रामचंद्र भिकाजी गुंजीकर

यांचे

संकलित लेख

(प्रथम खंड)

किं. २॥ रुपये

कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर

यांचे

संकलित लेख

प्रथम भाग

(भाषा, व्याकरण, लिपि वगैरे)

१९४२

किंमत रु. २-८-०

आभारनिवेदन

कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांचे लेख सध्या फार दुर्मिळ झाल्यामुळें मराठी साहित्याच्या अभ्यासकांची फारच गैरसोय होत असे. ती दूर करण्याकरितां त्यांच्या लेखांचें पुनर्मुद्रण करावें अशी सूचना अनेक मित्रांनीं वेळोवेळां केली होती. विशेषतः कै. आनंदराव तेलंग, म. भा. भू. आजगांवकर, श्री. रामभाऊ तटणीस व श्री. प्रियोळकर या मित्रांनीं तर फारच आग्रह केल्यामुळें गुंजीकरांच्या लेखांचा हा पहिला भाग आतां प्रसिद्ध होत आहे. यामध्यें त्यांचे भाषाविषयक लेख एकत्र केले असल्यामुळें मराठी व्याकरणाच्या अभ्यासकांना याचा विशेष उपयोग होईल अशी आशा आहे. हे लेख ज्या रूपानें वेळोवेळां प्रसिद्ध झाले त्या रूपानेंच येथें छापले आहेत; त्यामुळें कांहीं ठिकाणीं पुनरुक्ति व इतर कांहीं दोष राहून जाण्याचा बराच संभव आहे. परंतु सुज्ञ वाचकांना त्यांकडे दुर्लक्ष करून त्यांतील उपयुक्त भागाचें ग्रहण करावें असें सांगण्याची कांहीं जरूरी नाहीं.

या लेखांना चरित्रात्मक प्रस्तावना लिहिण्याचें काम मोठ्या हौसेनें स्वीकारून प्रकाशनाच्या कामीं अत्यंत महत्त्वाची मदत केल्याबद्दल श्री. प्रियोळकरांचा मी फार ऋणी आहें. त्याप्रमाणेंच श्रीलक्ष्मीनारायण प्रेसचे सर्व अधिकारी—विशेषतः श्री. तटणीस व श्री. मोरमकर—यांनीं पुस्तक सर्वांगसुंदर होण्यासाठीं फार कष्ट केल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यांत मला आनंद होत आहे.

हे लेख एकत्र करण्यामध्यें ' मुंबई युनिव्हर्सिटी लायब्ररी ', ' मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई ', ' ग्रंथसंग्रहालय, ठाणें ' व ' रॅायल एशियाटिक लायब्ररी, मुंबई ' या संस्थांची व त्यांतील अधिकाऱ्यांची फार मदत झाली. व त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

सरतेशेवटीं कै. गुंजीकरांचे कांहीं लेख, पत्रें, पुस्तकें वगैरे कोणाच्या संग्रहीं असतील तसेंच त्यांच्याविषयीं कांहीं उपयुक्त आठवणी कोणास असतील तर त्यांनीं आम्हांला तसें कळविण्याची कृपा करावी अशी विनंती करून ही प्रस्तावना पुरी करतों.

काशीनाथ रामचंद्र गुंजीकर

अनुक्रमणिका

विषय	पृष्ठ
रामचंद्र भिकाजी गुंजीकर (प्रस्तावना) ...	१–५९
परिशिष्ट–या भागांत न आलेले गुंजीकरांचे निबंध व ग्रंथ यांची यादी	६०–६४
१ मराठी भाषा	१
२ महाराष्ट्र–भाषेमध्यें व्याकरण आणि कोश यांची आवश्यकता	७
३ भरतखंडामध्यें एक भाषा करण्याचा विचार आणि नवीन विद्वानांचा अविचारीपणा ...	१३
४ भरतखंडांतील भाषांविषयीं—	२०
५ मराठी भाषेचे कोश	२३
६ देशभाषांची दुर्दशा	२७
७ आपल्या भाषेची स्थिति	३०
८ आपल्या भाषेचें पुढें काय होणार ?	३७
९ मराठी कविता	५४
१० काव्यविचार	६२
११ लघुलिपि किंवा चिटणीसी अक्षर	८४
१२ प्राचीन लिपि	८७
१३ बंगाली व्याकरण	९४
१४ कानडी भाषा	११३
१५ मराठी भाषा	१२२
१६ व्याकरणविवेचन	१३४

विषय					पृष्ठ
१७ व्याकरणविचार	...	...	...		१४०
१८ व्याकरणविषय	...	...	...	...	१६५
१९ मराठी व्याकरणावर विचार (निबंध १ ते ८)					१७८
२० महाराष्ट्रभाषेची वर्णयोजना			...	...	३४१
२० मराठी भाषेची लेखनपद्धति			...	...	३६४
२२ लहान मुलांकरितां **सुबोध व्याकरण** (स्वतंत्र पुस्तक)					३६७
२३ लेखनशुद्धि			,,	,,	४२३
२४ लाघवी लिपि			,,	,,	४३९
२५ Sanskrit Alphabet			,,	,,	४६१
२६ स्फुट विषय	...	...	...	...	४६८

मुद्रक व प्रकाशकः—**रा. का. तटणीस,** श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस,
३६४, ठाकुरद्वार—मुंबई.

कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर



जन्म ता. ३० एप्रिल १८४३

मृत्यु ता. १८ जून १९०१

रामचंद्र भिकाजी गुंजीकर

चरित्र व कार्य

आधुनिक मराठी ग्रंथकर्तृत्वाचा आरंभ

महाराष्ट्रांत इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर आधुनिक मराठी गद्यवाङ्मयाला सुरुवात झाली; परंतु आरंभीचें हें वाङ्मय प्राय: शालोपयोगी पुस्तकें किंवा इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें अशाच स्वरूपाचें परभृत होतें. देशी भाषेच्या अभिवृद्धीला प्रथम सरकारची सहानुभूति व मदत फार असे. १८१३ सालीं ईस्ट इंडिया कंपनीला जी सनद (Charter) देण्यांत आली, तिच्या अन्वयें वाङ्मयाचें पुनरुज्जीवन व अभिवृद्धि ("The revival and improvement of literature"), हिंदी विद्वानांना मदत आणि हिंदुस्थानांतील ब्रिटिश प्रजाजनांमध्यें शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार या गोष्टीकरितां म्हणून प्रांतिक उत्पन्नांतून निदान एक लाख रुपये बाजूला ठेवण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला मिळाला होता. १८१५ सालीं मुंबईमधील गरीब लोकांमध्यें शिक्षणाचा प्रसार करण्याकरितां मौन्टस्टुअर्ट एल्फिन्स्टन् यांच्या प्रोत्साहनानें एक खासगी स्वरूपाची विद्योत्तेजक सभा स्थापन झाली होती; पण पुढें १८२० सालीं या प्रांताचे गव्हर्नर म्हणून त्यांची नेमणूक झाल्यावर त्यांच्याच अध्यक्षतेखालीं याच उद्देशानें **बॉंबे एज्युकेशन सोसायटी** म्हणून एक संस्था जन्माला आली. पण त्या वेळीं पाठ्यपुस्तकें नव्हतीं. म्हणून १८२२ मध्यें '**नेटिव्ह स्कूल-बुक आणि स्कूल सोसायटी**' असें नामाभिधान धारण करून निराळी एक शाखा स्थापन झाली. हिलाच '**हइंदशाळा व शाळापुस्तकमंडळी**' किंवा पुढें 'मुंबईची शिक्षामंडळी' असें नांव देत. या संस्थेचे 'सक्रतार' कॅप्टन जार्ज जर्विस हे इंग्रज गृहस्थ होते. त्यांनीं शास्त्रीमंडळीच्या सहाय्यानें मराठी भाषेंत अनेक शालोपयोगी ग्रंथ तयार केले. या कामाला एल्फिन्स्टनसाहेब हे आपल्या जवळच्या मर्यादित शिलकेंतून सढळ हातानें मदत करीत. या रकमा मंजूर करतांना त्यांनीं जें टांचण (minute) लिहून ठेविलें आहे, त्यावरून त्यांची उदारबुद्धि

व दूरदृष्टि कळून येते. १८४० सालीं या सर्व मंडळ्या मोडून सरकारनें '**बोर्ड ऑफ् एज्युकेशन**' नांवाची संस्था स्थापन केली. अशा प्रकारें मराठी भाषेला उत्तेजन मिळून छत्रे, जांभेकर, माडगांवकर, हरि केशवजी, दादोबा पांडुरंग वगैरे ग्रंथकारांची पहिली पिढी उदयाला आली. १८४९ सालीं '**दक्षिण भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करण्याची मंडळी**' या नांवाची एक संस्था जन्माला आली. हिचे उत्पादक कर्नल फ्रेंच व कॅप्टन हार्ट हे इंग्रज गृहस्थ होते, हीही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. या संस्थेमार्फत 'देशव्यवहार-व्यवस्था', 'शास्त्रविज्ञानदर्शन', 'नानाफडणविसाची बखर' हे ग्रंथ प्रकाशित झाले. १८५१ सालीं सुप्रसिद्ध '**दक्षिणा प्राइझ कमिटी**' अस्तित्वांत आली. तिनें मराठी ग्रंथलेखनाला उत्तेजन देण्याचें कार्य चालू केलें. आरंभीं आपल्या लोकांची धांव केवळ भाषांतरावर होती; पण इंग्रजीचा पांगुळगाडा बाजूला टाकून स्वतंत्रपणें ग्रंथरचना करण्याची हांव व धमकही आपल्या लोकांमध्यें उत्पन्न झाली होती, हें माडगांवकरांचें मुंबईवर्णन, वि. ज. कीर्तन्यांचीं थोरले माधवराव पेशवे व जयपाळ हीं नाटकें, व कानविंदे, विष्णुबुवा ब्रह्मचारी, बाबा पद्मनजी वगैरेंचे स्वमतप्रतिपादनपर निबंध वाचल्यावर कळून येतें.

१८५७ सालीं **मुंबई युनिव्हर्सिटी** निघाली. सुरुवातीला मराठी भाषेचा थेट बी. ए. पर्यंत अभ्यासक्रमांत अंतर्भाव होता. सध्याच्यासारखी जरी त्या वेळीं युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड नव्हती, तरीपण मराठीला मिळालेल्या या महत्त्वामुळें मराठीच्या अभ्यासाला व ग्रंथलेखनाला मोठीच चालना मिळाली असली पाहिजे, हें उघड दिसून येणारें आहे.

वर उल्लेखिलेल्या संस्थांखेरीज १८६२ च्या सुमारास '**महाराष्ट्रजन-प्रबोधकविताप्रसारकमंडळी**' नांवाची एक नवी संस्था निघाली. तिनें 'नलनाटक' (लेखक—विनायकशास्त्री नातु) नामक एक ग्रंथ तयार करवून तो डॉ. भाऊ दाजी लाड यांस अर्पण केला आहे. देशी भाषांमध्यें जी ही भराभर ग्रंथनिष्पत्ति होत होती, तिच्याकडे इंग्लंडांतील 'रॉयल एशियाटिक सोसायटीचें' लक्ष वेधल्याखेरीज राहिलें नाहीं. या विद्वज्जनमंडळीनें हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी सर चार्लस् वुड यांना लिहून हिंदुस्थानांत प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांची यादी आपणांस मिळावी अशी इच्छा व्यक्त केली. तिला अनुसरून स्टेट सेक्रेटरींनीं हिंदुस्थानसरकारास लिहून अशा याद्या

तयार करण्याचा हुकूम दिला. मराठी ग्रंथाची यादी तयार करण्याचें हें काम कै. रा. ब. म. गो. रानडे यांच्याकडे सोपविण्यांत आलें. त्यांनीं १८२७ ते १८६४ अखेर प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची हकीकत तयार केली. ती १८६७ सालीं प्रसिद्ध झाली व याच सालीं **"सन १८६७ सालचा पंचविसावा ॲक्ट"** पास झाला. उपरिनिर्दिष्ट यादीप्रमाणें या कालांत गद्य ४२८ व पद्य २३३ असे एकंदर ६६१ मराठी ग्रंथ प्रसिद्ध झालेले दिसतात.

मुंबईंत 'महाराष्ट्र युनिव्हर्सिटी'!

देशी भाषेमध्यें शालेय पुस्तकें व कोश जे तयार झाले, त्यांच्याकरितां सरकारनें उदारपणें खर्च केला होता. तो कांहीं लोकांना पाहवत नसे. त्यांना वाटे कीं, देशी वाङ्मयाच्या उत्तेजनाकरितां जो हा खर्च केला तो अनाठायीं खर्च झाला; पाण्यांत फेकल्याप्रमाणें वायां गेला! या मताचे अध्वर्यु मेकॉले होते व त्यांची री ओढणाऱ्या देशी नवीन विद्वानांना वाण नव्हती; उलट रे. विल्सन, मि. शेक्स्पियर इ. लोक देशी भाषांचा जोरानें पुरस्कार करीत. पुढें हळुहळू देशी पक्ष मागें पडून इंग्रजीच्या अभिमान्यांची सरशी होत गेली. कै. सर फेराजशहा मेहता यानीं लंडन येथील धि ईस्ट इंडिया ॲसोसिएशनमध्यें १८६७ सालीं 'मुंबई प्रांतांतील शिक्षणपद्धति' या विषयावर जो निबंध वाचला, त्यांत Vernacularists या नांवानें प्रसिद्ध असलेले देशीवादी व Anglicists या अभिधानानें ओळखले जाणारे इंग्रजीवादी यांच्यामधील या रस्सीखेंचीची आपणास थोडीबहूत माहिती मिळते. (Speeches and writings of Sir P. M. Mehta, Ed. C. Y. Chintamani, 1905 पहा). अशा प्रकारें देशी भाषांना उत्तेजन देण्याच्या बाबतींत सरकारनें हात आंखडता घेतला; व देशी भाषांना मुख्यतः लोकाश्रयाची कास धरणें प्राप्त झालें.

इंग्रजी विद्येचा देशी लोकांमध्यें फैलाव करण्याचें उद्दिष्ट पुढें ठेवून १८५७ सालीं मुंबई युनिव्हर्सिटीची स्थापना करण्यांत आली होती. परंतु देशी भाषांना सुरवातीला तेथें मज्जाव नव्हता. पुढें १८६३ सालापर्यंत जे विद्यार्थी मराठी वगैरे देशी भाषा जोडभाषा म्हणून घेऊन प्रवेशपरीक्षा पास झाले असतील, त्यांचीच पुढें कॉलेजच्या परीक्षांमध्यें त्या भाषांची परीक्षा घेतली जाईल असें

जाहीर करण्यांत आलें. (Persons who matriculated before the close of 1863 may be examined in Portuguese, Marathi, Gujarati, Canarese, Hindustani, Persian or Sindhi–*Bombay University Calender*, 1865-66.) म्हणजे क्रमानें तीन वर्षांच्या अवकाशांत कॉलेजांतून देशी भाषेचें समूळ उच्चाटण व्हावें, अशा प्रकारची ही व्यवस्था होती.अर्थात् १८६७ सालीं मराठीचें कॉलेजांतील अस्तित्व संपलें. अशा परिस्थितींत **गुंजीकरांनीं** याच वर्षाच्या जुलै महिन्यांत आपल्या कांहीं मित्रांच्या मदतीनें '**विविधज्ञानविस्तार**' हें मासिक सुरू करून महाराष्ट्रांत नवें विविधज्ञानयुग निर्माण केलें; इतकेंच नव्हे तर या मासिकाच्याद्वारें त्यांनीं **मुंबईत महाराष्ट्र युनिव्हर्सिटीची स्थापना** केली, असेंही म्हणावयास मुळींच हरकत नाहीं. कारण पुढें एका लेखकानें म्हटल्याप्रमाणें '**विविधज्ञानविस्तारां**त आपला लेख छापून येणें म्हणजे मुंबई युनिव्हर्सिटीची एम्. ए.ची डिग्री मिळाल्याची मान्यता मिळणें होय,' असें लेखकांना पुढें वाटूं लागलें. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, 'विस्तारा'च्या पहिल्या वर्षीं (अं. ५) वायव्य प्रांतांतील चळवळ पाहून कां होईना, "आपल्या देशी भाषेंत युनिव्हर्सिटी (विद्वन्मंडळ) स्थापावें किंवा इंग्लिश विद्वन्मंडळासच देशी भाषेची एक शाखा जोडावी, असा आमच्या लोकांकडून सरकारास अर्ज केला जाण्याची आशा दूरच", असे खेदाचे उद्गार गुंजीकरांनीं काढले आहेत. देशी भाषेची स्वतंत्र युनिव्हर्सिटी असावी, अशी कल्पना किंवा महत्त्वाकांक्षा गुंजीकरांच्या पूर्वी कोणाही महाराष्ट्रीयाच्या डोक्यांत उद्भूत झाली नसेल. तेव्हां ह. भ. प. पांगारकरांनीं म्हटल्याप्रमाणें आपल्या प्राचीन साहित्यसेवकांची ज्याप्रमाणें पंढरी ही युनिव्हर्सिटी झाली, त्याप्रमाणें अर्वाचीन साहित्योपासकांची 'विविधज्ञानविस्तार' ही संस्था युनिव्हर्सिटीच झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. 'विस्तारा'मध्यें **विद्यालय** या सदराखालीं काव्यविचार, व्याकरणविचार, शाकुंतल वगैरे विषय प्रसिद्ध होत असत तेही या दृष्टीनें सहेतुक वाटतात. यासंबंधीं जास्त विचार करण्यापूर्वी ही महाराष्ट्र युनिव्हर्सिटीची प्रतिसृष्टि निर्माण करणारे विश्वामित्र, कै. रामभाऊ गुंजीकर यांच्या चरित्राचा आपण थोडा परिचय करून घेऊं.

गुंजीकरांचा कुलेतिहास, बालपण व प्राथमिक शिक्षण

बेळगांव जिल्ह्यांतील खानापूर परगण्यांत गुंजी* म्हणून एक गांव आहे. या गांवावरून रामभाऊंना गुंजीकर असें उपनांव प्राप्त झालें. त्यांचें वास्तविक उपनांव केंकरे. हें उपनांव गोमंतकांत अद्याप चालू आहे. कांहीं शतकांमागें गोमंतकांतून वरघाटीं आल्यावर त्यांच्या वतनाच्या गांवावरून त्यांच्या पूर्वजांना हें नवें आडनांव चिकटलें. गुंजीला हल्लीं मद्रास सदर्न मराठा रेल्वेचें स्टेशन आहे. गुंजीच्या या आद्य घराण्यांच्या शाखा (१) कापोली, (२) जांबोटी, (३) खानापूर व (४) अळणावर अशा बाजूच्या गांवांत पसरल्या व यांपैकीं जांबोटीच्या परगण्यांत रामभाऊंचा जन्म शके १७६५ शोभन नाम संवत्सर वैशाख शुद्ध प्रतिपदा रविवार (ता. ३० एप्रिल १८४३) रोजीं झाला.§ त्यांच्या वडिलांचें नांव भिकाजीपंत व आईचें लक्ष्मीबाई. भिकाजीपंत वत्सगोत्री ब्राह्मण असून कडक धार्मिक वृत्तीचे होते. लक्ष्मीबाईही आपल्या नांवाप्रमाणेंच आदर्श गृहिणी होत्या. त्यांना तीन मुलगे व एक मुलगी होतीः मंगेश (१८४१), **रामचंद्र** (१८४३), काशीबाई (१८४९) आणि गणपतराव (१८५१.)

गुंजीकरांचें प्राथमिक शिक्षण जांबोटीच्या मराठी शाळेंतच झालें. बेळगांवहून गोव्याला जाण्याच्या रस्त्यावरचा हा गांव आहे. बेळगांव जिल्ह्यामध्यें

---

* कुञ्जवनापासून गुञ्जी हें नांव आलें, असें गुंजीकरांनीं आपल्या बंधूंच्या चरित्रांत म्हटलें आहे; (वि. ज्ञा. वि. पु. ५८, पृ. १७४.) परंतु भाषाशास्त्राच्या नियमांप्रमाणें शब्दाच्या सुरुवातीच्या क चा ग होऊं शकत नाहीं. केंकरे या नांवाची उपपत्ति समजत नाहीं. महानुभावांच्या वाङ्मयांत " कांकैरे महादेवबोवा " असें नांव आढळतें. (स्मृतिस्थळ–सं. देशपांडे, पृ. २५) त्याचा व गोमंतकांतील केंकरे या उपनामाचा परस्परसंबंध आहे कीं काय, हें पाहाणें मनोरंजक होईल.

§ '**विविधज्ञानविस्तारां**'तील त्यांच्या मृत्युलेखांत रामभाऊंचा जन्मकाल ता. ८ एप्रिल १८४४ असा दिला गेला आहे. (वर्ष ३२, अं ३–४) ओक ता. १८ एप्रिल १८४३ असा जन्मकाल देतात. (बालबोध जुलै१९०१) वर दिलेला जन्मकाल स्वतःची वर सही असलेल्या त्यांच्या जन्मपत्रिकेवरून घेतलेला असून शके १७६५ च्या पंचांगावरून इंग्रजी तारीख निश्चित केली आहे.

अगदीं पहिल्या प्रथम ज्या थोड्या सरकारी शाळा स्थापन झाल्या होत्या, त्यांपैकीं ही एक शाळा होती. येथेंच गुंजीकरांनीं आपल्या महाराष्ट्रभाषेच्या ज्ञानाचा पाया घातला. संस्कृत भाषेचा अभ्यास देखील येथेंच त्यांनीं आपल्या वडिलांकडे केला असें म्हणण्यास जागा आहे. ते स्वतः आपल्या वडिलांसंबंधीं लिहितात, “ मुलांना सदाचरण लावणें या गोष्टीकडे उभयतां आईबापांचा मोठा कटाक्ष असे. मुलांना वेळच्या वेळेस शाळेंत पाठविणें आणि मधल्या वेळीं स्नानसंध्या, वैश्वदेव, पुरुषसूक्त, रुद्र, पवमान, रूपावलि, समासचक्र, अमरकोश, स्तोत्रें इत्यादि धर्मकृत्यांचें शिक्षण स्वतः तीर्थरूप देत असत. अभद्र भाषण, वाईट मुलांची संगत, चोरीचहाडी इत्यादि द्वाड कृत्यें मुलांना न लागूं देण्याविषयीं त्यांची सावधगिरी मोठी होती. देवपूजा, अध्ययन इत्यादि कृत्यांमध्यें त्यांचा बहुतेक काळ जात असे. कोणीही देवाची निंदा केली असतां, नास्तिकपणाचें भाषण केलें असतां किंवा त्यामध्यें प्रौढी मिरविली असतां त्यांना त्या गोष्टीचा तिटकारा येत असे; भूतपिशाचादिकांवर व त्यांच्या करणीवर त्यांचा अगदीं विश्वास नसे. छां छूं, थंतरमंतर वगैरे कृत्यें त्यांना बिलकुल आवडत नसत आणि असलीं कृत्यें आपला कुलदेव मांगिरीश शंकर याला मुळींच मान्य नाहींत, त्यांत यश नाहीं, यास्तव कोणीही आचरूं नयेत असें ते आपल्या घरच्या सर्व मनुष्यांना अंतःकरणपूर्वक निक्षून सांगत असत.” (विं. ज्ञा. वि. पु. ५८, पृ. १७८)

गुंजीकरांच्या संस्कृत ज्ञानाप्रमाणेंच पुढील आयुष्यांत दिसून आलेल्या त्यांच्या अंगच्या स्वाभिमान, सदाचार, सत्यप्रीति, बाणेदारपणा, शोधकबुद्धि वगैरे अनेक सद्गुणांचा उगम कोठें होता, हें आपणांस वरील उताऱ्यावरून स्पष्ट दिसून येईल.

बेळगांवास प्रयाण

जांबोटीसारख्या खेडेगांवांत मिळालेल्या मराठी व संस्कृत ज्ञानावरच गुंजीकरांची दुर्निवार ज्ञानपिपासा शमण्यासारखी नव्हती. म्हणून ते पुढील इंग्रजी शिक्षणाकरितां बेळगांवला गेले.* येथें त्यांचे वडील बंधु मंगेशराव

---

* आपल्या बंधूंच्या चरित्रांत हा प्रयाणकाल त्यांनीं १८६० असा दिला आहे; परंतु बालबोधकार तो १८५८ असा देतात. (बा. बो. जुलै १९०१, पृ. ७४)

इंजिनियर खात्यामध्यें कारकून होते; परंतु त्यांचा पगार बेताचा असल्यामुळें आपल्या धाकट्या भावाच्या शिक्षणाचा खर्च त्यांना झेपण्यासारखा नव्हता. बेळगांवांत मिशनशाळा १८३२ सालीं स्थापन झाली होती. या इंग्रजी शाळेंत, "मुलांस कांहीं फी द्यावी लागत नसे; परंतु उलट बहुत गरीब मुलांस दरमहा आठ आण्यांपासून तीन चार रुपयांपर्यंत सहाय्य मिळत असे." (अरुणोदय-बाबा पदमजी, १८८८, पृ. ३१) या शाळेचा आश्रय केल्यास गुंजीकरांसारख्या बुद्धिमान तरुणाला शिक्षणाची आर्थिक अडचण तितकीशी भासली नसती हें उघड आहे; परंतु परधर्मीयांकडून अशा प्रकारें फायदा घेणें त्यांना बिलकुल पसंत नव्हतें असें स्पष्ट दिसून येतें. मिशन् शाळा ही गरिबांकरितां होती. अशा संस्थेंत आपली मुलें पाठविणें ज्यांना कमीपणाचें वाटत असे, अशा दक्षिणेंतील सरदारांच्या मुलांकरितां म्हणून त्यांच्याच सहाय्यानें १८५० सालीं एक नवी इंग्रजी शाळा बेळगांवांत उघडली होती. सध्यांचें सरदार हायस्कूल तें हेंच होय. या शाळेंत अर्थातच फी जबर होती; परंतु गुंजीकरांनीं मुधोळकर सरदारांकडे वशिला लावून त्यांचें शिफारसपत्र मिळविलें व अर्धी फी माफ करून घेतली. सरदार हायस्कूल हें सरदारांच्या देणग्यांवर चाललेलें असल्यामुळें त्यांच्यामार्फत येणाऱ्या कांहीं मुलांना फी अगदींच माफ असे, किंवा तिच्यामध्यें कांहीं सवलत मिळे. अशा प्रकारें त्यांचें इंग्रजी शिक्षणाचें गाडें कसेंबसें मार्गाला लागलें. १८६० सालीं त्यांनीं पब्लिक सर्विसची परीक्षा दिली असें 'बालबोध'कार लिहितात; (पुस्तक २१ पृ. ७४) परंतु त्यांनीं नोकरी न धरतां आपला अभ्यास तसाच चालू ठेवला व सहाव्या इयत्तेपर्यंत त्यांनीं मजल मारलेली दिसते. या वेळीं मुंबईच्या एलिफन्स्टन कॉलेजांत शंकर पांडुरंग पंडित अभ्यास करीत असत. त्यांचेंही पूर्वशिक्षण सरदार हायस्कूलमध्यें झालें होतें, व तेथेंच त्यांची व गुंजीकरांची प्रथम ओळख झाली. त्यांच्या सल्ल्यावरून गुंजीकर पुढील शिक्षणाकरितां म्हणून मुंबईला गेले.* त्यांच्याबरोबर दुसरे एक सहाध्यायी मित्र रा. रा. वि. मोघे हेही होते, असें कै. देवानीं

---

* कै. बा. ना. देव यांनीं लिहिलेल्या गुंजीकरांच्या चरित्रांत १८६२ सालीं ते मुंबईला गेले, असें म्हटलें आहे. ओकांनीं बालबोधांतील उपरिनिर्दिष्ट लेखांत हें साल १८६३ असें दिलें आहे.

लिहिलें आहे. मुंबईला आल्यावर शिकवण्या वगैरे धरून केवळ स्वावलंबनाच्या जोरावर त्यांना आपला पुढील शिक्षणक्रम चालवावा लागला; शिवाय सरदार हायस्कूलमधूनही दहा रुपयांची एक स्कॉलर्शिप (Exhibition) मिळत होती. अशा प्रकारें १८६४ च्या नवंबरांत एलिफन्स्टन हायस्कूलांतून गुंजीकर प्रवेशपरीक्षेला बसले व पास झाले. गुंजीकरांबरोबर या वर्षी पास झालेल्या विद्यार्थ्यांत काशीनाथ त्र्यंबक तेलंग, नीलकंठ जनार्दन कीर्तने, श्रीपाद बाबाजी ठाकूर हीं आपल्या विशेष परिचयाच्या पुरुषांचीं नांवें झळकतात.

१८६४ सालची प्रवेशपरीक्षा

या वेळीं मॅट्रिक्युलेशनचा शिक्षणक्रम आजच्या शिक्षणक्रमापेक्षां कांहींसा निराळा होता. १ भाषा, २ गणितशास्त्र व ३ सामान्य ज्ञान (general knowledge) असे तीन विषय असत. भाषा या पहिल्या विषयांत इंग्रजीचा एक व संस्कृतादि प्राचीन किंवा मराठी वगैरे मातृभाषा अशा जोड भाषेचे दोन पेपर असत; व शिवाय दोन्ही भाषांत तोंडची परीक्षा असे. गणितशास्त्राचे अंक-गणित, बीजगणित व भूमिति असे तीन पेपर असत. सामान्य ज्ञानांत इतिहास, भूगोल, यंत्रशास्त्र (Mechanical powers), रसायनशास्त्र व सौर पद्धति यांचे मिळून तीन पेपर असत. ज्या परिस्थितींत गुंजीकरांनीं हें यश मिळविलें, ती लक्षांत घेतां त्यांच्या परिश्रमाचें व बुद्धिमत्तेचें कौतुक वाटल्याखेरीज राहत नाहीं. गुंजीकरांचे कौमुदीमहोत्साह वगैरे ग्रंथ, व व्याकरण व भाषाशास्त्र यांवरील सखोल आणि विद्वत्तापूर्ण निबंध वाचतां त्यांची जोडभाषा संस्कृत असावी, अशीच स्वाभाविक कल्पना होते. वास्तविक त्यांची जोडभाषा मराठी होती. सरदार हायस्कुलांत इंग्रजी भाषेच्या द्वारा संस्कृत शिकण्याची सोय नसल्यामुळें गुंजी-करांना मराठी ही जोडभाषा घ्यावी लागली असावी. पुढें मागें सांगितल्याप्रमाणें १८६३ सालानंतर जे विद्यार्थी मॅट्रिक पास झाले, त्यांना पुढल्या परीक्षेंत मराठी जोडभाषा घेऊन परीक्षेला बसण्याची बंदी झाल्यामुळें त्यांनीं कॉलेजांत संस्कृत भाषेचा नव्या पद्धतीनें अभ्यास केलेला दिसतो. कारण १८६६ च्या एप्रिलमध्यें कॉलेजच्या जुनियर स्कॉलर्शिपसाठीं घेतलेल्या परीक्षेंत संस्कृत विषयांत गुंजीकरांना सर्वांत जास्त म्हणजे ५० पैकीं ३१ मार्क मिळाले होते. (त्यांच्या खालोखाल काशिनाथपंत तेलंग यांना २९ मार्क मिळाले होते.) या परीक्षेचा उल्लेख पुढें येणारच आहे. १८६४ सालीं संस्कृत ही जोडभाषा

घेतलेल्या एकंदर मॅट्रिक्युलेशनच्या विद्यार्थ्यांत तेलंग व ठाकूर हीं दोनच नांवें आढळतात. १८६५ सालीं तर संस्कृत भाषा कोणीच घेतली नाहीं. संस्कृत भाषेसंबंधींची ही अनास्था पाहून कै. नाना शंकरशेठ यांचे चिरंजीव कै. विनायकरावजी यांनीं आपल्या पूज्य वडिलांचे स्मरणार्थ संस्कृतकरितां दोन स्कॉलर्शिपा ठेवल्या. यामुळें १८६६ सालीं संस्कृत जोडभाषा घेऊन एकंदर एकवीस विद्यार्थी बसले होते; व त्यांपैकीं यशवंत वासुदेव आठल्ये (रत्नागिरी हायस्कूल) व गोविंद श्रीपत शिखरे (धुळें हायस्कूल) यांना अनुक्रमें पहिली व दुसरी जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर्शिप मिळाली.

रामभाऊ गुंजीकर ज्या वर्षी मॅट्रिक पास झाले, त्या वर्षी एकंदर २४५ विद्यार्थी परीक्षेला बसले. याशिवाय गैरहजर चार ते निराळे. यांपैकीं ९२ सर्व विषयांत पास झाले, सतराजणांना एकाच विषयांत कांहीं कमी मार्क मिळाल्यामुळें वर चढविण्यांत आलें, असे एकंदर १०९ विद्यार्थी प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण झाले. अलीकडे मॅट्रिकच्या परीक्षेला बसणारे उमेदवार व त्यांतील यशस्वी विद्यार्थ्यांचें प्रमाण याच्याशीं हे आंकडे ताडून पाहाणें मनोरंजक ठरेल. रामभाऊ गुंजीकर, काशीनाथपंत तेलंग व नीळकंठराव कीर्तने यांना मिळालेल्या मार्कांचे आंकडे देतों, म्हणजे त्या वेळच्या परीक्षकांच्या औदार्याची व विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेची कल्पना होईल !

	इंग्रजी	जोडभाषा	गणित	सामान्य ज्ञान
एकंदर मार्क	१२५	२२५	३००	२००
पास होण्यास लागणारे	४१$\frac{२}{३}$	७५	७५	५०
गुंजीकर	४८	१११$\frac{१}{४}$	१६५$\frac{१}{२}$	७४$\frac{१}{२}$
कीर्तने	४०	१०२$\frac{१}{४}$	९२$\frac{१}{२}$	५०$\frac{१}{२}$
तेलंग	६८	१२०	१५९	७३

१८६४ सालीं मॅट्रिकला परीक्षक होते ते हे:—रे. स्टोथंर्थ व मि. ऑक्झेन्हॅम (इंग्रजी, इतिहास व भूगोल), डॉ. सिंक्लेयर व रे० ड्यू पोर्ट (गणित व सामान्यज्ञान), रे० विल्सन व डॉ. बुल्हर (संस्कृत), मेजर कँडी व रा. बाळ मंगेश वागळे (मराठी). मुंबई विश्वविद्यालयाची स्थापना १८५७ सालीं झाली असली तरी जुन्यांतली जुनी १८६४ सालचीच ही माहिती आज उपलब्ध असल्यामुळें ती मुद्दाम येथें दिली आहे.

कॉलेजांतील शिक्षण

मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास झाल्यावर गुंजीकरांनीं एलिफन्स्टन कॉलेजांत ता. २०–१२–१८६४ रोजीं नांव दाखल केलें. त्यावेळेस एलिफन्स्टन कॉलेज गवालिया तलावाचे बाजूस असलेल्या 'टँकरव्हिल' (Tankerville) नांवाच्या बंगल्यांत होतें. तेथें गुंजीकरांना फ्रीशिप मिळाली, व सरदार हायस्कूलमधून मिळालेली स्कॉलर्शिपही १८६५ साल अखेरपर्यंत चालू होती. त्यानंतर ४ महिने १० रुपयांची कॉलेजची जुनियर स्कॉलर्शिप मिळाली; व नंतर वर उल्लेख केलेल्या परीक्षेंत यश लाधल्यामुळें मे १८६६ पासून १५ रुपयांची स्कॉलर्शिप मिळूं लागली. (त्या काळीं एलिफन्स्टन कॉलेजांत स्कॉलर्शिपकरितां एप्रिल महिन्यांत स्वतंत्र परीक्षा घेण्यांत येत असत.) कॉलेजमध्यें असतांना त्यांना मराठी भाषेंतील उत्कृष्ट निबंधासाठीं ठेवलेलें ३५ रुपयांचें दुसरें बक्षिस १८६६ च्या आगष्टमध्यें मिळाल्याचा दाखला आहे. (त्या वर्षाचें पहिलें ४० रुपयांचें बक्षिस सुप्रसिद्ध वकील कै. घन:शाम नीळकंट नाडकर्णी यांनीं पटकाविलें होतें.) शिवाय त्याच वर्षी जुलैमध्यें त्यांना ड्राइंगच्या परीक्षेमध्यें १० रुपयांचें बक्षिसही मिळाल्याचा एलिफन्स्टन कॉलेजच्या दप्तरांत पुरावा सांपडतो. (त्या काळीं युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमाबाहेर कॉलेजांत चित्रकला व व्यायाम यांचेंही शिक्षण देण्यांत येत असे.) शिक्षणाचा खर्च भागण्याकरितां खासगी शिकवण्याखेरीज या अन्य मार्गांचा त्यांना उपयोग झाला असावा हें उघड आहे.

कॉलेजच्या शिक्षणाचा शेवट

बी. ए. पदवी मिळवयाला त्या काळीं तीन वर्षें कॉलेजांत घालवावीं लागत असत. सध्याच्या इंटरमिजिएट परीक्षेला त्या वेळीं 'फर्स्ट एग्झामिनेशन इन् आर्टस्' असें नांव होतें. चार टर्म्स भरल्यावर या परीक्षेला बसतां येत असे. परंतु दुर्दैवानें गुंजीकरांना आपला हा शिक्षणक्रम पुरा करतां आला नाहीं. त्यांना शिक्षण सोडून एलिफन्स्टन हायस्कुलांत सहशिक्षकाची नोकरी धरावी लागली. याचें नक्की कारण काय हें समजत नाहीं. खर्चाचे पैसे स्वकष्टानें मिळवून अभ्यास करणें त्यांना झेंपलें नसावें. गुंजीकरांनीं शिक्षण सोडण्याचें कारण कै. देव देतात तें असें:—"त्यांची पत्नी

एकाएकीं वारल्यामुळें संसाराची सगळी घडी विघडल्यासारखी झाली. त्यामुळें नाउमेद होऊन त्यांनीं कॉलेज सोडलें किंवा त्यांस तें सोडून निर्वाहमार्ग धरणें भाग पडलें. ही विमनस्कता दूर होण्यास कांहीं काळ गेला. पुढें त्यांचा द्वितीय संबंध मुंबईलाच जमून आला. याप्रमाणें विद्यार्थीदशेचा शेवट झाला.'' परंतु आमच्यापुढें असलेल्या स्वतः गुंजीकरांच्याच हातच्या टांचणावरून देवांचें हें विधान चुकीचें ठरतें. कारण त्यांच्या पहिल्या संबंधाच्या पत्नी सौ. जानकीबाई या श्रावण शु० ८ श० १७९० (११ ऑगस्ट सन १८६८) या दिवशीं दिवंगत झाल्या, असें त्यांनीं त्यांत लिहून ठेवलें आहे. तसेंच आपल्या नोकरीच्या आरंभींचा दिवस ता. ४ मार्च १८६७ असेंही दुसऱ्या एका कागदावर त्यांनीं टिपून ठेवलेलें आढळतें. विविधज्ञानविस्ताराचा पहिला अंक जुलै १८६७ रोजीं निघाला. या सर्व गोष्टींवरून त्यांच्या पत्नीचें निधन त्यांना कॉलेजला रामराम ठोकण्यास कारणीभूत झालेलें नाहीं, हें उघड दिसून येणारें आहे. परंतु त्यांच्या कुटुंबाचें दुखणें किंवा अशीच कांहींतरी कौटुंबिक अडचण त्या वेळीं उपस्थित झाली असावी असें वाटतें. कारण १८६६ च्या सप्टेंबर महिन्यापासून ते कॉलेजांत गैरहजर दिसतात. त्या काळीं स्कॉलर्शिप किंवा फ्रीशिप घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रत्येक गैरहजिरीच्या दिवसाची स्कॉलर्शिप किंवा फी कापून घेतली जात असे. १८६६ च्या सप्टेंबरमध्यें ते सात दिवस गैरहजर होते, व त्याबद्दल त्यांच्या १५ रुपये स्कॉलर्शिपपैकीं ३॥ रुपये कापून घेतलेले आढळतात. अशा स्थितींतच नवंबर महिन्यांत ते फर्स्ट एग्झामिनेशन इन् आर्ट्स या परीक्षेला बसलेले दिसतात. परंतु दुर्दैवानें त्यांत त्यांना यश मिळालें नाहीं. व अशा प्रकारें त्यांच्या शिक्षणाचा तेथेंच शेवट झाला.

एल्फिन्स्टन हायस्कुलचा उगम व विकास

वर सांगितल्याप्रमाणें १८६७ सालीं एल्फिन्स्टन् हायस्कुलमध्यें नोकरी धरल्यावर सुमारें वीस वर्षें त्यांनीं तेथें काम केलें व पुढें १८८८ सालीं हुबळी येथील अँग्लोव्हर्न्याक्युलर शाळेंत त्यांची हेडमास्तर म्हणून नेमणूक करण्यांत आली. तिकडून १८९२ सालीं बेळगांव जिल्ह्याचे असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर या अधिकारावर त्यांची बढती झाली व या जागीं आपलें काम उत्कृष्टपणें करीत असतांना १८९८ सालीं ऑगस्टच्या ३१ व्या तारखेला ते सवानिवृत्त झाले. म्हणजे आपल्या सुमारें तीस वर्षांच्या नोकरींतील वीस

वर्षें त्यांनीं एलिफन्स्टन हायस्कुलमध्यें अध्यापनकार्यांत घालविलीं. एलिफन्स्टन हायस्कुल या संस्थेचा उगम मागें सांगितल्याप्रमाणें एलिफन्स्टनसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झालेल्या संस्थेंतूनच झाला. गोविंद नारायण माडगांवकर आपल्या १८६३ सालीं प्रसिद्ध झालेल्या 'मुंबईवर्णनांत' या विद्यालयाच्या स्थापनेसंबंधीं लिहितात, " सन १८२१ त मेहरबान मौंटस्टुअर्ट एल्‌फिन्स्तन्‌साहेब मजकूर यांनीं पाहिलें कीं, राज्यांत दुसरा सर्व बंदोबस्त चालला आहे. परंतु या देशाच्या लोकांना स्वभाषेमध्यें पूर्ण ज्ञान होऊन इंग्रजी विद्या प्राप्त होण्याचीं साधनें करून ठेवल्याशिवाय त्यांच्या संपत्तीचें रक्षण करणें निष्फल आहे. तर सरकारी नात्यानें मुंबईंत एक विद्यालय स्थापावें. त्यांत संस्कृत, मराठी, गुजराथी, उर्दू इत्यादि एतद्देशीय भाषा शिकवून त्यांजकरवीं इंग्रजी भाषेचा अभ्यास करवावा; म्हणजे त्याला युरोपखंडांतील अनेक विद्यांचें परिज्ञान होऊन ते योग्यतेस चढतील आणि हेंच कृत्य त्यांच्या वंशपरंपरें चालेल व जेणेंकरून आपल्या प्रभूचें कृतज्ञतापूर्वक चिरकाल स्मरण करितील. असें मनांत आणून या देशाचें अभीष्ट चिंतणारे मुंबईंतील शेट सावकार व दुसऱ्या संभावित लोकांची एक सभा मिळविली. आणि आपला हा स्तुत्य उद्देश त्यांस दर्शविला. व आपण स्वतः या कामास एक मोठी रक्कम भरली. मग इतर गृहस्थांनीं कोणी पांच, कोणी दोन, कोणी हजार अशी आपआपल्या शक्त्यनुसार या उदार कृत्यास वर्गणी दिली. असें सांगतात कीं, या प्रसंगीं आपल्या लोकांनीं आपला उदारपणा व आनंद प्रदर्शित केला, तसा कोणत्याच वेळीं केला नव्हता. याप्रमाणें मुंबईंतील गृहस्थांकडून वर्गणी जमली. एवढ्यानेंच हे दयाळू व परोपकारी गृहस्थ स्वस्थ राहिले नाहींत. मुंबई इलाख्यांतील जे संस्थानिक लोक होते, त्या सर्वांस पत्रें लिहून हा आपला उद्देश कळविला आणि हें कृत्य सिद्धीस नेण्यास त्यांजकडून मदत मागितली, आणि त्यांनींही उदारपणें बरेंच द्रव्य पाठवून दिलें. द्रव्याची विपुलता झाल्यानंतर १८२२ आगस्ट २१ या दिवशीं नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी या नांवाची एक मोठी शाळा स्थापिली. या शाळेसाठीं कापाच्या मैदानांत एक इमारत बांधिली. त्या वेळीं ती लहान होती, परंतु आतां वाढविली आहे. मग मुंबईंत एक दोन ठिकाणीं शाळा घातल्या. एथूनच मुंबईंतील सर्व शाळांचा उगम. ह्या शाळेची भरभराट होतांच मुंबई इलाख्यांत देशोदेशीं व शहरोशहरीं आणि गांवोगांवीं शाळा

स्थापिल्या आणि अद्याप स्थापितच आहेत. हल्लीं या शाळेस एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशन् असें नांव दिलें आहे. हिच्याचसंबंधानें एल्फिन्स्टन पाठशाळा काढिली आहे......मराठी भाषेचा उदय होण्यास हेंच विद्यालय कारणीभूत झालें. पूर्वी मराठी भाषा म्हणजे रानटी व अज्ञानी लोकांची भाषा असें मानून ती शिकायास कोणी परिश्रम घेत नसत. व त्या भाषेंत कोश, व्याकरण, गद्य-पद्यादि ग्रंथ नसल्यामुळें शास्त्री, पंडित व पुराणिक मराठी भाषेंत कोणी कांहीं लिहायास लागला म्हणजे त्याचा उपहास करीत. परंतु ही शाळा स्थापित झाल्यापासून मराठी भाषेंत व्याकरण, कोश, व अनेक ग्रंथ निघूं लागले. त्यामुळें लोकांचे डोळे उघडून मराठी भाषा कांहीं उपयोगाची आहे असें त्यांस वाटूं लागलें." (पृ. २२७–३०)

गुंजीकरांच्या आठवणी

गुंजीकरांच्या एल्फिन्स्टन हायस्कुलांतील एका शिष्यानें सांगितलेल्या आठवणी कै. बा. ना. देव यांनीं 'विस्तारां'त (वर्ष ५८, पृ. १६२–३) प्रसिद्ध केल्या आहेत. त्या वाचून पाहतां गुंजीकरांच्या मनाचा कल केवळ परीक्षेकरितां माल तयार करण्याचा नव्हता, असें स्पष्ट दिसतें. हा त्यांचा शिष्य म्हणतोः—

"गुंजीकर वर्गांत नेमलेलीं इंग्रजीं पुस्तकें मराठी भाषेच्या द्वारें शिकवीत असत, त्यामुळें आम्हांला त्यांतील हृद्गत व रहस्य, मर्म, खुब्या इत्यादि प्रकार सहज कळून मनावर ठसत. तसे इंग्रजी भाषेंतून ते समजून दिले असते तर तें कळणें शक्य नव्हतें. साधारणतः जन्मभाषेच्या द्वारें परभाषेंतील ज्ञान जसें अनायासें सहज मनांत उतरतें, तसेंच अन्य मार्गानें साधणें कठिणच खरें अशी माझी खात्री आहे.

"गुंजीकरांविषयीं माझा जो पूज्यभाव होता, त्यांत भयाचा विटाळ बिलकुल नसे. गुंजीकरांच्या वर्तनांत भयोत्पादक असें कांहींच वाटत नसे. उलट सौम्यपणा, व सालसपणा यांचाच ठसा मनावर उमटे. त्यापासून प्रेमळपणास अवकाश मिळे. मराठी भाषेवरचें त्यांचें प्रभुत्व पाहून सर्वांस नवल वाटे. इंग्रजी मूळ ग्रंथ पुढें धरून त्यांतील नेमलेला धडा किंवा भाग मराठी भाषेंत मोठ्यानें वाचल्याप्रमाणें ते तोंडानें बोलून दाखवीत. जसें कांहीं त्याचें मराठी

भाषांतर किंवा रूपान्तर घरून करून आणून मग वर्गांत ते नुसतें वाचून मात्र दाखवीत आहेत! इतकी त्यांची आकलनशक्ति आणि विशदीकरणसामर्थ्य व्यापक व अन्तर्भेदक असे!

"याशिवाय दुसरी गोष्ट म्हटली तर गुंजीकरांच्या शिकविण्यांत वेळेनुसार विषयांतर वारंवार होत असे. त्यामुळें वादविवादाचे प्रसंग येत, आणि मुख्य विषय बाजूलाच पडून राही. त्यापासून हुषार विद्यार्थ्यांच्या बहुश्रुतपणांत भर पडत असे हें खरें. त्यांची सदभिरुचि प्रदीप्त होई; ज्ञानाचा विकास होण्यास मदत होई; पण वर्गांतला नियमित अभ्यास मागसत असे आणि नुसती परीक्षा पास होण्याकडेसच पाहाणाऱ्या पोटार्थी व भाडोत्री विद्यार्थ्यांना या सर्व गोष्टी निरुपयोगी वाटत, आणि त्यांच्या दृष्टीनें तें खरेंही होतें.

"गुंजीकरांस मानवी स्वभावाचें ज्ञान चांगलें व्यापक, गहन, पोक्त व अंतर्भेदक असे. आमच्या वेळीं या शाळेंत गुजराती व मराठी असे दोन तट असत. त्यांच्यांत वारंवार खटका उडण्याचे प्रसंग येत. पहिल्या तटांतील मुलें सशक्त, सधन, दांडगीं व मोठीं होतीं. आणि दुसऱ्यांतील त्याच्या उलट म्हणजे लहान, गरीब, सालस व सभ्य असत. त्यामुळें त्यांच्यांत कलागती लागून हातघाईपर्यंत मजल येत असे. पण कमकुवतीमुळें दुसरा पक्ष त्याला चीत् असे. म्हणून पहिल्या पक्षास फूस मिळे आणि चेव येई. तो दुसऱ्याच्या वाटेस मुद्दाम जाई. ही गय करणें त्यांस उत्तेजक होई. असें होतां होतां ही तक्रार एकदां गुंजीकरांकडे गेली. तेव्हां त्यांनीं आमचें म्हणणें शांतपणानें ऐकून घेतलें आणि त्याच्या प्रत्युत्तरादाखल आम्हांस जो बोध केला, तो खरोखर अमोल होता. ते म्हणाले, 'तुमचा जो छळ होतो म्हणून तुम्हीं सांगतां त्यास तुम्हीं पात्र असल्यावांचून तो तुम्हांस सोसावा लागला नसता. जर तुमच्या बाजूस सत्य, सालसपणा, निरपराधीपणा व भलेपणा असता तर मग तुम्हीं हा त्रास व छळ मुकाट्यानें खास सोसला नसता, आणि त्यास भिऊन ही कागाळी मजकडे आणली नसती. तुमचा हा भ्याडपणा व दुबळेपणा पाहून मला तुमची फार कींव येते.' "

'विस्तार'पूर्व नियतकालिकें

महाराष्ट्रांतील आधुनिक लोकशिक्षणाचा पाया कसा घातला गेला व इंग्रजी वाङ्मयाच्या अनुकरणानें महाराष्ट्रांत ग्रंथलेखनाला सुरवात कशी झाली,

याची त्रोटक माहिती वर आलीच आहे. ग्रंथलेखनाबरोबर वर्तमानपत्रें, मासिकें, त्रैमासिकें, वगैरे नियतकालिकांचा वाङ्मयप्रकारही आपल्याकडे प्ररूढ होणें अपरिहार्यच होतें, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. मराठींतील पहिलें मासिक **दिग्दर्शन** हें १८३७ सालीं बाळशास्त्री जांभेकर यांनीं सुरू केलें. याहीपूर्वी १८३२ सालीं **दर्पण** नांवाचें एक पत्रही त्यांच्याच संपादकत्वाखालीं निघूं लागलें होतें. या पत्रांतील लेखांवर खूष होऊन त्या वेळचे गव्हर्नर सर जेम्स कर्नाक यांनीं त्यांना 'जस्टिस ऑफ् धि पीस' ही पदवी बहाल केली असें दादोबा पांडुरंग यांनीं आत्मचरित्रांत लिहिलें आहे. (मूळ हस्तलिखित. पृ. २६१) यावरून या पत्राचें धोरण राजकर्त्यांच्या प्रकृतीला मानवणारें होतें, असें सिद्ध होतें. पुढें त्यांचेच एक सहकारी भाऊ महाजन यांनीं **प्रभाकर** नांवाचें साप्ताहिक चालू केलें. त्यांत इंग्रजी राजकर्ते व युरोपियन लोक यांच्यावर खरमरीत टीका प्रसिद्ध होत असे. यानींच पुढें १८५४ सालीं **ज्ञानदर्शन** नांवाचें त्रैमासिक काढलें होतें. १८४८ सालीं एल्फिन्स्टन विद्यालयांत उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा म्हणून एक संस्था स्थापन झाली होती. तिच्यापुढें वाचण्यांत येणाऱ्या निबंधांचा संग्रह करण्याकरितां म्हणून १८५० सालीं मासिक **मराठी ज्ञानप्रसारक** जन्मास आला व त्याच्या नांवास साजणारे असे विविध विषयावर निबंध त्यांत प्रसिद्ध होऊं लागले. जांभेकरांच्या **दिग्दर्श**नांत किंवा महाजनांच्या **ज्ञानदर्शनांत** ऐतिहासिक व शास्त्रीय विषय प्रसिद्ध केले जात. परंतु लोकांना कांहीं तरी झणझणीत क्षोभजनक हवें असतें. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं इंग्लंडांत जन्माला आलेल्या **एडिंबरो रिव्ह्यू** किंवा त्याचा विरोधी **क्वार्टर्ली रिव्ह्यू** वगैरे नियतकालिकांत राजकारणांतील स्पर्धेमुळें साहजिकच झणझणीतपणाला वाव मिळत असे. एडिंबरो रिव्ह्यूचा संपादक जेफ्री म्हणतो, "The Review, in short has but two legs to stand upon. Literature no doubt is one of them; and its right leg is politics." आपल्याकडे त्या काळीं पक्षप्रधान राजकारणाचा जन्मच झाला नव्हता. तेव्हां जेफ्रीनें म्हटल्याप्रमाणें स्पर्धायुक्त राजकारणाच्या या उजव्या पायाची जागा आपल्याकडे धर्मकारणानें भरून काढली. ख्रिस्ती मिशनऱ्यांचा प्रवेश हिंदुस्थानांत नुकताच झाला होता. त्यांनीं आपल्या धर्मप्रसाराचें मुखपत्र म्हणून **ज्ञानोदय** नांवाचें पाक्षिक

(१८४२) व **सत्यदीपिका** नांवाचें मासिक (१८६१) सुरू केलें. त्यांच्यामध्यें हिंदु धर्मावर व हिंदु आचारविचारांवर होणाऱ्या हल्ल्यांना तोंड देण्यांकरितां **उपदेशचंद्रिका** (१८४४) **विचारलहरी** (१८५२), **सद्धर्मदीपिका** (१८५५) अशीं पत्रें निघालीं. यांशिवाय स्वतंत्र आत्म-संशोधन करून आपल्यांतील दोष काढून टाकणें व समाजामध्यें जागृति करणें याकरितां **ज्ञानप्रकाश** (१८४९), **वर्तमानदीपिका** (१८५४), **प्रभोदय** (१८६१), **सत्यदीपिका** (१८६१) **धुमकेतु (?)**, **इंदुप्रकाश** (१८६३) अशीं पत्रें; किंवा विशिष्ट विषयाला वाहिलेलीं अशीं **सर्वसंग्रह** (१८६०) **न्यायाश्रम** (१८६६) अशीं मासिकें निघालीं. परंतु यांचा आपआपल्यापरी कितीही उपयोग असला तरी मराठी भाषेला जगांतील सुधार-लेल्या भाषांबरोबरचें मानाचें स्थान प्राप्त करून देण्याचें व महाराष्ट्रामध्यें विविध ज्ञानाचा फैलाव करून त्याची सर्वांगीण उन्नति करण्याचें कार्य यांच्या हातून होण्यासारखें नव्हतें, हें गुंजीकरांनीं जाणलें. १८६७ च्या सुमारास ज्ञानप्रसारक सोडला तर मुंबईंत नांव घेण्यासारखें मासिक राहिलें नव्हतें. शिवाय ज्ञानप्रसारकाचें कार्य एल्फिन्स्टन विद्यालयाच्या ज्ञानप्रसारक सभेपुढें वाच-ण्यांत येणारे निबंध प्रसिद्ध करण्यापुरतें मर्यादित होतें. अशा स्थितींत एक स्वतंत्रच प्रयत्न व्हावयास हवा होता. सरकारच्या त्या काळच्या देशभाषांविष-यींच्या बदललेल्या धोरणामुळें हें काम जितकें कठीण झालें होतें, तितकीच त्याची आवश्यकताही वाढली होती. १८६५ साला पासूनच म्हणजे कॉलेजमध्यें असतांनाच गुंजीकरांच्या मनाला या गोष्टीची चुटपूट व रुखरूख लागून राहिली होती असें दिसतें. पुढें १८६७ सालीं म्हणजे कॉलेज सोडून नोकरी धरल्या-बरोबर चार पांच महिन्यांनींच त्यांनीं **'विविधज्ञानविस्तार'** सुरू करून आपला कृतसंकल्प तडीला नेला. याच्या पूर्वी १८६६ मध्यें **मित्रोदय** नांवांच्या पत्रामध्यें ते लेख लिहीत, असा उल्लेख सांपडतो; परंतु या पत्राचे संपादक कोण होते यासंबंधीं जास्त माहिती मिळत नाहीं.

विविधज्ञानविस्ताराची स्थापना

आरंभीं **विविधज्ञानविस्तार** गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत छापिला जात असे. गुंजीकरांबरोबर बेळगांवहून आलेले त्यांचे उपरिनिर्दिष्ट सहाध्यायी मित्र रा. रामचंद्र नीलकंठ मोघे हे त्या मासिकाचे प्रकाशक होते,

गुंजीकर सरकारी नोकरींत असल्यामुळें असो किंवा अन्य कारणामुळें असो, त्यांचें नांव संपादक म्हणून 'विविधज्ञानविस्तारा'वर कधींही झळकलें नाहीं. त्यांच्यानंतर **हरि महादेव पंडित** किंवा **रामभाऊ मोरमकर** यांनींही संपादक म्हणून आपलें नांव या पुस्तकावर कधींही छापलें नाहीं. शंकराचार्य, कबीर, नानक यांचें कार्य पुढें चालविणारा त्यांच्या परंपरेंतील पुरुष ज्याप्रमाणें आद्य संस्थापकाचें नांव घेऊनच त्यांचें काम पुढें चालवी, तसाच 'विस्तारा'च्या बाबतींतही प्रकार दिसतो. याविषयीं पुढील संपादकांची स्पष्ट कबुलीच आपणास सांपडते, ती अशी: "या पुस्तकाचें त्याच्या पहिल्या पांचसात वर्षेपर्यंत मुख्य संपादकाचें काम त्याचे जनक रा. रा. **रामचंद्र भिकाजी गुंजीकर** यांनीं केलें. त्यांनीं तें काम सोडल्यापासून विविधज्ञानविस्ताराचा संपादक (Chief Editor) असा कोणी नाहीं. निरानिराळे लेखक आपआपल्या आवडीचे लेख लिहून देतात व गुंजीकरांनीं जो कित्ता घालून दिलेला आहे त्या वळणाचे ते लेख असले म्हणजे विविधज्ञानविस्तारांत प्रविष्ट केले जातात. तेव्हां **परोक्षतया** कां होईना, गुंजीकर हेच मुख्य संपादक आहेत असें म्हटलें असतां वावगें होणार नाहीं." (वि. ज्ञा. वि. वर्ष २२, पृ० १३) गुंजीकर 'विस्तारा'चे पहिलीं सात वर्षें प्रत्यक्ष असे संपादक होते. या कालांत त्यांनी 'विस्तारा'मध्यें बहुविध लेख लिहिले. ते वाचले असतां त्यांच्या चतुरतेची व वाङ्मयांतील चतुरस्रतेची स्पष्ट कल्पना होते. निरनिराळे जे मुख्य मुख्य वाङ्मयविषयक प्रश्न पुढील काळांत महाराष्ट्रासमोर आले, त्यांचीं बीजें आपणास या त्यांच्या लेखांतून दिसून येतात.

विष्णुशास्त्री चिपळूणकर विविधज्ञानविस्तारासंबंधीं निबंधमालेच्या पहिल्याच अंकांत म्हणतात, "त्याची भाषा शुद्ध व प्रौढ असून त्यांतील विषयही महत्त्वाचे असतात. तारखेच्या तारखेला अंक काढून वर्गणीदारांच्या टपक्यांतून सुटावें एवढीच इच्छा न धरतां हातीं घेतलेल्या कामाचा बोज त्यास चांगला कळतोसें स्पष्ट दिसतें. त्यांतील लेखांवरून लिहिणारांचा देशाभिमान, निर्भीडपणा, निर्मत्सरता, गुणग्राहित्व वगैरे उत्कृष्ट गुण सर्व व्यक्त होतात."

गुंजीकर व चिपळूणकर

आपल्या मायबोलीसंबंधीं जो अभिमान महाराष्ट्रामध्यें प्रथम जागृत केला, त्याचे आद्य जनक 'माला'कारच होत, अशी अलीकडील पुष्कळ लोकांची

समजूत आहे. परंतु गुंजीकरांच्या संकलित लेखांच्या प्रस्तुत पहिल्या खंडांतील, 'मराठी भाषा', 'नवीन विद्वानांचा अविचारीपणा', 'देशी भाषांची दुर्दशा', 'आपल्या भाषेची स्थिति' (पृ. १ ते ३७ पहा) हे निबंध पाहिले म्हणजे 'माले' पूर्वींच मराठी भाषेचा जयजयकार गुंजीकरांनीं अत्यंत जोरानें, पोट-तिडिकेनें व यशस्वी रीतीनें केला होता, असें आढळून येईल. गुंजीकर ज्या वर्षी मॅट्रिक झाले, त्याच्या पुढच्याच वर्षीं म्हणजे १८६५ सालीं विष्णुशास्त्री चिपळूणकर आपली प्रवेशपरीक्षा उतरले. विष्णुशास्त्री इंग्रजी भाषेत पारंगत होते, असें त्यांचे या परीक्षेंतील मार्क पाहून दिसून येतें. इंग्रजीमध्यें त्यांना १२५ पैकीं ७१ मार्क मिळाले होते. त्या काळच्या मनोवृत्तीप्रमाणें यामुळें स्वभाषेकडे त्यांचें दुर्लक्ष होणें स्वाभाविक होतें. आपलीं खासगी पत्रें व डायरी देखील ते इंग्रजीमध्यें लिहीत, त्यावरूनही त्यांच्या मनाचा कल दिसून आल्या-खेरीज राहत नाहीं. परंतु 'नवीन विद्वानांचा अविचारीपणा,' 'देशी भाषेची दुर्दशा' वगैरे गुंजीकरांच्या उपरिनिर्दिष्ट जोरदार लेखांनीं तरुण चिपळूणकरांचें संस्कार-सुलभ चित्त सावरलें व त्यांचें लक्ष स्वभाषेकडे वळविलें, असें असणें पुष्कळच संभवनीय आहे. गुंजीकरांच्या व चिपळूणकरांच्या लेखांतील विचारसाम्यामुळेंच नव्हे तर **आमच्या भाषेची स्थिति,** (वि. ज्ञा. वि. डिसेंबर १८७३) व **मराठी भाषेची सांप्रतची स्थिति** (निबंधमाला—जाने० १८७४) या निबंधांच्या शीर्षकांच्या साम्यावरूनही निबंधमालेचें पहिलें पुष्प गोवतांना विष्णुशास्त्र्यांपुढें नुकताच प्रसिद्ध झालेला 'विस्तारा'चा अंक पडला असावा असें वाटूं लागतें. 'विस्तार'कर्त्याविषयीं 'माला'कारांच्या मनांत वसत असणारा आदर 'माले'च्या पहिल्याच अंकांतील उद्गारांवरून स्पष्ट होतो. गुंजीकरांनांही चिपळूणकरांसंबंधीं किती कौतुक वाटे व त्यांच्या विषयीं कितीतरी मोठ्या आशा होत्या, ह्याचा उल्लेख पुढें येणारच आहे.

गरमपणाची दीक्षा व त्याचे जाचक परिणाम

विविधज्ञानविस्तार हें सात्त्विक व वाङ्मयात्मक विषयांना वाहिलेलें मासिक होतें. त्यांत प्रचलित धार्मिक, सामाजिक, राजकीय वगैरे विषयांवर खरमरीत लेख लिहितां येत नसत. शिवाय त्याचे संपादक गुंजीकर हे सरकारी नोकर आहेत याचाही विचार करावा लागे. परंतु अशा झणझणीत लेखांची तर त्या वेळीं फार आवश्यकता होती. म्हणून गुंजीकरांच्या कांहीं मित्रांनीं **'दंभहारक'**

नांवाचें मासिक काढण्याचें ठरविलें व त्याच्याशीं सहकार्य करण्याचें गुंजीकरांनीं कबूल केलें. या मासिकाचा पहिला अंक ता. १० अक्टोबर १८७१ रोजीं निघाला. याचा मूळ हेतु व मुख्य उद्देश "स्पेक्टेटराप्रमाणें केवळ लोकहित-वादाचा" होता. स्वधर्म, स्वभाषा व स्वसंस्कृति यांच्यावर होणारे हल्ले तित-क्याच बेछूटपणें परतविण्याचा या मासिकाचा रोख असे. विशेषतः ख्रिस्ती मिशनऱ्यांवर या मासिकामध्यें जशाला तसें या न्यायानें जोराचे प्रहार केले जात. या मासिकासंबंधीं चिपळूणकर 'माले'च्या पहिल्याच अंकांत लिहितात, "भाषा शुद्ध असते. पण ज्याच्यात्याच्यावर हल्ला धरण्याचा जो त्यानें बाणा उचलला आहे तो विचारी मनुष्यास खास आवडणार नाहीं...... आतां आपल्या धर्माच्या तर्फे भांडून त्याच्या प्रतिपक्ष्यांचें खंडण करणें हाच जर त्याचा उद्देश असेल, तर तो आमच्या कांहीं लोकांस मानवेल यांत संशय नाहीं व पाद्री बाटे वगैरे लोकांच्या जो तोंडीं लागेल त्यानें कांहीं अंशीं जशास तसें केल्यावांचूनही उपाय नाहीं हें खरें आहे. तरी या कामींही आमच्या देशबंधूनें आपली इतकी विटंबना करून घ्यावी हें आम्हांस सहन होत नाहीं." महाराष्ट्रांतील वैयक्तिक टीकालेखांचे आद्य प्रवर्तक म्हणून ज्यांच्यावर उघड आरोप केला जातो त्या शास्त्रीबुवांचे हे संभावितपणाचे उद्गार वाचून कुणालाही नवलच वाटेल; परंतु नरम वृत्तीच्या चिपळूणकरांना गरमपणाची दीक्षा द्याव-याला 'दंभहारक'च अखेर कारणीभूत कसा झाला याची माहिती पुढें येईलच.

किरकोळ मतभेद सोडले, तर गुंजीकर व चिपळूणकर यांच्यामध्यें महत्त्वाच्या बाबतींत पूर्ण मतैक्य होतें. गुंजीकरांचीं मासिकें किंवा चिपळूण-करांची 'माला' यांच्यामध्यें खटके उडाले नाहींत असें नाहीं, पण 'विस्तारां'तील ज्या लेखावर मालाकारांचा घुस्सा होता तो मोरोपंतावरील निबंध गुंजीकरांचा नसून कै. गंगाधर गोविंद शिनारी यांच्या हातचा होता. तसेंच पांगारकरांनीं आपल्या 'मोरोपंत' या सुंदर ग्रंथांत गुंजीकरांचा म्हणून ज्या मालेवरील खंडणपर लेखाचा उल्लेख केला आहे, तो 'विस्तारां'तील लेख (वर्ष १२, अं. ५, ६, ७) वास्तविक वा. दा. ओक यांचा आहे. प्रसाद व युक्तिवाद हे गुंजीकराचे, तर आवेश व चटकदारपणा हे चिपळूणकरांचे लेखनशैलीचे विशेष गुण म्हणून सांगतां येतील. दोघेही सरकारी शाळाखात्यांतील नोकर होते. दोघांचींहीं मतें वरिष्ठ अधिकाऱ्यांना मानवणारीं नव्हतीं. विष्णुशास्त्र्यांचा

घरखर्च थोरल्या शास्त्रीबुवांच्या मिळकतींतून प्रथम चाले व त्यांचा स्वतःचा पगार शिलकीं पडे. निबंधमालेंतूनही त्यांना प्राप्ति होई. अशा स्थितींत त्यांना नवीन शाळा किंवा छापखाना वगैरे स्वतंत्र उद्योग करतां आले व त्यामुळें त्यांनीं सरकारी नोकरीची पर्वा न करतां अखेर आपल्या विचारस्वातंत्र्याचें रक्षण करण्याकरितां तिचा राजिनामा दिला. बिचाऱ्या गुंजीकरांची अशी परिस्थिति नसल्यामुळें 'विस्ताराचें' विचारस्वातंत्र्य राखण्याकरितां त्या मासिकाशीं असलेला आपला संबंधच त्यांनीं तोडून टाकला. शिवाय हरि महादेव पंडितांसारखे "जैसा दीपें दीप लाविजे । आधील कोण हें नेणिजे", असें ज्ञानेश्वरांनीं म्हटल्याप्रमाणें सवाईगुंजीकर शिष्य तयार असल्यामुळें 'विस्तारा'ला धोका नव्हता. अशा स्थितींत त्यांनीं जें केलें तें समंजसपणाचें होतें, असेंच कोणीही कबूल करील.

'विस्तारा'चा संबंध कां सोडला ?

दशरथानें रामाला वनवासाला पाठविल्याप्रमाणें 'विस्तारा'शीं असलेला आपला संबंध सोडण्यास गुंजीकरांना कोणत्या कैकेयीनें भाग पाडलें याचा विश्वसनीय तपशील सांपडत नाहीं. "विविधज्ञानविस्तार आणि मराठी नियतकालिकें" या आपल्या माहितीपूर्ण लेखांत, प्रो. नी. ब. भवाळकर म्हणतातः "विस्तारच्या सुरवातीच्या काळांत मुंबई विद्याखात्याचें प्राबल्य फार होतें, आणि मराठीच्या शुद्धतेची काळजी त्या खात्याकडून फार 'दक्षतेनें' ठेवण्यांत येत असे. हावर्डसाहेबांच्या कारकीर्दींत हें शुद्धतेचें वळण मराठी ग्रंथनिर्मितीस लागावें म्हणून कांहीं लेखनशुद्धीचे नियम तयार करून ते जारी करण्यास प्रारंभ झाला व 'विस्तार'कारांचा अभिप्राय या नियमांविरुद्ध दिसल्यावरून खात्याकडून त्यास मिळणारा आश्रय बंद होऊन रा. रामभाऊंस या मासिकाशीं संबंध न ठेवण्याचा इशारा मिळाला. अर्थात् त्यांना नोकरी संभाळण्यासाठीं तसें करणें अवश्य झालें." (वि. ज्ञा. वि. वर्ष ५७, पृ. १८८).

गुंजीकरांचे लेख 'विस्तारा'च्या सातव्या वर्षापर्यंत आलेले दिसतात. सातव्या वर्षांत विद्याखात्याच्या उपरिनिर्दिष्ट नियमांविरुद्ध 'विस्तारां'त विरुद्ध अभिप्राय प्रसिद्ध झालेला सांपडत नाहीं. कदाचित 'विस्तारा'नें शाळाखात्याचे हे नियम अमलांत आणले नाहींत एवढ्याचकरितां त्यांच्यावर अधिकाऱ्यांची अवकृपा झाली असावी ! मात्र सहाव्या वर्षाच्या अखेरीला 'विस्तारा'वर कांहीं-

तरी भयंकर गंडांतर आलेलें दिसतें. कारण सातव्या वर्षाच्या अंकांत आरंभीं ता. १ माहे जाने० १८७५ ची 'विशेष सूचना' आहे, तिच्यामध्यें पुढील प्रमाणें मजकूर सांपडतो:—"विविधज्ञानविस्तारार्चें काम कांहीं **मोठ्या अडचणींमुळें** बरेच महिनें अगदीं बंद पडलें. परंतु कळविण्यास अत्यंत आनंद वाटतो कीं तें पुनः चालू करणें अवश्य आहे म्हणून सर्व व्यवस्था नीट करून या महिन्यापासूनच सातव्या पुस्तकाला आरंभ केलेला आहे." म्हणजे 'विस्तारा'चा वर्षारंभ जो आतांपर्यंत जुलै महिन्यामध्यें होता, तो यापुढें जानेवारीमध्यें झाला. सहा महिने 'विस्तार' बंद पडण्यास कारण झालेली 'मोठी अडचण' विद्याखात्यानें आपला आश्रय बंद केला हीच असावी. या प्रकरणांत मेजर कँडीची कांहींतरी लुडबुड असावी, अशी एक शंका येते. कारण गुंजीकर **'व्याकरणविचार'** या लेखमालेंत मेजर कँडीसंबंधीं म्हणतात, "जेव्हां जेव्हां त्यांच्या त्या नेमक्या पद्धतीला अनुसरून लिहिलेलें पुस्तक सरकारचा आश्रय मागावयाला येई, तेव्हां तेव्हां त्याला आश्रय अवश्य देण्याविषयीं कँडीसाहेबांकडून शिफारस झाल्यावांचून बहुशः राहत नसे. आणि भिन्न प्रकार असतां बहुशः त्याविरुद्ध मत यावयाचेंच." विद्याखात्यानें आश्रय बंद केला तरी 'विस्तार' पुनः जोमानें सुरू झालेला पाहून गुंजीकरांना त्या मासिकाशीं असलेला संबंध सोडण्याची ताकीद देण्यांत आली असावी. चिपळूणकरांच्या 'माले'चा आठवा अंक अवलोकन करून याच कँडीसाहेबांनीं 'मालाकारां'च्या वडिलांकडे सदरील अंकाबद्दल गाऱ्हाणें नेऊन फार खेद प्रदर्शित करून पत्र लिहिलें होतें. त्यांत त्यांनीं सुचविलें कीं, "तुमचेसारख्यांचे मुलानें अशा तऱ्हेचा मजकूर लिहिणें म्हणजे अतिशय शोचनीय गोष्ट आहे; तेव्हां असें न करण्याबद्दल तुम्हीं चिरंजीवांस ताकीद द्यावी," (विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र, पृ० ११४) असें लक्ष्मणराव चिपळूणकर लिहितात. या वेळीं विद्याखात्याचे अधिपति मि० हावर्ड नसून मि० चाटफिल्ड होते. यांनीं हायस्कुल पाहाण्याचें निमित्त करून विष्णुशास्त्र्यांना अशाच बाबतींत सौम्य प्रकारें समज दिली होती. असाच कांहींतरी प्रकार गुंजीकरांच्याही बाबतींत झाला असावा. शुद्धलेखनाच्या नियमांचें कदाचित वरकरणी निमित्त असावें. 'विस्तारां'तील इतर लेख त्या काळच्या मानानें बरेच जहाल असत हें प्रस्तुत पुस्तकांतील आरंभींचे निबंध वाचले असतां कळून येईल.

दंभहारकांशीं असलेला गुंजीकरांचा संबंध त्या वेळीं गुप्तच राखण्यांत आला असावा, असें वाटतें. स्वतः कृष्णशास्त्री चिपळूणकरांवरही नोकरी सोडण्याची अशीच वेळ आली होती, परंतु ती चुकली असें म्हणतात.

दंभहारक

दंभहारक या मासिकामध्यें गुंजीकरांप्रमाणेंच हरि महादेव पंडित व वामन दाजी ओक हेही लिहीत, असें दंभहारकाचे एक संस्थापक रा. व्यंकटेश अनंत मैजरकर यांनीं लिहिलेलें आहे. (वि. ज्ञा. वि. पुस्तक ५०, पृ० २४७) हरि महादेव पंडित गुंजीकरांच्याच धर्तीवर हुबेहुब लिहीत असत; त्यामुळें दंभहारकांतील गुंजीकरांचे लेख कोणते, हें निश्चित सांगणें जरा कठीण झालें आहे. रा. मैजरकरांनीं आपल्या उपरिनिर्दिष्ट लेखांत, "धर्मनीति, कुंट्यांचा 'राजा शिवाजी' या पुस्तकांचें परीक्षण, प्रसिद्ध 'वेदार्थयत्न' या पुस्तकाचें (त्यांच्या मदतीनें झालेलें) परीक्षण", हे गुंजीकरांचे कांहीं लेख म्हणून नमुद केलेले आहेत. मुंबई ग्रंथसंग्रहालयांत दंभहारकाचें जें दुसऱ्या वर्षाचें पुस्तक आहे, त्यांत प्रत्येक लेखावर त्याच्या कर्त्याचें नांव पेन्सिलीनें लिहिलेलें आहे. (हें बहुतेक कै० रा. सा. मोरमकराचें काम असावें) त्यांत 'धर्मनीति', 'ख्रिस्ती दांभिकपणा', "ख्रिस्ती 'सत्यदीपिका' आणि 'ज्ञानोदय' यांचा परस्परविरोध"– "येशु देव होता काय ?", "ख्रिस्ती धर्मप्रतिपादनाची पद्धत", "बाप्तिस्माचें मूळ आणि हिंदूचें गुरुत्व", "अर्ध्या हळखुंडानें पिवळे !!" हे लेख गुंजीकरांचे म्हणून नमूद केले आहेत. अशाच प्रकारें इतर पुस्तकांतही जर शेरे असते, तर गुंजीकरांचें दंभहारकांतील लेखन कळण्यास एक उत्कृष्ट साधन उपलब्ध झालें असतें. तरीपण अभ्यासपूर्वक असे लिहिलेले बहुतेक ख्रिस्तीधर्मावरील लेख तसेंच "अजूनही आमच्या लोकांचे डोळे उघडतील", (पुस्तक ३, अं. ४) (२५-१-७४), 'स्वभाषेची अनास्था व अपमान,' 'युरोपियन सौजन्याचा उत्तम मासला !!!' (जुलै १८७४) व 'पत्रकारांचें शुष्क वृत्त आणि निर्फळ अभिमान' हें लिहून आलेला मजकूर म्हणून प्रसिद्ध होणारें चालू सदरही त्यांच्याच हातचें असावें, अशी शंका येते. यांतील 'माले'वर केलेली टीका विष्णुशास्त्र्यांना फार झोंबली होती. तिला 'माले'च्या पांचव्या अंकांत जें त्यांनीं उत्तर दिलें आहे तिला उद्देशून " निबंधमालेंतील कठोर व सणसणीत टीकेचा हा पहिलाच मासला होय," असें लक्ष्मणराव चिपळूणकर यांनीं

आपल्या बंधूंच्या चरित्रांत (पृ. ११२) उद्गार काढले आहेत. दंभहारकांत 'माले'संबंधीं जी टीका प्रसिद्ध झाली, तिच्यामध्यें पुढील मजकूर आहे, " भाषा शुद्ध व सरळ असली तरी कितावासहित कर्त्याचें नांव प्रसिद्ध करण्या-इतकी प्रौढता व रसिकता तींत नसून विचारांविषयीं धरसोड व मळ-मळीतपणा फारच दिसून येतो. कसेंही असो. पण **आलीकडच्या किताबी विद्वानांस देशभाषेचा स्वप्नांतही विटाळ सोसत नाहीं,** अशा दुष्काळांत हे चिपळोणकर बी. ए. स्वभाषेचा जीर्णोद्धार करण्यास पुढें सरसावले आहेत. केवढा हा चमत्कार !" विष्णुशास्त्र्यांच्या लेखणीचें वैशिष्ट्य जो आवेश, झणझणीतपणा व आकर्षकता हे गुण मालेंतील आरंभींच्या चार अंकांत दिसत नाहींत ही गोष्ट अगदींच कांहीं नाकबूल करतां येईल असें वाटत नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें आपल्या पहिल्याच अंकांत दंभहारकाच्या ज्याच्या त्याच्यावर हत्यार धरण्याच्या वाण्याबद्दल ज्यांनीं दोष दिला, त्याच शास्त्रीबुवांना " जो ग्रंथकार वाचकांस नेहेमी रंजवूं पाहील व त्यांस नेहमीं थक्क करून टाकण्याचा यत्न करील त्यांस निवळ सत्यासच अनुसरून चालणें उपयोगी पडणार नाहीं. **मीठ मिरचीचा सांठा त्यास आपणापाशीं नेहमीं भरपूर ठेवावा लागेल"** (इंग्रजी भाषा, अं. २८) अशी मॅकॉलेचे गुणदोष सांगतांना अखेर कबुली द्यावीच लागली ! विविधज्ञानविस्तारासारख्या उच्च प्रकारच्या मासिकाचा ज्ञानवृद्धीच्या दृष्टीनें कितीही उपयोग असला, तरी सार्वत्रिक लोकजागृतीकरितां व परक्यांचे हल्ले **यथा यक्षस्तथा बलिः** न्यायानें परतविण्याकरितां खरमरीतपणाची कास धरल्याशिवाय गत्यंतर नाहीं, हें दोनतीन वर्षांच्या अनु-भवानें गुंजीकरांस कळून चुकलें व त्यामुळेंच दंभहारकाचा जन्म झाला. 'माले'च्या पहिल्याच अंकांत याबद्दल जरी दंभहारकाला दोष देण्यांत आला होता, तरी दंभहारकांतील टीकेला उत्तर देण्याच्या निमित्तानें मालेंत कठोर टीकेला सुरुवात झाली व अखेर ती हळुहळू दंभहारकाच्याच वळणावर गेली ! यासंबंधीं ' शिष्यादिच्छेत् पराजयम् ' या न्यायास अनुसरून **दंभहारक** मुक्तकंठानें ' माले ' ची स्तुति करीत म्हणतो, " मालेस आम्हीं सर्व मासिक पुस्तकांत पहिली जागा देतों. अलीकडच्या किताबी विद्वानांत व मतलबी आणि खुशामती मन्वंतरांत मालेसारखें खरें स्वदेशाभिमानी, स्पष्टवादी आणि निःस्पृह पुस्तक निघेल, असें कोणाच्या स्वप्नीं देखील नव्हतें; कारण तिलादेखील पहिल्यानें

दंभहारकाचा स्पष्टवक्तेपणा अगदीं रुचला नाहीं; पण आलिकडेस तर तिणे थट्टेची व दूषणीय वाग्बाणांची ज्यांच्या त्यांच्यावर अगदीं रेलचेल करून सोडली आहे. याहूनही चांगल्या व वाजवी प्रकाराविषयीं दंभहारकास तिणे जें दूषण दिलें होतें तें तिच्याच आलीकडील पांचसात अंकांवरून अगदीं अल्प विचाराचें होतें, असें आतां पदरांत घेणे तीस भाग पडेल. असो. वाजवी रीतीनें पाहिलें तर स्वतंत्र गोष्टीचें विवेचन आणि लोककल्याणाच्या संबंधें बरेंवाईट जगास कळविणें म्हटलें म्हणजे असा वाचालतेचा प्रसंग कोणावरही आलाच पाहिजे. लोकसुधरण्याच्या प्रामाणिक व खऱ्या उद्देशानें जें काम आम्हीं हातीं धरलें आहे त्यासही साह्य न मिळतां सर्वत्र दूषणांचा भडिमार चालत असे. तरीही आम्हीं अवसान न सोडतां तसेंच चालल्यानें लवकरच परमेश्वरानें आमची पाठ राखण्यास आम्हांहून विशेष गुणी **मालेस** निर्माण केलें आणि आज कित्येक गोष्टींत तिचें खरें धैर्य, सत्यप्रीति, आणि निःस्पृहता हीं उघड झालीं हें पाहून आम्हांस आनंद झाला...निराश्रयामुळें कधीं दंभहारकास राम म्हणणे भाग पडल्यास खऱ्याचें दास्य व खोट्याची वस्तादगिरी पतकरून **माला** त्याचाही भाग चालवील असा आतां आम्हांला पूर्ण भरंवसा आहे. ” (दंभहारक, वर्ष ५ वें, पृ. ११३–११५) हा मजकूर गुंजीकरांच्याच हातचा दिसतो. गुंजीकरां-संबंधीं चिपळूणकरांच्या मनांत असलेला भाव मालेच्या पहिल्याच अंकांत ‘विस्तारा’संबंधीं त्यांनीं काढलेल्या उद्गारांवरून कळून येतो. गुंजीकरांच्या मनांत चिपळूणकरासंबंधीं काय आशा होत्या त्याही वरील दंभहारकांतील उताऱ्या-वरून स्पष्ट होतील. दंभहारक १८७१ ते १८७५ पर्यंत चालला. यांत सोहिरोबा वगैरे कवींची अप्रकाशित कविता क्रमशः प्रसिद्ध होत असे. तोही गुंजीकरांचाच उद्योग असावा.

मराठी भाषेचा जळजळीत अभिमान

गुंजीकरांच्या संकलित लेखांच्या प्रस्तुत पहिल्या खंडांत त्यांचे भाषा, व्याकरण व लिपि या विषयांवरील लेख मुख्यतः प्रसिद्ध होत आहेत. यांतील पहिले सात लेख (पृ. १ ते ३७) चिपळूणकरांच्या निबंधमालेच्या पूर्वी लिहिले गेले असून त्यांत त्यांचा आपल्या मायभाषेसंबंधीं अभिमान, आस्था व तळमळ स्पष्ट दिसून येते. हे लेख चिपळूणकरांच्या याच विषयांवरील निबंधांशीं जरूर ताडून पाहाण्यासारखे आहेत. पहिल्याच लेखांत त्यांनीं मराठी भाषा ही

हिंदी, बंगाली, गुजराती वगैरे कोणत्याही इतर देशी भाषाभगिनीपेक्षां प्रौढी, कोमलता, सौंदर्य, लिपिसौलभ्य वगैरे गुणांत श्रेष्ठ असल्याचें सिद्ध करून अशा भाषेला विश्वविद्यालयांत मज्जाव व्हावा व नवीन इंग्रजी शिकलेल्या विद्वानांनीं तिची अवहेलना करावी, याबद्दल खेद व्यक्त केला आहे. स्वभाषेंत आपले विचार व्यक्त करण्यास असमर्थ बनण्याइतकें ज्याचें शब्ददारिद्र्य आहे त्या देशी नवीन विद्वानांना उद्देशून ते म्हणतात, "अशा लोकांच्या विद्येचा अभिमान बाळगण्यांत तरी आपल्या देशास भूषण कोणतें ? सरकारनें यांच्या शिकण्यास उत्तेजन येण्याकरितां मोठमोठे पगार देऊन विद्या शिकविल्या, आणि मोठमोठीं कामें दिलीं; तथापि जर दुसऱ्यांनीं शिकविलेली विद्या तीही यांना आपल्या देशबांधवांना समजून सांगण्याचें सामर्थ्य नाहीं, तर त्या पदव्या आणि तीं इनामें घेण्यांत त्यांचा पुरुषार्थ तो कोणता ? इतर लोकांप्रमाणें यांनींही रोजगार करून मोठा पगार मिळविला आणि त्यांच्या मूर्खपणाला हंसत हंसत आपणही आपल्या बायकांना सुवर्णानें मढवून काढलें तर यांनीं अधिक केलें तें काय ?"

विस्ताराच्या पूर्वकालीं, कॅरे (१८१०), कॅनडी (१८२४), मौल्स्वर्थ (१८३१ व ४७), पदमनजी (१८६३) यांचे मराठी–इंग्रजी कोश; पंडितमंडळ (१८२९), गोडबोले (१८६३) याचे मराठी–मराठी कोश; व कॅनडी (१८२४), कँडी (१८४७), पदमनजी (१८६०) व तळेकर (१८६१) यांचे इंग्रजी –मराठी कोश प्रसिद्ध झाले होते. तसेंच कॅरे (१८१०), कॅनेडी (१८२६), स्टिव्हन्सन (१८३३) यांची इंग्रजीतून व जांभेकर (१८३६), फडके (१८३६) व दादोबा (१८३६ व १८५०) यांचीं मराठींतून व्याकरणें जन्मास आलीं होतीं. परंतु हे कोश व व्याकरणें असमाधानकारक कां व ते कसे व्हावयास पाहिजेत याचा विचार या पुस्तकांतील दुसऱ्या निबंधांत आढळतो व त्यावरून गुंजीकरांची सखोल शास्त्रीय दृष्टि आपणांस कळून येते. ह्या सूचना आजही नव्या वैयाकरणांना व कोशकर्त्यांना मार्गदर्शक होण्यासारख्या आहेत. असे नवे प्रयत्न अंगावर घेण्यास नवे विद्वान पुढें येत नाहींत, याबद्दल ते म्हणतात, 'राज्यकर्ते तर मराठी भाषेचा उत्कर्ष व्हावा ही कल्पना दिवसेंदिवस विसरून जाण्याचा प्रयत्न करीत आहेत, व त्यांच्यावर आमच्या विद्वान लोकांची तान आहे. म्हणजे त्यांची जन्मभाषा त्यांना विषतुल्य वाटत आहे." असें कां होतें याचें निदान जें गुंजीकरांनीं केलेलें आहे तें मोठें मार्मिक व प्रत्ययोत्पादक असेंच आहे. ते

म्हणतात, "इंग्रजी भाषेमध्यें प्रवेश करण्याला थोडें स्वभाषेचें अगदीं आवश्यक असेंच जेवढें अगत्य आहे, तेवढें त्यांनीं राज्यकर्त्यांनीं शिकविण्याकरितां देशभाषेच्या हलक्या प्रतीच्या शाळा ठेवल्या आहेत. यामुळें असें घडतें कीं, मुलांना स्वभाषेचें कांहीं ज्ञान नसतां, त्यांचा इंग्रजी अभ्यासाकडे एकदां कल लागला म्हणजे प्रथमतः स्वभाषेचें अज्ञान झांकण्याकरितां तिरस्कारपूर्वक त्या भाषेची निंदा करूं लागतात आणि तेणेंकरून शेवटीं असा परिणाम होतो कीं, राजकर्त्यांनीं जर म्हटलें कीं देशभाषा विद्वानांच्या उपयोगी नाहींत, तर आमचे कित्येक विद्वान् लोक त्या भाषणाची मोठी तारीफ करून स्वभाषेची अधिकाधिक हेलना करूं लागतात आणि म्हणतात कीं, देशभाषेमध्यें काय धोंडे आहेत? ती पाहिजे तरी कशाला?" विविधज्ञानविस्तार ज्या सालीं (१८६७) जन्मास आला त्याच सालीं लंडन येथें वाचलेल्या एका निबंधांत सर फेरोझशा मेथा, सरकारनें देशी भाषांकरितां खर्च केलेल्या पैशाला उद्देशून म्हणतात, "Indeed, the printed works were proved to have been worth less than the paper on which they were printed! We cannot then too strongly condemn the spasmodic efforts to create on short notice, a vernacular literature or rather vernacular literatures." (Speeches & writings p. 13.) या उद्गारांवरून तत्कालीन नवीन विद्वानांची मनोवृति कशा प्रकारची होती, याची आपणांस कल्पना होईल व गुंजीकरांनीं त्यांच्यावर जी सतत झोड उठविली होती, त्याचें कारणही आपणांस कळून येण्यास कठीण पडणार नाहीं.

भाषाभिमान हा प्रत्यकाचा धर्म आहे

इंग्रजी भाषेच्या मोहिनीनें धुंद व अंध होऊन आपल्या विद्वानांनीं भरतखंडामध्यें एकभाषा असावी व तीही इंग्रजी व्हावी, अशा प्रकारचा प्रचार चालविला होता. १८५४ च्या हॅलिफॅक्स खलित्यानें जी नवी शिक्षणपद्धति रुजत घातली गेली होती तिचीं हीं स्वाभाविक फळें होतीं, यांत शंका नाहीं. आजही या मताचे अनुयायी अगदींच नसतील असें नाहीं; परंतु आज जें मत सर्वसंमत होत चाललें आहे, त्याचा उच्चार सत्तर वर्षांमागें गुंजीकरांनीं

केलेला आपणास प्रस्तुत पुस्तकांत सांपडेल. हिंदुस्थानच्या भाषाबाहुल्यावर जे आजही ठराविक सांच्याचे आक्षेप घेतले जातात, त्यांना गुंजीकरांनीं उत्तर देतांना जो कोटिक्रम व युक्तिवाद लढविला आहे, त्यावरून त्यांची मार्मिक विद्वत्ता, स्वाभिमानी दूरदृष्टि व समतोल विवादपद्धति हे गुण दिसून येतात. (पृष्ठ १४–१५ पाहा.) स्वतः सरकारी नोकरीमध्यें असतांना देखील त्यांनीं जे निर्भीड उद्गार काढले आहेत ते आश्चर्य वाटण्यासारखे आहेत. ते म्हणतात, " इंग्लिश लोकांना आपल्या भाषेचा इतका अभिमान आहे कीं आपली भाषा पृथ्वीच्या सर्व भागावर पसरलेली आहे अशी ते मोठी प्रौढी मिरवितात, भाषेचा विस्तार असण्यामध्यें जर प्रतिष्ठा आहे, तर **आपली असलेली भाषा राखण्यामध्यें व तिचा उत्कर्ष करण्यास झटण्यामध्यें प्रतिष्ठा आहे** इतकेंच नाहीं तर **तसें करणें हा प्रत्येकाचा धर्म आहे.** (पृ. १६) हिंदुस्थानच्या राजकर्त्यांना जर हिंदुस्थानच्या भाषा शिकण्याचा असा कंटाळा, तर मग त्यावरोबर राज्य करण्याचाही कां कंटाळा येऊं नये ? हिंदुस्थानमध्यें चांगला राज्यकारभार चालण्याकरितां हिंदुस्थानच्या वीस कोटी प्रजेनें आप-आपली भाषा सोडून देऊन राजकर्त्यांची भाषा घ्यावी, यापेक्षां प्रजेचा निकट संबंध ज्यांना आहे अशा थोड्याशा राजकर्त्यांनींच त्या त्या प्रांताची भाषा शिकावी आणि नीट व्यवस्था ठेवावी ही गोष्ट वाईट कोण म्हणेल ? (पृ. १६-१७) इतकें होऊन शेवटीं इंग्रजी ही स्वभाषा झालीच, तर मग सर्व विचाराचें मूळ जी भाषा तीच फिरल्यावर हिंदुस्थानचें सगळेंच स्वरूप वेगळें होऊन तरी सर्व स्थिति चांगलीच होईल असें म्हणणें केवळ स्वप्नवत् आहे." (पृ. १८-१९) ' नवीन सुधारलेले विद्वान लोकही हळूहळू देशभाषा बुडविण्याकडे गुंतले आहेत,' यावद्दल खेद व्यक्त करून " नवीन युनिव्हर्सिटींतील लोक मामलतदार वगैरे होऊं लागल्यापासून देशभाषेवर त्यांनीं यमाजीपंताचा हल्ला आणलाच," असे गुंजीकरांनीं दुःखोद्गार काढले आहेत.

इंग्रजी ही परकी भाषा हिंदुस्थानवर लादण्याच्या नवीन विद्वानांच्या प्रयत्नाला विरोध करतांना गुंजीकर म्हणतात, " ती भाषा परक्यांची असून कठीण असल्यामुळें तिजमध्यें चांगली गति होण्यास फारच श्रम लागतात; व तेणें-करून शेवटीं स्वदेशांतील भाषांचा नाश होत जाणार हें उघड आहे. याकरितां जी सार्वजनिक भाषा करावयाची, ती अशी असली पाहिजे, कीं ती थोड्या

श्रमानें समजणारी व शिकतां येणारी अशी असून प्रौढ असली पाहिजे; आणि दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं दिवसेंदिवस त्याच भाषेचा विस्तार होऊन जर तेणेंकरून इतर भाषांचा लोप होण्याचा योग घडून आला, तर त्यामुळें कोणास कांहीं दुःख किंवा तोटा होऊं नये. तेव्हां अशी भाषा म्हटली म्हणजे तूर्त प्रसंगीं एक **हिंदुस्थानी होय.**" यावरून मराठी भाषेचे जरी ते जाज्वल्य अभिमानी होते, तरी 'त्यजेदेकं कुलस्यार्थे' हें तत्त्व मान्य करण्याइतकें त्यांचें मन विशाल, उदार व राष्ट्रीय होतें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. परक्या भाषा आपण शिकूं नये असें गुंजीकरांचें मत मुळींच नव्हतें व हें त्यांनीं 'आपल्या भाषेची स्थिति' या निबंधांत असंदिग्ध शब्दांनीं सांगून टाकलेलें आहे. संस्कृत, हिंदुस्थानी, बंगाली किंवा कर्नाटकी अशांसारख्या भरतखंडस्थ इतर भाषाच नव्हेत, तर जर्मन, फ्रेंच वगैरे परखंडस्थ भाषा यांचा देखील "होईल तितका अवश्य अभ्यास आमच्या लोकांनीं केला पाहिजे," असें त्यांनीं म्हटलेलें आहे (पृ. ३१). पण, "जी देशभाषा नव्हे, तिचा त्या देशामध्यें कितीही फैलाव झाला, कितीही लोकांनीं जन्माचे जन्म तिच्या अभ्यासामध्यें व प्रसारामध्यें घालविले, तथापि देशभाषेकडेस त्याणीं लक्ष दिल्यावांचून सर्व व्यर्थ आहे," हेंही खणखणीत शब्दांत त्यांनीं आपल्या देशबांधवांना बजाविलें आहे. स्वभाषेचा अनादर करून जे इंग्रजी शिकूं लागले व 'आम्हांस मराठी भाषा येत नाहीं,' 'आम्ही हल्लीं मराठी भाषा विसरलों,' असें म्हणण्यामध्यें मोठी प्रतिष्ठा मिरवूं लागले, त्यांना उद्देशून गुंजीकर म्हणतात, "अशा प्रकारच्या विद्वानांची जर संख्या सध्यांच्याप्रमाणेंच वाढत गेली, तर दहावीस वर्षांच्या आंतच या आपल्या देशास महाराष्ट्र किंवा मराठी भाषा बोलणाऱ्यांचा देश, हें नांव अगदीं अयोग्य ठरेल यांत संशय नाहीं."

अशा स्थितींत विष्णुशास्त्री चिपळुणकरांसारखे बी. ए. गृहस्थ ज्या वेळीं मराठी भाषेच्या उत्कर्षाकरितां निबंधमाला मासिक सुरू करण्यास बद्धपरिकर झाले, त्या वेळीं गुंजीकरांचा या गोष्टीवर विश्वास बसणें कठीण झालें असलें पाहिजे ! श्री. होळकर सरकारास मानपत्र देतांना तें स्वभाषेंतून न देतां इंग्रजी भाषेंतून दिलें व याप्रसंगीं सर्व भाषणें इंग्रजींतून झालीं याचा तीव्र निषेध करतांना ते म्हणतात, "काय हा स्वभाषेचा अपमान ? अशाही आणीबाणीच्या प्रसंगीं पुण्यास एका बी. ए. नें फक्त भाषेचीच स्थिति सुधारण्यास्तव निबंधमाला

म्हणून एक मासिक पुस्तक काढण्याचें पत्करलें आहे." (दंभहारक, २५ जाने० १८७४) तर अन्य ठिकाणीं "हा एक चमत्कारच" म्हटलेला आहे ! (दंभहारक–एप्रिल १८७४).

गुंजीकर हे जरी मराठी भाषेचे इतके अभिमानी व तिला आपली मायभाषा मानणारे होते, तरी कोंकणी ही मराठीची बोली नसून स्वतंत्र भाषा आहे या मताचा सरस्वतीमंडळांत त्यांनीं पुरस्कार केल्याचें फादर दाल्गाद यांनीं गोव्याच्या येराल्द (ता. १३–२–१९१७) नामक दैनिकांत 'कोंकणी ही मराठीची बोली नव्हे' या लेखमालेंत नमूद केलें आहे. पण 'मराठी भाषेच्या पोटभाषा' हें नांव 'कोंकणी, गोमंतकी, खानदेशी, वऱ्हाडी' इत्यादि भाषांना लावतां येईल, असें गुंजीकरांनी स्पष्ट म्हटलें असून या भाषांच्या दुरभिमानानें भांडणाऱ्यांची निर्भत्सना केली आहे.

या बाबतींत रोमन कॅथलिक मताचे ख्रिश्चन लोक व कानडा जिल्ह्यामध्यें व पलीकडे दक्षिणेस कोची प्रांतांत राहाणारे कोंकणी बोलणारे लोक या दोघांनाही उद्देशून त्यांनीं जे उद्गार काढले आहेत, ते त्यांनीं अवश्य विचार करण्यासारखे आहेत. (आपल्या भाषेचें पुढें काय होणार ? पृ. ३७–५४ हा निबंध पहा.)

काव्यविचार

१८६७ सालीं मुंबई युनिव्हर्सिटीमध्यें मराठी भाषेला मज्जाव झाला व त्याच सालीं विविधज्ञानविस्तार स्थापन करून गुंजीकरांनीं मुंबईत महाराष्ट्र युनिव्हर्सिटीची स्थापना केली असें वर म्हटलेंच आहे. या आमच्या विधानाला विविधज्ञानविस्तारांतील **विद्यालय** हें सदर खचित पुष्टी देईल. कारण काव्यविचार, व्याकरणविचार, शाकुंतल वगैरे लेख याच सदराखालीं प्रसिद्ध झालेले आहेत. यापैकीं **काव्यविचार** या विषयाला पहिल्याच अंकापासून सुरवात होऊन त्याचीं दोनच खंडें प्रसिद्ध झालेलीं आहेत. तरी हा उपक्रम मराठींत गुंजीकरांनींच प्रथम सुरू केला असावा, असें वाटतें. पुढें दाजी शिवाजी प्रधान यांचा रसमाधव (१८६८), गणेशशास्त्री लेले यांचें साहित्यशास्त्र (१८७२), माकोडे यांचा रसप्रबोध (१८९२) वगैरे ग्रंथ झाले. गुंजीकरांचा हा प्रयत्न जरी अपुराच राहिला, तरी पुढील लेखकांना स्वतंत्र ग्रंथरचना करण्यास प्रेरक झाला असेल यांत शंका नाहीं.

बंगाली भाषेचे पहिले सखोल अभ्यासक

इंग्रजी भाषा हीच भरतखंडाची एकभाषा करण्याच्या " नवीन विद्वानांच्या अविचारीपणा"संबंधीं लिहितांना, " ज्याला हिंदुस्थानांतील एक भाषा चांगली पक्की येत आहे, त्यास हिंदुस्थानांतील दुसरी कोणतीही अवघड भाषा अगत्यानें शिकणें असल्यास पराकाष्ठा चार–सहा महिन्यांहून अधिक दिवस लागणार नाहींत," असे उद्गार गुंजीकरानीं काढलेले आहेत. (पृ. १८ पहा) **बंगाली व्याकरण** या आपल्या लेखांत तर ते म्हणतात कीं, " मराठी लोकांना बंगाली भाषेचें व्याकरण म्हणजे केवळ अर्ध्या तासाचें काम आहे" ! बंगाली ही कलकत्त्याची देशभाषा व तें शहर हिंदुस्थानची त्या वेळीं राजधानी असल्यामुळें त्या भाषेकडे सर्व प्रांतांचें लक्ष लागलें असल्यास नवल नाहीं. बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांना बंगाली भाषा अवगत होती, असें म्हणतात. (हेमंत व्याख्यान मालेंतील वा. ना. देव यांचें व्याख्यान, १८९२) पण गो. ना. माडगांवकरांनीं आमच्या **मुंबईवर्णनांत** (१८६३) " ते संस्कृत मराठी व इंग्रजी भाषेंत निपुण होते, व ह्याशिवाय त्यांस उर्दू, कानडी, गुजराथी या भाषा येत होत्या " असें म्हटलें आहे. (पृ. २१६) तसेंच न्या. मू. रानडे यांनींही त्या भाषेचा अभ्यास केला होता असें दिसतें; परंतु कै. रमाबाई साहेब रानडे यांनींच लिहिल्याप्रमाणें " स्वतःला बंगाली अक्षरओळख मात्र होती; पण चांगलें वाचतां येत नव्हतें." (आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी, पृ. १७५) "मराठी व बंगाली लोकांच्या भावी उत्कर्षाचीं चिन्हें व तुलना" या नांवाचा निबंध न्या. मू. रानडे यांनीं ता. २७ फेब्रुवारी १८६३ रोजीं वाचल्याचें ज्ञानप्रसारक सभेच्या अहवालांत नमूद आहे. (मराठी ज्ञानप्रसारक, पुस्तक १४, पृ. ३४२) बंगाली भाषेकडे गुंजीकराचें प्रथम लक्ष वेधण्यास हाच निबंध कारण झाला असावा काय ? एक गोष्ट मात्र बऱ्याचशा निश्चयानें म्हणतां येईल कीं बंगाली भाषेचा पायाशुद्ध व सखोल अभ्यास महाराष्ट्रांत प्रथम गुंजीकरांनींच सुरू केला असावा; कारण प्रस्तुत **बंगाली व्याकरण** या लेखमालेशिवाय दंभहारकामध्यें **धर्मनीति** ह्या श्रीयुत अक्षरकुमारदत्तकृत मूळ बंगाली ग्रंथाचें क्रमशः भाषांतर ते लिहून प्रसिद्ध करीत होते. हें भाषांतर दंभहारकाच्या पहिल्याच अंकापासून (१० आक्टो० १८७१) सुरू होऊन तीन वर्षें चाललें होतें. याशिवाय **श्रीकृष्णचरित्रामृत** हाही बंगाली ग्रंथ

त्यांनीं मराठींत भाषांतरित करून तो विविधज्ञानविस्तारांत क्रमशः प्रसिद्ध होत असे. (वि. ज्ञा. वि. पु. २२ व २३ पहा). याच सुमारास, म्हणजे १८७२ सालीं, **नीलदर्पण** नांवाचें नाटक मोरो विठ्ठल वाळवेकर यांनीं मूळ बंगालीच्या इंग्रजी भाषांतरावरून मराठी केलेलें आढळतें; पण मूळ बंगाली वाङ्मयाचे पाट फोडून भाषांतरद्वारा त्याचा प्रवाह मराठीला मिळविण्याचा प्रयत्न गुंजीकरांनीं सुरू केला व हा उद्योग मनोरंजनाचे मित्र, गुर्जर किंवा आपटे, वरेरकर, पु. वा. कुळकर्णी यानीं पुढें चालविला. **बंगाली व्याकरण** ही गुंजीकरांची प्रस्तुत ग्रंथांतील लेखमाला पुरी झालेली नाहीं हें दुर्दैव होय. **बंगाली प्रवेश** हें पुस्तक वासुदेवराव आपटे यांनीं अलीकडे लिहिलें आहे; परंतु तो प्रयत्न अगदीं सामान्य व जुजबी आहे. बंगाली भाषेवर मराठींत चांगला ग्रंथ होण्याची अद्यापि आवश्यकता आहे. तरी पण ज्यांना या भाषेचा चांगला अभ्यास करावयाचा असेल, त्यांनीं The Origin and Development of the Bengali Language (1926) हा कलकत्ता युनिव्हर्सिटीनें प्रसिद्ध केलेला डॉ. सुनीतिकुमार चतर्जी यांचा सुंदर विद्वत्तापूर्ण ग्रंथ अवश्य वाचावा, अशी आम्हीं शिफारस करतों.

कन्नड परिज्ञान

गुंजीकरांचा जन्म कानडी-मराठीच्या सीमाप्रांतांत होऊन तेथेंच त्यांच्या आयुष्याचीं पहिलीं कांहीं वर्षें गेल्यामुळें बंगाली भाषेप्रमाणें कानडी भाषेचा त्यांना नव्यानें अभ्यास करावा लागला नाहीं. प्रस्तुत पुस्तकांत त्यांचा कानडी भाषा हा जो निबंध प्रसिद्ध झाला आहे, (पृ. ११३) त्यांत त्यांनीं अलीकडे मधून मधून पुनः डोकें वर काढीत असलेल्या कानडी–मराठी वादाचा समाधानकारक निकाल कसा लावावा, याविषयीं आपले विचार प्रदर्शित केले आहेत. बेळगांव, धारवाड यासारख्या द्विभाषिक भागांमध्यें घरांत कानडी बोलण्याऱ्या लोकांचा देखील मराठी शिक्षणाकडेच फार ओढा दिसतो. यासंबंधीं सर अर्स्किन पेरी हे मुंबईचे एक वेळचे चीफ जज्ज लिहितात,- "Throughout the whole of the Belgaon and Dharwar collectorates it (Canarese) is the vernacular language, although strangely enough, on the esta-

blishment of schools by the Bombay Government in those districts in 1840, the Canarese population stoutly resisted instruction being conveyed to the children in their mother tongue and pleaded for Marathi (Bird's-eye-view of India, 1855, p. 263). १८४५ सालीं शाळांचे सुपरिंटेंडेंट प्रो. बाळशास्त्री हे बेळगांवजवळच्या एका शाळेसंबंधीं रिपोर्ट करतांना लिहितात, "Several of the Lingayat children who understand not a word of Marathi would yet insist upon learning nothing but reading and writing that language." असेच तत्कालीन बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या रिपोर्टीत शेरे सांपडतात. याचा स्वाभाविक परिणाम असा झाला कीं सुशिक्षित कानडी भाषेचे लोक मराठीला पाण्यांत पाहूं लागले, व गुंजीकरांनीं उल्लेखिलेल्या, कानडींत मिसळलेल्या मराठी शब्दांना एकदम फांटा द्यावा, मराठी ग्रंथ व वर्तमानपत्रें वाचूं नयेत, व ती भाषा बोलूं नये, या सूचना पुढें येऊं लागल्या. कांहीं वर्षांपूर्वी धारवाडमध्यें म्युनिसिपालिटीच्या मराठी शाळा बंद पाडण्याची चळवळ जोरांत होती. इतकेंच काय, परंतु १९२२ सालीं कर्नाटकचे सिंह म्हटले जाणारे, रा. गंगाधरराव देशपांडे यांना बोलावयाचें असेल, तर कानडींत बोला, मराठींत बोलावयाचें नाहीं (मराठी बॅडा, कन्नड बेकू) असें सांगून बंद पाडलेल्या धारवाड येथील एका प्रचंड सभेला प्रस्तुत लेखक हजर होता.

मराठी भाषा कानडीच्या उत्कर्षाच्या आड येत नसून " मराठी आणि कानडी यांचा परस्परांशीं शत्रुत्व संबंध आहे अशी जी कित्येकांची समजूत, तीच कानडीच्या वृद्धीला आड येते " असें जें गुंजीकरांनीं म्हटलें आहे तें सर्वथैव योग्य आहे. मराठीनें इंग्रजी भाषेवर बहिष्कार न पुकारतां तिलाच आपल्या उत्कर्षाचें साधन केली नाहीं काय ?

कानडी ही जरी मूळ द्रविड भाषा असली, तरी तिच्यामध्ये सांप्रत अर्धाधिक भरणा संस्कृत किंवा संस्कृतोत्पन्न शब्दांचा असून कानडी व देवनागरी लिपीचा उगम एकच होय असेंही गुंजीकरांचें म्हणणें आहे. कानडीनें जसे संस्कृत शब्द घेतले, त्याप्रमाणें नीर, कला, कुटी अशासारख्या द्राविडी

शब्दांची संस्कृत भाषेनें उसनवारी केली आहे असें म्हणतात. पण रे. डॉ. गुंडर्ट यांनीं अशा शब्दांची जी यादी दिली आहे (Journal of the German Oriental Society, 1869) ती पूर्ण विश्वसनीय मानून चालतां येणार नाहीं. कानडी भाषेची जुन्या मराठीवर बरीच छाया आहे व मराठीचा ऐतिहासिक दृष्ट्या विचार करणाऱ्यांना कानडी भाषेकडे दुर्लक्ष करणें अक्षम्य आहे. इंग्रजीमध्यें रे. हॉडसन यांचें कॅनरिज ग्रामर (१८६४) किंवा रे. काल्डवेल याचें द्राविडी भाषांचें तौलनिक व्याकरण (१८७५) अशां-सारखे ग्रंथ आहेत. परंतु कानडी भाषेचा अभ्यास करणाऱ्या मराठी लोकांना 'कन्नड परिज्ञान' हें १८९५ सालीं गुंजीकरांनीं प्रसिद्ध केलेलें पुस्तक फार उपयोगी आहे. मराठी भाषेंत हें अशा प्रकारचें पहिलें पुस्तक तर आहेच; परंतु त्यानंतरही रा. सडेकर व रा. सावंत यांची सामान्य पुस्तकें सोडल्यास असा भरीव प्रयत्न दुसरा कोणी केलेला मला माहीत नाहीं.

अनावश्यक अनुनासिक उच्चार

अनुच्चारित अनुस्वारांचा वाद महाराष्ट्रांत प्रथम श्री. नरसोपंत केळकरांनीं सुरू केला, अशी अलीकडील बऱ्याच लोकांची समजूत आहे. टिळकचरित्राच्या शेवटच्या दोन भागांत बहुतेक अनुस्वारांना अनुच्चारित या सबबीवर गचांडी मिळाल्यामुळें या प्रश्नाला विशेष महत्त्व आलें हें खरें असलें, तरी अक्टोबर १८६८ च्या विविधज्ञानविस्तारामध्यें हा प्रश्न गुंजीकर यांनीं एका निबंधांत प्रथमच उपस्थित केला आहे. प्रस्तुत संकलित लेखांतील 'मराठी भाषा' (पृ. १२२–१३३) हाच त्यांचा तो निबंध होय. या विषयावर रा. पावसे, पटवर्धन, कुळकर्णी, मोडक, रड्डीशास्त्री, कापडी, वैद्य वगैरे अनेक विद्वानांनीं विविधज्ञान-विस्तार, महाराष्ट्रसाहित्यपत्रिका, केसरी वगैरे नियतकालिकांतून साधकबाधक चर्चा केलेली आहे आणि जें मत आज साधारणतः सर्वमान्य ठरलेलें आहे, तेंच त्या वेळीं गुंजीकरांनीं प्रतिपादन केलें होतें. ते या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करून शेवटीं म्हणतात, "जे जे अनावश्यक अनुनासिक उच्चार आपल्या लेखनामध्यें स्थापित होऊं पाहत आहेत, त्यांचा आपण त्याग केला असतां आपली भाषा अशुद्ध होईल असें म्हणण्यास कांहीं आधार नाहीं." पण एकजात अनुस्वारांची हकालपट्टी करण्याच्या ते अगदीं विरुद्ध होते व

पुढें तीस वर्षांनंतर 'विस्तारा'च्या सप्टेंबर १८९८ च्या अंकांत त्यांनीं हें मत स्पष्टपणें नमूद केलेलें आहे. ते लिहितात, " मराठी भाषेंतील सर्व अनुनासिक बिंदूंना सरसकट फांटा द्यावा, अशी वर्तमानपत्रांतून कोणी सूचना केली आहे; पण ती सूचना सर्वथा त्याज्य होय. कारण कीं अनुनासिक बिंदूंना जर सर्वथैव फांटा दिला, तर–'ते कुत्रे आले,' 'तें कुत्रें आलें;' 'तो कुत्री गेली,' 'तीं कुत्रीं गेलीं;' 'ही घोडी बांधिली,' 'हीं घोडीं बांधिलीं,' यांतील भेद कसा समजावा ?" (सं. ले. पृ. ३५६) मराठी भाषेंत जास्त अनुस्वार देण्याची जी प्रथा पडली आहे, " तो कोंकणस्थांचा प्रसाद आहे" (चिं. वि. वैद्य, महाराष्ट्रसाहित्यपत्रिका, वर्ष १ लें, पृ. ३) असेंच गुंजीकरांपासून सर्व लेखक या विषयावर लिहितांना म्हणत आले आहेत ! पण वास्तविक तो जुन्या मराठीचाच स्वभाव दिसतो. महानुभाव लोकांचें अलिकडे प्रसिद्ध होत असललें वाङ्मय, राजवाड्यांनीं प्रसिद्ध केलेली ज्ञानेश्वरी, चोंव्याचें उषाहरण वगैरे जुन्या ग्रंथांत हा अनावश्यक अनुस्वाराचा प्रकार प्रकर्षानें आढळून येईल. (*A Paixao de Christo :* Introduction—§ 12, foot note 18 a, The Journal of the University of Bombay Vol. IX, Part 2, Sept. 1940. p. 189. हा माझा निबंध पाहा.) हे लेखक कांहीं कोंकणस्थ नव्हत ? वास्तविक कोंकणस्थांनीं इतर अनेक गोष्टींप्रमाणें या मराठीच्या जुन्या लक्षणाचें रक्षण केलेलें आहे, असेंच म्हटलें पाहिजे. असें करतांना खोट्या सादृश्याभासामुळें (false analogy) कांहीं बाबतींत अनावश्यक ठिकाणीं कोंकणस्थ अनुस्वार देत असतील; पण देशस्थ जरूर त्याही ठिकाणीं अनुस्वार गाळतात त्याची वाट काय ? बीम्स यानें आपल्या A Comparative Grammar of the Modern Aryan Languages of India या आपल्या ग्रंथांत एके ठिकाणीं हिंदी व बंगाली भाषांच्या उच्चारभेदासंबंधीं लिहितांना हवेचा उच्चारांवर परिणाम होतो, असें प्रतिपादिलें आहे. त्याला अनुसरून समुद्रकांठची हवा अनुस्वाराला पोषक व देशावरील त्याला मारक असें म्हणूं ! कारण कोंकणांतील लोकच देशावर गेल्यावर अनुस्वारांना अर्धचंद्र देऊन कोंकणस्थांना दोष देत सुटतात. पण महानुभावीय वाङ्मय, ज्ञानेश्वरी वगैरे देशावरील जुन्या ग्रंथांत अनुस्वारांचा सुळसुळाट आहे त्याची संगति कशी लावणार ?

महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धि

महाराष्ट्रभाषेची लेखनशुद्धि हा प्रस्तुत पुस्तकांत घातलेला निबंध १८६९ सालीं प्रथम प्रसिद्ध झाला. ही पहिल्या आवृत्तीची प्रत ठाणें ग्रंथसंग्रहालयांत आहे. यानंतर त्याच्या सुधारून वाढविलेल्या आवृत्त्या १८७८ व १८९२ सालीं निघाल्या. मराठी लेखनाच्या पद्धतीला स्थिरता त्या वेळीं आलेली नसल्यामुळें अशा पुस्तकांची फार गरज भासावी यांत नवल नाहीं. ' शुद्ध लिहिण्याचा अनुगम' (१८६२) हा रामचंद्र विनायक ओक यांचाच उपलब्ध ग्रंथांत (मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय) पहिला प्रयत्न दिसतो. यानंतर गो. ब. बापट (१८६९), ना. रा. महाडेश्वर (१८७०), रा. आ. चितळे (१८७४), वि. कृ. चिपळुणकर (निबंधमाला) वगैरे लेखकांचे पुढें अनेक प्रयत्न या विषयावर झाले. या विषयावरील जास्त व्यापक पद्धतीवर अद्ययावत असा प्रबंध म्हणजे प्रो. वि. भि. कोलते यांची **मराठी दीपिका** (१९३७) हें पुस्तक आहे.

व्याकरणविचार

गुंजीकरांच्या संकलित निबंधांच्या पहिल्या खंडांत व्याकरणविषयक जे लेख प्रसिद्ध झाले आहेत, त्यांचे दोन भाग पाडतां येतील. १८६८ ते १८७० या कालांत लिहिलेले व पुढें सुमारें वीस वर्षांनंतर 'विस्तारा'च्या एकविसाव्या (१८८९) वर्षापासून लिहिलेले. पहिल्या भागांत समाविष्ट होणारे लेख प्रायः मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेच्या विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडावे म्हणून त्यांच्या आग्रहावरून लिहिलेले दिसतात. दुसऱ्या भागांतील लेखांना कै. रामचंद्र भिकाजी जोशी यांचें " प्रौढबोध व्याकरण " निमित्त झालें. मोरो केशव दामले आपल्या 'शास्त्रीय मराठी व्याकरणाच्या' प्रस्तावनेंत या दुसऱ्या निबंधांना अनुलक्षून म्हणतात, " ज्याप्रमाणें दादोबांचें व्याकरण प्रसिद्ध झाल्यावर कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं आपले टीकात्मक ग्रंथ लिहिले, त्याचप्रमाणें जोशी यांचें प्रौढबोध व्याकरण प्रसिद्ध झाल्यावर गुंजीकर यांनीं आपले कांहीं परीक्षणात्मक निबंध लिहिले. हे निबंधही शास्त्रीबोवांच्या निबंधांच्या तोलाचे असून, त्यांनीं त्यांची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं."

या सर्व निबंधांत गुंजीकरांची शास्त्रीय मूलग्राही दृष्टि आपणास सर्वत्र दिसून येते. मराठीचीं तीन व्याकरणें प्रथम १८३६ सालीं प्रसिद्ध झालीं. (मराठी व्याकरणाची कुलकथा, १९३६, हें माझें पुस्तक पाहा.) तीं म्हणजे बाळशास्त्री यांचें बालव्याकरण, गंगाधरशास्त्री फडके यांचें महाराष्ट्रभाषेचें व्याकरण (हें व्याकरण १८२५ सालीं प्रसिद्ध झाल्याचें गुंजीकर लिहितात सं. ले. पृ. १७८ तें बरोबर नाहीं) व दादोबा पांडुरंग याचें 'मराठी भाषेचें व्याकरण.' इंग्रजी Grammar या शब्दाला जरी व्याकरण हा मराठी प्रतिशब्द योजण्यांत आला तरी पण या दोन शब्दांचा मूलार्थ वेगळा आहे. मराठीच्या या आद्य वैयाकरणानीं 'व्याकरण' हा शब्द घेतला, परंतु त्याची व्याख्या ते ग्रामरच्या इंग्रजी व्याख्येचें मराठी भाषांतर करून देऊं लागले ! या वेळीं युरोप व अमेरिका येथें Lindley Murray याचें इंग्लिश ग्रामर (१७९५) लोकप्रिय होतें व तेंच आपल्याकडेही शिकत. दादोबा यांनीं आपल्या आत्मचरित्रांत त्याचा निर्देश केलाच आहे. व्याकरण या शब्दाचें संस्कृत भाषेप्रमाणें लक्षण गुंजीकर यांनीं दिल्याप्रमाणें, **'व्युत्पाद्यन्ते प्रकृतिप्रत्ययादिभिः प्रदर्श्यन्ते शब्दा अनेन इति व्याकरणम्'**, म्हणजे 'भाषेमध्यें जे शब्द आहेत त्यांची व्युत्पत्ति कशी, म्हणजे त्यांची प्रकृति काय, त्यांना प्रत्यय कोणते झाले, आगम, आदेश इत्यादि काय काय झाले हें ज्या शास्त्राच्या अभ्यासानें समजतें तें व्याकरण असें आहे. गुंजीकरांनीं जें Grammar teaches how educated people speak and write असें इंग्लिश व्याकरणाचें लक्षण दिलें आहे तें कोठून घेतलें आहे, समजत नाहीं. तेंच गोडबोल्यांनीं व जोशांनीं आपल्या व्याकरणांत (१८६७) स्वीकारलेलें दिसतें. मरेच्या इंग्रजी मोठ्या ग्रामरची (१७९५) जुनी प्रत मजजवळ आहे. त्यांत "English Grammar is the art of speaking and writing the English Language with propriety" असें लक्षण दिलें आहे. तेंच जांभेकरांनीं स्वीकारलें: 'व्याकरण म्हणजे शुद्ध रीतीनें बोलणें आणि लिहिणें यांची विद्या आहे.' याचाच फडके व दादोबा यांनींही अनुवाद केलेला दिसतो. बापूशास्त्री शुक्ल या संस्कृत पंडिताकडे मराठी व्याकरणाचा दादोबांनीं अभ्यास केल्यामुळें त्यांच्या व्याकरणाच्या ज्ञानाला संस्कृताची बैठक मिळाली होती तरी आरंभीं

त्यांचा संस्कृत भाषेशीं प्रत्यक्ष असा परिचय नव्हता. त्यामुळें इंग्रजी ग्रामरच्या वळणावर त्यांच्या व्याकरणाची रचना झाली असल्यास नवल नाहीं. पुढें त्यांनीं संस्कृत व्याकरणाचा अभ्यास करून पुढील आवृत्त्यांमुळें पुष्कळ फेरफार केले. गुंजीकरांनीं व्याकरण शब्दाप्रमाणेंच 'शब्द,' 'वर्ण' वगैरे शब्दयोजनेंत कसा घोटाळा झाला आहे हेंही दाखवून आणखी अनेक सुधारणा सुचविल्या त्या सर्वांचा येथें विस्तारभयास्तव नामनिर्देश करीत नाहीं. यापैकीं कांहीं सुधारणा लक्षांत घेऊन त्यांनीं १८८६ सालीं लहान मुलांकरितां म्हणून एक 'सुबोध व्याकरण' प्रसिद्ध केलें. तेंही प्रस्तुत संकलित लेखांत समाविष्ट करण्यांत आलें आहे. (पृ. ३६७ पहा). परंतु दादोबांचें लघुव्याकरण इतकें प्ररूढ झालें होतें कीं, 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी' या न्यायानें हें सुबोध व्याकरण लघुव्याकरणाची जागा घेऊं शकलें नाहीं. कै. रामचंद्र भिकाजी जोशी यांनीं 'विस्तारां'-तील या निबंधांसंबंधीं लिहितांना "त्यांचा मला फार चांगला उपयोग झाला," अशी पुढील आवृत्तीच्या प्रस्तावनेंत कबुली दिलेली आहे. मला विशेष नवल वाटतें तें हें कीं, या निबंधांत जीं भाषाविषयक सामान्य तत्त्वें प्रतिपादन करण्यांत आलीं आहेत त्यांपैकीं कांहीं पुढें झालेल्या ओटो जेस्पर्सन, हेरोल्ड पामर, डॉ. विल्ड वगैरे अलीकडील पुरोगामी म्हणविणाऱ्या आंग्ल व्याकरणकार व भाषाशास्त्रज्ञ यांनीं प्रतिपादिलेल्या विचारांना जुळतीं अशीं आहेत.

पहिले मुद्रणसुधारक व लघुलिपीचे आद्य उत्पादक

मराठी भाषेचा उत्कर्ष व विस्तार व्हावयाचा असेल तर देवनागरी लिपीला मुद्रणाच्या बाबतींत रोमन लिपीप्रमाणें सुलभता प्राप्त करून दिली पाहिजे, हें मत आज सर्वमान्य झालें असून या बाबतींत अलीकडे आरू, लेले, नानल, सुंदरराव वैद्य वगैरे पुष्कळांनीं सुधारणा सुचविल्या आहेत. परंतु या प्रश्नाकडे सर्वांच्या आधीं गुंजीकरांचेंच लक्ष वेधलेलें होतें. कारण 'लाघवी लिपि' या मराठी शॉर्टहँडवरील आपल्या पुस्तकांत इ. स. १८७४ सालींच त्यांनीं ही कल्पना मांडली असून त्या तत्त्वावरच पुढील लिपिसुधारकांच्या कल्पना उभारलेल्या दिसतात. मुद्रणसुधारणेबरोबरच व्याख्यानें वगैरे बोललेलें टिपून घेण्याची इंग्रजी शॉर्टहँड पद्धतीप्रमाणें मराठी भाषेकरितां लघुलेखनपद्धति निर्माण केली पाहिजे, याचाही ध्यास १८७० मध्यें गुंजीकरांना लागला होता,

हें प्रस्तुत पुस्तकांतील ‘ लघुलिपि किंवा चिटणीसी अक्षर ’ या निबंधावरून दिसून येईल. पिटमनची लघुलेखनपद्धति १८३७ च्या सुमारास इंग्लंडमध्यें सुरू झाली व त्या पद्धतीवर अमेरिकेमध्यें मन्सननें आपली पद्धति बसविली. या दोन्हीही पद्धति त्या काळीं फार लोकप्रिय होत्या, व ‘फोनोग्रफि’ असें त्यांना नांव रूढ होतें. या लिपि शिकलेले कारकून त्या वेळीं ‘टाइम्स’ व ‘गॅझेट’ पत्रांमध्यें काम करीत असत. पिटमन व मन्सन यांच्या पद्धति पुढें ठेवून गुंजीकरांनीं मराठी लघुलेखनपद्धति निर्माण केली व ती ‘लाघवी लिपि किंवा अति त्वरेनें लिहिण्याची युक्ति’ या पुस्तकाच्या द्वारें १८७४ सालीं महाराष्ट्रापुढें ठेवली. हें पुस्तक प्रस्तुत खंडांत प्रसिद्ध करण्यांत येत आहे. (पृ. ४४१) गुंजीकरांच्या या पुस्तकाचा पुष्कळांनीं अभ्यास केला व या कलेंत कौशल्य मिळविलें. यानंतर ‘माजी इंडियन स्टेटस्मनचे शॉर्टहँड रायटर’ रा. गजाननभाऊ वैद्य यांनीं **लघुलेखनपद्धति** नांवाचें याच विषयावर एक पुस्तक तयार केलें. त्यावर ‘विस्तारा’मध्यें (एप्रिल १८८१, पु. १३–पृ. ९६) अभिप्राय प्रसिद्ध झाला आहे. त्यांत पुढील मजकूर सांपडतो: “ त्याची (गुंजीकराच्या लाघवी लिपीची) पद्धति अगदीं नवीन काढलेली असल्यामुळें शिकणाऱ्यांना ज्या अडचणी उत्पन्न झाल्या त्या वारंवार दुरुस्त करून हल्लीं त्याची तिसरी आवृत्ति त्यांनीं तयार केली आहे; त्या लिपीच्या दोन तीन महिन्यांच्या अभ्यासानें रा. म. गो. करमरकर याणीं गतवर्षीं भिवंडी एथें वक्तृत्वोत्तेजक मंडळीकडून बक्षिस मिळविलें. परंतु गुंजीकरांच्या प्रस्तावनेचा बहुतेक भाग (क्वचित् शब्द फिरवून) गजाननभाऊ यांनीं आपल्या प्रस्तावनेंत उतरून घेतला असून व त्यांच्या पुस्तकाचें नांव जें लाघवी लिपि त्याचाही एका ठिकाणीं अवचित चुकून उच्चार केलेला असून मराठीमध्यें आपलेंच पुस्तक हें या विषयाचें पहिलें पुस्तक होय असें दाखविण्याचा त्यांनीं आव आणिलेला आहे......तूर्त आम्हीं इतकीच आशा धरतों कीं, गुंजीकर व गजाननजी हे दोघेही आपापले कांहीं शिष्य तयार करतील व तेणेंकरून विशेष सोयी कोणाच्या पुस्तकापासून होते हें प्रत्यक्ष जनांच्या अनुभवास आणून देतील. असें झाल्यानें सर्वांना उपयोग होऊन खऱ्याची खरी योग्यता आपोआप प्रकट होईल.” मुंबई ग्रंथसंग्रहालयामध्यें वैद्यांच्या **‘लघुलेखनपद्धती’**ची १८८२ सालची एक प्रत आहे. त्यांत प्रस्तावनेंत गुंजीकरांच्या प्रयत्नाचा उल्लेख

आहे. परंतु त्यावर दुसरी आवृत्ति असें म्हटलेलें नाहीं. कदाचित् 'विस्तारां'तील हा मजकूर वाचून वैद्यांनीं जुनी प्रस्तावना व मुखपत्र रद्द करून पहिल्याच पुस्तकाला नवी प्रस्तावना जोडली असावी. या विषयावर तिसरें पुस्तक रा. भुजंगराव मानकर यांनीं १८९७ सालीं लिहिलें. त्यावर गुंजीकर किंवा वैद्य या दोघांचाही उल्लेख नाहीं. रा. वा. सी. बेंद्रे यांनीं १९२२ सालीं प्रसिद्ध केलेल्या **शीघ्र ध्वनिलेखनपद्धति** या पुस्तकांत पूर्वी असे प्रयत्न झाल्याचें मोघम लिहिलें आहे. देवनागरी लिपीची सुधारणा करावयाची म्हणजे तिचें प्राचीन स्वरूप कसें होतें, हें पाहणें अवश्य आहे. **प्राचीन लिपि** ह्या डॉ. भाऊ दाजी यांच्या इंग्रजी लेखाच्या आधारानें गुंजीकरांनीं तयार केलेल्या निबंधांत (पृ. ८७ पाहा) वाचकांना तें आढळून येईल.

संस्कृत लिपीची उत्पत्ति

आपण ज्या लिपीला देवनागरी असें नांव देतों ती अशोकाचीं शासनें ज्या लिपीमध्यें खोदलीं आहेत त्या ब्राह्मी लिपीपासून उद्भवली असें म्हणतात. परंतु ही लिपि भारतीयांनीं स्वतःच शोधून काढिली, कीं परकीयांकडून घेतली हा एक मोठा वादाचाच प्रश्न आहे. सर विलियम जोन्स यांनीं प्रथम ही लिपि मूळ आर्यांची नसून तिचा उगम सेमेटिक आहे, अशी कल्पना गेल्या शतकाच्या आरंभाला पुढें मांडली व तिला कॉप, लेप्सियस वगैरे विद्वानांनीं उचलून धरलें. पुढें प्रो. वेबर यांनीं या कल्पनेचा जास्त जोरानें पुरस्कार केला. त्याचें म्हणणें असें कीं, ही लिपि फिनिशन व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानांत आणली. मॅक्समुलरच्या मतें ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकाच्या पूर्वी भारतीयांना लेखनकला अज्ञात होती. मॅक्स-मूलर, व्हिटनी, बेन्फी वगैरे विद्वानांनीं वेबरची कल्पना संभाव्य मानिली आहे; परंतु सर ए. कनिंग्ह्याम् , लासेन व डॉसन यांचें मत ब्राह्मी लिपि मूळ आर्यांचीच असून तिचा उगम चित्रलिपींत (hieroglyphics) आहे. मिस्टर इ. थोमस यांनीं ब्राह्मी लिपीचा उगम द्राविडी आहे असें मत मांडलें आहे. अशोकाचीं दक्षिणेकडील शिलाशासनें प्रथम खोदिलीं गेलीं व पुढें उत्तरेकडील भाषांकरितां ही लिपि थोड्याफार फरकानें योजण्यांत आली, असें त्यानें प्रति-पादिलें आहे. तरीपण कस्ट, बर्नेल, बुल्हर, क्लॉड वगैरे बहुसंख्य विद्वानांचा ओढा या फिनिशन उगमाकडेच आहे. या विषयावर अजमीरचे पं. गौरीशंकर

ओझा यांनीं १८९४ सालीं **प्राचीन लिपिमाला** नांवाचा हिंदी भाषेंत ग्रंथ लिहिला. त्याच्या १९१८ सालच्या द्वितीयावृत्तीच्या प्रस्तावनेंत पंडित लिहितातः "I published, as early as 1894 A.D., 'Prachin Lipimala' or 'The Palœography of India in Hindi.' It was the first book of its kind in any language and was much appreceated by Europian and Indian scholars." पं. ओझांची पहिली आवृत्ति मी पाहिली नाहीं; परंतु दुसरी आवृत्ति खरोखरच अत्यंत सुंदर असून त्यांत या विषयाचा सर्वांगपूर्ण व विस्तृत विचार केलेला आहे. पंडित ओझा आपला हा कोणत्याही भाषेंतील पहिलाच प्रयत्न म्हणतात. त्यांच्याही पूर्वीं दोन वर्षें म्हणजे १८९२ सालीं गुंजीकरांचें या विषयाकडे लक्ष वेधलें होतें, हें त्यांचें The Origin of the Sanskrit Alphabet हें छोटेंसें पुस्तक वाचलें असतां दिसून येईल. हें पुस्तक त्यांनीं बेळगांवला असिस्टंट एज्युकेशनल इन्स्पेक्टर असतांना लिहिलें होतें. त्यामुळें त्यांना या विषयाचा जास्त विचार करण्यास साधनें सांपडलीं नाहींत असें दिसतें. पं. ओझांनीं आपल्या पुस्तकांत निरनिराळ्या काळच्या भारतीय लिप्यांचे नमुने दिलेले आहेत; परंतु ब्राह्मी लिपीचा मूळ उगम कसा झाला असेल याचा त्यांनीं शोध केलेला नाहीं. गुंजीकरांप्रमाणेंच सद्याच्या रोमन लिपीचा असाच उगम १८५९ सालीं इमानुयेल द रुजे (Emanuel de Rouge) या फ्रेंच माणसानें शोधून काढण्याचा प्रयत्न केला. चित्रावरून प्रथम इजिप्शन लिपीचा उगम होऊन पुढें फिनिशन, ग्रीक व लॅटिन अशीं अवस्थांतरें होऊन सद्यांच्या युरोपीयन भाषांकरितां योजण्यांत येणारी रोमन लिपि अस्तित्वांत आली, असें त्यानें सिद्ध केलें आहें. (The story of the Alphabet by Edward Clodd, 1913, pg. 143 वरील तक्ता पाहा) याच वर्षीं म्हणजे १८५९ सालीं डार्विनचा Origin of Species हा ग्रंथ प्रसिद्ध झाला, हा योगायोग लक्षांत ठेवण्यासारखा आहे. अलीकडील संशोधकांच्या मतें इजिप्शन लोकांनीं देखील आपली लिपि सुमेरी आर्यांकडून घेतली व अशा प्रकारें जगांतील लिपीचे आद्य उत्पादक आर्यच ठरतात. (The Aryan Origin of the Alphabet by Prof. L. A. Waddell, LL. D., 1927 पाहा)

इतकेंच नव्हे तर आतांपर्यंत फिनिशन लोक हे सेमेटिक वंशाचे समजले जात तोही समज बदलत असून तेही आर्यवंशीय असल्याचें मत पुढें येत आहे. (The Phœnician Origin of Britons by Prof. L. A. Waddell, 1925, Chapter I पहा) प्रो. वाडेल यांनीं आपल्या या ग्रंथांत प्रतिपादिलेलीं मतें जुन्या समजांना धक्के देऊन आश्चर्यचकित करणारीं आहेत. ब्रिटन या शब्दांतील "Brit" हा फिनिशन लोकांच्या "Barat" किंवा "Brihat" (हिंदी आर्यांचें 'भरत'!) या जात्यभिधानापासून आला असें त्यांचें म्हणणें आहे. इतकेंच नव्हे तर इंग्लंडचा पेट्रन सेंट जो सेंट अँड्रूज हा आर्यांचा ख्रिस्तपूर्व इंद्रच असून त्याचा 'क्रॉस' म्हणजे वज्र होय, असेंही मत त्यानें प्रतिपादिलें आहे. (St. Andrew as Patron saint with his "Cross" incorporates Hitto-Sumerian Father-God *Indara*, Indra or Gothic "Indri"—Thor and his *hammer* introduced into Early Britain by Gothic Phœnitians: Disclosing pre-Christian worship of Andrews in Early Britain and Hittite Origin of Crosses on Union Jack. chap. XXI) ज्याप्रमाणें जुन्या युरोपीयन भाषा व संस्कृत भाषा यांमध्यें शब्दसाम्य आढळतें त्याचप्रमाणें जुन्या सुमेरियन, इजिप्शन व फिनिशन व अशोकाची ब्राह्मी लिपि यांच्यामध्येंही कांहीं मूळाक्षरांमध्यें विलक्षण साम्य आहे. यावरून मूळ कोणत्या तरी प्राचीनतम आर्य लिपीवरून या सर्व लिप्या अस्तित्वांत आल्या अशी शंका येते. ती जर खरी मानली तर रुजेची इजिप्शन चित्रलिपीच्या उगमाची कल्पना किंवा गुंजीकरांची संस्कृत चित्रलिपीची कल्पना अर्थातच निर्मूल ठरेल. कारण रुजेनें ज्याप्रमाणें लिपीच्या आरंभकालीं जुनी इजिप्शन भाषा बोलली जात असे असें मानलें आहे, त्याप्रमाणें गुंजीकरांनीं संस्कृत भाषा त्या काळीं बोलली जाई, असें गृहीत धरलें आहे. पण हा आरंभकाल जर मागें नेला तर त्या वेळीं आर्य भाषेचें स्वरूप निराळें होतें असें मानल्याखेरीज गत्यंतर नाहीं. अलीकडे ठिकठिकाणीं जीं उत्खननें चाललीं आहेत, त्यामुळें नवनवीं साधनें पुढें येत आहेत. त्यांपैकीं कांहीं लिपींचा अद्याप बोध झालेला नाहीं. तात्पर्य या बाबतींत निर्णायक असें अद्याप कांहींच

नाहीं. परंतु रुजे किंवा गुंजीकर यांच्या संशोधक बुद्धीचें कौतुक मात्र कुणालाही करावेंच लागेल, यांत शंका नाहीं. संस्कृत लिपीची उत्पत्ति तंत्रशास्त्राधारें सिद्ध करण्याचा प्रयत्न श्री. शामशास्त्री यांनीं केला आहे (Indian Antiquary, vol, 35, pg. 253.) त्याचाही येथें उल्लेख करणें अवश्य आहे.

संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें

गुंजीकरांच्या संकलित लेखांच्या पहिल्या खंडांत आलेल्या निबंधांविषयीं आतांपर्यंत चार शब्द लिहिले. त्यांच्या राहिलेल्या वाङ्मयकार्यासंबंधीं जसजसे संकलित लेखांचे पुढील खंड प्रसिद्ध होत जातील, तसतसा त्यांच्या प्रस्तावनेंत विस्तारानें ऊहापोह करण्यांत येईल. प्रस्तुत खंडाला जोडलेल्या परिशिष्टावरूनही त्यांच्या वाङ्मयाची साधारण कल्पना होण्यासारखी आहे. तरी पण त्यांच्या प्रस्तुत चरित्रात्मक प्रस्तावनेला पूर्णता येण्याकरितां त्यांच्या वाङ्मयांतील इतर कामगिरीचा येथें ओझरता उल्लेख करणें प्राप्त आहे.

गुंजीकरांना 'विस्तारा'शीं असलेला आपला संबंध कसा सोडावा लागला, याची माहिती मागें दिलीच आहे. त्याच सुमारास त्यांनीं १८७५ सालीं **कौमुदी-महोत्साह** नांवाचें त्रैमासिक रा. का. पां. परब यांच्या साहाय्यानें सुरू केलें. यांत भट्टोजी दीक्षित यांच्या सुप्रसिद्ध सिद्धान्तकौमुदी या संस्कृत व्याकरण-ग्रंथाचें मराठी भाषांतर प्रसिद्ध होत असे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं या त्रैमासिकाची मुक्तकण्ठानें स्तुति करून, " 'कौमुदी'वर प्रस्तुत पुस्तकांत जी मराठी टीका दिली आहे, तिची सांप्रत काळांत अत्यंत आवश्यकता आहे. हें भाषांतर या वेळेस जर न होईल तर ' अष्टाध्यायी ' व ' सिद्धान्तकौमुदी ' हे दोन्ही ग्रंथ कापडांत गुंडाळून पुस्तकालयशोभनार्थ 'जेंदावेस्ता'दि प्राचीन ग्रंथांच्या सोबतीला ठेवून द्यावे लागतील, " असें 'माले'च्या ४२ व्या अंकांत उद्गार काढले आहेत. मराठी भाषेची मूळ प्रकृति संस्कृत असतां ती आपल्या लोकांच्या संस्कृत भाषेच्या अज्ञानामुळें इंग्रजी भाषेच्या वळणावर जात आहे म्हणूनच लोकांत संस्कृत व्याकरणाचें ज्ञान राहण्याकरितां गुंजीकरांनीं हा उद्योग आरंभिला असावा, अशी त्यांची व्याकरणावरील निबंध वाचून माझी समजूत झाली आहे. कालिदासाच्या अभिज्ञानशाकुंतलाचें मराठी भाषांतर हा त्यांचा

भाषांतरात्मक दुसरा (कालदृष्ट्या नव्हे) ग्रंथ होय. हें भाषांतर विविधज्ञान-विस्तारामध्यें प्रथम पहिल्याच अंकापासून क्रमशः प्रसिद्ध होऊन १८७० सालीं तें स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत आलें. याच्याही पूर्वीं परशुरामतात्या गोडबोले यांचें याच नाटकाचें भाषांतर १८६१ सालीं प्रसिद्ध झालें होतें. गुंजीकरांच्या भाषांतरानंतर लगेच १८६९ सालीं कृष्णशास्त्री राजवाडे यांचें भाषांतर उजेडांत आलें. शाकुंतलाचे जे आतांपर्यंत निरनिराळे मराठी अवतार झाले आहेत त्यांत गुंजीकरांच्या भाषांतराचें स्थान व वैशिष्टय काय आहे यांचा विचार तें प्रसिद्ध करतांना त्यांच्या प्रस्तावनेंत करण्यांत येईल. याच वर्गांतील त्यांचें तिसरें पुस्तक म्हणजे **सुबोधचंद्रिका** नामक भगवद्गीतेवरील मराठी टीका. हा ग्रंथ प्रथम १८८८ सालीं प्रसिद्ध झाला व १९२४ पर्यंत त्याच्या अकरा आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. यावरून त्याची लोकप्रियता कळून येईल. याशिवाय **रामचंद्रिका,** धातुरूपावलि व शब्दरूपावलि हीं संस्कृत भाषा शिकण्याच्या उपयोगीं अशीं त्यांचीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत.

रोमकेतु विजया : इंग्रजी नाटकाचें हिंदूकरण

कालिदासाच्या संस्कृत शाकुंतलाच्या भाषांतराप्रमाणें इंग्रजी भाषेचा कालिदास जो शेक्सपियर त्याच्या Romeo and Juliet या सुप्रसिद्ध नाटकाचें रूपांतर गुंजीकर यांनीं करून तें 'विस्तारा'च्या दुसऱ्या वर्षाच्या नवव्या अंकापासून (ऑगस्ट १८६९) क्रमशः प्रसिद्ध होऊं लागलें, व तें पांचव्या वर्षापर्यंत चाललें होतें. गुंजीकरांच्याही पूर्वीं कै. महादेवशास्त्री कोल्हटकर यांनीं शेक्सपियरच्या 'ॲथेल्लो' या नाटकाचें भाषांतर केलें होतें; परंतु त्यांत पात्रांचीं नांवें वगैरे मूळ नाटकांत होतीं तींच कायम राखिलीं होतीं. परंतु गुंजीकरांनीं Romeo ला रोमकेतु, Juliet ला विजया, Escalus ला अक्षध्वज अशीं नवीं हिंदी नांवें देऊन शेक्सपियरच्या मूळ पात्रांना हिंदुधर्माची दीक्षा दिली ! संस्कृत नाटकाचें भाषांतर करतांना नांवांत बदल करण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं; परंतु इंग्रजी नाटकाचें भाषांतर करतांना केवळ नांवेंच बदलून चालत नाहीं, तर मूळांतील आचारविचार व वाक्प्रचार हिंदी रीति-भातींना जुळवून घेतल्याखेरीज तें वाचकांना किंवा श्रोत्यांना रुचत व पचतही नाहीं. महादेवशास्त्र्यांच्या मराठी अथेल्लोमध्यें केवळ नांवेंच इंग्रजी नसून

शब्दप्रयोग व वाक्यरचनाही इंग्रजी पद्धतीवर असलेली दिसते. तेव्हां इंग्रजी नाटकाला मराठी पेहराव कसा चढवावा याचा नमुना म्हणून हें पुस्तक गुंजीकरांनीं लिहिलेलें असावें. रूपांतर चांगलें किंवा भाषांतर चांगलें ह्या प्रश्नाची चर्चा पुढें होऊं लागली. याचा जास्त विचार ह्या नाटकाचें पुनर्मुद्रण करतांना त्याच्या प्रस्तावनेंत होईलच. गुंजीकरांच्या पद्धतीवर कै. आनंदराव बर्वे यांनीं हिंमतबहाद्दर (हॅम्लेट) 'विस्तारां'तूनच (वर्ष १४–१८) प्रसिद्ध केला. याशिवाय नातू, आगरकर, महाजनि, परांजपे वगैरे लेखकांनीं शेक्सपियरच्या निरनिराळ्या नाटकांचीं अशींच रूपांतरें केलीं. कोल्हटकरांच्या भाषांतरित अथेल्लोप्रमाणें गोविंद बल्लाळ देवलांचा रूपांतरित झुंजारराव (अथेल्लो) आपणापुढें आहे. येथें एक गोष्ट सांगितली पाहिजे ती ही कीं, हें हिंदु मिशनरी कार्य करणारे गुंजीकर पहिलेच लेखक नाहींत. कारण सखाराम परशुराम पंडित यांनीं शेक्सपियरच्या कथानकांचें भाषांतर करतांना हीच पद्धति स्वीकारलेली आढळते.

मराठीचे पहिले ऐतिहासिक कादंबरीकार

'विस्तारा'च्या अगदीं पहिल्या वर्षापासून ' मोचनगड ' ही गुंजीकरांची सुप्रसिद्ध ऐतिहासिक कादंबरी क्रमशः प्रसिद्ध होऊं लागली. प्रो. नी. ब. भवाळकर यांनीं तिचा मराठींतील " पहिली समजली जाणारी कादंबरी " असा ' विविध-ज्ञानविस्तार व मराठी नियतकालिकें ' या आपल्या उत्कृष्ट लेखांत उल्लेख केला आहे. (वि. ज्ञा. वि. व० ५७, पृ. १८८) परंतु बाबा पदमजींची ' यमुना-पर्यटण ' (१८५७), हळव्यांची ' मुक्तामाला ' (१८६१) व ' रत्नप्रभा ' (१८६६), बाबाजी गोखल्यांची ' राजा मदन ' (१८६५), रामचंद्र गोखल्यांची ' सुलोचना आणि माधव ' (१८६५) व बा. रा. दोंदे यांची 'चंद्रकांत' (१८६६) या कादंबऱ्या 'मोचनगडा'पूर्वीच प्रसिद्ध झाल्या आहेत. मोचनगडाला पहिलें स्थान द्यावयाचेंच तर ती मराठींतील पहिली ऐतिहासिक कादंबरी म्हणून देतां येईल. स्कॉटच्या Ivanvoe च्या धर्तीवर तिची रचना आहे. ज्या वेळीं ती प्रसिद्ध झाली, त्या वेळीं ' कादंबरी ' हा शब्द मराठींत आजच्या अर्थीं प्रचारांत नव्हता असें वाटतें. ' कल्पित गोष्ट ' असा निर्देश 'मोचनगडा'च्या पहिल्या आवृत्तीवर (१८७१) सांपडतो. इंग्रजी novel च्या धर्तीवर मराठींत वाङ्मयप्रकार सुरू झाल्यावर त्याला नांव काय द्यावें हा प्रश्न

लेखकांना त्या कालीं पडला असावा. प्रथम ‘ कल्पित गोष्ट ’, पुढें ‘ नॉव्हेल ’ असेंही लोक त्याला नांव देत. नंतर संस्कृतमध्यें गद्यांत लिहिलेली बृहत्कथा जी बाणाची कादंबरी तिच्यासारखा ग्रंथ म्हणून कादंबरी हेंच नांव प्ररूढ झालें. विविधज्ञानविस्तारांत नोवेल या अर्थी ‘ कादंबरी ’ हा शब्द नवंबर १८७० च्या (पु. ३, पृ. ९१) अंकांत रिसबुडांच्या विश्वासराव कादंबरीच्या परीक्षणांत प्रथम आला आहे.

कादंबरी हा शब्दप्रयोग प्रथम रा. रिसबुडांनींच केला असावा. त्यांची पहिली कादंबरी जी **मंजुघोषा** (१८६८) तिच्या प्रस्तावनेंत पुढील वाक्य सांपडतें: ‘ आपण ज्यांस इंग्रजींत “नॉव्हेल्स” किंवा संस्कृतांत “ कादंबरी ” असें म्हणतों असल्या ग्रंथांचें मूळ पाहिलें तर ज्या कुत्र्या-मांजराच्या गोष्टी आपण लहानपणापासून ऐकतों त्यांतच आहे.’

इंग्रजी नॉव्हेलचा उगम कांहींसा निराळा आहे. पूर्वीं इकडच्या प्रमाणेंच युरोपांतही कथावाङ्मय पद्यांतच लिहिलें जाई. १३५० सालीं बोकाषियोनें इटलींत Decameron ह्या गद्यकथा लिहिण्यास सुरवात केली. त्यांना “ Novella Storia ” म्हणजे नव्या किंवा ताज्या गोष्टी असें म्हणत. पण अद्भुत किंवा दन्तकथात्मक कथा पूर्वीप्रमाणेंच पद्यांतच लिहिल्या जात व त्यांना Romance हें जुनेंच नांव चालू राहिलें. Novella मध्यें चालू व वास्तववादी अशा कथांचा अन्तर्भाव होई. याच्यावरूनच इंग्रजी Novel हा शब्द सद्यांच्या अर्थी १६४३ च्या सुमारास अस्तित्वांत आला. मोचनगडाचा कथाप्रसंग शिवकालीन म्हणजे मुसलमानांच्या अमदानींतला, पण पोर्तुगीजांच्या कारकीर्दीवरही गुंजीकरांनीं दुसरी एक हृदयस्पर्शि कादंबरी (हिला त्यांनीं ‘गोष्ट’ असेंच नांव दिलें आहे) ‘विस्तारां’तून तिसऱ्या वर्षा-पासून सुरू केली व पुस्तक ६ पर्यंत तिची एकंदर तेराच प्रकरणें प्रसिद्ध झालीं आहेत. गुंजीकरांना पोर्तुगीज भाषा अवगत नव्हती, परंतु त्यांनीं दिलेलीं पोर्तुगीज पात्रांचीं नांवें वगैरेचे उच्चार पोर्तुगीज दिसतात. त्यावरून व इतर आणखी कांहीं प्रमाणांवरून कोणीतरी तोंडी सांगितलेल्या माहितीवर त्यांनीं ही कादंबरी उभारली असावी, असें वाटतें व ही माहिती देणारे गृहस्थ चिपळूण-करांनीं ‘मोरोपंत’ या विस्तारांतील ज्या निबंधावर टीका केली आहे त्याचे

लेखक कै. गंगाधर गो. शिनारी हे असावेत. कारण यांना पोर्तुगीज भाषा माहीत होती, असें समजतें. 'विस्तारा'च्या (पु. १०, अं. १) मलपृष्ठावर ता. १ फेब्रु. १८७८ ची गुंजीकरांच्याच सहीची एक जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. तिच्यामध्यें ही कादंबरी संपूर्ण स्वरूपांत स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध होणार असून तिचीं पृष्ठें द्वादशपत्री सुमारें २०० वर होतील, असें लिहिलें आहे. यावरून त्यांनीं ही कादंबरी पुरी केली होती कीं काय, अशी एक शंका येते. प्रसिद्ध झालेल्या तेरा प्रकरणांत या कादंबरीचें कथासूत्र पोर्तुगालपर्यंत नेऊन विजापूरच्या राजपुत्राच्या प्रेमपाशांत सांपडलेली व्हास्को ड गामाची पुतणी जी इजावेला तिला पोर्तुगालच्या इंक्विझिशनपुढें उभें केलें आहे. कादंबरीची नायिका गोदावरी हीही या वेळीं पोर्तुगालमध्येंच असते ! इंक्विझिशनचें अचाट सामर्थ्य ज्यांना माहित असेल त्यांना ऐतिहासिक सत्याशीं मेळ ठेवून गुंजीकरांनीं या कथेचा परिपोष व शेवट कसा केला असता याचें कोडेंच पडल्याखेरीज राहाणार नाहीं. पूर्वी आलेशांद्रि येर्कुलानु यांचा पोर्तुगीज इंक्विझिशनवरील स्वतंत्र ग्रंथ किंवा ओलिव्हैर मार्तिंस, पिंजैरु शागस यांच्या पोर्तुगालच्या इतिहासांत आलेली इंक्विझिशनसंबंधीं माहिती उपलब्ध होती. परंतु अलीकडे 'नवे ख्रिश्चन', 'इंक्विझिशनच्या उपकथा' किंवा पोर्तुगीज ऐतिहासिक दप्तरी सि. बायांव यानें अलीकडे प्रसिद्ध केलेला इंक्विझिटरचा पत्र-व्यवहार वगैरे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय H. C. Lea यांचें स्पॅनिश इंक्विझिशनसंबंधीं इंग्रजींत ग्रंथ आहेत. त्यांच्या सहाय्यानें ही कादंबरी पुरी करतां येईल. याशिवाय खरें पातिव्रत्य, सुशीलाचरित्र वगैरे कांहीं लहान गोष्टी त्या काळीं त्यांनीं लिहिल्या. परंतु त्यांत सांगण्यासारखें वैशिष्ठ्य असें कांहीं नाहीं.

मराठी ऐतिहासिक साधनांचें संशोधन

काल्पनिक ऐतिहासिक कथाप्रसंग आपल्या मोचनगड व गोदावरी या कादंबऱ्यांमध्यें रेखाटून गुंजीकर थांबले नाहींत, तर अस्सल साधनांच्या आधारावर " मराठ्यांचा खरा इतिहास " लिहिण्याकरितां त्यांनीं कंबर कसली. याकरितां 'विस्तारा'च्या आक्टोबर १८७१ च्या अंकांत त्यांनीं 'सर्व लोकांस विनंती' या मथाळ्याखालीं ऐतिहासिक दाखले आपणाकडे पाठविण्याबद्दल जाहिरात

प्रसिद्ध केली, व ती तशीच कांहीं अंकांत चालू ठेविली होती. ऐतिहासिक कागदपत्र जाहीर रीतीनें मागवून ते छापविण्याचा उपक्रम महाराष्ट्रांत गुंजीकरांनींच प्रथम सुरू केला, आणि त्याप्रमाणें "मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें" या सदराखालीं रामचंद्र पंडित बावडेकर यांनीं कोल्हापूरच्या संभाजी राजास उपदेशिलेलें राजनीतिपर आज्ञापत्र, (वि. ज्ञा. वि. वर्ष ५ व ६) श्रीशिवछत्रपतींची सप्तप्रकरणात्मक बखर (पु. ९ ते १३) वगैरे लेख क्रमशः प्रसिद्ध होऊं लागले. या प्रश्नांकडे लोकांचें लक्ष वेधण्याकरितां 'शिवाजी महाराजांचा स्वभाव' हा लेख गुंजीकरांनीं लिहिला. (वि. ज्ञा. वि. नोव्हेंबर १८७१) त्यांत ते म्हणतात, "ग्रांट डफ याणें तर आपल्या पुस्तकामध्यें शिवाजीला जे दोष दिले आहेत ते जर कोणी निस्पृह मनुष्य पाहील, तर ते लिहिणाऱ्याला त्याला शिवाजीच्या वास्तविक गुणाहून दुसरें कांहीं तरी कारण झालें असावें असें उघड दिसेल. ज्या वेळीं त्याणें मराठ्यांची बखर लिहिली त्या वेळची राज्यक्रांतीची स्थिति लक्षांत आणून, मुद्दाम खऱ्या गोष्टीमध्यें त्याणें अफरातफर केली असावी, असाही उघड संशय येतो. परंतु त्याचा स्पष्ट पुरावा करण्यास, आमच्या शोधक म्हणविणाऱ्या नवीन विद्वानांनीं कांहीं लेख जमविले नाहींत व ग्रांट डफ यानेंही मिळविलेले लेख कोणत्या कोपऱ्याच्या भक्षस्थानीं टाकले हेंही समजत नाहीं व समजलें तरी ते अप्राप्तच; तस्मात् ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे." ग्रांट डफचा इतिहास विश्वसनीय नाहीं व तो अपुरा आहे या मताचा उच्चार रा. ब. नी. ज. कीर्तने यानीं पुणें कॉलेजांत शिकतांना यंगमेन्स ॲसोसिएशन नामक सभेपुढें वाचलेल्या एका निबंधांत प्रथम केला होता. त्यांचेही लेख 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें (उपोद्घात)' या मथाळ्याखालीं (पु. ८, अं. ८ व अं. ११) 'विस्तारां'त प्रसिद्ध झाले. 'सोनपत–पानपत येथील मराठे–दुराणी युद्ध' ही भाषांतरींत ऐतिहासिक लेखमाला गुंजीकरांनीं पुढें 'विस्तारां'त लिहिली. (पु. ४ व ५ पाहा). अशा प्रकारें ऐतिहासिक पोवाडे व बखरी 'विस्तारां'तून छापण्यास सुरवात झाली. पुढें केवळ या कार्यालाच वाहिलेलें 'काव्येतिहाससंग्रह' हें मासिक १८७८ सालीं साने, मोडक, विष्णुशास्त्री व शाळिग्राम यांच्या प्रयत्नानें निघालें. यानंतर, राजवाडे, खरे, पारसनीस वगैरे संशोधकांनीं हें ऐतिहासिक साधनें गोळा करण्याचें पुष्कळच कार्य केलेलें आहे व महाराष्ट्राला भूषणभूत असलेलें

पुण्याचें भारतइतिहाससंशोधकमंडळ, धुळ्याचें राजवाडेसंशोधनमंदिर व वाग्देवता-मंदिर वगैरे संस्था हेंच कार्य करीत आहेत. पोतदार, देव, भट वगैरे मंडळींनीं या कामीं केलेली खटपट अवर्णनीय होय. परंतु " मराठ्यांचा खरा इतिहास " लिहिला जाण्याची गुंजीकरांची इच्छा मात्र अद्याप अतृप्तच राहिली आहे, असें खेदानें म्हणावें लागतें.

सरस्वतीमंडळ व भ्रमनिरास

राष्ट्राचा इतिहास म्हणजे केवळ राजाच्या वंशावळ्या, युद्धें व तह यांच्याच हकीकती नसून तेथील प्रमुख ज्ञाति व संस्था यांच्या माहितीलाही तितकेंच महत्त्व आहे, ही गोष्ट अलीकडे सर्वमान्य होत चालली आहे. या दृष्टीनें महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासाबरोबर सामाजिक इतिहासही लिहिला जावा, असें गुंजीकरांना वाटणें स्वाभाविकच होतें. याकरितां त्यांनीं १८८४ सालीं सरस्वतीमंडळ हें पुस्तक लिहून त्यांत १ सारस्वत, २ यजुःशाखीय वाजसनेय, ३ देशस्थ, ४ चित्पावन, ५ कऱ्हाडे, ६ देवरुखे, व ७ किरवंत अशा सात ब्राह्मण जातींची माहिती देण्याचा प्रयत्न केला. प्राचीन काळीं ब्राह्मणांमध्यें आतांच्या सारखे भेद व गैरसमजुती नव्हत्या. पण गुंजीकर या पुस्तकाच्या उपसंहारामध्यें म्हणतात, "परस्परांमध्यें जे हे द्वेष, आणि ज्या या गैरसमजुती झाल्या आहेत, त्यांचीं मुख्य कारणें पाहतां दोन. एक राजकीय स्पर्धा, आणि एक परस्परांविषयीं गैर माहिती. अहाहा! या द्वेषांनीं महाराष्ट्राची आणि किंबहुना सर्व भरतखंडाची केवढी दुर्दशा करून टाकिली! .... अजून आपण अशी आशा धरूं कीं, या सर्व ब्राह्मण जाती एक होतील, एक विचारें वागतील, एकमेकांतील कलह सोडतील, आणि या देशांतील सरस्वतीभांडार जें परमेश्वरानें यांच्या हातीं कृतयुगापासून ठेविलें आहे, त्याचा सद्व्यय करून 'सरस्वतीमंडळ' हें आपलें नांव पुनरपि कृतार्थ करतील." दुर्दैवानें गुंजीकरांचा हा हेतु बाजूला राहून उलट या पुस्तकामुळें एक नवेंच वादाचें वादळ उठलें! गुंजीकरांचे एक सहकारी मित्र कै. प्रो. रा. रा. भागवत यांनीं या पुस्तकावर कांहीं आक्षेप घेऊन 'जशास तसें', हें पुस्तक लिहिलें. त्याला गुंजीकरांनीं 'भ्रमनिरास' नांवाचें पुस्तक लिहून उत्तर दिलें. त्याला प्रत्युत्तरादाखल पुनः भागवतांनीं 'जशास तसें' ची पुरवणी प्रसिद्ध केली. या उद्वेगजनक वादांतून

एक फायदा झाला तो हाच कीं, ब्राह्मण वर्गाचें व इतर ज्ञातींचें आपल्या कुलेतिहासाकडे लक्ष वेधलें. पूर्वीं निरनिराळ्या जातींची माहिती गॅझेटियरमध्यें सरकारी रीत्या प्रसिद्ध झाली होती तेवढीच म्हटल्यास चालेल. अलीकडे बदलापूरचे सेवानिवृत्त फर्स्टक्लास सबजज्ज रा. ना. गो. चाफेकर यांचा 'चित्पावन', मुंबईचे समाजसेवक रावबहादूर श्रीपादराव तालमकी यांची 'सारस्वत घराणीं' किंवा भावे, आठल्ये, लिमये, गोखले, आपटे, या घराण्यांचे कुलेतिहास प्रसिद्ध झाले आहेत, ही आनंदाची गोष्ट होय. याचप्रमाणें आद्य गौड, कायस्थ प्रभु वगैरे ज्ञातीच्या इतिहासासंबंधीं कांहीं ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. तसेंच कांहीं ज्ञातिविषयक मासिकेंही हें कार्य करीत आहेत.

वाङ्मयसमीक्षा

मराठी भाषेंत आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या नियतकालिकांत उत्कृष्ट, विस्तृत व विद्वत्तापूर्ण ग्रंथपरीक्षणाच्या बाबतींत 'विविधज्ञानविस्तारा'इतका दुसऱ्या कोणत्याही नियतकालिकानें लौकिक संपादन केलेला नाहीं. हा लौकिक त्यास प्राप्त करून देण्यास, ह. म. पंडित, रा. रा. भागवत, वा. दा. ओक, वि. मो. महाजनी, कृ. प्र. खाडिलकर, श्री. कृ. कोल्हटकर, वा. म. जोशी, मं. जि. तेलंग, पां. वा. काणे, दा. गो. पाध्ये, गो. स. सरदेसाई, वा. गो. आपटे, वा. अ. भिडे, नी. ब. भवाळकर, शि. सी. वागळे, श्री. कृ. बेलवलकर, रं. बा. रड्डी, दा. ना. आपटे, वगैरे वगैरे टीकाकार कारणीभूत झालेले आहेत, यांत शंका नाहीं. परंतु या लौकिकाचा पाया व टीकालेखांचा कित्ता स्वतः गुंजीकरांनींच घालून दिला होता, हें त्यांचा कुंट्याचा राजा शिवाजी, कृष्णशास्त्री राजवाड्यांचे अभिज्ञान शाकुंतल, चितळयांची मनोरमा, फडक्यांची वसंतमाला वगैरे पुस्तकांवरील परीक्षणें वाचल्यावर दिसून येतें. कुंट्याच्या शिवाजीकरितां त्यांनीं तीन लेखांक खर्चीं घातले आहेत. त्यांत मिल्टन, वामन वगैरे इंग्रजी व मराठी कवींशीं तुलना करून या काव्याचे गुणदोष विवेचन व रसग्रहण मार्मिकपणें, सहृदयतेनें व साधार केलेलें आहे. कुंट्याच्या काव्याचें एक वैशिष्ट्य म्हणजे संस्कृत शब्द शक्यतोवर टाळण्याचा त्यांचा प्रयत्न होय. यासंबंधीं गुंजीकर म्हणतात, " संस्कृत शब्द गाळण्याचा हा नियम आम्हांस योग्य वाटत नाहीं. मराठी भाषेचा शब्दसंग्रह दिवसें दिवस आकुंचित करीत जाणें हें नीट नाहीं. जर नवीन नवीन ग्रंथकार व कवि आपल्या भाषेचा शब्दसंग्रह वाढविणार

नाहींत व तिजमध्यें मोरोपंत वामनादि कवींनीं शिरवून दिलेले आयत प्रौढ व उपयुक्त संस्कृत शब्द गाळून टाकूं पाहतील, तर भाषेची सुधारणा कधींही होणार नाहीं. संस्कृत भाषेपासून मराठी भाषा फार दूर दूर जाऊं देऊं नये." असेच परीक्षणविषयक पुस्तकांचें गुणदोषविवेचन करतांना गुंजीकरांनीं मधून मधून जे विचार व्यक्त केलेले आहेत ते विचारार्ह आहेत. **विश्वासराव** या रिसबुडांच्या कादंबरीवर लिहितांना गुंजीकर म्हणतात, "कल्पनेच्या पुस्तकांची गरज गहन विषयावर मन गुंतून गेल्यामुळें ज्या वेळीं त्यास आलस्य येतें त्या वेळीं तें घालवून त्यास पुन्हा चेतना देण्याकरितां आहे. किंवा जेव्हां सांसारिक अनेक अडचणींनीं किंवा दुखण्यानें मन वर सांगितलेल्या (गंभीर) विषयांच्या अभ्यासास अपात्र होतें त्या वेळेस अशा पुस्तकांचा उपयोग होतो. परंतु सर्वकाळ कल्पित गोष्टी वाचण्याची एकवार सवय लागली म्हणजे विचार-शक्तीस विशेष ओढा न बसल्यामुळें इतर विषय ग्रहण करण्यास जितकें स्थैर्य व एकचित्तपणा आणावा लागतो तितका येत नाहीं." आजच्या ललितवाङ्मयाच्या पुरस्कर्त्यांनीं हे विचार अवश्य लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. **प्रेमबंधन** या कादंबरीसंबंधीं लिहितांना ते म्हणतात, "नाटकाप्रमाणेंच उत्तम कादंबरी-मध्येंही, आरंभापासून शेवटपर्यंत जे जे प्रकार वर्णिले असतील, त्या सर्वांचा मुख्य कथेशीं असा कांहीं चमत्कारिक संबंध असला पाहिजे कीं, जर त्यांतून एखादा लहानसाही प्रसंग गाळून टाकला, तर तितक्यामुळें सगळी कथा तुटक दिसली पाहिजे." हें तंत्र आज कितीसे लेखक संभाळतात? अलीकडे वास्तव-वादाचा (Realism) जोरानें पुरस्कार केला जातो. या भ्रामक मताचा मराठींतील आद्य उत्पादक डेक्कन कॉलेजांतील एक विद्यार्थी रा. महादेव बा. चितळे हा असावा! त्यानें लिहिलेल्या **मनोरमा** नामक नाटकाविषयीं लिहि-तांना गुंजीकर म्हणतात, "लोकव्यवहारांतील भाषा किंवा रीति दाखविण्यास चावटगिरीच लिहिली पाहिजे असें वाटत नाहीं, आणि अशा पुस्तकांस चावट-गिरीची आवश्यकताच असेल, तर देव करो, आणि आपल्या देशामध्यें अशीं पुस्तकें न होवोत. लोकव्यवहारामध्यें अनेक बीभत्स प्रकार केव्हां केव्हां होत असतात म्हणून ते सभ्य लोकांच्या ऐकण्यामध्यें येणें किंवा प्रसिद्ध पुस्तकांमध्यें लिहिणें हें फार अयोग्य आहे." इंग्रजीमध्यें वाङ्मयसमीक्षेची (Literary Criticism) तत्त्वें किंवा इतिहास यावर अनेक पुस्तकें

आहेत. या शास्त्राचा पश्चिमेकडील आद्य पुरस्कर्ता आरिस्टॉटल समजला जातो. त्यानें आपल्या साहित्यशास्त्रामध्यें (Poetics) उपस्थित केलेले प्रश्नच आजच्या पाश्चात्य साहित्यशास्त्राच्या मुळाशीं आहेत. कांहीं काळापूर्वी केवळ दोषाविष्करण म्हणजे वाङ्मयपरीक्षण असें इंग्लंडांतील टीकाकारांना वाटे; पण पुढें तिकडे ' रोमांटिक ' कालाचा उदय झाल्यावर या समाजांत विलक्षण क्रांति घडून आली. " What it did was to transform Criticism from the cult of finding faults to the art of revealing beauties, " असें या स्थित्यंतराचें वर्णन कॅाप्टन् रिकेट यानें आपल्या इंग्रजी वाङ्मयाच्या इतिहासांत केलेलें आहे. कोलेरिज्जनें आपल्या लेखांनीं या वाङ्मयसमीक्षेला ऐतिहासिक पद्धतीचा लाभ करून दिला. अलीकडे वर्तमानपत्री पद्धतीनें खऱ्या वाङ्मयसमीक्षेला ग्रासून टाकलें आहे, अशी तिकडेही ओरड असून आपल्या इकडे तर पुस्तकपरीक्षणें म्हणजे शुद्ध जाहिराती बनलेल्या आहेत ! अशा परिस्थितींत पौर्वात्य व पाश्चात्य साहित्यशास्त्राचा तुलनात्मक अभ्यास करून व गुंजीकर, चिपळूणकर, पंडित, भिडे, कोल्हटकर, खाडिलकर, केळ्कर ते माडखोलकर–खांडेकरांपर्यंत सर्व समीक्षकांच लेख विचारांत घेऊन **वाङ्मयसमीक्षेवर** मराठींत स्वतंत्र ग्रंथ निर्माण होणें आवश्यक आहे.

वाङ्मयाचें विविधज्ञानयुक्त स्वरूप

पुरुषाप्रमाणें स्त्रियांचीही सुधारणा झाल्याशिवाय समाजाची उन्नति होणें शक्य नाहीं, हें तत्त्व लक्षांत ठेवूनच गुंजीकरांनीं स्त्रियांस रुचतील व पचतील असे त्यांच्याकरितां अनेक लेख लिहिले. त्यांपैकीं कांहीं गोष्टी **सौभाग्यरत्नमाला** या नांवाखालीं १८८६ सालीं स्वतंत्र पुस्तक रूपानें एकत्र प्रसिद्ध झाल्या आहेत. याशिवाय उत्कर्षाकांक्षा, कुटुंबशिक्षा, नक्कल, मुलांचें अवसान, व्यसन, शूर कोणास म्हणावें, वगैरे शिक्षणविषयक व बोधप्रद असे लघुनिबंध गुंजीकरांनीं लिहिलेले आढळतात. वृक्षायुर्वेद, शास्त्र, पृथ्वीची उत्पत्ति, धूमकेतु, शिल्पसंहिता इत्यादि लेख त्यांचें शास्त्रीय विषयांकडे दुर्लक्ष नव्हतें, हें सिद्ध करण्यास पुरेसे आहेत. कुंभारकाम या त्यांच्या सचित्र लेखावरून देशी कलाकौशल्य व उद्योगधंदे यांच्या संरक्षणाची व वर्धनाची त्यांची कळकळ व आस्था

प्रत्ययास येते. रुधिराभिसरण किंवा मातृशिक्षा वगैरे लेखांवरून आरोग्य किंवा वैद्यक या विषयाचें त्यांना वावडें नव्हतें हें स्पष्ट होईल. 'मकरंद' या टोपण नांवाखालींही ते लिहीत असत.

आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून त्यांच्या वाङ्मयाचें स्वरूप कसें विविध, स्फूर्तिदायक व ज्ञानप्रद होतें तें कळून येईल.

कवि गुंजीकर

गद्याप्रमाणेंच कधीं कधीं वाङ्मयाच्या पद्यप्रकाराकडेही ते लक्ष देत असें दिसतें. 'विस्तारां'तील त्यांच्या मृत्युलेखांत, "स्वतः ते मराठी कविता करीत. त्यांच्या कांहीं कविता वि. ज्ञा. विस्तारामध्यें प्रसिद्ध झाल्या आहेत. प्रिन्स ऑफ वेल्स हे हिंदुस्थानांत आल्यावेळीं त्यांस संबोधून त्यांनीं एक छोटेंसें काव्य लिहून प्रसिद्ध केल्याचें कांहींकांच्या स्मरणांत असेल," असा मजकूर आढळतो; परंतु त्यांची 'विस्तारां'तील कविता कोणती हें कळत नाहीं, किंवा प्रिन्स ऑफ वेल्स वरील काव्यही सद्या उपलब्ध नाहीं. त्यांच्या कवितांसंबंधीं लिहितांना, "त्यांत प्रसाद आणि रस हे ओतप्रोत आढळतात," असे उद्गार कै. वि. को. ओक यांनीं काढले आहेत. (बालबोध, पुस्तक २१, अं. ४) त्यांच्या कवितेचा एक उपलब्ध मासला पाहा: आपल्या एका मृतमित्राच्या चितारूढ देहाकडे पाहून गुंजीकर म्हणतातः—(वि. ज्ञा. वि. पु. २९, पृ. ५९)

श्लोक

कितिक म्हणतो श्रीमान् आम्ही चला तुम्हि दूर व्हा
कितिक म्हणती विद्वान् आम्ही कळे नच हें तुम्हां
कितीक म्हणती सत्ताधारी अम्ही तुम्हि आयका
सम परि यमा लक्ष्मी विद्या पराक्रम बायका ! १
क्षण न लगतां रक्षा झाली स्वयें जरि पाहतों
कपट करुनी माना मोडूं जनां नचि लाजतों
अहह सुजना कां र प्राण्या वृथा उपताप हा
अश्रुनिहि करीं कांहीं थोडा परार्थ सुखें रहा ! २

तुजसह अम्ही बोलूं भांडूं गळ्या तुज दूखवूं
कधिं तुजसवें थट्टा गोष्टी कधीं तुज सूखवूं
तुजसह अम्हीं खावें प्यावें अतां सरलें अहा
सुख तुज असो जातों प्राण्या क्षमा करिं तूं रहा ! ३

कवि या नात्यापेक्षां काव्यमर्मज्ञ व काव्यरसिक म्हणूनच वाङ्मयांत त्यांचे स्थान विशेष राहील हें त्याचें काव्यविचार वगैरे निबंध व राजा शिवाजी वगैरे काव्यांवरील परीक्षणांवरून कळून येइल. काव्यसंग्रहाचें संपादकत्वही कांहीं काळ त्यांच्याकडे होतें.

व्याख्यानें किंवा वाचलेले निबंध

गुंजीकरांनीं जीं कांहीं व्याख्यानें दिलीं किंवा सभेंत निबंध वाचले त्या सर्वांची नोंद उपलब्ध नाहीं. ता. १९ मार्च सन १८७५ रोजीं त्यांनीं उपयुक्त मराठी ज्ञानप्रसारक सभेमध्यें वाचलेला एक निबंध विविधज्ञानविस्तारांत (पुस्तक ७, पृ. ६१) प्रसिद्ध झाला असून त्याचा विषय “ **भरतखंडाच्या निकृष्टावस्थेचीं कारणें आणि उत्कर्षाचे उपाय,** ” असा आहे. यांत “ आपल्या देशाची दुर्दशा होण्यास मूळ कारण गर्व, पण ती दुर्दशा इतक्या पंथास पोचण्यास खोटा स्वार्थ आणि दैवावर हवाला हीं दोन मोठीं कारणें झालीं, ” असें सांगून, “ आतां आमच्या देशाला कांहीं. आशा उरली आहे कीं नाहीं ? मी या प्रश्नाचें उत्तर असें देतों कीं, अजूनही आपल्या देशाला आशा आहे. ती कोणत्या रीतीनें ? तर, “ अति मोठ्या जनसंख्येचें अति मोठें कल्याण, हाच सर्व सुधारणेचा पाया, ” हें तत्त्व आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. यापासूनच आमच्या देशाची खरी सुधारणा होईल. ” असें म्हटलें आहे.

मुंबईच्या ‘हिंदु युनियन् क्लब’च्या हेमंत व्याख्यानमालेच्या दुसऱ्या वर्षीं त्यांनीं ता. २९–१–८७ रोजीं दिलेलें तिसरें व्याख्यान **विद्यावृद्धीच्या कामीं आमची अनास्था** या नांवाखालीं स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेलें आहे. या व्याख्यानांत प्रथम, “ स्वतःचे दोष पाहणें हें सर्व सुधारणांचें मूळ बीज होय, ” असें सांगून आपल्या शिक्षणपद्धतींतील चुकांचा निर्भीडपणें

विचार केलेला आहे. गुंजीकरांचें सारें आयुष्य अध्यापनकार्यांत गेलेलें असल्यामुळें त्यांच्या या स्वानुभवाच्या बोलांचें महत्त्व फार आहे. ते म्हणतात, "विद्यावृद्धीच्या कामीं जी सुधारणा होणें अवश्य आहे ती विशेषेंकरून आमच्या प्रयत्नानें झाली पाहिजे. ... इंग्लिश लोक परके, त्यांनीं स्वदेशीय पद्धतीचा नमुना धरून, आम्हांला एक धोपट मार्ग लावून दिला. परंतु ती पद्धति एथें लागू होते किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे." थोडासा मराठीचा अभ्यास होतांच मुलांना इंग्रजी शाळेंत पाठवावयाचें व पुढें सर्व विषय इंग्रजींतून शिकवावयाचे या 'धोपट मार्गाचें' वर्णन करून ते पुढें सांगतात, "या पद्धतीमुळें त्यांचा देशभाषेचाही अभ्यास होत नाहीं आणि इंग्रजीचाही अभ्यास होत नाहीं, अर्थात इंग्रजी भाषेच्या द्वारें शिकविण्यांत येणारे जे विषय ते सर्व कच्चे राहतात. इतकेंच नव्हे तर त्या श्रमापासून, विद्यार्थ्यांच्या शरीरावर व मानसिक शक्तीवरही फारच ताण पडून, त्यांच्या बुद्धीचा आणि शरीरशक्तीचाही ऱ्हास होत जातो." गुंजीकर स्वतः मराठींतूनच शिकवीत हें त्यांच्या एका शिष्याच्या मागें दिलेल्या आठवणींत आलेंच आहे. सुमारें पंचावन्न वर्षांमागें त्यांनीं प्रतिपादलेलें तत्त्व अलीकडे सर्वमान्य झालें असून शाळेंतील निरनिराळे विषय देशी भाषेंत शिकण्याची किंवा त्यांची उत्तरें मातृभाषेंतून देण्याची सवलत विद्यार्थ्यांना विद्याधिकाऱ्यांनीं दिलेली आहे. या व्याख्यानांत मुलांना अल्पवयांत शाळेंत पाठवूं नये याही तत्त्वाचा गुंजीकरांनीं जोरानें पुरस्कार केलेला आहे. शेवटास मराठी मासिकें व वर्तमानपत्रें सुधारण्यासंबंधीं त्यांनीं ज्या कांहीं सूचना केल्या आहेत, त्याही चिंतनीय आहेत.

ता. १८ ऑगष्ट १८९९ रोजीं मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा पहिलाच वार्षिक समारंभ झाला, त्याचे अध्यक्ष न्या. मू. रानडे व वक्ते गुंजीकर होते. 'नेटिव्ह ओपिनियन'च्या ता. २० ऑगष्ट १८९९ च्या अंकांत या उत्सवाची जी हकीकत देण्यांत आली आहे. तिच्यामध्यें गुंजीकरांनीं मराठी भाषेसंबंधीं निबंध वाचल्याचें प्रसिद्ध झालें आहे; परंतु शोध करूनही तो कोठें प्रसिद्ध झालेला मला सांपडला नाहीं.

ठाण्याच्या मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या वार्षिकोत्सवाच्या प्रसंगीं (ता. १६ जून १९०१) अध्यक्ष या नात्यानें गुंजीकरांचें भाषण झालें होतें. पंधरा दिवसांपूर्वींच त्यांची एक कन्या दिवंगत झाल्यामुळें ते साहाजिकच

उद्विग्न मनस्थितींत होते; परंतु ठाणेकर कार्यकर्त्यांच्या अत्याग्रहास्तव त्यांना हें निमंत्रण स्वीकारावें लागलें. अर्थात आपलें भाषण त्यांना लिहून काढतां आलें नाहीं. ठाण्याचें स्थानिक पत्र अरुणोदय यांत या समारंभाची हकीकत दिलेली आहे; परंतु भाषण दिलेलें नाहीं. हा समारंभ आटोपून गुंजीकर घरीं आले व दुर्दैवानें दुसऱ्या दिवशीं सकाळींच त्यांना पक्षघाताचा विकार होऊन ता. १८ जून १९०१ रोजीं त्यांचा अंत झाला.

उपसंहार

येथवर विवेचन केलेल्या गुंजीकरांच्या वाङ्मयावरून त्याच्यामध्यें बहुविधतेप्रमाणें अपूर्वता, स्वाभिमानाबरोबर सत्यप्रेम, शास्त्रीय संशोधक दृष्टि तशीच आकर्षक सुबोधता, संयमाबरोबर निर्भीडपणा वगैरे अनेक गुण आपल्याला दिसून येतात. परंतु त्याचबरोबर त्यांचे कांहीं उपक्रम अपुरेच आहेत हीही गोष्ट आपल्या लक्षांत आल्याखेरीज राहत नाहीं. काव्यविचार, बंगाली व्याकरण, व्याकरणविचार, गोदावरी कादंबरी, कौमुदीमहोत्साह हे त्यांचे प्रयत्न पूर्णत्वाला गेले नाहींत. असें होण्याचें नक्की कारण जरी आपणाला सांगतां आलें नाहीं, तरी पण तर्कानें ताडतां येण्यासारखें आहे. आपली मायभाषा ही इंग्रजी किंवा संस्कृत या भाषांच्या तोडीची व सुसंपन्न व्हावयाची असली तर तिच्यामध्यें शास्त्रीय पद्धति व अनेक वाङ्मयप्रकार रूढ होऊन तिच्यामध्यें विविधज्ञानविस्तार झाला पाहिजे ही त्यांना लागलेली तळमळ त्यांच्या लेखांत ठिकठिकाणीं दिसून येते. अशा स्थितींत "हें करूं कीं तें करूं" असें होऊन हातांत घेतलेलें पहिलें काम अर्धेंच असतां नवीन कामांत मन रंगल्यामुळें जुनें काम अपुरें राहिलें असणें शक्य आहे. शिवाय सुरवातीला त्यांची सांपत्तिक स्थिति म्हणण्यासारखी समाधानकारक नव्हती. विविधज्ञानविस्ताराकरितां त्यांना महिन्याकांठीं पदरमोडही करणें भाग पडे असें वाटतें. पुढें 'विस्तारा'शीं असलेला संबंध सुटला व त्याची जबाबदारी पुरुषोत्तमराव नाडकर्णी यांनीं घेतली, तरी त्यांची वाढत्या कुटुंबाबरोबर संसाराचा व्यापही वाढल्यामुळें त्यांना अशा कामांत लक्ष घालण्यास जितकें मानसिक किंवा आर्थिक स्वास्थ्य हवें असतें तितकें लाभलें नसावें. त्यांचे उद्योग किंवा उपक्रम जे निबंध किंवा ग्रंथ यांच्या रूपानें पुढें आले तेवढेच आपणास माहीत झाले; परंतु याशिवाय आणखी किती गोष्टींत त्यांनीं लक्ष घातलें होतें हें

सांगवत नाहीं. त्यांच्या हातचा एक जुना कागद सांपडला त्यावर युरोपियन लोकांची गायनशास्त्रांतील जी एक विशिष्ट स्वरलेखनपद्धति आहे, तशा-प्रकारचा मजकूर त्यांनीं लिहिलेला आढळतो. त्यावरून इंग्रजी शॉर्टहँडवरून मराठी लाघवी लिपि ज्याप्रमाणें त्यांनीं निर्माण केली त्याप्रमाणें मराठी भाषेला स्वरलेखनलिपीचाही लाभ करून देण्याचा त्यांचा प्रयत्न होता, असें स्पष्ट दिसतें. अलीकडे पुण्याच्या फिलहारमोनिक सोसायटीनें या दिशेनें प्रयत्न चालविला होता व कै. भातखंडे यांचेंही त्याच्यामध्यें अंग होतें, असें कळतें; परंतु हा प्रयत्न सिद्धीस गेला कीं काय माहीत नाहीं.

त्यांच्या आयुष्यामध्यें विशेषतः अखेरीच्या काळांत त्यांच्यावर अनेक शोकजनक प्रसंग गुदरले; त्यांच्या धक्क्यामुळें जर्जर होऊन त्यांचा अकालीं अंत झाला असें म्हटलें पाहिजे. त्यांची शरीरप्रकृति जात्या निकोप होती व त्यांच्यासारख्या निर्व्यसनी व सदाचारसंपन्न पुरुषाला सुमारें ५८ व्या वर्षीं मृत्यु येणें हें निसर्गाविरुद्धच होय. ता. ३१ आगष्ट १८९८ मध्यें म्हणजे आपल्या वयाच्या पंचावनाव्या वर्षीं ते सेवानिवृत्त झाले. नोकरीच्या जंजाळांतून सुटल्यावर त्यांना दहापंधरा वर्षें मानसिक स्वास्थ्य व आयुष्य लाभतें तर त्यांनीं कदाचित आपलीं अपुरीं कार्यें व संकल्प तडीस नेले असते यांत शंका नाहीं.

विविधज्ञानविस्तार सुरू केल्यावर दुसऱ्याच वर्षीं त्यांच्या प्रथम पत्नी सौ. जानकीबाई यांचा अंत झाला. पुढें कांहीं कालानें मुंबईच्या धुमे घराण्यांत त्यांचा द्वितीय संबंध जुळून आला. त्यांचीं सर्व मुलें या द्वितीय पत्नीपासून जन्मलेलीं. १८९० सालीं त्यांच्या मातोश्री श्री. लक्ष्मीबाई यांचा अंत झाला. मातृवियोग हा असह्य असला तरी निसर्गाला धरून होता; परंतु १८९३ सालीं त्यांचे वडील जामात विठ्ठलराव भांडारकर, एल्. सी. ई. हे वारले. १८९४ सालीं त्यांचा वडील मुलगा भगवंत हा कॉलेजांत शिकत असतांना निधन पावला. १८९५ सालीं सप्टेंबरांत त्यांचे कनिष्ठ बंधु गणेशराव कालवश झाले. **कन्नड परिज्ञान** (१८९५) या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत ते लिहितात, " सुमारें दोन वर्षांमागेंच या पुस्तकाचें अर्धें अधिक काम छापून निघालें होतें आणि राहिलेलें कामही थोड्याच दिवसांत पुरें झालें असतें; परंतु तितक्यांत त्याच्या कर्त्यावर लागोपाठ कित्येक दुर्धर प्रसंग गुदरल्यामुळें,

तें काम पुढें चालविण्यासाठीं किंवा त्याकडे किंचित् तरी लक्ष देण्यासाठी त्यानें कितीही प्रयत्न केले तरी ते सर्व व्यर्थ जाऊन दोन वर्षेपर्यंत तें तसेंच अर्धवट पडून राहिलें. गेल्या दोन अडीच महिन्यांत ते पुढें चालवून पुरें केलें आहे." यावरून त्यांची मनःस्थिति व परिस्थिति कशा प्रकारची होती, हें कळून येईल. त्यांच्या लेखनावरून ते फार बाणेदार व कणखर वृत्तीचे असले पाहिजेत असें वाटतें व तत्त्वनिष्ठेच्या बाबतींत ते तसे होतेही; परंतु खासगी व्यवहारांत ते अत्यंत कोमल मनाचे व हळव्या वृत्तीचे होते असें दिसतें. त्यांचा मुलगा भगवंत ज्या वेळीं दिवंगत झाला, त्या वेळीं आपल्या मुलांस पाठविलेलें एक अत्यंत हृदयद्रावक पत्र उपलब्ध आहे, त्यावरून त्यांचें कोमल अन्तःकरण उत्कृष्टपणें आपणास कळून येतें. गुंजीकरांच्या निधनाच्या अगोदर सुमारें पंधरा दिवस आधीं त्यांची एक कन्या वारली होती, हें लक्षांत ठेवलें तर त्यांच्या अनपेक्षित निधनाचें तत्कालीक कारण कोणतें याची कल्पना होईल. स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांचे ते अत्युत्कृष्ट भक्त होते, तसे आज्ञाधारक पुत्र, प्रेमळ पिते व आदर्श बंधु होते. त्यांचे मित्रदेखील त्यांच्याकडे पितृभावनेनें किंवा बंधुभावानें पाहत. हरि महादेव पंडित यांच्या मनांत गुंजीकरांसंबंधीं असलेला आदर त्यांच्या लिखाणांत अनेक ठिकाणीं व्यक्त झालेला आहे. राजारामशास्त्री भागवत यांचा व गुंजीकरांचा सरस्वतीमंडळप्रकरणांत मतभेद झाल्याचा उल्लेख मागें आलेलाच आहे; परंतु त्यांचा व गुंजीकरांचा स्नेहसंबंध तुटला नाहीं. या वादांत आपण पडलों हें ठीक झालें नाहीं, असें कालांतरानें राजाराम शास्त्र्यांना वाटूं लागलें असावें, असें कै. देवांनीं आपल्या लेखांत नमूद केलें आहे. स्वदेश, स्वधर्म किंवा आपलें कुल यांच्यासंबंधीं गुंजीकरांच्या मनांत फार अभिमान होता; परंतु दुसऱ्याच्या अशा प्रकारच्या भावनेला आपण होऊन दुखविण्याची त्यांची वृत्ति नव्हती. पण जर कोणी त्यांच्या भावनेला उद्दामपणें धक्का दिलाच तर त्याची गय ते करीत नसत. ख्रिस्ती धर्माविरुद्ध जे त्यांना दंभहारकांत शस्त्र धरावें लागलें तें याचमुळें होय. 'विस्तारां'तील त्यांच्या मृत्युलेखांत त्यांचें स्वभाववर्णन पुढीलप्रमाणें आढळतें: " रामभाऊंचा स्वभाव साधा, प्रेमळ आणि उघडा असे. विद्यार्थ्यांशीं त्यांचें वर्तन पंतोजीपेक्षां बापाप्रमाणें असे, आणि इतर मंडळीशीं बालबोध आणि निष्कपट असे. केवळ स्वार्थासाठीं थोर लोकांची अथवा वरिष्ठांची

तोंडदेखली स्तुति करणें अथवा हांजी हांजी करणें याचा त्यांना मनापासून तिटकारा असे. यांची विद्वत्ता थोर आणि कर्तृत्वशक्ति जाडी होती, परंतु गृहस्थितीमुळें आणि शरीरमांद्यावरोवरच त्यांच्या स्वभावांतही थोडें मांद्य आलें. " सुधारणेच्या नांवाखालीं थातुरमातुर प्रकार किंवा परकीयांचें अंध अनुकरण त्यांना बिलकुल पसंत नसे; परंतु स्त्रीशिक्षण किंवा पुनर्विवाह यांसारख्या सुधारणांचा त्यांनीं पुरस्कारच केलेला आढळतो. सबगोलंकाराचे नसले तरी पोटजातींच्या एकीकरणाला ते अनुकूल होते. ब्राह्मणसंघटणाकरितांच त्यांनीं सरस्वतीमंडळ हें पुस्तक लिहिलें. स्त्रीशिक्षणाबरोबर बालशिक्षणाकडेही त्यांचें लक्ष होतें. मुलांकरितां त्यांनीं एक चित्रबोधही तयार केला होता. सुप्रसिद्ध बालबोध मासिक त्यांच्याच प्रेरणेनें निघालेलें दिसतें. ' बालबोध ' हें नांव तर त्या मासिकाला त्यांनींच सुचविल्यावरून देण्यांत आलें होतें असें ओकांनीं लिहून ठेवलें आहे. अशा प्रकारें लोकोपयोगी कामें करीत असतां व प्रतिकुल परिस्थितीशीं धैर्यानें झगडत असतां १९०१ च्या जून महिन्याच्या १८ व्या तारखेस, मंगळवारीं, दुपारीं एक वाजतां गुंजीकरांनीं आपला इहलोकचा प्रवास संपविला.

संपलें. प्रस्तावनेच्या मर्यादेचें अतिक्रमण करून त्यांच्यासंबंधीं जे चार शब्द सांगतां आले ते घाईघाईंतच सांगितले. वास्तविक गुंजीकरांचें स्वतंत्र विस्तृत चरित्र छापून निघालें पाहिजे. असें चरित्र त्यांचे जेष्ठ चिरंजीव जयवंतराव हे लिहिणार होते; परंतु त्यांचाही दुर्दैवानें अकालीं अंत झाल्यामुळें अशा ग्रंथाला महाराष्ट्र मुकला. निदान त्यांच्या समकालीन अशा एखाद्या विद्वानानें हें काम अंगावर घ्यावयास हवें होतें. परंतु तीही आशा आतां नष्ट होत चालली आहे. प्रस्तुत प्रास्ताविक निबंधानें अशा मोठ्या चरित्राची उणीव भरून निघणें शक्य नसलें तरी अशा ग्रंथास प्रस्तुत प्रस्तावना प्रेरक होईल अशी मला आशा आहे. इतकें झालें तरच गुंजीकरांचे धाकटे चिरंजीव रँग्लर काशीनाथपंत यांनीं मजवर सोंपवलेली ही कामगिरी सफल झाली असें मी समजेन.

वाङ्मयांतील आपल्या विविध उद्योगानीं ज्यांनीं आधुनिक महाराष्ट्रभाषा मंदिराचा भरींव पायाच घातला, त्या गुंजीकरांची आजच्या महाराष्ट्राला विशेष माहिती नसावी ही खेदाची गोष्ट आहे. परंतु याच्या मुळाशीं महाराष्ट्राची

केवळ कृतघ्नताच असावी, असें मात्र म्हणतां येत नाहीं. ज्याच्यावर सारी इमारत उभी असते तो इमारतीचा पाया तरी लोकांच्या डोळ्यांसमोर कोठें असतो?

गुंजीकरवाङ्मयाचा हा पहिला खंड प्रसिद्ध होत असलेला पाहून कोणाही महाराष्ट्रसाहित्यभक्ताला आनंदच वाटेल; परंतु गुंजीकरांनीं स्थापन केलेला विविधज्ञानविस्तार सध्यां बंद आहे, हें पाहून मन खेदानें अत्यंत विषण्ण झाल्याखेरीज राहात नाहीं. 'विस्तारा'च्या प्रकाशनांत यापूर्वीही दोनतीनदां खंड पडला होता; तसाच हाही त्याचा स्वल्पविरामच ठरेल व युद्धोत्तर कालांत सर्वत्र स्थिरस्थावर झाल्यावर महाराष्ट्रांतील सुबुद्ध लोकांच्या प्रोत्साहनानें व सध्यांचे त्याचे मालक रा. रामभाऊ तटणीस व रा. रघुनाथराव मोरमकर यांच्या प्रयत्नानें तो नव्या जोमानें आणि नव्या तेजानें पुनश्च प्रकट होईल अशी आशा बाळगून मी लेखणी खालीं ठेवतों.

रोशनमहाल, स्लेटर रोड,
मुंबई ७.
१-१-४२

अ. का. प्रियोळकर

रा. भि. गुंजीकर यांचे निबंध व ग्रंथ

संकलित लेख, भाग १ ला, या पुस्तकांत भाषा, व्याकरण व लिपि यांवरील निबंध व पुस्तकें आलीं आहेत; याशिवाय इतर प्रसिद्ध झालेल्या लेखांची व ग्रंथांची यादी:

भौतिकशास्त्रें : गणित, ज्योतिष, आरोग्य वगैरे

विविधज्ञानविस्तार	वर्ष	पृष्ठ
१ आरोग्याविषयीं सूचना	२	१०२
२ पृथ्वीची उत्पत्ति	३	३०
३ शिल्पसंहिता	३	१२६
४ भरतखंडांतील प्राचीन गणिती	३	७७
५ शास्त्र	४ ५	१३८,१५४ ८
६ रुधिराभिसरण	४	१८०
७ धूमकेतु	५	११७
८ मातृशिक्षा	५ ६	१४१,१८८ २८,७५
९ कुंभारकाम	५ (६	१४९,२१४ १०७,१३४)
१० वृक्षायुर्वेद	७	१३
११ देशी वैद्यकशास्त्र	७	१२७

निबंध वगैरे

१२ स्त्रियांसाठीं पंचरत्नमाला	१	१५
१३ स्त्रीक्रोधाचें सांत्वन	१	२१
१४ खरें पातिव्रत्य	१	४०
१५ दोन चोर	१	५७
१६ सुबोध-संवाद	१	७५
१७ उत्कर्षाकांक्षा	१	७८

	वर्ष	पृष्ठ
१८ सुबोध रत्नमाला	२	४७
१९ व्यसन	२	९६
२० सुशीलाचरित्र	२	१५४
२१ बायको भली तर नवरा भला	३	७
२२ कविश्रेष्ठ कालिदास व शाकुंतल	३	६५
२३ युद्धप्रसंग	२	८१
२४ कालिदास कवीचा खरा काळ	३	१३५
२५ स्त्रियांस उपदेश	३	१४४
२६ सुसंवाद	३	१६९
	४	९७,१२१
२७ मंकोसेन चरित्र	३	१८७
२८ स्वावलंबन	४	१५
२९ पुस्तकांविषयीं मत देण्याचा अधिकार	४	४६
३० स्त्रियांचें भूषण	४	६४
३१ शिवाजीमहाराजांचा स्वभाव	४	८५
३२ सोनपतपानपत येथील मराठे-दुराणी युद्ध	४	१०५,१४५
	५	३१,८१,१२६
३३ माता आणि बालक	४	१८१
३४ मुलांचें अवसान	४	१९८
३५ मुलांना फसवूं नका	४	२०४
३६ फजिती	४	२२४
३७ शूर कोणास म्हणावें ?	५	५४
३८ मुलांचें शिक्षण	५	५८
३९ कुटुंबशिक्षा	५	६१,९३
४० मुलीचें लग्न	५	९७
४१ स्त्रीचें तेज	५	११६
४२ सुस्वभाव	५	१६०
४३ हिंदुस्थानची सुधारणा (?)	५	१६१

	वर्ष	पृष्ठ
४४ गांवच्या वतनदारांविषयीं होणाऱ्या कायद्याचा मसुदा	६	२१
४५ कुत्सितपणाचा निषेध	६	४०
४६ मुंबई राज्याचें (इलाखा) वर्णन	६	१६१,१८१
४७ श्रीमंत मल्हारराव गायकवाड	७	९८
४८ भारतखंडाच्या निकृष्टावस्थेचीं कारणें आणि उत्कर्षाचे उपाय	७	६१
४९ नक्कल	७	४०
५० लाघवी लिपि आणि लघुलेखनपद्धति (पत्रव्यवहार)		
५१ योग्य स्थळीं योग्य मनुष्याची नेमणूक (का. त्रिं. तेलंग)	२१	२२५
५२ श्रीकृष्ण चरितामृत बंगालीवरून (अपूर्ण)	२२	१०८,१२६,१४५ १९७
	२३	१३१,१४५,१६९
५३ भाऊ महाजन	२२	२४
५४ का. त्रिं. तेलंग	२६	१७
परीक्षणें		
५५ ग्रँट डफकृत मराठ्यांच्या बखरीवरील कीर्तने यांनीं केलेली टीका (?)	१८	१२९
नाटकें—		
५६ विलक्षण न्यायचातुर्य अथवा उज्जनी शहरचा व्यापारी	२	१६
५७ अभिज्ञान शाकुंतल (कृष्णशास्त्री राजवाडे)	२	१४५
५८ मनोरमा (म. वा. चितळे)	३	१४७
५९ विक्रमोर्वशी (ताम्हणकर व अभ्यंकर)	४	२१८
	५	२
६० मल्हारराव महाराजांचें नाटक (ना. वा. कानिटकर)	७	१९९
६१ अभिज्ञान शाकुंतल नाटक (पत्र)	१३	२१०

परीक्षणें

	वर्ष	पृष्ठ
कादंबऱ्या—		
६२ **वसंतमाला** (केशव रघुनाथ फडके)	२	११
६३ **विश्वासराव** (नारो सदाशिव रिसबूड)	३	५१
६४ **प्रेमबंधन** (योगी)	६	२१४
(मकरंद या नांवानें पत्रात्मक परीक्षण)		२३३
काव्यें—		
६५ **दैवसेनी** (व. रा. प्रधान)	१	६३
६६ **रत्नमाला** (भा. दा. पाळंदे)	१	६३
६७ **केकादर्श** (परशुरामपंत गोडबोले)	१	६४
६८ **राजा शिवाजी** (म. मो. कुंटे)	४	८१,११४,१२८
६९ **मराठी भाषेचें व्याकरण** (बेलेयर्स व आस्खेडकर)	२	६२
७० **पुण्याचें वर्णन** (ना. वि. जोशी)	२	७८,१२७
इतर		
७१ **सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध** (विष्णुबुवा ब्रह्मचारी)	३	२४,५५
७२ **पुष्पवाटिका** (विनायक कोंडदेव)	४	१६३
७३ **बोधसुधा** (केशव बळवंत केळकर)	४	१६४
७४ **सहजबोध** (ठाकुरदास बोवा)	४	१६४
७५ **सृष्टिज्ञान परिभाषा** (स. बा. दांडेकर)	४	१६४
७६ **जिल्ब्लास चरित्र भाग १** (वि. जि. पागनीस)	४	१६४
७७ **तंतुवाद्य** (सूर्याजी स. महात्मे)	५	३६
७८ **रंभाशुकसंवाद** (गणेशशास्त्री अभ्यंकर)	६	१८
७९ **साहित्यशास्त्र** (?)	६	११९
८० **ब्राह्मणी धर्माच्या पडद्याआड गुलामगिरी** (ज्योतिराव फुले)	६	१२०
८१ **गोमंतकाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास** (य. फों. दणाईत व रा. गो. वागळे)	६	१७८

	वर्ष	पृष्ठ
८२ **गंगावर्णन** (ग. वा. पटवर्धन)	६	१७९
८३ **हुन्नरसंग्रह** (कार्लेकर बंधु)	१०	२८३
८४ **अपशब्दनिषेध** (सिमियन बेंजामिन)	१२	१८८
८५ **लघुलेखनपद्धति** (वैद्य)	१३	९६
८६ **संस्कृत कविताविवेचक निबंध** (वा. गो. केळकर)	१३	९७
८७ **काव्यदोषविवेचन** (सिमियन बेनजामिन)	१५	२७१
८८ **श्रीकृष्णाचें जीवनवृत्त व तत्प्रणीत धर्म** (बंगाली पुस्तकाचा परिचय)	२१	१३७
८९ **अलंकारदर्पण** (रा. वा. तळेकर)	२७	१८७

यांशिवाय **दंभहारकांत** प्रसिद्ध झालेल्या लेखांविषयीं प्रस्तावना पृ. २२ पहा

स्वतंत्र पुस्तकें

† १ **मोचनगड** (ऐतिहासिक कादंबरी)
† २ **गोदावरी** (अपूर्ण)
† ३ **अभिज्ञानशाकुंतल**-(भाषांतर)
† ४ **रोमकेतु-विजया** (रोमियो आणि ज्युलिएटचें रूपान्तर)
५ **विद्यावृद्धीच्या कामीं आमची अनास्था.** (व्याख्यान)
६ **सरस्वतीमंडळ**
७ **भ्रमनिरास**
† ८ **सौभाग्यरत्नमाला**
९ **कौमुदीमहोत्साह** (रा. का. पां. परब यांचेसह)
१० **रामचंद्रिका**
११ **सुबोधचंद्रिका** (भगवद्गीता)
१२ **कन्नड परिज्ञान**

† हीं पुस्तकें प्रथम विविधज्ञानविस्तारांत खंडशः प्रसिद्ध झालीं आहेत.

१ : : मराठी भाषा

सांप्रत काळीं भरतखंडामध्यें संस्कृतापासून उत्पन्न जाहलेल्या जितक्या भाषा चालू आहेत, त्या सर्वांमध्यें महाराष्ट्र भाषा श्रेष्ठ होय, असें म्हणण्यास किंचितही संकोच वाटत नाहीं. कारण, पाहा गुजराती भाषा–तिचें स्थायिक स्वरूप म्हणून अद्यापि जाहलेलें नाहीं; तिजमध्यें कोश नाहीं, म्हणण्याजोगें व्याकरण नाहीं; लेखनमार्ग अद्यापि ठरलेला नाहीं. दिवसेंदिवस तिजमध्यें पराकाष्ठेचे इंग्लिश शब्द मिसळून तिचें स्वरूप मिश्रित अवयवांचें होत चाललें आहे. हिंदी किंवा हिंदुस्थानी भाषा राजकीय खरी; तिजमध्यें ग्रंथसंग्रहही पुष्कळ आहे; तथापि कोमलपणा तेथें दृष्टीस पडत नाहीं. भाषेची रचना अतिशयित उद्दाम. या दोहोंपेक्षां बरीच वरिष्ठ जी बंगाली, तीही मराठीच्या बरोबरीस लागणार नाहीं. तिजमध्यें बहुधा मराठींत आहे तसाच संस्कृत शब्दांचा भरणा पुष्कळ आहे; आज पुष्कळ दिवसांपासून सुधरत चाललेली आहे; तिजमध्यें अनेक विषयांवर अनेक ग्रंथ आहेत; तथापि त्या भाषेचें पुस्तक पाहिल्याबरोबर तिचा उणेपणा लक्षांत आल्यावांचून कधीं राहणार नाहीं. ज्यांच्या लिपीमध्यें सौंदर्य म्हणून किंचितही नाहीं; लिहिण्याचें सौलभ्य पाहिलें तर, या लिपीपेक्षां त्रासदायक व ओबडधोबड अशी दुसरी कोणतीही लिपि हिंदुस्थानात कोठेंही आढळणार नाहीं. याप्रमाणें या तीन काय त्या उत्तर हिंदुस्थानांतील मुख्य भाषा. यांशिवाय पंजाबी, मारवाडी, इत्यादि किरकोळ भाषा, यांची योग्यता अद्यापि फार उणी आहे, हें तर सर्वमान्य आहेच. परंतु आतां मराठीविषयीं पाहिलें तर, तिजमध्यें सर्वोत्कृष्ट नाहीं तरी चांगलाच कोश आहे; व्याकरण आहे; भाषा स्थायिक जाहली आहे; तिजमध्यें पाहिजेत ते विचार प्रकट करतां येतात. शास्त्रीय विषयांवर ग्रंथ करण्यास आमचे विद्वान् अमळ प्रयत्न करतील तर, तेही मराठींत उत्तम प्रकारचे होण्यास

फार हरकत पडणार नाहीं. संस्कृत भाषेचें जें अमूल्य आणि अपार शब्दभांडार तें संपूर्ण आपल्या स्वाधीन ठेवून स्वेच्छानुरूप त्यांतील रत्नांचा विनिमय करण्याचें सामर्थ्य मराठीमध्यें किती आहे, हें वामन, मोरोपंत, इत्यादि कविवरांनीं उत्कृष्ट रीतीनें प्रदर्शित केलें आहे. संस्कृत भाषेशीं प्राचीन बालभाषेच्या द्वारें, भरतखंडांतील इतर सर्व भाषांपेक्षां मराठीचा विशेष जवळचा संबंध आहे; तिजमध्यें संस्कृत शब्द जितक्या शुद्ध स्वरूपानें आढळतात, तितकें शुद्ध स्वरूप—वकार आणि बकार, यकार आणि जकार; श ष आणि स, इत्यादिकांच्या उच्चारभेदाविषयीं अज्ञानी जे बंगाली, हिंदुस्थानी किंवा गुजराती,—यांच्या भाषांमध्यें कधींही सांपडणार नाहीं. आणि एतद्विषयीं या तिघींपैकीं ऱ्हस्वदीर्घ भेद, जोडाक्षर, श ष स इत्यादिकांचा भेद यांविषयीं अज्ञानशिरोमणी जी गुजराती भाषा, ती तर मराठीच्या पासंगासही लागणार नाहीं. संस्कृतांतील प्रौढ शब्दांचें शुद्ध स्वरूप सहन करून, त्यांच्या पंक्तीस आपले साधे प्राकृत शब्द नेऊन बसविण्याचें, असें म्हणा; किंवा त्या प्रौढ गंभीर शब्दांनाच आपल्या साध्या प्राकृत शब्दांच्या आटोक्यांत ठेवून, त्यांवर वर्चस्व चालवून, तद्द्वारें शब्दांचा दुबार भरणा करण्याचें; आणि अशा प्रकारें वरिष्ठ भाषेच्या अपरिमित मिश्रणापासून संभवनीय जो कर्कशपणा, किंवा बिलगपणा, यांची शंकासुद्धां येऊं न देतां, उलट विशेष प्रौढी, कोमलता, आणि मनोहर सौंदर्य, हीं प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य आपल्या मराठी भाषेला आहे. निरनिराळे ध्वनि सूचित करण्यास, निरनिराळीं वर्णरूप चिन्हें नसणें हें जें भाषेच्या अपूर्णतेचें चिन्ह, तेणेंकरून ग्रासून गेल्यामुळें, युरोपखंडांतील सर्व भाषा, व मुख्यत्वेंकरून इंग्लिश भाषा लज्जित होऊन, अन्य सद्गुणांप्रमाणें उच्चारानुसार भिन्नभिन्न वर्ण लिहिण्याच्या गुणांविषयीं परिपूर्ण असलेल्या ज्या जगद्वंद्य संकृत भाषेची यथार्थ स्तुति करीत आहे, तिची तीच अप्रतिम देवनागरी लिपि, आपल्या मराठीच्या घरची किंवा विशेषतः मराठी भाषेचीच होऊन गेली आहे. हें तर काय, परंतु मराठीला संस्कृत भाषेपेक्षां कित्येक

अधिक उच्चारही दाखवितां येतात. पण अजूनही इतक्यांत संपलें असें नाहीं. अक्षर त्वरेनें लिहितां येण्याची किती आवश्यकता आहे, याचा विचार करण्यापेक्षां, सांप्रत इंग्रजी वर्तमानपत्रकर्ते यांणीं, मोठमोठ्या बृहस्पतीसारख्या वक्त्यांचीं संपूर्ण पांडित्यें, त्यांच्या वक्तृत्वाच्या प्रवाहाबरोबर आरंभापासून–शेवटापर्यंत बिनचूक उतरून घेण्याकरितां नवीन लिपि काढली आहे, व तिजपासून सर्व लोकांचा किती फायदा होत आहे, या गोष्टीचा विचार केला असतां, गुजराती, हिंदी, बंगाली इत्यादि भाषा चिटनिशीच्या मंदाईमुळें मराठीची कधींही बरोबरी करूं शकणार नाहींत, अशी सहज खात्री होईल. कित्येक अज्ञानी लोक, मोडीमध्यें ऱ्हस्व-दीर्घ नाहीं इत्यादि पोकळ कल्पना काढून तिला दूषणें देवोत; परंतु ज्या देवनागरी लिपीची इंग्लिश लोक इतकी स्तुति करितात, तींत सर्व अक्षरें मोडीच्या वळणावर फारच झपाट्यानें व सुंदर झोंकदार अक्षरानें मराठी लोकांस जर लिहितां येतात, तर त्यांच्या भाषेला श्रेष्ठत्व देण्यास कां अनमान करावा? असो. याप्रमाणें मराठीची योग्यता असतां कित्येक लोक तिला व्यर्थ दूषणें देतात. त्यांचें म्हणणें कीं, " मराठी भाषेंत कांहीं जीव नाहीं. दोन वर्षांत आम्ही मराठी संपवून इंग्रजीचा आरंभ केला; परंतु इंग्रजीचा अभ्यास कितीही दिवस केला तरी तो संपत नाहीं. तसेंच इंग्रजींतून मराठी भाषांतर करण्यास शब्द मिळत नाहींत इ." परंतु एक-दोन वर्षांतच जे मराठीचा पूर्ण अभ्यास करणारे, त्यांणीं दूषण दिलें म्हणून तादृश दुःख मानण्याचें कांहीं कारण नाहीं. परंतु कित्येक मोठमोठ्या विद्वानांच्या कल्पनाही याहून फार बऱ्या आहेत असें नाहीं. आलीकडे मुंबई एथील (युनिव्हर्सिटी) विद्वन्मंडळ, यांनीं तर देशभाषांना प्रवेशपरीक्षेच्या पलीकडे पाय घालण्याची बंदीच करून टाकली आहे; व त्या निखालस हद्दपार कराव्या असा कित्येकांचा आग्रह आहे, व तो दिवसेंदिवस तडीस जाण्याचा विशेष विशेष संभव दिसत आहे. तत्पक्षी लोकांचें म्हणणें कीं, " संस्कृतादि प्राचीन भाषांचा अभ्यास केला म्हणजे, तिच्या पोटच्या ज्या

देशभाषा त्यांचा अभ्यास आपोआप होतोच. इंग्लंडांत फक्त, ग्रीक, लॅटिन इ. प्राचीन भाषाच परीक्षेस घेतात. त्यामुळें इंग्रजीची आपोआप सुधारणा होते." परंतु हें भाषण हिंदुस्थानास लागू होत नाहीं. ग्रीक आणि लॅटिन शिकल्यामुळें त्यांची देशभाषा सुधारते असें नाहीं. परंतु त्या प्राचीन भाषांचें व इतर विषयांचें ज्ञान देशभाषेच्या द्वारें ते प्राप्त करून घेतात, त्यामुळें त्या त्या भाषेच्या किंवा अन्य विषयाच्या विवेचनामध्यें जर देशभाषेचें यत्किंचित् अज्ञान दिसून आलें, तर उपहास जाहल्यावांचून राहत नाहीं. अशा कारणानें त्यांना देशभाषेकडे मुजरद लक्ष द्यावें लागतें. परंतु भरतखंडांतील गोष्ट वेगळी आहे. कारण आमच्या ज्या जुन्या भाषा त्याही परकी म्हणजे इंग्रजी भाषेच्या द्वारें शिकवायाच्या असा नियम केला आहे. तेव्हां देशभाषा कोठें राहिली ? उदाहरणार्थ, दूर जाण्याची गरज नाहीं. आमचे कित्येक संस्कृत शास्त्री मोठे पंडित असतात, परंतु त्यांस देशभाषेंत एक शुद्ध वाक्य लिहिण्याची मारामार पडते. बरें, हे "जुन्या प्रतीचे" म्हटलें, तर नव्या प्रतीच्यांची काय अवस्था आहे ती पाहूं. मुंबई (युनिव्हर्सिटी) विद्वन्मंडळ स्थापित होऊन दहा वर्षें होऊन गेलीं. आतां तत्पूर्वीचे विद्वान् लोक सोडून आलीकडील विद्वानांचीच संख्या पाहिली असतां पुढें लिहिल्याप्रमाणें तपशील दिसेल.

४१३		प्रवेश परीक्षेंत उतरलेले.
५३	(एफ्. ए.)	सामान्य विद्वत्तेच्या प्रथम परीक्षेंत उतरलेले.
४३	(बी. ए.)	सामान्य विद्वत्तेच्या द्वितीय परीक्षेंत उतरलेले.
११	(एम्. ए.)	,, ,, मुख्य ,, ,,
४	(एलूएल्. बी.)	धर्मशास्त्र किंवा व्यवहार यांत मुख्य.
१८	(एल्. एम्.)	वैद्यशास्त्रांत मुख्य.
६	,,	दुसऱ्या प्रतीचे.
२		शिल्प व यंत्रशास्त्र यांत.
५५०		एकंदर

यांपैकीं नुसत्या प्रवेश परीक्षेंतील लोकांचा अभ्यास कच्चा म्हणून ते जर सोडले, तर बाकी राहिलेल्यांपैकीं, बहुतेक सर्व लोक मोठमोठ्या विद्या शिकलेले आहेत, त्यांस मोठे मोठे पगार आहेत, त्यांची अब्रू मोठी आहे; परंतु आपण शिकलेल्या विद्येपासून आपल्या लोकांस साहाय्य करण्याचें यांतील कितीकांस बरें सामर्थ्य किंवा इच्छा आहे? ज्या वेळीं मुंबईमध्यें प्रथमतःच हा पदव्या देण्याचा समारंभ जाहला त्या वेळीं, तेथील अध्यक्षांनीं या विद्वानांची प्रशंसा व यांच्या अभ्यासाला उत्तेजन येण्याजोगें भाषण करून नंतर मुद्दाम आग्रहानें सांगितलें होतें कीं, "ह्या ज्या तुम्हांस मोठमोठ्या पदव्या आणि हीं मानपत्रें मिळत आहेत, त्यांचा मुख्य उद्देश असा आहे कीं, त्यांचा तुम्हीं चांगला उपयोग करावा; म्हणजे इतक्या श्रमानें आणि खर्चानें जी तुम्हांस विद्या प्राप्त करून दिली आहे, ती तुम्ही आपल्या स्वभाषेच्या द्वारें स्वदेशबांधवांस प्राप्त करून देण्यास अंतःकरणपूर्वक झटलें पाहिजे." परंतु त्या सूचनेप्रमाणें कोणी एकानें तरी वर्तणूक ठेविली आहे काय? कित्येक लोक कांहीं तरी निमित्त सांगावें म्हणून "भाषेंत शब्द मिळत नाहींत" ही पूर्वोक्त पोकळ अडचण दाखवितात; परंतु त्यांस इतकेंच विचारणें आहे कीं, या दहा वर्षांत विद्वान् विद्वान् म्हणून गाजलेल्या इतक्या लोकांपैकीं एकानेंच, संस्कृत शिकणारांकरितां म्हणून एक रूपावलीसारखें लहानसें पुस्तक केलें, तर तेंही लिहिण्यास मराठी शब्द मिळत नाहींत, आणि इंग्रज़ी मिळतात! केवढें आश्चर्य! वामनपंडितादिकांनीं भगवद्गीतेसारख्या गूढ विषयावर मराठींत व्याख्यानें दिलीं आहेत आणि रूपावलि करण्यास आमच्या विद्वानांस शब्द मिळत नाहींत! मोठमोठ्या विद्वानांची जर ही कथा, तर त्यांची विद्वत्ता आणि मानपत्रें घेऊन देव्हाऱ्यावर पूजेला ठेवावयाचीं कीं काय नकळे! आणि अशा लोकांच्या विद्येचा अभिमान बाळगण्यांत तरी आपल्या देशास भूषण तें कोणतें? सरकारानें यांच्या शिकण्यास उत्तेजन येण्याकरितां मोठमोठे पगार देऊन विद्या शिकविल्या, आणि मोठमोठीं कामें दिलीं; तथापि जर दुसऱ्यांनीं शिकविलेली विद्या तीही

यांना आपल्या देशबांधवांना समजून सांगण्याचें सामर्थ्य नाहीं, तर त्या पदव्या आणि तीं इनामें घेण्यांत, त्यांचा पुरुषार्थ तो कोणता ? इतर लोकांप्रमाणें यांणींही रोजगार करून मोठा पगार मिळविला आणि त्यांच्या मूर्खपणाला हसत हसत आपणही आपल्या बायकांना सुवर्णानें मढवून काढलें, तर त्यांत यांनीं अधिक केलें तें काय ? इंग्लंडहून, जर्मनीहून दुसरे विद्वान् इकडे येतात, त्यांना आपल्या देशाचा व भाषेचा तरी अभिमान असतो, तोही यांना नाहीं. यांच्या इंग्रजी विद्येपासून यांच्याच देशाला जर वास्तविक फायदा होत नाहीं, तर यांच्यापासून हित करून घेण्यास इंग्लिश लोक कोठें यांजवर अवलंबून राहिले आहेत ? असें असतां यांनीं जुन्या शास्त्री लोकांस कां बरें हसावें ? विचारानें पाहिलें असतां सध्या जीं मराठींत पुस्तकें होत आहेत, त्यांतील बहुतेक सर्व जुन्या लोकांकडूनच होत आहेत. नवीन लोकांना जुन्यांचें कृत्य आवडत नाहीं, आणि स्वतः कांहीं करितां येत नाहीं, किंवा इच्छा नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय ? इंग्रजींतून भाषांतरें करण्यास जर शब्द नाहींत, तर ते नवीन कां करूं नयेत, आणि ते जर यांना करतां येत नाहींत, तर ते कोणी करावे ? कित्येकांना वाटतें कीं, एका भाषेंतील शब्दाचा अर्थ भाषांतर करतेवेळीं एकाच शब्दांत आला पाहिजे, आणि तसें होत नसेल तर ती भाषा कच्ची ! परंतु ही केवळ चूक आहे. अशा प्रकारचे शब्द शोधीत बसल्यापासून व्यर्थ भाषा मात्र बिघडून जाईल. इंग्रजींत मराठीच्या संपूर्ण अर्थाचे कित्येक शब्द मिळत नाहींत, म्हणून तिला अपूर्ण म्हणण्यास जितका आधार आहे, त्यापेक्षां आपल्या भाषेला याच कारणामुळें अपूर्ण म्हणण्यास अधिक आधार नाहीं.

असो. या प्रकारें देशभाषेविषयीं आपलें अज्ञान पाहून आमच्या विद्वान् लोकांस लाज वाटावी. जे लोक इंग्रजांचा कित्ता मोठ्या प्रीतीनें घेतात, त्यांणीं त्यांची भाषा सुधारण्याची चाल कां घेऊं नये ? इंग्रज लोकांस फ्रेंच भाषा येत नसली, किंवा स्पॅनिश लोकांस पोर्तुगीज येत नसलें, तर त्यांना बहुतेक वेळां मान खालीं घालण्याचा प्रसंग येतो.

परंतु आमच्या मराठी विद्वानांस गुजराती, किंवा गुजराती विद्वानांस मराठी समजत नाहीं, म्हणून वाईट वाटत नाहीं. यांस **लंडन, फिलाडेल्फिया, बोस्टन, गाटिंजन,** एथील विद्वान् लोकांना आपल्या ग्रंथांची किंवा देशाची माहिती करून देण्यांत प्रतिष्ठा वाटते; त्यांच्या सभांस निबंधादिक लिहून पाठविण्याचें किंवा त्यांच्या ग्रंथावर टीका करण्याचें जर यांना सामर्थ्य आहे, तर अशा प्रकारच्या विद्वानांस आपल्या देशभाषेंत लिहितां बोलतां येत नाहीं, हें वर्तमान त्यांना समजल्यापासून त्यांस किती आश्चर्य उत्पन्न होईल, याचा आमच्या विद्वान् लोकांनीं विचार करावा.

वर लिहिल्याप्रमाणें स्वभाषेकडे ज्या पक्षीं आमच्या विद्वान् लोकांचें इतकें दुर्लक्ष, त्या पक्षीं, जसें वायव्य प्रांतांतील लोकांनीं आपल्या देश-भाषेंत (युनिव्हर्सिटी) विद्वन्मंडळ स्थापावें, किंवा इंग्लिश विद्वन्मंडळासच देशभाषेची एक शाखा जोडावी, म्हणून सरकारास अर्ज केला आहे, तसा आमच्या लोकांकडून होण्याची आशा दूरच. परंतु सरकार आपण होऊन कांहीं या प्रकारची तजवीज आमच्या मराठी भाषेविषयीं करील, तर तेणें-करून, इंग्लिश विद्येपासून जें वास्तविक हित व्हावयाचें, तें फार जलदीनें सिद्धीस जाईल यांत किंचितूही संदेह नाहीं.

(नोव्हेंबर १८६७) (पु. १ अं. ५)

२ : : महाराष्ट्र भाषेमध्यें व्याकरण आणि कोश यांची आवश्यकता

महाराष्ट्र भाषेंत आजपर्यंत पुष्कळ ग्रंथ जाहले आहेत, आणि अजूनही पुष्कळ होत आहेत; तथापि या भाषेची चांगली स्थिति होण्यास अजून कित्येक गोष्टींची उणीव आहे, त्यांमध्यें मुख्यत्वें करून महाराष्ट्र भाषेचें चांगलें व्याकरण, आणि चांगला शब्दकोश या दोन ग्रंथांची सांप्रतकाळीं

फारच आवश्यकता आहे. कोणतीही भाषा वरिष्ठ दशेस येण्यास मुख्यत्वें-करून या दोन गोष्टींची फारच गरज लागत असते हें सर्व भाषाभिज्ञ लोक मान्य करतीलच. साधारणतः मराठी भाषा आसपासच्या इतर भाषांपेक्षां वरीच वरिष्ठ स्थितींत आहे याचीं कारणें आणखी दुसरीं कित्येक जरी असलीं, तरी ऐन इंग्रजी अमलाच्या आरंभीं सुजाण राज्याधिकारी लोकांनीं मराठी व्याकरण आणि कोश सिद्ध करण्याकरितां विद्वान् लोकांची योजना करून एक बराच चांगला कोश व कित्येक व्याकरणें प्रसिद्ध करविलीं, यामुळें तिच्या मोठेपणास बरेंच साहाय्य झालें यांत संशय नाहीं. तसेंच तेव्हांपासून आजकाळपर्यंत कित्येक नवीं व्याकरणें झालीं व त्यांपासून मराठी भाषेला दिवसेंदिवस बरेंच पुष्टीकरण येत चाललें आहे, हें जरी खरें आहे, तरी अद्यापि मराठी व्याकरण जसें असावें तसें झालें नाहीं असें म्हणणें प्राप्त आहे. दिवसेंदिवस जसजसे शोध वाढत चालले, तसतसा जुन्या व्याकरणामध्यें उणेपणा वाढत जाऊन सांप्रत जी प्रसिद्ध मराठी भाषा आहे तिचें स्वरूप प्रफुल्लित रीतीनें दाखविण्यास साधन असें नवीनच व्याकरण झालें पाहिजे असें झालें आहे. आतां कोशाविषयीं पाहिलें तर चाळीस वर्षांमागें जें एक पुस्तक झालें होतें, त्यानंतर त्या विषयाकडे आजपर्यंत कोणीही मुळींच लक्ष दिलें नाहीं. जुनीं पुस्तकें आतां मिळत नाहींत. हें तर काय ? परंतु मराठी भाषेचा कोश कधीं मागें झाला होता हें सुद्धां समजण्याची भ्रांति पडते, अशी वेळ आली असतां व दिवसेंदिवस मराठी कोशाची गरज वाढत चालली असतां, राज्याधिकाऱ्यांनीं व इतर विद्वान् लोकांनीं डोळेझांक करून बसणें ही मोठी दुःखकारक गोष्ट आहे. राज्यकर्ते तर मराठी भाषेचा उत्कर्ष व्हावा ही कल्पना दिवसेंदिवस विसरून जाण्याचा प्रयत्न करीत आहेत, व त्यांच्यावर आमच्या विद्वान् लोकांची तान आहे. म्हणजे त्यांची जन्मभाषा त्यांना विषतुल्य वाटत आहे. राज्यकर्ते जे आहेत त्यांचें मराठी भाषेवांचून कांहीं अडलें नाहीं; कारण साधारणतः मराठी लोकांमध्यें काय काय गोष्टी

चालल्या आहेत हें समजण्यापुरतें साधन त्यांनीं इंग्लिश भाषेच्या योगानें करून ठेवलें आहे; मराठी लोकांकडून कांहीं कलाकौशल्य शिकण्याची इच्छा किंवा इच्छा धरण्याचें कारणही त्यांना नाहीं. आतां आम्हांला हवें तर इंग्रजीचा अभ्यास करून कांहीं कलाकौशल्य शिकावें. इंग्रजी भाषेमध्यें प्रवेश करण्याला थोडेंसें स्वभाषेचें अगदीं आवश्यक असेंच जेवढें अगत्य आहे, तेवढें त्यांनीं शिकविण्याकरितां देशभाषेच्या हलक्या प्रतीच्या शाळा ठेवल्या आहेत. यामुळें असें घडतें कीं, मुलांना स्वभाषेचें कांहीं ज्ञान नसतां, त्यांचा इंग्रजी अभ्यासाकडे एकदां कल लागला म्हणजे, प्रथमतः स्वभाषेचें अज्ञान, आणि तें अज्ञान झांकण्याकरितां तिरस्कारपूर्वक त्या स्वभाषेची निंदा ते करूं लागतात, आणि तेणेंकरून शेवटीं असा परिणाम होतो कीं, राज्यकर्त्यांनीं जर म्हटलें कीं देशभाषा विद्वानांच्या उपयोगी नाहींत, तर आमचे कित्येक विद्वान् लोक त्या भाषणाची मोठी तारीफ करून, स्वभाषेची अधिकाधिक हेलना करूं लागतात आणि म्हणतात कीं, देशभाषेमध्यें काय धोंडे आहेत? ती पाहिजे तरी कशाला? हें तर काय, परंतु सांप्रत मराठीची स्थिति कशी नीच जाहली आहे ती पहा. देशसुधारणेचा आव घालणारे मुंबईसारख्या शहरांतील मोठमोठे वर्तमानपत्रकर्तेही धडधडीत लिहितात, कीं "आमच्या कारखान्यांतील ठसे जोडणाऱ्या लोकांस मोडी समजत नसल्यामुळें, कोणी मोडी लिपींत पत्र लिहूं नये." पत्रकर्त्यांची ही सुधारणा, तेव्हां इतरांनीं तसें म्हटल्यास नवल नाहीं. बाळबोध पत्र लिहिणें हें तर बायकांचें काम! एकूण कोठूनही मराठीच्या नांवानें शून्य. अशी आमच्या बहुतेक सर्व विद्वान् लोकांची अवस्था आहे. मित्र हो, ही मोठी लज्जेची गोष्ट नव्हे काय? मित्र हो, तुम्हाला घरच्या गोष्टी जर स्वाधीन ठेववत नाहींत, तर बाहेरच्या गोष्टींवर तुम्ही अंमल चालवून आपल्या घरच्यांचें कल्याण करूं शकाल काय? मित्र हो, पाया जर मजबूत नाहीं तर तुम्ही त्यावर इमारत बांधूं शकणार नाहीं हें खचित समजा. "जुने लोक मूर्ख, व ते आपली विद्वत्ता दुसऱ्यास कळूं देत नाहींत,

यामुळें हिंदुस्थानांतील कलाकौशल्य, विद्या वगैरे सर्व नाहींसें झालें." अशा हाका मारणारे अनेक विद्वान् सांप्रत आहेत, परंतु वास्तविक दृष्टीनें पाहतां, जे देशभाषेमध्यें कित्येक ग्रंथ जाहले आहेत, ते बहुधा सर्व जुन्या लोकांचेच आहेत. नवे लोक विद्वान् होऊन त्यांनीं देशभाषेंत नाहीं, तरी इंग्रजींत तरी काय प्रकाश पाडला आहे हें समजत नाहीं. हे विद्वान् झाल्यापासून देशाची भाषा मात्र नाहींशी होत चालली हा काय तो यांच्या विद्वत्तेचा मुख्य परिणाम! स्वतःच्या शोधाविषयीं बहुधा शून्यच; तथापि इंग्रजी ग्रंथांवरून जें कांहीं इतिहास, न्याय, भूगर्भशास्त्र, भूगोलशास्त्र, रसायन, सिद्धपदार्थविज्ञान, जोतिःशास्त्र, वैद्यक, यंत्रशास्त्र, उद्भिज, राजनीति, देशव्यवहार, अनेक कलाकौशल्यें, कृषि, एतत्संबंधीं यांनीं ज्ञान प्राप्त करून घेतलें आहे, त्याचा एक शतांश तरी लोकांना कळावा म्हणून या लोकांनीं काय खटपट केली आहे ? याप्रमाणें सुधारणेच्या मिषानें धनप्राप्ति करून घेणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे, तेंच जर आपलें हित करूनही पोकळ बाह्यात्कारी कीर्तीचा लोभ सोडून देशाचें थोडें तरी वास्तविक हित करण्याकडे या लोकांचें लक्ष लागलें असतें, तर किती बरें कल्याण झालें असतें! हें सर्व खरें, परंतु देशाची जी भाषा तिचेंही अस्तित्व हळूहळू जर संशयात्मक होऊं लागलें तर इतर गोष्टींविषयीं हाका मारून काय उपयोग होणार आहे ?

तथापि म्हण आहे कीं अवसान सोडूं नये; त्याप्रमाणें अजूनही आम्ही धीर धरतों, कीं आमच्यांतले विद्वान् अजूनही देशाच्या वास्तविक कल्याणास झटतील, व आपल्या भाषेच्या उत्कर्षाकडे लक्ष लावतील. अशी आशा धरून आतां आम्ही इच्छितों कीं इतर कल्याणकारक कृत्यांप्रमाणें तूर्त मराठी भाषेचें चांगलें व्याकरण आणि चांगला महाराष्ट्र कोश तयार करण्याकरितां आमच्या विद्वानांतून कोणी तरी पुढें व्हावें.

नवीन व्याकरण तयार करणारानें मुख्यत्वें भाषेच्या स्वरूपाकडे विशेष लक्ष देऊन जशी भाषा विद्वज्जनांच्या प्रचारांत आहे तशी दाखविण्याचा

प्रयत्न केला पाहिजे. 'आपल्या पदरचे नियम काढून अमुक तऱ्हा चांगली व अमुक वाईट हें सांगण्याचा डौल घालूं नये. व भाषेचा वास्तविक प्रकार अमुक आहे, परंतु तो **व्याकरणदृष्ट्या अशुद्ध,** अशा प्रकारचे विचार तर त्यानें आपल्या मनांत कधींच आणूं नयेत. शब्दाच्या अनेक रूपांविषयीं लिहितांना त्यानें मूळ संस्कृत, प्राचीन प्राकृत किंवा बालभाषा, यांच्या स्वरूपाकडे नीट लक्ष देऊन प्राकृत विषयाची योग्य व्यवस्था केली पाहिजे. शब्दादिकांचीं लक्षणें निर्दोष केलीं पाहिजेत. या सर्व गोष्टींहून विशेष लक्ष देण्याची गोष्ट, सर्व ग्रंथ सरळ आणि सोप्या रीतीनें लिहिण्याचा होईल तितका प्रयत्न झाला पाहिजे, ही होय. मराठी व्याकरणामध्यें संस्कृत संधीविषयीं जे नियम द्यावयाचे, ते ग्रंथाच्या आरंभीं न देतां शेवटीं द्यावे हें बरें वाटतें. आणखी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती अशी, कीं कोणतेंही प्रकरण किंवा कोणतेही पारिभाषिक शब्द घ्यावयाचे असतां, इष्ट विषयाचें प्रतिपादन करण्यास जितक्यांची गरज असेल तितकेच घ्यावे, अधिक घेऊं नयेत; या गोष्टीकडे लक्ष दिल्यानें शिकणाराला फारच मदत होईल, व उगीच तो घोटाळ्यांत पडणार नाहीं.

याप्रमाणें व्याकरणकारानें खटपट केली पाहिजे. परंतु कोशकाराची खटपट पाहून विशेष आहे. जुन्या मराठी कोशांत न आलेले शेंकडों शब्द आपल्या व्यवहारामध्यें व लेखामध्यें येतात, ते सर्व जमविले पाहिजेत. व्याकरण, इतिहास, गणित इत्यादि सर्व शास्त्रांतील शब्द त्यामध्यें घातले पाहिजेत. असें झाल्यानंतर त्या सर्व शब्दांतून सांप्रतच्या प्रचारांत जे असतील, त्यांची वर्णरचना सांप्रतच्या सर्वमान्य पद्धतीस अनुसरून केली पाहिजे; व जे जुनाट व एकदेशीय असतील, ते त्यांच्या त्यांच्या काळाच्या व स्थळांच्या पद्धतीप्रमाणें लिहिले पाहिजेत. नंतर त्या सर्व शब्दसमूहांतून जितक्या शब्दांची व्युत्पत्ति समजण्याजोगी असेल, तितक्यांची शोधून काढली पाहिजे; म्हणजे त्यांचा संस्कृत, प्राचीन प्राकृत (बालभाषा), हिंदी, गुजराती, कानडी, आरबी, फारशी, इत्यादि भाषांशीं संबंध असल्यास तो

परंपरागत अनुक्रमानें दाखविला पाहिजे. त्यापुढें त्या त्या शब्दाची जाति, लिंग, इत्यादि दिलें पाहिजे. पुढें शब्दाचें लक्षण किंवा व्याख्या व पर्याय-शब्द देण्याविषयीं विशेष श्रम घेतले पाहिजेत. ते असे–जुन्या कोशामध्यें शब्दाची व्याख्या बहुधा मूळ शब्दापेक्षां कठीण शब्दांनीं दिलेली आहे, तसें न करतां ती जितक्या सोप्या शब्दांनीं देववेल तितकी दिली पाहिजे. त्यामध्यें **जो तो** हे शब्द जिकडे तिकडे योजून सर्व कोशभर पौराणिक तऱ्हेच्या जुन्या भाषेची छाया आणलेली आहे, तीही नीट लक्ष देऊन टाळली पाहिजे. ही भाषेविषयीं गोष्ट झाली. आतां अर्थाचा क्रम धरला पाहिजे तो असा–प्रथमतः शब्दाच्या उत्पत्तीवरून जो अर्थ निघाला असेल तो आधीं द्यावा, त्याला पर्यायशब्द असतील ते द्यावे. नंतर तो प्रचारामध्यें येत असतां ज्या ज्या क्रमानें त्याच्या अर्थामध्यें अंतर पडत गेलें असेल, त्या क्रमानें ते वेगळे वेगळे लाक्षणिक, व्यंग्य इत्यादि अलंकारिक अर्थ व त्यांचे त्यांचे मिळतील तितके सर्व पर्याय देऊन, पहिल्यापासून ते सर्व अर्थ व पर्याय जिकडच्या तिकडे चांगल्या चांगल्या सर्वमान्य ग्रंथांतून उदाहरणें घेऊन परिस्फुट करावे. कित्येक शब्द पुष्कळ अंशीं परस्पर एका अर्थाचे असून त्यांतील प्रत्येकामध्यें अर्थांतराची किंचित् छाया मारते, तीही दाखविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दोन-दोन, तीन-तीन किंवा याहून अधिक शब्द मिळून त्यांचा वेगळा अर्थ होतो अशा प्रकारचीं वचनें किंवा वाक्यांश असतील, त्यांचीही याप्रमाणेंच व्यवस्था करावी. निरनिराळ्या प्रकरणीं निरनिराळ्या विषयांच्या संबंधाचे शब्द आहेत असें सुचविण्याकरितां जेथच्या तेथें त्यांचीं सूचक अक्षरें लिहावीं. कित्येकांचें मत असें आहे कीं, शब्दाचे अर्थ आधीं देऊन व्युत्पत्ति अगदीं शेवटीं द्यावी, म्हणजे अर्थ झटकन् पाहण्यास अडचण पडत नाहीं, हेंही मत प्रशस्त आहे.

या सर्व सूचनांकडे लक्ष देऊन कोणी विद्वान् गृहस्थ मराठी कोश करण्याचें काम हातीं धरील तर फारच चांगलें होईल. या मोठ्या कोशाची फारच आवश्यकता आहे यांत संशय नाहीं; तथापि दुसरा एक लहानसा

हरकामी म्हणजे खिशांत राहण्याजोगा मराठी कोश याची तर फारच निकडीची गरज आहे असें आमचें मत आहे. त्यामध्यें शब्दांचे मुख्य अर्थ थोडक्यांत देऊन बाकीचे पर्याय द्यावे; येणेंकरून कोशाचा आकार लहानसा राहून त्यापासून व्यवहारामध्यें पुष्कळ उपयोग होईल; या सर्व गोष्टींकडे विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांनीं व इतर विद्वज्जनांनीं आपलें लक्ष पुरवावें अशी त्यांना आमची विनयपूर्वक फार फार सूचना आहे.

(जून १८७०) (पु. ३ अं. १)

३ : : भरतखंडामध्यें एक भाषा करण्याचा विचार आणि नवीन विद्वानांचा अविचारीपणा

आलीकडे आपल्या भरतखंडामध्यें सर्वत्र एकच भाषा चालू होण्याचा प्रयत्न करावा अशाविषयीं कितीएक लोकांनीं आपले विचार प्रकट केले आहेत. अशा प्रकारचे विचार प्रकट करणारे मुळीं इंग्लिश लोक होत, व इंग्लिश लोक जें कांहीं म्हणतील त्या कृत्याला आपण " टेका " द्यावा, अर्थात् सारासारविचार एकीकडे ठेवून सर्वदा इंग्लिश लोकांचा तोंडपुजेपणा करावा असा ज्यांचा स्वभाव त्यांनींही तें मत उचलून धरलें आहे. भाषा एक करणें हा विषय म्हटला म्हणजे फार गहन विचाराचा आहे याकरितां त्याविषयीं जितकी वाटाघाट होईल तितकी चांगली, म्हणून आम्हीही त्याविषयीं थोडेंसें बोलूं.

प्रथमतः भाषा एक करण्याची आवश्यकता काय याचा विचार करून नंतर तशी आवश्यकता ठरल्यास ती एक भाषा कोणती असावी, त्या कृत्याचा परिणाम काय होईल, इत्यादि गोष्टींकडे लक्ष देऊं.

सर्व भरतखंडामध्यें भाषा एक असावी अशा मताला मुख्य कारण म्हणून जें कांहीं त्या मताच्या पुरस्कर्त्यांनीं पुढें आणलें आहे तें

हें–ते म्हणतात, " काय हो, एका भरतखंडामध्यें भाषा तरी असाव्या किती ? एक, कीं दोन, कीं चार ? दहा वीस भाषा म्हणजे झालें काय ? या सांप्रतच्या सुधारणेच्या काळाला एका देशामध्यें इतक्या भाषा म्हणजे सुधारणेला केवढा प्रतिबंध आहे ! परस्परांचे विचार, परस्परांचीं मतें परस्परांना समजण्याला, सर्व लोकांमध्यें एकी व प्रीति, व देशाभिमान उत्पन्न होण्याला अर्थात् सुखाचे प्रवाह निर्बंध वाहण्याला या भाषांचे मोठमोठे पर्वत किती आडवे येताहेत ! युरोपखंडांतील देशांकडे पाहा ! तेथें एका देशामध्यें एक भाषा. फारच तर दोन म्हणजे सीमा झाली; आणि एथें, प्रांतोप्रांतीं निराळ्या भाषा म्हणजे केवढा हा सुधारणेला अडथळा ! केवढें हें विघ्न ! असें हें विघ्न टाळणें हें कृत्य किती बरें आवश्यक आहे ? "

सहृदयांनीं या लेखांवरून दिसेल कीं हें बोलणें फारच रास्त आहे. पण विचारांतीं यांतील पोकळपणा सहज लक्षांत येईल. हिंदुस्थानामध्यें एक भाषा असेल तर बरी, ही गोष्ट कोणी वाईट म्हणत नाहीं, हें तर काय, परंतु या सर्व भूगोलावर जर एकच भाषा होईल तर फारच आनंदकारक गोष्ट होईल. सर्वत्र एक भाषा, एक धर्म, एक मत, एक अभिमान असें जर होईल, तर तेणेंकरून असें कांहीं या पृथ्वीचें स्वरूप बदलून जाईल कीं, एथें कधीं द्वेषबुद्धि, दुष्ट आचार, लक्षावधि प्राण्यांचा क्षणामध्यें विध्वंस करणाऱ्या राक्षसी लढाया, यांच्या गोष्टी स्वप्नींही येणार नाहींत. परंतु या गोष्टींचा कांहीं संभव आहे काय ? ही गोष्ट कधींही होणार नाहीं. सृष्टीचा नियमच असा दिसतो. असो. परंतु कित्येकांचें म्हणणें असें आहे कीं, जरी त्या असंभाव्य गोष्टी दिसतात, तरी प्रयत्नांतीं त्याही सिद्ध होतील, व कदाचित् त्या सिद्ध न झाल्या म्हणून ज्या होण्याजोग्या आहेत त्याही करूं नयेत कीं काय ? तर होय. ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या कराव्या, पण प्रथमतः त्या चांगल्या किंवा वाईट याचा मात्र निकाल झाला पाहिजे. भरतखंडामध्यें एक भाषा असती तर ती नसावी असें कोणीही म्हटलें नसतें. परंतु ज्या पक्षीं त्या अनेक आहेत त्या पक्षीं त्या सर्वांच्या जागीं एक भाषा करणें

हें सांप्रत सयुक्तिक व अडचणींवांचून घडण्याजोगें आहे कीं काय याचा विचार झाला पाहिजे. युरोपखंडांतील एक एक देशामध्यें एक एक भाषा आणि हिंदुस्थान या एका देशामध्यें दहावीस भाषा हें प्रथमतः आश्चर्यकारक दिसतें खरें; परंतु युरोपखंडामध्यें किती देश आहेत व त्यांमध्यें किती भाषा आहेत हें पाहिलें पाहिजे. त्यांमध्यें निरनिराळे देश या नांवानें प्रख्यात असे निरनिराळे सतरा अठरा भाग असून त्यांमध्यें वीसपंचवीस भाषा सध्यां चालत आहेत. परंतु हा जो असा वीसपंचवीस भाषा चालणाऱ्या देशांचा समुदाय, तो म्हणजे सर्व युरोप खंड; याची आपल्या एका हिंदुस्थान देशाशीं तुलना करून जर पाहिली, तर तें सर्व युरोप खंड विस्तारानें या एका हिंदुस्थानच्या दीढी-दुपटीबरोबरही मोठ्या मारामारीनें लागेल. एका हिंदुस्थानामध्यें २०,००,००,००० प्रजा, व त्या युरोप खंडांतील सर्व सतरा अठरा भागांमध्यें मिळून २५,००,००,००० पेक्षां कमी. तेव्हां त्या सर्व युरोपखंडाची बरोबरी करावयास जाणारा जो हा एक देश तो लहान म्हणतां येत नाहीं. यामध्यें अनेक भाषा असल्या म्हणून नवल नाहीं.

इंग्लंड म्हणजे युरोपाचा केवढासा लहान भाग, त्यामध्यें वेगळी भाषा, इटलीमध्यें वेगळी, ग्रीसामध्यें वेगळी, पोर्तुगालमध्यें वेगळी; अशा अशा एवढ्या एवढ्या तुकड्यांना जर वेगळी वेगळी भाषा, तर हिंदुस्थानाला दोष लावणें हा वेडेपणा नव्हे काय? मोठमोठे सुधारलेले म्हणविणारे इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, रशियन,वगैरे लोक, ज्यांना विद्या, कलाकौशल्य यांच्या वृद्धीची मोठी आवड, ते सर्व युरोपखंडामध्यें मिळून एक भाषा चालू करण्याचा प्रयत्न जर करीत नाहींत,तर त्यांनीं तो हिंदुस्थानामध्येंच काय म्हणून करावा? एक भाषा असल्यापासून जें हित आहे, तें घडवून आणण्याकरितां आपापल्या देशामध्यें त्यांनीं प्रयत्न करावा, तो ते कां बरें करीत नाहींत? आणि हिंदुस्थानामध्येंच एक भाषा करण्याला असें मोठें दुसरें कोणचें कारण आहे? जे मोठमोठे प्रख्यात सुधारलेले म्हणविणारे राजे त्यांना जर आपल्या

भाषांचा अभिमान आहे तर हिंदूंना मात्र तो नसावा काय ? हिंदूंचें तितकें सर्व वाईट असें मानणें हें केवळ मूर्खपण आहे असें कोण बरें म्हणणार नाहीं ? इंग्लिश लोकांना आपल्या भाषेचा इतका अभिमान आहे कीं, आपली भाषा पृथ्वीच्या सर्व भागावर पसरलेली आहे अशी ते मोठी प्रौढी मिरवितात, आणि ज्या पक्षीं त्यांना तशी प्रौढी मिरविण्याला योग्य कारण आहे,त्या पक्षीं हिंदूंनाही तसा अभिमान बाळगण्याला काय बाध आहे ? भाषेचा विस्तार असण्यामध्यें जर प्रतिष्ठा आहे, तर आपापली असलेली भाषा राखण्यामध्यें व तिचा उत्कर्ष करण्यास झटण्यामध्यें प्रतिष्ठा आहे, इतकेंच नाहीं तर तसें करणें हा प्रत्येकाचा धर्म आहे. गतवर्षी अशी एक गोष्ट घडलेली सर्वांस माहित आहे कीं, ज्या वेळीं फ्रेंच आणि प्रुशियन यांच्या युद्धामध्यें फ्रेंचाचा मोड झाला, तेव्हां सर्व युरोप खंडामधील दरबारांमध्यें पत्रव्यवहार ठेवण्याची पूर्वींपासून चालत आलेली जी फ्रेंच भाषा, तिचाही त्याग करून आपली जर्मन भाषा व्यवहारांत आणावी असा प्रशियाच्या राजानें बेत केला, आणि आपल्या भाषेनें रूस देशाच्या बादशहाला एक पत्र लिहिलें;परंतु हा त्याचा अभिमान पाहून त्या बादशहानें फ्रेंच आणि जर्मन या दोन्ही भाषा गुंडाळून ठेवून त्या पत्राचें उत्तर आपल्या रशियन भाषेनें लिहून पाठविलें. तेव्हां हे राजश्री शुद्धीवर येऊन त्यांनीं पूर्वींच्या फ्रेंच भाषेचाच क्रम चालू ठेवला. अशा या अभिमानाच्या गोष्टी आहेत, आणि अभिमानानेंच जर या देशाच्या भाषा मोडण्याचा विचार करायचा असला, तर तेथें समजुतीच्या गोष्टीची गरजच राहिली नाहीं. कितीएक लोक आपल्या हिंदुस्थानाचा विस्तार मोठा असल्यामुळें एथें अनेक भाषा आहेत ही गोष्ट कबूल करतात, परंतु शेवटीं ते म्हणतात कीं पुष्कळ भाषा शिकाव्या लागल्यामुळें राज्यव्यवस्था नीट चालण्याला मोठा अडथळा येतो. परंतु हें म्हणणें अगदीं पोरकट आहे; कारण हिंदुस्थानाच्या राज्यकर्त्यांना जर हिंदुस्थानच्या भाषा शिकण्याचा असा कंटाळा, तर मग त्याबरोबर राज्य करण्याचाही कां कंटाळा येऊं नये ?

सुख जर पाहिजे तर त्याबरोबर थोडेंसें दुःखही सोसणें ही गोष्ट सर्वांना अवश्य आहे. हिंदुस्थानामध्यें चांगला राज्यकारभार चालण्याकरितां हिंदुस्थानच्या वीस कोटी प्रजेनें आपापली भाषा सोडून देऊन राज्यकर्त्यांची भाषा घ्यावी, यापेक्षां प्रजेचा निकट संबंध ज्यांना आहे अशा थोड्याशा राज्यकर्त्यांनींच त्या त्या प्रांताची भाषा शिकावी आणि नीट व्यवस्था ठेवावी ही गोष्ट वाईट असें कोण म्हणेल ? यामध्यें ज्यांना आवडेल त्यांनीं इंग्रजी भाषा शिकूं नये असें कोणी म्हणत नाहीं;परंतु हजारों आणि लाखों रुपये पगार खाणाऱ्या राज्यकर्त्यांचे थोडेसे श्रम वांचविण्याकरितां, गरीब बिचारे दोन-चार रुपये मिळवून मोठ्या कटाकटीनें उदरनिर्वाह करणारे खेडोखेडीं राहणारे पाटील कुलकर्णी वगैरे दीन प्राणी, यांणीं इंग्रजी भाषा शिकून सगळीं कागदपत्रें व हिशेब इंग्रजी भाषेनें लिहावे असें म्हटलें, तर त्यापासून लक्षावधि प्राण्यांची दुर्दशा होण्याचा संभव आहे, याकडे सर्वांनीं लक्ष दिलें पाहिजे. वास्तविक पाहतां राज्यकर्त्यांना भाषांपासून कांहीं अडचण नाहीं. मुख्य मुख्य जे देश म्हणजे महाराष्ट्र, बंगाल, हिंदुस्थान, कर्नाटक, तैलंगण, गुजरात, इत्यादि भाग ते युरोप खंडांतील मोठमोठ्या देशांहूनही विस्तीर्ण आहेत आणि त्यांतील एकेकामध्यें एकेक भाषेची व्यवस्था ठेविली, व सध्या चालल्याप्रमाणें अगदींच थोडक्या विस्ताराच्या भाषा आसपासच्या भाषांमध्यें धरल्या तर सर्व सुरळीत चालेल व कांहीं अडचण येणार नाहीं.

आतां सुधारणेच्या प्रतिबंधाची गोष्टही वरील राज्याच्या गोष्टीप्रमाणेंच केवळ निराधार आहे. कारण,जे कोणी सुधारणा करण्याकरितां निघतात, ते भाषेची परवा करीत नाहींत, व त्यांना भाषेपासून अडथळाही होत नाहीं. आणि जे सुधारणेचे खरे भक्त आहेत, त्यांना जरी कदाचित् अडथळा आलाच, तरी ते भाषा शिकण्याच्या श्रमाला भीत नाहींत; व जे सुधारक केवळ भाषेच्या अनेकत्वाचें भय बाळगून मागें सरतात ते केवळ ढोंगी आहेत असें म्हणण्यास बिलकुल हरकत नाहीं. ज्यांणीं ज्यांणीं आजपर्यंत

अनेक धर्म व मतें निरनिराळ्या देशांमध्यें नेलीं त्या सर्वांच्या भाषा एक होल्या असें नाहीं. सारांश ही सबबही अगदीं पोरकट आहे. आतां तिसऱ्या प्रकारचे कित्येक लोक आहेत, त्यांणीं सर्व हिंदुस्थान देश खिस्ती करण्याला एक भाषा असण्याची आवश्यकता दाखविली आहे. परंतु खिस्ती होण्याची जशी आपल्या देशाला मुळींच गरज नाहीं, तशीच त्या एक भाषेचीही अशा रीतीनें गरज नाहीं; त्यापक्षीं त्या भाषणाकडे लक्ष देणें हें केवळ अनावश्यक आहे.

आलीकडे आगगाडीचा रस्ता सर्व हिंदुस्थानभर झाल्यामुळें लोकांचा परस्परांशीं निकट संबंध विशेष होणार, याकरितां परस्परांची भाषा परस्परांस समजणें अवश्य आहे; परंतु हीच गोष्ट याहून अधिक बळकट प्रमाणानें युरोपखंडास लागू आहे, व तेथें जसा व्यवहार चालतो तसाच येथें चालेल. तशांत हिंदुस्थानांतील सर्व भाषा परस्परांशीं इतक्या मिळून आहेत कीं, थोडक्याशा परिचयानें, व अगत्यानें हिंदुस्थानच्या कोणत्याही देशांतील लोकांना त्या सहज शिकतां येतात. त्यांना इंग्रजीप्रमाणें दहा-दहा आणि पांच-पांच वर्षे घालविलीं पाहिजेत असें नाहीं. ज्याला हिंदुस्थानांतील एक भाषा चांगली पक्की येत आहे, त्यास हिंदुस्थानांतील दुसरी कोणतीही अवघड भाषा अगत्यानें शिकणें असल्यास पराकाष्ठा चार-सहा महिन्यांहून अधिक दिवस लागणार नाहींत. इतकेंही असून एक भाषा चालू करावीच असा जर आग्रह झाला, तर ती असावी तरी कोणती ? ज्याला-त्याला ज्याच्या-त्याच्या भाषेचा अभिमान वाटणार, व त्या अभिमानाला योग्य आधार आहेच. सर्व एकीकडे ठेवून इंग्लिश भाषा जर चालू करावी, तर तेणें-करून राज्यकर्त्यांचें हित खरें, परंतु सर्व प्रजेला ती अवश्य शिकावी लागल्यापासून तिला मोठे कष्ट भोगावे लागतील, तिची दाद लागणार नाहीं, व सर्वस्वी दुर्दशा होईल, व इतकें होऊन शेवटीं इंग्रजी ही स्वभाषा झालीच, तर मग सर्व विचाराचें मूळ जी भाषा तीच फिरल्यावर

हिंदुस्थानाचें सगळेंच स्वरूप वेगळें होऊन तरी सर्व स्थिति चांगलीच होईल असें म्हणणें केवळ स्वप्नवत् आहे.

अशी गोष्ट असतां आमचे नवीन सुधारलेले विद्वान् लोकही हळू हळू देशभाषा बुडविण्याकडे गुंतले आहेत हें पाहून मोठें दुःख वाटतें. जसजसे ते अधिक विद्वान् होत जातात, तसतशी देशभाषा मोडण्याचा ते प्रयत्न करतात असें बहुधा दिसतें. इतके दिवसपर्यंत प्रत्येक प्रांतांतील राजकीय कामकाज त्या त्या देशभाषेनें चालत असे; परंतु नवीन युनिव्हर्सिटींतील म्हणजे विद्वन्मंडळांतील लोक मामलतदार वगैरे होऊं लागल्यापासून देशभाषेवर त्यांनीं यमाजीपंताचा हल्ला आणलाच. जे मोठे विद्वान् म्हणविणारे व ज्यांना आपल्या देशाचा व भाषेचा अभिमान असावयाचा, तेच आपण होऊन अविचारानें असा तोंडपुजेपणा करून विद्वत्तेचा डौल दाखविण्याकरितां आपल्या कर्तव्यावर पाणी सोडूं लागले, तर ' आपल्या देशाचें प्रालब्धच तसें ' यापलीकडे आणखी काय म्हणावयाचें आहे ?

देशाची सुधारणा व्हावी अशी ज्यांची वास्तविक इच्छा आहे, ते हिंदुस्थानांतील सर्व भाषा हळू हळू सुधारून, शेवटीं त्या परस्परांशीं दिवसेंदिवस विशेष साम्य ठेवीत जातील असें होण्याची तजवीज करतील, तर थोडक्या श्रमानें पुष्कळ काम होऊन जाईल हें त्यांनीं पक्कें समजावें. या भागांतील देशभाषा सुधारण्याच्या कामांत एथील डायरेक्टर ऑफ् पब्लिक् इन्स्ट्रक्शन् (विद्याखात्याचे अधिकारी) हे फार मेहनत करीत आहेत, व पुष्कळ अडचणी दुसऱ्यांनीं आणल्या असतांही आपल्या ताब्यांतील सर्व शाळांमध्यें देशभाषा अवश्य शिकविण्याचा त्यांणीं हुकूम केला आहे, या कृत्याबद्दल ते फार स्तुतीस पात्र आहेत. आतां दुसरी एक व्यवस्था अशी झाली पाहिजे कीं, कलकत्ता, मद्रास, मुंबई, वगैरे निरनिराळ्या भागांमध्यें जीं शास्त्रीय विषयांवर एतद्देशीय भाषांमध्यें पुस्तकें होत आहेत, त्या सर्वांमध्यें नवीन केलेले शास्त्रीय (पारिभाषिक) शब्द हे सर्व

भाषांमध्यें सारखेंच ठेवण्याची तजवीज विद्यावृद्धि करणाऱ्या मंडळ्यांनीं व अधिकाऱ्यांनीं योजावी व एकदम सर्वांच्या विचारें परिपाठांत आणावी, म्हणजे एणेंकरून कांहीं अडचण न पडतां सर्व भाषा एका धोरणानें चालूं लागून हळू हळू आपोआप सारख्या होण्याच्या ओघास लागतील हें खचित आहे.

(ऑगस्ट १८७१) (पु. ४ अं. २)

---

४ : : भरतखंडांतील भाषांविषयीं

गेल्या महिन्याच्या अंकामध्यें या विषयाच्या संबंधानें जे विचार लिहिले आहेत, त्यांवरून एका मित्रानें आम्हांस असें कळविलें कीं, "भरतखंडामध्यें एक भाषा करणें म्हणजे इतर भाषा अगदीं रद्द करून त्यांच्याऐवजीं एकच भाषा सर्वत्र चालू करणें असें नाहीं, परंतु जरी दुसऱ्या भाषा असल्या तरी, प्रसंगोपात्त जर भरतखंडांतील निरनिराळ्या देशांतील कांहीं लोकांची एक सभा झाली किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें ते एकत्र मिळाले, तर अडचणीवांचून सर्वांना परस्पर संभाषण करितां यावें, अशी तजवीज व्हावी, हा भाषा एक करण्याविषयीं झटण्याचा हेतु आहे." असें जर झालें,तर तें फार चांगलेंच यांत संशय नाहीं, व पूर्वीपासून आमचेंही म्हणणें याच्या विरुद्ध आहे असेंही नाहीं. एकदम दुसऱ्या भाषा रद्द करण्याच्या विरुद्ध मात्र आमचें बोलणें होतें. तथापि हा नवीन प्रकारही कांहीं विचाराचा आहे. आतां दिवसेंदिवस इंग्लिश भाषेचा सर्व भरतखंडामध्यें प्रसार होत चालला आहे. यामुळें अशा प्रकारच्या वेगळ्या भाषेची गरज नाहीं असें कित्येकांचें म्हणणें पडतें;परंतु इंग्रजीचा याहूनही अधिक विस्तार झाला; तथापि मोठमोठ्या विद्वान् हुशार लोकांशिवाय त्या भाषेमध्यें चांगलें संभाषण करणें हें इतरांस साधणार नाहीं. व ती भाषा परक्यांची असून

कठीण असल्यामुळें तिजमध्यें चांगली गति होण्यास फारच श्रम लागतात; व तेणेंकरून शेवटीं स्वदेशांतील भाषांचा नाश होत जाणार हें उघड आहे. याकरितां जी सार्वजनिक भाषा करावयाची ती अशी असली पाहिजे कीं, ती थोड्या श्रमानें समजणारी व शिकतां येणारी अशी असून प्रौढ असली पाहिजे; आणखी दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं दिवसेंदिवस त्याच भाषेचा विस्तार होऊन जर तेणेंकरून इतर भाषांचा लोप होण्याचा योग घडून आला, तर त्यामुळें कोणास कांहीं दुःख किंवा तोटा होऊं नये. तेव्हां अशी भाषा म्हटली म्हणजे तूर्त प्रसंगीं एक हिंदुस्थानी दिसते. जरी आलिकडे हिंदुस्थानी भाषेकडे बहुतेकांचें दुर्लक्ष होत चाललें आहे, तरी हिंदुस्थानी भाषेचें ज्ञान बहुधा सर्व लोकांस आवश्यक आहे इतकेंच केवळ नव्हे, परंतु आणखी तें भूषणास्पदही आहे, अशा प्रकारची समजूत पुष्कळ दिवसांपासून चालत आली आहे, व ती अशा प्रकारच्या कारणांनीं उदयास आणल्यानें तिजपासून कोणास बहुधा वाईट वाटणार नाहीं असें दिसतें. तथापि हिंदुस्थानीची सांप्रतची स्थिति पाहतां ती सोपी असून संभाषणाला योग्य आहे यापलीकडे तिची स्तुति करवत नाहीं. तिजमध्यें मुख्यत्वें आधीं हिंदी आणि ऊर्दू असे दोन भेद असून पोटभेद तर पुष्कळच आहेत. शास्त्रीय विषयाच्या दृष्टीनें पाहतां हिंदुस्थानीला एतद्देशीय इतर भाषांपेक्षां मोठें पद देतां येत नाहीं. व त्या शास्त्रीय विषयांमुळें तर हिंदी व ऊर्दू या दोहोंमध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे हें सर्वांस ठाऊक आहे. अशा कारणांनीं त्या अगदीं वेगळ्या भाषा म्हणण्यालाही बाध दिसत नाहीं. तेव्हां अर्थात् हिंदी किंवा ऊर्दू किंवा दोन्ही भाषा शिकाव्या हा विचार पुढें आहेच. हिंदूंना हिंदी आणि मुसलमानांना ऊर्दू आवडते. परंतु एकमेकांची भाषा एकमेकांस आवडत नाहीं. सर्व देशाच्या दृष्टीनें पाहतां हिंदीशीं इतर भाषांचें विशेष साम्य आहे म्हणून तिजकडे विशेष कल होईल. याकरितां मुख्यत्वें हिंदी भाषा व्यवहारांत येईल तितकी आणण्याविषयीं जर विद्वान् व उद्योगी

लोक प्रयत्न करतील, तर संभाषणाला सर्व भरतखंडभर एक भाषा व्हावी हा जो हेतु तो बराच सिद्धीस जाईल असें दिसतें. परंतु यास दुसरी एक अडचण आहे ती ही कीं, हिंदी भाषा त्वरित लिहिण्याला चांगली लिपि नाहीं. ऊर्दू लिपि तर या कामाला अगदीं अयोग्य असें कोणीही सांगेल. देवनागरी जरी छापी पुस्तकें लिहिण्याला फारच अनुपम व सुंदर आहे, तथापि कागदोपत्रीं झपाट्याच्या कामीं तिचा उपयोग होत नाहीं. आतां या कामीं फार उपयोगीं पडणारी दुसरी एक लिपि आहे, परंतु बहुतेक लोकांस ती माहीत नाहीं, व ज्यांस माहीत आहे त्यांचाही ग्रह विनाकारण त्या लिपीच्या विरुद्ध बहुधा झाला आहे. त्यांना त्या लिपीची योग्यता किती आहे या गोष्टीचा विचार करण्याचीच कांहीं अंशीं लज्जा वाटते कीं काय कोण जाणे ! परंतु जर कधीं अशी सर्वमान्य व जरूरीच्या कामीं उपयोगीं पडणारी सुंदर लिपि या भरतखंडांत चालू होण्याचा योग असेलच, तर तो त्याच लिपीचा आहे यांत संशय नाहीं. त्या लिपीमध्यें लिहिण्याची सफाई फार असून शिकण्यालाही ती फार सोपी आहे. जशी हिंदी ही भाषा संस्कृतापासून उत्पन्न झाली आहे, तशीच ती लिपि देवनागरीपासून झाली आहे. देवनागरीमध्यें व तिजमध्यें फेर इतकाच कीं, नागरीमधील काने मात्रा वगैरे लिहितांना जो हात अडतो, तो न अडावा म्हणून तोच हात न उचलतां उलटून पुढच्या अक्षरापर्यंत नेलेला असतो, किंवा कित्येक ठिकाणीं काने गाळलेले असतात, व सर्वदा अक्षरांना बहुधा गोल आकार आणलेला असतो, हाच काय तो फेर आहे. परंतु अशी जी उपयुक्त लिपि सांगितली, ती आपली मोडी लिपीच होय, असें जेव्हां आम्ही सांगूं, तेव्हां त्या बोलण्याची चेष्टा झाल्यावांचून बहुधा राहील असें वाटत नाहीं. मनुष्याचा स्वभावच कांहीं चमत्कारिक आहे. लांब कशाला, भाषेची सुधारणा आणि देशाची सुधारणा करण्याविषयीं उत्सुकता दर्शविणारे जे याच शहरामध्यें हजारों मराठी लोक आहेत, त्यांतील बहुतेकांस त्या 'मोडी' या शब्दाचाच आधीं कंटाळा आहे...मग पुढें तिच्या बऱ्यावाईट

गुणांविषयीं विचार करणें दूरच. तसेंच बंगाली, गुजराती, व सिंधी वगैरे लोक जरी भाषेच्या सुधारणेविषयीं पुष्कळ अगत्य दाखवितात, तरी आपापल्या ओंगळ लिपि सोडून पुस्तकामध्यें तरी सर्वमान्य देवनागरीची योजना करणें ही गोष्ट त्यांच्या हातून होत नाहीं; तेव्हां त्यांना जी मोडी लिपि माहितही नाहीं, तिचा स्वीकार ते करतील ही गोष्ट फार दुरापास्त आहे. आपापली भाषा राखून फक्त चांगली लिपि (तीही आपल्या पूर्वजांची) घेण्याला जे असमर्थ आहेत, त्यांच्या हातून सर्व हिंदुस्थानाची एक भाषा होणें ही गोष्ट जरी निखालस असंभव्य नाहीं, तरी बरीच संशययुक्त आहे म्हणण्यास चिंता नाहीं. आतां 'मनावर घेतल्यास काय होणार नाहीं ?' हें वाक्य लक्षांत ठेवून आणि पोकळ अभिमान सोडून आपले लोक साधारण संभाषणापुरतीं तरी हिंदी भाषा वहिवाटींत आणतील, व तिला योग्य अशी लिपि कोणती याचा विचार करतील, तर त्यापासूनही पुष्कळच फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं. तसेंच मागील अंकांत सांगितल्याप्रमाणें तिजमध्यें व इतर भाषांमध्यें नवीन शास्त्रीय शब्द सारखेच घालण्याची तजवीज ठेवली, तर हळू हळू सर्व भाषा सुधारून एका ओघास येत जातील; व असें होतां होतां मग हिंदी भाषेचा फार प्रसार झाला, व तिच्या दाबामुळें इतर भाषा मोडत चालल्या, तरी ती हिंदुस्थानी भाषा या कारणानें तिजविषयीं कोणाच्याही मनांत द्वेष उत्पन्न न होतां प्रीतिच वाढत जाईल व आपण इच्छिलेलें काम सुरळीतपणें सिद्धीस जाईल.

(सप्टेंबर १८७१) (पु ४, अं. ४)

---

५ : : मराठी भाषेचे कोश

आलिकडे आमच्या ऐकण्यांत आलें आहे कीं विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांनीं मराठी व गुजराती भाषांच्या कोशांकडे लक्ष लाविलें आहे. गुजराती भाषेचा चांगला मोठा कोश नाहीं तो तयार करण्याकरितां व

गुजराती-इंग्रजी कोश करण्याकरितां त्यांणीं इनामें व कामदार नेमले आहेत असें समजतें. तसेंच मेजर क्यांडीकृत इंग्लिश-मराठी कोशाची पुनरावृत्ति छापविण्याकरितां तो सुधारण्याचें कामही चालविलें आहे असें कळतें. मराठी व गुजराथी भाषांच्या चांगल्या कोशांचा दुष्काळ दूर करण्याचें काम विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांनीं हातीं धरलें हें पाहून फार संतोष वाटतो; कारण अशा मोठ्या कामास पैशाची फार गरज, म्हणून सरकारानें मन घातल्यावांचून तें सिद्धीस जाणें कठीण. दुसरें असें आढळतें, कीं कोणी स्वतंत्र मनुष्यानें द्रव्य व श्रम खर्चून अशा प्रकारचा स्तुत्य उद्योग आरंभलाच, तर विद्याखात्यांतील कामदारांच्या मर्जीस जर तीं पुस्तकें न आलीं, तर–त्यांची एक प्रतसुद्धां खपणें कठीण पडतें. कारण सर्व सरकारी शाळा विद्याखात्याच्या ताब्यांत, त्यांत कांहीं त्या पुस्तकाचा प्रवेश होऊं शकत नाहीं; तेव्हां कोठें किरकोळ त्याच्या थोड्याशा प्रती खपल्याच, तर त्यांची संख्या इतकी थोडी असते कीं, त्या खपल्या न खपल्या सारख्याच. अशा प्रकारचें एक मोठें ढळढळीत उदाहरण थोड्या दिवसांमागें घडून आल्याचें आम्हांस समजलें आहे. विद्याखात्याचीं वास्तविक मतें व विचार काय आहेत, हें स्पष्ट समजण्यास तर मार्ग नाहींच. तथापि एका उद्योगी गृहस्थानें मोठा संस्कृत मराठी कोश तयार करून विद्याखात्याकडे पाठविला होता; परंतु ज्यास मराठी भाषेचें चांगलें ज्ञान नव्हतें, व ज्यास मराठी भाषेमध्यें पुस्तकांचा किती तोटा आहे हेंही माहीत नव्हतें, त्याकडे तपासून पाहण्याकरितां तो गेला; व त्यानें तो साफ निरुपयोगी असा शेरा दिला, त्यामुळें त्याला सरकारचा आश्रय मिळाला नाहीं, असें समजतें. याप्रमाणें तो गृहस्थ मोठ्या खर्चांत आला, तरी शेवटीं त्याणें स्वतःच्या खर्चानें तो ग्रंथ मोठ्या श्रमानें पुष्कळ वर्षें लावून छापवून तडीस नेला. तो पाहतां, सर्वोत्कृष्ट व अनुपम असा जरी न ठरला, तरी फारच उपयोगी असून, सर्वांच्या आश्रयाला योग्य असा दिसत आहे. परंतु एकाद्या तऱ्हेवाईक विद्वानाच्या लहानशा निष्कपट शेऱ्यावरून,

अशा प्रकारच्या कृत्याचा खर्च भागण्याचीही कशी पंचाईत पडते, याचें हें चांगलें उदाहरण होऊन गेलें. याकरितां विद्याखात्यानेंच असे ग्रंथ छापण्याचें मनावर घेतलें, याचा संतोषच मानिला पाहिजे. परंतु कोशाचें काम म्हटलें म्हणजे फार मोठें, व खर्चाचें आहे; यामुळें वारंवार होणारें नव्हे. याकरितां तें फार चांगल्या रीतीनें तडीस नेलें पाहिजे, व तें सर्व लोकांच्या उपयोगीं पडेल असें केलें पाहिजे. आमच्या या बोलण्याचा संदिग्धपणा दूर होण्याकरितां थोडासा विस्तार करूं—चाळीस वर्षांमागें जेव्हां सरकारानें पंडित लोकांकडून मोठा मराठी कोश करविला, तेव्हां तो मराठी भाषेच्या सुधारणेकरितां केला आहे असें त्यामध्यें लिहिलें होतें. आणि खरोखरी त्या कोशापासून मराठी भाषेची पुष्कळ सुधारणा झाली यांत संशय नाहीं. तथापि असें दिसतें कीं, जरी कदाचित् तो कोश रचण्यामध्यें मराठी भाषेची सुधारणा हा हेतु खरोखरीच असला, तरी पुढें त्या कोशाकडे जें सरकारचें दुर्लक्ष झालें, त्यावरून पाहतां तो हेतु होता असें म्हणण्यास किंवा तो पुढें कायम राहिला असें म्हणण्यास मोठी अडचण उत्पन्न होते. त्या कोशाच्या आधारानें मोल्स्वर्थकृत मराठी इंग्लिश कोश, आणि क्यांडीकृत इंग्लिश मराठी कोश हे एकदाचे तयार झाल्यावर, आजपर्यंत चाळीस वर्षांमध्यें त्या मराठी कोशाची सुधारणा करण्याकडे सरकारनें मुळींच मनावर घेतलें नाहीं. मोल्स्वर्थ कोशाच्या दोन आवृत्ति झाल्या, व क्यांडीकृत कोशाच्या पुनरावृत्तीचें आतां काम चाललें आहे, आणि मराठी कोशाचें नांव नाहीं; तेव्हां बहुधा त्याची विस्मृति पडली असेंच दिसतें. दुसरें, क्यांडीकृत व मोल्स्वर्थकृत कोशांच्या योगानें मराठी भाषेला जरी कांहीं मदत झाली नाहीं असें म्हणवत नाहीं, तरी ते मराठी लोकांचें व मराठी भाषेचें हित मनांत धरून तयार केले आहेत किंवा त्यांच्या हिताकरितां पुनरावृत्ति चालल्या आहेत असें म्हणतां येत नाहीं; कारण जो कोणी त्या कोशांकडे नजर लावील त्यास उघड दिसेल कीं, ते, मराठी शिकणाऱ्या

इंग्लिश लोकांकरितां आहेत, किंवा ज्याला प्रथमतः इंग्लिश चांगलें समजत असेल, अशा मराठी लोकांना, इंग्रजी ग्रंथांचे मराठी तरजुमे करण्यास मात्र साह्यकारी आहेत. क्यांडीकृत कोशामध्यें अशी रचना आहे कीं, एका इंग्लिश शब्दाचा इंग्रजीनेंच अर्थ सांगून नंतर त्याला लागोपाठ दोन-तीन अक्षरांपासून दहाबारा अक्षरांपर्यंतचे असलेले जुने किंवा नवीन केलेले, प्रसिद्ध किंवा अप्रसिद्ध, मराठी किंवा संस्कृत, जितके शब्द मिळतील तितके लिहून ठेवले आहेत. यामुळें इंग्रजी किंवा मराठी शिकणारांना सारखीच अडचण उत्पन्न होऊन त्यांतून कोणता मराठी शब्द घ्यावा याची जरी उभयतांना एकसारखीच पंचाईत पडते, तरी त्या कोशाचे सर्व पारिभाषिक शब्द, व इतर सर्व समजुतीच्या गोष्टी इंग्रजी भाषेनें लिहिलेल्या असल्यामुळें, त्यांपासून नवीन मराठी शिकणाऱ्या इंग्रजाला जितकी सोई होते तिचा शतांशही नवीनच इंग्रजी शिकणाऱ्या मराठी मनुष्याला होत नाहीं. मोल्स्वर्थकृत कोशाची ही तऱ्हा फक्त इंग्लिश लोकांच्याच उपयोगाची आहे. तेथें मराठी शब्दांना तंतोतंत लागू पडणारे इंग्लिश शब्द दिले आहेत असें नाहीं. बहुधा सर्वत्र त्यांचा अर्थविस्तार इंग्रजी भाषेनें केला आहे. यामुळें ज्याला प्रथमतः इंग्रजी भाषा बरीच समजते त्याला मात्र तो कोश उपयोगी आहे. त्यांतील मराठी शब्दांला यथायोग्य इंग्रजी शब्द शोधून काढण्यास, किंवा त्यांच्या व्याख्येवरून स्वमतीनें योजण्यास ज्याला इंग्रजी चांगलें समजत नाहीं त्याची वारंवार पंचाईत पडते. ज्यांना इंग्रजी लोकांकरितां केलेले आणि फ्रेंच लोकांकरितां केलेले जे इंग्लिशफ्रेंच किंवा फ्रेंचइंग्लिश कोश, या दोहोंतील भेद व उपयोग चांगला माहीत आहे, ते आमच्या म्हणण्याचा खरेपणा सहज कबूल करतील. सारांश क्यांडीकृत आणि मोल्स्वर्थकृत कोश जरी छापिले किंवा सुधरले, तरी मराठी लोकांना ज्या प्रकारचे कोश पाहिजेत त्या प्रकारचे ते होऊं शकत नाहींत; त्यांपासून फक्त सरकारला आणि प्रथमतःच चांगलें इंग्लिश समजणाराला उपयोग. जर मराठी

भाषेला किंवा मराठी लोकांना खरी मदत द्यावयाची, तर आधीं शुद्ध मराठी कोश सुधरून व विस्तीर्ण करून छापविला पाहिजे, व मराठीइंग्रजी आणि इंग्रजीमराठी कोश मराठी भाषेनें लिहिलेले असे तयार केले पाहिजेत. आणि असें घडून येईतोंपर्यंत विद्याखात्याकडून मराठी भाषेकडे जितकें लक्ष लागावें तितकें लागलें नाहीं असें म्हणण्यास अगदीं हरकत नाहीं. या बाबें इतर विद्वानांनीं व श्रीमंतांनीं उद्योग करावा हें स्तुत्य कृत्य आहे व हा त्यांचा धर्मही आहे: तथापि तूर्त आमच्या देशांतील लोकांस दरिद्राचा व्याधि लागला असल्यामुळें त्यांच्या हातून या गोष्टी तडीस जाणें कठीण; याकरितां विद्याखात्यानेंच हीं कृत्यें हातीं धरून देशभाषेस वास्तविक मदत करावी व ती सुधरून विशेष मोठेपणा येण्याजोगी करावी हा त्याचा धर्म आहे.

(ऑक्टोबर १८७१) (पु. ४ अं. ५)

---

६ : : देशभाषांची दुर्दशा

दिवसेंदिवस देशभाषा मोडकळेस येत चालल्या आहेत. देशभाषांच्या नवीन नवीन पुस्तकांची व वर्तमानपत्रांची जरी वृद्धि आहे, तरी त्यांचा कल उत्कर्षस्थितीकडे आहे असें नाहीं. बाह्यात्कारीं जरी त्यांना पुष्कळ मदत होत आहे असें दिसतें, तरी नीट रीतीनें पाहतां उलट स्थिति दृष्टोत्पत्तीस येते. ज्या वेळीं पहिल्यानें इंग्लिश राज्यकर्त्यांनीं या देशीं विद्यालयें आणि न्यायसभा स्थापिल्या, त्या वेळीं मराठी गुजराती वगैरे भाषांना बरेंच उत्तेजन मिळत गेलें. नवीन कोश झाले, व्याकरणें झालीं, दुसरे कित्येक शास्त्रीय ग्रंथ झाले, न्यायसभांमध्यें देशभाषेचा व्यवहार चालला. याप्रमाणें बरेच दिवसपर्यंत देशभाषेनें एतद्देशीय लोकांमध्यें विद्या व सुधारणा वाढविण्याचा राज्यकर्त्यांनीं प्रयत्न केला. आणि तेणेंकरून पुष्कळ

चांगले परिणाम झाले. परंतु आलिकडे देशभाषांची दशा चांगली दिसत नाहीं. दिवसेंदिवस राज्यकर्त्यांकडून आणि विद्वान् लोकांकडून त्यांना आश्रय कमी कमी होत चालला आहे. सरकारानें तर हळू हळू देशभाषांचे पाय मोडण्याचा क्रम चालविला आहे. 'युनिव्हर्सिटी' म्हणून जें विद्यामंडळ हल्लीं प्रसिद्ध आहे,त्यामध्यें तर देशभाषांना पायरी चढण्याचा हुकूम नाहीं. शाळांमध्यें पाहिलें तर मुलांना ट फ वाचतां येऊं लागण्याच्यापूर्वीच इंग्रजी भाषेचा अभ्यास सुरू होतो. स्वभाषेचें अज्ञान असल्यामुळें इंग्रजी भाषेमध्यें कांहीं थोडाही प्रवेश होण्यास एकाच्या जागीं चार वर्षें जरी लागलीं, तरी तेथें तीं तशीं कुचंबत पडतात; परंतु आधीं स्वभाषेचा कांहीं अभ्यास करणें कोणासही आवडत नाहीं. खुद्द स्वभाषेची ही दशा, तेव्हां शेजारपाजारच्या लोकांच्या भाषा जाणण्याची गोष्ट कशाला? याप्रमाणें शाळेंतील अभ्यास. न्यायकर्त्यांच्या सभेमध्येंही तिचा धिक्कार होत चालला आहे. इतके दिवस देशभाषेनें वकील लोकांस वरिष्ठ न्यायाधीशासमोरही बोलण्याची परवानगी असे. कांहीं दिवस तर, फक्त देशभाषेचा व्यवहार ठेवणाऱ्या वकिलांनाच तेथें बोलण्याचा हक्क होता. परंतु ते दिवस गेले. इंग्लिश भाषेच्या द्वारें परीक्षा दिल्यावांचून मुनसफ किंवा वकील होऊं न देण्याचे ठराव झाले; व बहुतेकांशीं अमलांतही आले. 'माट्रिक्युलेशन' म्हणजे विद्वन्मंडळसंबंधी इंग्रजी प्रवेश परीक्षा झाल्यावांचून दहा-पंधरा रुपड्यांची कारकुनीची जागाही मिळण्याला अडथळे झाले. जुन्या जुन्या परीक्षा रद्द होऊन नवीन नवीन ठरावाप्रमाणें पुनः परीक्षा द्याव्या लागल्या. हें तर कांहींच नाहीं. देशभाषेचे शब्दही हळू हळू रद्द पडत चालले. अदालत जाऊन 'कोर्ट' झालें, वकील जाऊन 'प्लीडर' झाले, मुनसफ जाऊन 'सबार्डिनेट् जज्ज' झाले, कायदे जाऊन 'आक्ट' झाले. हें तर काय, पण मराठी शाळेचे पंतोजी लोकांचे 'शाळामास्तर' झाले. इतर स्थळीं भाषेकडे दुर्लक्ष झालें म्हणून फार आश्चर्य नाहीं. पण विद्याखात्याकडे असा प्रकार होणें म्हणजे मोठी विलक्षण गोष्ट होय. सर्व लोकांनीं नवीं नवीं पुस्तकें लिहिलेलीं

विद्याखात्याकडे तपासण्याकरितां जात, व त्यांमध्यें असलेले कांहीं गुणदोष बाहेर पडत हें फार चांगलें होतें; तेणेंकरून भाषेची सुधारणा होऊन नवीन पुस्तककर्त्यांना उत्तेजन येई. परंतु ते गुणदोष लोकांना कळण्याची हल्लीं मुष्किल पडते, याचें कारण काय असेल तें समजत नाहीं. याशिवाय आलिकडे विद्याखात्यामध्यें ज्या मराठी भाषेची योजना होत असते, ती तर इतकी अद्वितीय असते कीं केव्हां केव्हां तिजमध्यें अर्थ काय हें समजण्याचीच मोठी पंचाईत पडते. उदाहरणाकरितां, गेल्या महिन्याच्या मराठी 'शाळापत्रका'मध्यें शाळाखात्याच्या अधिकारी लोकांनी जे कित्येक हुकूम छापले आहेत, त्यांतील उतारे घेऊं—

"शाळाखात्याच्या डायरेक्टराचे एज्युकेशन इन्स्पेक्टर यांस."

(पृ. २१०.)

"शाळाखात्याचे डायरेक्टर यांचें असें म्हणणें आहे कीं, सरकारास योग्य दिसल्यास ज्या सरक्युलराचा मसुदा पसंतीकरितां पाठविला आहे, तसें एक सरक्युलर शाळा तपासणाऱ्या कामगारांस पाठवितां येईल. हे कामगार ह्या कामास मामलेदार किंवा डेप्युटी कलेक्टर ह्यांपेक्षां कमी वर्ज आहेत, असें बहुतकरून मानलें आहे."

(पृ. २१३–२१४)

"खालीं लिहिलेला सरकारचा ठराव शाळाखात्यांत झाला आहे."

(पृ. २१४)

"मध्यभागांतील शाळामास्तर व असिस्टंट मास्तर यांस."

"धुळें येथील ट्रेनिंग क्लासांतील पहिल्या वर्षांत जे विषय चालतात–इ."

"खानदेश जिल्ह्यांतील जे मास्तर व असिस्टंट मास्तर ही परीक्षा देऊं इच्छितील, त्यांनीं आपलीं नांवें खानदेशचे डेप्युटी इन्स्पेक्टर यांजकडे ताबडतोब लिहून पाठवावीं आणि त्यांनीं (कोणी ?) धुळें नंबर १ चे शाळेंत फेब्रुवारी महिन्याचे २६ तारखेस अकरा वाजतां हजर व्हावें."

(पृ. २१५)

"...उमेदवार लोकांनीं.. आपले अभ्यासाबद्दल व चांगले वर्तणुकी-बद्दल ज्या शाळेंत पूर्वी दोन वर्षें अभ्यास केला असेल त्या शाळेंतील मास्तरचे सहीचा दाखला हजर केला पाहिजे." इ. इ.

ही भाषा कोणत्या प्रकारची म्हणावी ? अशा प्रकारची भाषा विद्या-खात्याच्या हुकुमांमध्यें, हें पाहून फार दुःख वाटतें. सर्व लोकांची भाषा शुद्ध करणारें जें विद्याखातें त्याची जर अशी दशा, तर मग देशभाषा सांप्रतच्या काळीं चढत्या कळेस येण्याची आशा दूरच, यांत संशय नाहीं. दुःखांत सुख इतकेंच कीं, आलिकडे सर्व इंग्रजी शाळांमध्यें देशभाषांचा अभ्यास अवश्य चालविण्याचा सख्त हुकूम झाला आहे. तेणेंकरून कांहीं बरें होण्याचें चिन्ह दिसतें. तथापि विद्याखात्याचे अधिकारी यांणीं वर दाखविल्या प्रकारची अशुद्ध भाषा व्यवहारांत न आणण्याविषयीं तजवीज ठेवावी अशी त्यांस सूचना आहे.

(फेब्रुवारी १८७९) (पु, ४ अं. ९)

७ : : आपल्या भाषेची स्थिति

देशाची वरिष्ठ स्थिति होण्याला अनेक साधनें लागतात, त्यांमध्यें देशांत सदुद्योग वाढणें हें मुख्य साधन होय. जसजसे देशांतील लोक सदुद्योगी होत जातील, व अनेक कलाकौशल्यें वाढवितील, तसतशी त्या देशाची ऊर्जित दशा येत जाईल यांत संशय नाहीं. तथापि या सर्व गोष्टी सुयंत्रपणें उद्भवण्याला व वृद्धिंगत होत जाण्याला, सामान्यतः सर्व लोकांचीं मनें प्रफुल्लित झालीं पाहिजेत. परंतु अशी गोष्ट घडण्याला मुख्य साधन कोणचें, हें उघड आहे. ज्या देशच्या लोकांची जी जन्मभाषा असेल त्या भाषेंतच अनेक सदाचारोत्तेजक ग्रंथ, वर्तमानपत्रें, कलाकौशल्यशिक्षक, वगैरेंची फारच आवश्यकता आहे. जी देशभाषा नव्हे, तिचा त्या देशामध्यें कितीही

फैलाव झाला, कितीही लोकांनीं जन्माचे जन्म तिच्या अभ्यासामध्यें व प्रसारामध्यें घालविले, तथापि देशभाषेकडेस त्यांणीं लक्ष दिल्यावांचून सर्व व्यर्थ आहे. आपण विद्यालयांमध्यें पुष्कळ शिकलों, पुष्कळ गोष्टींचें पोपट-ज्ञान झालें, "ऑक्सिजनामध्यें हैड्रोजन मिळविला असतां ऑक्सैड ऑव् हैड्रौजन होतो." "आसिड' आणि 'बेस' मिळून क्षार होतो," असें म्हणतां आलें; परंतु 'ऑक्सैड' म्हणजे काय, आणि 'हैड्रोजन' म्हणजे काय, 'आसिड' म्हणजे काय, आणि 'बेस' म्हणजे काय, हें आपल्या बायकां-मुलांच्या मनांत भरवून देतां येत नाहीं. तेव्हां अशा विद्वत्तेपासून देशाचें हित तें कसें होणार? हाच प्रकार इतर सर्व गोष्टींचा; तेव्हां अशी विद्या पुष्कळ जरी वाढली, तरी उपयोगदृष्ट्या ती असून नसून सारखीच होय. बोलण्याचें तात्पर्य इतकेंच, कीं जी भाषा बालपणापासून आपणास अवगत, ज्या भाषेच्या एका शब्दानें दुसऱ्या भाषेच्या दहा शब्दांचें काम होणार, परभाषा शिकण्याला लागणारा जो काळ, त्याच्या दशांशामध्यें जी भाषा चांगली होणार, तिजकडेसच जर दुर्लक्ष केलें, तर सर्व विद्वत्तेचा व्हावा तसा कधींही उपयोग होणार नाहीं. यावरून परभाषा शिकूं नये, असें म्हणण्याचा आमचा भाव असेल, असें कोणीही समजूं नये. आपल्या व परक्यांच्या देशांमध्यें ज्या ज्या अत्युपयुक्त, व देश वैभवास चढविण्यास साधक अशा भाषा असतील, त्यांचा साधेल त्याणें अवश्य अभ्यास करून त्यांपासून आपल्या देशाचें हित करणें अतिशय अवश्य आहे. याकरितां केवळ आपल्याच देशांतील नव्हे, पण सर्व पृथ्वीवर सर्वोत्कृष्ट अशी जी संस्कृत भाषा, तशीच हिंदुस्थानी, बंगाली, कर्णाटकी, इत्यादि भरतखंडस्थ इतर भाषा, व सांप्रतच्या राज्याधिकाऱ्यांची व फार उपयुक्त इंग्लिश भाषा, विद्याकलादिकांच्या वृद्धीस फार उत्तेजन देणाऱ्या फ्रेंच आणि जर्मन वगैरे भाषा, यांचा होईल तितका अवश्य अभ्यास आमच्या लोकांनीं केला पाहिजे. परंतु या सर्वांचा जरी अभ्यास केला, आणि स्वभाषेकडेस जर दुर्लक्ष

केलें, तर त्या सर्व भाषांचा योग्य उपयोग होणारच नाहीं. आणखी, ज्यांना स्वभाषा चांगली येते, त्यांना परभाषा शिकण्यास जितका परिश्रम व काळ लागेल, त्याच्या चौपट परिश्रम व काळ वेचल्याविना, स्वभाषा न येणाऱ्या मनुष्यास परभाषा कधींही चांगली येणार नाहीं. बरें इतकाही श्रम करून व काळ खर्चून शेवटीं स्वभाषा नाहीं ती नाहींच; तेव्हां अशा अयुक्त कृत्यापासून देशाचें वास्तविक हित कांहींच न होतां, श्रम आणि काळ यांचा मात्र व्यर्थ व्यय झाला. यासारखी दुसरी हानि ती कोणची ?

परंतु या स्थितीपासून दुसरी याहूनही मोठी हानि होण्याचा फारच संभव आहे; व तो खरा खोटा पाहण्यास लांब जाण्यास नको. पहा सांप्रत आपल्या राज्यकर्त्यांची जी इंग्रजी भाषा, तिच्या अभ्यासापासून चार पैसे मिळून सांसारिक कृत्यास मदत होऊं लागल्यामुळें, जो तो स्वभाषेचा अनादर करून इंग्रजी शिकूं लागला; यामुळें सरासरी ं ग्रजी जाणणाऱ्यांची संख्या मात्र पुष्कळ झाली; पण त्या विद्येपासून देशाचें वास्तविक कांहींच हित न होतां, बहुतेक लोक निरुद्योगी मात्र झाले, व धंदा नाहींसा झाला. व ज्यांना खरोखरी इंग्रजीचें चांगलें ज्ञान आहे, त्यांतील बहुतेकांना स्वभाषेच्या अज्ञानामुळें, त्या शिकण्याचा कांहींच स्तुत्य उपयोग करितां येत नाहीं, ही मोठी लज्जेची गोष्ट होय. सध्यां बहुधा सर्वत्र अशी स्थिति आहे कीं, मोठमोठ्या विद्वान् म्हणविण्याऱ्यांनाही पाव घटकाभर शुद्ध मराठी भाषेनें अस्खलित, कबहुना तुटक तुटकही संभाषण चालविण्याची मोठीच मारामार. हें तर काय, पण कित्येक लोक असे आढळतात कीं, 'आम्हास मराठी भाषा येत नाहीं,' 'आम्ही हल्लीं मराठी भाषा विसरलों', असें म्हणण्यामध्यें त्यांना मोठी प्रतिष्ठा वाटते ! ही गोष्ट सामान्य मनुष्यांचीच नव्हे, पण जे चारचौघांत पुढारी, विद्वान् म्हणविणारे त्यांचीसुद्धां ही दशा ! यावरून त्यांना देशहिताची वास्तविक किती इच्छा असेल हें उघड दिसतें. अशा प्रकारच्या विद्वानांची जर संख्या सध्यांच्या

प्रमाणानेंच वाढत गेली, तर दहावीस वर्षांच्या आंतच या आपल्या देशास महाराष्ट्र, किंवा मराठी भाषा बोलणाऱ्यांचा देश, हें नांव अगदीं अयोग्य ठरेल यांत संशय नाहीं.

वरील लेखांत सांगितलेली मराठी भाषेची दुर्दशा किंवा मराठी भाषेचा द्वेष सांप्रत कोठवर पोंचला आहे, हें पाहून, मराठी भाषेचा कळवळा बाळगणाऱ्यांना खरोखरी दुःख झाल्यावांचून राहणार नाहीं. तथापि तिची स्थिति लोकांच्या नजरेपुढें आणणें हा आपला धर्म आपण जागविला पाहिजेच. ज्या लोकांना वस्तुतः मराठी भाषेचा कांहीं उपयोग नाहीं, व कोणच्याही प्रकारें अभिमान धरण्यास कारण नाहीं, अशा कित्येक इंग्लिश विद्वानांनीं, व विद्याखात्याच्या इंग्लिश अधिकाऱ्यांनीं देशभाषांची सांप्रतची अति दरिद्र स्थिति पाहून त्यांना उदयास आणण्याकरितां, येथील 'युनिव्हर्सिटि' नामक **विद्यासमाजामध्यें** असा प्रस्ताव काढला, कीं त्या समाजाच्या **प्रवेश**परीक्षेमध्यें, विद्यार्थ्यांचें स्वभाषाज्ञान तपासण्याकरितां त्या भाषेचेही कांहीं प्रश्न घालावे, आणि संस्कृतादि प्राचीन, व इंग्लिशादि अर्वाचीन भाषांमध्यें जरी त्यांची गति असली, तरी स्वभाषेचें चांगलें ज्ञान त्यांना अवश्य असावें. विचार करून पाहिलें असतां, ही सूचना फारच योग्य होती, व ही सर्वमान्य होती तर फारच चांगलें झालें असतें. परंतु देशभाषांचा ज्यांणीं कैवार घ्यावा, व त्यांच्या सुधारणेकरितां ज्यांणीं भांडावें, तेच आमचे कित्येक विद्वान् लोक केवळ दुराग्रहामुळें दोनदा या सूचनांच्या आड येऊन दोनदा त्यांणीं त्या रद्द पाडल्या ! परके लोक आमच्या भाषेची वृद्धि व सुधारणा इच्छीत असतां आमच्या लोकांनाच्च असें दुराग्रहानें ग्रासावें, ही मोठीच दुःखकारक गोष्ट होय. या सूचनांच्या आड येणाऱ्या विद्वानांचें असें म्हणणें आहे म्हणून समजतें, कीं सांप्रतच्या कायद्याप्रमाणें, या परीक्षेमध्यें इंग्रजी व दुसरी कोणतीही एक भाषा त्यांना अवश्य आली पाहिजे; तेव्हां या दुसऱ्या भाषेबद्दल जर त्यांहीं स्वभाषाच घेतली, तर संस्कृतादि प्राचीन भाषा शिकण्याची कोणा-

सही जरूर वाटणार नाहीं. यामुळें त्या प्राचीन भाषांच्या अभ्यासाला धोका बसेल. परंतु हें म्हणणें अगदी निराधार आहे. कारण, सांप्रत "हायस्कूल" नांवाच्या इंग्रजी विद्यालयामध्यें देशभाषा व संस्कृतादि भाषा या दोहोंचाही अभ्यास चालतो; किंबहुना देशभाषांपेक्षां संस्कृतादिकांकडे विशेष लक्ष दिलें जातें; प्रवेशपरीक्षेच्या वेळीं संस्कृतादि गहन भाषांमध्यें परीक्षा उतरणें विशेष भूषणार्ह वाटतें; प्रवेशपरीक्षेपुढील सर्व परीक्षांमध्यें देशभाषांना बंदी असून संस्कृतादिकांचीच आवश्यकता. याप्रमाणें संस्कृतादिकांच्या अभ्यासास तीन प्रकारांनीं उत्तेजन मिळतें, पण या तीन्ही प्रकारांनीं देशभाषांचा मोड होण्यास कारण होतें. 'हायस्कूल' शाळांमध्यें केवळ देशभाषांच्या अभ्यासाकडे तादृश लक्ष पोंचत नाहीं. प्रवेशपरीक्षेनंतर देशभाषांना कोणीं विचारीत नाहीं. संस्कृतादि भाषांशिवाय नुसत्या देशभाषेच्या बळावर 'कॉलेज' विद्यालयामध्यें कोणाचाही प्रवेश होत नाहीं. याशिवाय "हायस्कूल" शाळांमध्यें संस्कृतादि भाषा शिकविण्याकरितां मुद्दाम वेगळेच शिक्षक ठेविले असल्यामुळें, पुढें विद्यार्थ्यांनीं प्रवेशपरीक्षेमध्यें देशभाषा न घेतां संस्कृतादि भाषाच घेतली पाहिजे, असा त्यांचा ही मोठा कटाक्ष असतो. याप्रमाणें चारही प्रकार देशभाषांना प्रतिकूळ व संस्कृतादिकांना अनुकूळ असल्यामुळें देशभाषांची अशी दुर्दशा होत चालली आहे, यांत आश्चर्य नाहीं. अशा प्रसंगीं जर एथील प्रवेशपरीक्षेमध्यें देशभाषेचेंही ज्ञान विद्यार्थ्यांना अवश्य असलें पाहिजे असा कायदा केला, तर संस्कृतादिकांचें उत्तेजन कसें कमी होईल हें आम्हांस समजत नाहीं. कारण देशभाषांचा जो शाळेमध्यें विद्यार्थ्यांचा अभ्यास चालतो, त्याकडेस त्यांहीं थोडेंसें जास्त लक्ष दिल्यानें सर्व अडचणी सहज दूर होणार आहेत.

देशभाषांचे प्रतिपक्षी अशी दुसरी अडचण पुढें आणतात म्हणून समजतें, कीं जर देशभाषा आवश्यक ठरविली गेली, तर ज्यांनीं केवळ देशभाषाच घेतली असेल, त्यांच्यापेक्षां ज्यांनीं संस्कृतादि भाषा घेतली असेल, त्यांची

परीक्षा कठीण जाते; कारण देशभाषा घेणारांना ती एकच भाषा, पण संस्कृतादि घेणारांना ती संस्कृतादि भाषा व आणखी देशभाषा, अशा दोहोंचीही परीक्षा अवश्य द्यावी लागते; यामुळें सर्वांची परीक्षा सारखी न होऊन संस्कृतादि भाषा घेणारांना अन्याय सोसावा लागतो. वरवर पाहिलें असतां हें म्हणणें सयुक्तिक दिसतें.खरें; पण बारीक विचारांतीं या बोलण्यांत ही कांहीं जीव नाहीं असें दिसेल. कारण आपल्या देशभाषेचें ज्ञान हें तर सर्वांना अवश्य असलेंच पाहिजे, त्यावांचून निर्वाहच नाहीं, असें वर दाखविलेंच आहे; त्या पक्षीं जर संस्कृतादि वरिष्ठ भाषांची परीक्षा दिल्याचा मोठेपणा विद्यार्थ्यांना घेणें आहे, तर त्यांणीं देशभाषेच्याही कांहीं सामान्य प्रश्नांचीं उत्तरें देणें सर्वथा अवश्य होय. सांप्रत 'हायस्कूल' शाळांमध्यें देशभाषा शिकणारांनाही संस्कृतादि भाषाही अवश्य शिकावी लागते. व संस्कृतादि शिकणारांनाही देशभाषा ही अवश्य शिकावी लागते—म्हणजे तेथें इंग्लिश भाषा ही एक, देशभाषा ही एक, आणि संस्कृतादि गहन भाषांपैकी कोणती तरी एक, अशा तीन भाषा शिकविल्या जातातच. म्हणून संस्कृतादि शिकणांराना देशभाषेचे ही प्रश्न विचारण्यांत कांहीं अन्याय घडत नाहीं, हें सिद्ध होतें.

एथें अशी एक शंका उत्पन्न होईल, कीं जर 'हायस्कूल' शाळांमध्यें देशभाषेचाही बराच अभ्यास चालतोच आहे, तर पुढें 'युनिव्हर्सिटीनें' (**विद्यासमाजानें**) त्या भाषेची परीक्षा न घेतली म्हणून काय झालें? हें म्हणणें दिसतांना चांगलें दिसतें, परंतु वस्तुगत्या यापासून मोठीच अडचण उत्पन्न होते, असें लक्षांत येईल. कारण, परीक्षेला आवश्यक जे विषय त्यांजकडेसच लक्ष देणें, व अनावश्यकाकडे दुर्लक्ष करणें, हा जरी अयोग्य मार्ग, तरी मनुष्यमात्रांचा कल बहुधा असाच असतो. म्हणून ज्यांहीं पुढील परीक्षेला संस्कृतादि भाषा घेण्याचा निश्चय केला आहे, ते देशभाषांकडे अगदीं लक्ष देत नाहींत, असें स्पष्ट अनुभवास येतें. पण तोच जर आवश्यक विषय ठरविला तर तसें होणार नाहीं. किंबहुना, संस्कृतादि

भाषांचा अभ्यास हा पुढें **विद्यासमाजाच्या** दुसऱ्या तिसऱ्या वगैरे परीक्षांमध्यें, अवश्य धरलेला असल्यामुळें, व अशा प्रसंगीं 'हायस्कूल' शाळांमध्यें मुद्दाम वेगळेच नेमलेल्या संस्कृतादि शिक्षकांचा, त्या भाषांच्या अभ्यासाविषयीं फार जोरा असल्यामुळें त्या भाषांच्या अभ्यासास आपोआप दुहेरी उत्तेजन मिळतच आहे; या कारणानें 'युनिव्हर्सिटी'च्या (**विद्यासमाजाच्या**) **प्रवेश**परीक्षेमध्यें संस्कृतादि भाषा एकीकडेसच ठेवून फक्त देशभाषाच जरी आवश्यक ठरविल्या, तरी कांहीं वाईट होणार नाहीं. पण कदाचित् यापासून सुधारणेचें पाऊल मागें पडलें, असें कित्येक म्हणूं लागतील. वस्तुतः या म्हणण्यामध्येंही कांहींच अर्थ नाहीं; तथापि सुधारणेचें पाऊल मागें पडूं नये, असा जर कोणास खरा अभिमान आहे, तर सुधारणेचें मागें पाऊलच केवळ नव्हे, पण सर्वत्र लज्जास्पद असें जें देशभाषांचें सध्यांचें अज्ञान, तें आपल्या लोकांत नसावें, अशाविषयीं ही आधीं अभिमान धरणें सर्वांना भूषणार्ह व अवश्य आहे.

सुधारणेचें पाऊल मागें पडूं नये, असा जर खरा आग्रह आहे, तर मग **प्रवेश**परीक्षेमध्यें सर्वांनाच इंग्रजी भाषेप्रमाणें **देशभाषा** व **संस्कृतादि** भाषा या दोहोंचें ही ज्ञान अवश्य आहे, असें कां ठरवूं नये? तसें होऊं द्या. म्हणजे कांहींच अन्याय नाहीं, सुधारणेची सुधारणाही झाली, विद्वान् लोकांस देशभाषेकरितां खालीं मान घालण्याचेंही कारण राहाणार नाहीं. या कृत्यापासून, सांप्रत केवळ देशभाषाच घेणारे जे, व जे फक्त कामधंद्याच्या लायकीकरितां म्हणूनच 'म्याट्रिक्युलेशन' **प्रवेशपरीक्षा** देऊं इच्छिणारे, त्यांना अमळ वाईट वाटेल. पण थोडयाच दिवसांत याचा परिणाम चांगला होईल. **विद्यासमाजाला** जर आपलें योग्य वजन ठेवणें आहे, तर चाकरीधंद्याची लायकी वगैरे पोरकट कारणांकडे लक्ष देणें अगदीं अयोग्य होय. तशांत ती परीक्षा दिलेले शेंकडों लोक कामधंद्यावांचून आहेत, तस्मात् हें बोलणें व्यर्थच. कायद्यावांचूनच गेल्या परीक्षेला पावणेतीनशेहें विद्यार्थ्यांनीं संस्कृतादि गहनभाषा घेतली होती; तर

कायद्याचा थोडासा कडकपणा झाल्यास हळू हळू सर्व विद्यार्थी आपोआप तसें करूं लागतील, व देशभाषांची दुर्दशा ही होणार नाहीं. केवढें आश्चर्य, कीं वकिली अगर कायद्यांच्या परीक्षांमध्यें देशभाषा घेऊं नये, असा सरकारनें केलेला नवा ठराव रद्द व्हावा, म्हणून हजारों लोकांचे अर्ज होत आहेत; आणि विद्याखात्यांतील सरकारी अंमलदार आपण होऊन देशभाषांची सुधारणा इच्छीत असतां, आमचे विद्वान् विद्वान् म्हणविणारे लोकच देशभाषांचा धिक्कार करीत आहेत ! तसेंच पांच-सात वर्षांमागचे विद्याखात्याचे अधिकारी, व 'युनिव्हर्सिटी' (**विद्यासमाज**) हे देशभाषांच्या विरुद्ध असतां त्या वेळीं कित्येक ख्रिस्ती 'मिशनरी' (पाद्री) यांणीं देशभाषांची तरफ घेतली होती. पण हल्लीं जेव्हां विद्याखातें देशभाषांच्या तर्फेचें निघालें, तेव्हां 'मिशनरींनीं' उलट बाजू घेतली आहे; सारांश यामध्यें फक्त दुराग्रहाचेंच प्राबल्य दिसतें, दुसरा कांहीं अर्थ नाहीं. याकरितां सर्व लोकांस व मुख्यत्वें ज्यांचें **विद्यासमाजा**मध्यें वजन आहे, त्या सर्वांस अशी विनंति आहे, कीं त्यांनीं पोकळ दुराग्रह सोडावा; व विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांस विनंति आहे, कीं देशभाषांचा उद्धार करण्याची जी त्यांची योग्य सूचना, ती पुनः पुनः **विद्यासमाजा**पुढें आणून ती सर्वमान्य होण्याचा होईल तितका प्रयत्न करण्यास त्यांहीं मागें सरूं नये, व देशभाषा उदयास आणल्यावांचून राहूं नये.

पुस्तक ६ (डिसेंबर १८७३) अंक ७

---

८ : : आपल्या भाषेचें पुढें काय होणार ?

कित्येक गोष्टी अशा आहेत कीं त्यांविषयीं जितका विचार करावा तितका थोडाच. अशां पैकींच कांहीं गोष्टींकडे आज आपण लक्ष देऊं. पुष्कळ लोकांच्या मनामध्यें वारंवार असे प्रश्न येत असतील कीं, काय हो, आमच्या या देशाचें पुढें व्हायचें काय ? आमच्या लोकांचें व्हायचें

काय ? आमच्या धर्माचें व्हायचें काय ? आमच्या भाषांचें व्हायचें काय ? आमच्या रीतीभातींचें, आमच्या धंद्यारोजगारांचें, आमच्या कलाकौशल्याचें, आमच्या बायकामुलांचें आणि दुसऱ्या अनेक गोष्टींचें पुढें व्हायचें काय ? प्रश्न दिसतात लहान, पण यांचीं उत्तरें फार कठीण आहेत. तरी हे प्रश्न फार महत्त्वाचे होत. यांचा विचार प्रत्येक मनुष्यानें करण्याला योग्य आहे, तथापि सर्वच विषय एकदम घेऊन त्यांचा निकाल लावण्याचा प्रयत्न करणें सर्वथा अशक्य. म्हणून सोईसोईप्रमाणें एक एक विषय घेऊं. त्या त्या विषयांच्या महत्त्वाप्रमाणें त्यांचा अनुक्रम लावतां येईल. आणि त्या अनुक्रमाला लक्षून प्रत्येक विषयाची चर्चा झाली तर तितकी विशेष चांगली गोष्ट होईल हें खरें आहे. तथापि तसा क्रम साधणें फारच कठीण म्हणून जसजशी अनुकूलता होईल, तसतसा एकएक विषय म्हणजे पूर्वोक्त प्रश्नांपैकीं एकेक प्रश्न घेऊन त्याची चर्चा करण्याचा प्रयत्न करूं. आज रोजीं जो प्रश्न घ्यावयाचा तो हा,–"आमच्या भाषांचें पुढें व्हायाचें काय ?"

या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वीं, आधीं त्यामध्यें काय काय गोष्टींचा समावेश होतो हें पाहिलें पाहिजे. आमच्या मतें या प्रश्नामध्यें इतक्या गोष्टी येतात. १ आमच्या भाषा म्हणजे काय ? २ त्यांची सध्यांची स्थिति कशी आहे ? ३ त्यांकडे आम्ही दुर्लक्ष केल्यानें काय परिणाम होण्याचा संभव आहे ? आणि ४ त्यांच्यासंबंधानें आपलें प्रत्येकाचें कर्तव्य काय आहे ? इतक्या गोष्टींचा विचार झाला, म्हणजे मुख्य प्रश्नाचें उत्तर सहज निघण्याजोगें होईल.

१. वस्तुतः आमच्या भाषा म्हणजे भरतखंडांतील सर्व भाषा असा अर्थ निष्पन्न होतो. तथापि तितका विस्तृत अर्थ आज आम्ही घेत नाहीं. तर इतकाच घेतों कीं, आमची महाराष्ट्र देशाची जी शुद्ध मराठी भाषा ती, आणि 'मराठी भाषेच्या पोटभाषा' हें नांव ज्या भाषांना लावितां येईल, अशा कोंकणी, गोमंतकी, खानदेशी, वऱ्हाडी, इत्यादि ज्या

शुद्धाशुद्ध भाषा, त्या आमच्या भाषा असा एथें अर्थ घेतला आहे. इतक्यांच्यासंबंधानेंच जर यथातथ विचार झाला, तर तोच कांहीं थोड्याशा फेरफारानें महाराष्ट्राच्या बाहेरच्या भाषांनाही लावितां येईल. अथवा ज्यांना तो विषय फार निकट संबंधाचा असेल, ते लोक त्याकडे लक्ष देतील.

२. आमच्या भाषांची सांप्रतची स्थिति कशी काय आहे ? आपली जी खुद्द म्हणजे शुद्ध मराठी भाषा, तिची स्थिति पाहिली, तर सांप्रत पुष्कळ गोष्टींनीं फार चांगली आहे, असें म्हणण्याला कांहीं अडचण दिसत नाहीं. कारण, तिचें शुद्ध स्वरूप म्हणजे अमुक, असें आज पुष्कळ वर्षां-पासून ठरून गेलें आहे, ही मोठी गोष्ट. तिजमध्यें बहुतेक विषयांवर लहानमोठे ग्रंथ बरेच झाले आहेत, व दिवसेंदिवस अधिकाधिक होत आहेत. तिजमध्यें वर्तमानपत्रें, आणि नियतकालिक पुस्तकेंही बरींच निघत आहेत. तिजमध्यें ज्या ज्या गोष्टींचें साहित्य उणें आहे, तें तें भरून काढण्याविषयीं विद्वान् लोक बराच प्रयत्न करीत आहेत. विश्वविद्यालयामधून त्या भाषेला बाहेर लावून दिलें असल्यामुळें तिच्या प्रसाराला मोठेंच विघ्न आलें ही गोष्ट खरी, तथापि लौकरच तिचा त्या विद्यामंदिरांत पुनः प्रवेश होण्याचा संभव दिसत आहे ही आनंदाची गोष्ट होय.

मराठी भाषेच्या ज्या पोटभाषा आहेत, त्यांची स्थिति पाहिली तर ती मात्र चांगली नाहीं असें म्हणणें प्राप्त होईल. खुद्द मराठीमध्येंच जे अशुद्ध प्रकार आहेत, त्यांनाही तूर्त या पोटभाषांमध्यें गृहीत करण्यास कांहीं बाध दिसत नाहीं. या सर्व भाषांमध्यें सर्वमान्य किंवा शुद्ध प्रकार म्हणजे अमुक असें मुळींच म्हणतां येत नाहीं. ज्या त्या प्रांतांतील किंबहुना ज्या त्या गांवांतील लोक आपापली पोटभाषा तीच शुद्ध, तीच प्रौढ, तीच सर्वमान्य, असा आग्रह धरून केव्हां केव्हां भांडतात, परंतु त्या आग्रहांत कांहीं अर्थ आहे असें म्हणवत नाहीं. कारण कीं, पोकळ भांडणाखेरीज त्या त्या भाषेचा कोणत्याही उपयुक्त गोष्टीमध्यें ते

काय ? आमच्या धर्माचें व्हायचें काय ? आमच्या भाषांचें व्हायचें काय ? आमच्या रीतीभातींचें, आमच्या धंद्यारोजगारांचें, आमच्या कलाकौशल्याचें, आमच्या बायकामुलांचें आणि दुसऱ्या अनेक गोष्टींचें पुढें व्हायचें काय ? प्रश्न दिसतात लहान, पण यांचीं उत्तरें फार कठीण आहेत. तरी हे प्रश्न फार महत्त्वाचे होत. यांचा विचार प्रत्येक मनुष्यानें करण्याला योग्य आहे, तथापि सर्वच विषय एकदम घेऊन त्यांचा निकाल लावण्याचा प्रयत्न करणें सर्वथा अशक्य. म्हणून सोईसोईप्रमाणें एक एक विषय घेऊं. त्या त्या विषयांच्या महत्त्वाप्रमाणें त्यांचा अनुक्रम लावतां येईल. आणि त्या अनुक्रमाला लक्षून प्रत्येक विषयाची चर्चा झाली तर तितकी विशेष चांगली गोष्ट होईल हें खरें आहे. तथापि तसा क्रम साधणें फारच कठीण म्हणून जसजशी अनुकूलता होईल, तसतसा एकएक विषय म्हणजे पूर्वोक्त प्रश्नांपैकीं एकेक प्रश्न घेऊन त्याची चर्चा करण्याचा प्रयत्न करूं. आज रोजीं जो प्रश्न घ्यावयाचा तो हा,–"आमच्या भाषांचें पुढें व्हायाचें काय ?"

या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी, आधीं त्यामध्यें काय काय गोष्टींचा समावेश होतो हें पाहिलें पाहिजे. आमच्या मतें या प्रश्नामध्यें इतक्या गोष्टी येतात. १ आमच्या भाषा म्हणजे काय ? २ त्यांची सध्यांची स्थिति कशी आहे ? ३ त्यांकडे आम्ही दुर्लक्ष केल्यानें काय परिणाम होण्याचा संभव आहे ? आणि ४ त्यांच्यासंबंधानें आपलें प्रत्येकाचें कर्तव्य काय आहे ? इतक्या गोष्टींचा विचार झाला, म्हणजे मुख्य प्रश्नाचें उत्तर सहज निघण्याजोगें होईल.

१. वस्तुतः आमच्या भाषा म्हणजे भरतखंडांतील सर्व भाषा असा अर्थ निष्पन्न होतो. तथापि तितका विस्तृत अर्थ आज आम्ही घेत नाहीं. तर इतकाच घेतों कीं, आमची महाराष्ट्र देशाची जी शुद्ध मराठी भाषा ती, आणि 'मराठी भाषेच्या पोटभाषा' हें नांव ज्या भाषांना लावितां येईल, अशा कोंकणी, गोमंतकी, खानदेशी, वऱ्हाडी, इत्यादि ज्या

शुद्धाशुद्ध भाषा, त्या आमच्या भाषा असा एथें अर्थ घेतला आहे. इतक्यांच्यासंबंधानेंच जर यथातथ विचार झाला, तर तोच कांहीं थोड्याशा फेरफारानें महाराष्ट्राच्या बाहेरच्या भाषांनाही लावितां येईल. अथवा ज्यांना तो विषय फार निकट संबंधाचा असेल, ते लोक त्याकडे लक्ष देतील.

२. आमच्या भाषांची सांप्रतची स्थिति कशी काय आहे ? आपली जी खुद्द म्हणजे शुद्ध मराठी भाषा, तिची स्थिति पाहिली, तर सांप्रत पुष्कळ गोष्टींनीं फार चांगली आहे, असें म्हणण्याला कांहीं अडचण दिसत नाहीं. कारण, तिचें शुद्ध स्वरूप म्हणजे अमुक, असें आज पुष्कळ वर्षांपासून ठरून गेलें आहे, ही मोठी गोष्ट. तिजमध्यें बहुतेक विषयांवर लहानमोठे ग्रंथ बरेच झाले आहेत, व दिवसेंदिवस अधिकाधिक होत आहेत. तिजमध्यें वर्तमानपत्रें, आणि नियतकालिक पुस्तकेंही बरींच निघत आहेत. तिजमध्यें ज्या ज्या गोष्टींचें साहित्य उणें आहे, तें तें भरून काढण्याविषयीं विद्वान् लोक बराच प्रयत्न करीत आहेत. विश्वविद्यालयामधून त्या भाषेला बाहेर लावून दिलें असल्यामुळें तिच्या प्रसाराला मोठेंच विघ्न आलें ही गोष्ट खरी, तथापि लौकरच तिचा त्या विद्यामंदिरांत पुनः प्रवेश होण्याचा संभव दिसत आहे ही आनंदाची गोष्ट होय.

मराठी भाषेच्या ज्या पोटभाषा आहेत, त्यांची स्थिति पाहिली तर ती मात्र चांगली नाहीं असें म्हणणें प्राप्त होईल. खुद्द मराठीमध्येंच जे अशुद्ध प्रकार आहेत, त्यांनाही तूर्त या पोटभाषांमध्यें गृहीत करण्यास कांहीं बाध दिसत नाहीं. या सर्व भाषांमध्यें सर्वमान्य किंवा शुद्ध प्रकार म्हणजे अमुक असें मुळींच म्हणतां येत नाहीं. ज्या त्या प्रांतांतील किंबहुना ज्या त्या गांवांतील लोक आपापली पोटभाषा तीच शुद्ध, तीच प्रौढ, तीच सर्वमान्य, असा आग्रह धरून केव्हां केव्हां भांडतात, परंतु त्या आग्रहांत कांहीं अर्थ आहे असें म्हणवत नाहीं. कारण कीं, पोकळ भांडणाखेरीज त्या त्या भाषेचा कोणत्याही उपयुक्त गोष्टीमध्यें ते

अभिमान बाळगतात असें म्हणतां येत नाहीं. त्या भाषा केवळ बोलण्याच्या कामापुरत्याच. कागदावर कधीं त्या भाषेंतला शब्द पडत नाहीं; तेव्हां पुस्तकाचें नांव तें कशाला? केवळ कौतुकार्थ, किंवा थट्टेसाठीं, किंवा नमुन्यासाठीं क्वचित् कोणी पांच चार ओळी लिहिल्या असल्या तर! त्यांपलीकडे कांहीं नाहीं. या भाषा बोलणाऱ्या लोकांचा सर्व पत्रव्यवहार पाहिला, तर भिन्न भाषेच्या द्वारें. मराठी देशामध्यें मराठीनें, कानडी व मलबार देशामध्यें त्या त्या भाषेनें होतो. त्यांना स्वतंत्र भाषा हें नांव देणें फार कठीण आहे, व दिवसेंदिवस त्यांचें असलें नसलें स्वातंत्र्य तेंही जात चाललें आहे.

३. आतां तिसरी गोष्ट. आमच्या भाषांकडे आम्ही दुर्लक्ष केल्यानें काय परिणाम होणार आहे? प्रथमतः मुख्य मराठी भाषेविषयीं. मराठी भाषेची स्थिति पुष्कळ चांगली आहे असें वर म्हटलें आहे, तथापि तो तिच्या स्थितीचा चांगुलपणा उणा न होतां, दिवसेंदिवस जर वाढत चालला तरच तिची स्थिति नीट राहील. नाहीं तर एकदा जर का तिचें पाऊल मागें हटलें, तर सध्यांच्या वाढत्या इंग्रजी भाषेपुढें तिचें कांहीं चालणार नाहीं. मग ती मागें पडलीच! पोटभाषा तर असून नसल्यासारख्याच आहेत. त्यांच्यामुळें मुख्य मराठी भाषेच्या शुद्धतेला मात्र बट्टा लागत आहे. इतकाच त्यांपासून लाभ. दुसरें कांहीं नाहीं. या पोटभाषांची अशी ही दीन स्थिति फार शोचनीय आहे यांत संशय नाहीं. म्हणून या भाषांकडे जर सध्यां लक्ष न दिलें, तर दिवसेंदिवस त्यांची स्थिति अधिकाधिक बिघडत जाणार आणि तसल्या अव्यवस्थित भाषांच्या संसर्गामुळें शुद्ध मराठी भाषेलाही त्या त्या प्रमाणानें त्रास होत जाणार असें उघड दिसतें.

४. आतां शेवटचा प्रश्न. 'त्या भाषांच्यासंबंधानें आपलें प्रत्येकाचें कर्तव्य काय?' शुद्ध मराठीच्या संबंधानें आमचें मत असें आहे कीं, जर मराठी भाषेची विशेष सुधारणा झाली पाहिजे, तर त्या सुधारणेचा पहिला

मार्ग हा—आपले लौकिक, धार्मिक, राजकीय, यांत्रिक, व्यावहारिक तसेंच अर्वाचीन नानाविध शास्त्रसंबंधीं जे अनेक विषय, त्यांचीं पुस्तकें, व्याख्यानें, निबंध, आणि ओतप्रोत चर्चा हीं शुद्ध मराठी भाषेनें करण्याचा उद्योग दिवसेंदिवस आपण वाढविला पाहिजे.

असा एक प्रश्न वारंवार निघत असतो कीं, पुस्तकें करावीं, अमुक लिहावें, तमुक लिहावें, पण वाचतो कोण ? हा प्रश्न खरा आहे, पण त्याचें उत्तर सोपें आहे.

कित्येक पुस्तकें किंवा लेख असे असतात कीं, त्यांना कोणीं विचारीतही नाहीं, किंवा त्यांकडे कोणीं ढुंकूनही पाहात नाहीं. परंतु कित्येक असे असतात कीं, ज्याला पुस्तक वाचण्याची बिलकुल हौस नाहीं, तशाही मनुष्याच्या कानीं त्याचा कांहीं थोडासा भाग पडला, तर त्याला तें संपूर्ण वाचण्याची पराकाष्ठेची इच्छा होते. याचें कारण काय ? तर विषयाची गोडी, आणि त्यांत पुनः लिहिण्याचेंही चातुर्य. “प्रयोजनमनुद्दिश्य मंदोऽपि न प्रवर्तते.” कोणतीही गोष्ट मनुष्याच्या अंतःकरणाला जाऊन झोंबल्यावांचून तिजकडे त्याचें पूर्ण लक्ष लागायाचें नाहीं. आणि ती तशी झोंबली, म्हणजे आपोआप तिजकडे तो लक्ष देऊं लागतो. ज्या लेखापासून कांहीं उपयोग नाहीं, किंवा कांहीं नवीन प्राप्त होत नाहीं, त्याकडे कोणीही लक्ष देत नाहीं. याकरितां प्रत्येक लेखकर्त्यानें ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे, कीं ज्यापासून कांहीं तरी नवीन कल्पना, किंवा जुन्या कल्पनांनाच नवें स्वरूप उत्पन्न होईल, असे चणचणीत लेख असल्यावांचून त्यांच्या लेखाला कोणीही विचारणार नाहीं. शिळें खाणें किती दिवस चालेल ? इंग्रजी वगैरे भाषांमध्यें ज्यांना नवें नवें काहीं तरी प्रतिदिनीं मिळतें त्यांना शिळ्या मराठी लेखांची गोडी कशी लागावी ? यासाठीं, जुन्या शिळ्या कल्पना, आणि जुन्या शिळ्या गोष्टी, जशांच्या तशा पुढें न आणतां, नव्या नव्या कल्पना, किंवा निदान पक्षीं जुन्या शिळ्या कल्पनांनाच ताजी चणचणीत फोडणी देऊन जर त्या ताज्या केल्या, तर त्यांची गोडी ग्राह–

कांना सहज लागेल. पण ही गोष्टही लक्षांत ठेविली पाहिजे कीं, कल्पना नवीन असोत किंवा जुन्या असोत, त्यांचा उपयोग काय हें स्पष्ट असलें पाहिजे. नाहीं तर त्यांपासून इष्ट हेतु कधींही साध्य होणार नाहीं. आतां हीच गोष्ट कां घ्या ना, कीं " मराठी भाषेचा आणि मराठी ग्रंथांचा उपयोग काय ? हा इतका खटाटोप पाहिजे आहे कशाला ? आहे इंग्रजी भाषा आयती, ती घ्यावी, तिजमध्यें पुस्तकें आहेत, लेख आहेत, सर्व कांहीं आहे." हें वाक्य केवळ काल्पनिक आहे असें नाहीं. पुष्कळ लोकांची अशीच समजूत आहे. कांहीं दिवसांमागें एका विद्वान् गृहस्थानें या मुंबईतील एका प्रसिद्ध सभेमध्यें व्याख्यान दिलें होतें, कीं देशी भाषांचा कांहीं उपयोग नाहीं, त्यांच्या जागीं इंग्रजी भाषाच सर्वत्र चालू होईल तर बरें, इत्यादि. परंतु आमचें म्हणणें तर असें आहे कीं, ज्या देशांतील लोकांना स्वतःचें घरदार नाहीं तर नाहीं; पण स्वतांची भाषाही नाहीं, त्यांचें जिणें व्यर्थ होय ! ज्यांची देशभाषा गेली, त्यांच्या हातून कांहीं मोठें कृत्य व्हावयाचें नाहीं. आलिकडे मुंबईतील कित्येक पारसी गृहस्थांनीं, गेल्या संपूर्ण दहा शतकांमध्यें आपली म्हणून अंगीकारिलेली जी गुजराथी भाषा, ती सोडून देऊन सर्वत्र घरीं दारीं इंग्रजी भाषाच चालू करावी असा निश्चय केला आहे असें समजतें. परंतु ही गोष्ट सर्व प्रकारें दुश्चिन्हसूचक होय, असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. आम्ही तर असें समजतों, कीं ज्यांनीं देशाची भाषा सोडली, त्यांचा त्या देशाच्या संबंधाचा सर्व अभिमान गेला, ते त्या देशाला परके झाले, त्यांच्या हातून त्या देशाच्या कल्याणाची कांहीं मोठी गोष्ट होणार नाहीं. त्यांची दृष्टि बहिरंग झाली, बाहेरच्या देशाकडे लागली, ते देशांतून दूर जातील तर वाईट नाहीं. आमच्या देशामध्यें जे क्रिश्चन लोक आहेत, त्यांचीही भाषेच्या संबंधानें मोठी शोचनीय स्थिति झाली आहे. बहुतेक क्रिश्चन लोकांना, आणि त्यांत विशेषेंकरून रोमन क्याथोलिक मताच्या क्रिश्चन लोकांना देशी भाषांचें ज्ञान तांत्रिकच असल्या-

मुळें, त्यांनीं पोर्तुगीज किंवा इंग्लिश भाषा आपली करण्याचा यत्न चालविला आहे. परंतु त्यांचीही स्थिति हीच. त्यांना या देशाचा किंवा लोकांचा अभिमान जर कांहीं थोडासा असेल, तर तो या कृत्यामुळें दिवसेंदिवस नाहींसा होत जाणार; त्यांच्याही हातून या देशाच्या खऱ्या कल्याणाची गोष्ट कांहीं होणार नाहीं. ते आपण होऊन आपणांला इतक्यांतच परके मानूं लागले आहेत. ज्यांच्या पन्नास पिढ्यांमध्यें परदेशीय रक्ताचा लेशही खरोखरी नसेल, आणि या गोष्टीमुळें ज्यांना, आपण एथले पूर्ण देशी लोक म्हणविण्याचा मोठा अभिमान वाटावा त्यांना त्या ‘ देशी लोक ’ या शब्दाची लाज वाटूं लागली आहे; आणि कोणी म्हणतो, मी पोर्टुगीस, कोणी म्हणतो मी इंग्रज ! तेव्हां अशा मनुष्याला या देशाचा आणि या देशांतील लोकांचा कितीसा अभिमान उत्पन्न होणार हें उघड दिसत आहे. देशांतील सर्व लोक एका वळणांत राहण्याला भाषा हें एक मोठें साधन आहे. तें जर नाहीं, तर तितकें त्यांत न्यून पडलें. भाषा-भेदापासून मतभेद होतो, आणि मतभेदापासून द्वेषभाव उत्पन्न होण्याला साहाय्य होतें, इत्यादि अनेक कारणांवरून पाहतां, देशभाषा जी आहे तिचा अभ्यास, आणि तिची सुधारणा, आणि व्यवहारामध्यें तिचा होईल तितका उपयोग करण्याविषयीं प्रत्येकानें झटलें पाहिजे. इंग्रजी वगैरे फार उपयोगी ज्या परभाषा आहेत, त्यांचा अभ्यास करणें हेंही फार अवश्य आहे खरें, तथापि यावरून देषी भाषेच्या अभ्यासाचें महत्त्व उणें होतें असें नाहीं. कोणताही विचार, कोणतीही सुधारणा, जर देशांतील लहान-थोर सर्व स्त्रीपुरुषांना समजली पाहिजे, जर त्याविषयीं प्रत्येक व्यक्तीनें उद्योग करण्याला झटलें पाहिजे, तर देशभाषेसारखें त्या कृत्याच्या उत्तेज-नाला दुसरें साधनच नाहीं. परभाषा तुम्ही कितीही चांगल्या शिका, तथापि त्यांपासून, हा जो आबालवृद्धांच्या अंतःकरणावर होणारा इष्ट परि-णाम, तो कधींही साध्य होऊं शकणार नाहीं. यावरून परभाषांचा आम्ही तिरस्कार करितों असें बिलकुल कोणी समजूं नये. त्यांच्या अभ्यासाची

योग्यता जी आहे ती आहेच; ती कमी होत नाहीं. तथापि परभाषांची योग्यता कितीही मोठी असली, तरी स्वदेशभाषेच्या अभ्यासाचें महत्त्व तेणेंकरून लेशमात्रही कमी होत नाहीं, इतकेंच आमचें म्हणणें आहे. तरी पुनः म्हणतों, कीं जर स्वदेशभाषा, आणि परभाषा यांमध्येंच निवड करण्याचा प्रसंग आला, तर आधीं स्वदेशभाषा आणि मग परभाषा हेंच आमचें तत्त्व आहे. कारण कीं, ज्यांची देशभाषा मोडली, त्यांचे हात-पाय मोडले, त्यांचीं तोंडें बंद झालीं. यापेक्षां आणखी वाईट परिणाम तो कोणता ? सर्व वाईट परिणाम यांत आले. तेव्हां देशभाषेच्या त्यागाचा जर हा सर्वथा अनिष्ट परिणाम, तर उलट पक्षीं त्याच देशभाषेच्या अभ्यासाचा काय उपयोग, हें पुनः पुनः विचार (विशद ?) करून सांगण्याचें कारण राहत नाहीं. तेव्हां स्वदेशभाषेच्या संबंधानें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म म्हटलें म्हणजे, हें आहे कीं जितकी ती भाषा शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न करवेल तितका अवश्य केला पाहिजे. ज्यांच्या व्यवहारामध्यें तिचें कोणत्याही प्रकारें अशुद्ध रूप येत असेल त्यांनीं तें नीट लक्षांत आणून, त्याच्या जागीं शुद्ध रूप योजण्याचा झटून प्रयत्न केला पाहिजे. सांप्रत मुंबईमध्यें एका मोठ्या सभेमध्यें असा एक फार उत्तम नियम केलेला आहे, कीं त्या सभेच्या कोणीही सभासदानें मिश्रित भाषा बोलूं नये. म्हणजे अर्धें मराठी आणि अर्धें इंग्रजी असें करूं नये. निदान पक्षीं **एकाच वाक्यामध्यें तरी दोन भाषांतील शब्द मिश्रित करूं नयेत.** हा फार उपयोगी नियम जर सर्व लोक स्वीकारतील, तर फार उत्तम परिणाम होईल, यांत कांहीं संशय नाहीं. याशिवाय, मराठी भाषेच्या संबंधें मुख्य कृत्य म्हटलें म्हणजे इतकेंच, कीं प्रत्येकानें आपणा-कडून होईल तितका तिचा अभ्यास चालू ठेवावा. आपले अनेक विचार शुद्ध मराठी भाषेनें बोलून दाखविण्याचा आणि लिहून ठेवण्याचा अभ्यास ठेवावा. ऐतिहासिक गोष्टी, सृष्टिज्ञानसंबंधीं विचार, देशस्थिति, लोकस्थिति, इत्यादि अनेक विषयांना अनुलक्षून प्रसंगोपात्त भाषण करावें, लेख लिहावे, ऐकावे; आपण लिहिलेले व इतरांनीं लिहिलेले वाचावे,

आणि आपल्या सामर्थ्याप्रमाणें अशा गोष्टींना उत्तेजन द्यावें. यांमध्यें सर्व आलें. इतकें जर प्रत्येक मनुष्यानें लक्षांत ठेविलें तर पुष्कळ झालें.

आतां मराठी भाषेच्या आसपास ज्या पोटभाषा आहेत, त्यांच्यासंबंधानें कांहीं लिहिणें अवश्य आहे. त्या भाषांची स्थिति फार वाईट आहे, असें वर म्हटलेंच आहे. परंतु त्या भाषांची स्थिति सुधारण्याला आतां करावें काय, हा प्रश्न येऊन उभा राहिला. असें जर म्हटलें, कीं शुद्ध मराठी भाषेचा अभिमान धरून तिची सुधारणा करण्याचा जो उपाय वर सांगितला आहे, तोच उपाय त्या भाषांच्यासंबंधानें चालविला, तर काय अडचण येईल ? बरें, पाहूं तर खरें. तोच उपाय करावयाचा म्हटलें म्हणजे, काय काय बरें केलें पाहिजे ? तर प्रथमतः प्रत्येक भाषेचें एकेक व्याकरण, एकेक कोश, आणि बरींच वाचनपुस्तकें, इतकें आधीं तयार केलें पाहिजे.

शाळांमध्यें तीं शिकविलीं पाहिजेत; इतिहासादि अनेक विषयांचे ग्रंथ केले पाहिजेत; वर्तमानपत्रें वगैरे सर्व प्रकार त्या त्या भाषेंत झाला पाहिजे. परंतु हें सर्व होऊं शकणारें आहे काय ? प्रांतोप्रांतीं, किंबहुना गांवोगांवीं अशा भाषा वेगळ्या वेगळ्या आहेत. त्यांत पुनः ब्राह्मणादि जातींच्या वेगळ्या, शूद्रादि जातींच्या वेगळ्या. तेव्हां अशा निरनिराळ्या भाषा देशामध्यें किती करायाच्या ? परंतु असेंही कोणी म्हणूं शकेल कीं, कितीही होतना, त्यांचें काय ? ज्याला त्याला आपापल्या भाषेचा अभिमान नको का ? पण हीही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं आपापल्या भाषेचा अभिमान जर पूर्वीपासून सर्वांनीं ठेविला असता, तर इतक्या वेगवेगळ्या भाषा झाल्याच नसत्या. अभिमान सुटल्यामुळेंच ही स्थिति झाली आहे. परंतु असा पूर्वपक्ष होईल कीं, गेली ती गोष्ट गेली; पण इतःपर आम्ही आमच्या भाषांचा अभिमान धरूं. आम्ही म्हणूं, फार उत्तम गोष्ट आहे, पण जर असें करूं शकाल तर. आह्मी तर खात्रीनें सांगूं शकतों, कीं ही गोष्ट अशक्य आहे. कां अशक्य ? तर प्रथमतः ही व्यवस्था उत्पन्न करण्याला

आणि निरंतर चालू ठेवण्याला द्रव्याचा किती भयंकर व्यय करावा लागेल हें पाहिलें पाहिजे. इतकें द्रव्य कोणीही काढूं इच्छिणार नाहीं. आग्रहास पडून कोणी मातबर मनुष्य या कृत्याला लागेल तितका पैसा द्यावयाला उभा राहला, तरी त्याच्यानेंही हें कृत्य तडीस नेववणार नाहीं, आणि कदाचित् सिद्धीस नेलें, तरी असें म्हणणें प्राप्त आहे कीं तें केवळ वेडेपणाचें काम होईल. यासाठीं तें द्रव्य याहून चांगल्या अशा दुसऱ्या एकाद्या कृत्याला खर्चावें हें चांगलें. कारण कीं, या कृत्यापासून पैशाचा पैसा फुकट जाऊन, कांहीं लाभ न होतां, हानि मात्र मोठी होईल. क्षणभर असें समजूं कीं गांवोगांव वेगवेगळ्या भाषा कायम झाल्या, त्यांचीं वेगवेगळीं पुस्तकें सिद्ध झालीं, परंतु असल्या संकुचित भाषांपासून केवढा मोठा तोटा होणार आहे तो पाहिला पाहिजे. मराठीसारख्या स्थायिक झालेल्या प्रौढ भाषेमध्यें जें आज विद्येचें भांडार वाढत चाललें आहे, तें या लोकांना सर्वथा निरुपयोगी होईल. तें प्राप्त करून घ्यायाचें असेल तर मराठीचा अभ्यास वेगळा केलाच पाहिजे. या गांवचें वर्तमानपत्र त्या गांवीं व त्या गांवचें या गांवीं कोणाला समजावयाचें नाहीं. अर्थात् तें निरुपयोगी. एका गांवच्या लोकांनीं दुसऱ्या गांवच्या लोकांस पत्र पाठवायाचें तर प्रश्न एका भाषेंत आणि उत्तर दुसऱ्या भाषेंत असें झालेंच पाहिजे. कारण अभिमानाची गोष्ट पडली. वीस वर्षांमागें युरोपखंडामध्यें फ्रान्स आणि जर्मनी या दोन राज्यांमध्यें जेव्हां मोठा युद्धसंग्राम होऊन फ्रान्साचा मोड झाला, तेव्हां जर्मनी देशाच्या बादशाहानें आपल्या जयाचें आनंदकारक वर्तमान रुशिया देशाच्या बादशाहाला लिहून कळविलें. युरोपखंडामध्यें निरनिराळ्या राज्यांचा परस्पर पत्रव्यवहार पूर्वींपासून फ्रेंच भाषेनें चालत आलेला आहे. परंतु जर्मन लोकांना असा गर्व झाला कीं, ज्यापक्षीं आपण फ्रेंचांचा पराभव केला, त्यापक्षीं त्यांची भाषा आतां आपणाला कशाला ? आमचीच भाषा आम्ही चोहोंकडे चालवूं. अशा अभिमानानें त्यांनीं आपलें पत्र जर्मन भाषेनें लिहून पाठविलें. परंतु जें उत्तर आलें तें पाहतात तों फ्रेंच

भाषेंतही नाहीं, आणि जर्मन भाषेंतही नाहीं, तर रशियन भाषेंत ! तेव्हां राव शुद्धीवर आले, आणि दुसरें पत्र पाठवितांना पूर्ववत् फ्रेंच भाषेचा त्यांनीं आश्रय केला. तेव्हां सर्व गोष्टी पूर्ववत् ठीक चालू झाल्या. अभिमानाची गोष्ट म्हटली म्हणजे तेथें असाच परिणाम व्हायाचा. मराठी लोकांना जर कोंकणी लोकांनीं किंवा गोमंतकी लोकांनीं पत्र पाठवायाचें, तर सध्यांप्रमाणें मराठी भाषेनें पत्र लिहिलें असतां कमीपणा घेतल्यासारखें होणार. स्वतःच्या भाषेनें पत्र लिहावें, तर तें वाचण्याची खटपट करतो कोण ? तेव्हां असा वेडा अभिमान कामाचा नाहीं. शुद्ध मराठीचा आश्रय केल्यावांचून कांहीं चांगला परिणाम व्हायाचा नाहीं. पण असें जर करावें, तर अभिमान राहिला कोठें ? आणि मराठी भाषेच्यासंबंधानें लिहितांना जी इतकी देशाभिमानाची तरफ ताणली आहे, तिचा काय उपयोग ? पण असें नव्हे. मराठीच्या संबंधानें जें कांहीं लिहिलें आहे, तें योग्य आहे, परंतु ती गोष्ट एथें लागू होत नाहीं. तें कसें म्हणाल तर पाहा. मराठीचा आणि परभाषांचा जो परस्पर संबंध आहे तो वेगळा आणि तिचा आणि तिच्या पोटभाषांचा जो संबंध आहे तो वेगळा. या पोटभाषा जरी मराठीहून एका प्रकारें भिन्न आहेत, तथापि त्यांपैकीं बहुतेक मराठीपासूनच अपभ्रंशरूपानें उत्पन्न झाल्या आहेत, किंवा फारच भेद म्हटला, तर मराठीचें मूळ आणि त्यांतील कित्येकींचें मूळ तरी एकच आहे.यामुळें त्यांच्यामध्यें आणि मराठीमध्यें फार मोठासा भेद नाहीं. कांहीं विशेष शब्द आणि कांहीं विभक्तिरूपें शिवायकरून पाहिलें असतां, एकंदर भाषाशैलीच्या किंवा शब्दसंग्रहाच्या दृष्टीनें फारसा भेद नाहीं. लिंगभेदादिकांमध्यें-सुद्धां फार सादृश्य आहे. बोलण्याचा जो झोंक किंवा सूर त्यामध्यें मात्र बरेंच अंतर पडतें. अशा कारणांवरून पाहतां, मराठीला सोडून स्वतंत्ररूपानें राहण्याची त्यांच्या अंगीं योग्यताही नाहीं, आणि त्यांना ती गोष्ट शोभणारही नाहीं. सध्यां कागदोपत्रीं तर त्यांच्या ऐवजीं मराठी भाषा घेतलीच आहे. तेव्हां आमचें म्हणणें इतकेंच कीं, अपभ्रंशरूपानें असोत किंवा कोणत्याही

कारणानें असोत, मराठीच्या पोटभाषा म्हणून जितक्या आहेत, त्यांतील कोणतीही भाषा बोलणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें ही गोष्ट पूर्णपणें ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, मराठी भाषेपासून आपली भाषा वेगळी नाहीं, वेगळेपणा फार फार मानिला तरी एका पिढीच्या आंतला आहे. त्यापक्षीं त्यांची सुधारणा करणें व त्यांचा अभिमान धरणें म्हणजे इतकेंच कीं, त्या भाषांमध्यें आणि मराठीमध्यें जो जो म्हणून भेद दृष्टीस पडतो, तो तो सोडून देऊन त्या भाषांनाच शुद्ध मराठीचें स्वरूप द्यावें. कोणी म्हणेल कीं त्या भाषा निखालस टाकून देऊन मराठी भाषाच घ्या असें स्पष्ट कां नाहीं म्हणत? संकोचित भाषण कां करतां? तर हें म्हणणें योग्य नाहीं. कारण या पोटभाषा जर मराठीहून अगदीं भिन्न असत्या, तर तेथें त्या टाका आणि ही नवी म्हणजे मराठी भाषा घ्या, हें म्हणणें शोभतें. परंतु जर त्या वेगळ्या नाहींतच, तर त्या टाका, आणि ही घ्या म्हणणें लागतच नाहीं. आणि जरी त्या वेगळ्या मानिल्या तरी त्या टाका असें म्हणण्याचें आतां कारणच राहिलेलें नाहीं; कागदोपत्रीं व पुस्तकादि लेखांमध्यें त्यांचा कधींही आदर झालेला नाहीं; त्यांना मुळींच सोडून देऊन तुम्ही मराठीचें कधींच ग्रहण केलें आहे. तेव्हां त्यांचा वेगळेपणा तो राहिला आहे कोठें? यास्तव पोकळ आग्रहास न पडतां, जसें लेखांमध्यें मराठीचें निर्विवाद ग्रहण केलें आहे, तसें बोलण्यामध्येंही शुद्ध मराठी भाषा योजण्याचा सर्व महाराष्ट्रजनांनीं, म्हणजे सध्यां मराठीच्या पोटभाषा बोलणारांनींही निश्चय करावा, आणि त्याप्रमाणें चालण्याची रीत एकदम सुरू करावी. हीच त्या पोटभाषांची सुधारणा. दुसरा मार्ग नाहीं. त्या पोटभाषांना मान नाहीं, त्या अशुद्ध भाषा मानल्या जातात, इतकेंच नव्हे, पण त्या ओंगळ अप्रतिष्ठित मानल्या जातात. यामुळें त्या बोलणारांना चारचौघांमध्यें मान खालीं घालावी लागते. स्वतःच्या घरीं जरी असें न घडलें, तरी आपापल्या ठिकाणाबाहेर ते गेले, म्हणजे अभ्यास नसल्यामुळें त्यांना शुद्ध बोलतां येत नाहीं, आणि मग फटफजीतीला पारावार नाहींसा होतो. यास्तव मराठीवांचून गत्यंतर नाहीं,

आणि जर गत्यंतर नाहीं, तर एकदम तिचा स्वीकार करण्यासारखें दुसरें शहाणपण नाहीं. शुद्ध भाषा बोलतां येणें हा सभ्य मनुष्याचा एक अलंकार आहे, आणि सुशिक्षितपणाचें एक अंग आहे. आणि याच्या उलट जी स्थिति ती निःसंशय लांछनास्पद आहे, ही गोष्ट प्रत्येक मनुष्यानें ध्यानांत ठेविली पाहिजे. अभिमानादि सर्व गोष्टींचा पूर्वींच निकाल केला आहे. सारांश शुद्ध मराठीचा खरा अभिमान धरणें, हाच पोटभाषांचा अभिमान होय, दुसरा नाहीं.

ही सर्व गोष्ट मान्य केली, तरी एक अडचण राहते. ती कोणती? तर ज्यांना शुद्ध मराठी भाषा बोलतां येत नाहीं, मुळींच मराठी बोलण्याचा अभ्यास नाहीं, आणि आसपास शुद्ध बोलणारेही कोणी सांपडत नाहींत, तर त्यांनीं कसें करावें? या प्रश्नावरून इतकें तरी म्हणतां येतें कीं, त्यांना शुद्ध भाषा शिकण्याची इच्छा आहे, असें गृहीत करण्यास बाध नाहीं. म्हणून त्यांना इतकेंच सांगणें योग्य आहे, कीं परकी लोकांना जरी मराठी भाषा कठीण वाटण्यासारखी कदाचित् असली, तरी या पोटभाषांतून कोणतीही एकादी पोटभाषा ज्याची जन्मभाषा आहे, त्याला शुद्ध मराठी भाषा शिकणें फार अवघड नाहीं. इतकेंच कीं, त्यानें श्रम घेऊन थोडासा अभ्यास केला पाहिजे. मराठी पुस्तकें आतां पुष्कळ झालीं आहेत, तीं वाचण्याचा थोडथोडा त्यानें परिपाठ ठेवावा, म्हणजे सहजच त्याची त्यामध्यें गति होत जाईल. आमची इच्छा अशी आहे कीं या कामीं आम्हांकडून होईल तितकें आम्हीं साहाय्य करावें. म्हणून सर्व विद्वान् लोकांस आमची विनंती आहे कीं, ज्या ज्या प्रांतीं मराठी भाषेमध्यें जे जे अशुद्ध प्रकार आढळतील, ते ते त्यांनीं कृपा करून आम्हांस कळवावे. म्हणजे ते प्रकार आणि त्यासंबंधीं आमची स्वतःची माहितीही जी असेल, ती आम्ही मोठया आनंदानें प्रसिद्ध करूं. ज्यांना लिहितां येत नाहीं त्यांना, ज्यांना येतें त्यांनीं जर मदत केली, तर क्रमशः सर्व गोष्टी सिद्धीस जातील. अगदीं निरक्षर आणि अशिक्षित लोकांमध्यें या गोष्टींचा एकाएकीं

प्रसार होणें अंमळ कठीण आहे असें प्रथमतः वाटतें खरें. परंतु केवळ शुद्ध भाषा ऐकल्यानेंही केव्हां केव्हां अशुद्ध भाषा शुद्ध होण्याच्या मार्गास लागते. पण इतकें कशाला ? ज्यांना लिहितां वाचतां येतें, त्यांच्यापुरतीच जरी आज ही सुधारणा झाली, तरी तें मोठेंच काम झालें असें म्हटलें पाहिजे. हळूहळू पुढें क्रम सुरू ठेविल्यानें सर्व नीट होत जाईल.

कित्येक वृद्ध लोकांनाही शुद्ध भाषा शिकण्याची फार हौस असते, आणि तेही मोठ्या अगत्यानें शिकतात. शिकविणारा कोणी मिळत नसला तर मात्र त्यांचा उपाय चालत नाहीं. परंतु जर कदाचित् वृद्धांना, आणि कित्येक तरुणांनाही हा उद्योग आवडला नाहीं, तर त्यांत काय झालें ? ज्यांना ज्यांना इच्छा आहे, त्यांनीं तो स्वतः अभ्यास करावा, आणि इतरांनाही त्यापासून होणारे फायदे दाखवून द्यावे. जे ऐकतील ते ऐकोत. ज्यांना ती गोष्ट आवडेल ते ती घेतील. इतर नाहीं घेणार; इतकेंच; दुसरें काय ? पण एकपक्षीं वृद्ध लोकांना या कामीं फार तसदी देण्याचें प्रयोजनच नाहीं; कारण आपोआप मागें पडत जाणारे ते लोक. ह्मणून जेव्हां त्यांच्या ठायीं इच्छा आहे असें दृष्टीस पडेल, तेव्हां अवश्य त्यांना त्या कामीं मदत करावी; परंतु जेथें इच्छेचा अभाव किंवा कंटाळा दिसेल, तेथें आग्रह चालविण्याच्या भरीस पडणें अयोग्य होय. नवीन संततीला मात्र मुळापासून शुद्धच भाषा शिकविण्याचा प्रघात होईल तितका अगत्यानें ठेवावा. एकदां तो चालू झाला ह्मणजे मग त्यामध्यें कांहीं अडचण येणार नाहीं. या कामीं बायकामंडळीचें मोठें साहाय्य पाहिजे आहे. त्यांना आपण शुद्धच भाषा बोलावी अशी नैसर्गिक इच्छा असते. नवीन नवीन सुंदर सुंदर पोषाखांची आणि नवीन नवीन चांगल्या चांगल्या दागिन्यांची जशी त्यांना मोठी हौस, तशीच आपणांस चांगली शुद्ध भाषा बोलतां यावी अशी त्यांना फार हौस असते. परंतु स्त्रिया म्हटल्या म्हणजे स्वभावतः अंमळ लज्जाशील, म्हणून त्यांना हा नवीन प्रकार घेण्याला पुरुषांनींच आरंभीं उत्तेजन देऊन, अडल्या प्रसंगीं होईल तितकें साहाय्य केलें पाहिजे. एकदा तो

संकोचरूपी अडथळा दूर झाला, म्हणजे मग पुढें कांहीं अडचण येणार नाहीं. आणि भाषा शिकण्याच्या कामीं पुरुषांपेक्षां स्त्रियांच्या अंगीं अधिक सामर्थ्य आहे असें सहज दृष्टीस पडेल.

कित्येकांची अशी एक अडचण असते, कीं ते म्हणतात आम्हांला मुळापासून आपल्या मंडळीमध्यें आमच्या जन्मभाषेहून वेगळी भाषा बोलण्याचा अभ्यास नसल्यामुळें तशा मंडळीमध्यें मराठी भाषा बोलण्याला मोठा संकोच वाटतो, इतकेंच नव्हे, तर तो नवा प्रकार केवळ थट्टेसारखा वाटतो, आणि मनमोकळें पोटभर त्या भाषेनें बोलण्याला उल्हास येत नाहीं, कसेंसेंच वाटतें, आणि मनाचें समाधान होत नाहीं, त्याला काय करावें ? पण कोणतीही नवी रीत चालू केली म्हणजे प्रथमतः तसें वाटावयाचेंच. इंग्रजी भाषा शिकणारांना ही गोष्ट माहीत आहे कीं आरंभीं कांहीं दिवसपर्यंत त्या भाषेनें बोलण्याला फार शरम वाटते. चुका झाल्याबद्दल किंवा नवा प्रकार घेतल्याबद्दल कित्येक लोक थट्टाही करितात. परंतु हें सर्व आठ पंधरा दिवस किंवा फार तर महिना दोन महिने चालतें. पुढें मग कांहीं नाहीं. तोच प्रकार एथें व्हावयाचा. आपापसामध्यें इंग्रजीसारख्या अगदीं भिन्न भाषेनें जर आम्हीं निःशंकपणें बोलतों, तर शुद्ध मराठीनें बोलण्यालाच आम्हांला संकोच वाटावा, आणि त्या संकोचाला भिऊन आम्ही तो उद्योग सोडून द्यावा, हीच मोठी लज्जेची आणि नादानपणाची गोष्ट आहे. सारांश, असल्या पोरकट शंकांमध्यें कांहीं अर्थ नाहीं हेंच सत्य.

आणखी असा एक प्रश्न आहे कीं, कानडा जिल्ह्यामध्यें आणि पलीकडे दक्षिणेस समुद्रतीरीं कोची प्रांतीं जे कोंकणी भाषा बोलणारे सहस्रावधि लोक राहत आहेत त्यांनीं काय करावें ? त्यांच्या देशीं मराठी भाषा नाहीं. देशभाषा म्हटली म्हणजे कानडी, मल्याळी, किंवा मलबारी. त्यांच्या कोंकणी भाषेची स्थिति पाहिली, तर मालवणी किंवा गोमंतकीपेक्षांही

वाईट. त्यांनीं जर ती भाषा सोडावी, तर मग घरची भाषा मराठी करावी, किंवा ती ती देशभाषाच घरीं चालवावी ? हा प्रश्न बिकट दिसतो खरा, परंतु याचा निकाल सरळ आहे. कारण त्या गोष्टीचा आम्ही आमच्या मतें कसाही निर्णय केला, तरी तो त्या लोकांच्या कानीं जाऊन पडण्याचीच प्रथमतः मोठी भ्रांति, तेव्हां त्याप्रमाणें वागणें किंवा न वागणें ही दूरची गोष्ट होय. परंतु जर हा लेख मूळरूपानें किंवा निदान भाषांतर-रूपानें तरी त्यांच्या पाहण्यांत येईल आणि जर त्यांना हा विषय विचार करण्यासारखा आहे इतकें वाटूं लागेल, तर आमची अशी खात्री आहे कीं, त्यांना जो योग्य मार्ग तो सहज मिळेल. तो असा—देशभाषा ज्या आहेत, त्यांचा तर ते सध्या अभ्यास करीतच आहेत. त्याप्रमाणेंच इतउत्तर पुढेंही तो अभ्यास त्यांनीं चालविला पाहिजे. कारण देशभाषेवांचून गत्यंतर नाहीं. परंतु ती भाषा सहज होते, शाळांमध्यें तिचा अभ्यास चालतो, कामकाजामध्यें वहिवाटीनें ती येते. परंतु घरीं बोलायाची जी भाषा तिच्या जागीं त्यांनीं ती ती देशी भाषा घ्यावी अशी आम्हीं कधींही संमति देणार नाहीं. त्यांना स्वभाषा सोडून देशी भाषाच घरीं चालवा अशी कोणी शिफारस करील, तर आम्हांला ती गोष्ट मान्य होणार नाहीं. बेहत्तर त्यांची ती अशुद्ध कोंकणी भाषा आहे तशीच पाहिजे तर चालू ठेवावी, आणि बाहेरच्या व्यवहारामध्यें मात्र देशी भाषा चालवावी. परंतु कोणत्याही सबबेनें आपल्या घरच्या भाषेमध्यें त्यांनीं असा बिघाड उत्पन्न होऊं देऊं नये. तसा बिघाड झाल्यास नफ्यापेक्षां नुकसान फार मोठें होईल. प्रथमतः कदाचित् तें लक्षांत येणार नाहीं; परंतु थोडासा विचार करून पाहिला तर आमच्या म्हणण्याचा खरेपणा सहज ध्यानांत येईल. आम्हीं म्हणतों, नफ्यापेक्षां नुकसान फार होईल; फार फार नुकसान होईल; त्या नुकसानाची कल्पनासुद्धां कितीएकांच्या लक्षामध्यें एकाएकीं येणार नाहीं. इतकें मोठें नुकसान होईल. असें तें नुकसान कोणचें, असा सहज प्रश्न होणार. आमच्या म्हणण्याचा खरेखोटेपणा

पहा. त्यांची जी ही सध्यांची कोंकणी भाषा आहे, हा त्यांचा सहस्रावधि वर्षांचा जागता इतिहास होय. जरी ते शेंकडों वर्षें परदेशामध्यें जाऊन राहिले आहेत, तरी ते कोण ? तर सर्व भरतखंडामध्यें ज्यांपासून वेदादि विद्यांचा प्रसार झाला, ज्यांपासून देशांत मुळीं ज्ञानांकुर पसरला, त्या आर्यांचे हे अव्यवहित वंशज आहेत असें या त्यांच्या इतिहासावरून सहज समजतें. हे मूळचे उत्तरदेशीय असल्यामुळें महाराष्ट्रादि सांप्रत काळच्या आर्य लोकांशीं जितका त्यांचा मूळचा निकट सहोदरसंबंध आहे, तितक्याचा शतांशही त्यांचा द्रविडांशीं मूळचा संबंध नाहीं. यावरून आम्ही द्रविडांचा तिरस्कार करितों असें कोणींही समजूं नये. परंतु आमचें म्हणणें इतकेंच कीं, सद्भाग्यानें म्हणा, किंवा, भाग्याभाग्याची गोष्ट मनांत न आणिली तरी, सहजगत्या म्हणा, ज्यांना मूळचें आर्यत्व आहे, त्यांनीं आपल्या आर्यत्वाची मोठी खूण जी आपली भाषा ती आपण होऊन टाकून देणें ही गोष्ट फार अयोग्य होय. त्यांनीं मराठी भाषाच घेतली पाहिजे. त्यांना मराठी भाषा अवघड जाणार नाहीं हें वर सांगितलेंच आहे. येणेंकरून दुसरा एक मोठा चांगला परिणाम होईल. तो असा—देशभाषा जी द्रविडजातीय आहे, तिचें लौकिक कामकाजाच्या संबंधानें त्यांनीं ग्रहण केलें असल्यामुळें, आर्यांचा आणि द्रविडांचा स्नेहभाव कायमचा कायम राहून, आर्यांचें आर्यत्वही कायम राहील. जर त्यांनीं घरींही द्रवीडजातीय भाषा घेतली, तर त्यांचा जो अनादिसिद्ध उत्तरदेशीय लोकांशीं निकट संबंध आहे तो, आणि त्यांचें उत्तरदेशीयत्व हीं दोन्ही एकदम तुटून जातील, आणि भाषेच्या संबंधानें आम्हाला ते केवळ परकीय बनतील ही गोष्ट आम्हांला तर इष्ट नाहीं. जे म्हणत असतील कीं, त्यांत काय आहे ? दुहेरी भाषा कशाला पहिजेत ? एक देशी भाषा आहे तीच सर्वत्र कायम केली म्हणजे झालें. त्यांनीं या गोष्टीचा नीट विचार करावा, आणि मग हवें तसें करावें. परंतु आम्हांला तर ती गोष्ट पसंत नाहीं, असें आम्ही पुनः म्हणतों. ज्यांना, महाराष्ट्र देशाशीं आणि महाराष्ट्र लोकांशीं आपलें कांहीं कर्तव्य नाहीं असें

वाटत असेल, त्यांनीं मराठी भाषेशीं असलेला आपला प्राचीन संबंध पाहिजे तर बेलाशक तोडून टाकावा. परंतु त्यांनीं इतकें खचित समजावें, कीं तसें करणें ही त्यांची मोठी चूक होईल, आणि एकदां हातून गेलेली गोष्ट पुनः सुधरून घेणें फार कठीण, किंबहुना अशक्य होऊन जाईल.

याप्रमाणें गृहीत विषयाच्या संबंधाच्या चारही गोष्टींचें विवेचन केलें. यावरून आतां आपल्या भाषांचें पुढें काय व्हायाचें, याचा निश्चय जरी नव्हे, तरी सामान्यतः झोंक सहज लक्षांत येईल.

आमच्या भाषांच्या सुधारणेला अनुकूल गोष्टी कोणत्या आणि प्रतिकूल कोणत्या, हेंही आमच्या मतें आम्हीं स्पष्ट केलें आहे. अनुकूल गोष्टी जर दिवसेंदिवस प्रबल होत जातील, तर आमच्या भाषांची भरभराट होत जाईल, नाहीं तर त्यांचा मोड होत जाईल हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. तथापि मराठी भाषेचे अभिमानी सर्व लोक या सर्व गोष्टींचा चांगला विचार करितील, आणि तिची योग्य सुधारणा आणि योग्य भरभराट करण्याकडे आपलें पूर्ण लक्ष देतील, अशी पूर्ण आशा धरून, हा विषय आतां आटोपता घेतों.

या विषयांच्या संबंधानें ज्या कोणास कांहीं सुचवायाचें असेल, किंवा आपलें मत प्रसिद्ध करावयाचें असेल, त्यांनीं तें आम्हांकडे लिहून पाठविल्यास, अनुकूल किंवा प्रतिकूल कसेंही असो, त्याला मोठ्या संतोषानें या पुस्तकांत स्थळ दिलें जाईल.

पु. २१ वें, अंक ९-१०, सप्टेंबर-आक्टोबर १८८९

---

९ : : मराठी कविता

आपल्या मराठी कवितेमध्यें कांहीं वैलक्षण्य आहे असें कोणास वाटतें काय ? म्हणजे संस्कृत, हिंदुस्थानी, इंग्रजी, लाटीन, इत्यादि भाषांतील कवितेहून आपल्या मराठी कवितेमध्यें कांहीं भिन्न प्रकार कोणास कांहीं

दिसतो कीं नाहीं ? असें वाटतें कीं कित्येकांस तो दिसत असेल. तथापि अद्यापि त्याचा कोणी पुरतेपणीं शोध केला आहे असें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. बरें, तो भिन्नपणा–किंवा त्यास उणेपणा म्हणण्यासही प्रतिबंध नाहीं –असा हा उणेपणा आहे तरी कोणत्या गोष्टींत ? मराठी कवितेंत छंदांची वाण आहे काय ? नाहीं. तिजमध्यें संस्कृतांतील अनेक, व त्यांशिवाय केवळ प्राकृतासच लागू असणारीं पुष्कळ छंदें वृत्तें पुरून उरण्याजोगीं भरपूर आहेत. यावरून छंदाविषयीं नव्हे. तर काय कवितेंतील विषयाविषयीं, किंवा संविधानकाविषयीं, किंवा तिजमधील प्रौढ–अप्रौढ विचारांविषयीं; कशाविषयीं आम्ही बोलत आहों ? वास्तविक पाहतां या उक्त विषयावर व्याख्यान करण्याजोगीं पुष्कळ स्थळें आहेत; तथापि सांप्रतचा हा विषय नव्हे. मराठी कवितेमध्यें याशिवाय कांहीं वैलक्षण्य आहे. सर्व भाषांमध्यें गद्य व पद्य यांची रचना वेगळी असते; म्हणजे गद्या-मध्यें जसा शब्दांचा अनुक्रम बहुधा कर्ता, कर्म, आणि क्रियापद, व त्यांचीं त्यांचीं विशेषणें त्यांच्या त्यांच्या मागें, असा असतो, तसा अनुक्रम छंदाच्या अनुरोधानें कवितेमध्ये सर्वदा राहूं शकत नाहीं. मागचे शब्द पुढें व पुढचे मागें करावे लागतात. ज्यापक्षीं ही गोष्ट सर्व भाषांमध्यें आढळते, त्यापक्षीं ती मराठींतही असली म्हणून कांहीं विलक्षण मानण्याचें कारण नाहीं. परंतु असें पहा, कीं संस्कृतांतील किंवा इंग्रजींतील कविता जशी न बदलतां नाटकादिकांमध्यें संवादाच्या उपयोगी पडते, तशी मराठींतील पडत नाहीं. यामुळें संस्कृतांतील कालिदास, भवभूति इत्यादि पंडितांनीं किंवा इंग्रजींतील शेक्सपियर इत्यादिकांनीं रचलेलीं नाटकें यांचा जसा रंगभूमीवर प्रयोग करून दाखवितां येतो, तसा मराठींत जीं कित्येक गद्यपद्यात्मक नाटकें—तीं आणखी बाहेरची नव्हेत, तर त्याच प्राचीन संस्कृत नाटकांचीं जीं भाषांतरें जाहलीं आहेत, त्यांचा प्रयोग करतां येत नाहीं, हें उघड आहे. आणखी असें समजूं, कीं एक संस्कृत, एक इंग्रजी, आणि एक मराठी, अशीं तीन पद्यें घेऊन त्यांतील शब्दांचीं रूपें न बद-

लतां फक्त ते आपण गद्याच्या क्रमानें मांडीत गेलों, तर संस्कृत व इंग्रजी जाणणारे जे आहेत त्यांस असें आढळेल कीं, तें वाक्य भाषणाच्या रीतीनें जसें असावें तसें आहे. परंतु मराठीविषयीं पाहूं लागलों तर तशी गोष्ट आढळत नाहीं. फक्त शब्दांचा क्रम बदलूनच एथें काम होत नाहीं. त्यांच्या रूपांमध्यें जेव्हां बराच फेरफार करावा, तेव्हां ती भाषा व्यवहारी भाषणाला योग्य होते. तसेंच, उलट पक्षीं जरी पाहिलें, तरी ही त्याप्रमाणेंच. पहा; संस्कृत गद्यामध्यें जे शब्द व जीं रूपें येतात त्यांचा प्रयोग पद्यांत करितां येतो. इंग्रजीमध्यें ही गद्यांतील शब्द व रूपें न बदलतां पद्यांत चालतात, परंतु मराठींत तसें करितां येत नाहीं, हें पुरतें लक्षांत येण्याकरितां उदाहरण घेऊन पाहूं;—

"धरुनिया नररूप कृतांजळी
चरण वंदुनिया हरिचे जळीं
हळु हळू प्रभुसी अति संकटें
वदतसे शिशु जे रिति धाकटें ॥ १ ॥

—वामन

हाच श्लोक गद्य रूपानें लिहिला तर असा होईल—

"जळीं नररूप धरुनिया, कृतांजळी (होऊन) हरीचे चरण वंदुनिया, प्रभुसी अति संकटें, जे रिति धाकटें शिशु, [ते रिति] हळुहळू वदतसे."

याप्रमाणें जर आज आपण बोलूं लागलों, तर ती भाषा मोठी विलक्षण दिसेल, आणि अर्थ समजण्याचीही मारामार होऊन जाईल. याकरितां तेंच वाक्य आपल्या व्यवहारी भाषेसारखें होण्यास त्यामध्यें कितका फेरफार करावा लागतो तो पहा.—

" नररूप धरून, कृतांजळी होऊन हरीचे चरण वंदून, प्रभूस अतिसंकटानें, ज्या रीतीनें धाकटें मूल बोलतें त्या रीतीनें हळुहळू बोलतो. " उलट पक्षीं, म्हणजे व्यवहारामध्यें जे शब्द व जीं रूपें आहेत, तीं कवितेंत

घालतां येत नाहींत, हें सिद्ध करण्याची कांहीं गरज नाहीं. कारण तसें जर असतें तर आपल्या भाषेंत इतके श्लोक व इतक्या आर्या आहेत, त्यांमध्यें शब्दांचीं फक्त व्यावहारिक रूपें मात्र योजून केलेले किती बरें श्लोक आणि किती आर्या आढळल्या ? परंतु तसें नाहीं. मोरोपंताच्या किंवा वामन पंडिताच्या सर्व ग्रंथांमध्यें, तशीं पद्यें मिळण्याची मोठीच मारामार पडेल यांत संदेह नाहीं व इतकेंही असून कांहीं मिळालींच, तरी तीं छंदोभंग झाल्यावांचून संभाषणांत उपयोगी पडणार नाहींत. यावरून पाहतां अशा प्रकारचें न्यून असणें ही गोष्ट मराठी कवितेंत विलक्षण नव्हे काय ?

यावरून सहज प्रश्न उत्पन्न होतो, कीं, असें हें वैलक्षण्य कशापासून उत्पन्न जाहलें असावें ?

असें दिसेल कीं, यास मुख्यत्वें दोन कारणें आहेत. त्यांतील पहिलें कारण इतर भाषांस ही कांहीं अंशीं लागू आहे, तथापि तें आपल्या भाषेस फारच लागू आहे. छंद जमविण्याकरितां ऱ्हस्वाच्या जागीं दीर्घ, आणि दीर्घांच्या जागीं ऱ्हस्व करणें, तसेंच जे शब्द व जीं रूपें सांप्रत प्रचारांत नाहींत त्यांचा प्रयोग, यांच्या योगानें सांप्रतच्या भाषेमध्यें आणि कवितेच्या भाषेमध्यें बराच फेर पडतो. आतां दुसरें कारण जें आहे तें पुरतें लक्षांत भरण्यास मराठी भाषेंतील लेखनाची आणि संभाषणाची पद्धति अमळ लक्षांत आणिली पाहिजे.

मराठीमध्यें जे आज साठ-पासष्ट हजार शब्द आहेत, त्यांच्या कोशा-मध्यें जर पाहिलें, तर किती बरें व्यंजनान्त शब्द मिळतील ? सर्व मिळून कदाचित् पांच-सात होतील हें कोणीही सांगेल. यावरूनच पाहिलें तर असें वाटेल कीं, आपल्या भाषेंत व्यंजनान्त शब्द मुळींच येत नाहींत. संस्कृतामधून जे कित्येक येतात तेही बहुशः व्यंजनान्त राहत नाहींत; म्हणजे, पुढील व्यंजन निखालस निघून तरी जातें, किंवा त्यापुढें बहुशः

अकार लागतो. पहा, पयस्, जगत्, मनस्, इत्यादिकांतील शेवटच्या व्यंजनांचा लोप होऊन पय, जग, मन इत्यादि शब्द मराठींत उतरले आहेत. तसेंच विद्वान, भगवान इत्यादि शब्द विद्वान् भगवान् इत्यादिकांपुढें अकार लागून जाहले आहेत. अशी जरी गोष्ट आहे, तथापि जे बहुतेक अकारांत शब्द आहेत, ते जर लेखामध्यें किंवा संभाषणामध्यें आले, तर त्यांच्या अंतीं स्वरांचा उच्चार होतो किंवा व्यंजनाचा होतो बरें ? बहुतेकांच्या अवलोकनांत आलें असेल कीं, जर असे शब्द कवितेंत आले तर मात्र त्यांचा जशास तसा उच्चार होतो. परंतु गद्यवाचनामध्यें, किंवा संभाषणामध्यें, अंत अकाराचा लोप होऊन ते शब्द व्यंजनान्त आहेत असा भास झाल्यावांचून राहत नाहीं. अशी गोष्ट बहुधा शेवटीं जोडाक्षर नसतां होत असते. आणखी अशा प्रसंगीं म्हणजे, शेवटच्या अकाराचा लोप जाहलेला असतां त्यामागें जर ऱ्हस्व अक्षर असलें तर त्याचा उच्चार लांबट होत असतो. परंतु ही गोष्टही कवितेमध्यें आढळत नाहीं. याप्रमाणें निरनिराळीं कारणें एकत्र होऊन कवितेच्या ध्वनीमध्यें शब्दांचा व मात्रांचा फेर पडून शेवटीं कवितेची भाषा अगदीं भिन्न होऊन संभाषणाला केवळ निरुपयोगी अशी होऊन गेली आहे. या गोष्टीचा खरेपणा पाहण्याकरितां एखादें उदाहरण घेऊं.

।। ऽ। ।ऽ। ।।।
नळ नीळ सुषेण पनस
।। ।।। ।ऽ। ऽ।ऽ।। ऽ
गज गवय गवाक्ष गंधमादन ही
ऽऽ ऽ।।ऽऽ
आले जांबवदादि
।।।।ऽ ऽ।ऽ। ।ऽ। ।ऽ
स्वबळभरें कापवीति समस्त मही ॥ १ ॥

मोरोपंत

। । । ऽ । । ऽ । । ऽ । ऽ
धरुनिया नररूप कृतांजळी
। । । ऽ । । ऽ । । ऽ । ऽ
चरण वंदुनिया हरिचे जळीं ॥
। । । ऽ । । ऽ । । ऽ । ऽ
हळु हळू प्रभुसी अति संकटें
। । । ऽ । । ऽ । । ऽ । ऽ
वदतसे शिशु जेरिति धाकटें ॥ १ ॥
वामन

यांत ज्यावर । ही खूण केली आहे, तें लघु अक्षर, व ऽ ही खूण केली आहे तें गुरु अक्षर. आतां हींच कवितेंतील वाक्यें संभाषणाला योग्य करणें जाहल्यास मात्रांचा कसा फेर होतो पहा.—

ऽ ऽ । ऽ । ऽ ऽ । ऽ
नळ नीळ सुषेण पनस गज गवय
। ऽ । ऽ ऽ । । ऽ । ऽ ऽ
ग वा क्ष ही जां ब व दा दि आले, (आणि)
। । । । ऽ ऽ । ऽ । । ऽ ऽ । । ऽ ऽ ऽ
स्वबळ भरानें समस्त मही कांपविते झाले
तसेंच

। ऽ । । ऽ । ऽ । ऽ । ऽ
जळीं नररूप धरून, कृतांजळी (होऊन)
। ऽ ऽ । ऽ ऽ ऽ । ऽ । । ऽ । ऽ ऽ
हरीचे चरण वंदून, प्रभूस अतिसंकटानें,
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ । । ऽ ऽ
ज्या रीतीनें धाकटें शिशु बोलतें (त्या
। ऽ । ऽ ऽ ऽ ऽ ऽ
रीतीनें) हळू हळू बोलत आहे.

यांत ज्यांवर खुणा नाहींत त्यांचा उच्चार व्यंजनासारखा होतो.

यावरून कवितेच्या ध्वनीमध्यें आणि व्यवहारी भाषणाच्या ध्वनीमध्यें किती फेर आहे हें सहज दृष्टोत्पत्तीस येईल.

या प्रकारचें हें न्यून आपल्या भाषेंतून काढून टाकून व्यवहारी भाषा व कवितेंतील भाषा एक करण्याचा यत्न करणें अवश्य आहे असें कोणीही म्हणेल. परंतु तें कृत्य कोणत्या रीतीनें तडीस जाईल ? कवितेमध्यें जी भाषा आहे ती व्यवहारांत आणावी; किंवा व्यवहारांत जसे आपण बोलतों त्याप्रमाणें कवितेंत शब्द घालावे ? पहिली युक्ति तर केवळ वेडेपणाची; कारण ती कधींही तडीस जाणार नाहीं, व तसा प्रयत्न करणाराचा उलट उपहास मात्र होईल. आतां दुसरी.––कवितेमध्यें जुने शब्द व जुनीं रूपें नसल्यानें संभाषणामध्यें योजना करण्यास ती विशेष पात्र होते, हें खरें आहे; तथापि कित्येक प्रसंगीं जुने शब्द व क्वचित् जुनीं रूपें यांचा प्रयोग झाल्यानें, शुष्कपणा जाऊन कविता विशेष मनोहर जाहल्यावांचून राहणार नाहीं. परंतु इतक्यानेंच संपलें नाहीं; मुख्य अडचण ती अद्यापि आहेच; म्हणजे, भाषणामध्यें जसे आपण अकारांत शब्द व्यंजनांतांसारखे उच्चारितों, तसेच कवितेमध्यें ते व्यंजनांतासारिखे योजतां येतील कीं काय ? परंतु हें अमळ कठीण दिसतें. कारण जरी हे अकारांत शब्द व्यंजनांतांसारखे भासतात, तरी ते केवळ व्यंजनांत होतात असेंही म्हणतां येत नाहीं; कित्येक ठिकाणीं तर स्वरांत किंवा व्यंजनांत उच्चार आहे याची भ्रांति पडते. याकरितां त्याचा निश्चय करणें हें कठीण आहे. बरें, ते निखालस व्यंजनांत जरी झाले, तरी, आणखी एक दुसरी अडचण येऊन उभी राहतेच. ती अशी कीं, व्यंजनांत अक्षरें लिहिण्याची कटकट, व ती कटकट सोसूनही हजारों शब्द मूळच्या स्वरूपाहून विशेष विशेष भिन्न होऊं लागतील,ही मोठी हानि होण्याची भीति आहे. बरें, ही हानि चुकविण्याकरितां, असें जर म्हटलें, कीं जसे आपण गद्यामध्यें अकारांत शब्द असतांही ते व्यंजनांत असल्याप्रमाणें वाचतों, तसेच ते कवितेमध्यें ही अकारांत लिहून, व्यंजनांताप्रमाणें समजून वृत्ताची रचना केली व वाचनामध्येंही तसेच

मानिले, तर ती दूर होईल किंवा नाहीं ? कांहीं अंशीं होईल असें दिसतें. तथापि बहुतेकांस ही कल्पना विलक्षण वाटल्यावांचून राहणार नाहीं. कदाचित् अप्रशस्तही वाटेल.तसेंच या युक्तीनें भाषेमध्यें गुरु अक्षरांचा समुदाय फार वाढून वृत्तरचनेमध्यें त्यांचा विनिमय करणें वरेंच कठीण पडेल असें दिसतें.

अजूनपर्यंत हा विषय कोणी काढिला नव्हता. ही याची प्रथमचीच खेप आहे. याकरितां विशेष कांहीं न बोलतां व कोणतीच सिद्धता न करितां तूर्त विद्वज्जनांच्या विचारावर हा ठेवितों.

पु. १ लें, अंक ७, जानेवारी १८६८

विद्यालय

काव्यविचार

बहुतकरून सर्व पदार्थांमध्यें चांगला आणि वाईट हीं विशेषणें लागण्याजोगीं असतात. आणि तीं विशेषणें लावणाऱ्यांच्या योग्यतेप्रमाणें, त्या पदार्थांचीं लक्षणें, व बऱ्यावाइटाच्या मर्यादा ठरविलेल्या असतात; तेणेंकरून तशा प्रकारच्या अन्य पदार्थांची परीक्षा करणें सोपें पडतें. सारांश परीक्षा म्हटली म्हणजे तेथें कांहीं तरी कसोटीची अवश्य गरज आहे. नाहीं तर, अमुक पदार्थ अमक्यास चांगला वाटतो म्हणून तो चांगला म्हणतो, आणि अमक्यास वाईट वाटतो म्हणून तो वाईट म्हणतो, याप्रमाणें मनाच्या लहरीवरच अवलंबून राहिलें तर कांहीं वेळानें ती लहर फिरली, म्हणजे, बऱ्याचें वाईट, आणि वाईटाचें बरें होण्यास चुकत नाहीं. सांप्रत काळीं आपल्या मराठी भाषेंतील ग्रंथांविषयीं पाहिलें तर त्यांची स्थिति अगदीं, वर सांगितल्याप्रमाणें जाहली आहे. त्यांच्या परीक्षेस प्रमाण म्हणून कांहींच नाहीं. कोणास मोरोपंताची कविता चांगली वाटते; कोणास वामनाची; कोणास श्रीधरापुढें सगळे रद्द; कोणास सर्वांपेक्षां तुकारामाचे सोपे अभंग चांगले वाटतात. यांशिवाय कित्येक वरच्या पायरीचे म्हणविणारे त्यांचें म्हणणें " कवि पहावे इंग्रजींतच; त्यांची रचना, त्यांचे विचार आणि त्यांची शैली ही अवर्णनीय आहे. " हें पद्यग्रंथांविषयीं. गद्याविषयीं तर अद्यापि पुष्कळसे ग्रंथ आपल्या भाषेंत जाहलेच नाहींत. परंतु बाळमित्र आणि इसापनीति यांशिवाय दुसरे ग्रंथ कित्येकांस चांगले वाटतच नाहींत. कित्येकांना प्रौढ शब्दांची भाषा फार आवडते. कित्येकांना घोटीव, सफाईदार शब्द घालून लिहिण्याची मोठी आवड; मग ते शब्द अप्रयोजक असले तरी चिंता नाहीं. कित्येकांस व्यवहारी बोलण्याची, कित्येकांस

अडाणी स्त्रियांच्या मूर्ख रुसव्या फुगव्यानें भरलेली. याप्रमाणें हजार जणांचीं हजार मतें; त्यांतून खरीं कोणतीं व खोटीं कोणतीं हें समजण्याची मारामार. याकरितां संस्कृतामध्यें व इंग्रजीमध्यें या विषयावर जे अनेक ग्रंथ आहेत, त्यांच्या आधारानें आम्हीं हीं पुढील प्रकरणें लिहिलीं आहेत. यापेक्षां अधिक योग्यतेचा ग्रंथ होई तोंपर्यंत, यांपासून लोकांस पुष्कळच माहिती मिळेल.

शरीर सुदृढ होण्यास त्यास जसा व्यायाम अवश्य आहे, तद्वतच मानसिक शक्ति सुदृढ व प्रफुल्लित होण्यास त्यास ही व्यायामाची आवश्यकता आहे. मानसिक व्यायाम म्हटला म्हणजे ग्रंथादिकांचा अभ्यास, निरनिराळ्या विषयांवर विचार, बुद्धिबळादिकांचे खेळ इत्यादि प्रकार येतात. शरीरास जसें भोजन, तसें मनास काव्यादिकांचे श्रवण व अनेक सुंदर वस्तूंचें दर्शन होय. तथापि त्यांत आणखी सुंदर वस्तूंच्या दर्शनापेक्षां काव्यादिकांची योग्यता विशेष. कारण सुंदर पदार्थांपासून जरी मनास आनंद होतो, तरी ते बहुशः चिरकाल राहणारे नव्हेत. काव्याची गोष्ट तशी नाहीं. थोड्या श्रमानें सहस्रावधि वर्षें त्यास बिनधोक ठेवितां येतें. त्याची योग्यता प्राचीन कवींनीं अशी वर्णिली आहे—

धर्मार्थकाममोक्षेषु **वैचक्षण्यं** कलासुच ॥
करोति कीर्तिं प्रीतिं च साधुकाव्यनिषेवणं ॥१॥

अर्थ—उत्तम काव्याच्या योगानें धर्म म्हणजे सत्कृत्य, अर्थ म्हणजे संपत्ति, काम म्हणजे सुखोपभोग, मोक्ष म्हणजे मुक्ति या गोष्टी प्राप्त होतात; त्यापासून अनेक कलांमध्यें विचक्षणपणा म्हणजे ज्ञान हें प्राप्त होतें. तशीच कीर्ति व प्रीतिही उत्पन्न होते. याचा भाव असा कीं, या वरील गोष्टी घडण्यास मूल कारणभूत जो सदुपदेश, तो उत्तम काव्यापासून प्राप्त होतो; त्यापासून करावें जें कृत्य तेंच करावें न करावें, तें कधीं करूं नये, सज्जनास मान द्यावा, दुर्जनाचा त्याग करावा; इत्यादि कृत्याकृत्या-

विषयीं प्रवृत्तिनिवृत्तीचा उपदेश होऊन भगवंताच्या गुणानुवादाचें स्तवन झाल्यामुळें धर्मप्राप्ति होते; काव्याच्या योगानें अर्थप्राप्ति म्हणजे द्रव्य मिळतें हें तर उघडच आहे; सुखोपभोग द्रव्यापासून आहे. आणि मोक्ष-प्राप्ति तर धर्माचें फळ; याशिवाय ज्ञान, कीर्ति आणि प्रीति यांची प्रत्यक्ष प्रतीति आहेच. हें तर काय, परंतु वेद आणि शास्त्रें हे जे अतिशय पूज्य बुद्धीनें मानिलेले ग्रंथ,त्याहूनही काव्याची योग्यता विशेष मानलेली आहे, व त्याचें कारण असें सांगितलें आहे कीं, त्या गहन ग्रंथांतील विषय समजण्यास असमर्थ अशा कोमल बुद्धीच्या पुरुषांसही काव्यापासून सुबोध होतो. कडू औषधानें जाणारा रोग साखरेनें जात असल्यास साखर सोडून कटुऔषध कोण घेईल ?

असो; आतां काव्य म्हणजे काय, या प्रश्नाकडे आपण वळूं. आली-कडे बहुत करून आपल्या महाराष्ट्र देशांतील लोकांची अशी समजूत घडून गेली आहे कीं, काव्य किंवा कविता म्हणजे छंदोबद्ध ग्रंथ, व त्यांत प्रास व यमकें अवश्य असलीं पाहिजेत. परतु या गोष्टी संस्कृत कवींच्या ध्यानींमनींही नव्हत्या. हीं वरील लक्षणें जर आपण लागू केलीं, तर संस्कृतामध्यें जीं आज महाकाव्यें म्हणून मानलेलीं आहेत, त्यांमध्यें प्रास नसल्यामुळें त्यांस आपलें नांव सोडून द्यावें लागेल. आणि दुसऱ्यापक्षीं पाहिलें तर इतर हजारों ग्रंथ काव्यत्व पावतील. कारण संस्कृतांतील बहुतकरून सर्व ग्रंथ छंदोबद्ध आहेत.

कित्येकांनीं काव्याचें लक्षण सांगितलें आहे तें असें:—

तददोषौ शब्दार्थौ सगुणावनलंकृती पुनः क्वापि ॥

म्हणजे–शब्द आणि अर्थ हे माधुर्यादि गुणें करून युक्त असावे, कर्णकठोरत्व, सांदिग्ध्य इत्यादि दोष नसावे, आणि अशा वाक्यांत अलंकार जरी नसला, तरी तें काव्य होतें.परंतु हें लक्षण बरोबर नाहीं. कारण काव्यत्व म्हणून जें कांहीं आहे,तें वेगळेंच आहे; त्यांत कर्णकटुत्वादि दोष असल्यानें

तें नाहींसें होत नाहीं.जसें एकाद्या रत्नास छिद्र पडलें तरी त्याचें रत्नपण जात नाहीं, तसेंच नुसत्या माधुर्यानें काव्यत्व येत नाहीं. दोष असल्यानें त्याचें मोल कमी होतें हें जरी खरें, तरी जिकडे दोष आहेत तेवढा भाग अकाव्य आणि इतर भाग काव्य असें म्हणतां येत नाहीं. अशानें काव्य-अकाव्य यांमध्यें ओढाताण होऊन धड एकही ठरणार नाहीं. काव्याच्या आत्मभूत रसामध्यें जर अपकर्षत्व नसलें, तर अशा दोषाचें दोषत्वही अंगीकारीत नाहींत. सरस काव्यामध्यें कांहीं नीरस पद्यें जरी असलीं, तरी अन्य पद्यांच्या सान्निध्यानें त्यांस सरसत्व प्राप्त होतें. कोणी म्हणतात कीं,

रीतिरात्मा काव्यस्येति

म्हणजे शब्द घटनेची जी रीति तो काव्याचा आत्मा आहे. परंतु तसेंही नाहीं. याविषयीं असें म्हटलें आहे—

काव्यस्य शब्दार्थौ शरीरं । रसादिश्चात्मा ।
गुणाः शौर्यादिवत् । दोषाः काणत्वादिवत् ।
रीतयोऽवयवसंस्थानविशेषवत् ।
अलंकाराः कटककुंडलादिवदिति ॥

अर्थ—शब्द आणि अर्थ हे काव्याचे शरीरावयव होत. रस म्हणून जो आहे, तोच काय तो आत्मा. माधुर्यादि गुण हे पुरुषाला जसे शौर्यादि गुण, तद्वत होत. सांदिग्ध्यादि दोष हे अंधत्वाप्रमाणें. रीति ही त्या शरीरावयवांची कांहीं अमुक प्रकारची व्यवस्था जशी, तशी होय. आणि अलंकार हे सुवर्णादिकांच्या भूषणांप्रमाणें होत. याकरितां म्हटलें आहे,

वाग्वैदग्ध्यप्रधानेऽपि रस एवात्र जीवितमिति ।

म्हणजे शब्दचातुर्यानें जरी काव्यास प्रगल्भता येते, तरी रस हाच त्यांतील मुख्य प्राण आहे. यावरून शेवटीं ठरविलें कीं—

वाक्यं रसात्मकं काव्यं ॥

ज्या वाक्यामध्यें केवळ रस हाच आत्मा आहे त्यास काव्य म्हणतात.

दोषास्तस्यापकर्षकाः ॥

आंधळेपण लुलेपण इत्यादि जसे शरीरद्वारानें मनुष्यास अपकर्षत्व आणितात, तद्वत् कर्णकटुत्व, अपुष्टत्व इत्यादिक, काव्यास शब्दार्थद्वारानें अपकर्षत्व आणितात.

उत्कर्षहेतवः प्रोक्ता गुणालंकाररीतयः ॥

माधुर्यादि गुण, उपमादि अलंकार आणि शब्दाची विशिष्ट घटना ह्या गोष्टी, मनुष्यास जसें शौर्यादिगुण, तोडे, चौकडे इत्यादि अलंकार, आणि ठाकठीकपणा हीं शोभा देतात, तद्वत् काव्यास विशेष शोभा देतात.

(पु. १, लें, अंक १, जुलै १८६७,)

प्रकरण २ रें

मागील प्रकरणांत काव्यामध्यें रस प्रधान आहे असें सांगीतलें. आतां रस म्हणजे काय व तो कसा दृष्टोत्पत्तीस येतो, याविषयीं विचार करूं.--- " कामक्रोधादि ज्या आपल्या मनोवृत्ति आहेत, त्यांना जागृत करणारे जे विषय असतात ते; तसेंच त्या वृत्ति जागृत जाहल्याचे, घर्म रोमांच इत्यादि जे क्षणिक परिणाम ते; आणि आनंद, त्रास, निद्रा इत्यादिक जे त्यांचे सहचर ते; या तिहींच्या योगानें काव्यांतील जो स्थायी भाव प्रकट होतो त्यास **रस** असें म्हणतात."

यांतील प्रथम सांगितलेले, म्हणजे मनोवृत्ति जागृत करणारे जे विषय यांस **विभाव** म्हणतात; दुसरे म्हणजे घर्म, रोमांच इत्यादिक यांस **अनुभाव**; आणि तिसरे म्हणजे आनंद त्रास इत्यादिक **संचारी** म्हणतात. यावरून थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं,---"**विभाव, अनुभाव** आणि **संचारी** यांच्या संयोजनानें जो काव्यामध्यें स्थायी भाव प्रकट होतो त्यास **रस** म्हणतात." यावरून आतां सहजच प्रश्न उत्पन्न होईल कीं,

स्थायीभाव म्हणजे काय ? तेव्हां या प्रश्नाचें उत्तर. काव्यामध्यें जे इतर अनुकूल किंवा प्रतिकूल भाव असतील, त्यांच्या योगानें गौणत्व न पावतां स्वादाचा केवळ गाभा होऊन राहिलेला जो भाव तो **स्थायी** किंवा **व्यापक भाव.**

हे स्थायी भाव नऊ आहेत. त्यांचीं नांवें,

रतिर्हासश्च शोकश्च क्रोधोत्साहौ भयं तथा ॥
जुगुप्सा विस्मयश्चेत्थमष्टौ प्रोक्ताःशमोऽपिच ॥ १ ॥

१ रति, २ हास, ३ शोक, ४ क्रोध, ५ उत्साह, ६ भय, ७ जुगुप्सा, ८ विस्मय आणि ९ शम. यांतील प्रत्येकाचा अर्थ.—

१ आपणास आनंद उत्पन्न करणाऱ्या वस्तूविषयीं मनावर जी उत्कंठा उत्पन्न होते तीस रति म्हणतात. २ भाषणाच्या कांहीं विलक्षण प्रकारामुळें मनावर जो प्रफुल्लितपणा उत्पन्न होतो, तो **हास.** ३ **शोक** म्हणजे प्रिय वस्तूच्या नाशामुळें मनावर जी अस्वस्थता उत्पन्न होते तो. ४ प्रतिकूल वस्तूपासून मनावर जी तीक्ष्णता उत्पन्न होते तो क्रोध. ५ आरंभलेल्या कार्यामध्यें निकटीनें परिश्रम करण्याचा जो उल्हास तो **उत्साह.** ६ भेसुर पदार्थापासून मनावर अस्वस्थता उत्पन्न करणारें तें भय. ७ पदार्थांतील दोष किंवा उणेपणा दृष्टीला पडून मनामध्यें जो तद्विषयक कंटाळा उत्पन्न होतो ती **जुगुप्सा.** ८ लोकशक्तीच्या पलीकडील विचित्र गोष्टींच्या योगानें चकित जाहलेल्या—मनाची जी स्थिति तो **विस्मय.** आणि ९ संसाराच्या घोटाळ्यांतून मन काढून आत्म्याला विश्रांति दिल्यापासून जें समाधान उत्पन्न होतें त्याचें नांव **शम.**

याप्रमाणें वर्णिलेले हे नऊ स्थायीभाव जेव्हां वर सांगितलेले **विभाव, अनुभाव** आणि **संचारी** यांच्या योगानें प्रगट होतात, तेव्हां अनुक्रमें नऊ रस उत्पन्न होतात. त्यांचीं नांवें

शृंगारहास्यकरुणरौद्रवीरभयानकाः ॥
बीभत्सोऽद्भुत इत्यष्टौरसाः शांन्तस्तथा मतः ॥

१ शृंगार, २ हास्य, ३ करुण, ४ रौद्र, ५ वीर, ६ भयानक, ७ बीभत्स, ८ अद्भुत आणि ९ शांत.

असो. याप्रकारें नऊ रसांची उत्पत्ति सांगितली. आतां कोणत्या प्रकारची त्यांची स्थिति अनुभवास येते, याविषयीं लिहूं.—

जरी तो निरनिराळ्या नऊ प्रकारचा आहे, तथापि सर्वत्र सत्वगुणापासून म्हणजे केवळ शुद्ध भावापासून उत्पन्न जाहला आहे असा अनुभवास येतो, त्यास अशुद्ध किंवा भ्रष्ट भावाचा वारा सुद्धां लागत नाहीं. यद्यपि विभाव, अनुभाव, संचारी इत्यादि अनेक बीजें एकत्र मिळून तो उदयास आलेला असतो, तथापि तो केवळ अखंड म्हणजे विभाग करण्यास अशक्य असा आहे; कारण त्या विभावादिकांच्या योगानें जो कांहीं मनामध्यें अलौकिक विस्मय उत्पन्न होतो, तोच साक्षात् रसाचा प्राण असून जात्या अखंड आहे. तो केवळ स्वयंप्रकाश, म्हणजे उत्पन्न जाहल्याबरोबर आपल्या प्रकाशामुळें अनुभवास आल्यावांचून राहणारच नाहीं. आणि जर अनुभवास आला नाहीं, तर तो मुळीं उत्पन्न झाला असें म्हणतांच येत नाहीं. तो रस आणि त्याचा अनुभव किंवा स्वाद हे एकमेकांस सोडून राहणार नाहींत. किंबहुना दोन्ही एकच आहेत असेंही म्हणण्यास कांहींच बाध नाहीं. केवळ आनंद हेंच त्याचें स्वरूप. त्याचा आपण स्वाद घेत असतां तेथें अन्य कल्पनेचा स्पर्शही होणार नाहीं. सारांश, सर्व गोष्टींनीं, विश्वंभर जें आनंदस्वरूप ब्रह्म त्याचा जसा योगिजन स्वाद घेतात, तदनुरूपच रसिकजन रसांचा स्वाद घेतात.

याप्रमाणें सर्व रसांमध्यें मुख्य सार आश्चर्य किंवा विस्मय हाच असल्यामुळें तन्मूलक अभ्दुत हाच काय तो एक रस व इतर त्याचे पोटभेद असें कित्येकांनीं म्हटलें आहे. असो. रसाविषयीं ही चमत्कारिक

गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे कीं, त्याच्या योगानें दुःख शोक इत्यादिकांनीं भरलेल्या कथा ऐकूनही मनामध्यें विलक्षण आनंद उत्पन्न होतो, हें अनेकांस माहित असेल. या गोष्टीचें कारण असें सांगितलें आहे कीं, दुःखशोकादिकांस उत्पन्न करणाऱ्या गोष्टी जंवपर्यंत आपण लौकिक दृष्टीनें पाहतों, तोंपर्यंत आपणावर त्यांचा परिणाम घडतो, यांत संशय नाहीं. तथापि त्या गोष्टी काव्याच्या स्वाधीन ज़ाहल्यावर, अलौकिक सामर्थ्यवान् जे विभावादिक त्याच्या योगानें त्यां सर्वांपासून सदा सुखच प्राप्त होईल यांत आश्चर्य नाहीं.

काव्यविचार (आगस्ट १८६७ पु. १, अं. २)

दुसऱ्या अंकामध्यें रस म्हणजे काय व ते किती आहेत, इत्यादि प्रकार सांगितले. आतां रसाविषयीं विशेष सांगण्यापूर्वी शब्दांच्या शक्तीं-विषयीं अमळ विवेचन करूं.

संस्कृतामध्यें इतर विषयांप्रमाणें याचेंही पुष्कळ बारीक विवेचन केलें आहे. परंतु तितक्या घोटाळ्यांत शिरण्याचें एथें प्रयोजन दिसत नाहीं. व विषय नवीन असल्यामुळें तितका पाल्हाळ त्रासदायक जाहल्यावांचून राहणार नाहीं. याकरितां थोडक्यांत त्याचा विचार करूं.

वाक्य म्हणजे शब्दसमुच्चय; परंतु त्यांतील प्रत्येक शब्दामध्यें ह्या तीन गोष्टी अवश्य असल्या पाहिजेत--१, प्रथमतः ते शब्द एकमेकाला विरोध आणणारे नसावे. उदाहरणार्थ 'अग्नीनें उदक सिंचितो,' असा विरोध नसावा. या लक्षणास **योग्यता** म्हणतात. २, एका शब्दांतील अर्थ पूर्ण समजण्यास त्याचा संबंधी शब्द ऐकण्याची श्रोत्यांस जिज्ञासा होण्याजोगे ते शब्द असावे. नाहीं तर नुसत्या गाई, घोडा, मनुष्य, हत्ती, इत्यादि तुटक शब्दांमध्यें सुद्धां वाक्यत्व येईल. यास **आकांक्षा** म्हणतात. आणि, ३, ते सर्व शब्द बुद्धीला ग्रहण करितां येण्याजोगे एकमेकाच्या समीप असले पाहिजेत. नाहीं तर, पहिल्या दिवशीं एक शब्द बोलून त्याचा संबंधी शब्द

दुसऱ्या दिवशीं म्हटल्यानेंही वाक्य होईल. या लक्षणास **आसत्ति** म्हणतात. यांतील शेवटचें लक्षण शब्दाच्या अंगीं अवश्य असलें पाहिजे असा जरी अर्थ नाहीं, तथापि काव्य म्हटलें म्हणजे अंतःकरण उल्लसित करण्याचीं जितकीं साधनें त्यांत असतील तितकीं चांगलीं. याकरितां हा वरील नियम आवश्यक मानावा लागतो.

याप्रमाणें योग्यता, आकांक्षा आणि आसत्ति यांहींकरून युक्त अनेक वाक्यांचा जो समुदाय त्यास महावाक्य म्हणतात. असो. आतां शब्दांच्या शक्तींकडे वळूं—

प्रत्येक शब्दाचा अर्थ तीन प्रकारचा असतो, आणि त्या त्या प्रमाणें वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, आणि व्यंग्यार्थ अशीं त्यांचीं नांवें आहेत.

१. त्यांत प्रत्यक्ष शब्दाच्या अवयवांपासून जो मूळचा संकेतित अर्थ निघतो तो वाच्यार्थ. आणि अशा प्रकारें संकेतित अर्थ प्रकट करणारी जी शब्दाच्या अंगीं शक्ति असते तिला **अभिधा** म्हणतात.

२. शब्दाच्या मुख्यार्थाला विरोध येऊन रूढीमुळें, किंवा कांहीं कारणामुळें दुसरा गौण अर्थ उत्पन्न होतो, त्याला लक्ष्यार्थ किंवा लाक्षणिक अर्थ म्हणतात. असा अर्थ उत्पन्न करणारी जी शब्दाची शक्ति तिला **लक्षणा** म्हणतात. उदाहरणार्थ, ‘नदीवरचा वाडा’ यांत ‘नदीवरचा’ या शब्दाचा मुख्यार्थ म्हटला म्हणजे, ‘पाण्याच्या पृष्ठभागावरचा’ असा असतां, त्याला विरोध येऊन नदीच्या ‘कांठावरचा’ वाडा असा जो स्वाभाविक अर्थाहून भिन्न अर्थ जाहला, त्यास लाक्षणिक अर्थ किंवा लक्ष्यार्थ म्हणतात. कित्येक शब्दांमध्यें मुख्यार्थ म्हणजे व्युत्पत्तीचा अर्थ प्रचारांत नसतां गौण अर्थच प्रसिद्ध असतो, अशा स्थळीं त्याला लक्ष्यार्थ जरी कोणी म्हणतात, तथापि वाच्यार्थच म्हणण्यास कांहीं बाध दिसत नाहीं. उदाहरण—‘कुशल’ या शब्दाची व्युत्पत्ति-कुश म्हणजे दर्भ, ते आणणारा तो–अशी आहे, परंतु व्यवहारा-

मध्यें मूळचा अर्थ जाऊन विवेचक शक्ति ज्यामध्यें आहे तो कुशल असा अर्थ जाहला आहे. आतां दुसरा अर्थ जरी पहिल्या अर्थावरूनच निघालेला आहे, तथापि हाच व्यवहारांत असल्यामुळें यासच मुख्यार्थ म्हणण्यास बाध नाहीं.

३. शब्दाचा मुख्यार्थ किंवा लक्ष्यार्थ किंवा तात्पर्यार्थ यांशिवाय शब्दामध्यें आणखी कांहीं अर्थ असतो त्यास व्यंग्यार्थ किंवा ध्वन्यर्थ म्हणतात. उदा० 'नदीवरील वाडा' यांतील मुख्यार्थ व लक्ष्यार्थ येऊन चुकल्यानंतर शांत थंड कोमल वायूचें तें स्थान असावें, इत्यादि जो मनामध्यें भाव उत्पन्न होतो तो व्यंग्यार्थ किंवा ध्वन्यर्थ होय.आणि या शक्तीला व्यंजनावृत्ति म्हणतात.

सांगितलेला शब्दाचा मुख्यार्थ समजण्यास चार प्रकारचा संकेत गृहीत करतात. १ जाति, २ गुण, ३ द्रव्य आणि ४ क्रिया. उदाहरणार्थ, 'प्राणी' हा शब्द सर्व सप्राण पदार्थांस लागू आहे. यास 'जाति' म्हणतात. परंतु विवक्षित अर्थ विशेष स्पष्ट करण्याकरितां 'ज्ञानवान' हें विशेषण लावल्यानें तो अर्थ फक्त मनुष्यमात्रासच लागू जाहला. अशा विशेषणास 'गुण' म्हणतात. याहूनही विशेष स्पष्टता येण्याकरितां म्हणजे, व्यक्ति दर्शविण्याकरितां जीं विशेषनामें लावतात त्यास 'द्रव्य' म्हणतात. जसें—नारायण, हरि इत्यादि. क्रिया म्हणजे कोणताही व्यापार. जसें पाक, स्नान, इत्यादि.

हा विषय इंग्रजीमध्यें विशेष व्यवस्थित केलेला आहे. ते स्पष्टार्थाकरितां 'क्रिया' वेगळ्या धरित नाहींत. 'जाती'मध्येंच तिचा समावेश करितात. तथापि जाति (Genus जीनस) आणि गुण (Difference डिफरेन्स) एकत्र मिळवून तदर्थक जो विशिष्टमर्याद शब्द होतो ती (Species स्पीशिस,) 'विशिष्ट जाति' असा एक वेगळा संकेत ते गृहीत करितात. उदाहरणार्थ 'प्राणी' ही जाति, 'ज्ञानवान्' हा गुण, आणि 'ज्ञानवान् प्राणी' किंवा 'मनुष्य' हा जो जाति आणि गुण मिळून शब्द

जाहला, त्यास विशिष्ट जाति म्हणतात. याशिवाय आणखी विशिष्ट जाति अधिक स्पष्ट करण्याची असेल, तर तिलाही आणखी कांहीं 'गुण' लागून तिच्या पोटीं अंतरंग विशिष्ट जाति उत्पन्न होते, आणि पहिल्या विशिष्ट जातीला पोटभेदाच्या संबंधानें नुसता जाति शब्द लागतो.

उदाहरण, 'प्राणी' ही जाति; 'सज्ञान प्राणी' किंवा 'मनुष्य' ही विशिष्ट जाति; परंतु 'मनुष्य' याच्या पोटीं आणखी 'विद्वत्ता' इत्यादि गुण लावून 'पंडित' इत्यादि अधिक विशिष्ट अर्थ केला तर 'पंडित' ही विशिष्ट जाति होईल, आणि मनुष्य ही नुसती जाति होईल. याप्रमाणें जेथपर्यंत पोटभेद होण्याचा संभव आहे, तेथपर्यंत जाति व विशिष्ट जाति ह्या परंपरागत चाललेल्या असतात. आणि जेव्हां पुढें विशिष्ट जाति नाहीं असें होईल, म्हणजे फक्त व्यक्तिवाचक शब्द पुढें राहील, तेव्हां त्या विशिष्ट जातीस सर्वांत कनिष्ट जाति म्हणतात. आणि याप्रमाणेंच उलट पक्षीं ही जातीच्या वर दुसरी जाति आली असतांही पहिल्या जातीला विशिष्टजातित्व येतें. आणि तिजवर नवीन आलेल्या शब्दास नुसतें जातित्व येतें. असें होतां होतां होतां शेवटीं जेव्हां वर दुसरी जाति नाहीं असें होईल, तेव्हां तीस सर्वोत्कृष्ट जाति म्हणतात. आणखी यांत दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी असते ती ही कीं, जरी जातीच्या पोटीं विशिष्टजाति आहे असें आपण म्हणतों, तरी शास्त्रदृष्ट्या ते याच्या उलट म्हणतात. म्हणजे विशिष्ट जातीच्या पोटीं जाति. उदाहरणार्थ

जाति = पदार्थ

गुण = जीवित्व

विशिष्टजाति = प्राणी

यांत व्यवहाररीत्या पदार्थांच्या वर्गामध्यें प्राण्याचा समावेश होतो. परंतु शास्त्ररीत्या ते असें म्हणतात कीं, 'प्राणी' म्हटला म्हणजे 'पदार्थत्व' त्याच्या पोटीं येतेंच; आणि त्याशिवाय 'जीवित्व' हा विशेष असल्यामुळें विशिष्ट जातीच्या पोटीं जाति; असा वास्तविक प्रकार आहे.

वर सांगितलेल्या शब्दाच्या तीन शक्ति, यांचे एकमेकींच्या साहाय्यानें पुष्कळ पोटभेद होतात. परंतु तितक्या खोल पाण्यांत शिरण्याचें एथें प्रयोजन दिसत नाहीं.

(नोव्हेंबर १८६७, पु. १, अं ५)

काव्यविचार

(पुस्तक १ अंक ५ वरून पुढें चालू.)

हा विषय सुमारें तीन वर्षे मागें पडला आहे. परंतु ह्याचें पुनरुज्जीवन करावें असें आमच्या पुष्कळ मित्रांनीं आपलें मत. आम्हांस दर्शविलें, व आम्हांसही तें पसंत वाटलें त्यावरून हा विषय पुन्हां हातीं धरला आहे. परंतु यावर जें कांहीं मागें लिहिलें आहे, तें आमचे बहुतेक जुने वाचक विसरले असतील, व नव्या वाचकांस तर त्याजविषयीं अगदींच माहिती नसेल; म्हणून उक्त विषयाचा विस्तार न करितां तो एथें सांक्षेपानें आधीं सांगून नंतर प्रस्तुत विषय पुढें चालू करूं.

पहिल्यानें, "शब्द आणि अर्थ हे काव्याचे शरीरावयव होत. रस म्हणून जो आहे तोच काय तो आत्मा. माधुर्यादि गुण हे पुरुषाला जसे शौर्यादि गुण तद्वत होत. सांदिग्ध्यादि दोष हे अंधत्वादिकाप्रमाणें. रीति ही त्या शरीरावयवांची कांहीं अमुक प्रकारची व्यवस्था जशी, तशी होय. आणि अलंकार हे सुवर्णादिकाच्या भूषणाप्रमाणें होत." असें सांगून, रसभरित जें वाक्य त्यास काव्य म्हणावें, असें सांगितलें. (पु. १, अं. १) पुढें काव्याचे शरीरावयव जे शब्द आणि अर्थ, व त्यांपासून होणारें वाक्य व महावाक्य यांविषयीं विवेचन केलें. (पु. १, अं. ५) आणि रसाविषयीं सांगितलें कीं, "विभाव, अनुभाव आणि संचारी यांच्या संयोजनानें जो काव्यामध्यें स्थायीभाव प्रकट होतो त्यास रस म्हणतात." हे स्थायीभाव रति, हास, शोक, क्रोध, उत्साह, भय, जुगुप्सा, विस्मय, आणि शम असें नऊ आहेत. व त्यांचेच अनुक्रमें करून शृंगार, हास्य, करुण,

रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अद्भुत, आणि शान्त असे नऊ रस होतात म्हणून सांगितलें व त्यांचें थोडेसें विवेचनही केलें आहे. (पु० १, अं. २) परंतु रसाविषयीं चांगलें ज्ञान होण्यास म्हणजे एखाद्या काव्याची गोडी कशी घ्यावी हें समजण्यास पुष्कळ सांगितलें पाहिजे. म्हणून प्रथमतः **विभाव** म्हणजे काय हें सांगण्यास प्रारंभ करूं.

कामक्रोधादि मनोवृत्ति जागृत करणारे जे विषय त्या विषयांस विभाव म्हणावें. आतां प्रत्येक काव्यामध्यें कांहीं व्यक्तींविषयीं वर्णन असतें, किंवा त्यांच्या कृति वगैरे त्या त्या व्यक्तींच्याच हातून करून दाखविल्या असतात. त्या त्यांच्या कृति व वर्णनें पाहून मनांत कांहीं तरी विकार उत्पन्न होतो; म्हणजे त्या वेळेस ज्या ज्या व्यक्तीचें वर्णन ऐकितों किंवा कृति पाहतों त्या त्या व्यक्तीप्रमाणें आपले मनाची वृत्ति होते. उदाहरणार्थ, थोरल्या माधवरावांच्या नाटकांत हैदराशीं लढाई करण्याच्या आधीं त्यांच्या दरबारांतील मानकऱ्यांचीं चाललेलीं भाषणें ऐकून मनांत वीरश्रीचें केवळ वारें भरतें. तर ह्या व्यक्ति आपली शौर्याची मनोवृत्ति जागृत करितात. यावरून स्पष्ट दिसेल कीं, काव्यामध्यें ज्या व्यक्ति वर्णिल्या असतात, त्यांस विभाव म्हणावें. परंतु याशिवाय विभाव या सदराखालीं आणखी अधिक विषय येतात. आपल्या मनोवृत्ति ज्या जागृत होतात त्यांस, वर्णिलेल्या व्यक्तींपेक्षां आणखी कांहीं साधनें लागतात. तीं कोणतीं, तर त्या व्यक्तींचा वेष, चेष्टा, देश, काल, इत्यादि. या विषयांमध्यें चंद्र, चंदन, कोकिलांचे मंजुळ स्वर, भ्रमरांचे **गुंजारव** इत्यादि येतात. यांस विभाव म्हणण्याचें कारण असें कीं, काव्यामध्यें यांचा सन्निवेश केल्यामुळें समाजानें उत्पन्न होणारे जे रत्यादि भाव म्हणजे मनोविकार, ते वाचकानें किंवा प्रेक्षकानें गोडी घेण्याजोगे स्फुट केले जातात. विउपसर्गपूर्वक भूधातूचा प्रयोज्यार्थी कर्मणि रूपीं करिजेतो असा अर्थ होतो. आतां हे विषय काय करितात हें सांगितलेंच आहे. यांतून पहिल्या प्रकारचे म्हणजे जे व्यक्तिरूप विषय सांगितले

त्यांस **आलंबन विभाव** म्हणतात. कारण, त्यांस आलंबून म्हणजे त्यांच्या आश्रयानें, किंवा आधारानें, रस उत्पन्न होतो. दुसऱ्या प्रकारचे म्हणजे देशकालादिक जे विषय सांगितले, त्यांस **उद्दीपनविभाव** म्हणतात; कारण रस उत्पन्न होण्याला ते प्रयोजक होतात. आलंबनविभावांचे प्रकार संस्कृत साहित्यशास्त्रकर्त्यांनीं पुष्कळ सांगितले आहेत; व त्यांतील बहुतेकांचें विवेचन करणें हें पुष्कळ वाचकांस, व मुख्यत्वें करून संस्कृत भाषाध्यायी वाचकांस, फारच उपयोगी आहे. म्हणून तें करूं. आलंबनविभावांचे मुख्य भेद म्हटले म्हणजे पुरुष आणि स्त्री. पुरुषांत नायक, उपनायक, आणि प्रतिनायक असे मुख्य भेद कल्पिले आहेत. तसेच स्त्रियांत नायिकादि भेद कल्पिले आहेत. काव्यामध्यें नायक जो असेल तो दान करणारा, सत्कृत्य करणारा, कुलीन, लक्ष्मीयुक्त, रूपयौवनानीं युक्त, दक्ष, लोकांस आवडता, तेजयुक्त, शाहणा, सुशील असा असावा. याचे मुख्य चार भेद आहेत. १ **धीरोदात्त** म्हणजे आपली स्तुति न करणारा, क्षमावान्, हर्षशोकादिकांनीं ज्याचें चित्त चल होत नाहीं तो, विनयानें आपला गर्व झांकतो, अतिगंभीर, आणि हातीं घेतलेलें काम तडीस नेतो, तो; २ **धीरोद्धत्त** म्हणजे कपटी, प्रचंड, चपल, अतिशय गर्विष्ट; आणि आपली नेहमी स्तुति करणारा असा; ३ **धीरललित** म्हणजे जो निष्काळजी, स्वभावानें गरीब, व ज्यास संगीतादि कला आवडतात तो; ४ **धीरप्रशांत** म्हणजे सामान्य गुणयुक्त; हा नायक ब्राह्मण असावा. यांतील प्रत्येक नायकाचे नायिकांच्या योगानें, १ दक्षिण, २ धृष्ट, ३ अनुकूल, आणि ४ शठ असे चार भेद कल्पिले आहेत. १ दक्षिण म्हणजे सर्व नायिकांवर सारखी प्रीति ठेवणारा; २ जो अपराध करून निःशंक राहतो. भर्त्सना केली असतांही लज्जित होत नाहीं, अपराधांत सांपडूनही खोटें बोलतो तो धृष्टनायक; ३ ज्याची एकाच नायिकेवर प्रीति असते म्हणजे ज्याला दुसरी नायिकाच नाहीं तो अनुकूल; ४ जे दोन्ही नायिकांवर वरवर प्रीति दाखवून खरोखर ती

एकीवरच ठेवितो व दुसरीस गुप्त रूपानें त्रास देतो तो शठ. या प्रकारानें नायकांचे सोळा भेद झाले; त्यांत आणखी उत्तम, अधम आणि मध्यम अशा भेदानें एकंदर अठ्ठेचाळीस प्रकार कल्पिले आहेत. याप्रमाणें नायकांचे भेद सांगितले. आतां कोणत्याही काव्यामध्यें मुख्य जें पात्र वर्णिलें असतें, त्यानें जें कांहीं कार्य त्या काव्यामध्यें करावयाचें आहे, त्या कार्याला कोणी तरी दुसरें पात्र सहायभूत पाहिजे हें उघड आहे. हीं सहायभूत जीं पुरुषपात्रें त्यांस उपनायक अशी संज्ञा आहे. हे उपनायक ज्या ज्या कार्यामध्यें नायकास सहाय करितात त्या-त्याप्रमाणें त्यांचे भेद कल्पिले आहेत. नायकाचे जे जे गुण सांगितले त्यांहून थोडेसे ज्यांत गुण कमी आहेत, व नायकाचें मुख्य जें कर्तव्य त्यामध्यें मनापासून मदत करण्यास झटतो, त्याला **पीठमर्द** अशी संज्ञा आहे. नायकास शृंगारांत सहाय करणारे जे आहेत त्यांच्या कांहीं नियमित अशा संज्ञा नाहींत. त्या संज्ञा त्यांच्या उद्योगावरून त्यांस प्राप्त झालेल्या असतात. ते उपनायक विट, चेट, विदूषक, माळी, परीट, तांबोळी, गांधी, आदिकरून जाणावे. ह्यांची नायकांच्या ठायीं फार प्रीति असते, व हे थट्टा करण्यांत फार कुशल असतात, आणि एखाद्या रागावलेल्या नायिकेचा मानभंग करण्यांत फार चतुर असतात. ह्यांचीं लक्षणें वगैरे सांगण्याची एथें गरज नाहीं. दुसरीं नायकांस सहाय करणारीं पात्रें पुष्कळ असतात, तीं सर्व व त्या सर्वांचीं लक्षणें येथें सांगून विस्तार करणें जरूर नाहीं. या उपनायकांत पीठमर्दादि पात्रें उत्तम होत, विट आणि विदूषक हे मध्यम, आणि चेटादि जीं पात्रें तीं अधम होत.

आतां प्रसंगोपात्त दूतांचें लक्षण सांगणें जरूर आहे. कारण, शृंगारामध्यें यांचा फार उपयोग आहे. निरोप सांगणारें जें पात्र त्यास दूत अशी संज्ञा आहे. या दूतांचे तीन प्रकार आहेत;—**निसृष्टार्थ, मितार्थ,** व **संदेशहारक.** दोघांचें, म्हणजे पाठविणारा व ज्याकडे पाठविलें तो यांचें मनोगत जाणून स्वतःच्या अकलेनें उत्तरप्रत्युत्तर देऊन कार्याचा शेवट

गोड करतो तो निसृष्टार्थ समजावा; जो थोडेंच बोलून कसें तरी कार्य साधून घेतो तो मितार्थ; आणि सांगितलेला निरोप सांगण्यापुरतीच ज्याची अक्कल तो संदेशहारक म्हणजे सांगकाम्या समजावा.

नायकाच्या अंगीं आठ सात्त्विक गुण असावेत. सात्त्विक गुण म्हणजे काय हें त्या गुणांच्या वर्णन प्रसंगीं सांगूं. येथें त्यांचें लक्षण न सांगितल्यास जें कांहीं सांगणार आहों तें समजण्यास कांहीं हरकत पडणार नाहीं. ते आठ गुण शोभा, विलास, माधुर्य, गांभीर्य, धैर्य, तेज, ललित, आणि औदार्य हे होत. शौर्य, दक्षता, सत्य, उत्साह (हौस), लोकांची आपल्यावर प्रीति, वाईटपणापासून दूर होणें, व आपल्यापेक्षां मोठे असतील त्यांची स्पर्धा म्हणजे बरोबरी किंवा वर्चस्व करण्याची इच्छा; ह्या सर्व गोष्टी पुरुषाच्या अंगीं असल्यानें त्यास शोभा देतात. म्हणून या सर्वांचा, शोभा या गुणांत समावेश केला आहे. धीर मुद्रेनें पाहणें व चालणें, आणि प्रसन्नमुखानें बोलणें याला विलास म्हणतात. रागाचें कारण असतांही मन अनुद्विग्न म्हणजे शांत असणें यास माधुर्य म्हणतात. भय, शोक, क्रोध, हर्ष, इत्यादिकांनीं मनास विकार न होणें, याला गांभीर्य म्हणतात. मोठें विघ्न आलें असतांही मन विकृत झालेलें दाबणें यास धैर्य म्हणतात. दुसऱ्यानें निंदा किंवा मानहानि वगैरे केली असतां, ती जीवावरचें संकट आलें तरी सहन न करणें यास तेज म्हणतात. बोलणें गोड, व वेश म्हणजे पोषाख चांगला असणें, तसेंच शृंगाराच्या ज्या कांहीं इतर क्रिया आहेत त्यांस ललित म्हणतात. गोड बोलून दान करणें, आणि शत्रु व मित्र यांविषयीं सारखाच भाव याला औदार्य म्हणतात. याप्रमाणें हे नायकाचे आठ सात्त्विक गुण आहेत. नायिका वगैरेंचीं लक्षणें पुढें सांगूं.

(पु. ४ अंक ८, जानेवारी १८७२)

काव्यविचार खंड २—रस प्रकरण

(पुस्तक ४, अंक ८ पासून पुढें चालू.)

मागील खेपेस आलंबनविभागापैकीं नायकादि पुरुषजातीय व्यक्ति सांगितल्या. आतां नायिकादि स्त्रीजातीय व्यक्ति सांगूं.

स्त्रीजातीयव्यक्तिरूप विभावाचा शृंगार, हास्य व करुण रसांशीं जितका निकट संबंध असतो, तितका इतर रसांशीं फारसा संबंध नसतो. याचें कारण उघड आहे. परंतु यावरून इतर रसांशीं अगदींच संबंध नसतो असें नाहीं. उदाहरणार्थ राक्षसस्त्रियांचा बीभत्स व भयानक रसांशीं बहुधा संबंध असतो. दुसरीं ही यांचीं उदाहरणें सांपडतील. त्या त्या व्यक्तीचा त्या त्या रसाशीं संबंध असतो म्हणजे त्या त्या व्यक्तीस आलंबून तो तो रस उत्पन्न होतो असें समजावें.

स्त्रीजातीय व्यक्तींत नायिका ही मुख्य मानिली आहे. जसें पुरुषव्यक्तींत नायकाचें प्राधान्य आहे. तसेंच स्त्रीजातीय व्यक्तींत नायिकेचें प्राधान्य आहे; कारण तिचें नायकाप्रमाणेंच मुख्यत्वानें वर्णन कर्तव्य असतें. ही गोष्ट केवळ शृंगार व करुण रसप्रधान काव्यासच लागू आहे. वीररसप्रधान काव्यास लागू नाहीं. कारण स्त्रिया बहुत करून अबला असतात असा समज पडल्यानें त्यांच्या अंगीं तादृश वीररसोत्पादक गुण नसतो, असें मानलें आहे. म्हणून प्राचीन संस्कृत कवींच्या वीररसप्रधान काव्यांत यद्यपि नायिका वर्णिली असते, तथापि तिचें तादृश प्राधान्य नसतें. उदाहरणार्थ वेणीसंहारवीरचरितादि नाटकें पहावीं. मुद्राराक्षस नाटक यद्यपि वीररसप्रधान नाहीं, तरी त्यांत नायिका मुळींच नाहीं. याचें कारण त्यांत शृंगार किंवा करुण यांपैकीं एकही रस प्रधान नाहीं. प्राचीन इतिहासांत याविरुद्ध कांहीं उदाहरणें आहेत; परंतु त्यांवर काव्यरूपानें झालेला ग्रंथ अजून आढळांत नाहीं. अर्वाचीन एतद्देशीय इतिहासांतही कांहीं उदाहरणें झालीं आहेत, व त्यांपैकीं एकावर

नाटकरूपानें एक ग्रंथही झाला आहे, परंतु त्यांत तादृश वीररस साधला नाहीं. अस्तु.

नायिकांचे, संस्कृत साहित्यशास्त्रवेत्त्यांनीं मुख्य भेद तीन कल्पिले आहेत.—१ स्वस्त्री, २ परकीय स्त्री, ३ साधारण स्त्री.

१ स्वस्त्री ही, विनय, आर्जव इत्यादिकांनीं युक्त, सर्व गृहसंबंधीं कर्म पाहणारी, म्हणजे घरांतील कामावर देखरेख ठेवणारी, आणि पतिव्रता, अशी असावी; हिचे मुग्ध, मध्य, प्रगल्भ असे तीन भेद केले आहेत. जिच्या तारुण्यास नुकताच प्रारंभ झाला आहे, जिच्या अंगीं मदनविकार नुकतेच दिसूं लागले आहेत, क्रीडेविषयीं इच्छा असूनही अनुकूल होत नाहीं, जिला मान कमी म्हणजे पतीच्या नव्या संगमामुळें मान दाखवीत नाहीं, जी अतिशय लाजाळू, तिला मुग्धा म्हणावें.—जिला अनेक प्रकारची क्रीडा आवडते, तारुण्याच्या भरांत आलेली, मदनविकार फार दाखविते, थोडेसें प्रौढ भाषण करिते, आणि जिची भीड थोडिशी चेपली आहे, तीस मध्या म्हणावें. जिचे मदनविकार वारंवार नजरेस येतात, तारुण्यानें पूर्ण, अनेक प्रकारच्या क्रीडेंत निपुण, जिची भीड बरीच चेपली आहे, तीस प्रगल्भा म्हणावें. यांमधून मध्या आणि प्रगल्भा या प्रत्येकीचे धीर, अधीर, धीराधीर असे तीन तीन भेद केले आहेत. हे जे तीन भेद केले आहेत, ते धृष्टनायक व शठनायक यांचा संबंधानें केले आहेत, असें मागें जें सांगितलें आहे त्यावरून स्पष्ट दिसेल. कारण, नायिकांची अशी स्थिति होण्यास कारण, नायक असून त्याणें नायिकेवर कमी प्रीति ठेवणें, हेंच होय. हे भेद दक्षिण नायकाच्या ही संबंधानें होतील असें म्हणूं नये; कारण त्याची प्रीति सर्व नायिकांवर सारखी असते. तेव्हां ह्या त्याच्या अवस्था क्रोधामुळें होतात हें सांगणें नको. मध्याधीरा ही नायकाला वांकडें मर्मभेदक भाषण करून संताप करिते. धीराधीरा ही रडून क्रोध दाखविते. अधीरा कठोर भाषणानें त्रास देते. प्रगल्भाधीरा ही आपल्यास कोप आलासें दाखवीत नाहीं, परंतु हिचें क्रीडेवर मन राहत नाहीं, आणि वरवर मात्र पतीचा आदर केलासा

दाखविते. धीराधीरा ही कपटभाषणानें त्रास देते. अधीरा ही क्रोधाने भर्त्सना करिते. असे हे सहा भेद आतां सांगितले; या प्रत्येकाचे ही नायकास आवडती, नावडती, असे दोन दोन भेद केले आहेत. म्हणजे मध्या व प्रगल्भा यांचे मिळून बारा भेद झाले. आणि वर मुग्धा म्हणून सांगितली आहे, ती धरून स्वस्त्रीचे एकंदर तेरा भेद झाले.

२. परकीय स्त्री हिचे दोन भेद केले आहेत; परोढा म्हणजे दुसऱ्यानें विवाहित, आणि कन्यकाः यांपैकीं पहिली ही वारंवार घरांतून बाहेर जाणारी, कुलटा व निर्लज्ज असते. कन्यका ही अविवाहित, भिडस्त, व नुक्तीच तारुण्यांत येत असणारी अशी असावी. हिला परकीय म्हणण्याचें कारण ही आईबापांच्या अगर पितृकुळासंबंधीं वडील माणसांच्या आधीन असते. उदाहरणार्थ मालतीमाधव नाटकांतील नायिका मालती.

३. सामान्यनायिका म्हणजे जिला विवाहित नायक नसतो, व सर्व पुरुषांची नायिका करितां येते ती. अशी नायिका वेश्याच असणार. ही धीर कलेमध्यें निपुण व प्रगल्भ असून, ज्यांच्या अंगीं गुण नाहींत त्यांचा द्वेषही करीत नाहीं; तसेंच गुणवानावर आसक्त ही नसते. ही केवळ धन पाहून वरवर अनुराग दाखविते. धनास्तव एखाद्या पुरुषावर प्रीति दाखवून, तो धनहीन झाला म्हणजे त्यास घालवून देते. हीची खरी प्रीति बहुधा चोर, मूर्ख, पुंड्रक ज्यांना श्रमावांचून द्रव्य मिळतें ते, धर्माचे ढोंग गाजविणारे इत्यादिकांवर असते. ही कामवश होऊन क्वचित् अनुरक्त होते. परंतु ही रक्त किंवा विरक्त कशीही असली तरी हिचा संगम होणें कठिणच.

हे एकंदर नायिकांचे सोळा भेद झाले. ह्या प्रत्येकीचे नायकजन्य अवस्थांतरानें आठ आठ भेद होतात. म्हणजे नायिकांचे एथपर्यंत एकशें अठ्ठावीस भेद झाले.

१. स्वाधीन नायका—ही आपल्या विचित्र विलासांनीं नायकास आपल्या ठायीं इतकें आसक्त करून घेते कीं त्यास तिच्याजवळून हाला-

वेंसें वाटतच नाहीं. २ दुसऱ्या नायिकेमुळें जी हेव्यानें संतप्त होते, तीस खंडिता म्हणावें. ३ अभिसारिका ही भेटीच्या स्थलाचा संकेत करिते. ४ जी नायक मधुर भाषणें करीत असतांही त्याचा अव्हेर करिते, व तो गेल्यानंतर जिला पश्चात्ताप होतो तीस कलहांतरिता असें म्हणावें. ५ जिचा नायक संकेत करूनही संकेतस्थळीं येत नाहीं, तीस विप्रलब्धा असें म्हणावें. ६ अनेक कारणांमुळें जिचा नायक विदेशीं गेला आहे तिला प्रोषितभर्तृका म्हणावें. ७ वासकसज्जा ही आपला नायक येणार आहे असें वर्तमान ऐकून आपलें राहण्याचें घर शोभिवंत करून ठेविते. ८ जिच्या नायकाच्या मनांत यावयाचें असून ही दैवानें तिजकडे जात नाहीं, म्हणून जी दुःखानें व्याकुळ होते ती विरहोत्कंठिता होय.

ह्या आठ भेदांनीं एकंदर १२८ भेद होतात म्हणून नुक्तेंच सांगितलें; यांचेही उत्तम, मध्यम व अधम असे भाग करून ३८४ भेद केले आहेत. ह्यांचाही संकर होऊन यांहून अधिक प्रकार होण्याचा संभव आहे; परंतु तितकें लांब जाण्यांत हशील नाहीं.

जसे पुरुषांच्या अंगीं सात्त्विक गुण असतात, तसेच स्त्रियांच्या अंगींही असतात. हे त्यांचे सात्त्विक गुण एकंदर अठ्ठावीस आहेत. त्यांचीं नांवें व लक्षणें एका खेपेंतच सांगूं.

१ **भाव** म्हणजे मनाला कोणच्या प्रकारचा विकार नसतां प्रथमच जो विकाराचा अंकुर फुटतो तो. २ **हाव** म्हणजे कांहीं अंगविकारांनीं पूर्वोक्त भावाचा जो थोडासा परिस्फोट तोच होय. ३ आणि तोच पूर्वोक्त भाव अधिक पूर्णपणें अंगविकारांनीं दुसऱ्यांच्या लक्षांत येण्याजोगा झाल्यास त्यालाच **हेला** म्हणतात. हे तिन्हीही सात्त्विक अलंकार तारुण्यांत त्यांच्या अंगींच असत. हे गुण पुरुषांच्या ठायींही असतात. ४ रूप, तारुण्य इत्यादिकांनीं जें शरीरास सौंदर्य येतें, त्यास **शोभा** म्हणावें. ५ तीच शोभा मदनानें वृद्धिंगत झाली असतां तिला **कांति** म्हणतात. ६ तीच कांति फार विस्तृत

झाली म्हणजे तिला **दीप्ति** असें म्हणतात. ७ कोणत्याहि स्थितींत असलें तरी रमणीय दिसणें ह्याला **माधुर्य** म्हणतात. ८ कोणत्याही वेळेस कावरेंबावरें न होणें याला **प्रागल्भ** म्हणजे प्रौढपणा म्हणतात. ९ नेहमीं विनययुक्त असणें यास **औदार्य** म्हणतात. १० **धैर्य** हें मागें सांगितलेंच आहे. हे शोभादिक सात गुण स्त्रियांत आपोआप यत्नावांचून येतात. ह्यांना बाह्य प्रसाधनांची गरज लागत नाहीं. हे गुणही पुरुषांत असतात. ११ शरीरानें, वेशानें, अलंकारानें, मधुर प्रीतियुक्त भाषणानें, नायकाची मर्जी संपादणें यांस **लीला** म्हणतात. १२ जाणें, उठणें, बसणें, मुखनेत्रादिकांची क्रिया यांमध्यें जी विशेष रमणीयता दिसते तिला **विलास** असें म्हणतात. १३ **विच्छित्ति** म्हणजे कांतीला वाढविणारी अशी जी थोडीशीच अकल्पित किंवा चमत्कारिक रचना ती. १४ आवडत्या वस्तूचाही गर्वानें अनादर करणें याला **बिब्बोक** म्हणतात. १५ इष्ट पदार्थांचा संगम झाला असतां हर्षानें गालांत किंवा मोठ्यानें हसणें, कोरडें रडणें, त्रास होणें, क्रोध येणें, श्रम होणें हे सर्व किंवा यांतील कांहीं प्रकार एकदम घडून येणें याला— **किलकिंचित** म्हणतात. १६ आपल्या नायकाच्या गोष्टी काढल्या असतां, मनावर त्याच्यासंबंधीं प्रीति ठसली, एतत्सूचक जे नायिकेचे कर्णकंडूयनादि व्यापार त्यांस **मोट्टायित** म्हणतात. १७ शरीरास स्पर्श केला असतां जरी हर्ष झाला तरी डोकें, मान हालविणें याला **कुट्टमित** म्हणतात. १८ नायकाच्या येण्यानें वगैरे हर्षानें व प्रीतीनें घाईत अलंकार भलतीकडेसच घालणें याला **विभ्रम** म्हणावें. १९ कोमलपणानें जो हात पाय इत्यादिकांचा व्यापार त्याला **ललित** म्हणतात. २० सौभाग्य, तारुण्य इत्यादिकांच्या गर्वामुळें झालेला जो मानसविकार त्यास **मद** म्हणावें. २१ बोलण्याची जरूर असतांही भिडेमुळें न बोलणें याला **विकृत** म्हणतात. २२ वल्लभाचा विरह झाला असतां मदनाच्या आवेशानें झालेले जे व्यापार त्यांना **तपन** असें म्हणतात. २३ एखादी वस्तु माहित असूनही

ती जशी कांहीं माहीतच नाहीं अशा तऱ्हेनें वल्लभास प्रश्न करणें याला **मौग्ध्य** असें म्हणतात. २४ नायकासमोर अर्धवट अलंकार घालणें, उगीच इकडे तिकडे पाहणें, थोडासा एकांत करणें याला **विक्षेप** म्हणतात. २५ एखादी सुंदर वस्तु पाहण्याविषयीं जी घाई करणें त्यास **कुतूहल** म्हणतात. २६ तारुण्याच्या परिस्फोटापासूनच उत्पन्न होणारें असें जें वृथा म्हणजे कारणावांचून हसणें त्याला **हसित** म्हणतात. २७ कांहीं तरी कारणावरून वल्लभाच्यासमोर भयानें घाबरें झाल्यासारखें दाखविणें याला **चकित** म्हणतात. २८ नायकाशीं एकांतीं जी क्रीडा तिला **केली** असें म्हणतात. ह्या २८ सात्त्विक गुणांपैकीं कांहींकांचीं उदाहरणें दिल्या-शिवाय ते समजावयाचे नाहींत, परंतु उदाहरणें देत बसल्यास विस्तार फार होईल म्हणून इतकेंच पुरे.

जशी नायकास शृंगारामध्यें विटविदूषकादि पात्रें सहाय असतात तशींच नायिकेसही असतात. तीं पात्रें मैत्रिण, दासी, दाई, संन्यासीण, चित्रें काढणारी वगैरे पुष्कळ आहेत. त्यांचे सामान्य गुण म्हटले म्हणजे सर्व प्रकारच्या कलेमध्यें निपुणता, उत्साह, नायिकेच्या ठायीं लोभ, गोड बोलणें, थट्टा वगैरे करण्याचें ज्ञान, बोलकेपणा, दुसऱ्याचें मन जाणणें इत्यादि होत. पात्रभूत आलंबनविभावाखेरीज आणखी कांहीं कांहीं राहिले आहेत ते त्या त्या रसाच्या वर्णनांत सांगूं.

उद्दीपन विभावाविषयींही मागें कांहींसें सांगितलें आहे, त्यापेक्षां थोडेंसें जास्त सांगणें जरूर आहे; परंतु तें येथें सांगत नाहीं. त्याचें विव-रण त्या त्या रसाच्या प्रसंगानें केलें जाईल.

(जान्युआरी १८७२, पु. ४, अं. १०)

लघुलिपि किंवा चिटणीसी अक्षर

आपल्या भरतखंडामध्यें, व तिबेट, ब्रह्मदेश, यांमध्यें ज्या लिपि चालत आहेत, त्यांतून बहुतेक सर्व देवनगरी किंवा बाळबोध लिपीपासून उत्पन्न झालेल्या आहेत. देवनगरी लिपि ही मुळीं संस्कृत भाषेची होय. ही लिपि पृथ्वीवर ज्या अनेक लिपि चालतात, त्या सर्वांत उत्कृष्ट होय. कारण या लिपीची रचना अशी कांहीं सुंदर केली आहे कीं, संस्कृत भाषेंतील प्रत्येक उच्चार दाखविण्याकरितां त्या लिपीमध्यें निरनिराळी खूण किंवा वर्ण केलेला आहे हें आपणा सर्वांस माहित आहे. इंग्रजी वगैरे कित्येक भाषांमध्यें एकाच वर्णाचे उच्चार अनेक होतात, व केव्हां केव्हां एकच उच्चार दाखविण्यास वेगवेगळे वर्ण योजिले जातात, यामुळें त्या लिपीनें लिहिलेल्या शब्दांचे उच्चार समजण्यास किंवा उच्चार ऐकून शब्द लिहिण्यास फार कठीण पडतें. परंतु संस्कृतामध्यें असें कधींही व्हावयाचें नाहीं. शब्द ऐकतांच संशयावाचून तो शुद्ध रीतीनें लिहितां येतो, व लिहिलेला वाचतां येतो. मराठी, हिंदी, अशा दोन तीन भाषांमध्यें ग्रंथादि लिहिण्याला देवनगरी लिपिच चालत आहे, व इतर देशभाषांच्या लिपि देवनगरीवरून झालेल्या आहेत. यामुळें या देशांतील लिपि इतर देशांतील लिपींपेक्षां फार चांगल्या आहेत यांत संशय नाहीं. या लिपीचे इतके प्रकार होण्याचें मुख्य कारण असें दिसतें कीं, संस्कृतची देवनगरी लिपि जरी उत्कृष्ट आहे, तथापि, जेथें झपाट्यानें लौकर लिहिण्याचें कारण पडतें, तेथें ही लिपि जलदीनें लिहितां येत नाहीं. यामुळें कारकुनी लिहिणारांनीं, तीच लिपि झपाट्यानें लिहिण्याच्या कामाला योग्य होण्याकरितां तिजमध्यें कांहीं अधिक उणें फांटे जोडून आपापल्या सोईप्रमाणें ते लिहूं लागल्यामुळें असे निरनिराळे प्रकार होत गेले. आपली मोडी लिपीही अशाच कारणानें उत्पन्न झालेली आहे, व कारकुनीच्या कामाला ती फारच सोईस्कर आहे. 'ही लिपि वारंवार मध्यें

हात न उचलतां पुष्कळ झपाट्यानें लिहितां येते. मराठी दरबारामध्यें सर्वत्र या मोडी लिपीचाच प्रचार असे, व पेशव्यांचें दप्तर सर्व सुंदर व स्वच्छ मोडी लिपीनें लिहिलेलें आहे. अद्यापिही जिल्ह्यामध्यें बहुधा सर्वत्र हीच लिपि चालू आहे. अशी ही चांगली लिपि आहे, तरी इच्यापेक्षांही झपाट्यानें लिहिण्याजोग्या आणखी एखाद्या नवीन लिपीची सांप्रत आपल्या देशांत फारच आवश्यकता आहे हें उघड आहे. इंग्लिश लोकांनीं एक नवी लिपि केली आहे, तिच्या योगानें त्या लोकांना मोठा लाभ जाहलेला आहे. त्या लिपीच्या योगानें इतकें त्वरित लिहितां येतें कीं, पार्लमेंट सभेंतील मोठमोठे वक्ते भाषण करीत असतां, त्याचें इत्थंभूत भाषण कागदावर बिनचूक उतरून घेऊन, ती सभा उठण्यापूर्वी छापूनही वाचावयास मिळतें. आपल्या मुंबई शहरांतील ' टाइम्स ' आणि ' गझेट 'या पत्रकर्त्यांपाशीं ही लिपि शिकलेले कारकून आहेत. ते, कोणी मोठा वक्ता भाषण करीत असतां किती हुशारीनें व त्वरेनें त्यांचें भाषण बिनचूक उतरून घेत असतात हें आपण नेहमी पाहत असतों. ही लिपि नसती तर आज जीं आपणांस अनेक पंडितांचीं इंग्लिश भाषेंतील पांडित्यें वाचायाला मिळतात, तीं व्यर्थ गेलीं असतीं. अशा प्रकारची एकादी लिपि आपल्या मराठी भाषेला योजण्याजोगी असती तर किती बरें चांगलें झालें असतें ? हीच इंग्रेजींतील लघु लिपि आपल्या भाषेंत योजण्यास काय हरकत, असा प्रश्न निघेल; परंतु ज्यांनीं ती लिपि पाहिली असेल, व ज्यांस इंग्लिश उच्चारांची माहिती असेल, त्यांच्या लक्षांत स्पष्टपणें येईल कीं, मराठी उच्चारांला व शब्दांला उपयोगी पडण्याचें त्या लिपीच्या अंगीं सामर्थ्य नाहीं. मराठी भाषेकरितां एक नवीनच लिपि केली पाहिजे. मग ती लिपि त्या इंग्लिश लिपीच्या साहाय्यानें रचलेली असो, किंवा स्वतंत्र वेगळीच रचलेली असो. परंतु ती नवीन केली पाहिजे. आमचे इतके विद्वान लोक आहेत, त्यांतून कोणी प्रयत्न केला असतां हें काम सहज होऊन जाईल.

एका गृहस्थानें हें काम हातीं धरलें आहे व तें लवकरच तयार होईल असें आमच्या समजण्यांत आहे. या पुस्तकाचा हेतु मुख्यत्वें त्वरित लेखन हा तर आहेच, परंतु त्याबरोबर आणखी स्पष्टपणा हाही साधला पाहिजे; नाहीं तर झपाट्यानें लिहिलें, परंतु वाचण्याची मारामार, असा प्रकार होईल. याकरितां या गोष्टीकडे पूर्ण लक्ष असावें अशी त्या ग्रंथकारास सूचना आहे.

(जुलै, सन १८७०, पु. ३, अं. २)

प्राचीन लिपि

आपल्या भरतखंडांत ज्या अनेक लिपि चालत आहेत, त्यातून बहुतेक सर्व देवनागरी लिपीपासून उत्पन्न झाल्या आहेत, असें त्यांच्या वळणावरूनच दिसण्यांत येतें. तथापि आपली देवनागरी किंवा बाळबोध या नामानें सांप्रत जी प्रख्यात आहे, ती सदोदित प्राचीन काळापासून सांप्रतच्याच स्वरूपानें वागत आली आहे असें म्हणतां येत नाहीं. प्रारंभीं देवनागरी लिपि कधीं उत्पन्न झाली, याविषयीं आलीकडील युरोपियन पंडितांचीं मतें फार विलक्षण आहेत. कित्येक असे आग्रही आहेत कीं, वेदांच्या उत्पत्तीच्या वेळीं किंबहुना आलिकडे म्हणजे महान् व्याकरणकार जो पाणिन्याचार्य त्याच्याही वेळीं ब्राह्मण लोकांना लिहिण्याची विद्या माहित नव्हती, व या देशांत अशी लिपि स्वतंत्रपणें उत्पन्न होणें ही गोष्ट असंभव्य असे पक्ष घेऊन ते भांडत आहेत. अशा प्रकारचे विलक्षण पोकळ तर्क काढण्यामध्यें मुख्यत्वें जर्मन लोक फार कुशल असतात. त्यांणीं ग्रीक भाषेच्या लिपीविषयीं ही अशीच कल्पना काढली होती, कीं त्या भाषेंत उत्तम काव्य करणारा जो जुनाट कवि होमर या नांवानें प्रख्यात आहे, त्या नांवाचा मुळीं मनुष्यच नव्हता, व कदाचित् कोणी असलाच, तर त्यानें प्राचीन कवींचीं कवनें मात्र एकत्र केलीं असतील. त्याला लेखनविद्या माहित नव्हती, म्हणून त्याणें तीं फक्त मुखोद्गत करून लोकांना म्हणावयास शिकविलीं. परंतु हे सर्व तर्क अगदीं व्यर्थ आहेत,असें आलिकडे सिद्ध झालें आहे. तसेंच वेदांच्या काळीं भरतखंडामध्यें लेखनकला होती अशाविषयीं सबळ प्रमाणें कित्येक एतद्देशीय पंडितांनीं देऊन वरील मतांचें खंडण केलें आहे. परंतु त्यांचे सर्व सिद्धांत वगैरे येथें उतरून घेण्यास तूर्त स्थळ नाहीं; अवकाशानुसार पुढें तसें करूं. आपल्या देशामध्यें लिपि उत्पन्न होऊन कितीही वर्षें झालेलीं


असोत, व ती या देशींच उत्पन्न झालेली असो किंवा परदेशांतून आलेली असो, सांप्रत या अंकामध्यें देवनागरी लिपीचीं जीं अनेक स्वरूपें झालीं आहेत, तीं बहुतेक देतों. प्राचीन काळीं मोठमोठया राजादिकांनीं, मोठमोठे स्तंभ बांधून त्यांवर अनेक उपयोगी व मोठमोठया गोष्टींविषयीं लेख कोरून ठेविले आहेत; तसेंच मोठमोठया धर्मोपदेशकांनीं, धर्मप्रवर्तकांनीं व साधूंनीं गुहा कोरून त्यांमध्यें ही लेख कोरलेले आहेत. परंतु त्यांची लिपि नष्ट झाल्यामुळें त्यांस पांडवांचे लेख हा शब्द लावून त्यांविषयीं विशेष शोध करण्याच्या भरीस कोणी पडत नाहीं. तसेंच कित्येक प्राचीन राजांनीं ब्राह्मणादिकांस अग्रहारें व इतर इनामें देऊन त्यांचे ताम्रपट करून दिले आहेत; परंतु जरी त्या अग्रहारादिकांचा अक्षतमरिष्ट उपयोग त्यांचे वंशज करीत आहेत, तरी त्या ताम्रपटामध्यें काय काय लिहिलें आहे तें समजत नाहीं असें होऊन गेलें होतें; परंतु कांहीं वर्षांपूर्वीं म्हणजे सन १८३८ सांत कलकत्ता येथें प्रिन्सेप म्हणून एक इंग्रज होता त्याणें मोठया प्रयत्नानें व विद्वान पंडितांच्या साहाय्यानें त्या लिपि वाचल्या आणि छापून प्रसिद्ध केल्या. तेव्हांपासून प्राचीन लेखांकडे पुष्कळ विद्वानांचें लक्ष लागलें, व आलिकडे अनेक लेखांचे उतारे सांप्रतच्या देवनगरी लिपीनें करून, त्यांचीं इंग्रजी भाषांतरें ही झालीं आहेत, व त्यांवरून प्राचीन इतिहासासंबंधीं मोठमोठया अनेक गोष्टींचें ज्ञान झालें आहे. एथील प्रख्यात डॉक्टर भाऊ दाजी यांनीं इतर अनेक गोष्टींप्रमाणें प्राचीन लेखांकडे ही पुष्कळ लक्ष दिलें आहे, व त्यांपासून अनेक शोध काढले आहेत. याप्रमाणें या लेखांसंबंधी माहिती पुष्कळ मिळण्याजोगी आहे; तथापि ते शोध वगैरे इंग्रजी भाषेनेंच लिहिलेले असल्यामुळें इंग्रजी जाणणारांवांचून इतरांना तो विषय गम्य होत नाहीं. याकरितां पुढें लिपि उतरून घेतलेल्या आहेत, त्यांकडे आमचे वाचक व इतर लोक लक्ष देतील, तर त्यांपासून पुष्कळ फायदा होण्याजोगा आहे. प्राचीन काळचीं तुटकीं मोडकीं अनेक देवालयें आपल्या देशामध्यें गांवोगांव आहेत, व त्यांमध्यें अनेक शिलालेखही


कोठें कोठें आढळतात, ते वाचून पाहण्याला, यांपासून फार सोई होईल. आतां ही एक गोष्ट खरी आहे कीं, ते सर्व लेख संस्कृत भाषेंतच लिहिलेले आहेत असें नाहीं. यामुळें ते समजण्याला पहिल्यानें किंचित् अडचण पडेल. तथापि त्या लेखांकडे अमळ विशेष लक्ष दिलें असतां ते चांगले समजूं लागतील. बहुतेक लेख संस्कृत भाषेचेच आहेत. तथापि बुद्धधर्मी लोकांची भाषा मागधी म्हणून जी होती, त्या भाषेचे लेख फार अढळतात. ही भाषा संस्कृताचा अपभ्रंश होऊन झालेली आहे, यामुळें वहिवाटीवरून ती सहज समजूं लागते. दुसरें, हे लेख समजूं लागल्यापासून इतकें तरी होईल कीं, दिवसेंदिवस मोडून धुळीस मिळत चाललेल्या ज्या अनेक इमारती, त्यांवर कोठें लेख दृष्टीला पडल्यास त्याचा अर्थ लावण्याच्या हेतूनें जशाचा तसा उतरून घेण्याची तरी कोणाला इच्छा होईल, व तसें करून ते सांप्रतच्या लिपीनें लिहिले असतां त्यांचा अर्थ समजण्यास अडचण पडणार नाहीं. कदाचित् जरी अर्थ न समजला तरी सांप्रत अनेक वर्तमानपत्रें प्रसिद्ध होत असतात. त्यांच्या द्वारानें जरी तो प्रसिद्ध केला, तरी हरकत नाहीं. कोणीही ती भाषा जाणणारा त्याचा अर्थ लावील. हे लेख पाहिले असतां त्यांचीं अक्षरें अगदीं वळणदार दिसत नाहींत, व आपल्या परिपक्व संस्कृत भाषेला शोभण्याजोगीं व बरोबर बिनचूक समजण्याजोगीं तीं नाहींत; या कारणावरून कित्येक असा तर्क करितात कीं ब्राह्मणांची वेदादि धर्मग्रंथ लिहिण्याची जी प्राचीन लिपि, तिचें स्वरूप केवळ इतकें अशुद्ध प्रकारचें असावें असें म्हणवत नाहीं; आणि हें म्हणणें खरें दिसतें. कारण सांप्रतची लिपि जरी इतकी सुंदर आहे तथापि मोठमोठ्या राजे लोकांचेही मोर्तब, शिक्के, नाण्यांवरील ठसे, ताम्रपट, वगैरेंचीं अक्षरें किती ओबड धोबड असतात हें सर्वांस माहित आहे. कागदावर लिहिणारांनीं जरी चांगलीं अक्षरें लिहिलीं, तरी अक्षरें कोरणार हुशार नसल्यामुळें हा परिणाम होतो. प्राचीन काळची लिपि आतांच्या लिपीपेक्षां सुरेखपणामध्यें पुष्कळच कमी होती हें तर उघड दिसतें; आणि तो मासला धरून


कोरणारांनीं अक्षरें कोरलेलीं त्यांहून वाईट यावयाचींच. तशांत ब्राह्मणांचे धर्मग्रंथ व इतर शास्त्रीय विषय लिहिण्यास अक्षरें जितकीं सुरेख काढलेलीं असतात, तितकीं दरबारी लेखांमध्यें आढळणें म्हणजे कठीण आहे. तसेंच बुद्धधर्मी लोकांचें ही लक्ष शुद्ध लेखाकडे फारसें नव्हतें, हें त्यांच्या अशुद्ध भाषेवरूनच उघड दिसतें. असो. यापुढील कोष्टकामध्यें प्राचीन लिपि व त्यांपासून उत्पन्न झालेल्या असून सांप्रत चालू असलेल्या, अशा मिळून एकंदर सत्रा लिपि दिल्या आहेत. यामध्यें जे अंक दिले आहेत ते डॉक्टर भाऊदाजींनीं प्रसिद्ध केलेल्या लेखावरून घेतले आहेत.

(मार्च, सन १८७१, पु. ३, अं. १०)

देवनागरी किंवा बालबोध.	अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ ऌ ॡ ए ऐ ओ औ अं अः
शा. शकापूर्वी ५०० वर्षे किंवा बुद्धधर्मारंभ.	
अनिश्चित काळ पश्चिमेकडील गुहा.	
शा. शकापूर्वी २०० वर्षे अशोक राजाचे लेख.	
शालि. शकाचा आरंभ. गुजराथेंतील ताम्रपट.	
शा. शकसुमारें ४००, गुप्तवंश.	
शा. शकसुमारें ६००. तिबेटांतील लेख.	
शा. शकसुमारें ९००. कुटिल लेख.	
नर्मदातीरचे लेख	
कृष्णातीरचे लेख.	
बंगाली	
गुजराथी	
पंजाबी	
काश्मीरी.	
उत्कल किंवा ओढीसा.	
कानडी	
मराठी मोडी.	






शके ४०० पासून १२०० पर्यंत

बंगाली व्याकरण

दिवसें दिवस निरनिराळ्या देशांचें परस्परांशीं संघट्टन वाढत चालल्यापासून त्यांच्या त्यांच्या आचारविचारांच्या, व विद्याकलाकौशल्यादिकांच्या माहितीची परस्परांस फार आवश्यकता उत्पन्न होत असते हें सर्वांस ठाऊक आहे. तशांत एकाच देशांतील राहणाऱ्यांस परस्परांची भाषा न समजणें ही तर कांहीं अशीं लज्जास्पद गोष्टही आहे, असें म्हणण्यास कांहीं बाध नाहीं. आलिकडे भरतखंडाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत मनुष्य, चार सहा दिवसांत आगगाडीच्या योगानें जाऊं येऊं लागल्यापासून कनिष्ठपक्षीं या देशांतील तरी लोकांच्या भाषा परस्परांस अवश्य समजल्या पाहिजेत. याकरितां आमच्या पुस्तकामध्यें या निरनिराळ्या भाषांविषयीं व त्यांच्या व्याकरणाविषयीं थोडक्यांत समजण्याजोगे विचार व नियम देण्याला आम्हीं आरंभ केला आहे. सध्या बंगाली भाषेचें व्याकरण देऊं.

प्रथमतः ही गोष्ट सर्वांनीं लक्षांत ठेविली पाहिजे कीं, भरतखंडांतील सर्व भाषांचे सामान्य नियम बहुधा एकसारखे असून त्यांत संस्कृतापासून उत्पन्न झालेल्या भाषा तर परस्परांशीं अगदींच निकट संबंधानें वागतात, व त्यांत आणखी ज्याला मराठी भाषा चांगली समजत आहे त्याला तर सर्व प्राकृत भाषा म्हणजे संस्कृतापासून बालभाषेच्या द्वारें निघालेल्या सर्व भाषा अगदीं सुलभ आहेत. बंगाली भाषेचा विस्तार जरी मराठीपेक्षां बराच मोठा असला, **तरी मराठी लोकांना बंगाली भाषेचें व्याकरण म्हणजे केवळ अर्ध्या तासाचें काम आहे**, हें सर्वांनीं पक्कें समजावें. तसाच शब्दसंग्रहही मराठीपासून फारसा वेगळा आहे असें नाहीं. याकरितां या विषयाकडे वाचक लोकांनीं आणि इतरांनीं ही लक्ष दिलें असतां भाषा सहज येण्याजोगी असून आलीकडे जीं त्या भाषेमध्यें विद्वान

बंगाली अक्षरें.

स्वर.

অ अ আ आ ই इ ঈ ई উ उ ঊ ऊ ঋ ऋ ৠ ॠ
ঌ ऌ ৡ ॡ এ ए ঐ ऐ ও ओ ঔ औ অং अं অঃ अः

व्यंजनें.

ক क খ ख গ ग ঘ घ ঙ ङ চ च ছ छ জ ज ঝ झ ঞ ञ
ট ट ঠ ठ ড ड ঢ ढ ণ ण ত त থ थ দ द ধ ध ন न
প प ফ फ ব ब ভ भ ম म য य র र ল ल ব व
শ श ষ ष স स হ ह ক্ষ क्ष
১ १ ২ २ ৩ ३ ৪ ४ ৫ ५ ৬ ६ ৭ ७ ৮ ८ ৯ ९ ১০ १०

া ি ী ু ূ ে ৈ ো ৌ ং ঃ
ক কা কি কী কু কূ কে কৈ কো কৌ কং কঃ

[illegible]

१ गणेश. ✓ ईश्वर.

लोक उपयुक्त विषयावर अनेक पुस्तकें लिहीत आहेत त्यांचाही उपयोग आपणांस सहज होईल.

१ लिपि—ही देवनागरी (मराठी)पासून झालेली आहे, यांत भ्रांति नाहींच; तथापि लिहिण्याच्या दुर्लक्षामुळें तिचें वळण किंचित् अस्पष्ट झालें आहे. या भाषेंतील मूळाक्षरें, जोडाक्षरें, काना मात्रा इत्यादिक वेगळ्या कागदावर छापून जोडलीं आहेत.

२ **उच्चार**—बंगालीमध्यें संस्कृत शब्दांचा भरणा पुष्कळ झाला आहे; तथापि त्यांचा उच्चार ते लोक बहुधा फारच अशुद्ध रीतीनें करीत असतात.

अ याचा उच्चार ते बहुधा ऱ्हस्व ओकारा सारखा करितात. उदाहरण—अनल, मधुसूदन, याचा उच्चार कांहींसा ओनोलो, मोधुसूदनो, अशा प्रकारचा करितात.

ड, ढ, यांचा उच्चार बहुधा संस्कृत शब्दांमध्यें मराठींतल्या सारखाच होतो; परंतु इतरत्र हिंदुस्थानीप्रमाणें कांहींसा र आणि ह्व यांसारखा होतो, व तो दाखविण्याकरितां त्या अक्षराखालीं एक बारीक बिंदु देत असतात.

य चा उच्चारही बहुधा ज सारखा होतो. शुद्ध **य** चा उच्चार दाखविण्या करितां त्याच्याखालीं बिंदु देतात.

ण, आणि **न,** या दोहोंचाही उच्चार न सारखाच.

व, आणि **ब,** हीं दोन्ही अक्षरें एकसारखींच लिहितात. उच्चार बहुधा ब सारखा होतो; परंतु **ग, म, र,** यांशिवाय इतर व्यंजनांपुढें तें अक्षर आलें असतां प्रायः त्याचा उच्चार व होतो.

श, ष, स, या तिहींचाही उच्चार प्रायः **श** सारखा करितात. उ० शशी, सिद्ध (शिद्ध), षोडश (शोडश), इ०; परंतु ऋ, र, न, यांपूर्वी श चा उच्चार स होतो. उ० शृगाल (सृगाल), श्री (स्री), प्रश्न (प्रस्न), इ० तसेंच ऋ, त, थ, न, र, यांपूर्वी स चा उच्चार

प्रायः फिरत नाहीं. उ० सृष्टि, स्तव, स्थान, स्नान, स्रक्, लिप्सा, जुगुप्सा, इ०

ह्य चा उच्चार ज्झ सारखा. उ० सह्य–(सज्झ), बाह्य (बाज्झ), इ०

व्ह चा उच्चार ब्भ सारखा. उ० जिव्हा (जिब्भा), गव्हर (गब्भर), बव्हाशी (बब्भाशी) इ०

क्ष आणि ज्ञ यांचा उच्चार ख्य आणि ग्यँ यांसारखा होतो. जोडाक्षरामध्यें म हा दुसरा किंवा तिसरा वर्ण असल्यास त्याचा उच्चार न होतां पूर्व वर्ण सानुनासिक मात्र होतो. उ० लक्ष्मी (लख्यीँ), पद्म (पद्दँ), इ०

ऋ, ऌ, यांचे उच्चार कांहींसे रु, लु, यांसारखे आहेत.

३ लिंग.—या भाषेंत पुल्लिंग, आणि स्त्रीलिंग मात्र आहे. संस्कृतांतील नपुंसक शब्द बंगालीमध्यें पुल्लिंगवत् मानतात.

४ वचन.—बहुवचनी रा, एरा, दिग, गण, आणि गुला, हे प्रत्यय लागतात. उ० पशु, पशुरा; लोक, लोकेरा; मनुष्य, मनुष्यगण; वृक्ष, वृक्षगुला; इ०

(अ) यांतील रा प्रत्यय प्रायः सजीव जंतुवाचक नामाच्या प्रथमेच्या बहुवचनीं लागतो. उ. पशु, पशुरा, इ.

(आ) निर्जीव पदार्थांना बहुवचन नाहीं; परंतु तदर्थी समूह, सकल इत्यादि शब्दांची योजना करतात. उ. प्रस्तर सकल म्हणजे धोंडे (बहुव.)

(इ) एरा हा प्रत्यय अकारांत आणि कित्येक व्यंजनांत शब्दांपुढें लागतो. जसें—मनुष्य, मनुष्येरा; गुणवान्, गुणवानेरा; इ.

(ई) दिग हा प्रत्यय प्रथमेला लागत नाहीं. केव्हां केव्हां रा, दिग, गुला इत्यादि बहुवचनसूचक शब्द लागल्यावांचून बहुवचन समजतां येतें. उ. **एखानकार लोक बड मंद,** (या स्थळचे लोक फार मंद), **अश्वथगाछ बढ उच्च हइया थाके,** (पिंपळाचीं झाडें फार उंच

वाढतात) या ठिकाणीं लोकोरा (बहुवचन) आणि गाछ सकल (बहुवचन) असा अर्थ होतो.

(उ) नामाच्या पूर्वी संख्यावाचक शब्द असल्यास, त्यापुढें बहुत्वसूचक दुसरा प्रत्यय लावावा लागत नाहीं. उ. पंचश जन लोक लोक; (पन्नास मनुष्य), पंचिश जनरे काज; (पंचवीस जणांचें काम); इ.

५ केव्हां केव्हां शब्दाला एकवचनी टि किंवा टा लागतो, परंतु त्यापासून कांहीं अर्थभेद होत नाहीं. उ. शिशुटि, वृद्धटि, गृहटा इ. संख्यावाचकाला हीं अक्षरें बहुवचनींही लागतात. उ. दुइटि (दोन), चारटि (चार) इ.

तसेंच खान, खानि, यांपासून तुकडा; गाछा, गाछि, यापासून एकत्व टुकि, टुकु, यांपासून अल्पता; गोटा, गुटि यांपासून अनिश्चय किंवा सुमार बोधित होतो. उ. पुस्तकखान, पुस्तकखानि [लहानसें पुस्तक]; चुल गाछि [एक केश]; जलटुकु [थोडेंसें पाणी]; गोटादश [सुमारें दहा, दहा बारा]; गुटिबार [सुमारें बारा]. यांतून खानि, गाछि, टि, टुकि, हे प्रत्यय आदरसूचक आहेत.

६ विभक्ति प्रत्यय उभयवचनीं सारखेच.

प्रथमा	०
द्वितिया	के, रे.
तृतीया	द्वारा, दिया, ए, य, ते, करिय, कर्तृक.
चतुर्थी	(द्वितीयेप्रमाणें.)
पंचमी	हइते (पेक्षां, पासून) थेके, ए.
षष्ठी	र.
सप्तमी	ए, य, ते.
संबोधन	प्रथमेप्रमाणें.

यांतील त आणि र प्रत्यय लागते वेळीं अकारांत आणि व्यंजनांत शब्द एकारांत होतात. मनुष्य–र, मनुष्येर (मनुष्याचा); वयस्–र, वयसेर

(वयाचा); वृक्ष--ते, वृक्षेते (वृक्षांत); वयस्–ते, वयसेते (वयांत)इ. संबोधनीं केव्हां केव्हां संस्कृत रूपें ही घालतात. उ. कन्ये, पितः, बन्धो, इ.

लोक शब्द

एकव.	बहुव.
१ लोक	लोकेरा
२ लोकके	लोकदिगके
३ लोकद्वारा	लोकदिगेर द्वारा
५ लोक हइते	लोकदिगेर हइते.
६ लोकेर	लोक दिगेर
७ लोके	लोक दिगते (अप्रसिद्ध)
सं. लोक	लोकेरा

७ विशेषणास लिंग, वचन, विभक्ति नाहीं; परंतु विशेषण नामाप्रमाणेंच योजलें असलें तर त्यास नामाप्रमाणें विभक्त्यादि लागतात. उ. सतीर (सतीचा), विद्वानदिगेर (विद्वानांचा), इ०

८ सर्वनामें—सर्वनामांनाही लिंगभेद नाहीं.

सर्वनामें

	सन्मानार्थक	तुच्छार्थक
(मी)	आमि	मुइ.
(आपण)	आपनि	
(तूं)	तुमि	तुइ
(जो)	जाहा, जा, जिनि	जे
(तो)	ताहा, ता, तिनि	से
(हा)	एइ, इहा, इनि	ए
तो (दूरचा)	ऐ, उहा, उनि	ओ
(कोण)	के, कि, कोन	कोन, के.
(सर्व)	सब	

९ सर्वनामास विभक्ति लागतांना होणारीं रूपांतरें (सामान्यरूपें)

मूळ सर्वनाम	रूपांतर	मूळ सर्वनाम	रूपांतर
आमि	आमा	जिनि	जाँहा
तुमि	तोमा	जे	जाहा, जा
आपनि	आपना	के	काहा
तुइ	तो	तिनि	ताँहा
से	ताहा	ए	ईहा
इनि	इहा		

यांत आमा, आणि तोमा यांच्या प्रथमा बहुवचनी आकारांताचा अकारांत होतो. उ० आमरा, तोमरा; परंतु इतर शब्दांमध्यें कांहीं फेर पडत नाहीं. आपनि शब्द द्वितीय पुरुषीं असल्यास आपनका असें सामान्यरूप होतें.

आमि शब्दाची रूपावली

	एकवचन	बहुवचन
१	आमि	आमरा
२	आमाके	आमादिगके
३	आमाद्वारा	आमादिगेरद्वारा
५	आमाहइते	आमादिगेरहइते
६	आमार	आमादिगेर
७	आमाते	आमादिगते.

याप्रमाणेंच तुमि हा शब्द चालतो; इतर सर्व सर्वनामाचीं रूपेंही अशींच चालतात. परंतु प्रथमेच्या बहुवचनीं तीं ऱ्हस्व मात्र होत नाहींत. (पुढें चालेल.)

(ऑगस्ट १८७१, पु. ४, अं. १)

बंगाली व्याकरण

(पुढें चालू)

क्रियापदें

बंगाली क्रियापदें मराठीप्रमाणेंच सकर्मक आणि अकर्मक आहेत; व त्यांपासून प्रयोज्य रूपें ही होतात.

या भाषेच्या व्याकरणांत मुख्य काळ तीन आहेत. वर्तमान, अतीत (भूत), आणि भविष्यत्.

वर्तमान दोन प्रकारचा आहे. १ विशुद्ध वर्तमान, आणि २ नित्यप्रवृत्त वर्तमान.

१. विशुद्ध वर्तमान हा मराठींतील अपूर्ण वर्तमान होय. यापासून क्रिया चालू आहे असा बोध होतो.

२. नित्यप्रवृत्त, हा मराठी रीतिवर्तमान होय. परंतु यापासून सामर्थ्यही बोधित होतें.

अतीत (भूत) यामध्यें १ अद्यतन (नुकताच गेलेला), २ अनद्यतन (वर्तमानभूत किंवा भूतवर्तमान) ३ परोक्ष (भूतभूत) ४ नित्यप्रवृत्त (रीतिभूत) आणि ५ असंपन्न (अपूर्णभूत) असे पांच भेद आहेत.

भविष्यत् काळाचें रूप एकच आहे.

हे सर्व काळ स्वार्थी आहेत, तथापि स्वार्थी हें नांव ते योजीत नसतात. त्यामध्यें वेगवेगळे काळच मानतात. यांशिवाय १ संभावना आणि समर्थना (शक्यता) यांचीं सूचक (शक्यरूपें); २ अनुज्ञा, जिज्ञासा, प्रार्थना, एतद्वाचक (आज्ञार्थ); ३ विधिवाचक; आणि ४ संकेतार्थवाचक अशीं रूपें होत असतात.

कृदंतें

असमापिका क्रियावाचक—करिते (करण्याकरितां, करीत), करिया (करितांच, करून), करिले (केल्यानंतर, केल्यास) याप्रमाणेंच,—जाइते, जाइया, जाइले; पडिते, पडिया, पडिले; इ०

भाववाचक कृदंतनामें

बंगाली	मराठी
गमन, जाओया	जाणें
भोजन, खाओया	खाणें
पतन, पडा	पडणें
करण, करा	करणें
गान, गीत करा	गाणें
लेपन, लेवा	लेप
मर्दन, माजा	मर्दन
कल्पन, रचना करा	रचणें
ज्ञापन, जानान	जाणणें

यांत एकाक्षरी धातूस ओया, आणि इतरांस आ हे प्रत्यय लागतात. इवा प्रत्यय लागूनही भाववाचक कृदंतें होतात. जसें—लइवा (घेणें), बलिवा (बोलणें), जाइवा (जाणें), इ०

याशिवाय मुक्ति, शक्ति, इत्यादि संस्कृत कृदंतें ही प्रचारांत पुष्कळ येतात.

क्रियापदास तीन पुरुष असतात—प्रथम, द्वितीय, तृतीय.

बंगाली क्रियापदांस लिंगभेद किंवा वचनभेद नाहीं.

प्रयोग कर्तरि आणि कर्मणि असे दोन आहेत तथापि बहुधा सर्वत्र कर्तरि प्रयोगच फार आढळतो.

आछि (आहें), हओन (होणें), जाओन (जाणें), करण (करणें) हीं साह्य क्रियापदें आहेत. त्यांत आछि धातूचीं नुसतीं वर्तमान व भूत या काळचींच रूपें आहेत.

वर्तमान

मी आहें, आम्ही आहों इ०

१ आमि, आमरा आछि

२ तूमि, तोमरा आछ.

३ { तिनि, ताँहारा आछेन्
  { से, ताहारा आछे

अतीत

मी आम्ही होतों इ०

१ आमि, आमरा छिलाम

२ तूमि, तोमरा छिले.

३ { तिनि ताँहारा छिलेन्.
  { से, ताहारा छिल

देखन (पाहणें.)

कृदंतें.

वर्तमान—देखिते (पाहत)

अतीत–देखिया (पाहून), देखिले (पाहिल्यास)

वर्तमानकाळ.

नित्यप्रवृत्त व. मी पाहतों इ०

१ आमि, आमरा देखि

२ तूमि, तोमरा देख

३ { तिनि, ताँहारा देखेन्
  { से, ताहारा देखे.

टीप—तृतीय पुरुषीं जीं दुसरीं रूपें दिलीं आहेत, त्यांमध्यें किंचित् विनय कमी आहे.

विशुद्ध (अपूर्ण वर्तमान)

मी पाहत आहें, इ०

१ आमि, आमरा देखितेछि

२ तुमि, तोमरा देखितेछ.

३ { तिनि, ताँहारा देखितेछेन्.
से, ताहारा देखितेछे

अतीत (भूत)

अद्यतन. मी नुकतेंच पाहिलें आहे. इ०

१ देखिलाम्

२ देखिल

३ देखिलेन्, देखिल.

अनद्यतन. मीं केलें आहे. इ०

१ देखियाछि

२ देखियाछ

३ देखियाछेन् देखियाछे.

परोक्ष. मीं पाहिलें होतें. इ.

१ देखिया छिलाम

२ देखिया छिले.

३ देखिया छिलेन्, देखिया छिल

नित्यप्रवृत्त अतीत

मी पाही, पाहत असें. इ०

१ देखिताम

२ देखिते

३ देखितेन्, देखित.

असंपन्न अतीत

मी पाहत होतों. इ०

१ देखिते छिलाम

२ देखिते छिले

३ देखिते छिलेन्, देखिते छिल.

भविष्यत् आणि विध्यर्थ

मी करीन, करावें. इ०

१ देखिव

२ देखिवे

३ देखिवे, देखिवेक.

अनुज्ञा	संशय, संकेत
मी पाहूं, इ०	जर मी पाहिलें, इ०
१ देखि	देखि, देखिताम
२ देख	देख, देखिते
३ देखुक	देखे, देखित

संभावना आणि शक्यता

यामध्यें **पार**, आणि **थाक** या दोन साहाय्य धातूंची योजना होते. **पार** याच्या पूर्वी **ते** प्रत्ययांत कृदंत येतें, आणि हीं रूपें वर्तमान, भूत, भविष्य या तीन काळीं निरनिराळीं होतात. **थाक** हें **इया** प्रत्ययांत कृदंतापुढें असतें. जसें देखिते पारि (मी पाहूं शकतों इ०), देखिते पारिताम (पाहूं शकलों इ०), देखिते पारिव (पाहूं शकेन इ०); **देखिया थाके** (पाहण्याचा संभव आहे, पाहत असतो, इ०)

बंगाली पुस्तकांमध्यें बहुधा निरनिराळ्या क्रियापदांच्या जागीं त्यांचें एक भाववाचक नाम आणि **कर** धातु याचा प्रयोग अतिशय करितात. उ० **देख** (पाहणें) याच्या जागीं **दृष्टि कर** किंवा **दर्शन**

कर याचा प्रयोग होतो. तसेंच राख याच्या जागीं रक्षण कर, चिंत याच्या जागीं चिंता कर अशीं संयुक्त क्रियापदें योजलीं जातात. आपल्या मराठीमध्येंही हा प्रकार आहे; परंतु मराठीमध्यें जसें 'त्याणें सेवक राखला,' याच्या जागीं 'त्याणें सेवकाचें रक्षण केलें,' असा प्रयोग होऊन मूळच्या कर्माला षष्ठी किंवा दुसरी एखादी विभक्ति लागते, तसें बंगालींत होत नाहीं. मूळचें कर्म तेंच कायम राहतें आणि 'त्याणें सेवक रक्षण केला,' अशा प्रकारचीं रूपें होतात.

(पुढें चालेल)

(ऑक्टोबर, १८७१, पु. ४, अं. ५)

बंगाली व्याकरण

(पुढें चालू)

बंगाली भाषेमध्यें क्रियावाचक कृदंत नामें आणि करधातु यांच्या योगानें संयुक्त क्रियापदें करण्याचा फार प्रचार आहे असें मागें सांगितलें. उदाहरणार्थ कित्येक संयुक्त क्रियापदें एथें लिहून दाखवितों.

अपेक्षा कर	वर्णना कर
अवरोध कर	शांति कर
आक्रमण कर	हिंसा कर
आच्छादन कर	लोप कर

यांमध्यें संयुक्त क्रियापदांपुढें कर्म नेहमीं प्रथमांत किंवा द्वितीयांतच येतें हेंही मागें सांगितलें आहे.

क्रियापदें कर्मणि किंवा कर्मकर्तरि करण्याचे दोन प्रकार आहेत. बंगाली क्रियावाचक कृदंतापुढें **जाओन** (जा) धातु लावणें हा एक प्रकार आणि संस्कृत भूत कृदंता पुढें **हओन** (हो) धातु लावणें हा दुसरा प्रकार.

उदाहरणें

१ आमि, आमरा देखा जाय किंवा दृष्ट हइ–(मी पाहिला जातों, इ०)

१ आमि आमरा देखा जाइतेछि किंवा दृष्ट इइतेछि (मी पाहिला जात आहें, इ०)

१ देखा जियाछि, किंवा दृष्ट हइयाछि (मी पाहिला गेलों, इ०)

आइसंन (येणें) या धातूचीं सर्व रूपें नियमित नसल्यामुळें त्यांतून कांहीं लिहितों.

वर्तमान	विशुद्ध वर्तमान
मी येतों, इ०	(येत आहे, इ०)
१ आइसि, आसि.	१ आसितेछि
२ आइस,	२ आसितेछे
३ आइसेन	३ आसितेछेन

अतीत

(मी आलों, इ०)

१ आइलाम

२ आइला

३ आइलेन

इतर रूपें नियमाप्रमाणें होतात.

वट हें एक साहाय्य क्रियापद आहे. याचा अर्थ निश्चयेंकरून होय, असा होतो. 'आमि भाल वटि,' (मी बरा आहें); 'से ए स्थाने छिल वटे किन्तु अईक्षणे नाइ', (तो एथें होता खरा, पण आतां नाहीं); 'तिनि ज्ञानवान् वटेन्, ' (तो ज्ञानी होय).

नुसतें 'नव्हे' किंवा 'नाहीं' इतकेंच म्हणायाचें असेल तर तेथें 'ना' याचा प्रयोग करतात. क्रियापदापुढेंही 'ना' याचा प्रयोग होतो.

जसें ‘ तिनि ताहा अश्वीकार करिलेनना (तो त्याविषयीं नाकबूल गेला नाहीं.)—‘ नाइ ’ असें रूप असलें तर निश्चयात्मकता दिसते. उ० आमि एमन कथा कखनो शुनि नाइ ’ (आम्हीं अशी गोष्ट कधींही ऐकली नाहीं.) फक्त निषेधार्थक क्रियापद योजायाचें असलें तर तेथें ‘ नह ’ असें रूप होतें. म्हणजे प्रथम पुरुषीं, ‘ नहि’, द्वितीय पुरुषीं ‘ नह’, ‘ नओ, ’ आणि तृतीय पुरुषीं ‘ नहेन’ ‘नहे’ अशीं रूपें होतात. उ० ‘ आमि निष्पाप नहि ’ (आम्ही निष्पाप नाहीं), ‘ से प्रिय नहे ’ (तो प्रिय नाहीं.) इ०

‘ आम्हांला गेलें पाहिजे,’ इत्यादिप्रकारचीं वाक्यें ‘ आमाके जाइते हय, ’ ‘ तोमाके जाइते हय, ’ अशीं होतात. भूत किंवा भविष्यत् काळ दाखवायाचा असल्यास ‘ हय ’ याच्या जागीं ‘ हइल ’ किंवा ‘ हइबे ’ हीं हो धातूचीं रूपें लावावीं.

या शिवाय क्रियापदांमध्यें विशेष सांगण्याजोगें कांहीं नाहीं. बहुधा सर्व रचना मराठी सारखीच आहे.

अव्ययें

क्रियाविशेषणें

कालवाचक

बंगाली	मराठी
अद्य	आज
इतोमध्ये	इतक्यांत
एखन, एबे	आतां
काल, कल्य	काल, उद्यां
कखन्	केव्हां
जखन्, जबे	जेव्हां
तखन्, तबे	तेव्हां

कदाच, कदाचित् कोनकाले	कदाचित्
जावत्	जोंपर्यंत
तावत्	तोंपर्यंत
तत्काले	
दिनेदिने	
नित्य	
पश्चात्	
परे, तत्परे, तारपरे, उत्तरे	नंतर
प्रत्यूषे, भोरे	पाहटेस
परशु, परश्व	परवां
तरशु, तरश्व	तेरवां
पुनर्वार, पुनराय, पुनरपि, आरवर	पुनः
पुर्वे, अग्रे, आगे	पुढें
रात्रे	
सकाले, प्रभाते	
सायंकाले, वैकाले	
सदा, सदाकाल.	

क्षणे, दा, वार, हे शब्द दुसऱ्या शब्दापुढें लावून कालवाचकें होतात उ०—

एक्षणें	आतां	एकदा	एकदा
जेक्षणे	जेव्हां	दुईवार	दोनदां इ०

स्थलवाचक

एखाने, एखाय	एथें
ओखाने, ओखाय	तेथें (पलीकडे)
सेखाने, सेखाय	तेथें

कोथा, कोथाय	कोठें
कोथाहइते	कोठपासून
जथाय, जेथाय	जेथें
तथाहइते	तेथून
चतुर्दिगे	सर्वत्र
भितरे	आंत
बाहिरे	बाहेर
पिछे, पश्चाते.	मागें
अग्रे	समोर
उच्चे, उपरे	वर
नीचे	खालीं
दूरे	दूर
सम्मुखे	समोर
साक्षाते	समक्ष

स्थाने, त्र, हे शब्द लावल्यानेंही स्थलवाचकें होतात. उ० एइस्थाने, अन्यत्र, इ.

कित्येक कालवाचकें व स्थलवाचकें यांस षष्ठीचा व क्वचित् पंचमीचा प्रत्यय लागतो. उ० अद्यकार (आजचा), एखानकार (एथचा), दूरहइते (दूरपासून), इ.

रीतिवाचक

अति, अतिशय, अत्यंत.

अकस्मात्

एमन	असें
जेमन	जसें
केमन	कसें

तेमन	तसें
किच्छु	किंचित्
विस्तर	पुष्कळ
क्रमेक्रमे	क्रमानें
अनुक्रमे	
निरर्थ,–क	
व्यर्थ, वृथा	
पृथक्	
मिथ्या	
भाल	बरें, ठीक
विलक्षणे	चांगल्याप्रकारें
प्राय	प्राय
मन्द	मंदपणें
केन	कां ?
हेन	तसें
दैवे	दैववशात्
परस्पर	उभयतांकडून
परम्परा	परंपरेनें
मौने, तूष्णीम्	गुपचूप
शीघ्र, त्वरित, सत्वर, अविलम्बे	
झटिति, आशु	लवकर
सुतराम् , तस्मात्	निश्चयेंकरून.

मते, रूपे, तः, था, हे शब्द लावून ही रीतिवाचकें होतात. उ० एमते (असें), कोनमते (कोणत्याही रीतीनें), बलवद्रूपे, यत्नतः, सर्वथा.

'इ' याचा अर्थ मराठी 'च' सारखा निश्चयसूचक आहे. जसें–

सेस्थानेइ (तेथेंच), सेमतेइ (त्याच रीतीनें).

विशेषणांवरून अव्ययें होत असतां बहुतकरून 'रूपे' हा प्रत्यय लागतो. जसें सुन्दर, सुन्दर–रूपे. इ.

शब्दयोगी अव्ययें

हीं बहुधा इतर सप्तम्यंत शब्दांपासून झालेलीं आहेत. यांचा प्रयोग षष्ठीच्या पुढें होतो.

अग्रे	समोर, पुढें	नीचे	खालीं
अनुसारे	प्रमाणें	परिवर्ते	समोंवती
अंतरे	आंत	परिशोधे	विरुद्ध
अर्थे	कारणें	परे	नंतर
उपरे	वर	पिछे	मागें
कारण, जन्य, निमित्ते, हेतु	मुळें	प्रति	
		मध्ये, माझे मध्यें,	
काछे, निकटे समीपे	जवळ	बाहिरे	बाहेर
		विषये	विषयीं
द्वारा		संगे, सहित	
दूरे	पासून दूर	साक्षात्	सन्मुखे

केव्हां केव्हां नामें व सर्वनामें यांपुढें विशेषणाचा शब्दयोगी अव्यया-प्रमाणें प्रयोग होतो. अशीं विशेषणें—

कर्तृक, करणक	नें, कडून
पूर्वक	
पर्यंत	
निमित्तक, प्रयुक्त, हेतुक	बद्दल

इ०

(एप्रिल, १८७२ पु. ४, अं. ११,)

कानडी भाषा

कानडी भाषा बोलणाऱ्या लोकांचा प्रदेश म्हणजे कर्नाटक, हें महाराष्ट्र देशाला अगदीं चिकटून आहे. इतकेंच नव्हे, पण महाराष्ट्र देशाचा दक्षिण भाग, आणि कर्नाटकाचा उत्तर भाग हे परस्परांमध्यें अतिशय मिसळून गेले आहेत. दक्षिण महाराष्ट्र देश अशी ज्याला संज्ञा आहे, तो मूळचा कर्नाटकाचा भाग असें कानडी लोकांचें म्हणणें आहे, आणि हें म्हणणें कदाचित् खरें असेल, असें मानण्याला पुष्कळ आधार दिसतो. पण अशी कांहीं चमत्कारिक स्थिति झाली आहे कीं, मराठी भाषा आणि कानडी भाषा या मुळीं परस्परांपासून अगदीं भिन्न जरी होत्या, तरी या दक्षिण महाराष्ट्र देशीं त्यांचा परस्परांशीं सध्यां इतका निकट संबंध जडला आहे कीं, येथील कित्येक स्थळांची भाषा कानडी किंवा मराठी हें निश्चितपणें सांगणें फार कठीण पडतें. येथील भाषा मराठी म्हणावी, तर तिजमध्यें कानडी शब्दांची व कानडी तऱ्हेच्या वाक्यांची भेसळ पुष्कळ दिसते; इतकेंच नव्हे, तर तिजमध्यें मराठी भाषेचा सूर, म्हणजे भाषणाचा झोक जो मराठी वळणावर असायाचा, तो सुद्धां जाऊन त्याच्या जागीं कानडी सूर बनलेला दृष्टीस पडतो. बरें, एथील भाषा कानडी म्हणावी, तरी तिजमध्यें मराठीचें मिश्रण पुष्कळ दिसतें आणि बहुतेक कानडी लोकांनाही कानडीपेक्षां मराठीची गोडी अधिक असते. या मिश्रित स्थितीला कारणें अनेक झालीं आहेत. राजकीय कारणानें म्हणा, धर्मसंबंधीं कारणानें म्हणा, किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें म्हणा, या प्रदेशीं आणि विशेषेंकरून येथील शहराच्या वस्तीमध्यें, मराठी आणि कानडी या दोहों जातींच्या लोकांचें मिश्रण फार झालें आहे. सध्यांच्या काळीं त्यांच्या त्यांच्या भाषांवरून मराठी लोक कोण आणि कानडी लोक कोण, हें सहज लक्षांत येतें खरें, तथापि कानडी लोकांमध्यें जे ब्राह्मण आहेत ते, आणि लिंगायत आणि जैन यांमध्यें ही जे पुरातनकाळीं मोठमोठे विद्वान होऊन गेले, ते

व त्यांचे वंशज हे मूळचे कर्नाटकी होते, असें म्हणण्यापेक्षां, ते मूळचे संस्कृत भाषा बोलणारे महाराष्ट्र, किंवा महाराष्ट्र नसले तरी उत्तरदेशीय दुसऱ्या कोणत्याही आर्य कुळांतले होते, असें म्हणण्याकडे आमचा अधिक कल धांवतो. निदान इतकें तरी म्हणणें अवश्य दिसतें कीं कानडी भाषेची जी आजपर्यंत सुधारणा होत आली आहे, तिला मूळ कारण महाराष्ट्र भाषा किंवा महाराष्ट्र नाहीं तर संस्कृत भाषा तरी होय. कानडी भाषेमध्यें जो संस्कृत भाषेचा अंश आहे, तो आर्यांच्याच द्वारें तींत आला आहे असें उघड दिसतें. संस्कृत व मराठी भाषांशीं कानडी भाषेचा कांहीं संबंध नाहीं, असें म्हणण्याकडे अलीकडे कित्येक लोकांचा फार कल झालेला दृष्टीस पडतो; परंतु त्याचा अर्थ इतकाच घ्यायाचा, कीं कानडी भाषेचें जें अत्यंत प्राचीन स्वरूप, तें द्रविड भाषेला फार निकट आहे, आणि त्या प्राचीन स्वरूपाचा मात्र संस्कृत किंवा मराठी भाषांशीं संबंध नाहीं. पण सध्यांची जर कानडी भाषा घेतली, तर तिजमध्यें अर्ध्याहून अधिक भाग संस्कृताचा आणि संस्कृतापासून उत्पन्न झालेल्या महाराष्ट्री इत्यादि प्राकृत भाषांचा आहे असें म्हणणें प्राप्त आहे. आणि तो भाग जर काढून टाकिला, तर 'कानडी भाषा' अगदीं लंगडी, पांगळी, निरुपयोगी, अशी होऊन जाईल. मराठी लोकांच्या सहवासानें कानडी भाषा बिघडली, असें म्हणणाऱ्या लोकांनीं इतकें लक्षात ठेविलें पाहिजे कीं, मुळीं आर्यांच्या उद्योगानेंच कानडी भाषेंत ग्रंथोत्पत्ति झाली. कानडी भाषेशीं सहवास ठेवणारे आर्य म्हटले म्हणजे प्रायः ते महाराष्ट्रच असले पाहिजेत, आणि मराठ्यांच्या सहवासानें कानडीमध्यें शब्दाचा भरणा अधिक झाला आहे. असो, या वादांत विशेष मन घालण्यापेक्षां, घटकाभर असें मानूं कीं कानडी भाषा मराठ्यांच्या सहवासानें बिघडली खरी; कारण कीं मध्यें कांहीं काळपर्यंत या प्रदेशीं मराठ्यांचें राज्य असल्यामुळें कागदोपत्रीं मराठी भाषाच होऊन गेली, आणि कानडी भाषेचा कानडी लोकांनाही कंटाळा येऊन गेला. एकपक्षीं हा राजकीय स्थितीचा परिणाम असल्यामुळें, याबद्दलचा दोष

मराठ्यांना द्यावा किंवा कानड्यांना द्यावा, याचा निश्चय करणें हें अत्यंत कठीण काम आहे; व या विचारामध्यें दुसऱ्या कित्येक गोष्टींचा विचार येऊन घुसूं लागेल. याकरितां तो विषय सोडून देऊन, यापुढें कानडी भाषेची सुधारणा करण्याचा मार्ग कोणता या विषयाकडे लक्ष देऊं.

कानडी भाषेची सुधारणा करण्याचे निरनिराळे मार्ग निरनिराळ्या लोकांनीं दाखविले आहेत. कोणी म्हणतात कीं मराठी भाषेंतील जितके शब्द कानडींत मिसळले आहेत, तितक्या सर्वांना एकदम फाटा द्यावा; परंतु आम्हांला वाटतें कीं, या कामीं फार सावधगिरी ठेविली पाहिजे. सरसकट मराठी शब्दांना हरताळ लावूं नये. ज्यांच्या जागीं फार चांगले कानडी शब्द सध्या प्रचारांत आहेत, असे मराठी शब्द दूर करण्यास हरकत नाहीं; परंतु जर रूढ भाषेंत एकादा अर्थ प्रकट करण्यास चांगला कानडी शब्द नाहीं, आणि त्याचें काम एकादा मराठी शब्द फार चांगल्या रीतीनें चालवीत आहे, तर शब्द मराठी आहे इतक्यासाठींच तो टाकून देऊन, हळेगन्नड (प्राचीन कानडी) भाषेंतील दुसरा कोठचा तरी अज्ञात शब्द शोधीत बसणें हें चांगलें नाहीं. कित्येकांचें म्हणणें आहे कीं तिजमध्यें आलेले सर्व संस्कृत शब्दही झुगारून देऊन निवळ कानडी शब्दच वहिवाटींत ठेवावे; परंतु हा प्रयत्न कितपत साध्य आहे, याची कल्पना आज आमच्यानें करवत नाहीं. बरें. जरी कदाचित् हा साध्य होण्यासारखा असला, तथापि तो हितकारक मात्र होणार नाहीं, अशी आमची समजूत आहे. तेणेंकरून ती भाषा मूळच्या स्थितींत जाऊन पडेल असें आम्हांस वाटतें. तीच स्थिति उत्तम असें जर कोणाचें म्हणणें असेल, तर तें मात्र आम्हांला संमत होणार नाहीं. हा मतभेदाचा प्रकार खरा, परंतु याला एक उदाहरण देऊं. इंग्लिश भाषा जी आज इतक्या थोरवीला चढली आहे, तिनें जर आपल्यांतील सर्व लॅटिन, ग्रीक व परदेशीय शब्द टाकून दिले, तर तिला आधीं सर्व शास्त्रीय ग्रंथ टाकून द्यावे लागतील, सर्व सुधारणेला हरताळ लावावा लागेल, आणि मग पुनः

आपल्या मूळ भाषेचे सर्व नवे ग्रंथ बनवावे लागतील आणि सर्व सुधारणेचा पाया नवा उभारावा लागेल.

कित्येकांची अशी सूचना आहे कीं कानडी लोकांनीं मराठी भाषा न बोलण्याचा आणि मराठी वर्तमानपत्रें किंवा पुस्तकें न वाचण्याचा कडक नियम करावा. परंतु ही सूचना सिद्धीस जाणें अशक्य दिसतें, आणि जर कदाचित सिद्धीस गेली, तर कानडी भाषेनें आपण होऊन आपल्या पायांवर धोंडा पाडून घेतल्यासारखें होईल, हें खचित समजावें. सांप्रतकाळीं मराठी भाषा ही चांगल्या प्रतिष्ठित भाषांतील एक भाषा आहे, तिची चांगली सुधारणा झाली आहे, तिजमध्यें दिवसेंदिवस नव्या नव्या लेखांचा व उत्तम उत्तम ग्रंथांचा भरणा अधिकाधिक होत आहे. अशा भाषेशीं सहजगत्या मराठी लोकांच्या सहवासानें ज्यांचा परिचय झालेला आहे किंवा होत आहे, त्यांनीं आपण होऊन त्या भाषेचें ज्ञान टाकून देणें यासारखा दुसरा वेडेपणा कोणता ? त्या भाषेच्या सहज साध्य होणाऱ्या अभ्यासापासून मोठा लाभ प्राप्त करून घेतां येण्यासारखा आहे. तिजमध्यें जे चांगले चांगले विषय येतील, त्यांचें सहज ज्ञान करून घेतां येईल, स्वभाषेमध्यें भाषांतरें करतां येतील. परंतु तिजकडे पाहायाचेंच नाहीं, असा जर नेम केला, तर या सर्व सोई फुकट जातील. सूर्याचा प्रकाश फुकट मिळतो, तो घरांत न यावा म्हणून दरवाजे खिडक्या बंद करून, आंत दिवे लावून प्रकाश उत्पन्न करण्याचा जो प्रयत्न त्यासारखाच हा प्रयत्न होईल.

चवथी सूचना अशी आहे कीं कानडी ग्रंथ आणि पत्रें यांची वृद्धि करण्यासाठीं विद्वान आणि उदार गृहस्थांनीं पुढारी होऊन सभा किंवा मंडळ्या स्थापाव्या, आणि त्यांना चांगलें उत्तेजन देऊन त्यांजकडून कानडी भाषेची सुधारणा करण्याचा उद्योग चालवावा. ही सूचना फार चांगली आहे. कानडी किंवा दुसरी कोणतीही भाषा असो,

तिच्या सुधारणेचें काम ती ती भाषा बोलणाऱ्या लोकांकडून जितकें चांगलें होईल तितकें इतरांकडून होण्याचा वास्तविक संभव नाहीं. राज्यकर्ते इंग्लिश लोक किंवा ख्रिस्तीधर्मोपदेशक जर्मन लोक, यांनीं कानडी भाषेच्या सुधारणेचा जितका प्रयत्न करावा तितका आपणांस अनुकूलच आहे; तथापि, देशी लोकांना जर त्या भाषेचें अगत्य वाटत नसलें, तर बाह्य प्रयत्नापासूनच सर्व इष्टकार्य साध्य होणार नाहीं हें उघड आहे. दक्षिण महाराष्ट्र देशीं राजकीय व्यवहार प्रायः कानडी भाषेनेंच चालवावा असा निश्चय होऊन, आज पंचवीस–तीस वर्षें त्या ठरावाप्रमाणें काम चालत आहे. तथापि, अद्यापि येथील कानडी लोकांस स्वभाषेची लागावी तितकी गोडी लागत नाहीं, या गोष्टीला आमच्या मतें कांहीं कारणें झालीं आहेत. मराठीसारख्या चांगल्या भाषेशीं असलेला आपला पुष्कळ दिवसांचा परिचय एकदम सोडून द्यावा हें कित्येकांना योग्य वाटलें नाहीं, यांत आश्चर्य नाहीं. बरें, तसें करण्याला जीं योग्य साधनें पाहिजेत तींही त्यांना मिळालीं नाहींत. मराठीची लागलेली अभिरुचि सोडून देऊन, कानडीची नवी अभिरुचि उत्पन्न करायाची, तर तिचें उत्तम स्वरूप प्राप्त करून घेण्याला साधनाभाव ही मोठी अडचण झाली, असें आम्हांस वाटतें. जे मुळींच अशिक्षित लोक, त्यांना तर मराठीचाही अभ्यास नको, आणि कानडीचाही नको. तेव्हां त्यांना विद्याभ्यासाची गोडी लावण्याचा स्वतंत्र कांहीं प्रयत्न झाल्यावांचून ते स्वभाषेकडे लक्ष देतील ही आशाच व्यर्थ आहे. त्या प्रांतीं मराठीच्या जागीं कानडीची अभिरुचि उत्पन्न होण्याला काय उपाय योजला पाहिजे, या गोष्टीकडे विद्वान लोकांचें लागावें तितकें लक्ष लागलें नाहीं असें आम्हांस वाटतें. ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, म्हैसूर वगैरे प्रदेशीं कानडीच्या सुधारणेला जे उपाय योग्य वाटतील, तेच उपाय या प्रदेशीं केल्यानें सर्व कार्य होणार नाहीं. तेथील लोकांना येथल्या लोकांसारखा

मराठीचा संपर्क नाहीं. त्यांचे सर्व विचार व्यवहार कानडी भाषेनेंच चालत आहेत, तेव्हां त्यांच्या भाषेमध्यें ग्रंथसंग्रह करून देणें हेंच तेथील लोकांचें मुख्य काम आहे. परंतु येथें कानडीची नवीन अभिरुचि उत्पन्न करणें हें एक मोठें काम आहे. याला जो मार्ग आम्हाला योग्य वाटतो, तो येथील कानडी विद्वान लोकांच्या मनांत अद्यापि आलेला नाहीं असें उघड दिसतें. कारण कीं, जर तो उपाय त्यांच्या मनांत आला असता, तर त्यांनीं त्याच्या सिद्धीकरितां कांहींना कांहीं प्रयत्न चालविला असता. म्हणून तो उपाय जरी एथें आम्ही सांगतों, व त्यापासून जरी चांगलाच परिणाम होईल असें आम्हांस वाटतें, तरी कानडी विद्वानांचे विचार त्या संबंधानें कसे पडतील, याचा आजच आमच्यानें तर्क करवत नाहीं. आमचें म्हणणें असें आहे कीं, येथील विद्वान् लोकांच्या मनांत कानडीच्या वृद्धीला मराठी भाषा आड येते, ही जी एक विलक्षण समजूत भरली आहे, ती अमळ कमी झाली पाहिजे. मराठी आणि कानडी यांचा परस्परांशीं शत्रुत्वसंबंध आहे अशी जी कित्येकांची समजूत, तीच कानडीच्या वृद्धीला आड येते असें आम्हांस वाटतें. या करितां ती समजूत आधीं दूर झाली पाहिजे. म्हणजे सर्व काम सोईनें चालेल. ज्या मराठी भाषेची अभिरुचि लोकांना अधिक आहे अशी फिर्याद आहे, तीच मराठी भाषा तुमच्या कानडीची सुधारणा करण्याच्या कामीं साधनभूत करून टाकावी म्हणजे आपोआप तुमचें काम होईल. तें कसें ? तर ज्यांना कानडी आणि मराठी या दोन्ही भाषा चांगल्या अवगत आहेत असे विद्वान् बरेच आहेत. त्यांनीं प्रथमतः एक कानडी भाषेचें व्याकरण शुद्ध मराठी भाषेनें लिहून प्रसिद्ध करावें. त्यामध्यें कानडी भाषा आणि व्याकरण यांचें मराठी भाषा आणि व्याकरण यांशीं कसकसें कोठेंकोठें सादृश्य आहे, आणि कसकसें कोठेंकोठें भिन्नत्व आहे, हेंही उदाहरणसहित उत्तम प्रकारें स्पष्ट करावें. दुसरें कृत्य

म्हटलें म्हणजे एक कोश. तो असा असावा, कीं त्यामध्यें प्रत्येक मराठी शब्दाच्या स्थानीं शुद्ध कानडी शब्द कोणता योजावा व त्याचा प्रयोग कसा करावा हें समजण्याचें साधन असावें. यामध्यें जे थोडेसे संस्कृत शब्द भिन्न भिन्न अर्थानें या दोहों भाषांमध्यें योजिले जातात तितके मात्र घेऊन इतर सर्व गाळून टाकण्यास कांहीं बाध नाहीं. कारण दोहों भाषांमध्यें ते समानच आहेत. येणें करून ग्रंथविस्तार न होतां पुष्कळ काम थोडक्यांत होईल. तिसरें, सध्यां या प्रांतीं जे कित्येक अशुद्ध किंवा मिश्रित भाषाप्रकार आढळतात ते एकत्र करून त्यांच्या स्थानीं शुद्ध कानडी भाषेची योजना कशी करावी हें दाखविण्याकरितां वाक्यसंग्रहाचें एक पुस्तक करावें. हीं सर्व पुस्तकें कानडी भाषेनेंही लिहावीं, म्हणजे ज्या कानडी लोकांना मराठी समजत नाहीं त्यांनाही आपली भाषा सुधारण्याला तें मोठें साधन होईल. इतकें करून हीं सर्व पुस्तकें सर्व शाळांमध्यें चालू करण्याकरितां विद्याखात्याचें साहाय्य मिळवावें. इतकें जर होईल, तर कानडी भाषेच्या सुधारणेला खरोखरीं आरंभ झाला असें म्हणण्यास कांहीं बाध नाहीं. या कृत्यापासून तेथील मराठी लोकांनाही मोठा उपयोग होणार आहे. म्हणून त्यांनींही या कामास आपणांकडून होईल तितकी मदत केली पाहिजे. त्यांच्या हिताकरितां, व जे कानडी लोक शुद्ध मराठी शिकूं इच्छितील त्यांच्याही हिताकरितां एक मराठी व्याकरण व मराठी कानडी कोश, व शुद्ध मराठी वाक्यसग्रह यांचीं पुस्तकें त्या दोन्ही भाषांमध्यें तयार करावीं. अथवा सोईला जमेल तर एकेक पुस्तक कानडी मराठी या दोघांनाही उपयोगी होईल असें सिद्ध केल्यास फार उत्तम गोष्ट होईल.

सारांश, परस्परांचें शत्रुत्व मानिल्यामुळें आज तीस वर्षांत जें काम झालें नाहीं, तें मित्रत्वाच्या योगानें सहज पांच सात वर्षांत होऊन जाईल. आणि या दक्षिण महाराष्ट्र देशीय लोकांना धड कानडीही येत नाहीं, आणि धड मराठीही येत नाहीं अशी जी स्थिति आहे, ती निघून

जाऊन, त्यांना दोन्ही भाषा चांगल्या येऊं लागतील. याशिवाय दुसरा असा एक चांगला परिणाम होईल कीं शुद्ध मराठी देशांतील आणि शुद्ध कानडी देशांतील लोकांपेक्षां यांना आपलें हित करून घेण्याचें अधिक सामर्थ्य ये ल. म्हणजे, कोणताही मराठी ग्रंथ किंवा लेख आणि कोणताही कानडी ग्रंथ किंवा लेख यांपासून आपलें ज्ञान वाढविण्याचें त्यांना साधन मिळेल. तें साधन शुद्ध मराठी किंवा शुद्ध कानडी देशांतील लोकांना मिळणाऱ्या साधनाहून श्रेष्ठ आहे असें कोणीही म्हणूं शकेल. हें काम एकदा उत्तम प्रकारें चालू झालें, म्हणजे दुसरे आणखी अनेक चांगले चांगले ग्रंथ सहज उत्पन्न होऊं लागतील, आणि त्यांपासून दिवसेंदिवस अधिकाधिक हित होत जाईल.

कानडी आणि मराठी यांचें खरें मित्रत्व होण्याला, दुसरी एक मोठी अनुकूल गोष्ट आहे. ती अद्यापि तिकडील विद्वान् लोकांच्या ध्यानांत आली नसेल तर मोठेंच आश्चर्य म्हणायाचें. मराठी भाषेच्या बालबोध आणि मोडी या दोन्ही लिपि, आणि कानडी लिपि यांची उत्पत्ति मूळच्या एकाच लिपीपासून आहे. ही गोष्ट बहुतेक कानडी लोकांना ठाऊक नाहीं; आणि त्यांना ही गोष्ट सांगितली तरी खरी वाटत नाहीं. परंतु ही गोष्ट निःसंशयपणें खरी आहे. तेव्हां लिपीच्या संबंधानें तरी मराठी आणि कानडी भाषांमध्यें सहोदर संबंध असल्यामुळें परस्पर स्नेहाला तितकें विशेष कारण आहे. ही गोष्ट त्या प्रांतांतील सर्व विद्वान् लोक लक्षांत आणतील तर बरें होईल. असो. या विषयाच्या संबंधानें विशेष लिहिण्यापूर्वी त्या प्रांतांतील विद्वान् लोकांचें या विषयीं काय मत आहे तें समजणें अवश्य आहे. म्हणून तूर्त हा विषय इतकाच ठेवितों, व त्या विद्वान् लोकांनीं याचा पूर्ण विचार करावा अशी त्यांस आदरपूर्वक सूचना करितों.

कानडी आणि मराठी लिपींचा सहोदरसंबंध कसा काय आहे, हा आम्ही थोडक्याच दिवसांत उत्तम प्रकारें स्पष्ट करून दाखविण्याची उमेद धरीत आहों.

हा जो कानडी भाषेच्या संबंधानें आम्ही लेख लिहिला आहे या पासून जर खरोखरी कांहीं उपयोग झालेला दृष्टीस पडेल, तर मराठी –हिंदुस्थानी आणि मराठी–गुजराती इत्यादि भाषांनाही हे विचार कितपत लागू पडतील हें पाहण्याचा प्रयत्न करण्यास आम्हांस उत्तेजन येईल.

(सप्टेंबर-ऑक्टोबर १८८९
पुस्तक २१, अंक ९, १०.)

मराठी भाषा

ज्या ज्या देशामध्यें जी भाषा चालत असेल त्या त्या देशांत ती सर्वत्र एक स्वरूपानें वागत असणें, ही गोष्ट त्या भाषेच्या उत्कर्षाला विशेष कारणीभूत होत असते, हें सर्वमान्य आहे. आपल्या मराठी भाषेमध्यें जरी बरेच पोटभेद आहेत, तरी दिवसेदिवस ते हळूहळू मोडत चालले आहेत. याशिवाय दुसरी एक मोठी गोष्ट ही कीं, कागदोपत्रीं लिहिण्याची भाषा पाहिली असतां, तिजमध्यें इतके प्रकार दृष्टीस न पडतां, बहुधा ती एक स्वरूपानेंच चालते म्हणण्यास कांहीं बाध नाहीं. पुस्तकांची व वर्तमानपत्रांची भाषा तर आतां स्थायिक झाल्यासारखीच आहे, आणि जर कोणी या सर्वमान्य प्रकाराला न अनुसरतां एकदेशीय शब्दांचें व रूपांचें अवलंबन करील, तर त्याचा उपहास झाल्यावांचून राहणार नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां असें स्पष्ट दिसेल, कीं आपल्या शेजारच्या बहुतेक भाषांपेक्षां मराठी भाषेच्या उत्तेजनास अधिक मदत झाली आहे यांत भ्रांति नाहीं. या गोष्टीच्या मूळ कारणाचा शोध करूं लागल्यास असें लक्षांत येईल कीं आपल्या देशामध्यें पूर्वीं मराठ्यांचें व पेशव्यांचें राज्य असतां, त्यांच्या पदरीं मोठमोठे विद्वान् लोक असत, व त्यांची राज्यकारभारामध्यें मोठी मानमान्यता असल्यामुळें, व पूर्वींच्या यवनी राज्याशीं त्यांचा विरोध असल्यामुळें, पूर्वीं आपल्यामध्यें जे यवनी संप्रदाय शिरले होते ते काढून टाकण्याविषयीं, व त्याप्रमाणेंच आपली भाषा ही यवनी शब्दांच्या संपर्कापासून निर्मल राखण्याविषयीं, तिजमध्यें लागतील तितक्या संस्कृत शब्दांचें मिश्रण करून ती आपली भाषा प्रौढ दशेस आणण्याचा त्यांणीं प्रयत्न केला व तो सिद्धीसही नेला. त्यांणीं राज्यकारभारामध्यें सर्वत्र एक भाषा चालू केली, आणि जिकडे जिकडे त्यांच्या राज्याचा प्रसार झाला, तिकडे तिकडे सर्व कारभार त्याच भाषेंत चालूं लागला. परिणामीं, पुण्याचा दरबारची

भाषा व्यवहारांत आणण्याविषयीं सर्व देशभर लोक प्रयत्न करूं लागले. याप्रमाणें पेशव्यांच्या राज्याबरोबर हें मराठी भाषेच्या इतिहासांतील प्रथम खंड समाप्त जाहलें. पुढें इंग्रजी राज्य स्थापित जाहल्यापासून तिच्या द्वितीय खंडास आरंभ झाला. या काळींही तिच्या उत्कर्षास चांगलेंच सहाय्य झालें; पेशव्यांच्या वेळचे कित्येक व नवीन कित्येक पंडित मिळवून त्यांजकडून सरकारानें कोश व्याकरणादि ग्रंथ करविले; व कित्येक दुसरीं पुस्तकें करविलीं. कित्येकांनीं वर्तमानपत्रें वगैरे शुद्ध व प्रौढ भाषेंत चालविण्याचा सद्व्यापार चालविला. यामुळें छापखान्याच्या ऐन सुरवातीस जीं नवीं नवीं पुस्तकें व पत्रें प्रसिद्ध झालीं, त्यांहींकरून इतके दिवस बऱ्याच पक्व दशेस आलेल्या भाषेची स्थिरता मोठ्या झपाट्यानें होत चालली. आणि दिवसेंदिवस तिचा भरभराट होतां होतां हल्लीं तिची अशी स्थिति आहे कीं, या भाषेची योग्यता उणी मानणारे जरी कित्येक लोक असले, तथापि भरत खंडांतील बहुतेक, किंबहुना सर्व, भाषांपेक्षां तिची योग्यता मोठी आहे, असें म्हटल्यास या म्हणण्यास बाध येईल असें वाटत नाहीं.

असें जरी आहे, तथापि मराठी भाषेंत अद्यापि कांहीं उणेपणा नाहीं असें समजूं नये. अद्यापि तिजमधील कित्येक प्रकरणांवर व्याख्यानें जाहलीं पाहिजेत, चांगलें व्याकरण झालें पाहिजे, अनेक महान महान विषयांवर या भाषेंत ग्रंथ झाले पाहिजेत; ती सर्व लोकांस शुद्ध लिहितां आली पाहिजे; व असें होण्यास मध्यें ज्या कित्येक अडचणी आहेत, त्या दूर जाहल्या पाहिजेत. सारांश, ज्या ज्या लोकांस महाराष्ट्र या नांवाचा अभिमान असेल, त्या सर्वांनी तिचा उत्कर्ष करण्याकरितां निरंतर झटलें पाहिजे.

पेशवाई बुडाल्यानंतर जे कित्येक पंडित मराठी भाषेच्या उत्कर्षाकडे लागले होते, त्यांतील बहुतेक सर्व कोंकणांत राहणारे असल्यामुळें त्यांणीं केलेल्या पुस्तकांत कोंकणी प्रकाराचें बहुतेक स्थळीं अवलंबन केलें आहे, व

कालगतीमुळें हळूहळू त्यांस इतकें प्राबल्य येत चाललें आहे कीं त्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळें लिहिणाराकडे व बोलणाराकडे अशुद्ध भाषेचा दोष लागण्याचा प्रसंग येत चालला आहे. या कोंकणी प्रकारांपैकीं आवश्यकतेवांचून शब्दाचा अनुनासिक उच्चार करणें हा जो मुख्य प्रकार त्याच्या विचाराकडे आपण लक्ष लावूं.

आपल्या भाषेंत असे कित्येक शब्द आहेत कीं त्यांचा उच्चार कोंकणांतील लोक अनुनासिक करतात. परंतु देशांतील लोकांविषयीं पाहिलें तर त्यांच्या बोलण्यांत व वाचनांत तसा अनुनासिक उच्चार आढळत नाहीं. कोंकणांतील लोक देशच्या लोकांचा उच्चार रूक्ष म्हणतात, व देशचे लोक कोंकणच्या लोकांचा उच्चार गेंगाणा म्हणतात. हें तर काय, परंतु तशा शब्दावर बिंदु दिला असतांही वाचनामध्यें देशचे लोक त्याकडे दुर्लक्ष करितात; आणि बिंदु नसतांही कोंकणचे लोक नाकांतूनच त्यांचा उच्चार करितात; तेव्हां यांतून खरा पक्ष कोणता याचा विचार करणें आवश्यक आहे. कारण याचा निर्णय झाल्यामुळें लिहिण्यामध्यें वगैरे ज्या कित्येक शंका उत्पन्न होतात, त्यांचें सहज निरसन होईल.

या गोष्टीचा निर्णय करण्याकरितां, आपल्या भाषेंत मुळीं अनुनासिक उच्चार कोठून आले याजकडे लक्ष दिलें पाहिजे. असें दिसेल, कीं यास आधार मुळीं संस्कृत शब्दांतील अनुस्वार, किंवा नकार किंवा मकार हा होय.

१ मराठींतील एकारांत नपुंसक एकवचनीं नामें, विशेषणें व क्रियापदें यांवर जो बिंदु येतो, तो संस्कृतांतील मकार किंवा अनुस्वार यांपासून आलेला आहे. उदाहरणें—

वरं	बरेँ	कृतं	केलें
कथं	कसेँ	कार्यं	करावें

२ नपुंसकलिंगी शब्दांच्या प्रथमेच्या अनेकवचनीं जो बिंदु येतो तो नकारापासून आलेला आहे.

उदाहरणें—

सं.	प्रा.	महाराष्ट्र
वनानि	वनाइं	वनें
गृहाणि	घराइं	घरें

३ प्रथम पुरुषीं क्रियापदावर येणारा अनुनासिक मकारापासून आलेला आहे. उ०

अस्मि	आहें
स्म	आहों

४ इकारांत, उकारांत नपुंसक शब्दांवरील अनुनासिक बालभाषेंतून आला आहे.

दधि	दहिं	दहीं
मधु	महुं	महूं

या नियमांच्या आधारानेंच वासरूं, तारूं इत्यादि नपुंसक शब्दांवर अनुनासिक उत्पन्न जाहला.

५ द्वितीय पुरुषीं बहुवचनीं स्वार्थी आकारांतांवर येणारा अनुनासिकही बालभाषेंतूनच आला आहे. उदा०

हसथं=हसतां इ.

१. या वरील गोष्टीवरून असा साधारण नियम निघेल कीं अकारांतावांचून इतर नपुंसक शब्दावर बिंदु द्यावा.

(क) आतां या नियमास अपवादक, पाहिजे, नको, नये, नलगे इत्यादि शब्द तसेंच करी, जाई, येई, आहे, इत्यादि शब्द नपुंसकीं योजिले असतांही तृतीय पुरुषीं त्यांवर अनुनासिकत्व येत नाहीं, याचें

कारण उघड आहे; तें असें कीं यामध्यें अनुस्वार, किंवा मकार यांचा मुळींच संभव नाहीं.

(ख) याच कारणामुळें आज्ञार्थी द्वितीय पुरुषीं बहुवचनीं, व तृतीय पुरुषीं एकवचनीं शेवटीं बिंदु येत नाहीं.

२. प्रथमपुरुषीं, म्हणजे संस्कृतांतील उत्तम पुरुषीं, अकारांतांचांचून इतर क्रियापदांवर शेवटीं बिंदु द्यावा.

३. स्वार्थी द्वितीयपुरुषीं बहुवचनीं आकारांत क्रियापदावर बिंदु द्यावा. उदा० हसतां, बसलां, इ०

याप्रमाणें या तीन नियमांमध्यें जे शब्द येतील त्यांवर व ज्या इतर ठिकाणीं मकारादिकांचा लोप झाला असेल तेथें मात्र बिंदु देण्याला मूळ भाषांकडून आधार आहे. परंतु सांप्रत पाहतां अनुनासिकांविषयीं कित्येक मनःकल्पित नियम होऊन भाषेंत त्यांचा भरणा पुष्कळच होत चालला आहे. उदाहरणें–

सं.	प्राकृत	मराठी	सं.	प्राकृत	मराठी
अत्र	एत्थ	एथें	यावत्	जाव	जों, जंव
तत्र	तत्थ	तेथें	तावत्	ताव	तों, तंव
यत्र	जत्थ	जेथें	सदा	—	सदां
कुत्र	कत्थ	कोठ	सर्वदा	—	सर्वदां
		आतां	एकदा	—	एकदां
तदा	—	तेव्हां			
यदा	—	जेव्हां			
कदा	—	केव्हां			
इव	एव	विअ, जेव जैंवी, जेवीं			

तेंवि, तेवीं
केंवि, केवीं
एविं इ० इ० इ०

वरील उदाहरणांतील अनुनासिकत्वाला कांहींच आधार नाहीं. देशांतील लोकांच्या भाषणांमध्यें या शब्दांचा उच्चार क्वचितच सानुनासिक होतो. परंतु कोंकणामध्यें व आलीकडील ग्रंथांमध्यें हा अनुनासिक उच्चार अगदी अवश्यकसा होऊन गेला आहे. कदाचित् याचें कारण असें असेल, कीं क्रियाविशेषण अव्ययें कांहीं अंशीं अर्थानें नपुंसक शब्दांप्रमाणें आहेत; म्हणजे त्यांमध्यें पुंस्त्रीत्वाचा बोध होत नाहीं, अशा विचारानें नपुंसक शब्दांचा नियम यांजवर कोणी लाविला असावा. कोणत्याही रीतीनें असो, ही कल्पना त्यांच्या मनांत एकदा भरल्यानंतर हळू हळू तिची मर्यादा वाढत चालली, ती येथपर्यंत कीं, कोणत्याही प्रकारें साधलेलीं रूपें असोत, त्यांचा क्रियाविशेषणासारखा प्रयोग होत असला, आणि तीं अकारांत नसलीं म्हणजे झालें. त्यांजवर अनुनासिकत्वाचा छाप बसलाच. उदाहरणार्थ ' देव ' या शब्दास विभक्ति लावूं.

प्र.	देव,	देव
द्वि.	देवास, देवाला, देवातें	देवांस—ला—ना—तें.
तृ.	देवानें—देवें—देवाशीं	देवांनीं—शीं—हीं
च.	द्वि. प्रमाणें.	
पं.	देवाहून—तून	देवांहून—तून
ष.	देवाचा—ची—चें	देवांचा—ची—चें
स.	देवीं, देवांत	देवांत

अव्ययें

लागीं, लागूनीं, लागूनियां,
मुळें करवीं कडून इ०,

कारण उघड आहे; तें असें कीं यामध्यें अनुस्वार, किंवा मकार यांचा मुळींच संभव नाहीं.

(ख) याच कारणामुळें आज्ञार्थी द्वितीय पुरुषीं बहुवचनीं, व तृतीय पुरुषीं एकवचनीं शेवटीं बिंदु येत नाहीं.

२. प्रथमपुरुषीं, म्हणजे संस्कृतांतील उत्तम पुरुषीं, अकारांतां-वांचून इतर क्रियापदांवर शेवटीं बिंदु द्यावा.

३. स्वार्थी द्वितीयपुरुषीं बहुवचनीं आकारांत क्रियापदावर बिंदु द्यावा. उदा० हसतां, बसलां, इ०

याप्रमाणें या तीन नियमांमध्यें जे शब्द येतील त्यांवर व ज्या इतर ठिकाणीं मकारादिकांचा लोप झाला असेल तेथें मात्र बिंदु देण्याला मूळ भाषांकडून आधार आहे. परंतु सांप्रत पाहतां अनुनासिकांविषयीं कित्येक मन:कल्पित नियम होऊन भाषेंत त्यांचा भरणा पुष्कळच होत चालला आहे. उदाहरणें–

सं.	प्राकृत	मराठी	सं.	प्राकृत	मराठी
अत्र	एत्थ	एथें	यावत्	जाव	जों, जंव
तत्र	तत्थ	तेथें	तावत्	ताव	तों, तंव
यत्र	जत्थ	जेथें	सदा	—	सदां
कुत्र	कत्थ	कोठ	सर्वदा	—	सर्वदां
		आतां	एकदा	—	एकदां
तदा	—	तेव्हां			
यदा	—	जेव्हां			
कदा	—	केव्हां			
इव	एव	विअ, जेव जेंवी, जेवीं			

तेंवि, तेवीं
केंवि, केवीं
एविं इ० इ० इ०

वरील उदाहरणांतील अनुनासिकत्वाला कांहींच आधार नाहीं. देशांतील लोकांच्या भाषणांमध्यें या शब्दांचा उच्चार क्वचितच सानुनासिक होतो. परंतु कोंकणामध्यें व आलीकडील ग्रंथांमध्यें हा अनुनासिक उच्चार अगदी अवश्यकसा होऊन गेला आहे. कदाचित् याचें कारण असें असेल, कीं क्रियाविशेषण अव्ययें कांहीं अंशीं अर्थानें नपुंसक शब्दांप्रमाणें आहेत; म्हणजे त्यांमध्यें पुंस्त्रीत्वाचा बोध होत नाहीं, अशा विचारानें नपुंसक शब्दांचा नियम यांजवर कोणी लाविला असावा. कोणत्याही रीतीनें असो, ही कल्पना त्यांच्या मनांत एकदा भरल्यानंतर हळू हळू तिची मर्यादा वाढत चालली, ती येथपर्यंत कीं, कोणत्याही प्रकारें साधलेलीं रूपें असोत, त्यांचा क्रियाविशेषणासारखा प्रयोग होत असला, आणि तीं अकारांत नसलीं म्हणजे झालें. त्यांजवर अनुनासिकत्वाचा छाप बसलाच. उदाहरणार्थ ' देव ' या शब्दास विभक्ति लावूं.

प्र.	देव,	देव
द्वि.	देवास, देवाला, देवातें	देवांस–ला–ना—तें.
तृ.	देवानें–देवें–देवाशीं	देवांनीं–शीं–हीं
च.	द्वि. प्रमाणें.	
पं.	देवाहून–तून	देवांहून–तून
ष.	देवाचा–ची -चें	देवांचा–ची–चें
स.	देवीं, देवांत	देवांत

अव्ययें

लागीं, लागूनीं, लागूनियां,
मुळें करवीं कडून इ०,

कारणें, करितां, साठीं;
मुळें, पेक्षां;
संबंधीं, विषयीं;
मध्यें, ठायीं.

धातुसाधितें

असतां, असतांनां, असूं इ०

आतां वास्तविक पाहतां यांतून कितीक अनुनासिक स्थळें बरें सोपपत्तिक आहेत ? पाहूं—तें, यावरील बिंदु अंते, यापासून आला असें कदाचित् कोणी म्हणेल. देवें या वरील व देवांहीं यावरील शेवटचे बिंदु न आणि हिं (भिः) यापासून आले; परंतु नें आणि नीं यावर बिंदु कोठून ? तयांतील बिंदु आंत यापासून; परंतु ए पासून आलेला सप्तमीचा ईं प्रत्यय त्यावर बिंदु कोठचा ? तसेंच मुळें, कारणें यावरील बिंदु संस्कृतांतील नकारापासून, परंतु करितां (कृते) मध्यें (मध्ये) इत्यादिकांवर बिंदु कोठचा ?

असूं, करूं इत्यादि निमित्तवाचकावरील बिंदु संस्कृत नुम् प्रत्ययापासून; परंतु असतां, असतांनां असें कोठून ?

हे निराधार अनुनासिक उच्चार, वरील कल्पित नियमावरून म्हणजे क्रियाविशेषणाच्या कल्पनेवरून आणलेले आहेत असें जरी म्हणावें तरी द्वितीयेच्या ला प्रत्ययावर बिंदु नाहीं ही मध्यें अडचण येते. बरें त्या नियामास तरी कांहीं सबळ आधार आहे असेंही म्हणतां येत नाहीं. कारण संस्कृतांतही अनेक अव्ययें अनुस्वारावांचून आहेत; मराठींतही हळू, जरा, पुरे, कडे इत्यादि अव्ययांवर कधीं कोणीच बिंदु देत नाहीं. याकरितां हा नियम कांहीं सबळ नाहीं, हें उघड आहे. शब्दाला बहुवचनीं द्वितीयादि प्रत्यय लागतांना त्यांवर बिंदु देण्यालाही कांहीं सबळ कारण नाहीं. परंतु तो देशी, कोंकणी सर्व लोकांच्या प्रचारांत आहे, व

त्यापासून अर्थभेद समजण्यास पुष्कळ सहाय्य होतें, याकरितां तो अनुस्वार आहे तो बरा आहे.

असो. वरील शब्दामध्यें कांहीं कल्पित नियम तरी आहे. पण पुढील शब्द पहा.—

सं.	मराठी	सं.	मराठी
इक्षु	ऊंस	पीत	पिंवळा
काच	कांच	प्रवाल	पोंवळें
केश	कंस	कर्कट	खेंकडा
लगुड	लांकूड	वै	पैं
ओष्ठ	ओंठ	नास्ति	नाहीं
कृपा	कींव	मया	म्यां
धाव	धांव		

या शद्बांतील अनुनासिकत्वास कोंकणी लोकांच्या उच्चाराशिवाय दुसरा आधार नाहीं.

पुढील शद्बांमध्यें मकाराच्या जागीं वकार आला आहे.—

नाम	नाव	कोमल	कौंवळा
ग्राम	गाव	हिम	हीव
सुमंगळ	सोवळें	भ्रम	भोवणें
अमंगळ	ओवळें		भोवरा
आमलक	आवळा		भोवळ
शामल	सावळा	जामातृ	जावई

वरील शद्बांमध्येंही अनुस्वाराच्या संबंधानें देश-कोंकणपरत्वें भिन्न उच्चार होतात. नाम, याचा अपभ्रंश नांव असा तूर्त बिंदुयुक्त लिहिलेला अढळतो, तथापि कोशामध्यें त्या शद्बावर व त्यापासून निघालेल्या दुसऱ्या दहा पंधरा शद्बांवर मुळींच बिंदु दिलेला नाहीं. वास्तविक पाहतां मकार

मुळींच जाऊन त्याच्या जागीं वकार आला आहे, यामुळें अनुनासिकत्वास कांहीं स्थळ राहिलें नाहीं. तशांत वकाराचा उच्चार संस्कृतांत जात्या सानुनासिकहि आहे, यावरून तर नवीन बिंदु देण्याचें कारणच दिसत नाहीं. या मताच्या बळकटीस हे पुढील शद्ब पाहा; त्यामध्यें मकाराच्या जागीं व आला असून कोणी बिंदु देत नाहीं:—

कामिला—कावीळ, शामल–सावली, चामर—चवरी.

यावरून पाहतां या अनुनासिकत्वास खरा आधार म्हणून कांहीं नाहीं. बहुधा वकार, ओकार, उकार, चकार, ककार, इत्यादिक शद्बांमध्यें आले असतां कोंकणी लोक त्याच्या आसपास कोठें तरी बिंदु देतात एवढें खरें आहे. कारण म्हणून कांहीं नाहीं. दादोबा पांडुरंग हे मी, आम्ही, म्या, हे शब्द सानुनासिकच लिहितात, परंतु दुसरा कोणी तसें लिहित नाहीं. ओवी शब्दावर परशुरामपंत गोडबोले हे नेहमी बिंदु देऊन ओंवी असें लिहितात, परंतु कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या लिहिण्यांत ओवी शब्दामध्यें अनुनासिकत्व नसतें.

कांहीं या शब्दामध्यें जे दोन बिंदु आहेत त्यांस काय आधार ? याची उत्पत्ति पाहिली असतां ‘ काय ही ’ अशी आहे. तेव्हां या नियमास म्हणावें काय ? देशी लोकांच्या बोलण्यांत हें अनुनासिकत्व येत नाहीं.

तसेंच ईव प्रत्ययांत शब्द देश कोंकणपरत्वें निरनुनासिक किंवा सानुनासिक असतात. उ० करीव, घोटीव, घडीव, इत्यादि शब्दांवर बिंदु देऊन कोंकणी लोक करींव, घोटींव, घडींव, इत्यादि लिहित असतात.

शे, किंवा शेहे (शत) यावर कोंकणांतील लोक बिंदु देतात यास काय आधार कोण जाणें; उ० चारशें, तीनशें इ०

शेकडो, लाखो, हजारो, यावर कोंकणी लोकांचा अनुस्वार तर असतोच; तसेंच घरोघर दारोदार इत्यादि शद्ब ते घरोंघर, दारोंदार, असेच उच्चारतात.

आणखी याशिवाय पुष्कळ स्थळीं अनुनासिकत्वाविषयीं देशी व कोंकणी लोक यांचा वाद आहे. परंतु तूर्त थोडे शब्द उदाहरणार्थ खालीं दिले आहेत त्यांकडे पाहिले असतां, खात्री होईल.

कोंपर	रेंस	चिंवट	टांच
ढोंपर	रेंव	पेंव	खोंट
मोंगल	लेंक	सांठा	टांप
रोंवणें	झांप	वांसरूं	टांपू
पोंच	शींव	सोंपणें	टांकी
खोंच	वांटणें	रत्नांगिरी	कांकडी
घोंस	कदांचित्	हांव	कांख
ओंठ	भरंवसा	फेंकणें	कांतणें
झोंप	स्वांरी	टांकळा	कांसोटा
भोंपळा	संवयी	आंचका	केंसर
भोंक	शेंवयी	झोंपडी	कोंकी
भोंकर	शिंवणें	टोंक	कोंतवाल
भोंसकणें	सभोंवती	चेंचणें	कोंटाळ
चोंथा	भोंवई	टेंकणें	खांच
झोंक	वांकडा	टेंकाड	खुरंट
रोंख	रांवा	टांकण	खेंटर
ठेंचणें	सोंटा	टांक	गंवसणी
रेंच	देंट	टांकी	चंवळी
पेंच	जिंकीर	जुंवळा	घोंटाळा
फेंस	घोंट	घांसणें	गोंवारी
जांतें	कोंता	गोंवरी	चांचपणें
गोंवळा	इत्यादि.		

देशी लोकांच्या भाषणामध्यें वरील शद्बामध्यें अनुनासिकत्व येत नाहीं. परंतु कोंकणी लोक त्यांवाचून हे शब्द केवळ अशुद्ध समजतात. या शब्दांपैकीं मोगल, टापू, स्वारी वगैरे शब्द हिंदुस्थानी भाषेंतून आलेले आहेत, त्यांजवर बिंदु दिला म्हणून कोणास आश्चर्य वाटेल, तर **डांकटर, कोंच, डेंपो,** या शब्दांवरील बिंदु पाहून त्यास किती आश्चर्य वाटावें ? याप्रमाणें मुख्यत्वें दक्षिण कोंकणांतील लोकांस या अनुनासिकत्वाची फारच प्रीति जडून गेली आहे; त्यांना त्यावांचून कसेंसेंच वाटतें.

वरील लेखावरून स्पष्ट दिसेल कीं आपल्या भाषेंत अनावश्यक अनुनासिकत्व पुष्कळ शिरलें आहे. परंतु बहुतकरून सर्व देशी लोकांच्या भाषणामध्यें पाहतां त्यांजकडे त्यांचें दुर्लक्ष असतें असें दिसेल. वस्तुदृष्ट्या त्या अनावश्यक अनुनासिकत्वावांचून त्यांची भाषा अशुद्ध ठरते असें जरी नाहीं, तथापि थेट पुण्यामध्यें राहणाऱ्या लोकांनीं आपल्या जन्मभाषेवर जाऊन अशा कोंकणी प्रकाराकडे दुर्लक्ष केलें म्हणून कित्येक परीक्षकांनीं लेखी परीक्षेमध्यें त्यांच्या चुका मानल्या आहेत, अशा गोष्टी वारंवार पाहण्यांत येतात. व यांपैकीं कित्येक शब्दांवर तर बिंदु दिलाच पाहिजे असे नियम केलेलेही कोठें कोठें आढळतात. तेव्हां कोणी इंग्लिश किंवा दुसऱ्या कोणी लोकांनीं परीक्षेच्या वेळीं तसें केलें तर त्यामध्यें आश्चर्य नाहीं.

भाषा ती काय, लोकव्यवहार हा तिजमध्यें प्रमुख मानला पाहिजे, आणि तशांत लोकव्यवहारास जर विशेष आधार असला तर तो अवश्य मान्य केला पाहिजे. या करितां देशभाषेमध्यें मुद्दाम अनुनासिक उच्चार घुसवून ती लिहिण्या वाचण्यांस कठीण करणें, व तीजवर कोंकणी भाषेची छाया आणणें हें प्रशस्त दिसत नाहीं. ज्याला कोंकणी प्रकार आवडत असेल त्यांनीं पाहिजे तर तो घ्यावा, परंतु दुसरे घेत नाहींत तर त्यांची भाषा अशुद्ध असें म्हणण्याचा कोणास अधिकार नाहीं. कारण मराठींत

देशभाषा मुख्य धरली आहे, आणि कोंकणी प्रकार हा एकदेशीय मानला आहे. दुसरें असें कीं, एकदेशीय प्रकार मोडून सर्वमान्य जो प्रकार असेल त्याचें अवलंबन करणें याकडे लोकांचा जितका कल असेल तितकी ती भाषा एका स्वरूपानें राहण्यास विशेष समर्थ होत असते. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां स्पष्ट दिसेल कीं, जे जे अनावश्यक अनुनासिक उच्चार आपल्या लेखनामध्यें स्थापित होऊं पाहत आहेत, त्याचा आपण त्याग केला असतां आपली भाषा अशुद्ध होईल असें म्हणण्यास कांहीं आधार नाहीं.

या निबंधांतील मतें अद्यापि प्रसिद्ध झालीं नसल्यामुळें, यांतील भाषेमध्यें अनुनासिकत्वाविषयीं पूर्वींचींच मतें ठेविलीं आहेत. पुढें खऱ्या प्रकारानें चालण्याकडे लक्ष देऊं.

(ऑक्टोबर, १८६८, पु. २, अं. ४)

१ : : व्याकरण–विवेचन

कोणत्याही वस्तूचें किंवा विद्येचें पूर्ण ज्ञान होण्यास, मूळपाया म्हटला म्हणजे त्यांची यथास्थित व्याख्या किंवा लक्षण, हा होय. तो लक्षणरूपी पायाच जर खोटा किंवा अपुरा आहे, तर त्याजवर रचलेली जी पुढची इमारत, म्हणजे त्या वस्तूचें किंवा विद्येचें ज्ञान, तेंही तसेंच खोटें किंवा अपुरें असायाचें. याकरितां विद्यार्थ्यास आपल्या इष्ट विषयाचें वास्तविक लक्षण समजणें ही मोठी महत्त्वाची गोष्ट आहे. आणि तें चांगलें समजलें म्हणजे अर्धा हेतु सिद्धीस गेला म्हणून समजावें.

सांप्रत आपण व्याकरण म्हणजे काय याविषयीं विचार करूं.

बाळ गंगाधर शास्त्री यांणीं "व्याकरण म्हणजे शुद्ध रीतीनें बोलणें आणि लिहिणें यांची विद्या," अशी व्याख्या दिली आहे. आतां या व्याख्येंतीलच शब्दांकडे लक्ष देऊन जर विचार केला, तर ती अगदीं अक्षरशः शुद्ध आहे. व ज्या वेळीं तें व्याकरण लिहिलें व ज्यांच्याकरितां तें लिहिलें, त्यांच्या योग्यतेकडे लक्ष देऊनच व्याकरणकारानें, थोडक्यांत ती व्याख्या दिली असावी. पण हें जर आपण लक्षांत आणिलें, कीं, त्या वेळेपेक्षां हल्लीं भाषा पुष्कळ थाऱ्यावर आलेली आहे, संशयाचीं स्थळें फारच थोडीं राहिलीं आहेत, आणि दिवसेंदिवस शिकणारांची संख्या व ज्ञान हीं वाढत चाललीं आहेत; तर सांप्रतकाळीं, "शुद्ध कसें बोलावें, आणि शुद्ध कसें लिहावें; हें शुद्ध कां व हें अशुद्ध कां; हें व्याकरण शिकल्यानें समजतें," अशा व्याख्येनें विद्यार्थ्यांचें समाधान होणार नाहीं हें उघड दिसेल. कारण शुद्ध म्हणजे काय आणि अशुद्ध म्हणजे काय हेंच त्यांना समजत नाहीं. कित्येक म्हणतात कीं व्याकरणामध्यें जें आहे तें शुद्ध, आणि त्यापासून वेगळें असेल तें अशुद्ध. परंतु तें असें कां, हें त्यांस कळत नाहीं. कित्येक व्याकरणकारही याविषयीं चमत्कारिक मताचे आहेत. ते "लाडवास, लाडवाला, इत्यादि रूपें प्रचारांत आहेत खरीं, परंतु व्याकरणदृष्ट्या

लाड्वास, लाड्वाला इत्यादि रूपें शुद्ध होत, " अशा प्रकारचे विचार लिहून शिकणारास भ्रांतींत घालतात. यामुळें प्रचार खरा किंवा व्याकरण खरें याचा विचार करतां करतां शिकणारास वाटूं लागतें कीं, प्रचारापेक्षां व्याकरण शुद्ध खरें; याचें कारण त्याला वाटतें व्याकरण म्हटलें म्हणजे कोणी मोठ्या विद्वानानें केलेलें आहे, त्याप्रमाणें लोकांनीं बोलावें लिहावें, परंतु लोक अडाणी पडल्यामुळें तसें करीत नाहींत ही त्यांची चूक. असें होतां होतां त्यांची इतकी खात्री होऊन जाते कीं, आधीं विद्वान् लोकांनीं व्याकरणाचे नियम ठरविले, आणि नंतर त्यांवरून भाषा चालू झाली! परंतु वास्तविक गोष्ट तशी नाहीं.

मनुष्यें परस्पर हजार कोसांच्या अंतरावर जरी असलीं, तरी त्यांच्या शरीराच्या रचनेंत कांहीं फेर नसतो, तद्वत्च मनुष्यांच्या मनाच्या रचनेंतही कांहीं फेर नाहीं. यामुळें परस्परांचा व्यवहार पडला म्हणजे आपोआप भाषा चालू होते. नंतर जे कोणी वजनदार लोक असतात, ज्यांस चौघांत मान असतो, त्यांच्या भाषेसही त्याप्रमाणेंच मान मिळूं लागतो, त्यांच्या भाषेमध्यें बहुतकरून दिवसेंदिवस अधिक व्यवहार चालूं लागतो; व त्या भाषेला प्रतिष्ठितपणा येतो. असा प्रकार पुष्कळ दिवस चालला म्हणजे, ती भाषा चांगली, व तिच्या विरुद्ध दुसरे प्रकार असतील ते वाईट असा लोकांच्या मनाचा कल होतो. एकाच भाषेमध्यें सारख्या वजनदार लोकांच्या बोलण्याच्या प्रकारांत कांहीं भेद असल्यास दोन्हीही मान्य होतात. याप्रमाणें सर्वांना मान्य जी असेल ती भाषा शुद्ध. आणि बाकीची अशुद्ध. याशिवाय शुद्ध आणि अशुद्ध, किंवा चांगली आणि वाईट असें म्हणण्यास दुसरा कांहीं आधार नाहीं. एकाच भाषेंतील निरनिराळे प्रकार त्या त्या लोकांच्या कमी जास्ती वजनाप्रमाणें, कालांतरानें शुद्ध किंवा अशुद्ध ठरण्याचा संभव आहे. अशा प्रकारच्या शुद्ध ठरलेल्या भाषेंत जे नियम दिसतील, ते लिहून ठेविलें असतां त्या पुस्तकास व्याकरण म्हणतात. सारांश व्याकरणदृष्ट्या

अमुक प्रचार शुद्ध, व अमुक प्रचार अशुद्ध, असें म्हणण्याचा व्याकरण-कर्त्यास अधिकार नाहीं. त्याचें काम इतकेंच कीं वर सांगितल्याप्रमाणें भाषेच्या संबंधानें प्रतिष्ठित मानलेले जे लोक त्यांच्या बोलण्यांत व लिहिण्यांत जे नियम दिसतील, ते त्यानें बिनचूक लिहून ठेवावे.

(पु. १, अं. १, जुलै १८६७)

---

२ : : व्याकरण विवेचन

मागील अंकांत आम्हीं व्याकरणाच्या लक्षणाविषयीं विचार केला आहे; परंतु त्यानंतर आलिकडे राजमान्य राजश्री कृष्णशास्त्री गोडबोले यांणीं मराठी व्याकरणावर एक ग्रंथ रचलेला आमच्या पाहण्यांत आला. त्यामध्यें त्यांणीं "व्याकरणांत विद्वान् लोक कसें बोलतात आणि लिहितात, याचें पद्धतवार निरूपण केलेलें असतें," असें लक्षण दिलेलें आहे. परंतु शोधाअंतीं असें समजेल कीं, पश्चिम महाद्वीपांतील जंगली लोक; ज्यांस वस्त्र स्वप्नांतसुद्धां माहित नाहीं; जे रानांतील श्वापदांवर, जंगली फळांवर व प्रसंगीं आपल्यासारख्याच हस्तपादादिकांनीं युक्त अशा स्वजातिबांधवांच्या रक्तमांसादिकांवर चरितार्थ चालविणारे, विद्या किंवा ज्ञान यांविषयीं जे पशूंची बरोबरी करणारे, अशा लोकांच्या भाषांचींही व्याकरणें हल्लीं रचलेलीं आहेत, व त्यांचा अभ्यास करून पुष्कळ युरोपी लोक त्यांच्याशीं व्यवहार ठेवीत आहेत. यावरून असें दृष्टोत्पत्तीस येईल कीं, विद्वान् लोकांच्याच भाषणांमध्यें कांहीं नियम असतात असा अर्थ नाहीं. आतां जंगली किंवा अडाणी लोकांच्या वजनाप्रमाणें त्यांच्या भाषेचेंही वजन तशासारखेंच असतें, म्हणून तिजमधील नियमांकडे कोणी तादृश लक्ष देत नाहीं ही गोष्ट जगताच्या वर्तनास अनुसरून होत आहे; आणि अशा या क्षुल्लक

प्रकारच्या अगणित भाषांचे नियम शोधून काढीत बसण्यामध्यें कांहीं अर्थ नाहीं हें खरें आहे; तथापि, ते विद्वान् नाहींत या कारणामुळें त्यांच्या भाषेंत नियम नाहींत, व ते जमवून व्याकरण करितां येणार नाहीं, असें म्हणतां येत नाहीं.

आतां या संदिग्ध व्याख्या सोडून आपल्या भाषेंतील, "व्याकरण" याच शब्दाच्या घटनेवरून जो अर्थ सिद्ध आहे तो येथें घेऊं. व्याकरण हा, कृ म्हणजे कर या धातूस **वि** आणि **आ** उपसर्ग लागून भाववाचक शब्द जाहलेला आहे. त्याचा अर्थ, विशेषेंकरून मर्यादा करणें असा होतो. म्हणजे " ज्या शास्त्रामध्यें, भाषेचे मूलभूत अवयव आणि त्यांचा अर्थविस्तार करणारे प्रत्यय यांच्या योगानें शब्द सिद्ध होण्याचा प्रकार, आणि वाक्यांतील अवयवांचा परस्पर संबंध, यांचें प्रतिपादन केलेलें असतें तें व्याकरण." यावरून महाराष्ट्र भाषेविषयीं ज्यांत प्रतिपादन केलें असतें तें महाराष्ट्र व्याकरण होय.

महाराष्ट्र भाषा मुळीं संस्कृत भाषेपासून निघालेली आहे. तथापि एकदम संस्कृतापासून निघून आपली सांप्रतची मराठी भाषा सिद्ध जाहली असा अर्थ नाहीं. तर प्राकृत किंवा बालभाषा म्हणून एक प्राचीन काळीं प्रचारांत होती, ती संकृतापासून निघाली, व तिजपासून आपली मराठी उत्पन्न झाली असें शोधाअंतीं सिद्ध जाहलें आहे.

बरें, आतां या भाषेस महाराष्ट्र भाषा म्हणण्याचें कारण काय याविषयीं विचार करून पाहूं.

मोल्स्वर्थकृत मराठी इंग्रेजी शब्दकोशाच्या आरंभीं मुंबईतील डाक्तर उइसलन यांणीं लिहिलेला एक निबंध आहे, त्यांत त्यांणीं म्हटलें आहे कीं, महाराष्ट्र देशांतील भाषा ती महाराष्ट्रभाषा. परंतु महाराष्ट्र म्हणजे काय, यावर कोटी करून ते पुढें म्हणतात कीं, " त्याचा अर्थ मोठा देश असा जरी ब्राह्मणलोक करितात, तरी तो मोठा देश कसा त्याचें त्यांस समाधान

करितां येत नाहीं. त्यापक्षीं त्याचा दुसराही एक अर्थ संभवनीय आहे तो असा—महाराष्ट्र देशाच्या शेजारीं गुर्जरलोक आहेत त्यांच्या देशास जसें गुर्जरराष्ट्र किंवा गुजराथ असें नांव आहे, त्याप्रमाणें महारांचें जें राष्ट्र तें महारराष्ट्र किंवा महाराष्ट्र असा याचा अर्थ असावा." परंतु हा तर्क केवळ खोटा आहे असें स्पष्ट दिसून येईल. या आमच्या म्हणण्यास आधार आहे तो असा—वररुचि किंवा कात्यायन या नामें जो मुनि होऊन गेला त्यानें **प्राकृतप्रकाश** म्हणून एक बालभाषेच्या व्याकरणावर सर्वमान्य ग्रंथ केला आहे. त्यांत बालभाषेच्या पोटीं माहाराष्ट्री, पैशाची, मागधी, आणि शौरसेनी, असे चार भेद केले आहेत. व फक्त माहाराष्ट्रीच्या व्याकरणाचेच विस्तीर्ण नऊ अध्याय लिहिले आहेत, आणि इतर तीन प्रकार एक एकच अध्यायांत आटपून टाकिले आहेत. यावरून स्पष्ट दिसेल कीं, माहाराष्ट्री हा मुख्य विस्तीर्ण व बाकीचे किरकोळ प्रकार होत. दुसरें—या शेवटच्या तीन प्रकारांच्या आरंभीं मागधी, पैशाची, शौरसेनी अशीं स्पष्ट नांवें घातलेलीं आहेत. परंतु पहिल्या नऊ अध्यायांत माहाराष्ट्री हें नांव मुळींच सांपडत नाहीं. शेवटीं शौरसेनीच्या अध्यायाच्या समाप्तीस एक सूत्र असें आहे—

शेषं माहाराष्ट्रीवत् ॥

अर्थ— याशिवाय इतर व्यवस्था माहाराष्ट्रीप्रमाणें म्हणजे पहिल्या नऊ अध्यायांवरून समजावी.

तेव्हां, ज्या भाषेचे विस्तीर्ण नऊ अध्याय व्याकरण लिहिलें, तिचें नांव लिहिण्याची त्यास आवश्यकता वाटली नाहीं, व अन्य ठिकाणीं त्याणें तीस माहाराष्ट्री असें स्पष्ट म्हटलें, यावरून उघड दिसतें कीं, त्या शब्दामध्यें गूढार्थ कांहीं एक नाहीं, व महाराष्ट्र म्हणजे मोठा देश असा शब्दार्थ असून विस्तीर्ण देशांतील म्हणजे सामान्यतः उत्तर भरतखंडांतील लोकांची जी भाषा ती माहाराष्ट्री असा त्याचा भाव होता.

कालांतरानें जेव्हां हे लोक दक्षिणेंत पसरले, तेव्हां त्यांजबरोबर त्यांची भाषाही पसरली. यावरून त्यांच्या देशास महाराष्ट्र देश आणि भाषेस महाराष्ट्र भाषा अशीं नावें पडलीं. उत्तरेकडील भाषेमध्यें हिंदी, व्रज, बंगाली, गुजराथी इत्यादि भेद जाहले. इकडच्या देशास व भाषेस मात्र मूळचें नांव कायम राहिलें. प्रथमतः महाराष्ट्र या शब्दाचा सामान्य अर्थ घेत असत; परंतु दक्षिणेंत त्याचा विशेषार्थ झाला. महाराष्ट्री भाषेपासून महाराष्ट्र भाषा झाली याविषयीं तर संशय राहिलेलाच नाहीं. माहाराष्ट्री या शब्दाचा अपभ्रंश म्हाराटी किंवा म्हराटी असा विवेकसिंधुग्रंथांत सांपडतो, व त्यावरून आपला मराठी हा शब्द जाहलेला आहे. महाराष्ट्र भाषेच्या उत्पत्तिकाळाविषयीं पाहिलें, तर सांप्रत वररुचि पंडिताच्या व्याकरणास सवातीन हजार वर्षें झालीं, असें तारानाथ तर्कवाचस्पति भट्टाचार्य म्हणून कलकत्ता एथील संस्कृत विद्यालयामध्यें जे व्याकरणशास्त्राचे अध्यापक आहेत त्यांणीं समर्थक सिद्ध करून दिलें आहे. व म्हार हा शब्द मुळींच संस्कृत ग्रंथांत सांपडत नाहीं. यावरून तो अतिशयित अलीकडचा आहे हें निभ्रांत. तस्मात् एकंदर गोष्टीवरून अशी खात्री होईल कीं, महाराष्ट्र हा मूळचा सार्थ शब्द आहे व म्हार या शब्दाचा त्याशीं कोणत्याही प्रकारें कांहीं संबंध नाहीं, व डॉक्टर उइलसन यांचा वर लिहिलेला निराधार तर्क केवळ अश्लाघ्य आहे.

(पु. १, अं. २, ऑगस्ट १८६७)

२ : : व्याकरणविचार

मुंबई–विद्वन्मंडळाच्या प्रवेशपरीक्षेस जाणाऱ्या बहुतेक लोकांच्या सूचनेवरून "संधिविचाराविषयीं" विशेष समजूत पडण्याकरितां हे पुढील नियम दिले आहेत.

कोणतीही गोष्ट पायाशुद्ध जाहल्यानें तिजमध्यें कांहीं घोटाळा राहात नाहीं, याकरितां प्रथमतः आपण मराठी वर्णमालेची रचना स्पष्ट करून मग पुढील सामान्य तत्त्वांकडे लागूं.

वर्णांमध्यें स्वर आणि व्यंजनें असे दोन भेद आहेत. व्यंजनांमध्यें प्रथमतः पांच पांच व्यंजनांचा एक-एक, याप्रमाणें पांच वर्ग, त्यांपुढें **अंतस्थ** या नांवाचे य र ल व हे चार वर्ण; त्यांपुढें **ऊष्म** या नांवाचे श ष स हे तीन, आणि शेवटीं ह, अशी रचना आहे. हकार हा बहुधा ऊष्मांमध्यें धरितात; परंतु सोईकरितां एथें आपण तो वेगळाच घेऊं.

आतां **स्थानविचारा**कडे पाहिलें तर बहुशः असें दिसतें कीं, स्वरांचें एक एक जोडपें, व्यंजनांपैकीं एक एक वर्ग, एकादा अंतस्थ, आणि एकादा ऊष्म, इतक्यांचें मिळून एक स्थान असतें; म्हणजे ते ते सर्व, मुखाच्या एकाच भागापासून उत्पन्न झालेले असतात. पहा;—

स्वर	वर्गीय	अंतस्थ	ऊष्म आणि ह	स्थान
अ आ	कवर्ग	– –	ह	कंठ
इ ई	चवर्ग	य	श	तालु
उ ऊ	पवर्ग	व×	– –	ओष्ठ
ऋ ॠ	टवर्ग	र	ष	मूर्धा
ऌ	तवर्ग	ल	स	दंत
ए ऐ	– –	– –	– –	कंठ, तालु
ओ औ	– –	– –	– –	कंठ, ओष्ठ

× **व** हा दंतौष्ठ्य आहे. परंतु कारणास्तव तूर्त नुसता ओष्ठ्यच मानला आहे

या वर्णांस त्यांच्या त्यांच्या स्थानांप्रमाणें कंठ्य (कंठांतून निघणारे), तालव्य (ताळ्यांतून निघणारे), ओष्ठ्य (ओठांपासून निघणारे), मूर्धन्य (मस्तकापासून निघणारे), दंत्य (दांतांपासून निघणारे), कंठतालव्य (कंठ आणि ताळा यांपासून मिळून निघणारे), आणि कंठौष्ठ्य (कंठ आणि ओंठ यांपासून मिळून निघणारे), अशीं नांवें पडलीं आहेत.

एकाच स्थानापासून निघालेल्या वर्णांस **सवर्ण** किंवा **सजातीय** म्हणतात. यांत ए ऐ, आणि ओ औ हीं दोन्ही जोडपीं दीर्घ-दीर्घ स्वरांचींच आहेत; परंतु इतर स्थानीं जे दोन दोन स्वर आहेत, ते एकच असून फक्त उच्चाराच्या अवकाशावरून ऱ्हस्व (लहान) आणि दीर्घ (लांब) झाले आहेत. ऌ यास तर दीर्घत्व नाहींच.

वर्गीयांमध्यें प्रथमतः दोन दोन वर्णांचीं दोन जोडपीं आणि पुढें एक अनुनासिक (म्हणजे मुख आणि नासिक या दोहोंपासून मिळून निघणारा), असे पांच वर्ण असतात. त्या दोन्ही जोडप्यांतील पहिल्या वर्णांस **अल्पप्राण** आणि दुसऱ्यास **महाप्राण** म्हणतात; कारण पहिल्यापेक्षां दुसऱ्यामध्यें हकारासारखा कांहींसा जोर अधिक असतो. जसें क, ख; ड, ढ; इ.

या पांचही वर्णांतील प्रथमचे दोन दोन वर्ण म्हणजे क ख, च छ, ट ठ, त थ, आणि प फ, आणि ऊष्म नांवाचे श ष स, यांचा उच्चार कांहींसा कठोर होतो. यांस संस्कृतांत **खर्** अशी संज्ञा आहे. इतर सर्व व्यंजनांस व सर्व स्वरांस आपण **मृदु** हें नांव ठेवूं.

टीप—याप्रमाणें वर सांगितलेली ही वर्णमालेची रचना नीट लक्षांत ठेविली, तर संधिविचार समजण्यास कांहीं उशीर लागणार नाहीं.

स्वरसंधि

१ अ आ, इ ई, उ ऊ, ऋ ॠ, यांतून कोणतेही दोन सवर्ण स्वर एकत्र आले असतां त्या दोहोंच्या बदली त्यांतला दीर्घ येतो.

उदाहरणें—वस्त्रान्न, धर्माश्रय, नदीश, भानूदय, पितॄण इ.

२ पुढील नियमांकडे लक्ष दिलें असतां ते केवळ स्वाभाविक आहेत असें स्पष्ट दिसेल.

१ अ किंवा आ कंठ्य आहे म्हणून, पुढें इ किंवा ई तालव्य आल्यास दोघांच्या बदली ए हा कंठतालव्य होतो.

२ अ आ कंठ्य, उ ऊ ओष्ठ्य, म्हणून दोन्ही मिळून ओ कंठौष्ठ्य.

३ अ आ कंठ्य, ऋ ॠ मूर्धन्य; म्हणून दोन्ही मिळून कंठ्य आणि मूर्धन्य अर्.

४ अ आ कंठ्य, ऌ दंत्य; म्हणून दोन्ही मिळून कंठ्य आणि दंत्य अल्.

५ अ आ कंठ्य, ए ऐ कंठ्य आणि तालव्य; म्हणून दोन्ही मिळून दुसरा कंठतालव्य ऐ.

६ अ आ कंठ्य, ओ औ कंठ्य आणि ओष्ठ्य; म्हणून दोन्ही मिळून दुसरा कंठौष्ठ्य औ.

उदाहरणें—रमेश, गंगोदक, कृष्णर्द्धि, तवल्कार, एकैक, गंगौघ इ.

३ इ ई, उ ऊ, ऋ ॠ, ऌ, यांपुढें स्वर आला तर त्या प्रथम स्वराच्या जागीं अंतस्थांतील त्यांचा सवर्ण येतो आणि तो मग पुढील स्वरास मिळतो; म्हणजे—

१ इ ई तालव्य; म्हणून पुढें स्वर असतां त्यांच्या जागीं अंतस्थांतील तालव्य य् होतो.

२ उ ऊ ओष्ठ्य; म्हणून त्यांच्या जागीं अंतस्थांतील ओष्ठ्य व् होतो.

३ ऋ ॠ मूर्धन्य; म्हणून त्यांच्या जागीं अंतस्थांतील मूर्धन्य र् होतो.

४ ऌ दंत्य; म्हणून त्याच्या जागीं अंतस्थांतील दंत्य ल् होतो.

५ ए, १ ला कंठतालव्य; म्हणून १ ला कंठय आणि अंतस्थांतील तालव्य अय् होतो.

६ ऐ २ रा कंठतालव्य; म्हणून २ रा कंठय आणि अंतस्थांतील तालव्य आय् होतो.

७ ओ १ ला कंठौष्ठय म्हणून. १ ला कंठय आणि अंतस्थांतील ओष्ठय अव् होतां.

८ औ २ रा कंठौष्ठय; म्हणून दुसरा कंठय आणि अंतस्थांतील ओष्ठय आव् होतो.

उदाहरणें—इत्यत्र, मन्वंतर, मात्रर्थ, लनुबंध, नयन, गायन, गवुत्साह इ. यांतील अपवाद पुढें येतील.

(पु. १. अं. ३, सप्टेंबर १८६७.)

---

२ : : व्याकरणविचार

व्यंजनसंधि

हे पुढील नियम वाचण्यापूर्वी अल्पप्राण, महाप्राण, खर् , मृदु इत्यादि ज्या संज्ञा मागील अंकामध्यें विस्तारपूर्वक सांगितल्या आहेत, त्या नीट वाचून लक्षांत ठेवाव्या; म्हणजे समजुतीस अडचण पडणार नाहीं.

१ संस्कृतामध्यें कर्णकठोर उच्चार टाळण्याकडे फार लक्ष असतें. यामुळें असा एक नियम झाला आहे, कीं शब्दाच्या अंतीं वर्गातील महाप्राण व्यंजन असलें, तर, पुढें अवसान असो किंवा दुसरा शब्द येऊन संधि होवो, तेथें तें महाप्राण व्यंजन राहूं शकत नाहीं; त्याच्या बदली त्याचा अल्पप्राण आला पाहिजे. उदा० समिध्–समिद् .

(क) परंतु अल्पप्राणामध्येंही खर् आणि मृदु असे दोन भेद आहेत; म्हणून पुढें अवसान असतां अशा स्थळीं, पाहिजे तर

खर किंवा पाहिजे तर मृदु घालतां येतो. उदा० समिध्, समिद्, समित्. तथापि खराची प्रवृत्ति विशेष आहे.

(ख) शब्दाच्या अंतीं वरील मुख्य नियमाप्रमाणें महाप्राणापासून आलेला अल्पप्राण असो, किंवा मूळचाच असो, पुढें जर खर आला तर तो मागचा अल्पप्राण खराच्या जातीचा होतो, आणि पुढें मृदु आला, तर मृदूच्या जातीचा होतो. उदाहरणें—

समिध्–द्, आहरण=समिदाहरण.

क्षुध्–द्–त्, पिपासा=क्षुत्पिपासा.

(ग) वर्गांतील पांचवीं अक्षरें जीं आहेत, तीं मृदु असून अनुनासिकही आहेत. म्हणून तीं पुढील शब्दाच्या आरंभीं आलीं असतां, मागील व्यंजन पाहिजे तर नुसतें मृदु होतें, किंवा आपल्या जोडीचें अनुनासिक होतें. परंतु बहुधा अनुनासिकाचा प्रचार विशेष आहे. उदा०–तत्–द्–न्, निमित्त=तद्निमित्त, तन्निमित्त.

विशेष नियम.––१ शब्दाच्या अंतीं चकार किंवा जकार असला, तर तो ककार किंवा गकार समजून मग वरील नियम लावावे.

वाच्–क्––ग्, ईश=वागीश

वाच्–क्, पति=वाक्पति.

वाच्–क्–ग्–ङ्, नियम=वाग्नियम, वाङ्नियम.

२ त् किंवा द् यापुढें चवर्ग, टवर्ग किंवा ल आला तर त्या प्रथम अक्षरास वर सांगितलेले खर मृदु विकार होतात खरे, परंतु त्याच्या बदलीं आधीं चवर्ग, टवर्ग किंवा ल यांतील व्यंजनें अनुक्रमें आलीं पाहिजेत. उ०—

तत्–च्, चरित्र=तच्चरित्र.

तत्–ट्, टीका=तट्टीका.

तत्–च्–ज्, जाया=तज्जाया.

तत्, लीला=तल्लीला.

(क) हाच नियम थोडक्यांत सांगतां येईल, तो असा. तकारापुढें चवर्ग, टवर्ग किंवा ल यांतील वर्ण आला असतां, तकारास पुढील वर्णाचें स्वरूप हातें. परंतु

(ख) एथें, दुसरा एक नियम येतो तो हा–दोन महाप्राण वर्ण एकत्र आले असतां पहिल्याचा अल्पप्राण होतो. उ०—

शरत्–झ्–ज्, झंझा=शरज्झंझा.

तत्–छ्–च्,छत्र=तच्छत्र.

याच नियमावरून, शुध्ध, विठ्ठल हीं रूपें अशुद्ध होत.तीं शुद्ध, विट्ठल अशीं असावीं.

३ हकार मृदु वर्ण आहे, म्हणून तो पुढें असतां मागचें व्यंजन मृदु हातें, हें ठीकच आहे. जसें वाक्,हरि=वाग्हरि इ. परंतु कष्टोच्चारण टाळण्याकरितां पाहिजे तर त्या हकाराच्या जागीं त्या मृदु वर्णाचा महाप्राण घालतां येतो. जसें—

वाक–हरि=वाग्हरि, वाग्घरि इ०

४ सकारापुढें, च छ किंवा श आल्यास सकाराचा शकार; आणि ट, ठ किंवा ष आल्यास, षकार होतो. उदा०—

मनस्, चंद्र=मनश्चंद्र इ०

५ ह् छ् श् ष् हे अंतीं असतां त्यांस टकार होतो. जसें मुह मुट्, प्राछ् प्राट्, विश् विट्, प्रावृष् प्रावृट्.

(क) श् ह् अंतीं असतां क्वचित् क् ही होतात. जसें स्पृश् स्पृक्, मुह् मुक्.

(ख) अंत्य हकाराचा क्वचित् त् होतो. उदा०–उपानह्, उपानत्.

६ वर असा एक नियम आला आहे, कीं तकारापुढें च आला तर तकाराला चकार होतो. श हें अक्षर चवर्गाच्या जातीचें आहे. तेव्हां पुढें श आला असतांही तकाराला चकार होतो. परंतु, आणखी पुढील श चा छ होतो. उदा० तत्, शत्रु=तच्छत्रु.

(क) नकारापुढें श आल्यास न्श, ञ्छ, ञ्च्छ अशीं रूपें होतात. उ० भवान्शूर, भवाञ्छूर, भवाञ्च्छूर.

किरकोळ नियम

१ मागें अक्षर असून पुढें छ आला असतां बहुधा त्याचा च्छ होतो. उदा०.वृक्ष, छाया=वृक्षच्छाया इ०

२ शब्दाच्या अंतीं ङ्, ण् किंवा न् असला, आणि त्याच्यामागें ऱ्हस्व स्वर असला, तर पुढें आणखी कोणताही स्वर आल्यास ङ्, ण्, न् यांस द्वित्त होतें. उ०—

प्रत्यङ्, आत्मा=प्रत्यङ्ङात्मा.

सुगण्, ईश=सुगण्णीश.

सन्, अच्युत=सन्नच्युत.

२ मकारापुढें कोणतेंही व्यंजन आलें तर मकाराचा अनुस्वार होतो किंवा त्याच्या जागीं पुढील अक्षराच्या वर्गांतील अनुनासिक येतो. उदा० सम्, ताप=संताप किंवा सन्ताप; संशय, संयोग इत्यादि; परंतु सम्राट् शब्दामध्यें संराट् असें रूप होत नाहीं.

यावरील नियमाविषयीं बहुतेकांचा वाद आहे. वर्गीय अक्षर पुढें असतां, मागील अनुस्वाराच्या जागीं, सर्वदा पुढील अक्षराच्या वर्गांतील अनुनासिकच यावा, असा कित्येकांचा आग्रह आहे. या मतास अनुसरूनच आलीकडील मराठी **ज्ञानप्रसारक**कर्त्यांचा प्रचार आहे व कलकत्त्याकडे छापलेल्या पुस्तकांतही ही रीति दृष्टीस पडते. परंतु संस्कृत व्याकरणकार **पाणिन्याचार्य** यांचा कांहीं इतका कडक नियम नाहीं.

दोन शब्द जोडले नसतील अशा स्थानीं जर वर सांगितलेला प्रसंग आला, तर मात्र अनुनासिक केला पाहिजे. इतरत्र इच्छेचें काम आहे. पाहिजे तर अनुनासिक करावा किंवा अनुस्वारच ठेवावा. आतां पाणिन्याचार्यांची योग्यता महान्, आणि त्यांच्या वाक्यास आड येण्याचा कोणास अधिकार नाहीं, हें खरें आहे; तथापि कित्येक अन्य वैयाकरणांच्या मतें सर्वदा दोन्ही रूपें मान्य आहेत. तशांत पुढील अनुनासिकाच्या जागीं अशा स्थळीं अनुस्वार असल्यानें उच्चारांत कांहीं फेर पडतो असा अर्थ नाहीं. लिहिण्याची सुलभता पाहिली, तर अनुस्वाराच्याच पक्षाची आहे. प्रचार म्हणावा तर **वाराणसी**सारख्या वंद्य स्थळीं **बापूदेव** पंडितासारखे विद्वान् हाच प्रकार चालवीत आहेत. सर्व दक्षिणेंत तर, जे लोक वेदाध्ययनामध्यें एक स्वर चुकला लोक तर जिव्हाच्छेदन करण्यास, आणि पुस्तकामध्यें अवाक्षर पडलें तर हस्तच्छेदन करण्यास सिद्ध होऊन बसणारे होऊन गेले, व अजूनही आहेत, त्यांचीं पुस्तकें जर पाहिलीं तर अनुस्वाराच्याच पक्षाचीं आहेत.तेव्हां प्रत्यक्ष संस्कृतांतही फक्त दुराग्रही लोकांशिवाय इतर सर्व लोक दोन्ही पक्ष मान्य करतात, तर मग मराठीची काय कथा ? ज्या लोकांस फक्त अनुस्वाराचा एकच सुलभ पक्ष माहित आहे, तो मोडून त्याच्या जागीं लिहिण्यास व बहुशः वाचण्यासही कठीण नवीन प्रकार त्यांना घालून देण्यांत किंचित् लाभ नसतां हानीचा संभव विशेष आहे.

४. विसर्ग आणि रेफ यांविषयीं थोडक्यांत सर्व नियम सागतां येणार नाहींत. परंतु साधारणपणें असा नियम आहे कीं,

(क) अः यापुढें मृदु अक्षर आलें असतां अः याच्या जागीं ओ होतो; जसें:—

मनः, जय=मनोजय, मनोरथ इ०

(ख) विसर्गापुढें खर वर्ण असतां तो तसाच राहतो. किंवा बहुधा विसर्गाचा सकार होऊन, पुढील अक्षराच्या वर्गाप्रमाणें (वरील नियमांनुसार) त्याची व्यवस्था होते.

उ० मनःकल्पित, मनस्ताप, मनश्चंद्र, नमस्कार. पुढें खर असतां अकारापुढील विसर्गाचा क्वचित् रेफही होतो. अहर्पति इ०

(ग) पुढें अवसान असतां रेफ आणि स् यांचा विसर्ग होतो. जसें मनः, पुनः इ०

(घ) इतर स्वरांपुढें विसर्ग असून पुढें मृदु अक्षर आल्यास विसर्गाचा रेफ होतो.

जसें—चक्षुः, इंद्रिय=चक्षुरिंद्रिय.

धनुः, वारी=धनुर्वारि.

५ ऋ, र्, ष्, यांपुढें, नकार आधीं असलेलें अक्षर आलें, तर नला ण होतो. परंतु मध्यें चवर्ग, तवर्ग, टवर्ग किंवा ल किंवा श आला, तर नच राहतो.

उ० ऋण, कारण, विष्णु, अर्जुन, अनुष्ठान, मर्दन इ०

६ अ, आ, सोडून इतर स्वरांपुढें किंवा क् र् ल् यांपुढें स् आला असतां त्याचा ष होतो. आणि अशा स्थितींत सकारापुढें त थ किंवा न आल्यास ट्, ठ्, किंवा ण् होतात.

७ समासामध्यें, प्रथमशब्दाच्या शेवटचा नकार नाहींसा होतो. उदा० राजन्, आज्ञा=राजाज्ञा. जन्मन्, कर्म=जन्मकर्म. इ०

मराठी भाषेंत जे संस्कृत शब्द येतात, त्यांचे संधि समजण्यास यांपेक्षां विशेष बारीक नियमांची कांहीं गरज नाहीं. याकरितां फक्त सारस्वतकारानें जे अपवादांचे श्लोक दिले आहेत तितके मात्र एथें उतरून घेतों.

गवाक्षश्च गवेंद्रश्च गवाग्रंच गवाजिनं ॥
स्वैरमक्षौहिणी प्रौढ एते प्रोक्ता गवादयः ॥ १ ॥

हलीषा लांगलीषा च मनीषाऽद्यों तथैव च ॥
शकंधुरथ कर्कंधुः सीमंतः कुलटा तथा ॥ १ ॥
पतंजलिश्च सारंग एते प्रोक्ता हलादयः ॥

गो, अक्ष; गो, इंद्र; गो, अग्र; गो, अजिन; स्व, ईर; अक्ष, ऊहिनी; प्र, ऊढ.

हल, ईषा; लांगल, ईषा; मनस्, ईषा; अद्य, ओं; शक, अंधु; कर्क, अंधु; सीमन्, अंत; कुल, अटा; पतत्, अंजलि; सार, अंग. असे शब्द असतां वरील श्लोकांत असल्याप्रमाणें संधिरूपें होतात.

(पु. १ अ. ४, ऑक्टोबर १८६७)

---

३ : व्याकरणविचार

क्रियापदांचें विभागीकरण

कांहीं दिवसांपूर्वीं नवीन झालेल्या दोन व्याकरणांविषयीं आमचीं कांहीं मतें प्रकट झालीं होतीं. परंतु त्यांतील क्रियापदविचार तसाच कांहीं कारणावरून राहिला. त्याजकडे लक्ष देणें अवश्य; तथापि त्या दोन पुस्तकांकडेसच विशेष लक्ष न देतां साधारणपणें आजपर्यंत मराठी क्रियापदांची व्यवस्था कशी काय झाली आहे तिकडे लक्ष देऊं; कारण त्यांमध्यें कांहीं म्हणण्यासारखी सुधारणा झाली आहे असें दिसत नाहीं. मराठी क्रियापदांची व्यवस्था वास्तविक पाहतां फार घोटाळ्याची आहे असें नाहीं; तथापि ज्या पद्धतीनें ती व्यवस्था करण्याचा प्रयत्न हल्लीं प्रचारांत आहे, ती पद्धतीच अशुद्ध असल्यामुळें क्रियापदांमध्यें फार अव्यवस्था दिसते. याकरितां कोणत्या रीतीनें व्याकरणकारांनीं क्रियापदांची व्यवस्था चालविली असतां त्यांमध्यें घोटाळा न राहतां, शिकणारांस सोपें पडून आणखी शास्त्रीय रीतीला तितकें विशेष सान्निध्य ठेविल्यासारखें होईल, या गोष्टीचा सांप्रत विचार करूं.

प्रथमतः, मराठी क्रियापदांचे जे वर्ग केले आहेत ते पाहूं. सकर्मक, अकर्मक, उभयविध, सहाय, भावकर्तृक, शक्य, प्रयोज्य, गौण, हे जे आठ वर्ग केले आहेत, त्यांमध्यें अशा प्रकारच्या वर्गीकरणास मुख्य आधार कांहींच दिसत नाहीं; कारण सकर्मक आणि अकर्मक या दोहोंच्या पोटींच उभयविध, सहाय, भावकर्तृक, प्रयोज्य, आणि गौण यांचा समावेश होतो. उभयविध क्रियापदें सकर्मक किंवा अकर्मक असतात, परंतु तीं एकाच काळीं दोहीं प्रकारचीं होऊं शकत नाहींत. तशींच सहाय क्रियापदें कांहीं सकर्मक कांहीं अकर्मक. भावकर्तृक अकर्मक, गौण सकर्मक किंवा अकर्मक, आणि प्रयोज्य सर्वदा सकर्मकच असतात. सारांश, हे सर्व सकर्मक आणि अकर्मक यांचे फक्त पोटभेद असून निरनिराळ्या कार्यांकरितां केलेले असतात. म्हणून ते सकर्मक आणि अकर्मक यांच्या बरोबरीचे होऊन बसूं शकत नाहींत. तसेंच, कांहीं रूपें अर्थावरून व कांहीं रूपांवरून म्हटलीं आहेत; परंतु त्यांमध्येंही कांहीं आधार दिसत नाहीं. प्रयोज्य वर्ग मात्र रूपावरून म्हणण्यास अडचण नाहीं. परंतु, शक्य आणि गौण हे रूपावरून म्हटले आहेत यास आधार नाहीं; कारण प्रयोज्य वर्गामध्यें, मूळ धातूला **व** किंवा **विव** प्रत्यय लागून झालेल्या साधित धातूंवरून झालेलीं क्रियापदें येतात, यामुळें मूळच्या रूपामध्यें आणि यामध्यें भेद पडतो म्हणून त्यास रूपावरून म्हणतां येईल. परंतु शक्य क्रियापदें म्हणून वेगळा वर्ग मानतां येत नाहीं. कारण तीं केवळ कर्मणि आणि भावी क्रियापदें होत. आतां इतर कर्मणि आणि भावी रूपांमध्यें व यांमध्यें किंचित् अर्थाचा भेद आहे, तो हाच कीं, यांमध्यें शक्यर्थ किंचित् विशेष आहे. परंतु वास्तविक पाहतां इतर कर्मणि आणि भावी क्रियापदांपेक्षां, सांप्रत ज्यांस शक्य क्रियापदें म्हणतात, त्यांस कर्मणि आणि भावी क्रियापदें म्हणून घेण्याचा विशेष अधिकार आहे. पहा, केलें हें जरी कर्मणि क्रियापद आहे तथापि मुळीं तें संस्कृतामध्यें

कृतं या रूपानें विशेषण आहे. परंतु **करवतें** हें रूप क्रियते या रूपानें क्रियापदच आहे. यावरून पाहतां शक्य क्रियापदें कर्मणि आणि भावी रूपामध्येंच येतात हें सिद्ध आहे. शक्य क्रियापदांचा जर वेगळा वर्ग मानिला तर मग इतर कर्मणि आणि भावी रूपेंच कां वेगळीं टाकावीं ? गौण क्रियापदें रूपावरून कशीं हें समजत नाहीं. इतकेंच कीं त्या धातूंचीं सर्व रूपें सिद्ध होत नाहींत. म्हणून तशा प्रकारच्या क्रियापदांचा, सोईकरितां पाहिजे तर एक वर्ग करावा, परंतु तो मुख्य वर्गांत येऊं शकत नाहीं.

याप्रमाणेंच प्रयोगांचीही अवस्था आहे. वास्तविक पाहतां कर्तरि कर्मणि आणि भावी हेच तीन प्रयोग खरे. याशिवाय कर्मकर्तरि आणि भावकर्तरि अशा नांवाचे आणखी दोन प्रयोग मानतात, परंतु त्यांची कांहींच आवश्यकता दिसत नाहीं. त्यांपासून शिकणारांचा व्यर्थ घोटाळा मात्र होतो. 'त्याणें आज्ञा केली,' 'त्याकडून आज्ञा केली गेली,' आणि 'त्याच्यानें आज्ञा करवली' यांचें मूळ पाहिलें असतां 'तेन आज्ञा कृता,' किंवा 'तेन आज्ञा अकारि' असें आहे. यांत **कृता** हें विशेषण आणि **अकारि** हें क्रियापद आहे; तथापि दोन्ही रूपें कर्मणि असून, त्यांपासून वाक्याच्या अर्थामध्यें कांहीं भेद पडत नाहीं. आणि साधारण ग्रंथामध्यें तर क्रियापदांच्या स्थळीं अशा विशेषणांचाच प्रयोग बहुशः आढळतो. आणि याच आधारावरून मराठींतील भूतकाळी कर्मणि क्रियापदें, भूतार्थी धातुसाधित विशेषणांवरून झालीं आहेत. आतां रूढीमुळें 'त्याच्यानें आज्ञा करवली' यांत सामर्थ्याचा बोध विशेष झाला म्हणून तें कर्मणि रूप होत नाहीं असें नाहीं. **त्यानें, त्याकडून आणि त्याच्यानें**, अशीं निरनिराळीं जरी रूपें आहेत, तथापि तीं सर्व **तेन** या संस्कृत रूपावरून झालेलीं असून, **तेन** यामध्यें जो अर्थ आहे तोच या तीन्ही रूपांमध्यें आहे. आतां कर्मकर्तरि म्हणून पाहिजे तर वेगळा प्रयोग मानावा; परंतु त्यामध्यें आणि कर्मणि प्रयोगामध्यें शब्दांचीं रूपें वेगळींच असलीं पाहिजेत असें नाहीं. 'श्रम

केला तर विद्या साध्य होईल,' या वाक्यामध्यें ' श्रम केला ' हा कर्मकर्तरी प्रयोग होईल; आणि ' आपण श्रम केला ' असें वाक्य घेतलें असतां कर्मणि प्रयोग होईल. परंतु ' त्यानें काम केलें,' हा कर्मणि, आणि ' त्याकडून काम केलें गेलें,' हा कर्मकर्तरि, असा भेद शास्त्रीय दृष्टीनें प्रशस्त दिसत नाहीं. वाक्यामध्यें कर्त्याची अपेक्षा ठेविली असतां दोन्ही वाक्यें कर्मणि आणि कर्त्याची अपेक्षा न ठेविली तर दोन्ही कर्मकर्तरि होतील. 'काम केलें', आणि 'काम केलें गेलें,' यामध्यें शास्त्रदृष्ट्या कांहीं भेद नाहीं. आतां 'काम करवलें' यामध्यें शक्तीचा अर्थ रूढीवरून विशेष आलेला आहे; तथापि त्याच्या उत्पत्तीकडून आणि स्वरूपावरून पाहिलें असतां, वरील रूपांमध्यें आणि यामध्यें कांहीं भेद नाहीं. हेच विचार भावी आणि भावकर्तरि यांस लागू आहेत. या सर्व लेखावरून असें दिसेल कीं कर्मणि आणि कर्मकर्तरि यांमध्यें, व भावी आणि भावकर्तरि यांमध्यें, जरी सूक्ष्मदृष्टीनें कांहीं भेद असला, तरी त्याचें फारसें महत्व आहे, किंवा त्यापासून व्याकरणाच्या समजुतीस कांहीं साहाय्य होईल, असें दिसत नाहीं. याकरितां ज्या गोष्टीपासून फारसा उपयोग नाहीं, पण समजुतीस मात्र अडचण पडते, ती गोष्ट मुळींच काढून टाकली असतां, कांहीं अडचण पडणार नाहीं. प्रयोगविचाराचें वास्तविक स्वरूप न समजल्यामुळें पूर्वोक्त व्याकरणकारांपैकीं एकानें, **प्रयोगविचार** आणि **वाक्यविचार** असे त्याचे दोन भेद केले आहेत.

क्रियापदाच्या काळांविषयीं कांहीं सूचना करणें योग्य आहे. तीन्ही काळांचीं मूळचीं मुख्य रूपें व संयुक्त रूपें एकत्र मिसळल्यामुळें शिकणारांचा गोंधळ होतो. आणि तशांत मूळचीं मुख्य रूपें समजलीं असतां **अस** धातूच्या योगानें संयुक्त रूपें समजण्यास कांहींच अडचण नाहीं. याकरितां प्रथमतः फक्त मूळ रूपें मात्र देऊन इतर रूपें साधण्याच्या रीतीचें दिक्प्रदर्शन केलें असतां तितकें पुष्कळ होईल. काळांचीं रूपें देतांना कर्तरि

रूपांमध्यें कर्मणि व भावी न मिसळण्याकडेही लक्ष ठेविलें पाहिजे. उदाहरणार्थ पहा, 'मी करितों,' हा वर्तमानकाळ, आणि 'मी केलें' हा भूतकाळ हें खरें: परंतु एक रूप कर्तरि आणि दुसरें कर्मणि आहे, म्हणून दोन्ही एकत्र मिसळून अव्यवस्था करणें प्रशस्त नाहीं. कर्तरि रूपें वेगळीं देऊन त्यांचीं त्यांचीं कर्मणि रूपें वेगळीं द्यावीं.

निरनिराळ्या पुरुषीं क्रियापदांचीं रूपें लिहितांना कित्येकांचें दुर्लक्ष दृष्टीस पडतें. तें असें—भूतकाळचीं रूपें चालवीत असतां 'मी केला' हा प्रथम पुरुष, 'तूं केला' हा द्वितीय पुरुष, आणि 'त्याणें केला' हा तृतीय पुरुष, तसेंच 'मी करावें' हा प्रथम पुरुष, 'तूं करावें' हा द्वितीय पुरुष, आणि 'त्याणें करावें' हा तृतीय पुरुष, असें म्हणण्याचा अशुद्ध प्रकार पुष्कळ आढळतो. वस्तुतः हीं सर्व रूपें तृतीय पुरुषींच आहेत. ही गोष्ट त्या रूपांचा पदच्छेद करून व्याकरण केलें असतां स्पष्ट दृष्टीस पडते. कर्ता जरी प्रथम किंवा द्वितीय पुरुषीं असला, तथापि हीं वाक्यें कर्मणि असल्यामुळें क्रियापद कर्मानुसारी असतें म्हणून जवपर्यंत कर्म तृतीय पुरुषीं आहे, तवपर्यंत क्रियापदही तदनुसार तृतीय पुरुषींच असलें पाहिजे.

याशिवाय कृदंतादि जीं धातुसाधितें त्यांमध्यें कर्तरि कोणतीं व कर्मणि कोणतीं याचाही निर्णय केला पाहिजे. उदाहरणार्थ, कर्ता, करणारा, करणार, इत्यादि कर्तरि; केला, केलेला, करणें किंवा केले जाणें इ० कर्मणि; आणि करीन, करून, करतांनां इ० अर्थाप्रमाणें कर्तरि किंवा कर्मणि होतात.

यांतील बहुतेक गोष्टी जरी कदाचित् क्षुल्लक दिसतील, व कित्येकांविषयीं यापूर्वी कदाचित् ऊह निघाला असेल, तथापि यांकडे व्याकरणकारांनीं लक्ष दिलें असतां मराठी क्रियापदांतील घोटाळा समूळ नाहींसा होईल.

या वरील गोष्टींस अनुसरून क्रियापदांची रूपावळी कोणत्या प्रकारें द्यावी लागेल हें तूर्त स्थलसंकोच असल्यामुळें पुढील खेपेपर्यंत ठेवणें प्राप्त आहे.

(पु. २, अं. ९, आगस्ट १८६९)

४ : : व्याकरणविचार

मराठी क्रियापदाची रूपावलि.

मागें क्रियापदांच्या विभागीकरणाविषयीं निबंध लिहिला आहे. त्यामध्यें क्रियापदाचीं रूपें नव्या तऱ्हेवरून कसकशीं दिलीं पाहिजेत, याविषयीं स्थलसंकोचामुळें विस्तार केला नाहीं. तो एथें करूं.

अस धातु

या क्रियापदास एक मूलरूप भेदच आहे, प्रयोज्य भेद नाहीं.

कर्तरि रूपें

स्वार्थ

वर्तमानकाळ

अस धातूस वर्तमानीं तीन प्रकारचीं रूपें होतात.

	प्रकार १.			प्रकार २.	
	एक व०	बहु व०		एक व०	बहु व०
१	आहें	आहों	१	होय	होय
२	आहेस	आहां	२	होस	व्हां
३	आहे	आहेत	३	होय	होत

होय हें अव्ययही आहे.

वरील दोन्ही प्रकारांमध्यें लिंगभेदावरून कांहीं विशेष होत नाहीं. यांतील १ ल्या प्रकारचीं रूपें अस्तित्व दाखवितात, व कोणत्याही गोष्टीचें सत्यत्व दाखविण्याकरितां दोन्हीं प्रकारच्या रूपांचा प्रयोग होतो.

प्रकार ३

	एक व०	बहु व०
१	असतों–तें–तें	असतों.

२ असतोस–तेस–तेंस	असतां
३ असतो–ते–तें	असतात.

या प्रकारचीं रूपें सर्व क्रियापदांवरून होतात. यांमध्यें कृतीचा बोध होतो. या रूपांमध्यें नित्यपरिचय किंवा रीति गम्यमान असते. म्हणून या प्रकारास रीतिवर्तमानही म्हणतात. इतर क्रियापदांपुढेंही हे प्रत्यय लागले असतां त्यांपासून नुसता कृतिवाचक किंवा रीतिवाचक या दोहों अर्थांचाही संदर्भाप्रमाणें बोध होतो. रीतिवाचकता स्पष्ट दाखविण्याकरितां इतर क्रियापदांपुढें हीं असधातूचीं रूपेंही लावण्याचा प्रचार आहे. जसें मी करितों, किंवा करीत असतों इ०. लिंगविशेषावरून या प्रकारामध्यें क्रियापदांचें रूपांतर होतें.

भूतकाळ

एक व०	बहु व०
१ होतों–तें–तें	होतों
२ होतास–तीस–तेंस	होतां
३ होता–ती–तें	होते–त्या–तीं

यामध्यें लिंगभेदावरून रूपविशेष होतो.

रीतिभूत.

१ असें	असूं
२ असेस–असस	असां
३ असे	असत

भविष्य

प्रकार १ एक व०	प्रकार १ बहु व०	प्रकार २ एक व०	प्रकार २ बहु व०
१ असेन	असूं	असणार	असणार
२ असशील	असाल		
३ असेल	असतील		

विध्यर्थ

एक व.	बहु व.
१ असावा–वी–वें	असाव–व्या–वीं.
२ असावास–वीस–वेंस	असावेत–व्यात–वींत
३ असावा–वी–वें	असावे–व्या–वीं. } असावेत–व्यात–वींत }

आज्ञार्थ

१ असो, असूं	असूं
२ अस, ऐस	असा
३ असो	असोत

संशयार्थ

१ असेन	असूं	}
२ असशील	असाल	} भ. प्रकार १ यामध्येंही हींच रूपें.
३ असेल	असतील	}

संकेतार्थ

सामान्यकाळ (वर्तमान, भूत, भविष्य.)

१ असलों–लें–लें	असलों
२ असलास–लीस–लेंस	असलां
३ असला–ली–लें	असले–ल्या–लीं

हेच प्रत्यय इतर क्रियापदांस लागले असतां, त्यांपासून मुख्यत्वें स्वार्थी भूतकाळाचा अर्थ उत्पन्न होतो. आणि जर हें अव्यय जोडलें असतां क्रियापदाचें कोणतेंही रूप संकेतार्थी योजतां येतें, तसें हेंही योजतां येतें.

संकेतार्थ भूतकाळ

पुढील रूपांवरून, ती ती क्रिया घडली नाहीं, असा गर्भितार्थ उत्पन्न होतो.

१ असतों–तें–तें	असतों
२ असतास–तीस–तेंस	असतां
३ असता–ती–तें	असते–त्या–तीं

भावी रूपें

पुरुष स्वार्थ.

वर्तमान. ३. { माझ्यानें, तुझ्यानें, त्याच्यानें, आमच्यानें इ० } असवतें.

भूत ३ असवलें. रीतिभूत–३ असवे

भविष्य { ३. असवेल. / ३. असवणार.

विध्यर्थ. ३. मी, तूं, त्याणें असावें.

आज्ञार्थ. ३. असवो.

संशयार्थ. ३. असवेल.

संकेतार्थ. { सामान्यकाळ ३. असवलें / भूत ३. असवतें

यांतील विध्यर्थाचीं रूपें मात्र साधीं आहेत; इतर शक्यर्थसूचक आहेत.

इतर धातुसाधितें.

दोन्ही प्रयोगीं सारखीं.

नाम— } असणारा

विशेषण–– } असलेला.

अव्ययें—असून, असत, असतां, असताना, असूं.

आतां कर हा सकर्मक धातु चालवूं.

मूलरूप भेद.

कर्तरि रूपें

स्वार्थ.

वर्तमान.	मी करितों इ०	
रीतिवर्तमान.	मी करितों,	करीत असतों इ०
भूत.	मी कर्ता झालों इ०	

व्यवहारामध्यें सकर्मक धातूच्या भूतकाळीं, कर्मणि रूपें योजण्याचाच प्रचार फार आहे; कर्तरि रूपें क्वचित् येतात.

रीतिभूत.	मी करीं,	करीत असें इ०
भविष्य.	मी करीन,	करणार इ०

विध्यर्थ

सकर्मक क्रियापदाला विध्यर्थी कर्तरि रूपें नाहींत.

आज्ञार्थ

मी करूं इ०

संशयार्थ

मी करीन इ०

या रूपांपेक्षां साधित रूपांचा प्रचार विशेष आहे, तीं साधण्याची रीति पुढें येईल.

संकेतार्थ

सामान्यकाळ.	जर मी कर्ता झालों इ०
भूत.	जर मी करतों इ०

धातुसाधितें.

नामें.	कर्ता, करणारा, करणार इ०
विशेषणें.	केलेला, इ०

यांतील **केलेला** हें रूप कर्मणि असून कर्तरिही आहे. उ०, काम **केलेला** मनुष्य. इ०.

अव्ययें.—करीत, करून, कर्ताना, करितां, करूं.

साधित रूपें सर्व **अस** धातूंचीं रूपें लागून होतात. व त्याप्रमाणें त्यांच्या अर्थामध्यें भेद पडतो. हें समजणें सोपें असल्यामुळें तीं रूपें एथें देणें अवश्य दिसत नाहीं. वर्तमान काळच्या रूपापुढें अस धातु असतां मुख्य धातूचें अर्धें रूप, किंवा अव्यय रूप राहतें. जसें, मी **करीत** असतों, **करीत** होतों, इ०

(पु. ३, अंक १, जून १८७०)

---

५ : व्याकरणविचार

वाक्यरचना

मराठी भाषेच्या वाक्यरचनेसंबंधीं अद्यापि चांगला ग्रंथ झाला नाहीं. याकरितां हा विषय होईल तितका स्पष्ट करण्याचा आपण प्रयत्न करूं.

मनुष्याच्या मनामध्यें जे अनेक ग्रह अथवा अनेक कल्पना उत्पन्न होतात, त्या पूर्णपणें आपल्या लक्षांत आणण्याला किंवा दुसऱ्याच्या मनामध्यें भरवून देण्याला, त्या उत्पन्न झालेल्या ग्रहांना किंवा कल्पनांना कांहीं तरी स्पष्ट आकार म्हणजे स्वरूप द्यावें लागतें.

अगदीं साध्या प्रकारचा ग्रह म्हटला म्हणजे एकाद्या पदार्थापासून किंवा पदार्थाच्या नांवापासून हा अमुक पदार्थ असा जो कांहीं आपल्या मनाला बोध होतो तो होय. जसें 'मनुष्य', 'चोर', 'पर्वत', इ.

परंतु कल्पना म्हटली म्हणजे तेथें नुसत्या एका ग्रहानें काम होत नाहीं. तेथें कांहीं पदार्थांचा बोध होऊन त्याच्यासंबंधानें कांहीं स्थिति किंवा व्यापार यांचाही स्पष्ट बोध झाला पाहिजे. उदाहरण–'हरि उठतो.' ही कल्पना आहे. परंतु जवपर्यंत ही मनांमध्येंही असते तंवपर्यंत हिला कल्पना हें नाव योग्य आहे. तीच शब्दांनीं प्रकट केल्यानंतर व्याकरण-दृष्ट्या तिला **वाक्य** हें नांव प्राप्त होतें.

वाक्यामध्यें **वाच्य** आणि **वाचक** असे दोन भाग असतात.

ज्याला लक्षून कांहीं स्थिति किंवा व्यापार यांचें वर्णन केलें असतें, तद्बोधक शब्दास **वाच्य** म्हणतात; आणि तसेंच जें कांहीं त्या वाच्याला लक्षून केलेलें वर्णन त्यास **वाचक** म्हणतात. उ० 'गोविंदा बोलतो,' या वाक्यांत गोविंदा हें वाच्य आणि बोलतो हा वाचक होय. यावरून वाच्य आणि वाचक यांचा जो योग त्यास **वाक्य** म्हणावें.

केव्हां केव्हां वाच्य आणि वाचक हे वाक्याचे दोन्ही भाग एकाच शब्दाच्या पोटीं असतात; ते पृथक् पृथक् दाखवितां येत नाहींत. उ० "वाः, अरेरे," इ० वाः म्हणजे चांगलें झालें; आणि अरेरे म्हणजे वाईट झालें. अशा प्रकारचा जरी अर्थ आहे, तरी त्या शद्बांतून वाच्य आणि वाचक असे दोन दोन अवयव वेगळे वेगळे करून दाखवितां येत नाहींत. हे उद्गारवाचक शद्ब संक्षिप्त वाक्यांप्रमाणें आहेत. हे व संबोधनवाचक शद्ब यांचा इतर भाषणाशीं साक्षात् कांहीं संबंध नसल्यामुळें वाक्यरचनेच्या नियमांमध्यें त्यांकडे लक्ष देण्याची अवश्यकता नाहीं.

वाच्यस्थानीं जो शब्द असतो तो, नाम, सर्वनाम किंवा दुसरा कोणताही नामाप्रमाणें योजलेला शब्द असतो. उ० 'कृष्ण बोलतो,' 'तो बसला,' 'विद्वान् शोभतो,' इ०

नियम १. वाच्यशब्द निरंतर प्रथमा विभक्त्यंत असला पाहिजे. वाचकस्थानीं क्रियापद असतें.

वाच्य तीन प्रकारचें असतें—कर्तृवाच्य, कर्मवाच्य, आणि भाववाच्य.

वाक्यांतील क्रियापदाची क्रिया साक्षात् घडवून आणणारा जो असेल तद्वाचक शब्दाला त्या क्रियेचा **कर्ता** म्हणतात. आणि वाच्य आणि कर्ता हे दोन्ही जेव्हां एकच असतात, म्हणजे वाच्य हाच जेव्हां क्रियेचा कर्ता असतो, तेव्हां त्यास **कर्तृवाच्य** म्हणावें. उ० ' घोडा धांवतो ' यामध्यें घोडा हें वाच्य आहे, आणि धांवतो या क्रियेचा कर्ताही तोच; म्हणून घोडा हें कर्तृवाच्य होय. याप्रमाणेंच 'वेणू गाते,' 'मूल खेळतें,' इ०

वाक्यांतील क्रियापदाची क्रिया साक्षात् ज्यावर घडते, तद्वाचक शब्दाला त्या क्रियेचें **कर्म** म्हणतात. आणि वाच्य हेंच जेव्हां क्रियेचें कर्म असतें, तेव्हां त्याला **कर्मवाच्य** म्हणावें. उ० 'पुस्तक वाचिलें.' यांत पुस्तक हें वाच्य आहे, आणि वाचिलें या क्रियेचें कर्महीं तेंच, म्हणून पुस्तक हें कर्मवाच्य. याप्रमाणेंच–'ईश्वरसेवा करावी,' 'दुर्व्यसन त्यागावें,' इ०

जेव्हां वाच्य हें शब्दांनीं दाखवितां येत नाहीं, फक्त क्रियापदाचा जो भाव तेंच वाच्य समजायाचें, तेव्हां तेथें **भाववाच्य** आहे असें म्हणतात, उ० 'यावें,' 'जावें,' 'उजेडलें,' 'मळमळतें,' इ०

वाच्य जसें कर्तृरूप, कर्मरूप किंवा भावरूप असेल, त्याप्रमाणें क्रियापद कर्तरि, कर्मणि किंवा भावि असलें पाहिजे. उ० 'फळ पिकलें,' 'चंद्र पाहिला,' 'यावें,' 'उजेडलें,' इ०

टीप—भावी क्रियापदामध्यें उजेडणें, सांजावणें, मळमळणें, अशीं दोन चार क्रियापदें भावकर्तरि आहेत; परंतु लाघवाकरितां तीं येथें भावीच धरिलीं आहेत.

नियम २ रा—वाच्य शब्दाचें लिंगवचनपुरुष वाचकस्थानच्या क्रियापदांस लागतें. म्हणजे वाच्याचें जें लिंग तेंच त्या क्रियापदाचें लिंग; वाच्याचें जें वचन, तेंच क्रियापदाचें वचन; आणि वाच्याचा जो पुरुष तोच क्रियापदाचा पुरुष, अशी रचना असते.

नियम ३ रा—भावी (आणि भावकर्तरि) क्रियापदें निरंतर नपुंसकलिंगीं एकवचनीं तृतीय पुरुषींच असतात.

वाक्यांतील क्रियापद जसें कर्तरि, कर्मणि, किंवा भावी असेल, त्याप्रमाणें त्या वाक्यरचनेला अनुक्रमें कर्तरि, कर्मणि, किंवा भावी प्रयोग म्हणतात.

विस्तृत वाक्यें

वाक्यांतील अर्थ अधिक स्पष्ट करण्याकरितां वाच्य आणि वाचक या दोहोंचा ही विस्तार करितां येतो.

प्रथमतः वाचकाचा अर्थविस्तार करण्याकडे लक्ष देऊं.

वाचक हें क्रियापद असतें हें वर सांगितलेंच आहे.

क्रियेचा अर्थविस्तार करण्याकरितां जे शब्द योजतात, त्यांच्या त्यांच्या संबंधाप्रमाणें त्यांस कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान आणि अधिकरण अशीं नांवें आहेत.

यांतील कर्ता आणि कर्म म्हणजे काय हें पूर्वी सांगितलेंच आहे.

कर्तरि प्रयोगामध्यें जो कर्ता तेंच जरी वाच्य असतें, तरी कर्मणि आणि भावी प्रयोगांमध्यें कर्ता वेगळा असतो. ‘ तो चालतो,’ यामध्यें **तो** हा शब्द **चालतो** या क्रियापदाचा कर्ता असून जरी वाक्यांतील वाच्यही आहे तरी ‘ रामानें रावण मारिला, ’ ‘ कृष्णानें नाचावें, ’ या कर्मणि आणि भावी प्रयोगांमध्यें **रामानें** आणि **कृष्णानें** असे वेगळे कर्ते आहेत, यामुळें ते क्रियेचा कर्तृसंबंध दाखवून वाक्याच्या अर्थाचा तितका विस्तार करितात.

नियम ४—कर्मणि आणि भावी प्रयोगांमध्यें कर्ता तृतीयांत असतो. परंतु शक्यता दाखवायाची असतां, कर्ता चतुर्थ्यंतही करतां येतो. उ० ‘ त्याच्यानें किंवा त्याला काम करवतें, ’ ‘ मला चालवलें, ’ इ०

तसेंच कर्मणि प्रयोगामध्यें जरी कर्म हेंच वाच्य असतें, तरी क्रियापद सकर्मक असतां, कर्तरि आणि भावी प्रयोगामध्यें कर्म वेगळें असतें. उ०

'रामानें रावण मारिला,' यामध्यें जरी **रावण** हा शब्द कर्म असून वाच्यही आहे, तरी, 'राम रावणास मारितो,' 'पारधी कुत्रा सोडतो,' 'रामानें रावणास मारिलें,' इत्यादि कर्तरि आणि भावी प्रयोगांमध्यें कर्में वेगळीं आहेत, आणि त्यांपासून सकर्मक क्रियेचा अपूर्ण अर्थ पूर्ण होऊन वाक्याचा तितका विस्तार झाला.

नियम ५—क्रियापद सकर्मक असल्यास कर्तरि प्रयोगामध्यें कर्म प्रथमांत किंवा द्वितीयांत आणि भावी प्रयोगामध्यें द्वितीयांतच असतें.

टीप—निर्जीव पदार्थवाचक शब्द कर्म असल्यास बहुधा तो प्रथमांतच असतो; आणि मी, तूं हीं सर्वनामें कर्मस्थळीं आल्यास गद्य भाषणामध्यें द्वितीयांतच असतात. उ० ' गोविंदानें घर बांधिलें,' 'त्यानें मला पाहिलें,' 'विठूनें तुला पहावें,' इ०

अस, हो, ठर, नीघ, निपज, दिस इत्यादि कित्येक अकर्मक क्रियापदें द्विकर्तृक असतात, म्हणजे प्रसंगीं त्यांस दोन कर्ते असूं शकतात. उ० 'गोविंदा विद्यार्थी आहे,' 'गोपाळराव कारकून होणार,' 'तो चोर ठरला,' 'कोल्हा ठक निघाला,' 'तो पंडित निपजला,' 'सदू शिपाई दिसतो,' इ० यांमध्यें पहिल्या कर्त्याला वाच्य आणि दुसऱ्याला **विधान** किंवा **विधानार्थी** प्रथमा म्हणतात.

या द्विकर्तृक व दुसऱ्या कांहीं क्रियापदांचा प्रयोग केला असतां त्यांच्या दुसऱ्या कर्त्याच्या जागीं केव्हां केव्हां नुसतें विशेषणही येऊं शकतें. उ० 'तो शहाणा आहे,' 'हरी हुशार झाला,' 'कैदी लबाड ठरला,' 'रुपया खोटा निघाला,' 'गोदी गुणी निपजली,' 'तो मतलबी दिसतो,' 'आंबा गोड लागतो,' 'मसलत योग्य वाटते,' इ० अशा विशेषणाला **विधिविशेषण** म्हणतात.

कर, नेम, म्हण, मान, समज इत्यादि कित्येक क्रियापदें द्विकर्मक असतात. उ० 'रामानें भरत (किंवा भरतास) राजा केला,' 'रामाजी-

पंतास कारभारी नेमला,' 'हरी कुत्र्याला मांजर म्हणतो,' 'तो द्रव्य सर्वसाधन मानील,' इ०

द्विकर्मक क्रियापदाचें पहिलें कर्म प्रथमांत किंवा द्वितीयांत असूं शकतें; परंतु दुसरें कर्म प्रथमांतच असलें पाहिजे.

द्विकर्मक क्रियापदापाशीं ही दुसऱ्या कर्माच्या स्थानीं विधिविशेषण योजतां येतें. उ० 'शिक्षकानें शिष्य शाहणे केले'. 'त्याणें मुलास बोलका केला,' इ० परंतु अशा स्थळीं, हीं विशेषणें नामाप्रमाणें योजलीं आहेत म्हणण्यास बाध दिसत नाहीं.

द्विकर्तृक क्रियापदाच्या प्रयोगामध्यें मराठी भाषेची अशी एक विलक्षण शैली आहे कीं, तेथें मी आणि तूं हीं सर्वनामें नेहमीं वाच्यरूपच असतात, आणि जरी तीं विधानार्थी योजिलीं तरी, व्याकरणदृष्ट्या तीं वाच्यरूप सोडीत नाहींत. आणि जें खरें वाच्य असेल, तें विधानवत् होतें. 'नारद नारदी झाला,' 'नदी समुद्र झाली,' 'मूल राजा झालें,' हीं वाक्यें फिरविलीं असतां 'नारदी नारद झाली,' 'समुद्र नदी झाला,' 'राजा मूल झाला,' अशीं वाच्य आणि विधान यांची अदलाबदल होईल; परंतु 'मी सरदार झालों,' तूं पंडित आहेस,' 'ती तूं होतीस,' इत्यादि वाक्यें जर फिरविलीं, तर वरील वाक्यांप्रमाणें 'सरदार मी झाला, 'पंडित तूं आहे,' ती तूं होती,' अशीं वाक्यें न होतां 'सरदार मी झालों,' 'पंडित तूं आहेस,' 'ती तूं होतीस,' अशींच होतील; मी आणि तूं हे शब्द विधानार्थी असले, तरी व्याकरणदृष्ट्या तसे होणार नाहींत; वाच्यरूपच सर्वदा राहतील.

तसेंच द्विकर्मक क्रियापदाच्या प्रयोगांतील दोन कर्मांपैकीं कोणतेंही कर्म व्याकरणदृष्ट्या मुख्य कर्म मानतां येतें, आणि रूढीवरून पाहतां तर दुसरेंच कर्म मुख्य मानणें हें चांगलें दिसतें. उ० 'रामानें बिभीषणास राजा केलें,' आणि 'रामानें बिभीषणास राजा केला,' हे दोन्ही प्रयोग

शुद्ध आहेत, तरी पहिल्यापेक्षां दुसरा प्रयोग रूढीच्या दृष्टीनें सुशोभित दिसतो. आणि कर्मणि प्रयोगामध्यें तर कित्येक स्थळीं दुसरें कर्म मुख्य मानणें आवश्यकच्च होतें. उ० 'त्याणें आपल्या मुलींना राजस्त्रिया केल्या,' हें वाक्य जर कोणी 'त्याणें आपल्या मुलींना राजस्त्रिया केलें' असें लिहिलें, तर तें महाराष्ट्र लोकांना विचित्र व अगदीं बेढब वाटल्यावांचून राहत नाहीं. 'त्याणें आपल्या मुली राजस्त्रिया केल्या,' यामध्यें दोन्ही कर्में प्रथमांत असल्यामुळें कोणतेंही मुख्य मानण्यास अडचण पडत नाहीं.

अशा प्रयोगामध्यें मुख्य कर्म तें वाच्य मानावें, आणि इतरांस द्वितीय-कर्म म्हणावें. यावरून पाहतां, नुसत्या सकर्मक क्रियापदाच्या कर्मणि आणि भावी प्रयोगांमध्यें जो कित्येकांचा वाद आहे, तो सहज दूर होण्या-जोगा आहे. 'कृष्णानें कंसास मारिलें,' हा तर भावी प्रयोग आहेच; परंतु 'कृष्णानें कंसास मारिला,' यामध्यें 'केला' हें द्विकर्मक क्रियापद अध्याहृत धरून 'कृष्णानें कंसास मारिला केला,' असा जर अर्थ घेतला तर वादास मुळींच जागा राहणार नाहीं.

(पु. ४, अं. ४, सप्टेंबर १८७१.)

---

१ : : 'व्याकरणविषय'

मराठी भाषेची परीक्षा घेण्याचा जेथें जेथें प्रसंग येतो, तेथें तेथें बहुधा, 'तूं काम केलेंस,' 'तूं उद्योग केलास,' 'तूं पोथी लिहिलीस' इत्यादि प्रयोग शुद्ध किंवा अशुद्ध, व अशुद्ध असल्यास, कां अशुद्ध तें कळवावें.– अशा प्रकारचे प्रश्न वारंवार येत असतात. परीक्षा देणारानें हे प्रयोग शुद्ध आहेत असें जर म्हटलें, तर त्याला मराठी भाषा येत नाहीं, व व्याकरण समजत नाहीं, असें म्हणून परीक्षक त्याला कांहींच, 'गुण' देत नाहींत, व त्यामुळें त्याचा फार तोटा होतो. परंतु असें करणें परीक्षकांला

योग्य आहे कीं काय याचा विचार करणें अवश्य आहे. परीक्षकांना ' हे प्रयोग अशुद्ध ' असें उत्तर मिळालें पाहिजे. कारण त्यांचें म्हणणें असें असतें कीं, वरील वाक्यांमध्यें केलें, केला, व लिहिली, हीं क्रियापदें लिंग, वचन, पुरुष या तीन्ही गोष्टींनीं कर्माशीं अनुसरून आहेत, यामुळें हा कर्मणि प्रयोग होय. कर्मे तृतीय पुरुषीं आहेत, व क्रियापदेंही तृतीय पुरुषीं आहेत. असें असतां, त्यांच्यापुढें द्वितीयपुरुषवाचक ' स ' हा प्रत्यय लावणें ही चूक आहे. याकरितां हा प्रयोग रूढींत जरी असला, तरी व्याकरणदृष्ट्या अशुद्ध आहे. व प्रख्यात मोरोपंत व वामन इत्यादि मराठी कवींनीं ही चूक जाणूनच, बहुधा अशा प्रयोगांमध्यें ' स ' जोडलेला नाहीं.

आतां याविषयीं विचार करूं. अमुक एक प्रयोग " रूढींत आहे, परंतु तो व्याकरणदृष्ट्या अशुद्ध " हें म्हणणें अगदीं अप्रशस्त आहे, याविषयीं पुष्कळ लेख आलेले आहेत. व्याकरण म्हणजे काय ? रूढीमध्यें जे प्रयोग असतील ते सिद्ध धरून त्यांमध्यें जे अंतर्गत नियम दिसतील, ते उघड करणें याचें नांव व्याकरण. असें असतां रूढींत असलेला प्रयोग व्याकरणदृष्ट्या अशुद्ध, याचा अर्थ काय ? कांहीं नाहीं. सारांश रूढी अशुद्ध म्हणण्यापेक्षां आपल्या भाषेच्या व्याकरणाची स्थिति अद्यापि अशुद्ध किंवा अपक्व आहे, असें म्हणणें हें विशेष रास्त आहे. प्रथमतः व्याकरण सिद्ध करून नंतर भाषा उत्पन्न केली असें नाहीं. तर, आधीं भाषा,आणि मग व्याकरण, असा क्रम आहे. कित्येक लोक असें म्हणतात कीं, ही गोष्ट इंग्रजी वगैरे भाषांशीं मात्र लागू आहे, आणि भाषानुसारी व्याकरण ही कल्पना इंग्लिश लोकांची असून आलीकडे आपले लोक ती घेऊं पाहताहेत. परंतु असें नाहीं. हें म्हणणें अगदीं पोकळ आहे. कारण मराठी व्याकरण तीस चाळीस वर्षांपूर्वीं नव्हतें, म्हणून मराठी भाषाही नव्हती हें म्हणणें किती असमंजस आहे हें सांगण्याची गरज नाहीं. आपल्या लोकांच्या समजुतीविषयीं जर म्हटले, तर वेदामध्यें असें म्हटलें आहे:

वाग्वै पराच्यव्याकृता अवदत् । ते देवा अब्रुवन्निमां नो वाचं व्याकुर्विति ॥

अर्थ. प्राचीन भाषेला व्याकरण नव्हतें, म्हणजे वाक्य कोणतें, पद कोणतें, प्रकृति कोणती, प्रत्यय कोणता याविषयीं फोड झालेली नव्हती. नंतर 'आमच्या या भाषेचें व्याकरण कर' असें ते देव (इंद्राप्रत) बोलते झाले. तसेंच आर्यविद्यासुधाकरकर्ता म्हणतो—

नहि मृत्पिंडेन घटा इव व्याकरणेनापूर्वाः शब्दा उत्पाद्यन्ते किन्तु सिद्धानामेव शब्दानां साधुत्वमन्वाख्यायते इति स्पष्टं पतंजलिकृते व्याकरणमहाभाष्ये पस्पशान्हिके इति ॥

अर्थ—मृत्तिकेचा गोळा असून त्यापासून नंतर घट उत्पन्न केले जातात, तसें व्याकरण आधीं असून, पूर्वी नसलेले शब्द त्यापासून नंतर उत्पन्न केले जातात असें नाहीं. तर, भाषेमध्यें जे सिद्ध असलेले शब्द, तेच शुद्ध धरून तदनुसार व्याकरणामध्यें व्याख्यान केलें असतें, असें पतंजलिकृत व्याकरणमहाभाष्याच्या पस्पशान्हिकामध्यें स्पष्ट सांगितलें आहे.

यावरून पाहतां, रूढीपेक्षां व्याकरणाचें वजन विशेष, ही कल्पना आपल्या लोकांमध्यें मुळींच नाहीं हें उघड दिसेल.

परीक्षकांची जी शंका असते, कीं तृतीय पुरुषीं प्रयोग असतां त्याजवर पुनः आणखी 'स' कां लावावा? तिला उत्तर हेंच कीं "रूढी आहे म्हणून." पण हें व्याकरणाच्या नियमांत नाहीं, त्यास कसें करावें? तर अमुक एक रूढींतला नियम तुमच्या व्याकरणामध्यें लिहिलेला नाहीं, म्हणून त्याप्रमाणें तुम्ही बोलूं नका व लिहूं नका, असें ज्यांची ती भाषा असेल त्यांना सांगणें हा मोठा जुलूम आहे; याकरितां व्याकरणामध्यें हा नियम नसला तर आतां घालावा, आणि व्याकरण शुद्ध करावें.

यावरून 'तूं केलें,' इ० सकार न लावलेलीं रूपें म्हणजे अशुद्ध आहेत असें आमचें म्हणणें नाहीं. इतकेंच कीं सकार लावलेलीं रूपेंहीं शुद्धच आहेत.

यावर शंका निघेल, कीं अशा रीतीनें व्याकरणामध्यें नवीन नियम घातल्यानें घोटाळा होईल. या शंकेला उत्तर हेंच कीं, ती ज्यांची भाषा, त्यांना जर ते मान्य आहेत तर ते घातले पाहिजेत. व्याकरणामध्यें घोटाळा होईल, ही शंका ती भाषा बोलणारे जे असतील त्यांच्यापुढें चालत नाहीं. असा प्रकार नसता तर आज संस्कृत व्याकरणामध्यें जे इतके अपवाद, प्रत्यपवाद, त्यांना आणखी अपवाद, आणखी प्रत्यपवाद, मतभेद, इत्यादि गोष्टी झालेल्या आहेत, त्या सर्व निघून गेल्या असत्या; व अनेक ठिकाणीं जे असेच दुहेरी प्रत्यय लागलेले आहेत ते सर्व रद्द पडले असते. असे प्रकार बहुधा सर्व भाषांमध्यें असतात.

ध्रुवासः पर्वता इमे ।

यामध्यें ध्रुव या शब्दाला दुहेरी प्रत्यय लागल्यासारखें होऊन **ध्रुवासः** असें रूप झालें आहे. नाहीं तर ध्रुवाः इतकेंच रूप झालें असतें

इंग्रजींत Children चिल्ड्रन् (मुलें) हेंही तसेंच दुहेरी प्रत्ययाचें उदाहरण आहे. हें Child चाइल्ड (मूल) या शब्दाला जुना व नवा असें एकावर एक प्रत्यय लागून बहुवचनीं रूप झालें आहे. आतां भाषा जितकी सुलभ असेल तितकी शिकणारास सोईवार पडते हें खरें; म्हणून व्याकरणकारानें ती सोपी करूं पाहणें फार वाईट आहे. भाषेचें स्वरूप दाखविण्याला व्याकरण हा एक आरसा आहे. आणि त्या आरशामध्यें जर त्या भाषेचें वास्तविक स्वरूप दिसत नाहीं तर तो आरसा निरुपयोगी होय.

आतां हीं रूपें खरीं ठरल्यावर केलेंन, केलेंनी, इत्यादि रूपें कां खरीं ठरूं नयेत, असा प्रश्न उभा राहतो. हीं रूपें वरील रूपांसारखीं जर सर्व देशभर प्रसिद्ध असतीं, तर तींही मान्य करण्यास कांहीं अडचण नव्हती; परंतु यांची गोष्ट तशी नाहीं; हीं रूपें एकदेशीय होत, म्हणून सर्वमान्य रूपांच्या जोडीस तीं येऊं शकत नाहींत.

केलेंस, लिहिलीस इत्यादि रूपांचें व्याकरण कोणत्या रीतीनें व्हावें? ही तर साधारण शंका आहे. तिचें निवारण झालें पाहिजे. केलेंस, लिहिलीस, इत्यादि रूपें मुळीं उत्पन्न होण्याचें कारण असें झालें कीं केलें, लिहिली, इत्यादि क्रियापदें जरी कर्मणि आहेत, तरी त्यांचा कर्ता 'तूं' हा शब्द तृतीयांत असतांही प्रथमांताशीं त्याचें रूप समान असल्यामुळें, व मराठीमध्यें सकर्मक क्रियापदांचीं भूतकाळीं व्यवहारोपयोगी कर्तरिरूपें बहुधा नसल्यामुळें हींच रूपें कर्तरि प्रयोगामध्येंही योजण्याचा आपल्या लोकांचा हळू हळू कल होत जाऊन, तृतीय पुरुषीं रूपें असतांही त्यांवर पुनः द्वितीयपुरुषवाचक एकवचनी 'स' व अनेकवचनीं 'त' हे प्रत्यय लागून कर्तरीसारखीं रूपें होऊं लागलीं. यामुळें 'तूं काम केलेंस' यामध्यें वस्तुतः दोन प्रयोग मिसळले आहेत, त्यांचें पृथक्करण असें करतां येईल.—

कर्मणि	कर्तरि
ज्याणें काम केलें,	तो तूं आहेस.
किंवा तूं काम केलें,	असा आहेस.

सारांश, 'केलेंस', हें रूप 'केलें असा आहेस', या बरोबर आहे. या गोष्टीकडे लक्ष दिलें असतां, हीं रूपें अशुद्ध म्हणण्याचें कारण न पडतां, त्यांची व्यवस्थाही नीट होईल.

(पु. ३, अंक २; जुलै, १८७०)

---

२ : व्याकरण विषय

(रा. भि. याणें केलेल्या पुस्तकाकरून)

विभक्ति

१. आजपर्यंत मराठी व्याकरणांमध्यें वचन आणि विभक्ति याविषयीं वेगवेगळीं प्रकरणें करून त्यांची व्यवस्था स्वतंत्रपणें करण्याचा प्रचार होता; परंतु वस्तुतः त्या दोहोंचा इतका निकट संबंध आहे कीं, त्यांची

व्यवस्था वेगवेगळी करूं लागल्यास व्यर्थ ग्रंथविस्तार होऊन शिकणारांस निरर्थक अडचण उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं. याकरितां त्या दोन्हीं विषयांचा एकत्र विचार करणें अवश्य आहे.

२. विभक्ति—एका नामाचे दुसऱ्या नामाशीं किंवा क्रियेशीं असलेले निरनिराळे संबंध दाखविण्याकरितां त्याच्या शेवटीं जीं अक्षरें लागतात, त्यांस विभक्ति किंवा विभक्तिप्रत्यय म्हणतात. हे प्रत्यय लागून जीं रूपें सिद्ध होतात, त्यांनाही कोणी विभक्ति म्हणतात. या विभक्ति आठ मानण्याचा संस्कृतावरून प्रचार पडला आहे. वास्तविक पाहतां मराठीमध्यें आठ विभक्ति मानण्यास योग्य आधार नाहीं; तथापि प्रचाराप्रमाणें तितक्या मानल्यास कांहीं मोठीशी नड दिसत नाहीं.

३. वचन—या विभक्तींचीं एकवचनी, आणि अनेकवचनी अशीं दोन दोन रूपें असतात. ज्यापासून एकाच वस्तूचा बोध होतो, तो शब्द एकवचनीं आणि ज्यापासून अनेक वस्तूंचा बोध होतो तो अनेकवचनीं आहे असें म्हणतात. उदाहरण एकवचन घोडा, अनेकवचन घोडे इ०

४ विभक्तींचे प्रत्यय—

	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	...	...
द्वितीया	ला, स	ला, ना, स
तृतीया	ने, शीं	नी, हीं, शीं
चतुर्थी	ला, स	ला, ना, स
पंचमी	हून, ँतून, [ऊन]	हून, ँतून, [ऊन]
षष्ठी	चा, ची, चें चे, च्या, चीं	चा, ची, चें चे, च्या, चीं
सप्तमी	ँत, [ईं]	ँत, [ईं]
संबोधन	...	नो

यांतील अनेकवचनी प्रत्यय लागते वेळीं नामाचा अंत्यस्वर सानुनासिक होतो. 'ऊन' आणि 'ई' हे प्रत्यय कांहीं नियमित शब्दांस मात्र लागतात.

५ उदाहरणार्थ घोडा (पुल्लिंग), आणि वाट (स्त्रीलिंग) या शब्दांस विभक्ति लावूं.

	एकवचन	अनेकवचन
प्र०	घोडा	घोडे
द्वि०	घोडयाला,--स	घोडयांना--स
तृ०	घोडयाने--शीं	घोडयांनी--हीं--शीं
च०	घोडयाला--स	घोडयांला--स
पं०	घोडय'हून--ँतून	घोडयांहून--तून
ष०	घोडयाचा--ची--चें घोडयाचे--च्या--चीं	घोडयांचा--ची--चें चे--च्या--चीं
स.	घोडयांत	घोडयांत
स.	घोडया	घोडयांनो

वाट.

	एकवचन	अनेकवचन
प्र.	वाट	वाटा
द्वि.	वाटेला--स	वाटांला--ना--स
तृ.	वाटेने--शीं	वाटांनी--हीं--शीं
च.	वाटेला--स	वाटांला--स
पं.	वाटेहून--ँतून	वाटांहून--तून
ष.	वाटेचा, ची, चें	वाटांचा इ०
स.	वाटेंत	वाटांत
स.	वाटे	वाटांनों

६ वरील उदाहरणें पाहतां स्पष्ट दिसेल कीं विभक्ति सिद्ध होते वेळीं फक्त प्रत्यय लागूनच काम होत नाहीं. तर त्यांशिवाय शब्दांच्या अंत्य

व्यवस्था वेगवेगळी करूं लागल्यास व्यर्थ ग्रंथविस्तार होऊन शिकणारांस निरर्थक अडचण उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं. याकरितां त्या दोन्हीं विषयांचा एकत्र विचार करणें अवश्य आहे.

२. विभक्ति–एका नामाचे दुसऱ्या नामाशीं किंवा क्रियेशीं असलेले निरनिराळे संबंध दाखविण्याकरितां त्याच्या शेवटीं जीं अक्षरें लागतात, त्यांस विभक्ति किंवा विभक्तिप्रत्यय म्हणतात. हे प्रत्यय लागून जीं रूपें सिद्ध होतात, त्यांनाही कोणी विभक्ति म्हणतात. या विभक्ति आठ मानण्याचा संस्कृतावरून प्रचार पडला आहे. वास्तविक पाहतां मराठीमध्यें आठ विभक्ति मानण्यास योग्य आधार नाहीं; तथापि प्रचाराप्रमाणें तितक्या मानल्यास कांहीं मोठीशी नड दिसत नाहीं.

३. वचन–या विभक्तींचीं एकवचनी, आणि अनेकवचनी अशीं दोन दोन रूपें असतात. ज्यापासून एकाच वस्तूचा बोध होतो, तो शब्द एकवचनीं आणि ज्यापासून अनेक वस्तूंचा बोध होतो तो अनेकवचनीं आहे असें म्हणतात. उदाहरण एकवचन घोडा, अनेकवचन घोडे इ०

४ विभक्तींचे प्रत्यय—

	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	...	...
द्वितीया	ला, स	ला, ना, स
तृतीया	ने, शीं	नी, हीं, शीं
चतुर्थी	ला, स	ला, ना, स
पंचमी	हून, ँतून, [ऊन]	हून, ँतून, [ऊन]
षष्ठी	चा, ची, चें चे, च्या, चीं	चा, ची, चें चे, च्या, चीं
सप्तमी	ँत, [ईं]	ँत, [ईं]
संबोधन	...	नो

यांतील अनेकवचनी प्रत्यय लागते वेळीं नामाचा अंत्यस्वर सानुनासिक होतो. 'ऊन' आणि 'ई' हे प्रत्यय कांहीं नियमित शब्दांस मात्र लागतात.

५ उदाहरणार्थ घोडा (पुल्लिंग), आणि वाट (स्त्रीलिंग) या शब्दांस विभक्ति लावूं.

	एकवचन	अनेकवचन
प्र०	घोडा	घोडे
द्वि०	घोडयाला,-स	घोडयांना-स
तृ०	घोडयाने-शीं	घोडयांनी-हीं-शीं
च०	घोडयाला-स	घोडयांला-स
पं०	घोडयाहून-ँतून	घोडयांहून-तून
ष०	घोडयाचा-ची-चें घोडयाचे-च्या-चीं	घोडयांचा-ची-चें चे-च्या-चीं
स.	घोडयांत	घोडयांत
स.	घोडया	घोडयांनो

वाट.

	एकवचन	अनेकवचन
प्र.	वाट	वाटा
द्वि.	वाटेला-स	वाटांला-ना-स
तृ.	वाटेने-शीं	वाटांनी-हीं-शीं
च.	वाटेला-स	वाटांला-स
पं.	वाटेहून—ँतून	वाटांहून-तून
ष.	वाटेचा, ची, चें	वाटांचा इ०
स.	वाटेंत	वाटांत
स.	वाटे	वाटांनों

६ वरील उदाहरणें पाहतां स्पष्ट दिसेल कीं विभक्ति सिद्ध होते वेळीं फक्त प्रत्यय लागूनच काम होत नाहीं. तर त्यांशिवाय शब्दांच्या अंत्य

स्वराला आणखी कांहीं विकार होत असतो. 'घोडा' या शब्दास विभक्ति लागते वेळीं प्रथमेच्या अनेकवचनीं 'घोडे' असें रूप झालें, आणि पुढील सर्व प्रत्यय लागतांना एकवचनीं 'घोडा' आणि अनेकवचनीं 'घोड्यां' अशीं रूपें होऊन त्यांपुढें नेमलेले प्रत्यय लागले. म्हणून 'घोडा' या शब्दाचें 'घोड्या' हें एकवचनीं सामान्यरूप आणि 'घोड्यां' हें अनेकवचनीं सामान्यरूप असें म्हणतात. तसेंच 'वाट' या शब्दाचें 'वाटे' हें एकवचनीं सामान्यरूप आणि 'वाटां' हें अनेकवचनीं सामान्यरूप होय. शब्दाचें मूळचें रूप, तेंच प्रथमेचें एकवचन.

७ सामान्यरूप समजलें म्हणजे शब्दाची कोणतीही विभक्ति आणि प्रथमेचें अनेकवचन हें समजण्यास अडचण पडत नाहीं; परंतु हें सामान्यरूप सर्व शब्दांमध्यें एकाच रीतीनें होतें असें नाहीं. याकरितां त्याविषयींच्या नियमाकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे.

८. परंतु आकारांतांशिवाय इतर सर्व पुल्लिंग शब्दांचीं प्रथमेचीं रूपें दोन्ही वचनीं सारखींच असतात, हा नियम फार उपयोगी आहे.

९. या सामान्यरूपाच्या संबंधानें नामाचे सहा वर्ग केले असतां विभक्तिप्रकरण सुलभ होईल.

वर्ग १

१०. या वर्गांतील नामाला विभक्ति लागतांना त्यांच्या रूपांला कांहींच विकार होत नाहीं. उ० हत्ती.

टीप—अनेकवचनीं सामान्यरूपाच्या अंत्यस्वरावर अनुस्वार नेहमीं असतो हें लक्षांत ठेवावें

	एकवचन	अनेकवचन
प्र०	हत्ती	हत्ती
द्वि०	हत्तीला–स	हत्तींला–स
	इ०	इ०

याप्रमाणें हस्ती, करी, दंडी, इत्यादि कित्येक ईकारांत संस्कृत शब्द; पेरू, गेरू, साडू, इत्यादि कित्येक ऊकारांत शब्द; नाना, काका, दादा इत्यादि सन्मानवाचक शब्द; गोविंदा, रामा, विठू इत्यादि विशेषनामें; तसेंच टाहो, लाहो; हे शब्द पहिल्या वर्गांतील आहेत.

वर्ग २

११. या वर्गांत सर्व (ऱ्हस्व) इ–उकारांत संस्कृत शब्द येतात. यांचीं प्रथमेचीं उभयवचनीं रूपें सारखींच; सामान्यरूपीं मात्र अंत्यस्वर दीर्घ होतो, एवढाच काय तो यामध्यें विकार होत असतो.

उ. हरि, गुरु, धेनु, मधु, इ०

	एकवचन	अनेकवचन
प्र.	हरि	हरि
द्वि.	हरीला–स	हरींला–स
	इ०	इ०

वर्ग ३

१२. यामध्यें बहुतेक अकारांत स्त्रीलिंग शब्द येतात. या वर्गांतील शब्दांचीं दोन्ही सामान्यरूपें आणि प्रथमा अनेकवचन, हीं तीन्ही रूपें एकसारखीं, म्हणजे ईकारान्त होतात. उ० चाल.

	एकवचन	अनेकवचन
प्र०	चाल	चाली
द्वि०	चालीस	चालींस
	इ०	इ०

१३ वरील तीन वर्गांचे नियम फार सोपे आहेत. परंतु पुढील तीन वर्गांच्या नियमांकडे किंचित् विशेष लक्ष दिलें पाहिजे.

टीप––अनेकवचनीं, सामान्यरूपाच्या अंत्यस्वरावर नित्य अनुस्वार असतोच; परंतु (विभक्तींचीं रूपें अगदीं सिद्ध होत तोंपर्यंत तूर्त) तो

अनुस्वार काढून शेष राहिलेलें रूप हेंच अनेकवचनीं सामान्यरूप मानावें, म्हणजे तें इतर सर्व रूपांना आधारभूत होऊन त्याच्या योगानें पुढील विभक्ति प्रकरण फार सोपें होईल.

१४ नियम–पुल्लिंग आणि नपुंसक शब्दांचे (अनुस्वार वर्ज्य करून) अनेकवचनीं सामान्यरूप समजलें म्हणजे तेंच एकवचनीं सामान्यरूप असतें; आणि प्रथमेचें अनेकवचन मात्र समजण्याला कांहीं विशेष नियम लागतो. उ० घोडा, याचीं सामान्यरूपें 'घोडया' अशीं होतात. फक्त, प्रथमेचें अनेकवचन 'घोडे' हें रूप कसें झालें, हें समजण्याला मात्र दुसरा नियम पाहवा लागतो, तो पुढें येईल.

परंतु स्त्रीलिंग शब्दांमध्यें, अनेकवचनी सामान्यरूप समजलें म्हणजे, तेंच (अनुस्वार वर्ज्य करून) प्रथमेचें अनेकवचन होतें. एकवचनी सामान्यरूप शोधून काढण्याला मात्र दुसरा नियम लागतो. उ० वाट, याचें अनेकवचनीं सा० रूप 'वाटा' आणि तेंच प्रथमेचें अनेकवचन; आतां एकवचनीं सा० रू० 'वाटे' हें शोधून काढण्याला मात्र दुसरा नियम पाहिला पाहिजे.

वर्ग ४

१५ यामध्यें शब्दांचें अनेकवचनीं सामान्यरूप (अनुस्वार वर्ज्य करून) आकारांत असतें. यांत अकारांत पुल्लिंग आणि नपुंसकलिंग शब्द; तट्टू, भट्टू, मेंढरूं, करडूं, वासरूं, कोकरूं, गुरूं, कुसूं, इत्यादि थोडे ऊकारांत शब्द; आकारांत स्त्रीलिंग शब्द; तसेंच वाट, घांट, इत्यादि कांहीं अकारान्त स्त्रीलिंग शब्द; आणि बायको, ढंबो; हे शब्द येतात.

१६ वरील नियमांवरून, यांतील पुल्लिंग आणि नपुंसक शब्दांचीं एकवचनी सामान्यरूपें, आणि स्त्रीलिंग शब्दांचीं प्रथमेचीं अनेकवचनें, वेगळीं सांगण्याची गरज राहत नाहीं. कारण तीं आकारांतच होणार.

आतां, या वर्गातील पुल्लिंग शब्दांचीं प्रथमेचीं अनेकवचनें, तीं एकवचनांसारखींच असतात, हें ८ व्या लेखावरून उघड आहे. नपुंसक शब्दांचीं एँकारांत होतात. बायको, ढंबो, याचें एकवचनी सामान्यरूप बायको, ढंबो असेंच होतें. आणि या वर्गातील इतर स्त्रीलिंग (म्हणजे अ—आकारांत) शब्द यांचें एकवचनी सामान्यरूप एकारांत होतें. उदा०

अकारांत पु० वृक्ष.

	एकवचन	अनेकवचन
प्र०	वृक्ष	वृक्ष
द्वि०	वृक्षास	वृक्षांस
	इ०	इ०

ऊकारांत पु०. तट्टू.

प्र०.	तट्टू	तट्टू
द्वि०	तट्टास	तट्टांस
	इ०	इ०

आकारांत नपुं० झाड.

प्र०	झाड	झाडें
द्वि०	झाडास	झाडांस
	इ०	इ०

ऊकारांत नपुं०. मेंढरूं

प्र०	मेंढरूं	मेंढरें
द्वि०	मेंढरास	मेंढरांस
	इ०	इ०

अकारांत स्त्रीलिंग. वाट.

प्र०	वाट	वाटा
द्वि०	वाटेस	वाटांस
	इ०	इ०

आकारांत स्त्रीलिंग. आज्ञा.

प्र०	आज्ञा	आज्ञा
द्वि०	आज्ञेस	आज्ञांस
	इ०	इ०

वर्ग ५

१७ या वर्गांतील शब्दांचें अनेकवचनी सामान्यरूप 'या' लागून होतें, आणि मूळचा अंतस्वर निघून जातो. यांत आ–ईकारांत पुल्लिंग, इ–एंकारांत नपुंसक, आणि ईकारांत स्त्रीलिंग, शब्द येतात. आकारांत पुल्लिंगाचें अनेकवचन एकारांत; ईकारांत पुल्लिंगाचीं दोन्ही वचनें सारखींच; ईकारांत नपुंसकाचें अनेकवचन एँकारांत; एँकारांत नपुंसकाचें अनेकवचन ईकारांत; होतें.–ईकारांत स्त्रीलिंगाचें एकवचनी सामान्यरूप मूळ रूपासारखेंच. उदा०.

आकारांत पुल्लिंग. घोडा.

प्र०	घोडा	घोडे
द्वि०	घोड्यास	घोड्यांस
	इ०	इ०

ईकारांत पुल्लिंग. शास्त्री.

प्र०	शास्त्री	शास्त्री
द्वि०	शास्त्र्यास	शास्त्र्यांस
	इ०	इ०

ईकारांत नपुंसक. पाणी.

प्र०	पाणी	पाण्यें
द्वि०	पाण्यास	पाण्यांस
	इ०	इ०

ऍंकारांत नपुंसक. तळें

प्र०	तळें	तळीं
द्वि०	तळ्यास	तळ्यांस
	इ०	इ०.

ईकारांत स्त्रीलिंग. नदी

प्र०	नदी	नद्या
द्वि०	नदीस	नद्यांस
	इ०	इ०

वर्ग ६

१८. या वर्गांत ऊकारांत शब्द असून त्यांचें अनेकवचनी सामान्यरूप वा, अवा, किंवा उवा लागून होतें. यांतील पुल्लिंग शब्दांचें अनेकवचन एकवचनासारखेंच; नपुंसक शब्दाला अनेकवचनीं 'वें' किंवा 'अवें' लागतें. स्त्रीलिंग शब्दाच्या एकवचनी सामान्यरूपीं 'अवे' लागतें. उदा०.

ऊकारांत पुल्लिंग. गहूं.

प्र०	गहूं	गहूं
द्वि०	गव्हास	गव्हांस
	इ०	इ०

ऊकारांत पुल्लिंग. लाडू.

प्र०	लाडू	लाडू
द्वि०	लाडवास	लाडवांस
	इ०	इ०

ऊकारांत नपुंसक. तारूं

प्र०	तारूं	तारवें, तारवें.
द्वि०	तार्वास, तारवास	तार्वांस, तारवांस
	इ०	इ०

ऊकारांत स्त्रीलिंग. जळू.

प्र०	जळू	जळवा
द्वि०	जळवेस	जळवांस.
	इ०	इ०

यांतील अपवाद, आणि कांहीं विशेष नियम पुढें येतील.

(पु. ३, अं. ८, जान्युआरी १८७१)

मराठी व्याकरणावर विचार.

निबंध १ ला

प्रस्ताव

मराठी भाषेनें लिहिलेलें अर्वाचीन मराठी भाषेचें पहिलें व्याकरण म्हटलें म्हणजे गंगाधरशास्त्री फडके यांचें. तें सन इस्वी १८२५ त प्रसिद्ध झालें. त्याच्या दोन-चार आवृत्ति झाल्यानंतर, दहाबारा वर्षांनीं बाळशास्त्री जांभेकर यांचें बालव्याकरण उत्पन्न झालें. त्याच वर्षीं म्हणजे १८३६ च्या अखेरीस दादोबा पांडुरंग यांचें मोठें व्याकरण निघालें. तेव्हांपासून बाराचौदा वर्षांत विशेष हालचाल झाली नाहीं. १८५० च्या सुमारास दादोबांनीं आपलें व्याकरण पुष्कळ सुधारून पुनः प्रसिद्ध केलें. तेव्हांपासून पंधरा सत्रा वर्षांपर्यंत चोहोंकडे दादोकृत व्याकरणाचाच अभ्यास चालला होता. पुढें मराठी शाळापत्रकाच्या द्वारें कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचें व्याकरणविषयक फुटकळ निबंधांची, व सन १८६७ सालीं कृष्णशास्त्री गोडबोलेकृत नवीन मराठी व्याकरणाची प्रसिद्धि झाली. तथापि सरकारी शाळांमध्यें प्रायः दादोकृत व्याकरणाला अद्यापि मुख्य स्थान मिळत आहे. यांशिवाय एक दोन लहान लहान व्याकरणें झालीं. गंगाधरशास्त्री टिळक यांचें लघु व्याकरण, दादोकृत लघु व्याकरण, व

पूरणिका, सुबोध व्याकरण, व्याकरणबोध, विद्यार्थ्यांचा व्याकरण मित्र इत्यादि. यांखेरीज अमेरिकन मिशनरींनीं छापलेलें एक जुनें मराठी व्याकरण आहे, व अलीकडे 'ट्राक्ट सोसाइटि' नामक मंडळीनें व्याकरणावर धडे म्हणून कांहीं लहान पुस्तकें केलीं आहेत. मध्यदेशच्या शाळांमध्यें चालविण्याकरितां म्हणून तिकडे एक दोन लहान लहान व्याकरणें केलेलीं आहेत.

हे मराठी भाषेनें लिहिलेले ग्रंथ झाले. पण इंग्रजी भाषेनें लिहिलेलीं मराठी व्याकरणें दोनचार झालीं आहेत. त्यांत पहिलें व्याकरण स्टीव्हन्सनचें, असें म्हणतां येईल. शिवाय बर्जेस्‌चें एक, अस्खेडकर आणि बेलेयर्स् यांचें एक, ब्यालंटैन्‌चें एक, आणि अलीकडे नवलकर यांचें एक, आणि दुसरें कोणाचेंसें एक, अशीं व्याकरणें झालीं आहेत.

याप्रमाणें मराठी भाषेच्या व्याकरणावर अनेक ग्रंथ आहेत. तथापि मराठी व्याकरणाचें पूर्ण स्वरूप आविष्कृत होण्याला आणखी नवीन व्याकरणग्रंथ पाहिजे आहे, यांत कांहीं संशय नाहीं. म्हणून ही अडचण दूर करण्याच्या हेतूनें 'पुणें न्यू इंग्लिश स्कुलांतील शिक्षक,' रा. रा. रामचंद्र भिकाजी जोशी यांनीं 'प्रौढबोध मराठी व्याकरण,' नांवाचा बराच मोठा ग्रंथ ३२५ पृष्ठांचा करून सांप्रत छापविला आहे. मराठी भाषेच्या सुधारणेकडे अलीकडे विद्वान् लोकांचें बरेंच लक्ष लागत चाललें आहे, ही मोठी आनंदाची गोष्ट होय; आणि जोशीबोवा यांनीं मोठा उद्योग करून हें पुस्तक सिद्ध केलें, याबद्दल त्यांची प्रशंसा करणें योग्य आहे. आजपर्यंत झालेल्या व्याकरण ग्रंथांचें सार घेऊन त्यांनीं हा नवा ग्रंथ केला, आणि मराठी भाषेच्या सुधारणेला बरीच मदत करण्याचा प्रयत्न केला, याबद्दल खरोखर ते स्तुतीस पात्र होत.

विश्वविद्यालयांतून मराठी भाषेला फांटा मिळाल्यापासून तिच्या अभ्यासाकडे लक्ष देण्याची बहुशः कोणाला इच्छा होत नाहीं. कारण त्या अभ्या-

साला परीक्षांमध्यें महत्त्व नाहीं. यामुळें हा विषय कितीही उपयोगी असला, तरी हा दूर टाकून ज्या विषयांची परीक्षांमध्यें गरज आहे, त्यांकडेसच सर्व लक्ष देणें ही गोष्ट विद्यार्थ्यांस फार हितकारक आणि आवश्यक होते. तथापि अलीकडे मराठी लोकांना आपल्या भाषेची गोडी बरीच लागत चालली आहे, आणि विश्वविद्यालयामध्यें पुनः तिचा प्रवेश व्हावा, अशा-विषयीं कित्येक विद्वान् लोकांकडून खटपट चालू आहे. अशा प्रसंगीं मराठी व्याकरणाचा नवा ग्रंथ उत्पन्न झालेला पाहून खरोखरी कोणाही महाराष्ट्रजनाला आनंद झाल्यावांचून राहूं नये, हें योग्य आहे.

या ग्रंथाची रचना कसकशी केली आहे हें दाखविण्याकरितां ग्रंथ-कारांच्या प्रस्तावनेंतीलच कांहीं अंश येथें उतरून घेऊं.

" कै० दादोबा पांडुरंग यांचें व्याकरण झाल्यानंतर कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं विशेषतः त्यांचे व्याकरणावर, व साधारणतः मराठी भाषेच्या व्याकरणव्यवस्थेवर माजी मराठी शाळापत्रकांत निबंध लिहिले, ते सर्व प्रसिद्ध आहेत. या निबंधांत व्याकरणाच्या सर्व गोष्टींचे संबंधानें पोक्त रीतीनें विचार करून अनेक नवीन व्यवस्था सुचविल्या होत्या. परंतु आमच्या नहमींच्या अलगर्जीपणाप्रमाणें हे निबंध सध्यां माहितही नाहींतसे झाले आहेत! या निबंधांच्या आधारानें खुद्द त्यांचे हातून किंवा दुसऱ्या कोणा विद्वानाचे हातून जर व्याकरणाची रचना झाली असती, तर केवढी बहार झाली असती! परंतु दुर्दैवेंकरून असलें फार कठीण, महत्त्वाचें व प्रचंड काम प्रस्तुतसारख्या ग्रंथ-कारावर पडलें आहे! तथापि वरील सर्वमान्य विद्वानांचें स्मरण करून, त्यांनीं रंध्र पाडून ठेवलेल्या भाषारूप रत्नांत हा ग्रंथकार यःकश्चित् सूत्रासारखा प्रवेश करीत आहे. वरील दृष्टांतांतल्या सूत्राचें तें करणें धाष्टर्याचें आहे असें ज्याप्रमाणें कोणी म्हणणार नाहीं, त्याप्रमाणें माझेवरही कोणी धाष्टर्याचा आरोप आणणार नाहींच!

"हा ग्रंथ रचितांना कै० चिपळूणकर शास्त्रीबुवा यांचे निबंधांतील सूचनांचा पूर्ण विचार केला आहे. त्यांतील कित्येक व्यवस्था जशाच्या तशाच घेतल्या

आहेत, व कित्येक ठिकाणीं योग्य फेरफार केले आहेत. दादोबा पांडुरंग यांच्या व्याकरणांत आज जे प्रकार लोकांस अडचणीचे वाटूं लागले आहेत, त्यांत सुधारणा केल्या आहेत. नुसत्या गद्याचा विचार न करितां गद्य व पद्य दोहींचाही त्यांत पूर्ण विचार केला आहे. वाक्यविचार व भाषापद्धति यांचा विचार विस्तृत रीतीनें केलेला आहे. हा परिपूर्ण झाला, असें मी मुळींच म्हणत नाहीं. परंतु हा लोकांस आवडला व उपयोगाचा आहे असें दिसून आलें, म्हणजे पुढल्या आवृत्तींत ती व्यवस्था पूर्णत्वास नेण्याचा माझा विचार आहे. आजपर्यंतच्या व्याकरणाचे पद्धतींत व व्यवस्थेंत जे अनेक कठीण व घोटाळ्याचे प्रकार वाटले, ते जितके सोपे व साधे करवतील तितके करण्याचा यत्न केला आहे. प्रस्तुत ग्रंथांत ज्या नवीन गोष्टी व नवीन व्यवस्था आहेत, त्यांचे संबंधानें ग्रंथांत जेथच्या तेथें थोडक्यांत सांगितलेंच आहे. परंतु कित्येक मुख्य मुख्य गोष्टींविषयीं येथें विशेषतः सांगितलें पाहिजे. त्या गोष्टी अशा—

" (१) नामांचें सामान्यरूप करणें व त्यांस विभक्ति लावून तीं चालवून दाखविणें यासंबंधानें त्यांचे वर्ग बांधून नामें नियमबद्ध होतील असें करण्याचा यत्न केला आहे. नामांच्या अंत्यस्वरांवरून हे वर्ग बांधून त्यांचे पोटीं त्यांचे आणखी होणारे पोटभेद, अपवाद, प्रत्ययपत्राद वगैरे सांगितले आहेत. हें प्रकरण लिहितांना रेव्ह. टामस बर्जेस यांच्या इंग्रजींत लिहिलेल्या मराठी व्याकरणाचा उपयोग झाला.

" (२) विभक्ती कारकांप्रमाणे वांटून दिल्या आहेत. कर्ता व कर्म यांची एकच विभक्ति मानण्याची सध्यांची व्यवस्था आहे, ती माझे मतें चुकीची आहे. एक तर दोहींचा जो क्रियापदाशीं संबंध असतो, ज्याला कारक असें म्हणावयाचें, तो एकच प्रकारचा असतो, असें कोणीही कधीं म्हणणार नाहीं. दुसरें, आपण जर सहा-सात निरनिराळ्या विभक्ती मानितों तर कर्ता व कर्म हीं जीं सर्व कारकांत अत्यंत महत्त्वाचीं कारकें, त्यांची अशी व्यवस्था करून आपल्यास काय लाभ आहे? दादोबांच्या पूर्वींच्या व्याकरणांत अशी व्यवस्था नव्हती. प्रत्ययांवरून विभक्ती मानण्याचा विचार करून त्यांनीं ही नवीन व्यवस्था काढिली, पण त्यांना आपल्या उद्देशाप्रमाणें ही व्यवस्था करितां आली नाहीं; कारण तसें करणें अशक्यच होतें. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं दादोबाची व्यवस्था

अधिक पूर्ण करण्याचा यत्न केला आहे. गोडबोले यांना पुनः तो प्रकार घोटाळ्याचा वाटून त्यांनीं कर्ता असतां प्रथमा व कर्म असतां द्वितीया अशी व्यवस्था सुचविली. वरील सर्व प्रकार मनांत आणून सांप्रत सोपी असून व्यवस्थेशीर अशी विभक्तीची रचना केली आहे.

" (३) दादोबा पांडुरंग यांच्या ग्रंथांत क्रियापदें चालविण्याची व्यवस्था फार कठीण व घोटाळ्याची झाली आहे. याचें कारण मराठी आख्यात प्रत्ययांचा मूळ पाया कोणचा आहे, हें पाहण्याचा त्यांनीं यत्न केला नाहीं. मराठी कवितेंत व जुन्या मराठी भाषेंत सांपडणारे वर्तमान काळाचे प्रत्यय (पहा क० २३५) हें मराठींतील सर्व आख्यात प्रत्ययांचें मूळ आहे. त्यांच्या पायावर मराठींतील क्रियापदांचीं सर्व काळांचीं रूपें चालविण्याची इमारत बांधिली असतां तें प्रकरण फारच सोपें व व्यवस्थेशीर होईल. ही व्यवस्था कै० चिपळूणकर यांनीं आपल्या निबंधांत सुचविली; तिचें अनुकरण प्रस्तुत पुस्तकांत केलें आहे. शिवाय यांत अर्थ, भेद, इत्यादि संबंधाचे कित्येक प्रकार, ज्यांचा क्रियापदांचीं रूपें करण्यामध्यें संबंध मुळींच नसून ज्यापासून शिकणारांचा घोटाळा मात्र होत असे, ते काढून टाकिले आहेत. या गोष्टींचा वाक्यरचनेशीं संबंध आहे तेथेंही त्यांचा विचार जरूर तितकाच केला आहे. यामुळ बरीच भानगड कमी होऊन शिकणारास सुलभ जाईल.

" (४) मराठींत सध्यां प्रयोगरचना आहे, तिचा वास्तविक उद्देश एकीकडे राहून ती केवळ नांवाला राहिली आहे. आणि मग प्रथमान्त कर्ता, चतुर्थ्यंत कर्ता, षष्ठ्यंत कर्ता, असे अनेक प्रकार अनेक जण सुचवितात. अशा प्रकारचीं भिन्न मतें होण्याचें कारण 'कर्ता' शब्दाची व्याख्या नीट करीत नाहींत, हें होय. व्याकरणांत ' कर्ता ' म्हणजे क्रियापदाचा नायक—म्हणजे ज्याच्या धोरणानें क्रियापदाचीं लिंगादि बदलतात तो शब्द, अशी व्याख्या केली असतां कर्तरि, कर्मणि व भावी ही जी प्रयोगरचना, तिला सार्थकता येईल. कर्तरी प्रयोग म्हणजे कर्त्याच्या लिंगवचनानुरूप क्रियापदाचा प्रयोग (स्थिति); ' कर्मणि प्रयोग ' म्हणजे कर्माच्या लिंगवचनाप्रमाणें क्रियापदाचा प्रयोग (स्थिति),—अर्थात् कर्मदर्शक शब्द क्रियापदाचा कर्ता असणें; व " भावी—प्रयोग " म्हणजे क्रियापदावर 'कर्ता' व 'कर्म' यांतून कोणाचीच सत्ता नसून

तें स्वतंत्र असणें. अशी व्यवस्था मानल्यावरही 'कर्ता' या पदाच्या संबंधानें पुन: घोटाळा राहील; तो दूर व्हावा म्हणून सांप्रत "कर्तृपद" व 'कर्ता' असे दोन पारिभाषिक शब्द काढिले आहेत. 'कर्तृपद' म्हणजे कर्तृस्थानीं असणारा किंवा क्रिया करणाराचा दर्शक शब्द; व 'कर्ता' म्हणजे व्याकरणांतला क्रियेचा नायक. असें एकवार ठरविल्यावर कित्येक ठिकाणीं 'कर्तृपद' चतुर्थ्यंतही असलें तरी चालेल. या व्यवस्थेच्या योगानें सर्व भिन्नमतें व वादस्थळें यांची एकवाक्यता होईल, असा ग्रंथकारास पूर्ण भरंवसा आहे.

"(५) मराठी भाषेंतल्या व्याकरणाचे संबंधाचा दुसरा घोटाळ्याचा प्रकार संयुक्त क्रियापदें व त्यावरून संयुक्तकाळ मानण्याची रीत. हा होय. धातुसाधितें व क्रियार्थदर्शक नामें, विशेषणें आणि अव्ययें, या सर्वांवरूनच क्रियार्थाची निष्पत्ति होणार. पण सर्वांसच 'क्रियापद' अशी संज्ञा दिली व काळ कोणचा हें ठरवीत बसलें, तर मराठींत संयुक्त क्रियापदें व संयुक्त काळ असंख्य होतील. या व्याकरणांत काळांचे स्वाभाविक भेद तेवढे ठेवून बाकीच्या संयुक्त कियापदांस जरी अर्थावरून 'संयुक्त' म्हटलें आहे, तरी त्यांतून नामें, विशेषणें व अव्ययें निराळीं काढण्याची नवीन व्यवस्था केली आहे. ह्या नव्या रीतीस नीट जुळण्यासाठीं 'क्रियावाचक नामें,' मानण्याचा नवीन प्रकार या ग्रंथांत घालावा लागला आहे. तथापि ही तऱ्हा अगदीं नवीन नसून कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर व दादोबा यांची तिला संमति आहे, हें त्यांचें लेखांवरून दिसून येईल. या नवीन तऱ्हेपासूनही बराच घोटाळा कमी होईल."

हा ग्रंथ लिहिण्याच्या कामीं जोशीबोवा यांस बरेच परिश्रम करावे लागले आहेत, यांत कांहीं संशय नाहीं; आणि यामध्यें जरी महाराष्ट्र भाषेच्या व्याकरणाचें उत्तम स्वरूप साध्य झालें नाहीं, तथापि मराठी भाषेच्या फार मंदावलेल्या व्याकरणविषयक विचारांला त्यांच्या या ग्रंथामुळें उचल प्राप्त झाली, या गोष्टीकडे लक्ष देऊन, सर्वांनीं या ग्रंथास आपला उदार आश्रय देणें योग्य होय.

असो. याप्रमाणें या ग्रंथाच्या संबंधानें कांहीं विचार आम्हीं प्रकट केले; परंतु आतां यापुढें आम्हांस याविषयीं जें कांहीं लिहावयाचें आहे,

यांत धात्वर्थ, व्यापार, क्रिया, आणि पुनः तिचें फळ हें ज्या पदार्थावर घडतें तो पदार्थ त्या (कोणत्या ?) क्रियापदाचें कर्म; पण पुढें 'हरिण' हा पदार्थ राहून जाऊन ' हरिण ' हा जो शब्द तो कर्म होतो !

लें० १०—" ळ् हें व्यंजन फक्त मराठींतच येतें. "—या विधानोक्तींत जरी सत्य नाहीं तरी ती चूक सध्यां लक्षांत आणीत नाहीं; 'फक्त' आणि ' च ' यामुळें वाक्य शिथिल झालें, इतकेंच सांगतों.

लें० २३—" संधी संस्कृत शब्दांत मात्र होतात; व केव्हां केव्हां शुद्ध मराठी शब्दांतही संधी होतात." या विधानाचा उपयोग काय ?

२. आतां पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या.

लें० ५६८—" **कर्ता** म्हणजे वाक्यांत क्रियापद ज्या शब्दाप्रमाणें असतें, तो शब्द, व **कर्तृपद,** म्हणजे वाक्यांतील क्रियापदाचा अर्थ जो व्यापार तो ज्याचेकडून घडला असेल, असा शब्द."

या व्याख्येमुळें जोशीबुवांच्या व्याकरणाची सर्व घाण झाली आहे. प्रयोग प्रकरण तर सर्वथा बिघडून गेलें आहे.

कर्ता आणि **कर्तृपद** हे शब्द थोडके पडले, म्हणून पुनः जोशीबोवांनीं **उद्देश्य** या शब्दाचीही योजना केली आहे; परंतु कर्ता आणि कर्तृपद यांच्या घोटाळ्यांतून तो शब्द सुटत नाहीं !

लें० २०२—" ज्या धातूंवरून फळविशिष्ट व्यापाराचा बोध विवक्षित असतो, ते **सकर्मक** होत; व ज्यांवरून केवळ व्यापाराचा बोध विवक्षित असतो, ते **अकर्मक** होत."

अशीं उदाहरणें पुष्कळ देतां येतील. परंतु हीं थोडींशीं येथें केवळ मासल्याकरितां दिलीं आहेत.

ग्रंथव्यवस्थेच्या संबंधानें कांहीं विशेष केलें आहे असेंही म्हणवत नाहीं. क्रियापदाच्या व्यवस्थेमध्यें सोपेपणा आणण्याविषयीं कांहीं प्रयत्न केला आहे खरा, तथापि तो सफळ झाला आहे असें म्हणवत नाहीं.

ग्रंथांतील भाषेच्या शुद्धतेकडे अथवा लेखाच्या प्रौढतेकडे जर लक्ष देऊन पाहिलें, तर असें म्हणणें भाग पडतें कीं मराठी भाषेचें मुख्य पीठ म्हणून गाजलेल्या पुण्यग्रामाच्या नांवाला शोभण्यासारखें त्यांत कांहीं दिसत नाहीं. उलट असा चमत्कार वाटतो कीं, तेथील एका विद्यालयांतील शिक्षकानें लिहिलेल्या व्याकरणासारख्या ग्रंथामध्यें, 'त्यांचा संधि त्यांच्याच दीर्घस्वरांत होतो.' (पृ. ६) 'जाड टाईपांत घातलेले शब्द' (पृ. १५) 'पदार्थमात्रांचीं किंवा व्यक्तिमात्रांची नामें' (पृ. १४)

'या व्याकरणाचा नंबर सर्व प्रकारें जरी दादोकृत व्याकरणाच्यावर न लागला, तरी ह्यांत जे शोध व भाषेसंबंधीं जी अनेक प्रकारची माहिती आहे, तिच्यासंबंधानें ह्याचा नंबर पहिला आहे.' (प्रस्तावना पृ. १)

असलीं वाक्यें यावीं, आणि प्रस्तावनेच्या आरंभींचें पहिलेंच वाक्य—

" कोणच्याही भाषेचें व्याकरण व भाडयानें दिलेल्या घराची भाडेचिठ्ठी यांची व्यवस्था एकच आहे. "

अशा प्रकारें बखालीं व्यवहाराचें यावें, यांत ग्रंथकर्त्यांना कांहीं दोष वाटत नाहीं !

वर दिलेल्या उदाहरणांवरूनच कोणीही या पुस्तकाविषयीं आपलें मत निश्चित करण्याला प्रवृत्त होऊं नये; तसेंच केवळ दोष दाखविण्यापेक्षां, त्यांबरोबरच त्यांच्या निराकरणाचे मार्ग दाखवून देण्याचाही प्रयत्न करावा हें चांगलें; हें लक्षांत आणून, आम्ही असा बेत केला आहे कीं सामान्यतः महाराष्ट्र व्याकरणाला लक्षून आमचे विचार लिहावे, व प्रसंगोपात्त इतर व्याकरणांकडे आणि विशेषतः जोशीबोवांच्या प्रस्तुत व्याकरणाकडे लक्ष द्यावें.

आजपर्यंत जीं मराठी व्याकरणें झालीं आहेत, त्यांच्या उत्पत्तीकडे अंमळ लक्ष देणें अवश्य आहे. गंगाधरशास्त्री फडके यांचें व्याकरण म्हटलें म्हणजे पहिलेंच. त्या पक्षीं त्यावेळच्या मराठी लोकांच्या सामान्य

अभ्यासाच्या इयत्तेला अनुसरून संस्कृत रूपावलि, समासचक्र यांच्या धोरणानें तें बसविलें होतें, याच्यापलीकडे त्यामध्यें फारसें नव्हतें.

बाळशास्त्र्यांना इंग्रजी आणि संस्कृत या दोहों भाषांत चांगली गति असल्यामुळें त्यांच्या व्याकरणांत सोपेपणा पुष्कळ आला होता. परंतु बोलून चालून तें बालव्याकरण. तेव्हां त्यामध्यें विस्तारही तादृशच. तिसरें दादोबांचें व्याकरण. दादोबाला त्या समयीं संस्कृतापेक्षां इंग्रजीचें ज्ञान अधिक होतें. त्यामुळें त्यांनीं आपल्या व्याकरणांतील मुख्य मुख्य नियम आणि व्याख्या इंग्रजींतील मरेज् व्याकरणांतून घेतल्या. त्यानंतर आलिकडे जीं व्याकरणें झालीं, त्यांत बहुतेक प्रकार दादोबांचाच असून कांहीं नवीन विषयही आहेत. गोडबोल्यांच्या व्याकरणामध्यें हॉवर्डकृत इंग्लिश व्याकरणांतील बहुतेक लेखांचें पदशः भाषांतर आलेलें आहे. परंतु शब्दोत्पत्तीच्या संबंधानें त्यांनीं पुष्कळ चांगला परिश्रम केला आहे. चिपळूणकरांच्या निबंधांमध्यें तरी शब्दोत्पत्तीकडे बरेंच लक्ष दिलें आहे. प्रस्तुत म्हणजे जोशीबोवाच्या व्याकरणामध्यें पाहिलें, तर स्वतंत्र विचार करण्याचा त्यांनीं आपणाकडून होईल तितका प्रयत्न केला आहे; तथापि त्यामध्यें फारसें कांहीं नवीन आलेलें दिसत नाहीं; व जें कांहीं क्वचित् नवीन आहे, तेंही प्रशस्त आहे असें म्हणवत नाहीं. याचें कारण काय असेल तें असो. मराठी तर त्यांची स्वभाषा आहेच, व तिचा अभ्यासही त्यांनीं केला असलाच पाहिजे. संस्कृत आणि इंग्लिश यांचेंही ज्ञान त्यांना बरेंच असावें, असें म्हणणें योग्य दिसतें. परंतु ग्रंथमुखावरच जें कालिदासोक्तीचें श्लोकार्ध त्यांनीं उतरून घेतलें आहे, त्यामध्यें ढळढळीत चुका पुनः पुनः (मुखपृष्ठीं, आणि ७ व्या पृष्ठीं) आल्या आहेत, यावरून त्या समजुतीला मोठा विरोध उत्पन्न होतो.

‘ मणौ वज्रसमुत्कीर्णे ’

असा मूळचा चरण. परंतु जोशीबोवांनीं, त्याचें स्वरूप बदलून एकदां—

‘ मणौ वज्रसमुत्किर्णौ ’

आणि दुसऱ्या वेळेस,

‘ मणौ वज्रसमुत्कीर्णौ ’

असें ‘णौ’ ला ‘र्णौ’ जमविणारें नवीन रूप दिलें आहे. आतां ही चूक त्यांची नसावी; आणि त्यांच्या पुस्तकामध्यें दुसऱ्या आणखी जशा ऱ्हस्व-दीर्घानुस्वारादिकांच्या असंख्य चुक्या छापणारांनीं केल्या आहेत, त्यांतलीच ही एक असावी, असें समाधानकारक अनुमान करणें बरें वाटतें. इंग्लिश शाळेमध्यें ते शिक्षक आहेत, त्यावरून त्यांना इंग्लिश व्याकरणांतील बहुतेक नियमांचें अनुकरण करण्याची इच्छा झाली हें साहजिक खरें. परंतु कित्येक ठिकाणीं त्यांनीं संस्कृत व्याकरणांत अमुक अमुक प्रकरणें अशीं अशीं आहेत असे लेख लिहिलेले आहेत, ते पाहून थोडासा चमत्कार वाटतो. असो. यांविषयीं जेथच्या तेथें पुढें विचार होईलच.

एकंदरीनें पाहतां, शास्त्रीय भाषाशैली आणि स्पष्टपणा यांच्या दृष्टीनें दादोबांला मुख्य स्थान देणें, किंवा जोशीबोवांच्या म्हणण्याप्रमाणें ‘पहिला नंबर’ देणें योग्य आहे असेंच आम्हांस वाटतें.

असो. व्याकरण म्हणजे काय, आणि त्यामध्यें काय काय प्रकरणें असलीं पाहिजेत, याचा आधीं विचार करूं.

दादोबा म्हणतात—

“ व्याकरण म्हणून एक शास्त्र आहे, जेणेंकरून भाषेचें मर्मज्ञान होतें; म्हणजे तिचे आंतील नियम कळतात. तेणेंकरून शुद्ध कोणतें आणि अशुद्ध कोणतें हें यथायोग्य समजतें. ”

बालव्याकरण—“व्याकरण म्हणजे शुद्ध रीतीनें बोलणें आणि लिहिणें यांची विद्या आहे.”

गोडबोले—“ व्याकरणांत, विद्वान् लोक कसें बोलतात आणि लिहितात, ह्याचें पद्धतवार निरूपण केलें असतें.”

जोशी—" सुशिक्षित लोक कोणचीही भाषा कोणच्या रीतीनें बोलतात किंवा लिहितात हें ज्या शास्त्रांत सांगितलें असतें, त्यास त्या भाषेचें व्याकरण असें म्हणतात."

इंग्लिश व्याकरण—" Grammar teaches how educated people speak and write " (सुशिक्षित लोक कसें बोलतात आणि लिहितात हें व्याकरण शिकवितें.) इ०

चिपळूणकरांचे निबंध आज आमच्या हातीं नसल्यामुळें, त्यांतील उतारा देववत नाहीं. तथापि एकंदरींत असें लक्षांत येईल कीं इंग्रजी व्याख्येला अनुसरूनच सर्व व्याख्या आहेत. ही गोष्ट येथें सांगण्याचें कारण इतकेंच कीं, मराठी व्याकरणाची व्यवस्था लावण्याच्या कामीं बहुतेक वैयाकरणांचा कल इंग्लिश व्याकरणांतील रीतीचें अनुकरण करण्याकडे फार असतो, व तोच दिवसेंदिवस वाढत चालला आहे, हें वाचकांच्या लक्षांत यावें. तो तसा कल कां नसावा, असा प्रश्न सहज येईलच, म्हणून आम्ही असें म्हणतों कीं, जेथें अनुकरण योग्य आहे तेथें तें करण्यास कांहीं प्रतिबंध नाहीं. परंतु हिंदूचें चित्र काढायाचें असतां त्याला इंग्रजी टोपी घालूं नये, इतकेंच आमचें म्हणणें. अनेक प्रसंगीं मराठी व्याकरणाच्या कर्त्यांनीं हा प्रकार केला आहे हें पुढें सहज लक्षांत येईल. असो, हा प्रकार जर अयोग्य, तर योग्य प्रकार तो कोणता ? जेव्हां एकादा विषय आपल्या देशी भाषेंत मुळींच नाहीं, किंवा स्वतंत्रपणें आणतां येण्याजोगा नाहीं, तेव्हां तेथें अन्य भाषांतील प्रकार घेणें अवश्य होईल. परंतु व्याकरणासारख्या विषयामध्यें तसें करण्याची आवश्यकता मुळींच दिसत नाहीं. कोणत्याही पारिभाषिक शब्दाचें लक्षण करतेवेळीं त्या शब्दाचा जो यौगिक अर्थ म्हणजे अक्षरार्थ, तो घेऊन, त्यामध्यें जर कांहीं अधिकउणें सांगणें असेल तर तें सांगावें हा प्रशस्त मार्ग होय. परंतु ' व्याकरण ' या शब्दाचें लक्षण सांगावयाचें असतां, त्याचा अक्षरार्थ सोडून देऊन

Grammar 'ग्रामर' हा जो त्या अर्थाचा इंग्लिश शब्द त्याचा आपण अक्षरार्थ देऊं लागलों, तर तो मार्ग प्रशस्त आहे असें आमच्यानें म्हणवत नाहीं. 'ग्रामा' म्हणजे अक्षर, किंवा लिहिणें, यावरून 'ग्रामर' म्हणजे लिहिण्याची, आणि तत्संबंधानें, बोलण्याची विद्या, असा त्याचा मूळचा अर्थ आहे, एवढ्यावरूनच 'व्याकरण' शब्दाचें लक्षण लिहितांना आम्ही 'ग्रामर' शब्दाचा अर्थ लिहावा हें कांहीं योग्य नाहीं. 'व्याकरण' शब्दाचा अर्थ म्हटला म्हणजे,—' **व्युत्पाद्यन्ते प्रकृतिप्रत्ययादिभिः प्रदर्श्यन्ते शब्दा अनेन इति व्याकरणम्**'—भाषेमध्यें जे शब्द, अर्थात् शुद्ध ठरलेले शब्द आहेत, त्यांची व्युत्पत्ति कशी, म्हणजे त्यांची प्रकृति काय, त्यांना प्रत्यय कोणते झाले, आगम आदेश इत्यादि विकार काय काय झाले, हें ज्या शास्त्राच्या अभ्यासानें समजतें, तें **व्याकरण**, हा मूळ अर्थ. पदयोजना, प्रयोगविचार, इत्यादिकांचा संग्रह हा त्यामध्यें अधिक अर्थ घेतला आहे. म्हणून 'व्याकरण' या शब्दाचें आम्ही महाराष्ट्रजनांनीं जें लक्षण द्यावयाचें, तें 'ग्रामर' शब्दाचें न देतां 'व्याकरण' शब्दाचेंच दिलें पाहिजे. सारांश, " भाषेंतील शब्दांची व्युत्पत्ति आणि योजना यांचें ज्ञान ज्या शास्त्राकडून होतें, तें व्याकरण, " ही किंवा अशा अर्थाची दुसरी एकादी व्याख्या असली पाहिजे होती.

'प्रौढ' म्हटलेल्या व्याकरणामध्यें प्रथमतः 'शुद्ध शब्द', 'शुद्ध प्रयोग' म्हणजे काय, आणि 'अशुद्ध शब्द' आणि 'अशुद्ध प्रयोग' म्हणजे काय, यांचा विचार असणें अवश्य आहे. परंतु या गोष्टीचा कोणीही फारसा विचार करीत नाहीं. शुद्ध म्हणजे व्याकरणशुद्ध, अथवा व्याकरणाच्या नियमांला अनुसरून असणारें, आणि तसें नाहीं तें अशुद्ध, हें बहुतेकांचें ठरींव उत्तर असतें. इतकेंच नव्हे, पण व्याकरण आणि भाषा यांचा अन्योन्यसंबंध काय आहे, ही गोष्ट आमचे मोठमोठे वैयाकरणही अगदीं विसरून जातात.

दादोबांनीं म्हटलें आहे—

स्त्रीलिंगीं—मी अस्यें, असत अस्यें; तूं अस्येस; ती अस्ये; इ० रूपें व्याकरणशुद्ध जाणावीं. परंतु अशा रीतीनें लिहिण्याचा प्रघात नाहीं; म्हणोन तीन्ही लिंगी सारखींच रूपें लिहावीं. आ० ४, पृ० १९०.

'म्यां तुला चोरीवर भली धरिली,' यापेक्षां 'म्यां तुला चोरीवर भलें धरिलें,' हें व्याकरणदृष्ट्या अधिक शुद्ध होय. आवृ० ४ पृ० ३०९

गोडबोले म्हणतात—

व्याकरणदृष्ट्या अशुद्ध प्रयोग नाहींतसे होत तोंपर्यंत ते अपवाद मानून राखले पाहिजेत. आवृ० १, पृ० १२१.

जोशीबोवा म्हणतात—" पुष्कळांचे बोलण्यांत सप्रत्यय द्वितीयेचा प्रयोग येऊन भावी क्रियापदाबद्दल कर्मणि क्रियापद येतें; जसें, 'त्यानें आपल्या मुलास शाळेंत पाठविला',...'मुलीला निजविली' अशा ठिकाणीं क्रियापद भावी असणें हेंच व्याकरणदृष्ट्या प्रशस्त आहे " नि० ५६६.

शुद्ध, व्याकरणशुद्ध, व्याकरणदृष्ट्या शुद्ध, व्याकरणनियमानुसार, इत्यादि अनेक शब्दप्रयोग आहेत, त्यांचा निश्चितार्थ काय, हें जाणण्याकडे कोणी लक्ष देत नाहीं. कांहीं वर्षांमागें पुण्यास 'मेजर क्यांडि' नांवाचे सरकारचे विद्याखात्यांतील भाषांतरकार होते. त्यांना मराठी भाषेच्या ज्ञानाचा मोठा गर्व असे, ही गोष्ट पुष्कळांना ठाऊक असेल. कांहीं लेखांच्या संबंधानें, मेजर क्यांडि आणि त्यांचें कांहीं आश्रित मंडळ हें एका बाजूला, आणि मुंबईंतील कांहीं विद्वान् मंडळी दुसऱ्या बाजूला, असें होऊन त्यांच्यामध्यें बरेच दिवस लेखी वादविवाद चालला होता. त्यामध्यें हे म्हणत, आमचें मत खरें; आणि ते म्हणत आमचें मत खरें; आणि आपापल्या मताच्या पुष्टीकरणार्थ उभय पक्षांकडून तऱ्हतऱ्हेचे पुरावेही पुष्कळ पुढें येत असत. परंतु चमत्कार हा, कीं त्यांच्या त्या कुटाकुटीपासून उभयपक्षांच्या आग्रही मतांपलीकडे जरी कांहीं फारसें निष्पन्न झालें नाहीं, तथापि अमुक एक

प्रयोग भाषेमध्यें सर्वमान्य किंवा निदान बहुमान्य तरी आहे, म्हणून तो शुद्ध, आणि अमुक तसा नाहीं म्हणून त्याला आम्ही अशुद्ध म्हणतों, असें त्या वादामध्यें कोणीही म्हटल्याचें आम्हांला आठवत नाहीं. दादोबांनीं, 'त्यानें तिला धरिली' हें शुद्ध किंवा 'धरिलें' हें शुद्ध, या वादामध्येंही बरीच काथ्याकूट केली आहे'; परंतु 'भूरिप्रयोग' हें जें एक शुद्धतेचें मुख्य लक्षण तें कांहीं त्यांना सर्व प्रकारें मान्य होतें, असें स्पष्ट म्हणवत नाहीं. "अहो, व्याकरण म्हणजे शास्त्र होय, आणि भाषा बोलणें ही केवळ व्यावहारिक आणि स्वाभाविक गोष्ट होय, म्हणोन या उभय गोष्टींमध्यें फार अंतर आहे" असें ते म्हणतात; परंतु त्यांचा परस्पर संबंध काय हें कांहीं त्यांनीं स्पष्ट केलेलें नाहीं.

मेजर क्यांडि अधिकारावर असतां त्यांच्या हाताखालून जीं मराठी पुस्तकें गेलीं, त्या सर्वांवर त्यांच्या नेमक्या भाषेचा छाप असेच. त्यांचा एक मोठा कडक सिद्धांत किंवा आग्रह होता, कीं भाषेमध्यें वैकल्पिक प्रयोग म्हणून जितके आहेत, तितके सरकारी पुस्तकांतून हटकून दूर करायाचे. त्यांना* पुढें येऊं द्यावयाचें नाहीं. उदाहरणार्थ तृतीयेचे प्रत्यय नें आणि नीं हे दोनच घ्यायाचे. णें, णीं, हे घ्यावयाचे नाहींत. 'हा' शब्दाच्या विभक्तींमध्यें 'या' हें रूप येऊं द्यायाचें नाहीं. सारांश ह्यानें, ह्यांनीं, असेंच लिहिलें पाहिजे. यानें, याणें किंवा ह्याणें म्हटलें कीं त्यांचें पित्त खवळलें. 'तूं काम केलेंस' हें अशुद्ध, 'त्वां काम केलें' हेंच शुद्ध. 'तिला राणी केली' हें अशुद्ध; 'तिला राणी केलें' हेंच शुद्ध. असे कित्येक प्रकार होते;

टीप—* इंग्रजीमध्यें the safest course (दि सेफेस्ट् कोर्स) म्हणजे बिनधोक मार्ग असें या कृतीला म्हणत असतात; ही कृति क्यांडि साहेबांनीं स्वीकारिली होती, ती काहीं स्वतःच्या व इतर परदेशीय जनांच्या सोईकरितां हें खरें; परंतु शेवटीं तिचा इतका कडक आग्रही प्रकार होऊन गेला, याचें मात्र मोठें आश्चर्य.

आणि त्यांवर त्यांचा इतका कटाक्ष होता कीं, जेव्हां जेव्हां त्यांच्या त्या नेमक्या पद्धतीला अनुसरून लिहिलेलें पुस्तक सरकारचा आश्रय मागायाला येई, तेव्हां तेव्हां त्याला आश्रय अवश्य देण्याविषयीं क्यांडिसाहेबांकडून शिफारस झाल्यावांचून बहुशः राहूं नये. आणि भिन्न प्रकार असतां बहुशः त्याविरुद्ध मत यावयाचेंच. दोन तीन गृहस्थांनीं तर ही खुबी पक्की ध्यानांत आणून तदनुरूप बिनचूक वागण्याचा निश्चय केल्यामुळें, त्यांनीं लिहिलेलें कोणतेंही पुस्तक असो, तें क्यांडिसाहेबांच्या हातीं गेलें कीं पसंत पडलेंच ! त्यांच्या लेखांच्या ठायीं असा मोहकपणा येण्याला आणखी एक दोन कारणें होतीं ही जरी गोष्ट खरी आहे, तरी एकंदरींत पट्टशिष्यत्व स्वीकारणें हें मुख्य कारण होतें यांत संशय नाहीं.

बरें, पण भाषा आणि व्याकरण यांचा खरोखर संबंध काय ? गोडबोले यांनीं एका ठिकाणीं (पृ. १२१ येथें) म्हटलें आहे, कीं " व्याकरण-कर्त्याचें काम, भाषेंतील सर्व चालू प्रकार सांगणें हें आहे, आणि नियम देऊन त्यांप्रमाणें भाषा नीट करूं लागणें हें नाहीं. 'प्रयोगशरणा वैयाकरणाः ' ह्या संस्कृत म्हणीचाही अर्थ हाच आहे. " जरी या लेखाप्रमाणें त्यांनीं सर्वथा वर्तन ठेविलें नाहीं, तथापि हा जो त्यांनीं सिद्धांत दिला आहे तोच खरा. भाषा आणि व्याकरण यांचा संबंध म्हटला म्हणजे वस्तु आणि तिचें चित्र यांच्या संबंधासारखा आहे. कोणेका वस्तूचें चित्र काढायाचें, तर ती वस्तु जशी असेल, तसेंच बिनचूक तें चित्र उठलें पाहिजे. एकाद्याचें नाक वांकडें आहे, तर चित्रांत तसें वांकडेंच नाक आलें पाहिजे; वाईट दिसतें म्हणून तें सारखें करणें अप्रशस्त. त्याप्रमाणेंच भाषेचें खरें स्वरूप जसें असेल, तसें व्याकरणांत दाखविलें पाहिजे. संस्कृत व्याकरण इतकें अवघड होण्याचें कारण तरी हेंच; आणि व्याकरणाचें लक्षण जें संस्कृत वैयाकरणांनीं दिलें आहे, त्यावरून पाहिलें असतांही भाषेच्या स्वरूपामध्यें ढवळाढवळ करण्याचा अधिकार वैयाकरणांनीं आपल्या हातीं ठेविला

नाहीं हेंच उघड दिसतें. असें असतां, हा प्रयोग चांगला दिसतो, हा वाईट दिसतो, अशा प्रकारचा वादविवाद चालवून आग्रही प्रकार चालविण्याचा यत्न करणें ही गोष्ट वैयाकरणांना सर्वथा अयोग्य होय. भाषेंत जर कांहीं दोष दिसले तर ते दूर करण्याचा विचार कोणी करायाचा ? वैयाकरणांनीं नव्हे, पण ती भाषा बोलणारांनीं आणि लिहिणारांनीं. वैयाकरणाचाही समावेश त्या मंडळीमध्यें होऊं शकेल; तथापि त्यानें त्याविषयीं पाहिजे तर स्वतंत्र ग्रंथ लिहावा. व्याकरणग्रंथामध्यें तो विषय केवळ अप्रासंगिक होय. आतां यावरून असा प्रश्न उत्पन्न होईल कीं भाषेचें पूर्ण स्वरूप दाखविणें ही गोष्ट शक्य आहे कीं काय ? मराठीचेंच उदाहरण कां घ्याना ! महाराष्ट्रांतील, प्रत्येक जातीमध्यें, आणि प्रत्येक दहाबारा कोशांवरील भाषेमध्यें कांहीं ना कांहीं भेद आहेच, तेव्हां आतां मराठी व्याकरणकर्त्यानें हे सर्व प्रकार आपल्या ग्रंथामध्यें दाखविले पाहिजेत कीं काय ? हा प्रश्न प्रथमतः मोठा अवघड दिसतो; परंतु याचें उत्तर फार सोपें आहे. तें असें—

आपण असा प्रश्न करूं—मराठी भाषेचे हे जे अनेक प्रकार, ते सगळे सर्वसंमत आहेत, किंवा त्यांतील एकादाच सर्वसंमत आहे, किंवा एकाहून अधिक सर्वसंमत आहेत, किंवा मुळींच कोणताही सर्वसंमत नाहीं ? याचें उत्तर बहुशः असेंच येईल कीं, मराठी भाषेचा सर्वसंमत प्रकार म्हणून एक प्रसिद्ध आहे, आणि प्रायः सर्व मराठी लोकांच्या लेखांमध्यें तोच आणण्याचा प्रयत्न असतो. असें जर आहे, तर तोच जो प्रकार, त्याचें जें चित्र तें मराठी व्याकरण. कित्येक शब्द आणि प्रयोग असे असतात कीं, जरी ते सर्व लोकांस संमत नसले, तरी बहुतेकांच्या व्यवहारांत तरी त्यांचा प्रयोग प्रशस्त रीतीनें होतो. असे जे प्रकार त्यांचाही व्याकरणामध्यें समावेश करणें अवश्य आहे; परंतु त्यांच्या मान्यामान्यतेची जी खरी स्थिति तिचाही उल्लेख झाला पाहिजे. मराठीचें जें सर्वमान्य स्वरूप म्हणून आपण

म्हणतों, तें कोणतें, व तें कोठें आढळेल ? असा प्रश्न होणें साहजिक आहे. याचें उत्तर असें—

मराठी भाषेचें जें स्वरूप मुख्यत्वें पुणें प्रांतीं आढळतें तें तिचें शुद्ध स्वरूप अशी सर्वसंमत गोष्ट आहे. पण येथेंही फार जपून अर्थ घेतला पाहिजे. म्हणजे—पुण्यांतील कोणीही मनुष्य बोलेल, ती शुद्ध भाषा असें समजायाचें नाहीं. तर महाराष्ट्र लोकांच्या बोलण्यामध्यें आणि लेखांमध्यें यावयाचा म्हणून, पुणेकरांच्या आणि इतर महाराष्ट्रजनांच्या दीर्घकालीन साहजिक संमतानें ठरलेला जो एक प्रकार तोच शुद्ध समजायाचा. तर मग यांत पुण्याचेंच इतकें महत्त्व कशासाठीं ? मुंबई किंवा सातारा किंवा रत्नागिरी किंवा नाशीक एथील लोकांची भाषा काय अशुद्ध ?—तर असें नव्हे. मुंबई इत्यादि स्थळीं जे शुद्ध बोलणारे आणि लिहिणारे लोक आहेत, त्यांची भाषा शुद्धच आहे, अशुद्ध नव्हे. आणि पुण्यामध्यें जे अशुद्ध बोलणारे आणि लिहिणारे आहेत त्यांची भाषा अशुद्धच आहे, ती शुद्ध ठरत नाहीं. तथापि सामान्येंकरून पुणें प्रांतींची भाषा म्हणजे सर्व महाराष्ट्राची भाषा असें मानण्याला योग्य कारणें झालीं आहेंत, ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. आतां तीं कारणें कोणतीं, याचा थोडासा उल्लेख करूं.

जे लोक राजकार्यधुरीण असतात, त्यांच्या कृतींचें, रीतिभातींचें, आणि भाषेचें अनुकरण करण्यामध्यें मोठी प्रतिष्ठा आहे असें प्रायः सर्व लोक स्वाभाविकपणें समजत असतात; हें एक कारण, आणि दुसरें कारण असें आहे कीं,

स्वराज्याचें मुख्य स्थान म्हणजे राजधानी जी असते ती स्वभावतः राज्यरूपी विस्ताराचें मध्यस्थान होते. तेथें राजकीय संबंधांच्या निमित्तानें चोहोंकडून नानाप्रकारच्या लोकांचें येणेंजाणें घडूं लागतें; गुणांची परीक्षा होत असल्यामुळें अनेक गुणवान् लोक येतात; वैदिक, शास्त्री, हरिदास, पुराणीक, वकील, कारकून इत्यादिकांचा संग्रह होत जातो. लोकव्यवहार,

वादविवाद, सभा, उत्साह, समारंभ, पुराणश्रवण, कीर्तनें, दरबार, नाटकें वगैरे प्रसंग वारंवार घडतात. तंटेबखेडे, तमासे, शिव्यागाळी, यांपासूनही भाषेच्या शैलीवर एक प्रकारचा ठसा उठतो. सारांश सर्व प्रकारच्या लोकांचें तशा स्थळीं संघट्टन होऊन तेथील भाषेला कांहीं विशेष प्रकारचें वळण लागून जातें. दरबारी व इतर कागदपत्रांमध्यें आणि ग्रंथांमध्येंही त्याच भाषेची योजना होत जाऊन तिला दिवसेंदिवस स्थिरता येते. कालें-करून इतर व्यवहारांमध्यें नागरिक जनांच्या संसर्गानें नागरिकतेचीं म्हणजे सभ्यतेचीं लक्षणें जशीं वाढत जातात, तशींच भाषेमध्येंही वाढत जातात. कर्णकटु किंवा कर्कश उच्चार, आणि हेल काढून सुरावर बोलणें, इत्यादि वेडगळ प्रकार निघून जाऊन त्यांच्या स्थानीं प्रौढ, सभ्य आणि गोड प्रकार येतात. म्हणून ज्या ठिकाणीं, वर सांगितलेल्या प्रकारांची अनुकूलता उत्तम असेल, तेथील भाषा क्रमशः उत्तम स्थिति पावत जाईल हें उघड आहे. आणि ज्या ठिकाणीं त्या अनुकूलतेमध्यें न्यून पडत जाईल, त्या ठिकाणचीं भाषा तितकी परिपक्वतेपासून दूर पडत जाईल हेंही उघड आहे. पुणें हें शहर स्वराज्याच्या कालीं बरींच वर्षें महाराष्ट्राची मुख्य राजधानी होतें. यामुळें तेथें मराठीच्या पक्वतेला आणि स्थिरतेला लागणारी वर सांगितल्या प्रकारची सर्व अनुकूलता होती. आणि या सर्व कारणांमुळें तेथील भाषा श्रेष्ठ आणि अनुकरणीय, असें महाराष्ट्रांतील इतर जनांस वाटूं लागलें हें साहजिक होय. यामुळें पुण्याच्या भाषेचें महत्त्व वाढलें हें ठीकच आहे. पुण्यापासून जसजसें कोणत्याही दिशेला दूर दूर जात जावें, तसतसा निर-निराळ्या अनेक भाषांचा अथवा एकाच भाषेंतील भिन्नभिन्न प्रकारांचा तिच्याशीं अधिकाधिक संपर्क झालेला दृष्टीस पडतो. आणि त्या संपर्कामुळें मराठी भाषेच्या मुख्य प्रदेशीं सांपडणाऱ्या स्वरूपामध्यें अंतर पडत जातें आणि या रूपामध्यें ही गोष्ट जो कोणी लक्ष देऊन पाहील, त्याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. भाषेचा जो प्रकार पुण्यासारख्या स्थळीं

बहारप्रांतीं, गंगातीरीं चंद्रगुप्त राजाची 'पाटलीपुत्र' नांवाची जी नगरी 'पाटना' नामेंकरून सांप्रत प्रसिद्ध आहे, तें मराठी भाषेचें मूळस्थान म्हणावें लागतें. हा काळ दोन हजार वर्षांच्या पलीकडे जातो. याप्रमाणें पाहतां 'पाटलीपुत्र,' 'उज्जयिनी,' 'प्रतिष्ठान,' यांच्या पाठीमागून भोजराजाची 'धारा नगरी'; नंतर 'विदर्भ' म्हणजे 'वऱ्हाड'; पुढें यादवांची 'देवगिरि'; तेथून शाहू छत्रपतीचा सातारा, आणि शेवटीं पेशव्यांचें पुणें; अशी परंपरा लागत जाते. पुण्याहूनही राज्यक्रांति झाली आहे, तेव्हां आतां, पुण्याचें नांव राहणें किंवा मागें पडणें, हें जसा योगायोग असेल तसें घडेल, त्याविषयीं विशेष बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

तथापि पूर्वी झालेल्या सर्व राज्यक्रांतींपेक्षां सांप्रतच्या राज्यक्रांतीपासून आमच्या भाषेवर जो परिणाम होत आहे, तो कांहीं वेगळ्या प्रकारचा आहे. पूर्वीच्या सर्व राज्यक्रांती देशांतल्या देशांत होत होत्या, असें म्हटल्यास फारसा बाध येणार नाहीं. त्यामुळें मराठी भाषेवर परभाषांचा संस्कार फारसा झाला नव्हता. फारसी भाषेंतील कांहीं शब्द मिसळले असतील तेवढेच. परंतु सध्यांचा प्रकार कांहीं वेगळा आहे. दिवसेंदिवस इंग्रेजी भाषेचा समागम सर्व भरतखंडीय लोकांना विशेष होत चालला आहे; यामुळें त्या भाषेचा बळकट छाप दिवसेंदिवस देशी भाषांवर बसत आहे. यामुळें देशी भाषांच्या स्वरूपांमध्यें क्रमेंकरून फरक पडत चालला आहे. ही गोष्ट अशी व्हावयाचीच, आणि अशी झाली म्हणून, मराठी भाषा छिन्नविच्छिन्न होईल असेंही नाहीं. कदाचित् तिजमध्यें यंत्रकलासंबंधी व लौकिक शास्त्रसंबंधी पुष्कळ इंग्लिश शब्दांचा संग्रह होईल, व कालेंकरून ते शब्द मराठीच बनून जातील, आणि तितकी मराठीला बळकटी येईल. अथवा असेंही होण्याचा संभव आहे कीं नवीन नवीन अर्थाचे संस्कृत अथवा देशी शब्द विद्वान् लोकांच्या प्रयत्नानें मराठींत वाढत जातील. किंवा हे दोन्ही प्रकार चालू राहून त्यांपासून मराठीला तितकी दुहेरी बळकटी येत

जाईल. दुसरी एक कित्येक लोकांची कल्पना आहे कीं सर्व देशी भाषा मोडून जाऊन इंग्रजी भाषाच या देशीं चालू होईल. परंतु या कल्पनेंत कांहीं अर्थ आहे, असें आम्हांला वाटत नाहीं, आणि या आमच्या मताप्रमाणेंच पुष्कळ लोकांचें हल्लीं मत होत चाललें आहे असें दृष्टीस पडतें. कदाचित् सर्व देशी भाषा नष्ट होऊन, इंग्रजी भाषा हीच देशी भाषा होण्याचा संभव असलाच तर तो प्रसंग सध्यां तरी नाहीं. ज्या वेळेस सर्व देशी लोक इंग्रज बनतील, किंवा इंग्रज लोक देशी बनतील, तेव्हांच त्या कल्पनेला कांहीं आधार. परंतु आम्हांस त्या स्थितीची इच्छाही नाहीं, आणि तिचा समीप संभवही तादृश वाटत नाहीं. त्या पक्षीं, जोंपर्यंत आम्ही मराठी लोक असें आपणांस म्हणवितों, तोंपर्यंत आमच्या मराठी भाषेला आम्ही संभाळून राहावें हें आमचें कर्तव्य आहे. आणि या कृत्याला सांप्रत एक मोठें उत्तम साधन आम्हांला ईश्वरकृपेनें प्राप्त झालें आहे. असें साधन पूर्वकालीं कधींही आमच्या देशीं प्राप्त झालें नव्हतें. तें साधन छापी पुस्तकें आणि वर्तमानपत्रें. भाषेला दिवसेंदिवस अधिकाधिक स्थिरता येण्याला हीं दोन मोठीं साधनें आहेत. हीं जसजशीं वाढत जातील, तसतशी भाषेला अधिक बळकटी येत जाईल; आणि सर्व देशभर आपल्या भाषेचीं जीं निरनिराळीं शुद्धाशुद्ध अनेक रूपें आहेत, तीं एणेंकरून हळूहळू एका झोंकावर येत जाऊन कांहीं काळानंतर सर्वत्र एकाच प्रकारची शुद्ध भाषा चालू होईल, असें मानण्याला मोठा आधार आहे. परंत हें सर्व कालगतीच्या आधीन आहे. यामुळें जो प्रकार होईल तो भविष्यत्कालीन लोकांना मात्र दिसणारा आहे.

असो. आतां पूर्व विषयाकडे वळूं. व्याकरणाचें लक्षण सांगतांना, “ सुशिक्षित लोक कोणचीही भाषा कोणच्या रीतीनें बोलतात, किंवा लिहितात हें ज्या शास्त्रांत सांगितलें असतें त्यास त्या भाषेचें **व्याकरण** असें म्हणतात.” असें जोशीबोवांनीं म्हटलें आहे. परंतु व्याकरणाशीं लोकांचें

सुशिक्षितत्त्व किंवा अशिक्षितत्व यांचा कांहीं संबंध नाहीं. जरी प्रायः सुशिक्षित लोकांच्या भाषेमध्येंच व्याकरणग्रंथ आढळतात, तरी अशिक्षित लोकांच्या भाषेला व्याकरण नसतें असें समजणें, हें सर्वथा अप्रशस्त होईल. लोकांची स्थिति कितीही अशिक्षित असो, त्यांच्या भाषेला व्याकरण म्हणून आहेच. तें लिहिलेलें नसलें म्हणून काय झालें ? कोणत्याही अशिक्षित किंवा रानटी लोकांच्या भाषेचें व्याकरण लिहिण्याचा जर कोणी प्रयत्न केला, तर तो सिद्धीस जाण्याला शक्य आहे; आणि याप्रमाणें पुष्कळ अशिक्षित व रानटी भाषांचीं व्याकरणें आणि कोश विद्वान् लोकांनीं लिहिले आहेत. आपल्या मराठी भाषेची माता अशी जी प्राचीन महाराष्ट्री भाषा, आणि तिच्याच भगिनी ज्या मागधी, पैशाची इत्यादि भाषा, त्या अशिक्षित लोकांच्या भाषा होत्या. परंतु वररुच्यादि पंडितांनीं त्यांचीं उत्तम व्याकरणें लिहून ठेविलीं आहेत, हें जोशीबोवांना ठाऊक नसेल तर मोठेंच आश्चर्य. अर्थात् हें जोशीबोवांनीं दिलेलें व्याकरणाचें लक्षण प्रशस्त नाहीं असें म्हणणें प्राप्त होतें.

'भाषा' शब्दाची व्याख्याही उगीच बिकट केली आहे.

भाषा म्हणजे बोलणें हें सर्वांस ठाऊक आहे, म्हणून त्या शब्दाच्या व्याख्येचें कांहीं फारसें प्रयोजन नव्हतें. तथापि व्याकरणाच्या स्पष्टीकरणास्तव जर ती व्याख्या द्यावयाचीच, तर त्या शब्दापेक्षां अधिक गूढ असा जो 'शास्त्र' शब्द त्यांनीं व्याकरण शब्दाच्या व्याख्येंत योजिला आहे, त्याची व्याख्या आधीं दिली पाहिजे होती. परंतु त्याला अचानक सोडून देऊन भाषेवरच फार कटाक्ष धरलेला दृष्टीस पडतो. जोशीबोवा म्हणतात—

"मनुष्यें आपल्या मनांतील भाव एकमेकांस शब्दघटित उद्गारांचे योगानें समजावितात. या उद्गारांस भाषा म्हणतात." दादोबांनीं दिलेलें लक्षणही तसेंच—"भाषा म्हणजे मनुष्यांस व्यवहारांत परस्परांचे मनोभाव समजावे म्हणोन परंपरागत शब्दांचें अवलंबन करून मुखानें जें बोलतात तें होय."

'शब्दघटित उद्गार' म्हणजे शब्दच कीं नाहीं? कीं दुसरें कांहीं आहे? तसेंच 'परंपरागत शब्दांचें अवलंबन' 'मुखानें बोलणें' इत्यादि लक्षणांचें प्रयोजन काय? शब्द परंपरागत असो, किंवा नवीनच संकेतित असो, बोलणाराला आणि ऐकणाराला, त्याचा अर्थ स्पष्ट असला म्हणजे झालें. ती भाषा झाली. नुसतें 'बोलणें' यापेक्षां 'मुखानें बोलणें' यांत अधिक तें काय? कोणी मनुष्य कानानें बोलण्यास समर्थ असला, किंवा ही एक गोष्ट अशक्य म्हणून हवी तर सोडा, पण कांहीं यंत्रानें बोलण्यास समर्थ असला, तर त्याच्या त्या बोलण्यास 'भाषा' हा शब्द लागणार नाहीं, असें नाहीं; अवश्य लागेल. व्याख्येमध्यें शब्दांचें आडंबर करून उगाच गोंधळ घालणें हें अयोग्य. व्याख्येय पदार्थाचें लक्षण सांगण्याला अवश्य तितकेच शब्द योजले पाहिजेत. अधिकही नसावेत, आणि उणेही नसावेत; आणि योजले तेही सर्व स्पष्टार्थक असावेत. म्हणून 'भाषा' शब्दाची व्याख्या करायाचीच असल्यास ती अशी किंवा अशासारखी कांहींशी होईल—

"परस्परांचें मनोगत परस्परांस स्पष्ट कळविण्याकरितां केलेली संकेतित शब्दांची जी व्यवस्था ती भाषा."

आतां ज्या लोकांची जी भाषा असेल तिला त्या लोकांवरून कांहीं तरी नांव पडतें किंवा ती नवीनच रचलेली असल्यास तिला कांहीं सोईचें नवीन नांव दिलें जातें, आणि त्या त्या लोकांच्या विस्ताराप्रमाणें त्या भाषेचा विस्तारही अधिकउणा होतो.

व्याकरणामध्यें पशुपक्ष्यादिकांची जी कांहीं केवळ मुद्रामूलक भाषा असेल तिचा समावेश होत नाहीं, याचें कारण उघड आहे.

शास्त्र म्हणजे व्यवस्था, मग ती मूळची गूढ स्थितींत असून कोणी तरी नंतर प्रकट केलेली असो, किंवा कोणी तरी नवी लावून दिलेली असो.

आतां 'महाराष्ट्र भाषा' आणि 'मराठी भाषा' या शब्दांची उत्पत्ति आणि खरा अर्थ काय, इत्यादि कित्येक प्रश्नांचा विचार करणें हें विषयानुक्रमानें

प्राप्त होतें; परंतु महाराष्ट्र किंवा मराठी म्हणून जी प्रसिद्ध भाषा आहे तीच महाराष्ट्री किंवा मराठी भाषा, इतकेंच सध्यां पुरे आहे. कारण कीं हा विषय मोठा वादग्रस्त झालेला आहे, आणि याच्या निर्णयावर म्हणजे व्याकरणाची अंतर्गत व्यवस्था फारशी अवलंबून राहिली आहे असेंही नाहीं. म्हणून याची वाटाघाट सध्यां न करितां पुढें योग्य प्रसंगीं विचार करण्याकरितां हा विषय ठेवून द्यावा, हेंच प्रशस्त दिसतें.

असो. याप्रमाणें व्याकरणाच्या संबंधानें उपोद्घातरूप जे कांहीं विचार सुचले ते येथें प्रदर्शित केले. आतां व्याकरणाचे विभाग काय काय असावे, आणि त्यांची व्यवस्था कसकशी करावी, या गोष्टींकडे यापुढें लक्ष देऊं.

जून १८८९, पुस्तक २१, अंक ६

मराठी व्याकरणावर विचार

निबंध २ रा.

व्याकरणाचे विभाग

व्याकरणाचे विभाग दादोबांनीं वर्णविचार, शब्दविचार आणि वाक्य-रचना, असे तीन केले आहेत. कितीकांनीं शब्दविचार आणि वाक्यरचना असे दोनच केले आहेत. विभाग दोनच करावे, किंवा तीन करावे, याविषयीं आमचा मोठासा आग्रह नाहीं; तथापि त्या विभागांमध्यें 'शब्दविचार' असा जो विभाग केला आहे, त्याच्या नांवाविषयीं आम्हांला मोठी अडचण वाटते. याविषयीं पुढें आम्हीं विशेष लिहिणार आहों. दुसरी गोष्ट. इंग्रजी व्याकरणामध्यें 'Word वर्ड्' अशी जी संज्ञा आहे, तिचें भाषांतर करून मराठीमध्यें 'शब्द' ही संज्ञा सरसकट घेतली असावी असें दिसतें. परंतु हें योग्य नव्हे. इंग्रेजीमध्यें मूळशब्द आणि विभक्त्यंत शब्द या

दोहोंलाही 'वर्ड' ही संज्ञा चालते; परंतु मराठीमध्यें संस्कृताच्या आधारानें 'शब्द' आणि 'पद' अशा दोन भिन्न भिन्न संज्ञा फार उत्तम असतां, पद आणि शब्द, यांमध्यें अभेद मानून, अथवा सर्वथा 'पद' संज्ञेचा तिरस्कार करून 'शब्द' संज्ञाच सर्वत्र योजल्यामुळें उगाच गोंधळ झाला आहे. याविषयींही पुढें विशेष लिहिणार आहों.

या प्रकरणाच्या आरंभीं वर्णविचार लिहिण्याचा संप्रदाय आहे, तो वेगळा काढला, किंवा आहे तेथेंच ठेविला तरी बाध नाहीं.

'वर्ण' याला इंग्लिश शब्द "Letter लेटर्." परंतु लेटर शब्दाचें जें लक्षण, तें 'वर्ण' शब्दाला लावणें नीट नाहीं. मराठी व्याकरणामध्यें 'वर्ण' म्हणजे भाषेला आधारभूत जे स्पष्ट मूलध्वनि ते, असा मूळचा अर्थ; आणि त्याच्या अनुषंगानें, त्यांचीं दर्शक जीं लिखित चिन्हें त्यांनाही वर्ण म्हणतात. पण इंग्रजीमध्यें तसें नाहीं. त्या चिन्हांनाच मुख्यत्वें 'लेटर' म्हणतात. हा भेद लक्षांत न आणितां, जोशीबोवांनीं इंग्लिश रीतीनें वर्ण शब्दाचें लक्षण दिलें आहे, तें असें—

"भाषेचें मूळ ध्वनी आहेत; हे ध्वनी ज्या चिन्हांनीं दाखवितात, त्यांस वर्ण असें म्हणतात." (पृष्ठ १). यांत चिन्हांलाच वर्णत्व दिलें आहे, हें योग्य नाहीं. यांत पुनः वाक्यरचना चमत्कारिक आहे. 'भाषेचें मूळ ध्वनी आहेत,' यांत कर्तृपद कोणतें, याची भ्रांति उत्पन्न होते. 'मूळ' हें कर्तृपद मानावें, तर 'आहेत' हें क्रियापद अनेकवचनीं असल्यामुळें त्याला जुळत नाहीं. 'ध्वनी' कर्ता मानावा, तर वाक्यारंभीं तो नाहीं. कोणीकडूनही पाहिलें, तरी वाक्य फार बोजड दिसतें. गोडबोल्यांनींही हेंच वाक्य योजिलें होतें; पण या वाक्याचा अर्थ स्पष्ट होत नाहीं. या कर्तृपदाच्या संबंधानें, संस्कृत वाक्यरचनेची पद्धति पाहतां, "गुणाः पूजास्थानं अस्ति" हें वाक्य अशुद्ध आहे. एथें उद्देश्यरूपकर्त्याला अनुसरूनच क्रियापद असलें पाहिजे. (आपटेकृत संस्कृत वाक्यरचना, द्वितीयावृत्ति, पृ० ६ पाहावें)

मराठींतही, " इंग्रजी भाषा आजकाल उदरनिर्वाहाचें साधन झाली आहे," इत्यादि प्रकारची योजना प्रत्यक्ष आहे. जर पुढील शब्दाप्रमाणें क्रियापद पाहिजे, तर तेथें हा, ही, हें यांतून एकादें दर्शक सर्वनाम योजलें पाहिजे. जसें, "इंग्रजी भाषा हें आजकाल उदरनिर्वाहाचें साधन झालें आहे." इ.

वर्णाचे भेद दोन, स्वर आणि व्यंजनें. त्यांत 'ज्या वर्णांचा स्वतंत्रपणें पूर्ण उच्चार होतो ते स्वर.' आणि 'ज्या वर्णांचा उच्चार पूर्ण होण्यास स्वराचें साह्य घ्यावें लागतें तीं व्यंजनें.' हीं लक्षणें कशीं तरी चालतील; पण, " व्यंजनास स्वतंत्र उच्चार आहेत. परंतु त्यांत स्वर मिळाल्याखेरीज त्यांचा उच्चार तोंडाबाहेर येत नाहीं," हा लेख पाहून चमत्कार वाटतो. 'थीबा राजा स्वतंत्र आहे, पण इंग्लिश सरकारच्या परवानगीवांचून त्याला बाहेर फिरतां येत नाहीं." अशासारखेंच हें वाक्य आहे.

ले० ७. ऱ्हस्वस्वर, दीर्घस्वर, आणि संयुक्तस्वर, यांचीं लक्षणें जोशीबोवांनीं मुळींच दिलेलीं नाहींत. आणि त्यांच्या लेखावरून संयुक्तस्वर हे ऱ्हस्व आणि दीर्घ यांच्या बाहेरचे आहेत, अशी शंका येते. परंतु तेही दीर्घच आहेत, हें त्यांनीं सांगितलें पाहिजे होतें. ऱ्हस्व म्हणजे तोकडा, दीर्घ म्हणजे लांब आणि संयुक्त म्हणजे मिश्रित, हें सांगितलें पाहिजे होतें, आणि हे कसे मिश्रित आहेत याचा उलगडा संधिप्रकरणीं होईल, असेंही कळविलें पाहिजे होतें. ऱ्हस्व आणि दीर्घ यांचें मान स्पष्ट सांगितलेलें नाहीं. ऱ्हस्वाच्या दुप्पट दीर्घ म्हटल्यानें निर्णय होत नाहीं. कां कीं, ऱ्हस्वाचेंच आधीं मान ठाऊक नाहीं. कु कू कू ३ असे जे कोंबड्याच्या अरवण्यामध्यें तीन शब्द होतात, त्यांत दिसणारे उ ऊ ऊ ३ हे तीन स्वर क्रमें करून ऱ्हस्व दीर्घ आणि प्लुत (म्ह० फार दीर्घ) यांचें बिनचूक प्रमाण दाखवितात, असें संस्कृत व्याकरणांत स्पष्ट सांगितलें आहे, आणि हेंच प्रमाण आमचे मराठी वैयाकरण स्वीकारते तर चांगलें होतें.

ले० ९. अंतःस्थवर्ण आणि ऊष्मवर्ण या शब्दांचा अर्थ काय ? हें सांगितलें पाहिजे होतें. ‘ अंतःस्थ ’ म्हणजे संस्कृत वर्णमालेमध्यें स्वर आणि वर्गीय यांच्यामध्यें सांगितलेले आणि ‘ ऊष्म ’ म्हणजे उष्णता उत्पन्न करणारे अर्थात् प्रखर उच्चाराचे. अंतःस्थास जोशीबोवांनीं दिलेली ‘ अर्धस्वर ’ ही संज्ञा इंग्रजींतील ‘ Semivowel सेमीव्हॉवेल् ’ या शब्दाचें भाषांतर आहे.

ले० १०. ‘ ङ् ’ हें व्यंजन शुद्ध मराठी शब्दांत येत नाहीं असें जोशीबोवांचें म्हणणें; परंतु ‘ ढंग ’ ‘ पांगारा ’ यांत ङ् आहे. भेद इतकाच कीं तो बिंदुरूपानें लिहितात.

‘ ळ् ’ हें व्यंजन फक्त मराठींतच येतें. यांत ‘ फक्त ’ आणि ‘ च ’ या दोहोंपासून विशेष अर्थ कोणता ? तें असो. पण ‘ ळ ’ हें अक्षर मराठीशिवाय इतर भाषांत आहे. वेदांमध्यें आहे, कानडींत आहे, तेलंगी, मद्रासी, गुजराती, इत्यादि अनेक भाषांत आहे.

ले० १२. “पुष्कळ वेळा (?) एकापेक्षां अधिक व्यंजनें एकत्र मिळून मग त्यांत स्वर मिळतो, त्यांस जोडाक्षरें किंवा संयुक्त व्यंजनें असें म्हणतात; उदा० क्त, प्र, र्ग, क्ष, म्न, ध्म, ट्र, इ०.” पण जोडाक्षरें तींच संयुक्त व्यंजनें काय ? क्त, प्र, इ० संयुक्त व्यंजनें आहेत, असें नवीनच समजतें !

ले० १३. यांत कठोर आणि मृदु असे व्यंजनांचे भेद केले आहेत. पण हीं इंग्रजींतील Hard हार्ड आणि Soft सॉफ्ट यांचीं भाषांतरें होत. यांना संस्कृत व्याकरणांतील फार उत्तम संज्ञा अनुक्रमानें श्वासवर्ण आणि नादवर्ण या आयत्या होत्या. पण त्यांकडे लक्ष दिलें असतें तर.

ले० १५. “ पांच वर्गांतील शेवटलीं व्यंजनें, ज्यांचा उच्चार नाकांतून होतो, त्यांस अनुनासिक व्यंजनें म्हणतात.” यांत ‘ ज्यांचा ’ हा इंग्लिश प्रकार सोडून तेथें ‘यांचा’ असें घातलें असतें तर बरें होतें. अशींच वाक्यें अनेक ठिकाणीं आलीं आहेत. पाहा.

लें० ३७- " एक किंवा अनेक वर्णांचा समुदाय, ज्यापासून कांहीं अर्थ समजतो, त्यास शब्द असें म्हणतात. " लें० ९४. " सर्व ऱ्हस्व इकारांत नामें, ज्यांचा स्वर दीर्घ होतो. " इ०

लें० १९. " त्यांच्या (म्ह० अनुनासिक व्यंजनांच्या) उच्चाराचा संक्षेप दाखविण्याकरितां (ं) या चिन्हाची योजना करितात, त्यास अनुस्वार म्हणतात. उदा० कां, तूं, तळें, तंटा, पंडित, इ०. " एथें कां, तूं, तळें यांत तर अनुस्वार मुळींच नाहीं. असा अनुनासिक आणि अनुस्वार यांचा गोंधळ उपयोगी नाहीं. अनुनासिक स्वर वेगळे न सांगितल्यामुळें हा गोंधळ उत्पन्न झाला आहे. ' अनुस्वार ' हें एक वेगळें व्यंजनच आहे असें मानण्यास बाध नाहीं. परंतु ' अनुनासिक ' यामध्यें तसा कांहीं प्रकार नाहीं. ङ् ञ् ण् न् म् हीं व्यंजनें अनुनासिक होत. त्यांमध्यें अनुनासिकत्व (म्हणजे नाकाच्या साहाय्यानें उच्चार होणें हा एक धर्म) आहे. परंतु त्या धर्माला वेगळें व्यंजन म्हणतां येणार नाहीं. तोच धर्म कोणत्याहि स्वरांमध्यें पाहिजे तर आणतां येतो; आणि जेव्हां तो धर्म एकाद्या स्वरामध्यें आणिलेला असतो, तेव्हां त्या स्वराला ' अनुनासिक ' ही संज्ञा लागते. मराठी शब्दांमध्यें अक्षरावर जो बिंदु येतो, त्याला सरसकट ' अनुस्वार ' किंवा सरसकट ' अनुनासिक ' संज्ञा लावतां येणार नाहीं. यासाठीं त्याला ' बिंदु ' हीच संज्ञा चांगली आहे. संयोग, संरक्षण, संलाप, संवाद, अंश, कंस, सिंह, या शब्दामध्यें शुद्ध अनुस्वार दाखविण्याकरितांच हा बिंदु लिहिलेला असतो. शंका, पंच, दंड, अंत, रंभा, यांमध्यें क्रमेंकरून ङ्, ञ्, ण्, न्, म्, या व्यंजनांच्या स्थानीं बिंदु योजिले आहेत; आणि कां, कोठें, नांव, गांव, आलों, इत्यादि शब्दांमध्यें स्वरांचें अनुनासिकत्व दाखविण्यास्तवच बिंदु योजिले आहेत. अशी ही बिंदूची तीन प्रकारची योजना स्पष्ट केली पाहिजे. उगाच गोंधळ कामाचा नाहीं. अनुनासिकत्व हा धर्म स्पष्ट दाखवायाचा

असतां, नुसता बिंदु न देतां, ँ असा अर्धचंद्रयुक्त बिंदु देतात ही सांगितलें पाहिजे होतें. परंतु अशी कांहींच व्यवस्था न केल्यामुळें, अनुस्वाराचा उच्चार कोठें 'केवळ नाकांतून होतो,' अशा प्रकारचे विलक्षण लेख आले आहेत.

ले० २१. विसर्गाला सकारयुक्त किंवा हकारयुक्त उच्चार म्हटलें आहे. परंतु तेथें 'अर्धसकारसदृश' म्हणजे अर्धसकारासारखा असें पाहिजे होतें.

ले० २२. "वर्णमालेंतील वर्णांचे उच्चार मुखाच्या निरनिराळ्या भागांत (?) उत्पन्न होतात." वर्णमाला म्हणजे काय हें सांगितलें नाहीं. वर्णमालेबाहेर आणखी कोणते वर्ण राहिले ?

येथेंच खालीं टीप देऊन म्हटलें आहे कीं, "मराठी भाषेंत च् छ् इ० वर्णांचा उच्चार दोन प्रकारचा होतो." परंतु च् ज् झ् यांचा मात्र दोन प्रकारचा उच्चार आहे, छचा नाहीं. मुखाच्या निरनिराळ्या भागांपासून वर्णांची उत्पत्ति कसकशी होते हें सांगण्यास संस्कृत व्याकरणाचें फार उत्तम साधन होतें, पण याकडे कोणीही लक्ष दिलें नाहीं. आम्हीं एथें तें सांगत बसण्यापेक्षां सिद्धांतकौमुदीचा हवाला द्यावा हें बरें वाटतें.

'कंठौष्ठस्थान,' आणि 'दंतौष्ठस्थान' यांच्या स्थळीं सोप्या उच्चाराचे 'कंठोष्ठस्थान' आणि 'दंतोष्ठस्थान' असे शब्द घातले असते, तर अयोग्य झालें नसतें.

संधि

हें संधिप्रकरण, निदान संस्कृत संधिप्रकरण तरी, मराठी व्याकरणाच्या आरंभीं घालण्यापासून कांहीं लाभ नाहीं, शिकणारांना त्रास मात्र उत्पन्न होतो, ही गोष्ट आमच्या वैयाकरणांच्या ध्यानांत अद्यापि कशी भरत नाहीं, कोण जाणें ?

सर्व ऱ्हस्व इकारांत आणि ऱ्हस्व उकारांत संस्कृत शब्द जोशीबोवांनीं दीर्घान्त लिहिण्याची रीति घातली आहे. परंतु ती मान्य करण्याधासून लाभापेक्षां हानि विशेष आहे असें आम्हांस वाटतें. याचें कारण पुढें विभक्तिप्रकरणीं स्पष्ट करूं. सध्यां त्यांनीं लिहिलेला ' संधी ' हा शब्द आमच्या लेखांत तरी ' संधि ' असाच चालू पद्धतीला अनुसरून आम्हीं लिहितो.

ले० २३ " दोन वर्ण एका जागीं आले असतां त्या दोहोंच्या जागीं दोहोंपैकीं एक किंवा अगदीं निराळाच वर्ण येतो, त्यास ' संधी ' असें म्हणतात. " परंतु हें लक्षण योग्य नाहीं.

दोन वर्ण एका जागीं कसे येतील ? एथें ते परस्परांच्या समीप येतील असा लिहिण्याचा अर्थ असावा; परंतु तो स्पष्ट करायाचा होता. ' संधि ' शब्दाचें लक्षण संस्कृतांत स्पष्ट आहे. ' परः संनिकर्षः संहिता । ' म्हणजे, मध्यें अवसान न घेतां वर्णांचा उच्चार करणें याचें नांव संधि; आणि या संधीच्या निमित्तानें त्या वर्णांला जे कांहीं विकार होतात त्यांचें नांव संधिकार्य. वस्तुतः बाराखड्या आणि जोडाक्षरें हेही संधिच आहेत. परंतु यांमध्यें कांहीं विशेष कार्य घडत नसल्यामुळें ते या प्रकरणांत सांगितले नसतात, इतकेंच. समासादि कारणांमुळें भिन्न पदांचें सान्निध्य जेथें घडतें तेथें प्रायः कांहीं तरी विशेष प्रकार घडत असतो, म्हणून तितक्यापुर्ताच त्यांत संग्रह केलेला असतो. तथापि याहून भिन्नप्रसंगीं, म्हणजे एकाच पदांतील वर्णांमध्यें, प्रत्ययादिकांच्या निमित्तानें किंवा कांहीं भिन्नकारणानेंहीं जीं कार्यें होतात, तींही संधि प्रकरणांत येतातच. म्हणून ' संधि ' शब्दाचें लक्षण सांगतांना या सर्व गोष्टी अवश्य ध्यानांत ठेविल्या पाहिजेत.

" संधी संस्कृत शब्दांत मात्र होतात, व केव्हां केव्हां शुद्ध मराठी शब्दांतही संधी होतात. " असें जोशीबुवांनीं म्हटलें आहे. परंतु जर संस्कृत शब्दांत मात्र संधि होतात, तर मराठी शद्बांतही ते कसे आले ?

ले० २४. 'दोन स्वर एकत्र आले असतां जो संधी होतो तो स्वरसंधी.' ही व्याख्या ठीक आहे. परंतु 'दोन व्यंजनें एकत्र येऊन जो संधी होतो तो व्यंजनसंधी,' असें म्हटलें आहे, तेथें मात्र अडचण येतें. 'जगत् आधार' यांचा संधि 'जगदाधार' असा झाला; हा व्यंजनसंधि खरा. पण एक व्यंजन आणि त्यापुढें एक स्वर यांचा येथें संधि आहे. दोन्हीं व्यंजनें नाहींत. म्हणून व्यंजनापुढें दुसरें व्यंजन किंवा स्वर आला असतां जो संधि होतो तो व्यंजनसंधि होय.

ले० २५. 'संस्कृत भाषेंत स्वरास अच् अशी संज्ञा आहे' आणि 'व्यंजनास (ले. २८) हल् अशी संज्ञा आहे.' परंतु या संज्ञा कशा उत्पन्न झाल्या याविषयीं कांहीं तरी प्रौढव्याकरणासारख्या ग्रंथांत सांगणें अवश्य होतें.

ले० २५. "संयुक्त स्वर शिवाय करून कोणतेही दोन सजातीय स्वर एकापुढें एक आले असतां ते ऱ्हस्व असोत किंवा दीर्घ असोत, त्यांचा संधी त्यांच्याच दीर्घ स्वरांत होतो."

'मराठी व्याकरण' म्हटलेल्या ग्रंथामध्यें अशा प्रकारचीं वाक्यें पाहून आम्हांला फार वाईट वाटतें. पुनः पुनः आमच्या दृष्टीसमोर असलीं वाक्यें आलीं म्हणजे आम्हीं भयाभीत होतों. पण पुढील वाक्य पाहा—

ले० ३६. "प्रत्यय लावितांना अमुक प्रत्यय लागतो असें सांगितल्यावर तो प्रत्यय जर स्वरादि (स्वर ज्याचे आरंभीं आहे असा) असेल, तर विशेष प्रकार सांगितला नसल्यास ज्या शद्बास प्रत्यय लावायाचा, त्याचा अंत्यस्वर असेल तो नाहींसा होतो; किंवा पररूपसंधी होतो असें साधारणतः समजावें. तसा प्रकार होत नसेल तेथें स्पष्ट उल्लेख केला आहे." काय भयंकर वाक्य हें! पुष्कळ विचार केल्यानंतर मोठ्या खटपटीनें यांतून इतकाच अर्थ घ्यायाचा कीं, शद्बापुढें स्वरादि प्रत्यय आला असतां तेथें प्रायः पररूपसंधि होतो; पण जेथें

भिन्न संधिप्रकार असेल, तेथें तो स्पष्ट सांगितला आहे. धन्य आहे त्या संस्कृत वैयाकरणांची, कीं ज्यांचे शब्द म्हणजे जशीं मुक्ताफळें. नेमकी योजना आणि नेमका अर्थ. असो. प्रस्तुत विषयाकडे वळूं.

प्रथमतः ' सजातीय ' स्वर म्हणजे काय, ' विजातीय ' स्वर म्हणजे काय हें सांगितलें पाहिजे होतें. परंतु तें कांहींच नसतां त्या शब्दांची योजना केल्यानें उगाच संदेह मात्र उत्पन्न होतो. संयुक्त स्वरांमध्यें परस्पर सजातीयत्व नाहीं. तेव्हां ' संयुक्त स्वर शिवाय करून ' असें म्हणण्याचें मुळींच प्रयोजन नव्हतें.

अ आ हे परस्पर सजातीय (अथवा सवर्ण); त्याप्रमाणेंच इ ई; आणि त्याप्रमाणेंच उ ऊ; आणि त्याप्रमाणेंच ऋ ॠ; हे परस्पर सजातीय आहेत. सजातीय म्हणजे समानस्थानीं समान प्रयत्नानें उत्पन्न होणारे. आणि असे नव्हेत ते विजातीय (अथवा असवर्ण) हें प्रथमतः सांगितलें पाहिजे होतें. ऱ्हस्वदीर्घादि जो केवळ कालकृत भेद आहे त्यापासून सवर्णत्वाला बाध येत नाहीं. त्याप्रमाणेंच व्यंजनांमध्यें श्वासवर्ण, नादवर्ण, अनुनासिकवर्ण असा जो हा अंतरंग भेद, तेणेंकरूनही सवर्णत्वाला बाध येत नाहीं, ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे.

' त्यांचा संधी त्यांच्या दीर्घ स्वरांत होतो, ' असें महाराष्ट्रपद्धतिविरुद्ध वाक्य न योजतां—' त्या दोहोंच्या स्थानीं मिळून त्यांचा दीर्घ असा एकच स्वर येतो ' असें वाक्य घातलें पाहिजे होतें.

या संधिप्रकरणामध्यें जोशीबुवांनीं जे अनेक नियम दिले आहेत, त्यांचा तात्पर्यांश जरी फारसा चुकीचा नाहीं, तथापि त्यांतील शब्दरचना फार द्राविडी प्राणायामाची आहे, असें म्हणणें प्राप्त होतें.

वाङ्मन, षण्मास, जगन्नाथ यांच्या स्थानीं वाग्मन, षड्मास, जगद्नाथ अशीं रूपें संस्कृत ग्रंथांतही आढळत नाहींत, आणि मराठी प्रचारांतही नाहींत. असें असतां संस्कृत व्याकरणामध्यें तीं वैकल्पिक

मानलेलीं आहेत एवढ्यावरूनच, कित्येक आग्रही परीक्षकांच्या संतोषास्तव जर त्यांचा मराठी व्याकरणांतही संग्रह करण्याचा असला तर, हवा तर विचारा करावा. परंतु असलीं कठीण रूपें प्रचारांत मुळींच नाहींत. म्हणून मराठी व्याकरणांतून तरी तीं साफ गाळून टाकणें हेंच योग्य असें आम्हांला वाटतें.

तेथेंच पुढील दोन्ही नियमांत 'संनिध' हा शब्द आला आहे. तो संस्कृत व्याकरणांतही त्या प्रसंगीं दिला आहे खरा. परंतु तेथें पाणिनीय सूत्रांच्या ओघाकडे लक्ष देऊन उत्सर्ग आणि अपवाद यांच्या जुळणीसाठीं वृत्तिकारांना तो शद्ब घालावा लागला आहे, इतकेंच. वस्तुत: "पुढें श किंवा चवर्गवर्ण आल्यास, स् आणि तवर्गवर्ण यांच्या स्थानीं क्रमशः श् आणि चवर्गवर्ण होतात," इतका नियम पुरे आहे. हाच प्रकार पुढील नियमामध्येंही लागू होतो. गुण, वृद्धि, आगम, आदेश इत्यादिकांच्या व्याख्यांमध्येंही नियत शद्बयोजना असती तर बरें होतें. "इ उ ऋ ऌ यांचे अंतस्थवर्ण अनुक्रमें य् व् र् ल् हे आहेत," म्हणजे काय, हें स्पष्ट नाहीं. तथापि य् व् र् ल् यांच्या स्थानीं इ उ ऋ ऌ येणें याला **संप्रसारण** ही संज्ञा संस्कृतांतल्याप्रमाणें जोशीबुवांनीं दिली हें बरें केलें. दादोबांनीं सोयीकरितां म्हणून इ उ ऋ ऌ यांच्या स्थानीं य् व् र् ल् येणें याला **संप्रसारण** संज्ञा केली होती; परंतु तसें करण्याची कांहीं आवश्यकता होती असें दिसत नाहीं.

शब्दविचार

ले० ३७. 'एक किंवा अनेक वर्णांचा समुदाय, ज्यापासून कांहीं अर्थ समजतो, त्यास शद्ब असें म्हणतात.' हें शिथिल वाक्य आहे; कारण, कीं अनेक वर्णांचा समुदाय होऊं शकेल; पण एकच वर्णाचा समुदाय तो कसा ?

शब्दाला अर्थ असणें हें प्रक्रियेच्या कारणानें जरी अवश्य आहे, तरी व्याकरणामध्यें केवळ अर्थशून्य ध्वनीलाही शब्द म्हणतच नाहींत असें समजूं नये. इतकाच भेद कीं, सार्थ शब्दापासून मात्र स्वतंत्रपणें पदसिद्धि होऊं शकते, तशी अर्थहीन शद्वापासून होऊं शकत नाहीं. अर्थहीन शब्दालाही आधीं सार्थत्व द्यावें लागतें. म्हणून सार्थशब्दाला विशेषेंकरून ' शब्द ' ही संज्ञा लावितात.

जोशीबुवांनीं आणि दुसऱ्या व्याकरणकारांनींही शब्दांचे भेद दोन प्रकारचे दाखविले आहेत. एक त्यांच्या उत्पत्तीवरून, आणि एक व्याकरणांतल्या त्यांच्या उपयोगावरून. पण हा गोंधळ आहे. उत्पत्तीवरून म्हणून जो भेद मानिला आहे, त्याचा जर व्याकरणांत उपयोग नाहीं, तर तो भेद व्याकरणांत दिला कशाला ? संस्कृत व्याकरणामध्यें या प्रकरणाची जी व्यवस्था केली आहे ती प्रशस्त आहे. म्हणून एथें तिचें थोडेंसें दिक्प्रदर्शन करूं:—

जितके म्हणून भाषेमध्यें शब्द आहेत, तितके सर्व निवडून काढून, त्यांचीं अगदीं मुळचीं स्वरूपें कोणचीं असावीत, हें वैयाकरणांनीं मोठ्या प्रयत्नानें ठरवून टाकिलें आहे. हीं जीं अगदीं मुळचीं रूपें, त्यांना ' प्रकृति ' अशी संज्ञा केली आहे. वृक्षाला असंख्य शाखा, पानें, फुलें, फळें, असलीं, तरी त्यांचें मुळबीज एक. एका बीजाचा विस्तार अनंत असतो. तोच प्रकार भाषेमध्यें आहे. मूळच्या प्रकृतींची संख्या फार थोडी, पण त्यांचा विस्तार फार होऊन शब्दसंख्या वाढली आहे. प्रकृति निवडून काढून त्यांचे दोन वर्ग केले. धातु आणि प्रातिपदिक. कांहीं तरी क्रियार्थ दाखविणारी जी **प्रकृति** तो धातु, आणि क्रियेहून कोणताही भिन्न अर्थ दाखविणारी जी प्रकृति तें **प्रातिपदिक.** तथापि मूळचीं प्रातिपदिकें फारच थोडीं. त्यांपेक्षां धातूंची संख्या मोठी. कित्येकांचें मत तर असें आहे कीं मुळीं प्रकृति म्हटल्या म्हणजे सर्वच धातुरूप. कित्येक प्रातिपदिकांमध्यें त्यांचा शोध लागत नाहीं, इतकाच

विशेष. तें असो. प्रकृतिपासून सर्व शब्दसृष्टीचा आरंभ. प्रकृतीचा विस्तार म्हटला म्हणजे मुख्यत्वें प्रत्यय लागून होतो, आणि शब्दांना शब्द मिळून संयुक्त म्हणजे सामासिक शब्दही होतात. प्रत्यय लागून जो विस्तार होतो, त्यांत दोन प्रकार आहेत; म्हणजे प्रत्ययामध्येंच दोन जाती आहेत असें म्हणण्यास बाध नाहीं. एका जातीचे प्रत्यय असे आहेत, कीं ते प्रकृतीला लागून एकदा कांहीं रूप सिद्ध झालें, म्हणजे मग त्या शद्वाची वाढ खुंटली. पुढें तो वाढत नाहीं, पण दुसऱ्या जातीचे जे प्रत्यय आहेत, त्यांचें तसें नाहीं. त्यांच्या योगानें नवीन म्हणजे प्रत्ययांत प्रातिपदिकें किंवा प्रत्ययान्त धातु उत्पन्न होतात, आणि त्यांच्यापुढें पुनः प्रत्यय लागूं शकतात. पहिल्या जातीचे म्हणजे शब्दांची वाढ खुंटविणारे जे प्रत्यय आहेत, त्यांना 'विभक्ति-प्रत्यय' * अशी संज्ञा आहे. विभक्तिप्रत्यय लागून जे शब्द सिद्ध होतात, त्यांना 'पद' ही संज्ञा केली आहे. ही पदसंज्ञा नीट ध्यानांत ठेवावी; कां कीं व्याकरणाचे जे मुख्य विभाग करावयाचे, ते या पदसंज्ञेवर फार अवलंबून आहेत. इतर म्हणजे दुसऱ्या जातीचे प्रत्यय, यांमध्यें, 'तद्धित प्रत्यय', ' कृत्प्रत्यय ' इत्यादि कांहीं प्रकार आहेत. हे तद्धितादि प्रत्यय लागून जीं नवीन प्रातिपदिकें किंवा जे नवीन धातु सिद्ध होतील, त्यांच्यापुढें पुनः पूर्वोक्त विभक्तिप्रत्यय लागून, त्यांना पदसंज्ञा प्राप्त झालीच पाहिजे. पदसंज्ञा प्राप्त झाल्यावांचून कोणताही शब्द × किंवा धातु भाषेमध्यें योजण्याला योग्य होतच नाहीं.

* धातूंपुढें लागणारे जे विभक्तिप्रत्यय, त्यांना 'आख्यातप्रत्यय' अशी वेगळी संज्ञाही आहे. परंतु ती सध्यां येथें सांगण्याचें कांहीं कारण नाहीं.

× वस्तुतः ' शब्द ' संज्ञेमध्यें धातूंचें ही ग्रहण होत नाहीं असें नाहीं, तथापि धातुवर्ज्य जे इतर शब्द अर्थात् प्रातिपदिकें, त्यांनाच ' शब्द ' म्हण-ण्याचा विशेष संप्रदाय पडला आहे. धातूला बहुशः ' शब्द ' ही संज्ञा लावीत नाहींत.

'पद' म्हणजे विभक्तिप्रत्ययांत शब्द, हें तर वर सांगितलेंच आहे. शब्द म्हणजे कोणताही सार्थ शब्द असें जरी खरें, तरी व्यवस्थेसाठीं 'शब्द' ही संज्ञा विभक्ति प्रत्यय लावण्याच्या पूर्वींचें जें त्याचें स्वरूप त्यालाच लावितात, पदाला लावीत नाहींत. याप्रमाणें 'शब्द' आणि 'पद' या संज्ञांचा भेद स्पष्ट केल्यानंतर, व्याकरणाचे असे विभाग होतातः—

पदसिद्धि, शब्दसिद्धि, आणि पदयोजना. पदसिद्धि आणि शब्दसिद्धि या दोहों प्रकरणांना मिळून एक नांव द्यावयाचें असल्यास 'शब्द-प्रकरण' किंवा 'शब्दखंड' हें नांव देण्याला बाध नाहीं. पण 'शब्दविचार' हें नांव प्रशस्त नाहीं असें आम्हांला वाटतें. कारण कीं यांत शब्दांचा नुसता विचार आहे असें नाहीं, शब्दांची सिद्धि आणि पदांची सिद्धि हे दोन विषय यांत मुख्य आहेत. 'वाक्यरचना' या नांवापेक्षां 'पदयोजना' हें नांव विशेष प्रशस्त आहे असेंही आम्हांस वाटतें. असो. याप्रमाणें व्याकरणाचे 'शब्दप्रकरण' आणि 'पदयोजना' हे दोन मुख्य भाग. शब्दप्रकरणाच्या पोटीं 'पदसिद्धि' आणि 'शब्दसिद्धि' हे दोन विभाग. 'वर्णविचार' हा विषय यांतच घेतला किंवा वेगळा ठेविला तरी चालेल, असें पूर्वीं म्हटलेंच आहे. पदसिद्धीसाठीं शब्दांचें 'प्रातिपदिक' आणि 'धातु' असे दोन भेद. अव्ययें सुद्धां प्रातिपदिकांतच येतात. असें असतां आलीकडचे मराठी व्याकरणकार त्यांचा एक वेगळाच वर्ग कां करितात हें समजत नाहीं. हॉवर्ड साहेबानें आपल्या इंग्रजी व्याकरणामध्यें नामें, धातु आणि अव्ययें असे तीन विभाग केले आहेत, म्हणून कदाचित् हेही त्याला अनुसरून अव्ययांचा वर्ग वेगळा करीत असतील तर नकळे. शब्दसिद्धीच्या पोटीं तद्धितप्रकरण, कृदंतप्रकरण, समासप्रकरण, साधित-धातुप्रकरण हीं येतात.यांशिवाय आणखी 'अपभ्रंश प्रकरण' हा एक नवीन विषय मराठी व्याकरणाच्या या शब्दसिद्धिप्रकरणांत प्रविष्ट झाला पाहिजे. त्याशिवाय व्याकरणाला पूर्णता येणार नाहीं, असें आमचें मत आहे.

व्याकरणाची अशी व्यवस्था लावणें हें किती बरें सरळ आणि स्वाभाविक आहे? या व्यवस्थेनें, ' रचनेवरून ' शब्दांचे भेद, आणि 'उपयोगावरून' शब्दांचे भेद (ले. ४२ पहा), असें जोशीबुवांचें अशास्त्र आणि विलक्षण वर्गीकरण सहज दूर होईल. इतकेंच नव्हे, पण पुढें विभक्ति-प्रकरणीं अनेक वादग्रस्त विषयांचा निर्णय ठरविण्यास इजपासून मोठें साहाय्य होणार आहे. यास्तव मराठी वैयाकरणांनीं विशेषेंकरून या गोष्टीकडे लक्ष देणें अवश्य.

असो. पुढें चालूं. जोशीबुवांनीं (ले. ४२) प्रातिपदिकें, क्रियापदें आणि अव्ययें, असे मूळ शब्दांचे तीन वर्ग केले आहेत, त्यांमध्यें ' क्रियापदें ' अशी जी एका वर्गाला त्यांनीं संज्ञा केली आहे, ती सर्वथा अप्रशस्त असें म्हणणें प्राप्त आहे. धातुरूपशब्दाला ' क्रियापद ' ही संज्ञा यांनींच नवी लाविली आहे असें नाहीं. आजपर्यंत झालेल्या बहुतेक व्याकरणांमध्यें हाच प्रकार. परंतु ' पद ' संज्ञेचा जो अर्थ वर सांगितला आहे, त्यावरून स्पष्टपणें लक्षांत येण्यासारखें आहे, कीं धातूला आख्यात-प्रत्यय लागून जें रूप सिद्ध होतें तेंच क्रियापद; मूळच्या धातूला 'क्रियापद' हा शब्द लागत नाहीं. तेथें ' धातु ' किंवा ' धातुशब्द ' हीच संज्ञा योग्य आहे. असें असतां ही एवढी मोठी ढोबळ चूक कशी झाली असावी, याचा विचार करितां असें लक्षांत येतें कीं, इंग्रजीमध्यें ' Verb व्हर्ब् ' अशी जी संज्ञा, तिच्या स्थानीं ' क्रियापद ' शब्द सरसकट योजल्यामुळें हा गोंधळ उत्पन्न झाला आहे. इंग्रजी व्याकरणामध्यें मूळशब्द आणि पद (म्हणजे विभक्त्यंत शब्द) यांना वेगवेगळ्या संज्ञा नाहींत. यामुळें त्यांच्या तऱ्हेवर जाऊन ' शब्द ' आणि ' पद ' यांचा जो मराठी वैयाकरणांनीं गोंधळ केला आहे, त्याचाच हा परिणाम होय. मूळचा धातुशब्द, आणि आख्यात प्रत्ययांत शब्द म्हणजे क्रियापद या दोहोंलाही इंग्लिश व्याकरणकार 'व्हर्ब्' ही संज्ञा लावितात, असें पाहून मराठी वैयाकरणांनीं

खऱ्या क्रियापदांना आणि त्यांच्या संगतीं धातुशब्दांनाही ‘ क्रियापद ’ ही संज्ञा धडकावून दिली आहे ! इतकेंच नव्हे, दुसरा एक चमत्कार झाला आहे. इंग्रजींतील ‘व्हर्ब्’ या संज्ञेचा मूळ अर्थ केवळ शब्द, म्हणजे कोणताही शब्द, असा होता. यामुळें इंग्रजी व्याकरणकारांचा एक लेख आहे कीं, “ ‘ व्हर्ब् ’ या शब्दांचा अर्थ धातूचें कोणतेंही रूप असा होतो, तरी व्याकरणांत धातूचे कालदर्शक रूपासच व्हर्ब् म्हणतात; बाकीच्यांस कृदंतें किंवा धातुसाधितें म्हणतात. ” आतां ‘ व्हर्ब् ’ म्हणजे मराठी वैयाकरणांचें ‘ क्रियापद ’. तेव्हां जोशीबोवांनीं तोच लेख आपल्या मराठी व्याकरणांत बिनधोक घुसवून दिला ! ते म्हणतात, (ले. ७४३) ‘क्रियापद शब्दाचा अर्थ कोणचेंही धातूचें रूप असा आहे, तरी व्याकरणांत धातूचे कालदर्शक रूपासच क्रियापदें असें म्हणतात; बाकीच्यांस कृदंतें किंवा धातुसाधितें असें म्हणतात. ’ परंतु क्रियापद शब्दाचा अर्थ धातूचें कोणतेंही रूप असा मराठींत किंवा संस्कृतांत कधींही होत नाहीं. कृदंतादि-कांना क्रियापद हा शब्द अगदीं लागत नाहीं. कारण कीं, कृदंतादिकांना पदसंज्ञा मुळींच नाहीं, तेव्हां क्रियापदांमध्यें त्यांचा समावेश कसा होईल ?

असो. प्रातिपदिकें आणि धातु यांचीं लक्षणें वर दिलींच आहेत. तथापि प्रकृतिरूप जीं प्रातिपदिकें आणि धातु त्यांचा मात्र त्या लक्षणांत समावेश होतो. म्हणून एथें सांगणें अवश्य आहे कीं, प्रकृतिरूप शब्दाला कित्येक प्रत्यय लागून नवीन प्रातिपदिकें आणि धातु उत्पन्न होत असतात त्यांचेंही त्यांत ग्रहण केलें पाहिजे. हें उघड आहे कीं हे जे प्रत्यय एथें निर्दिष्ट केले ते विभक्तिप्रत्ययांहून भिन्न होत; म्हणजे प्रत्ययांच्या ज्या दोन जाति वर सांगितल्या आहेत, त्यांतील दुसऱ्या जातीचे हे होत. म्हणून हे प्रत्यय लागून सिद्ध झालेल्या नवीन शब्दांपुढें विभक्तिप्रत्यय लागण्याला कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध नाहीं.

प्रातिपदिकांचे विभाग.

प्रातिपदिकांचे विभाग जोशीबुवांनीं नामें, विशेषणें, आणि सर्वनामें असे तीन केले आहेत. आमच्या मतें अव्ययेंही प्रातिपदिकांतच आलीं पाहिजेत; आणि सर्वनामांचा स्वतंत्र वर्ग न होतां, त्यांचा समावेश नामांच्याच पोटीं झाला पाहिजे. अव्ययांना जरी सर्व विभक्ति लागत नाहींत, तरी केव्हां केव्हां कांहीं विभक्ति लागतात. त्यांना प्रातिपदिकांच्या बाहेर टाकण्यास कोणतेंही योग्य कारण दिसत नाहीं. आतां, सर्वनामांविषयीं म्हटलें तर तीं एका प्रकारचीं नामेंच आहेत. म्हणून नामांचे सामान्य विशेष इत्यादि जसे भेद, तसाच हाही एक भेद आहे. वाक्यामध्यें नामाला जो जो अधिकार असतो, म्हणजे वाक्यरचनेच्या संबंधानें नामाची जशी योजना होते, तशीच सर्व-नामाचीही होते. इतर नामांपेक्षां सर्वनामांमध्यें अर्थदृष्ट्या कांहीं एका प्रकारची थोडीशी भिन्नता आहे, इतकेंच. त्यांचा वेगळा पोटभेद मानण्याचें मुख्य कारण हेंच कीं त्यांचीं विभक्तिरूपें सर्वथा सामान्य नियमाला अनु-सरून होत नाहींत, हें होय. इंग्लिश व्याकरणकार सर्वनामांचा वर्ग वेगळा करितात म्हणून मराठींतही तो आम्ही वेगळा करावा असें नाहीं. तात्पर्य, प्रातिपदिकांचे विभाग नामें, विशेषणें आणि अव्ययें, असे करावे, असें आमचें मत आहे. नामादिकांचीं लक्षणें कशीं काय करायाचीं तीं पाहूं.

बाळशास्त्री—इतर शब्दांशीं संबंध नसतां ज्या शब्दापासून वस्तूचा बोध होतो त्या शब्दास **नाम** असें म्हणावें.

दादोबा—**नाम** म्हणजे पदार्थमात्राचें नांव, मग ते पदार्थ प्रत्यक्ष दिसोत अथवा त्यांचा नुसता संस्कार मनाच्या ठायीं असो.

गोडबोले—पदार्थांच्या नांवांस **पदार्थवाचक नामें** किंवा फक्त **नामेंच** म्हणतात.

जोशी—१. ज्या प्रातिपदिकांवरून स्वतंत्र रीतीनें पदार्थाचा बोध होतो, व ज्यांचा अर्थ विशेष्य असतो, त्यांस नामें म्हणतात.

२. ज्या शब्दापासून संख्या लिंग (स्त्रीपुरुषभेद) इत्यादिकांनीं युक्त अशा पदार्थांचा बोध होतो, व ज्यांस विभक्त्यादि कार्यें होऊन क्रियापदांशीं त्यांचा संबंध असतो, त्यांस **नामें** असें म्हणतात.

विशेषणाचें लक्षण—बाळशास्त्री—पदार्थांचा गुण किंवा दोष दाखविणारा जो शब्द त्यास विशेषण असें म्हणावें.

दादोबा—विशेषण म्हणजे नामाच्या गुणाचा दर्शक जो शब्द तो.

गोडबोले— विशेषणानें गुण किंवा संख्या समजते.

जोशी—त्यांचा (ह्म. प्रातिपदिकांचा) अर्थ गौण असून त्यांचा दुसऱ्या प्रातिपदिकांशीं संबंध असला, म्हणजे त्यांस विशेषणें म्हणतात.

संस्कृत व्याकरणामध्यें कोणत्याही प्रातिपदिकाला, अर्थात् विशेषणाला सुद्धां ' नाम ' ही संज्ञा लावतां येते. त्याप्रमाणेंच वस्तुबोधक शब्दालाही विशेषण संज्ञा होऊं शकते. जसें ' नर्मदा नदी, ' एथें नर्मदा हें नदी शब्दाचें विशेषण आहे. तथापि मराठी व्याकरणामध्यें इंग्रजी व्याकरणाच्या धोरणानें नाम आणि विशेषण यांच्या अर्थाची व्याप्ति संकुचित झाली आहे. हें एका अर्थीं बरेंच झालें आहे. तथापि त्यांचीं निर्दोष लक्षणें सांगणें हें अमळ कठीणच काम खरें. कारण त्यांच्या लक्षणामध्यें येणारे पदार्थ, वस्तु, गुण, दोष, संख्या इत्यादि जे शब्द आहेत, त्यांच्याच अर्थाची मोठी भानगड आहे. पदार्थ म्हणजे स्पर्शेंद्रियानें जाणतां येणारें, हात लावून पाहतां येणारें, किंवा निदानपक्षीं नेत्रांना दिसणारें, असें कांहीं तरी, अशी साधारणतः सर्वांची समजूत असते. तेव्हां अशा पदार्थांच्या नांवालाच जर नाम म्हणावें, तर या लक्षणामध्यें संपूर्ण नामांचा संग्रह कदापि होणार नाहीं. दादोबांनीं म्हटलें आहे कीं ते पदार्थ प्रत्यक्ष दिसोत अथवा त्यांचा नुसता संस्कार मनाच्या ठायीं असो; परंतु एवढ्यानें पुरती समजूत होणें कठीण आहे. संशय, आकाश, पोकळी, अभाव, हीं निःसंशय नामें आहेत. तथापि तीं पदार्थांचीं नांवें कशीं ? किंवा त्यांच्या

पदार्थांचा नुसता संस्कार तरी मनाच्या ठायीं कसा व्हावा? हें स्पष्ट होत नाहीं परंतु संस्कृत नैयायिकांनीं याचा उलगडा उत्तम प्रकारें केला आहे, आणि तोच प्रस्तुत प्रसंगीं गृहीत करणें हें अवश्य आणि फार सोईचें आहे. 'अभिधेयत्वं पदार्थत्वम्' हें कांहीं तरी असुक, किंवा याला कांहीं ना कांहीं तरी नांव देतां येईल इतकें मनांत येण्यासारिखें असलें म्हणजे पुरे. ज्याला कांहींना कांहीं नांव देतां येईल तो पदार्थ, आणि अशा पदार्थांचें जें नांव तें नाम. सारांश, **नाम म्हणजे कशाचेंही नांव.** या लक्षणाहून दुसरें चांगलें लक्षण मिळणार नाहीं, अशी आमची तर समजूत आहे. द्रव्य, गुण, क्रिया, जाति, भेद, संबंध आणि शेवटीं अभाव सुद्धां या लक्षणामध्यें येतो, आणि यांनाच 'सत पदार्थ' ही संज्ञा आहे.

उदाहरणार्थ—

द्रव्य—मृत्तिका, वायु इ०.

गुण—तांबडेपणा, एक, दान इ०.

क्रिया—उठणें, चालणें, पलायन इ०.

जाति—मनुष्यत्व, पशुत्व इ०.

भेद—अंतर.

संबंध—पितापुत्रांचें नातें इ०.

अभाव—अंधकार, अन्याय इ०

हीं सर्व उदाहरणें नामांचीं आहेत. तेव्हां नाम म्हणजे द्रव्याचें नांव घ्या, गुणाचें नांव घ्या, क्रियेचें नांव घ्या, जातींचें नांव घ्या, भेदाचें नांव घ्या, संबंधाचें नांव घ्या, अभावाचें नांव घ्या, कशाचेंही नांव घ्या, तें वरील लक्षणांत येतें; त्याच्या बाहेर जाऊं शकत नाहीं. काल, दिक्, मन, आत्मा हे सुद्धां पदार्थ आहेत. हे द्रव्य वर्गात धरिले आहेत; ते कां, याचा एथें विचार करण्याचें कारण नाहीं. कां कीं ते कोणत्याही वर्गात धरिले तरी त्यांचें पदार्थत्व जात नाहीं, इतकें आपणांस पुरे आहे.

'वस्तु' शब्दाविषयीं पाहिलें तरी अडचण येतेच. जें कांहीं सत्यत्वेंकरून आहे तें वस्तु. म्हणून हा शब्द नामशब्दाच्या लक्षणामध्यें निर्दोषपणें योजतां येत नाहीं. गोडबोले आणि जोशी यांनीं दिलेलीं लक्षणें तर कांहींच कामाचीं नाहींत. त्यांत आधीं अर्थ स्पष्ट नाहीं. आणि जोशीबुवांच्या लक्षणामध्यें अन्योन्याश्रय आणि लिंग, संख्या, कारक, विशेष्य इत्यादिकांच्या ज्ञानाची अपेक्षा, हे दोष स्पष्ट दिसतच आहेत. तस्मात् त्याविषयीं आणखी अधिक कोटिक्रम करण्याचें कारण नाहीं.

आतां विशेषण म्हणजे काय ?—वर जीं आमच्या मराठी वैयाकरणांनीं दिलेलीं विशेषणांचीं लक्षणें उतरून घेतलीं आहेत, त्यांनीं निर्वाह होत नाहीं, असें म्हणणें प्राप्त होतें. गुण काय ? आणि दोष काय ? तसेंच गुण काय ? आणि संख्या काय ? तसाच नामाचा गुण दाखवावयाचा म्हणजे कसा, हें कांहीं स्पष्ट नाहीं. नामाचें लक्षण जसें त्यांनीं इंग्रजी व्याकरणांतून घेतलें आहे, तसेंच विशेषणाचेंही इंग्रजी व्याकरणांतूनच घेतलें आहे; परंतु 'An adjective is a word that qualifies a noun,' यामध्यें जो अर्थ आहे तो, त्यांनीं दिलेल्या मराठी लक्षणांत येत नाहीं. नामाच्या अर्थाला कांहीं विशेष अर्थ लावणारा जो शब्द तें विशेषण, असें इंग्रजींतील लक्षण आहे. 'Qualify क्वालिफाइ,' म्हणजे अमुक वस्तु 'अशी अशी आहे असें म्हणणें' अर्थात् विशेष सांगणें. म्हणून या अर्थाला जमवून जर हें लक्षण दिलें असतें, तर फार चांगलें होतें.

जोशीबुवांनीं आणखी म्हटलें आहे. (ले. १६२) "जीं प्रातिपदिकें दुसऱ्या प्रातिपदिकांच्या अर्थाला मर्यादित करितात, त्यांस विशेषणें म्हणतात." परंतु इतक्यानेंच सर्व अर्थ स्पष्ट होत नाहीं आणि पुनः भ्रांति मात्र उत्पन्न होते. विशेषणाच्या योगानें प्रातिपदिकाचा अर्थ मर्यादित होतो असें नाहीं; तर प्रातिपदिकाचा अर्थ वाढतो. पण त्या अर्थाची व्याप्ति मात्र मर्यादित होते. उदाहरणार्थ, 'घोडा' या शब्दापासून चतुष्पाद

जातीचा कांहीं विशेष प्राणी असा अर्थ होतो. त्याला 'काळा' हें विशेषण लागतांच काय झालें ? तर ' घोडा ' हा जो अर्थ त्या अर्थाला 'काळेपणा' हा आणखी अर्थ अधिक लागला. परंतु त्याच कारणानें दुसरा परिणाम असा झाला, कीं त्या ' घोडा ' या अर्थाची व्याप्ति मर्यादित झाली. ती अशी—' घोडा ' या शब्दानें पूर्वी, जितके म्हणून घोडे तितक्या सर्व घोड्यांचा बोध होत असे, पण ' काळा ' हें विशेषण लागतांच जितके काळे घोडे तितक्यांचा मात्र बोध राहिला. तांबडे, पांढरे, इत्यादि भिन्न रंगांचे जे घोडे ते मर्यादेच्या बाहेर पडले. तेव्हां विशेषणापासून नामाच्या अर्थाची मर्यादा होते असें नव्हे. अर्थ तर वाढतो, पण त्याची व्याप्ति मात्र मर्यादित होते. संस्कृतामध्येंही ' **भेदकं विशेषणम्** ' असें लक्षण आहे. भेदक म्हणजे अन्य पदार्थांची व्यावृत्ति करणारें; परंतु ही व्याख्याही समजायाला अमळ कठीणच. म्हणून भेद म्हणते विशेष, यावरून नामाच्या अर्थाला विशेष अर्थ जोडणारा शब्द तें विशेषण. नामाचा अर्थ वाढविणारा जो शब्द तें विशेषण असें कांहीं तरी लक्षण केलें तर पुरें आहे.

आतां अव्यय शब्दाचें लक्षण—ज्या शब्दाला लिंग, वचन, विभक्ति, यांपासून कांहीं विकार होत नाहीं त्या शब्दाला अव्यय म्हणावें हें ठीक आहे. परंतु लिंग, वचन, यांचीं लक्षणें स्पष्ट होत तोंपर्यंत, " ज्या प्रातिपदिकांना प्रत्ययादि विकार न होतांही पदत्व प्राप्त होतें, तीं अव्ययें, " असें लक्षण करण्यास कांहीं बाध नाहीं. संस्कृत व्याकरणामध्यें, अव्ययांना विभक्त्यादि कार्यें होत नाहींत, असें म्हणत नाहींत. तर अव्ययांना विभक्ति प्रत्यय जरी लागतात, तरी त्या प्रत्ययांचा लोप होतो, आणि त्या प्रत्ययांच्या निमित्तानें प्रातिपदिकाला कांहीं विकार होत नाहीं, असें म्हणतात. असो. तात्पर्यांश फारसा भिन्न नाहीं.

धातुशब्दाचें लक्षण वर आलेंच आहे. तथापि त्याविषयीं थोडासा विस्तार करणें अवश्य दिसतें. 'जाणें' आणि 'जातो' या दोन्ही शब्दांपासून क्रियेचा

बोध होतो खरा; तरी ' जाणें ' हाही धातुशब्द नव्हे, आणि ' जातो ' हाही धातुशब्द नव्हे. तर या दोहोंमध्यें दिसणारा जो ' जा ' इतका अंश तो धातुशब्द. कारण कीं ' जा ' या अंशामध्यें ' जाणें ' हा जो क्रियार्थ तो केवळ बीजरूपानें आहे, त्यामध्यें पदार्थत्व नाहीं; आणि जाणें यामध्यें जरी क्रियार्थ आहे, तरी 'णें' प्रत्ययाच्या योगानें त्याच्यामध्यें पदार्थत्व येत असल्यामुळें त्याला नामसंज्ञा होते. अर्थात् त्याला धातुसंज्ञा नाहीं. ' जातो ' यामध्यें जरी क्रियार्थ आहे, तरी त्यांत 'तो' हा आख्यात प्रत्यय असल्यामुळें, 'जातो' याला पदत्व आलें आहे. म्हणून त्यालाही धातुसंज्ञा लागत नाहीं.

मराठींत प्रत्येक धातुशब्दासारखेंच एक क्रियापद (आज्ञार्थी) आढळतें म्हणून ' धातुशब्दही प्रचारांत आढळतो, ' असें कदाचित् म्हणतां येईल. परंतु संस्कृतामध्यें बहुतेक क्रियापदांचा धातुशब्द भाषेमध्यें आढळत नाहीं. अनेक क्रियापदांच्या तुलनेनें त्यांतून धात्वंश वेगळा काढलेला असतो. तथापि भाषेच्या अत्यंत मूळारंभीं धातुशब्दही कोणत्या तरी रूपानें व्यवहारामध्यें येत असावा, असा तर्क करण्यास आधार दिसतो.

विभक्तिप्रकरण.

विभक्तिप्रकरण नीट समजण्यासाठीं, आधीं नामादिकांचे पोटभेद आणि लिंगविचार हीं प्रकरणें सांगितलीं पाहिजेत.

नामाच्या जाति कोणीं ' सामान्य ' आणि ' विशेष ' अशा दोन केल्या आहेत; कोणीं ' भाववाचक ' हा एक अधिक भेद मानिला आहे; कोणीं अधिकही केल्या आहेत. पण या जाति कोणत्या पायावर रचिल्या आहेत हें सांगणें कठीण आहे. जोशीबुवांनीं म्हटलें आहे कीं (ले. ५३) ' सामान्यनाम व विशेषनाम हे भेद नामाच्या अर्थावरून केले आहेत. ' ' उपयोगावरून सामान्यनामाचे अनेक पोटभेद मानितां येतील. परंतु त्यांतले (१) गुणवाचक नामें, (२) भाववाचकनामें, (३) द्रव्यवाचक नामें व (४) समुदायवाचक नामें हे मुख्य आहेत.

आमचें मत असें आहे कीं कोणत्याही शास्त्रीय ग्रंथामध्यें एकाद्या विषयाचे जेव्हां विभाग करायाचे असतात, तेव्हां त्या विभागांचा उपयोग काय, हें लक्षांत आणिल्यावांचून कधींही ते विभाग करूं नयेत. कांहीं विभाग उपयोगावरून व कांहीं विभाग आणखी कांहीं आधारावरून करायाचे, म्हणजे या कृत्यास काय म्हणावें हें आम्हांस तर समजत नाहीं. ज्या कृत्याचा उपयोग नाहीं, तें कृत्य करणें म्हणजे केवळ जलताडण होय. तें पाहिजे कशाला ? उपयोगास्तव जे भेद करावयाचे त्यांचेंच काय तें प्रयोजन, असें आम्ही समजतों. परंतु आमच्या मराठी व्याकरणकर्त्यांच्या मनांत ही गोष्ट अद्यापि येत नाहीं असें दिसतें !

वास्तविकपणें म्हटलें म्हणजे, मराठी व्याकरणांत नामाच्या जाती सांगण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. इंग्रजी व्याकरणामध्यें त्या दिलेल्या आहेत, म्हणून मराठी व्याकरणांत त्या दिल्या पाहिजेत, हेंच जर कारण असलें तर त्या खुशाल द्याव्या. परंतु त्यांचा मराठी व्याकरणांत म्हणण्यासारखा कांहीं उपयोग नाहीं. संस्कृतांत तर त्या मुळींच दिल्या नाहींत. इंग्रजी व्याकरणांत विशेषनामें सर्व समजलींच पाहिजेत. कारण कीं विशेषनामांचीं बहुवचनें करण्याचे कांहीं वेगळे नियम आहेत. पण हेंही मुख्य कारण नव्हे. संस्कृतामध्यें गार्ग्यादिकांच्या बहुवचनीं कांहीं विशेष प्रकार होत असतो, पण तेवढयावरून विशेषनामाचें वेगळें लक्षण सांगितलेलें नाहीं. पण विशेषनामाचें प्रथमाक्षर इंग्रजी भाषेच्या रीतीप्रमाणें मोठे लिहिलें पाहिजे, म्हणून विशेषनामें समजण्याची इंग्रजीमध्यें आवश्यकता. तसें कांहीं मराठींत नाहीं. आकारांत विशेषनामांच्या विभक्तींमध्यें थोडेंसें त्यांच्या ज्ञानाचें कदाचित् कारण पडेल; परंतु त्यावांचून कांहीं अडेलच असें नाहीं. असें असतां ' कर्ण ' हें नांव सामान्यनाम मानावें किंवा विशेषनाम मानावें, याविषयीं रिकामा वाद करण्यामध्यें वेळ घालवून फळ काय ? त्याला विशेषनामच सर्वदा म्हटलें किंवा ' तो आजकाल कर्ण आहे ' अशा वाक्यामध्यें त्याला सामान्यनाम म्हटलें, तर नफा तोटा काय ? समुदाय-

वाचक नामें, किंवा द्रव्यवाचक नामें यांचीही गोष्ट तीच आहे. समुदायवाचक नामें इंग्रजींत दिलीं आहे, त्यांचें तेथें कारण आहे. केव्हां त्यांना लावायाचें क्रियापद एकवचनीं असतें, केव्हां अनेकवचनीं असतें. म्हणून त्या विभागाचें कारण पडतें. पण मराठींत त्याचें काय प्रयोजन ? तसेंच 'द्रव्यवाचक नामें' म्हणून जी जोशीबोवांनीं इंग्रजींतील 'nouns of materials नाउन्स् ऑफ् मटीरीयल्स्' या अर्थाला मराठींत आणण्याकरितां संज्ञा केली आहे, तिचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. कारण त्या संज्ञेमध्यें पाणी, सोनें, यांचा जसा समावेश होतो, तसा वृक्ष, पाषाण, यांचाही अवश्य समावेश होतोच. तेव्हां तो विभागही कांहीं कामाचा नाहीं. गुणवाचक नामें, आणि भाववाचक नामें देण्यापेक्षां 'क्रियावाचक नामें' दिलीं असतीं तर त्यांचा कांहींतरी उपयोग झाला असता. कोणी म्हणेल कीं 'भाववाचक' इत्यादि संज्ञा पुढें तद्धितादि प्रकरणांत येत नाहींत कीं काय ? हो, येतात खऱ्या. पण दुसऱ्याही शतशः संज्ञा येतात, त्यांचाही कां येथें संग्रह करूं नये? पाटीलकी, मामलेदारी इत्यादि अधिकारवाचक नामें; शेती, सुतारकी इत्यादि उद्यमवाचक नामें; वसंत, ग्रीष्म इत्यादि ऋतुवाचक नामें गंगा यमुना इत्यादि नदीवाचक नामें; अशीं शतशः प्रकारचीं नामें मानतां येतील. परंतु त्यांचीं मुद्दाम लक्षणें सांगत बसण्यापासून कांहीं उपयोग नाहीं. आतां वडिलोपार्जित वहिवाट चालत आलेली मोडणें हें पातक वाटत असल्यास अथवा व्यवहारज्ञानाच्या वृद्धीला उपयोगी पडतील म्हणून सामान्य, विशेष, आणि फार तर भाववाचक, आणि सर्वनाम असे विभाग दिले तर पुरेत असें आम्हांस वाटतें; परंतु त्यांतही कर्णाची विशेष पदवी काढून घेऊन त्याला सामान्यांत ढकलणें, हें योग्य किंवा अयोग्य, हा व्याकरणाचा विषय नव्हे, असें म्हणणें आम्हांस अवश्य वाटतें.

सामान्यादिकांचीं लक्षणें देण्यामध्यें कित्येकांनीं उगीच ओढाताण केली आहे, तीही प्रशस्त नाहीं असें म्हणावें लागतें.

दादोबा—सामान्यनाम म्हणजे जातिबोधक संज्ञा, ज्यांत या नाम-जातीचा धर्म अनेकांवर राहतो.

विशेषनाम म्हणजे व्यक्तिबोधक संज्ञा, ज्यांत या नामाचा धर्म एकावरच राहतो.

ज्या नामांवरून कोणत्याही व्यक्तीचा शुद्ध भाव अथवा धर्म यांचा उद्‌बोध होतो, तीं सारीं भाववाचक नामें.

गोडबोले—जें नाम एका वर्गातील पदार्थांतून कोणत्याही एकास एकच अर्थानें लावतां येतें तें सामान्यनाम होय.

व्यक्तींचीं जीं नांवें तीं विशेषनामें.

पदार्थांपासून वेगळा मानिलेला जो त्यांचा साधारण गुण, भाव किंवा स्वरूप त्याचें जें नांव तें भाववाचक किंवा धर्मवाचकनाम होय.

जोशी—ज्या नामांवरून जातीचा किंवा गुणांचा बोध होऊन त्या जातीचा किंवा तद्गुणविशिष्ट पदार्थांचा बोध होतो, त्यास सामान्यनामें असें म्हणतात.

पदार्थमात्रांची (?) किंवा व्यक्तिमात्रांची (?) स्वतःची नामें, ज्यांच्यावरून जाती किंवा गुण यांचा बोध न होतां केवळ त्या त्या व्यक्तीचा मात्र बोध होतो, त्यांस विशेषनामें असें म्हणतात.

पदार्थांचा भाव किंवा धर्म यांचीं दर्शक जीं नामें तीं भाववाचक नामें.

यांत एकीपेक्षां एक व्याख्या मोठी; परंतु अर्थाकडे लक्ष देऊन पाहिलें असतां एकीपेक्षा एक बिकट. या सर्वांपेक्षां बाळशास्त्र्यांनीं आपल्या बालव्याकरणांत दिलेल्या व्याख्या फार बऱ्या असें म्हणणें प्राप्त होतें.

बाळशास्त्री—जातिमात्रांचें जें नाम तें सामान्यनाम. जसें मनुष्य पक्षी, इ०

कोणे एकेच वस्तूचें जें नाम तें विशेषनाम. जसें परमेश्वर, गोविंदा, करवीर, इ०

त्यांनीं भाववाचक नामांचें लक्षण दिलेलें नाहीं. तथापि बालव्याकरणांतल्या या लहानशा दोन वाक्यामध्यें जो अर्थ आहे, त्यापेक्षां मोठमोठ्या वैयाकरणांच्या लांबलचक वाक्यांमध्यें अधिक अर्थ तर कांहीं नाहीं; पण शब्दांचा गोंधळ मात्र विशेष आहे, असें स्पष्ट लक्षांत येईल. सामान्य, जाति, व्यक्ति, धर्म, वाचक, बोधक, विशिष्ट हे शब्द पुनः पुनः उलटे सुलटे हवेत तितके योजले तरी, अर्थ जर स्पष्ट नाहीं, तर त्यांचा उपयोग काय ? सामान्याचें किंवा जातीचें नांव तें सामान्यनाम, व्यक्तिचें नांव तें विशेषनाम, आणि भाव दाखविणारे नांव तें भाववाचक नाम, हेंच पुनः पुनः उलटें सुलटें सांगितल्यानें अधिक अर्थनिष्पत्ति काय बरें होणार ? एकजातीय अनेक पदार्थांच्या समुदायांतील प्रत्येक पदार्थाला जें लावतां येतें तें सामान्यनाम. जसें, मनुष्य, पक्षी, इ.

एकाच पदार्थाचें जें नांव ते विशेषनाम. जसें, हरि, नारायण, इ.

अनेक पदार्थांमध्यें असणाऱ्या कांहीं सारखेपणाचें जें नांव तें भाववाचकनाम. जसें मनुष्यत्व, सौजन्य इ०.

सामान्य, विशेष, भाव, इत्यादि संज्ञा न्यायशास्त्रसंबंधीं आहेत. म्हणून जर त्या स्पष्ट करायाच्याच तर थोडासा विस्तार केला पाहिजे. ' सुवर्ण ' आणि ' सुवर्णत्व ' हे दोन भिन्न भिन्न पदार्थ. त्यांत ' सुवर्ण ' या पदार्थाचें केवळ मनानें गृहीत करायाजोगें जें सर्वस्व तें ' सुवर्णत्व '. त्यालाच भाव म्हणतात. आणि त्याचेंच नांव म्हणजे 'सुवर्णत्व' हा जो केवळ शब्द याला भाववाचक नाम म्हणतात. अनेक पदार्थांमध्यें जो असा समानभाव, त्याचें नांव जाति किंवा सामान्य. म्हणून अनेक मनुष्यांमध्यें जो समानभाव, म्हणजे मनुष्यत्व, ती जाति. 'मनुष्य' हा शब्द उच्चारितांच, ज्या ज्या पदार्थांमध्यें मनुष्यत्व ही जाति आहे, ते ते सर्व पदार्थ लक्षांत येतात. म्हणून ' मनुष्य ' या शब्दाला सामान्यनाम म्हणावें. विशेष म्हणजे भेद. जेव्हां एकादा शब्द उच्चारिला असतां इतर सर्व

पदार्थ दूर होऊन, त्यापासून कांहीं तरी एकाच पदार्थाचा बोध होतो, तेव्हां त्या शब्दाला विशेषनाम म्हणतात. 'हरि' हा शब्द उच्चारितांच इतर सर्व पदार्थांची व्यावृत्ति होऊन 'हरि' म्हणून जो एकच पदार्थ (मनुष्य) त्याचें ग्रहण होतें.

पुस्तक २१, अंक ९।१०, सप्टेंबर, ऑक्टोबर १८८९

मराठी व्याकरणावर विचार

निबंध ३ रा

लिंगविचार

लिंग म्हणजे कोणतेंही सूचक चिन्ह किंवा खूण. हा मूळचा अर्थ, पण व्याकरणामध्यें या अर्थाची व्यापकता अंमळ संकुचित झाली आहे पदार्थांच्या नांवामध्यें पुंस्त्व, किंवा स्त्रीत्व, किंवा या दोहोंचाही अभाव, याचें सूचक असें जें कांहीं चिन्ह, त्यांचें नांव लिंग. अर्थात् हें नांव पुरुषाचें, किंवा स्त्रीचें, किंवा पुरूषही नव्हे आणि स्त्रीही नव्हे अशा पदार्थांचें, असा जो बोध त्याचें नांव लिंग.

या लिंग भेदावरून शब्दांच्या तीन जाति होतात; पुल्लिंग, स्त्रीलिंग, आणि नपुंसकलिंग.

ज्या शब्दावरून पुरुषाच्या नांवाचा बोध होतो, तो शब्द पुल्लिंग; ज्या शब्दावरून स्त्रीच्या नांवाचा बोध होतो तो शब्द स्त्रीलिंग; आणि ज्या शब्दावरून पुरुषाच्याही नांवाचा बोध होत नाहीं, अथवा स्त्रीच्याही नांवाचा बोध होत नाहीं, तो शब्द नपुंसकलिंग.

यावरून पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग या संज्ञा विशेषणरूप आहेत हें सहज लक्षांत येईल. तथापि क्वचित् त्यांचा प्रयोग नामाप्रमाणेंही होतो. जसें 'लिंगें तीन आहेत—पुल्लिंग, स्त्रीलिंग, आणि नपुंसकलिंग.' इ०.

कांहीं दिवसांमागें ‘ लिंग ’ हा शब्द व्याकरणामध्यें न योजण्याविषयीं कित्येकांचा फारच आग्रह असे. गुजराथी भाषेच्या व्याकरणांतून तर ‘ लिंग ’ हा शब्द मुळींच काढून टाकिला आहे. पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग यांच्या स्थानीं तेथें नरजाती, नारीजाति, नान्यतरजाती, या संज्ञा योजिल्या आहेत. याचें कारण असें सांगतात कीं ‘ लिंग ’ हा शब्द बीभत्स म्हणून शाळापुस्तकांत तो नसावा असा कित्येक अधिकारी लोकांनीं ठराव केला आहे. परंतु नीट शोध करून पाहिलें तर, त्यामध्यें बीभत्स मानण्यासारखें कांहीं नाहीं. लिंग हा संस्कृत शब्द आहे, आणि संस्कृतांतही तो बीभत्स मानिलेला नाहीं. याचा धात्वर्थ पाहिला तर, चित्रीकरण म्हणजे चिन्ह करणें, रूपांतर करणें, हा आहे. भगवें वस्त्र हें संन्याशाचें लिंग आहे, धूर हें अग्नीचें लिंग आहे, असे प्रयोग संस्कृतांत वारंवार येतात. त्या शब्दाच्या कांहीं एकदेशीय अर्थग्रहणावरून कदाचित् त्या विषयीं कित्येक लोकांच्या मनामध्यें कांहीं तिटकारा आला असेल तर येवो, परंतु तेवढ्यावरून तो शब्द त्याज्य ठरतो असें आम्हांला तर अगदीं वाटत नाहीं. इंग्रजी भाषेमध्यें sex, सेक्स, masculine म्यास्कुलिन्, feminine फेमिनिन्, neuter न्यूटर, हे शब्द निर्बाधपणें स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या शाळांत, व्याकरणामध्यें आणि सर्वत्र व्यवहारामध्यें चालत आहेत. त्या शब्दांपेक्षां या मराठी शब्दांमध्यें दोषास्पद असें कांहीं अधिक नाहीं. बीभत्सपणा म्हणून भाषेमध्यें मुळींच नाहीं असें जरी आम्ही म्हणूं शकत नाहीं, तथापि बीभत्स-पणाची कल्पना प्रायः अर्थ घेणाऱ्याच्या मनावर फार अवलंबून असते. बीभत्सपणाची स्पष्ट मर्यादा दाखविणारें साधन म्हटलें म्हणजे शिष्टजनांचा व्यवहार होय, असें आम्ही समजतों, आणि शिष्टजनांला जर या शब्दामध्यें कांहीं दोष आहे असें वाटत नाहीं, तर हा शब्द निर्दोष आहे असें म्हणणें योग्य आहे.

सृष्टीमध्यें जे असंख्य पदार्थ आहेत, त्यांना मनुष्यांनीं अनेक कारणांवरून अनेक नांवें दिलीं आहेत खरीं; पण संस्कृत, मराठी इत्यादि कित्येक भाषांमध्यें असा एक विलक्षण प्रकार आहे कीं, त्या भाषांतील कित्येक व्यवस्थांकडे नीट लक्ष दिलें असतां, त्या भाषांच्या उत्पादकांच्या मनोवृत्तीचें कांहीं एका प्रकारचें सूक्ष्म स्वरूप सहज आपल्या ध्यानांत येतें. कर्नाटकी इत्यादि भाषा बोलणारांना असा प्रश्न उत्पन्न होतों कीं, ' समुद्र हा निर्जीव पदार्थ, नदी हा निर्जीव पदार्थ आणि पाणी हा निर्जीव पदार्थ; असें असतां मराठी भाषेमध्यें समुद्र पुरुष, नदी स्त्री, पाणी नपुंसकलिंग, असें का ? आमच्या कर्नाटकादि भाषांमध्यें तर समुद्र, नदी, आणि पाणी हे तिन्ही शब्द नपुंसकलिंग ! ' परंतु या गोष्टीविषयीं जरी त्यांचें हवें तसें पूर्णपणें समाधान करणें कठीण काम आहे, तरी तें सर्वथा अशक्य आहे असें नाहीं. त्यांच्या भाषांमध्येंही अशा सारखाच कांहींसा प्रकार आहे. तो असा–त्यांच्या भाषांमध्यें समुद्र, नदी, उदक हे तिन्ही निर्जीव पदार्थ तर नपुंसकलिंग आहेतच; पण बैल, गाय, लेकरूं, या अर्थांचे शब्दही ते नपुंसकलिंगच मानितात. याचें कारण जर ते नीट लक्षांत आणतील, तर मराठी इत्यादि भाषांमध्यें जी लिंगव्यवस्था आहे, तिचें त्यांना तितकें आश्चर्य वाटणार नाहीं. बैल हा पुरुष, गाय ही स्त्री, आणि लेकरूं हें पुरुष किंवा स्त्री; असें असतां त्यांच्या ठायीं सारासार विचारशून्यत्व असल्यामुळें, त्यांच्या विषयीं, कर्नाटकादि भाषा बोलणारांच्या मनामध्यें क्षुद्र बुद्धि उत्पन्न होऊन त्यांच्या ठायीं त्यांनीं क्षुद्र वस्तूप्रमाणें सरसकट नपुंसकत्वाची कल्पना केली. यावरून पाहतां लिंगनिर्णय हा विषय कांहीं तरी वेडगळ प्रकारचा नव्हे; तर ती ती भाषा बोलणाऱ्या जनांच्या चित्त-वृत्तीची सूक्ष्मता दर्शविणारें एक साधन आहे, असें सहज दृष्टीस पडेल. मनुष्यें आणि देवता यांशिवाय इतर सर्व पदार्थांची योग्यता केवळ क्षुद्र

आहे असें मानण्याकडे कर्नाटकादि लोकांची मुळापासून प्रवृत्ति आहे, असें यावरून आपल्या लक्षांत येतें. फ्रेंच, आरबी, हिंदुस्थानी, बंगाली, इत्यादि भाषा बोलणारांच्या मनामध्यें अशी कल्पना आहे कीं, कोणताही पदार्थ घ्यानां, तो सजीव असो, निर्जीव असो, कसाही असो, पण त्याच्या ठायीं पुरुषत्व किंवा स्त्रीत्व यांतून कोणता तरी एक प्रकार अवश्य असायाचा. अर्थात् त्यांच्या भाषांमध्ये नपुंसकलिंग मुळींच नाहीं. इंग्रजी इत्यादि कित्येक भाषांमध्यें पाहिलें तर, तो कांहीं प्रकार वेगळा. सर्व निर्जीव पदार्थ तितके नपुंसकलिंग, प्राण्यांमध्यें पुरुष तितके पुल्लिंग, स्त्रिया तितक्या स्त्रीलिंग, हा सामान्य नियम झाला. परंतु मांजर, ससा, पोपट इत्यादि नाजूक दिसणारे प्राणी स्त्रीलिंग. स्वदेश, तारूं, इत्यादि मातृवत्सलतासूचक मानिलेले पदार्थ स्त्रीलिंग, चंद्र स्त्रीलिंग. सूर्य पुल्लिंग यावरून त्यांच्या मनाची स्थिति लक्षांत येते. संस्कृत, ल्याटिन, ग्रीक, इत्यादि प्राचीन भाषांमध्यें, आणि मराठी, गुजराथी इत्यादी अर्वाचीन भाषांमध्यें, मनुष्याच्या अंतःकरण-वृत्तीची सूक्ष्मता अतिशय दृष्टीस पडते. इतकेंच नव्हे, परंतु आमचा तर्क तर एथपर्यंत धांवतो कीं, या भाषांमधील लिंगव्यवस्थेचा निरालसपणें शोध करणारा जर कोणी उभा राहील, तर त्या लोकांची सामाजिक स्थिति आरंभी कशी होती, आणि कोणकोणत्या क्रमानें तिजमध्यें कसकसें अंतर पडत चाललें, याचा बराच उत्तम इतिहास त्या शोधापासून अवश्य निष्पन्न होईल.

असो. हा स्वतंत्र विषय आहे, म्हणून याकडे विशेष लक्ष देण्याला या प्रसंगीं अवकाश नाहीं. तथापि मराठीमध्यें आणि तिला आधारभूत जी संस्कृत भाषा तिजमध्यें, जी लिंगव्यवस्था आहे तिच्या ओघाचें किंचित् तरी एथें दिक्प्रदर्शन करणें अवश्य आहे असें दिसतें.

केवळ शब्दांच्या संबंधानें लिंगव्यवस्थेची कल्पना उत्पन्न झाल्या-पूर्वी म्हणजे अर्थात् व्याकरणशास्त्र उत्पन्न झाल्याच्यापूर्वी किंबहुना

सृष्टिमध्यें जेव्हां कधीं आरंभीं मनुष्य प्राण्याची उत्पत्ति झाली असेल तेव्हांपासूनच, त्याच्या मनामध्यें निरनिराळ्या पदार्थांच्या संबंधानें लिंगव्यवस्था उत्पन्न झाली असावी, असें स्पष्ट दिसतें. प्राणिमात्रामध्यें स्त्रीपुरुषभेद असल्यामुळें मनुष्यांच्या अवलोकनांत तो वारंवार येणें, हें साहजिकच आहे; आणि हा भेद त्याच्या अंतःकरणामध्यें पूर्णपणें बिंबून गेला असल्यामुळें, त्यांच्या सर्व मानसिक व्यवहारामध्यें अणि भाषणादिकांमध्यें त्या व्यवस्थेची छाया उठणें हेंही त्याप्रमाणेंच साहजिक आहे. उग्रता, पराक्रम, काठिन्य, भयानकता, या लक्षणांचा पुरुषजातीशीं विशेष संबंध आहे हें लक्षांत आणून पुरुषांच्या केवळ नांवांमध्यें सुद्धां कठोर उच्चार ते आणूं लागले. इतकेंच नव्हे, पण ज्या ज्या निर्जीव पदार्थांमध्यें हीं पूर्वोक्त उग्रतादि लक्षणें दिसलीं, त्यांनाही ते पुरुषाप्रमाणें मानूं लागले, आणि त्यांच्याही नांवांमध्यें कठोर उच्चारांची योजना करूं लागले. जसें—सुर, असुर, इंद्र, दक्ष, भृगु, पृथु, यांप्रमाणेंच स्वर्ग, मेघ, समुद्र, वृक्ष, शर, अरि, शत्रु, कर, ओष्ठ, दंत, कंठ, केश, पाद इत्यादि शब्द आणि त्या त्या अर्थांचे इतर शब्दही पुल्लिंग झाले. ज्यांमध्यें सौंदर्य, चपलता, मार्दव, कोमलता, इत्यादि लक्षणें दिसलीं ते पदार्थ स्त्रीवाचक झाले, आणि त्यांच्या नावांमध्येंही त्याप्रमाणेंच मार्दवादि लक्षणें येऊं लागलीं. पहा. देवता, देवी, विद्युत्, निशा, वल्ली, वीणा, दिशा, भूमि, नदी, शोभा, कांति इत्यादि शब्द आणि या अर्थांचे इतर शब्दही स्त्रीलिंग ठरले. जे कित्येक पदार्थ साहित्यवाचक दिसले, किंवा ज्यांच्यामध्यें स्वातंत्र्यादि गुण फार थोडे आढळले, त्यांना नपुंसकत्व आलें. पहा. अपत्य, कुटुंब, आकाश, अरण्य, पाताल, हिम, उदक, शीत, उष्ण, मांस, रुधिर, मुख, द्रव्य, बिल, फल, सुवर्ण, ताम्र, लोह, सुख, दुःख, शुभ, अशुभ, जल, पुष्प, लवण इत्यादि पदार्थ आणि त्यांचीं नांवें नपुंसक ठरलीं. याशिवाय आणखी विशेष चमत्कार

आहे. त्यांच्या त्यांच्या नांवांमध्यें तर हे कठोरत्वकोमलत्वादि प्रकार दिसतातच. पण त्यांना जे प्रत्यय लागतात त्यांमध्यें पुनः तोच प्रकार दिसतो. पुरुषाचें नांव ' रामः ' याच्या अंतीं विसर्गमय कठोर उच्चार. पण स्त्रीचें नांव ' रामा ' ह्यांत मार्दव आलें. नपुंसक शब्दांच्या अंतीं त्यांचें निर्बलत्व दाखविणारा ' अम् ' हा प्रत्यय आहेच. जलम्, लवणम्, गृहम्, इत्यादि. या सामान्य नियमांला अपवादक असे, आम्हांला म्हणजे प्रस्तुत कालच्या लोकांना, वाटणारे अनेक शब्द आढळतील, ही गोष्ट खरी आहे. परंतु सहस्त्रावधि वर्षांच्या अवधीमध्यें निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या कारणांवरून जे नवे नवे शब्द भाषेमध्यें येत गेले, त्या त्या प्रसंगीं त्या त्या शब्दांच्या संबंधानें त्या त्या लोकांच्या चित्तांवर कठोरत्वमृदुत्वादि गुणांचा कसकसा ठसा उठत गेला, हें जर समजण्याला कांहीं चांगलें साधन असेल, तर असें निःसंशय वाटतें कीं, संस्कृतादि भाषांतील सर्व शब्दांच्या लिंगव्यवस्थेचें सोपपत्तिक स्पष्टीकरण उत्तम प्रकारें करितां येईल. असो. पण यावरून आणखी एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे; ती ही कीं, शब्दांच्या अंत्यस्वरावरून जो लिंगनिर्णय बहुत प्रसंगीं होतो, त्याचें मूळ पाहिलें असतां तें वरील प्रकारापासूनच उत्पन्न झालें आहे. म्हणजे शब्दाच्या अंत्यस्वराच्या धोरणानें लिंगव्यवस्था झाली आहे असें नव्हे, तर लिंगव्यवस्था आधीं ठरून, तदनुसार त्याच्या अंत्यवर्णाची व्यवस्था नंतर झाली आहे. म्हणून अंत्यवर्णावरून शब्दाचा लिंगनिर्णय करणें हें कृत्य जरी सध्यां आम्हांला फार सोईचें पडतें खरें, तरी वस्तुतः कार्यावरून कारण शोधून काढण्यासारखें हें कृत्य आहे, असें म्हणण्याला कांहीं बाध नाहीं. पण भाषेची वृद्धि होतां होतां अशीही गोष्ट झालेली दिसते कीं, नवीन नवीन शब्दांची लिंगव्यवस्था इतर शब्दांच्या धोरणानें किंवा साहश्यावरून त्यांच्या त्यांच्या अंत्यवर्णाच्या किंवा उच्चाराच्या अनुरोधानें होत गेली

आहे. असो, कोणत्याही प्रकारें कां होईना, परंतु लिंगव्यवस्थेच्या ज्ञानाला काय काय साधनें सध्यां उपलब्ध आहेत तीं पाहूं.

प्राणिवाचक शब्दांच्या लिंगनिर्णयाविषयीं सामान्यनियम.

शब्द संस्कृत किंवा मराठी असो, किंवा दुसऱ्या कोणत्याही भाषेंतून घेतलेला असो, तो पुरुषवाचक असेल तर, पुल्लिंग आणि स्त्रीवाचक असेल तर स्त्रीलिंग मानणें, ही गोष्ट सयुक्तिकच आहे. जसें संस्कृतांतील देव, नृप, हस्ती, यति, आणि मराठींतील राजा, घोडा, कुत्रा, लांडगा, इत्यादि शब्द पुल्लिंग; आणि देवी, दासी, गोपी, व्याघ्री, आणि राणी, घोडी, कुत्री, लांडगी, इत्यादि शब्द स्त्रीलिंग, हें सरळ आहे.

कित्येक शब्द प्राणिवाचक असतांही त्यांच्या स्त्री-पुरुषभेदाकडे जेव्हां बोलणाराचें लक्ष नसतें, तेव्हां ते नपुंसकलिंग मानिलें जातात, जसें मूल, कुत्रें, बकरें, घोडें इत्यादि. परंतु जेव्हां त्यांच्या भेदाकडे लक्ष असतें, तेव्हां तेच शब्द मूल अथवा मुलगा, कुत्रा, बकरा, घोडा, इत्यादि प्रकारें पुल्लिंग होतात; तसेंच मूल अथवा मुलगी, कुत्री, बकरी, घोडी, इत्यादि प्रकारें स्त्रीलिंग होतात. याप्रमाणेंच मनुष्य, माणूस, डुकर, आस्वल, सांबर, माकड उंट हे शब्द पुल्लिंग आहेत; पण यांचा पुरुषत्वभेद लक्षांत न आणला तर हे नपुंसकलिंग आहेत.

कित्येक क्षुद्र प्राण्यांमधील स्त्रीपुरुषभेद लक्षांत येत नाहीं, तेव्हां त्यांचा लिंगनिर्णय बहुशः निर्जीव पदार्थांच्या लिंगनिर्णयाप्रमाणें होतो; त्या विषयीं पुढें विचार केला आहे.

कित्येक शब्दांचा लिंगनिर्णय थोडासा चमत्कारिक दिसतो. जसें कुटुंब (संस्कृत), कबीला (फारसी), दार (संस्कृत), या तीन्ही शब्दांचा अर्थ यद्यपि स्त्री हा आहे, तथापि **कुटुंब** शब्द नपुंसक, **कबीला** शब्द पुल्लिंग, आणि **दार** शब्दही पुल्लिंग आहे. याचें कारण असें दिसतें कीं, कुटुंब या शब्दामध्यें घर, घराणें, अशाही अर्थाची छाया असल्यामुळें

त्याला नपुंसकत्व आलें. तसेंच कबीला या शब्दालाही. परंतु हिंदुस्थानी भाषेंत नपुंसक शब्द नाहींत. आणि हा शब्द तर त्या भाषेंतून मराठींत आला आहे, यामुळें त्याला त्याच्या आकारांतत्वास्तव पुल्लिंगत्व आलें. एकारांत शब्द नपुंसक, आणि आकारांत शब्द पुल्लिंग असतात, असा पुढें नेम येईल, त्यावरून याची समजूत स्पष्ट होईल. दार हा शब्द पुल्लिंग असून पुनः बहुवचनीं असतो; याचें स्पष्ट कारण जरी ध्यानांत येत नाहीं, तरी असें दिसतें कीं, बाईसाहेब, महाराज, सरकार, अशांसारखी या शब्दाची योजना होत असावी, आणि यामुळें आदरास्तव त्याला बहु-वचनत्व आणि पुंस्त्व कदाचित् आलें असावें.

निर्जीव पदार्थांच्या लिंगव्यवस्थेचे नियम.

संस्कृत भाषेंतील जे शब्द मूळच्या शुद्ध रूपानें मराठींत आले आहेत, त्यांचीं लिंगव्यवस्था मुळीं संस्कृतांत होती तशीच प्रायः मराठींत आहे. क्वचित् भेद पडतो त्याकडे पुढें लक्ष देऊं.

संस्कृत भाषेमध्यें जितकीं स्त्रियांचीं नांवें तितकीं प्रायः आकारांत किंवा ईकारांत असल्यामुळें, तोच नियम निर्जीव पदार्थांच्या नामामध्येंही आला आणि त्यावरून उलट घेऊन असें म्हणतां येतें कीं, आकारांत आणि ईकारांत जी निर्जीव पदार्थवाचक किंवा क्षुद्रप्राणिवाचक संस्कृत नामें, तीं तीं सर्व स्त्रीलिंग आहेत. जसें—लाक्षा, लंका, आज्ञा, इच्छा, रथ्या, मथुरा, यूका; कंदली, बदरी, खारी, कौमुदी, स्थाली, द्वारावती, किंवदंती, कबरी, पल्ली, इ०. औकारांत ‘ नौ ’ (म्ह. तारूं) शब्दही स्त्रीलिंग आहे.

अकारांत शब्द, म्हणजे ज्या शब्दाच्या अंतीं अकार अर्थात् ‘अ’ हा स्वर आहे तो शब्द. जसें देव, विश्व, ग्रह इ०. याप्रमाणेंच रमा, विद्या, आज्ञा इत्यादि शब्द आकारांत; हरि, रवि, इत्यादि इकारांत; गुरु, मधु, लघु, इत्यादि उकारांत. याप्रमाणेंच पुढेंही स्पष्ट आहे.

आकारांत संस्कृत शब्दांमध्यें जे ' मा ' किंवा ' इमा ' एतत्प्रत्ययांत अदेहपदार्थवाची शब्द, ते पुल्लिंग आहेत. जसें—अणिमा, गरिमा, महिमा, लघिमा, आत्मा, प्रथिमा, इ०. याचें कारण असें कीं, हे मूळचे आकारांत नाहींत; अणिमन्, गरिमन्, असें नकारांत आहेत. याप्रमाणेंच ब्रह्मा हा शब्द ब्रह्मन् असा नकारांत, आणि चंद्रमा, हा शब्द चंद्रमस् असा सकारांत आहे. या गोष्टी ध्यानांत ठेविल्यानें लिंगभेद समजण्याला तितकें सहाय होतें. याप्रमाणेंच पंथा, सखा या पुल्लिंग शब्दांचीं मूळ रुपें पथिन् आणि सखि अशीं आहेत; आकारांत नाहींत.

गोपा, सोमपा, धूम्रपा, शंखध्मा, असें कांहीं धात्वंत शब्द प्रत्यक्ष आकारांत असून पुल्लिंग आहेत; परंतु सध्यां हे शब्द अपवादक मानून निर्वाह करण्यास बाध दिसत नाहीं.

माता, स्वसा, दुहिता, ननांदा, हे संस्कृत शब्द स्त्रीलिंग आहेत खरे, आणि मराठी मध्येंही हे आकारांत आहेत, तथापि संस्कृतांत हे मातृ, स्वसृ, दुहितृ, ननांदृ, असे मुळचे ऋकारांत आहेत. आणि त्यांचीं प्रथमविभक्तीचीं एकवचनरूपें आकारांत होतात. तींच आकारांत रूपें मराठींत आलीं आहेत. याप्रमाणेंच पिता, भ्राता, सविता, जनिता, कर्ता, इत्यादि पुल्लिंग शब्द मूळचे ऋकारांत आहेत.

ब्रह्मा, चंद्रमा हे शब्द देववाचक, अर्थात् पुरुषवाचक असल्यामुळें पुल्लिंग आहेतच; म्हणून त्यांचें एथें वरील परिगणनेंत ग्रहण केलें नाहीं, आणि ग्रहण करण्याचें कारणही नाहीं.

कित्येक अप्राणिवाचक संस्कृतशब्द असे आहेत कीं ते दीर्घईकारांत असल्यामुळें स्त्रीलिंग आहेतच, परंतु त्यांचेंच दुसरें विशेष प्रचारांत असणारें आणि मुळचें खरें मानिलेलें एक ऱ्हस्वइकारांत रूप आढळतें. तेंही स्त्रीलिंगच आहे. ते शब्द हे—

अवनि–नी	द्रुणि–णी	राजि–जी
आवलि–ली	धमनि–नी	रात्रि–त्री
कटि–टी	धर्षणि–णी	लिपि–पी
कंबि–बी	धावनि–नी	वर्तनि–नी
कर्कटि–टी	धूलि–ली	वर्ति–र्ती
करोटि–टी	निश्रेणि–णी	वल्लभि–भी
कांचि–ची	निष्कुटि–टी	वल्लरि–री
किंकिणि–णी	पदवि–वी	वापि–पी
कुटि–टी	पर्कटि–टी	वीचि–ची
केलि–ली	परिपाटि–टी	वेणि–णी
कोटि–टी	प्रसरणि–णी	वेदि–दी
क्षोणि–णी	पाटलि–ली	वेल्लि–ल्ली
खनि–नी	पेशि–शी	शुंठि–ठी
तरणि–णी	भेरि–री	श्रेणि–णी
तरि–री	मंजरि–री	सरणि–णी
त्रुटि–टी	मसि–षि–षी	स्वाति–ती
दर्वि–र्वी	महि–ही	इ.

याप्रमाणेंच ऊकारांतांमध्यें

स्त्रीलिंग—

कच्छु–च्छू   कर्कन्धु–न्धू इ.

अपवादक शब्द.

नाभि पु.   नाभी पु. स्त्री.

नेमि पु.   नेमी स्त्री.

ति प्रत्ययांत क्रियावाचक जीं संस्कृत नामें तीं स्त्रीलिंग जाणावीं. जसें.– कृति, गति, मति, रति, रीति, भीति, स्थिति, युति, प्रीति, व्याप्ति, क्लृप्ति,

बुद्धि, सिद्धि, ऋद्धि, इ०. यांत बुद्धि, सिद्धि, ऋद्धि, इत्यादि शब्द हे 'ति' प्रत्ययांतच आहेत; संधीमुळें त्यांचें रूपांतर मात्र झालें आहे.

मराठींत येणारे कित्येक संस्कृत शब्द असे आहेत कीं, त्यांच्या लिंग-निर्णयाचे नियम देण्यापेक्षां, त्यांची लिंगभेदानुसारें परिगणना करणें हें अधिक उपयोगी होईल. म्हणून तसें करूं. शब्द कांहीं फार नाहींत.

ऱ्हस्व इकारांत संस्कृत स्त्रीलिंग शब्द

कृषि	ज्यानि	भ्रुकुटि
छवि	त्रिपुटि	रुचि
जीर्णि	पुटि	सूचि

ऱ्हस्व इकारांत संस्कृत पुल्लिंग शब्द

अग्नि	उपाधि	दृति	मणि
अंघ्रि	कलि	ध्वनि	मेधि
अरत्नि	कुक्षि	निधि	विद्रधि
अलि	कृमि	पतत्रि	विधि
अहि	चूर्णि	परिधि	व्याधि
आधि	तिमि	पौलि	संधि (म. स्त्री.)
इषुधि	दुंदुभि	प्रणिधि	समाधि(म. स्त्री.)

ऱ्हस्व इकारांत संस्कृत नपुंसक शब्द

अस्थि	अक्षि	सक्थि
वारि	दधि	इ.

ऱ्हस्व उकारांत संस्कृत पुल्लिंग शब्द

अणु	धातु	वास्तु
इषु	पायु	विदु
उर्वारु	पांशु	वेणु

ऊरु	पांसु	वेपथु
कर्कारु	बाहु	शंकु
केतु	बिंदु	शिग्रु
चरु	मंतु	शिशु
जंतु	मन्यु	सेतु
जायु	मयु	हेतु
तंतु	मायु	
तरु	वायु	इ.

उकारांत पुल्लिंग, नपुंसकलिंग

कंबु	केशरु	शीधु–थु इ.

उकारांत नपुंसकलिंग

हिंगु (म. पु.)	जानु	दारु
जतु	वस्तु (म. स्त्री.) इ.	

इकारांत उभयलिंग

तिथि (म. स्त्री.)	मौलि	मरीचि इ०

उकारांत उभयलिंग

रेणु (म. पु.)
हनु–नू (म. स्त्री.)
सिंधु (सागर किं. नद.) पु.
सिंधु (नदी) स्त्री. इ.

दीर्घ ईकारांत व ऊकारांत एकाक्षरी संस्कृत शब्दांचें स्त्रीलिंग—

श्री, धी, ह्री, भू, भ्रू, पूः (नगरी) इ.

मूळ संस्कृत शब्द आकारांत स्त्रीलिंग असून, त्याचा अपभ्रंश जर मराठींत अकारांत किंवा आकारांत झाला असेल, तर तो शब्दही प्रायः स्त्रीलिंगच असतो. जसें—

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
कक्षा	काख	चिंचा	चिंच
भिक्षा	भीक	जंघा	जांघ
जिव्हा	जीभ	खट्वा	खाट
मुद्रा	मोहोर	दंष्ट्रा	दाढ
माया	माव	मन्या	मान
लज्जा	लाज	इष्टिका	ईट, वीट
निद्रा	नीज	समिधा-ध्	समीध
लत्ता	लात-थ	शुंडा	सोंड
लाक्षा	लाख	बुभुक्षा	भूक
संध्या	सांज	तृष्णा	तहान
वंध्या	वांझ	झंपा	झेंप
गुंजा	गुंज	जंघा	जांघ
शर्करा	साखर-कर	हरिद्रा	हळद
पूर्णिमा	पुनव	वेदना	वेण
अमावास्या	अंवस	धारा	धार
द्वितीया	बीज	तितिक्षा	तिडिक
तृतीया	तीज	कामला	कावीळ
माला	माळ	कणिका	कणीक
वेला	वेळ क्व. पु.	आज्ञा	आण
पेया	पेज	अत्तिका	आत
शय्या	शेज	ननांदा	नणंद
रक्षा	राख	संहिता	संथा
शिंका	शिंक	यात्रा	जात्रा, जत्रा
घंटा	घांट	ज्या (पृथ्वी)	जागा (हिं.)

पुढील इकारांत, ईकारांत, ऊकारांत संस्कृत शब्द स्त्रीलिंग आहेत; म्हणून त्यांचे अपभ्रंश जरी अकारांत झाले आहेत, तरी तेही मूलसंबंधास्तव स्त्रीलिंगच आहेत.

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
कदली	केळ (झाड)	कुक्षि	कूस
बदरी	बोर (झाड)	पल्ली	पाल
सप्तपर्णी	सातवण	वल्ली	वेल (क्व. पु.)
भित्ति	भिंत	चुल्ली	चूल
मूर्ती	मूर्त	धूलि	धूळ
जाति	जात	प्रीति	प्रीत
रात्रि	रात्र	नीति	नीत
कर्तरी	कातर	निश्रेणि	निसण
वीथि	वीद	खनि	खाण
तिथि	तीथ	नारी	नार
रीति	रीत	खारी	खार
वितस्ति	वीत	कुंडी	कोंड (स्त्री. डोह)
व्याधि (पु.)	व्याध	कंडू	कंड इ.

संस्कृतामध्यें अप्राणिवाचक ईकारांत शब्द स्त्रीलिंग असतात. याच धोरणावरून मराठीमध्येंही तसले शब्द सर्व स्त्रीलिंगच असतात. उदाहरणें– भाकरी, भाजी, काठी, पाटी, सरी, दोरी, पेटी, छत्री, इ.

ज्या संस्कृत शब्दाच्या अंतीं 'त्र' हें अक्षर असतें, ते शब्द प्रायः नपुंसक असतात.

नेत्र	शस्त्र	क्षेत्र (शेत, म.)
वक्त्र	सत्र	गात्र (गात, म.)
सूत्र (सूत, म.)	पवित्र (पोवतें, म.)	चरित्र

मूत्र (मूत, म.)	वेत्र (वेत, म.)	चारित्र
चित्र	स्तोत्र	तोत्र
तंत्र	गोत्र (गोत, म.)	शास्त्र
यंत्र (जातें, म.)	होत्र	पोत्र
खनित्र	वस्त्र	कलत्र
भटित्र	छत्र	नक्षत्र
पात्र	पत्र (पातें, म.)	मित्र (म. पु.)
	अरित्र, इत्यादि.	

यावरून मराठी शब्द धोत्र आणि धोतर हेही नपुंसकलिंग.

अपवादक शब्दः—

पुत्र, मंत्र, मित्र (सूर्य), क्षत्र, अमित्र, गोत्र (पर्वत), पौत्र यांच्या अंतीं ' त्र ' असतांही हे पुल्लिंग आहेत.

हे पुढील संस्कृत शब्द सर्व नपुंसकलिंग आहेत. यांच्या प्रातिपदिकांच्या अंतीं मन्, अस्, इस् किंवा उस्, हीं अक्षरें आहेत. परंतु प्रथमा आणि द्वितीया म्हणून जीं त्यांचीं विभक्तिरूपें आहेत, त्यांमध्यें नकार राहत नाहीं, आणि सकाराच्या स्थानीं विसर्ग होतो. मराठीमध्यें हे शब्द येतांना यांतील नकार तर आधीं गेला आहेच, विसर्गही नाहींसा होतो. तथापि खुणेसाठीं त्यांचीं मूळचीं प्रातिपदिकें ध्यानांत ठेवल्यानें त्यांचें लिंग समजण्याला तितकी सोई होते आणि अन्यत्रही समासादिकीं उपयोग होतो.

नामन्	नाम	सरस्	सर
व्योमन्	व्योम	तमस्	तम
प्रेमन्	प्रेम	रजस्	रज
जन्मन्	जन्म	वयस्	वय
कर्मन्	कर्म	मनस्	मन
वर्मन्	वर्म	वचस्	वच

शर्मन्	शर्म	श्रेयस्	श्रेय
चर्मन्	चर्म	महस्	(आनंद)
नर्मन्	नर्म	नभस्	नभ
भर्मन्	भर्म	ओजस्	(सामर्थ्य)
मर्मन्	मर्म	शिरस्	(मस्तक)
क्लोमन्	क्लोम	मेदस्	मेद
धामन्	धाम	रोधस्	रोध
दामन्	दाम (दावें)	स्रोतस्	स्रोत
लोमन्	लोम (लंव,स्त्री)	आयुस्	आयु, आयुष्य
रोमन्	रोम	धनुस्	धनु, धनुष्य
तेजस्	तेज	वपुस्	वपु
पयस्	पय	सर्पिस्	सर्पि (तूप)
यशस्	यश	इत्यादि	

अपवादक शब्द—

सदस् (सभा) स्त्री. न.

पाणी, लोणी, कांजीं, चिंचवणी, मिरीं, दहीं, हे मराठी शब्द ईकारांत असून नपुंसकलिंग आहेत. याचें कारण असें कीं, यांचे मूळचे संस्कृत शब्द नपुंसकच होते, पण ते ईकारांत मात्र नव्हते.

संस्कृत	प्राकृत	मराठी
पानीयम्	(पाणीअं)	पाणी
नवनीतम्	(नोनीअं)	लोणी
कांजिकम्	(कांजिअं)	कांजीं
मरीचम्	(मरीअं)	मिरीं
दधि	(दहिं)	दहीं

चिंचवणी हा शब्द ' चिंचपाणी ' याचा अपभ्रंश आहे, म्हणून अर्थात् हाही नपुंसक. पाणी, लोणी, यांमध्यें णकारामुळें अनुनासिक उच्चार आहेच, म्हणून पुनः बिंदु देत नाहींत.

कित्येक संस्कृत शब्दांचें मूळचें लिंग एक असून प्रायः भ्रांतीमुळें मराठी-मध्यें भलतेंच आलें आहे, आणि तें सर्वमान्य झालें आहे. असे कांहीं शब्द एथें देतों.

संस्कृत.	मराठी.
वाट पु.	स्त्रीलिंग
शाक पु. न.	स्त्रीलिंग
अग्नि पु. (प्रा. अग्गि)	आग स्त्री.
रथ्या स्त्री.	रस्ता पु.
हिंगु न.	हिंग पु.
महिमा पु.	पु. क्वचित् स्त्री.
वस्तु न.	स्त्री. वस्त स्त्री.
जन्म न.	पु. न.
वेला स्त्री.	वेळ स्त्री; क्वचित् पु.
काल पु.	काळ पुल्लिंग. पण सकाळ स्त्री. संध्याकाळ स्त्री. क्वचित् पु.
प्रहर पु.	पार पु. पण दुपार स्त्री. क्वचित् पु.
लशुन न.	लसूण स्त्री.
त्रिफला स्त्री.	त्रिफळा पु.
शाण न.	सहाण, साण स्त्री.
नासिका स्त्री.	नाक न.
नेत्र न.	पु. न.
दोला स्त्री.	डोला पु.

गुड पु. — गूळ पु. क्वचित् न.
ग्रंथि पु. (प्रा. गंठी) — गांठ स्त्री.

शब्दाला ' त्व ' प्रत्यय लागून झालेले संस्कृत शब्द सर्व नपुंसक आहेत. उदाहरणें—गुरुत्व, महत्त्व, मनुष्यत्व इ.

त्याप्रमाणेंच, शब्दाला वृद्धि होऊन झालेले भाववाचक शब्द नपुंसक आहेत. उदाहरणें—मृदु, लघु, गुरु, स्थूल, ईश्वर, केवल, इत्यादिकांना वृद्धि होऊन झालेले मार्दव, लाघव, गौरव, स्थौल्य, ऐश्वर्य, कैवल्य, इत्यादि.

धातूला ' अन ' प्रत्यय लागून झालेले क्रियावाचक शब्द नपुंसक आहेत. उदाहरणें—गमन, श्रवण, पूरण, भ्रमण, आनयन, स्नान, दान, व्याख्यान इ.

धातूला ' त ' प्रत्यय लागून झालेले शब्द जर क्रियावाचक असले, तर तेही नपुंसक असतात. जसें–गत (म्ह. गमन), स्खलित (स्खलन, चुकी), आचरित (आचरण) इ.

परंतु असें जेव्हां त्यांमध्यें क्रियावाचकत्व नसतें, तेव्हां ते शब्द विशेषण-रूप असतात; आणि विशेषणाचें लिंग विशेष्याच्या लिंगाप्रमाणें असतें; म्हणून तेथें हा नियम चालणार नाहीं.

' य ' प्रत्ययांत अथवा ' त्य ' प्रत्यत्यांत क्रियावाचक संस्कृत शब्द नपुंसकलिंग असतात. जसें—कार्य, कृत्य, नृत्य, इ. पण एथेंही वरचा नियम लागतो.

वरील ' त्व ' प्रत्ययावरून प्राकृतांत ' तन ' आणि त्यावरून मराठी-मध्यें ' पण ' प्रत्यय आला आहे. म्हणून ' पण ' प्रत्ययान्त भाववाचक मराठी शब्द नपुंसकलिंग आहेत. जसें बाळपण, थोरपण, माणुसपण, इ.

याप्रमाणेंच संस्कृत ' अन ' प्रत्ययावरून झालेला मराठींतील जो ' ण ' प्रत्यय, तदंत जे धातुसाधित (कृदंत) शब्द ते नपुंसकलिंग आहेत. उदाहरणें—जेवण, भांडण, नेसण, दळण, कांडण, इ.

या नियमाला अपवादक शब्द बरेच आहेत. उदाहरणें—

गाळण	लोळण
चाळण (सं. चालनी)	ठेवण
आठवण	कुचंबण
नागवण	भरवण
बोळवण	पुरवण-णी
चढण	मिरवण
उतरण	जिरवण
उठवण	ओमण
शिवण (सं. सेवनी)	भांगलण
पिळण	सांठवण
वीण	गोठण
खेटण	वैरण
सोडवण	इत्यादि

हे वरील शब्द मूळचे ईकारांत असून नंतर अकारांत झाले, आणि त्या कारणानें यांच्या ठायीं मूळचें स्त्रीलिंगत्व राहिलें आहे, असा भास होतो. या गोष्टीला बेणणी, कापणी, लावणी, पेरणी, फोडणी, पाठवणी, मांडणी, इत्यादि ईकारांत धातुसाधित (कृदंत) शब्द प्रमाणभूत आहेत, असें म्हणण्याला बाध दिसत नाहीं. यांशिवाय गर्भिणी—गाभण, डंखिनी—डांकीण, हस्तिनी—हत्तीण इत्यादि उदाहरणें अशा कल्पनेला साधकच आहेत. इतकेंच नव्हे, पण असें दिसतें कीं बहुतेक मराठी अकारांत स्त्रीलिंग शब्द हे मूळचे ईकारांत, आणि कांहीं थोडे आकारांत असून नंतर कालांतरानें ते अकारांत झाले आहेत. हा नियम आरबी, फारशी इत्यादि परभाषांतील अकारांत शब्दांना कदाचित् लावतां येणार नाहीं, हें उघड आहे.

'णूक' प्रत्ययान्त कृदंतें स्त्रीलिंग आहेत. उदाहरणें—

वागणूक	वर्तणूक	नांदणूक	करमणूक
चालचलणूक	मिरवणूक	वसणूक	जाचणूक
अडणूक इ.			

याप्रमाणेंच आगळीक, शिळीक, कुळीक, सोहिरीक, सोयरीक, इत्यादि 'ईक' प्रत्ययांत नामें स्त्रीलिंग आहेत.

या दोन्हीं प्रकारच्या शब्दांतील ऊक, ईक हे अंश, संस्कृतांतील 'उका' 'इका' यांपासून आलेले असावेत असें वाटतें.

धातुशब्दाची द्विरुक्ति होऊन सिद्ध झालेले शब्द स्त्रीलिंग आहेत. उदाहरणें—धांवाधाव, पळापळ, ताणाताण, रडारड, चळवळ, थाराथार, आरडाओरड, धराधर, मारामार, आटपाआटप, खळबळ, गुणगूण इ. याप्रमाणेंच

ओढाताण	झटापट	येरजार	खटपट
उठाठेव	मारहाण	उठाबस	लटापट
चढाओढ	जळफळ	इ.	

संस्कृत शब्दांचें जे अपभ्रंश मराठींत आले आहेत, त्यांत दोन प्रकार आहेत.

१. कित्येक शब्द प्रातिपदिकस्थितीमध्यें असतांच त्यांचे अपभ्रंश झाले आहेत. उदाहरणार्थ, गृह–घर, भ्रातृ–भाऊ, यातृ–जाऊ, नप्तृ–नातू, अग्नि–अग्गि–आग इ.

२. दुसरा जो प्रकार आहे, तो कांहीं वेगळा आहे; म्हणजे प्रथमाविभक्त्यंत रूपांचें हे अपभ्रंश आहेत. उदाहरणार्थ, स्थापनम्–ठेवणें, उत्थानम्–उठणें, खादनम्–खाणें, जेमनम्–जेवणें इ.

कित्येक शब्दांचे दोहों प्रकारें अपभ्रंश झाले आहेत, त्यांचीं कांहीं उदाहरणें देऊं—

१ जेमन	जेवण.
२ जेमनम्	जेवणँ–जेवणें
१ खादन	खाण.
२ खादनम्	खाणँ–खाणें.
१ दलन	दळण.
२ दलनम्	दळणँ–दळणें.
१ वेष्टन	वेष्टण.
२ वेष्टनम्	वेष्टणँ–वेष्टणें इ०

यांमध्यें असें लक्षांत येईल कीं, 'अन' या पासून 'ण' झाला; आणि 'अनम्' या पासून 'णँ', आणि त्या पासून मग केवळ लिहिण्यांत आणि कोंकणी भाषेंत बोलण्यांतही येणारा 'णें' हा प्रत्यय झाला. त्याप्रमाणेंच—

भांडम्	यापासून	भांडँ–भांडें
सुवर्णम्	,,	सोनँ–सोनें
अंडम्	,,	अंडँ–अंडें
कंबलम्	,,	कांबळँ-कांबळें

इत्यादि शब्दांची सिद्धि झाली.

यावरून सहज लक्षांत येईल कीं, संस्कृतामध्यें 'अम्' हें जें अकारांत नपुंसक शब्दांचें लक्षण, तेंच मराठीमध्यें अँ आणि एँ या रूपांनीं आविर्भूत झालें आहे; म्हणूनच मराठींतील एँकारांत नामें नपुंसकलिंग आहेत. उदाहरणार्थ—घोडें, तळें, कुत्रें, सोनें, रुपें, तांबें इ.

दुसरी एक गोष्ट यावरून लक्षांत येण्यासारखी आहे. कित्येक लोक असें मानितात कीं लोणचें, चांगलें, लागलें, इत्यादि नपुंसक शब्दांचे दुसरे उच्चार लोणचँ, चांगलँ, लागलँ इत्यादि प्रकार जे बोलण्यामध्यें येतात, त्यांना कांहीं आधार नाहीं. परंतु ही त्यांची समजूत खोटी आहे. अँ हाच उच्चार मूळचा, आणि त्यापासून नंतर एँ हें वरील उदाहरणांत स्पष्ट

दाखविलेंच आहे. परंतु यावरून अमुक उच्चार खरा आणि अमुक खोटा असें कांहींच सिद्ध होत नाहीं. इतकेंच म्हणतां येईल कीं, कोकणामध्यें ऍंची प्रवृत्ति फार आणि देशावर अँची प्रवृत्ति फार; ती एथपर्यंत कीं, केव्हां केव्हां त्यांतील अनुनासिकत्व मुळींच ऐकूं देखील येत नाहीं. केवळ लांबट ओढलेला 'अ' ऐकूं येतो. परंतु लेखामध्यें सर्वत्र 'ऍं'च लिहितात, हें एका अर्थी भ्रांतिनिवारणाला बरें आहे.

हे जे वर अपभ्रंशाचे दोन प्रकार दाखविले, ते पुल्लिंग नामामध्येंही आहेत. प्रथम प्रकार—

वट	वड	पनस	फणस
पिप्पल	पिंपळ	वृक्ष	रूख
पुत्र	पूत	दंत	दांत
चंद्र	चांद	मार्ग	माग
उष्ट्र	उंट	कर्ण	कान इ.

आतां दुसरा प्रकार—

संस्कृत	मराठी
अंगुष्ठः	आंगठा
स्कंधः	खांदा
गवयः	गवा
गर्भः	गाभा
बधिरः	बहिरा
काणः	काणा
मूकः	मुका इ.

या दुसऱ्या प्रकारावरून असा सार्वत्रिक नियम निष्पन्न होतो, कीं शुद्ध मराठी आकारांत जितके शब्द तितके पुल्लिंग.

उदाहरण—घोडा, वाडा, नाडा, पत्रा, लखोटा, तांब्या, डोळा, दिवा, उसासा इ.

हा नियम फार व्यापक आहे. संस्कृतांतून अपभ्रंश पावून झालेले मराठी आणि मूळचे अनुत्पन्न मराठी असे दोहों प्रकारचे शुद्ध मराठी शद्ब तर या नियमांत येतातच. पण यांशिवाय आणखी आरबी फारसी इत्यादि भाषांतून आलेले आकारांत शद्बही या नियमानें वागतात. उ. नमूना, खरीता, खजाना, मुजाखा, मसुदा, तर्जुमा इ.

अपवादक शद्ब—

१. हवा, रजा, मजा, सजा, दवा (क्वचित् पु.), इजा, निशा, परवा, हे परभाषांतून आलेले शद्ब स्त्रीलिंग आहेत.

२ साहेबा, सुलताना, इत्यादि स्त्रीवाचक शद्ब अर्थात् स्त्रीलिंग.

असो. वर दाखविलेल्या दुसऱ्या प्रकारच्या अपभ्रंशांकडे जर लक्ष दिलें, तर एका मोठ्या शंकेचें सहज उत्तम निवारण होतें. ती शंका ही—जर मराठी भाषा संस्कृतापासून उत्पन्न झाली आहे, तर संस्कृतांतील आकारांत शब्द स्त्रीलिंग असतां, मराठींतील आकारांत शब्द पुलिंग कां ? पण या शंकेचें निवारण असें-संस्कृतांतील शद्बांचा लिंगनिर्णय मराठी भाषेनें किती जागृतपणानें राखून ठेविला आहे हें मागील सर्व प्रकरण वाचणारांच्या ध्यानांत उत्तमप्रकारें आलें असेलच. त्याप्रमाणेंच आकारांत पुल्लिंग शद्बांमध्येंही संस्कृतांतील लिंगनिर्णयाला मराठीनें बळकट धरून ठेविलें आहे तेथें कांहीं उणेपणा नाहीं. मराठींत असलेल्या संस्कृत आकारांत शब्दांमध्यें आणि त्यांच्या अपभ्रंशांमध्येंही, त्यांचा लिंगनिर्णय जसा मुळाप्रमाणें राखिला आहे, तसाच या आकारांत मराठी शब्दांमध्येंही तो मुळाप्रमाणें राखिला आहे. यद्यपि ते शब्द मुळीं विसर्गयुक्त अकारांत होते, आणि कालांतरानें त्यांचें रूप बदलून ते ओकारान्त झाले तरी त्यांनीं आपला मूळचा गुण सोडिला नाहीं. ते पुल्लिंगाचे पुल्लिंगच राहिले ! इत

केंच नव्हे, तर जे शब्द संस्कृताहून भिन्न अशा दुसऱ्या कोणत्याही उगमापासून आलेले होते, त्या सर्वांनाही त्यांनीं आपल्या जोडीस आणून बसविलें. जे आकारांत होते ते पुल्लिंग, जे ईकारांत होते ते स्त्रीलिंग, आणि जे एँकारांत होते ते नपुंसक ठरवून टाकिले.

असो. यासंबंधानें आणखी ज्या गोष्टी लक्षांत येतात, त्यांतील कांहीं सांगू. कित्येक ऊकारांत शब्दांचा लिंगनिर्णय मूळ शब्दावरून कसा होतो पहा—

पुल्लिंग.

संस्कृत.	मराठी
कंदुकः	चेंडू
गेंदुकः	झेंडू, गेंद
लड्डुकः	लाडू
पूयः	पू
गूथः	गू
वृश्चिकः	विंचू
गोधूमः	गहूं
गंडूपदः	काडू गांडवळ

यांच्या धोरणानेंच गडू, पेरू, चाटू, नारू (तंतु-कानडी), सातू, काजू, राजू, अडू, भिडू, इत्यादि शब्द पुल्लिंग आहेत.

मराठीमध्यें अनुनासिकान्त पुल्लिंग शब्द म्हटला म्हणजे म्हणजे 'गहूं' हा एकच. परंतु त्याचा जो मूळ शब्द ' गोधूम , ' त्यामध्यें ' म ' हा अनुनासिक वर्ण असल्यामुळें, गोधूम–गहूंअ–गहूं, यांमध्यें तो 'म' कार शेवटपर्यंत अनुनासिकत्वाच्या रूपानें राहिला आहे. ही गोष्ट लक्षांत आणिली असतां, अपवाद टाळण्यास्तव ' गहूं ' हा शब्द ' गंहू ' असा लिहावा,

अशी जी दादोबांची सूचना, तिचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं. उलट पक्षीं, तो असल्यानें त्याच्या मूळ रूपाचें स्मरण होण्याला तितकें बरें पडतें.

स्त्रीलिंग.

संस्कृत	मराठी
यूका	ऊ
चिरयूका	चिरू
पिच्छयूका	पिसू
जलौका	जळू
भल्लूका	भालू
वालुका	वाळू
पेलवा	पेळू
तालु (न०)	ताळू

सुई सू
रुई रू (क्व पु०)
लुई लू

तसेच दुसरे कित्येक शब्द—

सवई	सवे, सवै	सोई	सोय
तिवई	तिवै	भाकरी	भाकर
साई	साय	धाबळी	धाबळ
कोई	कोय	कांबळी	कांबळ
पोई	पोय	बया	ब
चोई	चोय		

इत्यादि स्त्रीलिंग आहेत.

याप्रमाणेंच लाभः—लाहो, मोहः—मोहो, आणि यांच्याच अनुरोधानें टाहो, डोहो, खो, छापो, हे ओकारांत शब्द पुल्लिंग आहेत.

'मधु' याचा अपभ्रंश 'मोहो' हा शब्द नपुंसक आहे.

पदार्थाचें कुत्सितत्व दाखविणारीं डूं, रूं, कूं, टूं, ऊं, हीं जीं अक्षरें, तदंतशब्द नपुंसकलिंग असतात. उदाहरणें—

करडूं	थरूं	हासरूं
किरडूं	कुंकूं	आगरूं
वासरूं	अळूं	रांडरूं
मेंढरूं	निंबूं	फाळेटूं
शिंगरूं	पिलूं	तट्टूं
गुरूं	जिवाणूं	बायलूं
पाखरूं	पारडूं	तारूं
लेंकरूं	शेरडूं	कुसूं
रेडकूं	बकरूं	गळूं
परसूं	कोकरूं	लिंबूं
असूं	गायरूं	सुकाणूं इ०

अपवाद–तट्टू, निंबू, लिंबू हे शब्द जेव्हां पुल्लिंग असतात, तेव्हां त्यावर बिंदु नसतो.

याप्रमाणेंच आशीं, कुणीं, केंबरीं, इत्यादि ई वर्णांत कित्येक कुत्सितार्थवाची शब्द नपुंसकलिंग आहेत.

'बीज' या नपुंसक शब्दाचे अपभ्रंश वेगळे वेगळे दोन आहेत.

	सं०	प्रा०	म०
विभक्त्यंत—	बीजम्	बीअम्	बीं (नपु०)
मूळ—	बीज	बीअ	बी (स्त्री.)

यातील दुसऱ्या शब्दाचें लिंग यद्यपि भ्रांतिमूलक आहे, तथापि त्यामध्यें अर्थभेद उत्पन्न झाला आहे, हें चांगलेंच आहे.

'आवलि' म्हणजे पंक्ति हा स्त्रीलिंग यापासून 'आवळ' हा प्रत्यय उत्पन्न झाला आहे. म्हणून हा प्रत्यय ज्यांच्या अंतीं आहे, असे सर्व शब्द स्त्रीलिंग होत.

उदाहरणें—पत्रावळ, जेवणावळ, खाणावळ, इ०. यांच्या सादृश्यावरून दळणावळ, लिहिणावळ, शिवणावळ, इ० मूल्यवाचक शब्दही स्त्रीलिंग आहेत.

शब्दाची द्विरुक्ति होऊन पुढें 'आट' प्रत्यय लागून झालेले शब्द पुल्लिंग होत. उदाहरणार्थ–खळखळाट, लखलखाट, चकचकाट, भरभराट इ०

याप्रमाणें मराठी भाषेंतील प्राणिवाचक, अप्राणिवाचक बहुतेक शब्दांचा लिंगनिर्णय निश्चित आला. तरी अजून कांहीं अकारांत शब्द राहिले आहेत. त्या सर्वांचा निर्णय करण्यास प्रशस्त नियम मिळतील असें नाहीं; कारण कीं जरी त्यांतील बहुतेक शब्दांच्या मूळ संस्कृतादि भाषांतील स्वरूपाचा लिंगनिर्णय करण्यास कांहीं प्रत्ययादि साधनें होतीं, तरी तीं, मराठीमध्यें राहिलेलीं नाहींत. तरी उच्चारसादृश्य, अर्थसादृश्य, अशीं कांहीं तुटक तुटक साधनें मिळण्याजोगीं आहेत. त्या सर्वांचा संग्रह करीत बसण्यापेक्षां तें काम मराठी भाषेच्या कोशकाराकडे सोपवावें हें चांगलें. तथापि कोशामध्यें अमुक शब्द पुल्लिंग किंवा स्त्रीलिंग किंवा नपुंसक इतकेंच सांगितल्यानें, भ्रांतीच्या स्थळीं स्मरणशक्तीला तादृश सहाय होणार नाहीं. या करितां अकारांतादि जे संदिग्धलिंग शब्द आहेत, त्यांतील स्त्रीलिंग शब्दांचें आणि नपुंसक शब्दांचें बहुवचनी रूप सुचविणारें त्यांचें अंत्य अक्षर त्या त्या शब्दांपुढें द्यावें. जसें—वाट (–टा), चाल (--ली), घर (--रें), इ० यांत बहुवचनीं 'एँ' ज्यांपुढें आहे, ते शब्द नपुंसक, इतर सर्व स्त्रीलिंग. पुल्लिंग अकारांत शब्दांचें रूप उभयवचनीं समान असतें तें देण्याचें कारण नाहीं; आणि तें दिलेलें नाहीं, यावरून तो शब्द पुल्लिंग, असें समजण्याला सहज सोई होईल. परंतु या सर्व सूचना सध्यां

काय कामाच्या ? कोश करण्याचा यत्न होईल तेव्हां त्यांचा उपयोग. यास्तव सध्यां थोड्याशा सोईच्या ज्या गोष्टी दिसतील, त्या देऊन हा विषय पुरा करूं.

ही एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, इतर सर्व शब्दांचा लिंग-निर्णय झालाच आहे, तसाच अकारांतही पुष्कळ शब्दांचा निर्णय झाला आहे. कांहीं जे थोडे अकारांत शब्द राहिले आहेत, त्यांच्याविषयींच काय तें आतां बोलायचें. तरी क्वचित् इतर शब्दांचा त्यांत संग्रह होईल.

तेल, तूप, दूध, उदक, ताक, दहीं, मध, सार, मद्य, इत्यादि द्रववाचक शब्द नपुंसक. 'मध' पुल्लिंगही आहे.

पारा अणि पितळ वर्ज करून इतर धातुसंज्ञक अकारांत शब्द नपुंसक. पारा पुल्लिंग, पितळ स्त्रीलिंग आणि क्वचित् नपुंसक.

धान्यवाचक अकारांत शब्दांत तूर, मसूर लाख, डाळ, स्त्रीलिंग. शीत, भात (सालसकट), नपुंसक. तांदूळ पुल्लिंग; रांधलेला भात पुल्लिंग, पापड पुल्लिंग.

क्षुद्र प्राण्यांमध्यें घुबड, वाघूळ, चिलट, मुरकूट, घुंगरूट, बदक, मांजर (क्वचित् स्त्री०), जनावर, मालुंड, झुरळ, इत्यादि नपुंसक.

गरूड, पोपट, गीध, साप, सर्प, टोळ, सुरवंट, उंदीर, कांसव, बेडूक, मगर, ढेंकूण, पक्षी, हत्ती, इत्यादि पुल्लिंग. पक्षी, हत्ती, इत्यादि शब्दांचीं प्रातिपदिकें संस्कृतांत पक्षिन्, हस्तिन् अशीं इन्नंत आहेत.

घार, मैना, कीड, घूस, घोण, सुसर, घोरपड, गोचीड (गोचडी), तांब, इत्यादि स्त्रीलिंग.

घर, दार, झाड, पान, फूल, फल, मूळ, कूळ, शेत, रान, गवत, बोंड, कणीस, लोंभ, साल (स्त्री० न०) लांकूड, माप, पाप, पुण्य, पीठ, मीठ, तिखट, आंबट, वरण, इत्यादि नपुंसक.

डोंगर, दगड, पर्वत, मार्ग, घांट, चढाव, दिवस, वार, मास, पक्ष, पाऊस, चिखल, कर्दम, धूर, उजेड, अंधार, काळोख, हात, पाय, कान, केस, गाल, दांत, स्तन, तळाथ–ठ इ० पुल्लिंग.

पाठ, मान, खोंट, टांच, लंव, कंबर, कमर, कूस, कांख, जीभ, कांब, जांघ, इत्यादि स्त्रीलिंग.

नाक, कपाळ, पोट, बोट, नख, रक्त, मांस, हाड, चर्म, थान, पाऊल, इत्यादि नपुंसक.

वेष, द्वेष, लेश, वेश, लाभ, दाब, राब, ठाव, डाव, राव, लाव, शाप, संप, संताप, व्याप, आटोप, बांध, नाच, जाच, रहाट, घाट, थाट, पाट, घात, पात, साज, खेळ, मेळ, हुकूम, बयान, इत्यादि पुल्लिंग.

काच, खाच, पाच, टांच, खाज, बाज, वाट, खाट, लाट, चाड, दाढ, धाड, भीड, चीढ, साथ, मात, कीड, हांक, शिंक, खोंक, ठेंच, शेंग, मेंग, वेंग, पेंग, मेळ, चेळ, भेसळ, झीज, रीझ, वीज, मोट, मोड, सूट, फूट, जूट, लूट, तूट, तालीम, तुमान, कसर, तसर, नजर, कमान, जकात, फिसाद, अवलाद, जबान इत्यादि स्त्रीलिंग.

विष, मिष, पिस, कपाट, कबाट, खवाट, चाक, सामान, अवसान, इत्यादि नपुंसक.

दारू, अफू, बाजू , तंबाखू , गुडाखू ,तपकीर, हे स्त्रीलिंग. यांत तराजू क्वचित् पुल्लिंग. 'तंबाखू' आणि 'गुडाखू' हे पुष्कळ लोकांच्या व्यवहारांत पुंल्लिंग आहेत.

सुरत, भडोच, भूज, मिरज, ग्वाल्हेर, मद्रास, बनारस, खंबायत, विलायत हे शब्द आणि अहमदाबाद, औरंगाबाद, एशिया, अमेरिका, आफ्रिका, मक्का, मदीना इत्यादि शब्द स्त्रीलिंग होत. इतर ग्रामवाचक अकारांत नामें नपुंसक. जसें नगर, शहापुर, वडगांव, इ० 'गड' शब्द पुल्लिंग.

पुल्लिंग शब्दांवरून स्त्रीलिंग शब्दांची उत्पत्ति कसकशी होते हें दाखविणें या प्रकरणाचें काम नव्हे. तें शब्दोत्पत्तिप्रकरणीं येईल.

(पु. २१ अंक ११।१२, नोव्हेंबर, डिसेंबर १८८९.)

मराठी व्याकरणावर विचार.

निबंध ४ था.

वचन विचार

मागील निबंधामध्यें मराठी भाषेंतील शब्दांच्या लिंगव्यवस्थेचा विचार केला आहे. तथापि त्यामध्यें कित्येक अकारांत शब्दांविषयीं निश्चित नियम देतां आले नाहींत, हें वाचकांच्या लक्षांत असेलच. लिंगविचारामध्यें हा जो उणेपणा राहिला, तो वचनविचारामध्यें होईल तितका दूर करण्याचा प्रयत्न करूं; कारण कीं या दोहों प्रकरणांचा परस्परांशीं फार संबंध असल्यामुळें ही गोष्ट अंशतः साध्य होण्याजोगी आहे.

वचन म्हणजे बोलणें, हा शब्दार्थ झाला. परंतु व्याकरणामध्यें या संज्ञेचा अर्थ अंमळ वेगळा आहे. वचन म्हणजे संख्या लक्षांत आणून बोलणें. पण इतक्यानेंही पुरा अर्थ ध्यानांत येणार नाहीं, म्हणून तो अधिक स्पष्ट करूं.

कोणेका शब्दाकडून एका पदार्थाचा बोध होतो किंवा एकाहून अधिक पदार्थांचा बोध होतो, हें दाखविण्याचें जें त्या शब्दाचें सामर्थ्य, त्याचें नांव **वचन.**

मराठी व्याकरणामध्यें वचनें दोन आहेत, **एकवचन** आणि **बहुवचन.** पदार्थ एक आहे असें दाखविणारें जें शब्दाचें सामर्थ्य किंवा रूप, तें **एकवचन**; आणि पदार्थ दोन किवा अधिक आहेत असें दाखविणारें जें

शब्दाचें सामर्थ्य किंवा रूप, तें **बहुवचन.** जसें–' घोडा ' हा शब्द उच्चारितांच एक घोडा असा अर्थ आपल्या लक्षांत येतो. म्हणून 'घोडा' हें एकवचन; आणि ' घोडे ' हा शब्द उच्चारितांच दोन किंवा अधिक 'घोडे' असा अर्थ लक्षांत येतो म्हणून 'घोडे' हें बहुवचन.

केव्हां केव्हां एकाच मनुष्याविषयीं संमानपूर्वक बोलायाचें असतां बहुवचनाचा प्रयोग होतो. उदा०–'गोविंदराव आले, ' 'चिंतोपंत म्हणाले' इ. याला पूजार्थक अथवा आदरार्थक बहुवचन म्हणण्यास बाध नाहीं. मागें टिळककृत लघुव्याकरणांत असल्या पूजार्थक वचनास 'बहुवचन' म्हणावें, आणि इतरत्र 'अनेकवचन' ही संज्ञा ठेवावी, असा एक नेम दिला होता. परंतु हा नियम केवळ काल्पनिक आणि स्वेच्छा-मूलक असल्यामुळें सर्वथा उपेक्षणीय होय. याविषयीं एथेंच पुढें थोडासा विस्तार केला आहे तो पहावा.

जेव्हां शब्द समुदायवाचक असतो, तेव्हां समुदायाच्या अंतर्गत असणारे जे अनेक पदार्थ त्यांचाही त्याकडून जरी बोध होतो तरी ते बोलणाराच्या लक्षांत वेगवेगळेपणानें आलेले नसतात, व त्या सर्वांचा मिळून जो एकी भाव त्याकडे त्यांचें लक्ष असतें; म्हणून त्याचें एकवचनच समजायाचें. जर तसलेच समुदाय दोन किंवा अधिक असतील तर मात्र त्यांचें बहुवचन समजायाचें. जसें—मंडळी, टोळी, पलटण, इत्यादि एकवचनें आणि मंडळ्या, टोळ्या, पलटणी इत्यादि बहुवचनें.

संस्कृत, झेंद, आरबी, हीब्रू, ग्रीक, या भाषांमध्यें वचनें तीन आहेत; एकवचन, द्विवचन आणि बहुवचन. द्विवचनाकडून दोन पदार्थांचा, आणि बहुवचनाकडून दोहोंहून अधिक पदार्थांचा बोध होतो. मराठी इत्यादि बहुतेक भाषांमध्यें द्विवचन नाहीं म्हणून कित्येक लोकांचा असा वाद आहे कीं या भाषांमध्यें एकवचन ही संज्ञा जरी योग्य आहे, तरी 'बहु' या शब्दामध्यें दोन पदार्थांचा अर्थ प्रशस्तपणें येत नसल्यामुळें,

'दोन घोडे' या स्थळीं बहुवचन ही संज्ञा योजणें ठीक दिसत नाहीं. यास्तव तिच्या स्थानीं अनेकवचन हीच संज्ञा करावी, म्हणजे दोन पदार्थ या अर्थाचाही तिजमध्यें समावेश होऊन ही उक्त अडचण राहणार नाहीं. अनेकवचन ही संज्ञा दादोबांनीं प्रथमतः चालू केली. परंतु त्यांनीं त्याला 'कोणी बहुवचनही म्हणतात.'—असा एक टांक मारून ठेविला. गोडबोले यांनीं कोठे 'अनेकवचन' आणि कोठें 'बहुवचन' अशा या दोन्ही संज्ञा सरमिसळ योजल्या आहेत. जोशी-बुवा यांणीं दादोबांप्रमाणेंच अनेकवचन ही संज्ञा मुख्य मानून अनेकवचनास बहुवचन असेंही म्हणतात, अशी टीप दिली आहे. परंतु खरी स्थिति कोणीही दाखविलेली नाहीं,—'अनेकवचनास' कोणी ' बहुवचन ' म्हणतात असें संदिग्ध न लिहितां—'बहुवचन' ही संज्ञा जुनी होती, पण ती अशा अशा कारणामुळें अप्रशस्त वाटल्यावरून आम्ही तिच्या स्थळीं ' अनेकवचन ' ही संज्ञा योजितों, असें जर त्यांनीं स्पष्ट लिहिलें असतें तर बरें होतें. पण तसें करण्यास काय अडचण उत्पन्न झाली हें ध्यानांत येत नाहीं. असो. वर सांगितलेल्या वादास्तवच जर त्यांनीं नवी संज्ञा केली असेल, तर तसें करण्यास कांहीं सबळसें कारण होतें, असें म्हणवत नाहीं. कां कीं 'बहुवचन' ही संज्ञा पुरातन काळापासून चालत आलेली आहे; गंगाधरशास्त्री आणि बाळशास्त्री या दोघांनींही ती संज्ञा आपापल्या मराठी व्याकरणांत योजली होती, आणि ती चांगली प्रचारांतही आली होती. तेव्हां जरी कदाचित् अक्षरार्थावरून पाहतां त्या संज्ञेमध्यें कांहीं उणेपणा वाटला, तरी—"व्याख्यानतो विशेषप्रतिपत्तिर्नहि संदेहादलक्षणम् ।" म्हणजे, ठरलेली कांहीं संज्ञा संदिग्ध जरी असली, तरी तिला बाध येत नाहीं; तिचा अर्थ असा घ्यायाचा, असें स्पष्ट करून टाकावें म्हणजे झालें, अशी पुरातनची शास्त्रपरिभाषा आहे. म्हणून मराठी व्याकरणांतील 'बहुवचन' या संज्ञेमध्यें दोन पदार्थांच्या अर्थाचेंही ग्रहण होतें असें सांगितलें

असतें म्हणजे झालें असतें. अजूनही तसें करण्यास कांहीं बाध नाहीं. आतां, 'अनेकवचन' या संज्ञेला पांच पन्नास वर्षे थारा मिळाला आहे, या वहिवाटीस्तव तिचेही कोणी पक्षपाती मिळतील यांत आश्चर्य नाहीं. तथापि इंग्लिश इत्यादि भाषांच्या व्याकरणामध्येंही बहुवचन याच अर्थाची संज्ञा "Plural Number प्ल्यूरल् नंबर" ही योजलेली असते, आणि तिजमध्यें द्विवचनाचेंही ग्रहण होतें. तेथें 'एकाहून अधिक पदार्थ दाखविणारें वचन' असा स्पष्ट अक्षरार्थ असणारी संज्ञा नाहीं. पुनः 'अनेक' या शब्दाचा अर्थ दिसण्यांत जरी 'एकाहून अधिक' इतकाच कित्येकांना वाटतो, तरी वास्तविकपणें तसाच त्यामध्यें अर्थ नाहीं. 'अनेक' म्हणजे निदानपक्षीं तीन, किंवा तीहीहून अधिक असाच अर्थ आहे. म्हणून संस्कृतामध्यें 'अनेक' या शब्दाचा प्रयोग द्विवचनी नाहीं; 'अनेके' असा बहुवचनींच होतें.

यावरही कोणी शंका काढील कीं, "कांहीं का प्रयोग असेना, एक नव्हे तो अनेक, असा त्यांत अर्थ आहे कीं नाहीं? म्हणून त्यामध्यें आम्हीं दोहोंचेंही ग्रहण करूं." परंतु शब्दाचा सर्वमान्य अर्थ अशा रीतीनें फिरविण्याचा आपणास अधिकार नाहीं. आणि असें असतांही, जर 'एक नव्हे तो अनेक' असा केवळ अक्षरार्थावरून शब्दार्थ घ्यायचा हाच आग्रह असला, तर पाव, अर्धा, पाऊण हेही एक नव्हत, म्हणून यांनाही 'अनेक' ही संज्ञा येऊन चिकटेल, आणि नसता गोंधळ उत्पन्न होईल. सारांश, या असल्या अशास्त्र कोटयांमध्यें कांहीं अर्थ नाहीं. एकवचन आणि बहुवचन याच संज्ञा उत्तम आहेत यांत कांहीं शंका नाहीं.

आतां इतकें हवें तर म्हणावें कीं " बहुवचनाला कोणी अनेकवचनही म्हणतात "

हें वचनप्रकरण विभक्तिप्रकरणाचाच भाग आहे; तथापि हें वेगळें काढिल्यानें विषयाच्या प्रतिपादनाला बरीच सोई पडते. आणि हें असें

वेगळें काढण्याचा आजपर्यंत प्रघातही आहे, म्हणून एथेंहीं तसेंच केलें आहे. तथापि ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं विभक्ति प्रकरणामध्यें ज्या निरनिराळ्या विभक्ति येणार आहेत, त्या सर्वांचीं बहुवचनें यांत येणार असें नाहीं; तर प्रथम विभक्तीचीं म्हणजे केवळ प्रातिपदिकांचीं, बहुवचनें एथें येतील असें म्हटल्यासही फारसा दोष येणार नाहीं.

पुल्लिंग शब्दांमध्यें आकारांत शब्दांचीं मात्र बहुवचनें एकवचनाहून भिन्न असतात. तींही सर्वांचीं नव्हत. इतर सर्व पुल्लिंग शब्दांची उभयवचनें समान. आकारांत पुल्लिंग शब्द बहुवचनीं एकारांत होतात.

उदा०.

एक व०	बहु व०	एक व०	बहु व०
आंबा	आंबे	पिता	पिते
घोडा	घोडे	कर्ता	कर्ते
रस्ता	रस्ते	दाता	दाते
आत्मा	आत्मे	कोल्हा	कोल्हे इ०

अपवाद १ ला—दादा, काका, मामा, नाना, अण्णा, बाबा, आजोबा, आपा, या शब्दांचीं, दोन्ही वचनें समान. उ०—'तुमचा दादा कोठें आहे, तुमचे दादा काय करतात ?' 'काका आला,' 'काका काय म्हणाले ?' 'त्याला चार मामा आणि दोन आजोबा आहेत.'

'हे कोण ? बायकोचे मामे, घरांत हिंडती रिकामे.'

इत्यादि प्रयोगांमध्यें 'मामा' याचें बहुवचन 'मामे' असें आढळतें. तथापि सामान्य व्यवहारांत प्रायः 'मामा' असाच प्रयोग विशेष. दादोबांनीं 'काका' याचीं बहुवचनें 'काका' आणि 'काके' अशीं दोन दिलीं आहेत; परंतु काके हें रूप कोणत्या स्थळीं प्रचारांत असेल तें असो, आमच्या तर ऐकण्यांत नाहीं. 'तुमचे बापदादे कधीं घोड्यावर बसले होते का ?' मोठे आले आहेत बायकोचे मामे; जा, म्हणावें, चालते व्हा.'

इत्यादि औपरोधिक भाषणांमध्यें दादे आणि मामे यांचा जसा प्रयोग आहे, तसाच काके याचाही क्वचित् असेल असें वाटतें.

अपवाद २ रा—गोविंदा, रामा, कृष्णा इत्यादि आकारांत विशेषनामें, आणि दाजीबा, देवबा, घेवबा इत्यादि अंमळ प्रतिष्ठित दिसणारीं नामें, यांचीं उभयवचनें समान असतात.

टीप—संबंधिमनुष्यवाचक चुलता, सासरा इत्यादि नामें, तशींच गोंद्या, नाऱ्या, राम्या, इत्यादि कुत्सितार्थक विशेषनामें, यांचीं बहुवचनें सामान्य नियमानुसारें एकारांतच होतात. त्यांना अपवाद नाहीं.

अपवाद ३ रा.–सोमपा, शंखध्मा, धूम्रपा, आज्यपा, गोपा इत्यादि कठीण उच्चारांचे आणि अप्रसिद्ध असे संस्कृत शब्द प्रायः उभयवचनीं समान; म्हणून ते बहुवचनीं एकारांत आढळले, तरी ते क्वचित्. 'ब्रह्मा' याचें बहुवचन सामान्य व्यवहारामध्यें 'ब्रह्मे;' पण यज्ञकर्मामध्यें प्रायः 'ब्रह्मा' हेंच.

इतर पुल्लिंग शब्दांचीं रूपें उभयवचनीं समान. त्यांचीं उदाहरणें.—

एक व०	बहु व०	एक व०	बहु व०
अकारांत पु०		इकारांत पु०	
देव	देव	हरि	हरि
देश	देश	कवि	कवि
उकारांत		ईकारांत	
भानु	भानु	हत्ती	हत्ती
गुरु	गुरु	शास्त्री	शास्त्री
ऊकारांत		ओकारांत	
विंचू	विंचू	टाहो	टाहो
राघू	राघू	लाहो	लाहो

देशपांड्या, वाघमाऱ्या, इत्यादि शब्दांचीं बहुवचनें देशपांड्ये, देशपांडे; वाघमाऱ्ये, वाघमारे; इत्यादि प्रकारें दोन दोन होतात. तथापि यकार सोडून देऊन देशपांडे, वाघमारे इत्यादि सोपे उच्चार करण्याकडे लोकांची दिवसेंदिवस प्रवृत्ति विशेष दिसते.

स्त्रीलिंग.

आकारांत स्त्रीलिंग शब्द बहुवचनाच्या निमित्तानें कांहीं विकार पावत नाहींत, आकारांतच राहतात. उदाहरणें—

एक व०	बहु व०
विद्या	विद्या
आशा	आशा
आज्ञा	आज्ञा
गंगा	गंगा इ०.

याप्रमाणेंच, प्रशंसा, निंदा, कन्या, गोपिका, भाषा, निद्रा, मृत्तिका; रजा, मजा, इजा, सजा, हवा, दवा.*, जमा, जिम्मा.*, जागा.*, पागा; इत्यादिकांचीं बहुवचनें एकवचनासारखींच होतात.

जे स्त्रीलिंग शब्द मूळचे आकारांत असून नंतर अकारांत झाले आहेत, त्यांचींही बहुवचनें आकारांत होतात. जसें—

मूळ शब्द	मराठी श०	बहुवचन.
माला	माळ	माळा
भाषा	भाक	भाका
लिक्षा	लीख	लिखा
शिरा	शीर	शिरा
रेखा	रेघ	रेघा
जटा	जट	जटा

* हे शब्द क्वचित् पुल्लिंगही मानितात. तेव्हां त्यांचें बहुवचन एकारांत होतें.

मूळ शब्द	मराठी श०	बहुवचन.
रंडा	रांड	रांडा
उपानह्-हा	वहाण	वहाणा
संज्ञा	खूण	खुणा
अत्तिका	आत	आता
ननांदा	नणंद	नणंदा
समिध्-धा	समीध	समिधा
स्नुषा	सून	सुना
शुक्तिका	शिंप	शिंपा
शतपुष्पा	शेप	शेपा
गुंफा (गुहा)	गुंफ	गुंफा
ताम्रिका	तांब	तांबा
माता	माय	माया
करका	गार	गारा
तारा	तार	तारा
ईर्ष्या	इरा-ईर	इरा
धुर्-रा	धूर	धुरा
सुरा	सूर	सुरा
दूर्वा	दुरव	दुरवा
नौका	नाव	नावा
सीमा	शीम, शीव	शिमा, शिंवा
,,	सीम, सीव	सिमा, सिंवा,
भाषा	भाष	भाषा
लाला	लाळ	लाळा
कोकिला	कोईळ	कोइळा

मूळ शब्द	मराठी श०	बहुवचन
वेला	वेळ	वेळा
अवेला	अवेळ	अवेळा
शिला	शीळ	शिळा

टीप–सून, सुना; समीध, समिधा इत्यादिकांमध्यें इकार, उकार ऱ्हस्व झाले आहेत. हा विकार आणि असेच दुसरे कांहीं विकार यांविषयीं या प्रकरणाच्या शेवटीं विचार केला आहे.

अपवाद–'हरिद्रा' यापासून 'हलदी' असा शब्द होऊन त्यापासून 'हळद' हा शब्द झाला आहे. त्याप्रमाणेंच 'कामला' यापासून 'कामली' असा शब्द होऊन त्यापासून 'कावीळ' आणि 'कामीण' हे शब्द झाले आहेत. म्हणून हळद, कावीळ, कामीण, हे शब्द अव्यवहितपणें आकारांत शब्दांपासून आले नसल्यामुळें त्यांचीं बहुवचनें आकारांत न होतां वक्ष्यमाण नियमाप्रमाणें हळदी, कावळी, कामणी अशीं ईकारांत होतात, असा तर्क होतो.

पाच (पाचू), खाज (खर्जू), खरूज (खर्जू), वीज (विद्युत्–विज्जू), असे जे मूळचे ऊकारांत असून नंतर अकारांत झालेले स्त्रीलिंग शब्द, त्यांचीं बहुवचनें आकारांत होतात. जसें, पाचा, खाजा, खरजा, विजा, इ०

जे शब्द मूळचे स्त्रीलिंग नसतां केवळ भ्रमामुळें स्त्रीलिंग ठरून गेले आहेत त्यांचीं बहुवचनें आकारांत होतात. उदा०–

मूळ सं०	स्त्रीलिंग ए०	बहुव०
शाकम् न०	{ शाख	शाखा
	{ शाक	शाका
लवंगम् (न०)	लवंग	लवंगा
काचः पु०	काच	काचा
भुजः पु.	भूज	भुजा

शोथः	पु.	सूज	सुजा
वाटः	पु.	वाट	वाटा
प्रभातः	पु.	पहाट	पहाटा
कटः	पु.	कड	कडा
षंडः	पु.	सांड	सांडा
शाणः	पु.	साण, सहाण	साणा, सहाणा
लशुनम्	न.	लसूण	लसणा
वस्तु	न.	वस्त	वस्ता
{ नस्तितम्	न.	नथ	नथा
नाथः	पु.	"	"
शपथः	पु.	शपथ	शपथा
मधु	न.	मध*	मधा
बाष्पः	पु.	वाफ	वाफा
उष्मा	पु.	ऊब	उबा
लोम	न.	लंव	लंवा
व्यामः	पु.	वांव	वांवा
कषायः	पु.	काव	कावा
कच्छः	पु.	कांस	कांसा
शीर्षम्	न.	शेस	शेसा
सस्काल } सुकाल }	पु.	सकाळ	सकाळा इ०

धातुशब्दांमध्यें कांहीं विकार न होतां किंवा अल्प विकार होऊन, जे अकारांत स्त्रीलिंग शब्द उत्पन्न झाले आहेत, त्यांचींही बहुवचनें प्रायः आकारांत होतात. उदा०—

* हा शब्द पुल्लिंग आणि नपुंसकलिंगही असतो. तेव्हां त्याचीं रूपें 'मध' आणि 'मधें' अशीं अनुक्रमें होतात.

एकवचन	बहुवचन
अटक	अटका
चटक	चटका
लटक	लटका
जाग	जागा
टीप	टिपा

इत्यादि

याप्रमाणेंच अडक, हाक, पिंक, किंक, फुंक, रीघ,* खाच, झीज, रीझ, लाट भोवंड, भीड, चीड, तान, झडप, करप, झोंप, थोप, धोप, चार, चीर, खडाव, जाणीव, नेणीव, धांव, किळस, चिळस, भोंवळ इत्यादि अकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं बहुवचनें आकारांत जाणावीं.

अपवाद—उकड, उसळ, उचल, उमळ, इत्यादि कित्येक शब्दांचीं बहुवचनें ईकारांत होतात.

यांशिवाय, टीक, खारीक, कुळीक, चुणूक, चितंग, फिरंग, टांग, डांग, ढेंग, मेंग, वेंग, शेंग, किलच, ढेलच, टींच, बाज, आउंज, खाचट, मोट, पेंठ, रांडमुंड, मात, गप्प, चीप, धाप, रीप, खेप, मसूर, कव, माव, पाव, हाव, खेंव, उणीव, रेंव, चूळ,† सडक, डांच लांच,† लालूच, बूज, पैज, नरद, बोद, गंजीफ, तोफ, कमर, कंबर, शाल, कुमक, मसक, शिलक, तारीख, गरज, दरज, ताज, चीज, ताऊज, फौज, रयत, विलायत, ईद, कैद, तरफ, तलक, तसरीफ, गुराब, तलब, रकम, फाम, बाम, ताजीम, तालीम, तक्षीम, मोहीम, नजर, सदर, कबर, कसर, तसर, जंजीर, अक्कल, शिकल, शक्कल, सिकल, मजल, गजल, जिन्नस†, हुरूप, इत्यादि शब्दांचीं बहुवचनें आकारांत होतात.

* हा शब्द पुल्लिंग असतां 'रीघ' हेंच बहुवचन.

† हे शब्द पुल्लिंग असतां दोन्ही वचनें समान.

पूर्वोक्त शब्द वर्ज्य करून अवशिष्ट राहिलेले असे जे अकारांत स्त्रीलिंग शब्द, त्यांचीं बहुवचनें ईकारांत होतात. उदाहणार्थ, मूळचे ईकारांत असून नंतर अकारांत झालेले स्त्रीलिंग शब्द—

मूळ श०	अकारांत श०	बहु व०
भित्ति	भिंत	भिंती
पूगफली	पोफळ	पोफळी
चालनी	चाळण	चाळणी
पुष्करिणी	पोखरण	पोखरणी
ब्राह्मणी	बामीण	बामणी
भाकरी	भाकर	भाकरी
बदरी	बोर	बोरी
कदली	केळ	केळी
जाति	जात	जाती
गति	गत	गती

इत्यादि

याप्रमाणें ईकारांतांपासून उत्पन्न झालेले असोत किंवा नसोत, जे पूर्वोक्त परिगणनेंत येत नाहींत असे सर्व अकारांत स्त्रीलिंग शब्द या नियमांत येतात. उदा०—

एक व०	बहु व०	एक व०	बहु व०
वाघीण	वाघणी	नांदरूख	नांदरुखी
कोळीण	कोळणी	बाभूळ	बाभळी
सोनारीण	सोनारणी	जांभूळ	जांभळी
भेट	भेटी	चूल	चुली
ओळख	ओळखी	विहीर	विहिरी
घोरपड	घोरपडी	खटपट	खटपटी

इत्यादि

शोध करून पाहिलें असतां, या वर्गांतील बहुतेक अकारांत शब्द मूळचे ईकारांत होते, असें मानण्याला पुष्कळ आधार दिसतो. कित्येक जरी मूळचे प्रत्यक्ष ईकारांत नसले, तरी ' इनी ' आणि ' ई ' हे जे मूळचे स्त्रीप्रत्यय, त्यांच्या स्थानीं आलेले ' ईण ' आणि ' अ ' या दोहोंतील कोणता तरी एक त्यांच्या अंतीं असतो. यामुळें बहुवचनकालीं पुनः ते पूर्वस्थितीला पोंचतात, म्हणजे ईकारांत होतात. कित्येक शब्द केवळ सादृश्यास्तव या वर्गांत आले आहेत, आणि अशांची संख्या बरीच मोठी आहे. जे आरबी, फारसी, इत्यादि परभाषांतील शब्द आहेत, त्यांच्या संबंधानें हा वरचा नियम चालत नाहीं. तथापि इतकें म्हणतां येईल कीं पूर्वोक्त परिगणनेमध्यें जे आवर्णपर्यवसायी शब्द सांगितले आहेत, ते वर्ज्य केले असतां, अवशिष्ट राहिलेल्या सर्व अकारांत स्त्रीलिंग शब्दांचा कल बहुवचनीं ईकारामध्यें पर्यवसान पावण्याकडे आहे. सारांश, अकारांत स्त्रीलिंग शब्दांमध्यें बहुवचनीं आकारांत होणारे, आणि बहुवचनीं ईकारांत होणारे असे मुख्यत्वें दोन प्रकारचे शब्द आहेत;

आणि त्यांच्या या भेदाचें मुख्य तत्व पाहिलें, तर त्यांच्या उत्पत्तीवर तें बांधलें आहे असें म्हणण्यास कांहीं बाध नाहीं. आतां, त्यांतील कित्येक शब्दांच्या उत्पत्तीचें ज्ञान कालांतरामुळें जनसमुदायाच्या आटोक्यांत राहिलें नाहीं, यामुळें भ्रांति उत्पन्न झाली, आणि तिचा परिणाम असा झाला कीं, त्या शब्दांचीं बहुवचनें कोणी आकारांत करूं लागले, आणि कोणी ईकारांत करूं लागले. यामुळें तशा शब्दांचीं बहुवचनें स्थानपरत्वें दोहों प्रकारचीं होतात; परंतु त्यांत देशी लोकांचा कल बहुशः आकारांतांकडे आणि कोंकणी लोकांचा ईकारांतांकडे झाला ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. वर शब्दांच्या ज्या परिगणना केल्या आहेत, त्यांमध्येंही क्वचित् आकाराच्या स्थानीं कोणी ईकार करितात असें आढळेल. तथापि मराठी भाषेची पन्नास वर्षांपूर्वीं जी संदिग्ध स्थिति होती, ती सांप्रत-

काळच्या लेखांमधून तरी बहुतेक अंशीं दूर झाल्यासारखी आहे, असें म्हणण्याला कांहीं बाध नाहीं. म्हणून पन्नास वर्षांपूर्वी यद्यपि अशा या आकार-ईकारांच्या संबंधानें संदिग्ध शब्दांची संख्या बरीच मोठी होती, तथापि सध्यां ती फार थोडी राहिली आहे. या सर्व शब्दांची मागें निवड झाली होती, तथापि पुनः नवी निवड होणें ही गोष्ट एका अर्थी, म्हणजे व्याकरणाच्या पूर्णतेच्या दृष्टीनें इष्ट आहे. तरी तिजवांचून फारसें अडलें आहे असेंही नाहीं; कां कीं, त्या सर्व संदिग्ध शब्दांचें बहुवचन आकारांत आहे असें जरी कित्येकांचें मत.* असलें, तरी तें ईकारांतही निर्बाधपणें होत आहेच; त्यापक्षीं वर आकारांताच्या संबंधानें परिगणित केलेले शब्द सोडून, अवशिष्ट राहिलेल्या सर्व अकारांत स्त्रीलिंग शब्दांचें बहुवचन ईकारांत होतें असें स्पष्ट म्हणण्याला कांहींच अडचण राहत नाहीं. असो. पण त्यांतून ही जे अद्यापि खरे वैकल्पिक शब्द म्हणून राहिले आहेत, त्यांचा तरी उल्लेख करणें अवश्य दिसतें.

कर्मणूक, वागणूक, जाचणूक इत्यादि ' णूक ' प्रत्ययांत शब्द, तसाच आगळीक हा शब्द यांचीं बहुवचनें कर्मणुका, कर्मणुकी ; वागणुका, वागणुकी; जाचणुका, जाचणुकी; आगळिका, आगळिकी; इत्यादि दोहों प्रकारें होतात.

याप्रमाणेंच-तरवार, सुरवार, चकमक, टकमक, तसबीर, तसरीफ, एरजार, अखबार, उघडीक, कोरडीक, भरताड, खसखस, हुरमुज, खुरनीस, पुरशीस, तजवीज, सोयरीक, बंदूक, संदूक, परात, वरात, इजार, वखार, खबर, बखर, कटार, वळवींज, या शब्दांचीं रूपें दोहों प्रकारचीं होतात.

ईकारांत स्त्रीलिंग शब्दांच्या अंतीं बहुवचनीं ' या ' होतो. जसें—

* जसें—शाल, शाला; ढाल, ढाला; मशाल, मशाला; पखाल, पखाला; अहवाल, अहवाला;

एक व०	बहु व०	एक व०	बहु व०
नदी	नद्या	पेटी	पेट्या
काठी	काठ्या	साडी	साड्या
पोथी	पोथ्या	लेखणी	लेखण्या इ.

याप्रमाणेंच घोडी, वाडी, चौकी, चौकशी, तरफदारी, जमीनदारी, कर्तबगारी, कारागिरी, इत्यादि ईकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं रूपें होतात.

अपवाद—जे शब्द अकारान्त किंवा व्यंजनान्त शब्दापुढें 'ई' प्रत्यय लागून स्त्रीलिंग झाले आहेत, त्यांचीं बहुवचनें एकवचनासारखींच असतात, उदा०—

मूळशब्द	स्त्रीलिंग ए०	बहु व०
देव	देवी	देवी
नर	नारी	नारी
कुमार	कुमारी	कुमारी
मृग	मृगी	मृगी
सिंह	सिंही	सिंही
मांजर	मांजरी	मांजरी
गाढव	गाढवी	गाढवी
व्याघ्र	व्याघ्री	व्याघ्री
श्रीमत्	श्रीमती	श्रीमती
सुवासिन्	सुवासिनी	सुवासिनी इ.
	प्रत्यपवाद.	
बेडुक, बेडका }	बेडकी	बेडक्या.

परंतु ज्यांचे मूळ शब्द आकारांत आहेत, अशा ईकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं रूपें मुख्य नियमाप्रमाणेंच होतात. उदा०—

मूळ शब्द	स्त्रीलिंग ए०	बहुवचन
काका	काकी	काक्या
मामा	मामी	माम्या
पासोडा	पासोडी	पासोड्या
घोडा	घोडी	घोड्या
कुत्रा	कुत्री	कुत्र्या इ०

सती, साध्वी, अटवी, भागीरथी, पृथ्वी इत्यादि प्रौढ प्रौढ शब्दांचीं उभयवचनें प्रायः समान असतात. परंतु क्वचित् भिन्न रूपेंही आढळतात. उदा०—

' आनंदराव धुळपाच्या वेळेस तीनशें सत्या पडल्या म्हणून सांगतात. ' ' अशा सहस्र पृथ्व्या एकत्र झाल्या म्हणून त्यांना सूर्याचें साम्य येईल कां ?' ' देशोदेशीं भागीरथ्या असल्या तरी खरी भागीरथी एकच. '

ज्या शब्दाच्या अंतीं नुसता ' ई ' स्वर असतो, त्यांच्या बहुवचनीं नुसता ' या ' अंतीं येतो; क्वचित् मूळरूपही येतें.

एक व०	बहु व०	एक व०	बहु व०
आई	आया, आई	सवई	सवया, सवई
बाई	बाया, बाई	राई	राया, राई
अवाई	अवाया, अवाई	समई	समया, समई

टीप—आई, बाई, काकी, मामी इत्यादि शब्द पूजार्थी योजले असतां, त्यांच्या उभयवचनीं एकवचनासारखींच रूपें असतात.

बी आणि स्त्री यांचीं बहुवचनें बिया आणि स्त्रिया. पण धी, श्री, ह्री यांचीं रूपें दोन दोन होतात.

एकव०	बहुवचन.
धी	धी, धिया
श्री	श्री, श्रिया
ह्री	ह्री, ह्रिया

ऱ्हस्व इकारांत आणि ऱ्हस्व उकारांत शब्द म्हटले म्हणजे संस्कृत. ते मग कोणत्याही लिंगीं असोत. त्यांचीं उभयवचनें समान. एथें त्यांतलें स्त्रीलिंग शब्द मात्र घेतों.

एकव०	बहुव०	एकव०	बहुव०
रुचि	रुचि	धेनु	धेनु
मति	मति	तनु	तनु
बुद्धि	बुद्धि	रज्जु†	रज्जु
शुद्धि	शुद्धि	हनु	हनु इ०

दीर्घ ऊकारांत स्त्रीलिंग शब्द फार थोडे आहेत. त्यांत चमू, वधू, भू, सुभ्रू, श्वश्रू, हे संस्कृत; आणि गेरू, कुरकू, शाडू, काकू, खडू*, आऊ, माऊ, पाऊ, कौलू, पाचू, शेपू, शेळू, हे मराठी; तसेंच रू, लू, अकू, तंबाखू*, गुडाखू* हे संदिग्ध उत्पत्तीचे शब्द, हे सव उभयवचनीं समान आहेत. जसें–चमू, चमू; वधू, वधू; इत्यादि; याप्रमाणेंच अब्रू, अबरू, आबरू, तराजू, दारू यांचींही उभयवचनें समान.

कित्येक ऊकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं बहुवचनें, ‘आ’ लागून होतात. परंतु संधीमुळें त्यांत ‘अवा’ किंवा, ‘उवा’ असें रूप होतें–उदा०–

एक व०	बहु व०	एक व०	बहु व०
जळू	जळवा	ऊ	उवा
दुरू	दुरवा	चिरू	चिरवा
धू	धुवा	सू	सुवा

इतर ऊकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं बहुवचनें वैकल्पिक आहेत; तीं येणें प्रमाणें—

† याचा अपभ्रंश ‘राजू’ हा मराठी शब्द पुल्लिंग आहे-

* हे तीन्ही शब्द पुल्लिंगही मानिले जातात.

एक व०	बहु व०		
सासू	सासू	अथवा	सासवा
जाऊ	जाऊ	,,	जावा
वाळू	वाळू	,,	वाळवा
पिसू	पिसा	,,	पिसवा
टाळू	टाळू	,,	टाळवा
ताळू	ताळू	,,	ताळवा
पेळू	पेळू	,,	पेळवा

यांतील प्रथमरूपांचा प्रचार विशेषेंकरून देशांत, आणि द्वितीय रूपांचा विशेषेंकरून कोंकणांत आहे.

भ्रू या संस्कृत शब्दाचें बहुवचन भ्रू, भ्रुवा असें दोन प्रकारचें आहे.

बाजू याचें बहुवचन प्रायः, बाजू, असेंच. परंतु क्वचित् बाजवा, असें आढळतें. गंजीफांच्या डावामध्यें "बाजवा लावल्या," असें म्हणतात. पाऊ, माऊ, शेळू, शेपू, पाचू, यांचीं बहुवचनें एकवचनाप्रमाणें म्हणून वर म्हटलेंच आहे. कोणी त्यांचीं बहुवचनें पावा, मावा, इ० आकारांतही मानितात; परंतु हीं रूपें पाव, माव, शेळ, शेप, पाच, या त्यांच्याच अकारांत स्वरूपाचीं बहुवचनें मानणें हें विशेष ग्राह्य दिसतें.

ए–ऐ–ओ एतदंत स्त्रीलिंग शब्दांचीं बहुवचनें आकारांत होतात. परंतु त्यांविषयीं थोडेंसें अधिक सांगण्यासारखें आहे.

एकारांत शब्द म्हटले म्हणजे आते, सवे, वन्सें. 'आते,' हा शब्द आतई अथवा आत्याबाई याचा अपभ्रंश असावा.

'सवे' हा तर सवई शब्दाचा अपभ्रंश स्पष्ट दिसतो. 'वन्सें' हा शब्द थोडासा चमत्कारिक आहे. आई, बाप, भाऊ, बहीण, इत्यादि शब्दांना स्वार्थी 'स' प्रत्यय लावून केलेलीं आईस किंवा आऊस, बापूस, भाऊस, बहिणीस किंवा बहिणूस, इत्यादि रूपें कोंकणांत कित्येक स्थळीं फार प्रचारांत आहेत. त्याप्रमाणेंच 'वहिनीस' असा शब्द असून, त्याचें

बहुवचन ‘ वहिनिसा ’ अथवा ‘ वन्सा ’ असें झालें, आणि कोंकणांतील स्वाभाविक अनुनासिक उच्चार त्याला येऊन ‘ वन्सां ’ असा शब्द सिद्ध झाला असें दिसतें. अकारांत नपुंसकलिंग शब्दांना, प्राचीन प्राकृत “ आइँ ” यावरून आलेला ‘ आँ ’ प्रत्यय लागून , त्यांचीं घरॉं, पानॉं, रानॉं, इत्यादि प्रकारें झालेलीं बहुवचनरूपें कोंकणांत फार प्रसिद्ध आहेत. मराठीमध्यें आँच्या स्थानीं एँ होऊन त्यांचीं घरें, पानें, रानें, अशीं रूपें होतात. त्याच धोरणावर ‘ वन्सॉं ’ याला ‘ वन्सें ’ असें मराठी रूप आलें असावें. आणि याच कारणानें हीं दोन्हीं रूपें प्रायः बहुवचनीं योजिलीं जातात, असें वाटतें.

सवै, तिवै, खै, गै, हे सवई, तिवई, खई, गई किंवा गय, यांचे अपभ्रंश.

बायको या शब्दाची उत्पत्ति चमत्कारिक दिसते. ‘ बाला ’ आणि त्यापासून झालेला ‘ बालिका ’ शब्द, यांचा अर्थ कन्या किंवा तरुण स्त्री. या ‘ बालिका ’ शब्दाचा अपभ्रंश ‘ बाइका ’ हा मूळचा एकवचनी शब्द. याचें बहुवचन ‘ बाइकाओ ’ याचेंच ‘ बाइको ’ ‘ बायको ’ असें रूपांतर झालें. अर्थात हा मूळचा बहुवचनी योजायाचा शब्द सत्कारपूर्वक बोलायाचें असतां, एका स्त्रीच्या अर्थींही, “ बायका बाहेर गेल्या आहेत, आतां येतील ” असें जसें सध्यां बोलतात, तसेंच पूर्वीं एका स्त्रीच्या अर्थींही “ बायको ” या शब्दाची योजना सत्कारास्तव होऊं लागली, आणि कालांतरानें अर्थाकडे दुर्लक्ष होऊन हाच शब्द एकवचनीं चालूं लागला, आणि इतर स्त्रीलिंग शब्दांच्या धोरणानें याचें पुनः “बायका,” असें आकारांत बहुवचन झालें. सारांश ‘ बायका ’ हें मूळचें एकवचन आणि ‘ बायको ’ हें बहुवचन असून, सध्यां त्यांचा अर्थ अशा रीतीनें उलट झाला आहे, असें दिसतें.

‘ बालिका ’ याचाच दुसरा अपभ्रंश ‘ बाइआ ’ आणि याचें बहुवचन ‘ बाइआओ ’ अथवा ‘बायो.’ परंतु हाही शब्द आतां एकवचनीं चालतो.

‘ताटका’ नांवाची मोठी धिप्पाड राक्षसी होती; यावरून तशीच कोणी धिप्पाड आणि अस्ताव्यस्त अमर्याद बायको असली, तर तिलाही ‘ताटका’ हा शब्द लावितात. ‘ताटका’ हा शब्द तर मूळचा निर्विवाद एकवचनीं चालणारा; आणि अजून तो तसा चालतो. परंतु त्याचेंच रूपांतर असा ‘ताटको’ हा जो दुसरा एक शब्द, त्याचें पुनः बहुवचन ‘ताटका’ हेंच आहे. यावरून एथेंही असें दिसतें कीं ‘बायको’ शब्दाप्रमाणें ‘ताटको’ हें जुनें बहुवचनरूप आहे. इतकाच भेद कीं ‘बायको’ या शब्दामध्यें जो सत्कारसूचक अर्थ दिसतो, त्याच्या स्थानीं एथें ढमालपणाचा अर्थ आहे. तथापि दोहों शब्दांच्या उत्पत्तीचा म्हणून जो प्रकार, त्यामध्यें कांहीं भेद दिसत नाहीं. ‘ढंबो’ शब्दामध्येंही तोच प्रकार दिसतो.

जुन्या प्राकृत भाषेमध्यें बहुतेक शब्दांपुढें बहुवचनीं, ‘ओ’ प्रत्यय लागत असे. जसें–रमा, रमाओ. अद्यापि गुजराथी भाषेमध्यें तसेंच आहे. जसें, विद्या विद्याओ. गोमंतकी, मालवणी, इत्यादि कोंकणी भाषांतही तोच प्रकार आहे. जसें बाईल–बाइलो. आणि यावरून असें वाटतें कीं ‘बाइलो’ ‘बाइका ओ’ अथवा ‘बाइको’ हे शब्द मूळचे एकच. या सर्व गोष्टी लक्षांत आणितां, पूर्वोक्त तर्काला तितकी बळकटी येते.

‘बायकूं’ असें कुत्सितार्थ रूप आधीं असून त्यापासून मग ‘बायको’ असा शब्द झाला असावा, असा तर्क कित्येकांनीं केला आहे, त्याला कांहीं आधार दिसत नाहीं. आतां शंका काढणाराला एक स्थळ आहे. तें असें कीं ‘बालक’ हा जो पुल्लिंग शब्द, त्याचें प्राकृत भाषेंत ‘बालको’ आणि ‘बालका’ किंवा ‘बायको’ आणि ‘बायका’ अशीं क्रमशः एकवचनीं आणि बहुवचनीं रूपें होण्याचा संभव आहे. परंतु स्त्रियांना पुल्लिंगनामें चालू झालीं, अशी राठस कल्पना करणें, किंवा वर दाखविल्याप्रमाणें ‘बायकूं’ शब्दापासून ‘बायको’ शब्द निघाला असें

मानण्यापेक्षां आपल्या लोकांच्या सभ्य चालीस अनुसरून स्त्रीला सत्कार-बोधक 'बायको' हें मूळचें बहुवचनीं नाम चालू झालें, असें मानणें विशेष संभाव्य व प्रशस्त दिसतें. असो, आतां यांचीं बहुवचनें—

ए० व०	बहु व०	एक व०	बहु व०
आते	आता	पै	पै, पया
सवे, सवै (सवई)	सवया	तिवै (तिवई)	तिवया
वन्सें	वन्सें, वन्सां	बायको	बायका
गै (गई)	गया	ढंबो	ढंबा
खै (खई)	खया	ताटको	ताटका

टीप—'पै' आणि 'पया' या बहुवचनांमध्यें कितेकजण अर्थभेद मानीत नाहींत. पण 'पया' म्हणजे 'पै' नांवाचीं वेगवेगळीं नाणीं, आणि 'पै' म्हणजे तितक्या क्रिंमतीचीं कोणतींही नाणीं, असा प्रायः अर्थ असतो. उदा०—'आठ पया' म्हणजे 'पै' नांवाचीं आठ नाणीं. पण 'आठ पै' म्हणजे वेगवेगळ्या आठ पया असोत, किंवा दोन पाव आणे आणि दोन पया मिळून आठ पै असोत, असा सूक्ष्म अर्थ आहे.

पुस्तक २२, अंक ११२, जानेवारी-फेब्रुवारी १८९०

—मराठी व्याकरणावर विचार—

निबंध ४ था.

वचनविचार (पुढें चालू)

नपुंसकलिंग.

यांत सामान्य नियमाप्रमाणें ऱ्हस्व इकारांत, आणि ऱ्हस्व उकारांत शब्दांचीं दोन्ही वचनें समान आहेतच. इतर जे नपुंसक शब्द राहिले, त्यांत एँकारांतांचीं बहुवचनें ईकारांत; आणि इतर सर्वांचीं एँकारांत. क्वचित् संधीमुळें रूपांतर होतें, तितकाच विशेष. जसें:—

एक व०	बहु व०	एक व०	बहु व०
वारि	वारि	झाड	झाडें
दधि	दधि	घर	घरें
मधु	मधु	द्रव्य	द्रव्यें
कुत्रें	कुत्रीं	दहीं	दह्यें
बकरें	बकरीं	पाणी	पाण्यें
तळें	तळीं	मोतीं	मोत्यें

एक व०	बहु व०
गुरूं	गुरें
वासरूं	वासरें
लेंकरूं	लेंकरें
बीं	बियें इ.

यामध्यें कुत्सितार्थबोधक ऊं, कूं, डूं, टूँ, रूं, हे प्रत्यय लागून झालेलीं सर्व ऊंकारांत नामें, आणि लिंबूं, निंबू यांच्या अंतीं बहुवचनीं एँकार होतो. परंतु तारूं, अळूं, गळूं, असूं, आसूं, थरूं, कुंकूं, यांच्या बहुवचनीं 'अवें' हा आदेश होतो. जसें—

एक व०	बहु व०
कुंकूं	कुंकवें
अळूं	अळवें
थरूं	थरवें
तारूं	तारवें
गळूं	गळवें
असूं, आसूं	असवें, आसवें.

कुसूं, सुकाणूं, जिवाणूं, यांचीं बहुवचनें देशांत कुसें, सुकाणें, जिवाणें; आणि कोंकणांत कुसवें, सुकाणवें, आणि जिवाणवें, अशीं होतात.

शब्दांची वचनव्यवस्था समजल्यानें त्यांचा लिंगभेद समजण्याला सहाय होतें असें आम्हीं मागें म्हटलें होतें, त्याची या प्रकरणावरून नीट समजूत होईल. वृक्ष, चोर, रंग, वाट, खाट, भेट, किंमत, घर, पात्र, पान हे सर्व शब्द अकारांत खरे; पण वृक्ष, चोर, रंग, यांचीं बहुवचनें वृक्ष, चोर, रंग, अशींच असल्यामुळें, हे शब्द पुल्लिंग होत, असें आपणास उलट तर्क करून समजतें. वाट, खाट, भेट, किंमत, यांचीं बहुवचनें वाटा, खाटा, भेटी, किंमती, अशीं असल्यामुळें हे शब्द स्त्रीलिंग असें समजतें; आणि घर, पात्र, पान, यांचीं बहुवचनें घरें, पात्रें, पानें, अशीं असल्यामुळें हे शब्द नपुंसकलिंग असें समजतें. या प्रमाणेंच इतरत्र अनेक शब्दांविषयीं जाणावें.

हा प्रकार अन्योन्याश्रयाचाच होय; तथापि यापासून स्मरणशक्तीला तितकें सहाय होतें, म्हणून याची उपेक्षा न करणें हें फार चांगलें.

–उपांत्याक्षरविवेक–

प्रत्येक वस्तूमध्यें अंगस्वभाव म्हणून कांहीं गुण असतो. मराठी भाषेमध्यें त्यासारखाच कांहीं प्रकार आहे. त्याकडे या प्रसंगीं लक्ष देणें अवश्य दिसतें.

मराठी भाषेंतील नामादिकांच्या अंगीं असा एक कल आहे, कीं त्यांच्या अंतीं दीर्घ अक्षर असल्यास कालांतरानें तेथें ह्रस्वाक्षर यावें; अंतीं ई, ऊ, असल्यास तेथें अ व्हावा; संयुक्ताक्षर असल्यास साधें अक्षर यावें; आणि या सर्व कृति होत असतां उपांत्य अक्षर म्हणजे अंत्य अक्षरांच्या पूर्वीचें अक्षर दीर्घ व्हावें. याचीं उदाहरणें मागें आलीं आहेत, तरी प्रसंगवशात् एथें पुनः कांहीं देऊं—

संस्कृत	मराठी	संस्कृत	मराठी
आज्ञा	आण	हस्तिनी	हत्तीण
लज्जा	लाज	वस्तु	वस्त
भिक्षा	भीक	पुत्र	पूत, पोर

खनि	खाण	कर्ण	कान
चुल्ली	चूल	पर्ण	पान
पल्ली	पाल	कर्म	काम इ०

परंतु असेंही लक्षांत येईल कीं जोंपर्यंत अंत्य अक्षर दीर्घ किंवा संयुक्त आहे, तोंपर्यंत उपांत्य अक्षर, मूळचें ह्रस्व असल्यास, दीर्घ होत नाहीं, आणि मूळचें दीर्घ असलें तरी प्रायः ह्रस्व होतें. उदा०

शुष्कः	सुका	चूर्णः	चुना
जीर्णः	जुना	वस्तु	वस्त

यावरून सर्वव्यापक असे कांहीं नियम निघतात.

१. शुद्ध मराठी शब्द, आणि अपभ्रंश पावून झालेले मराठी शब्द, यांच्या अंतीं अ हा स्वर असून, त्यांतील उपान्त्य स्वर जर इ किंवा उ असेल, तर तो इ उ स्वर दीर्घ असतो. उदा०—

मीठ, पीठ, दूध, चूल, धूर, फूल, इ०.

२. परंतु तशा शब्दाच्या अंतीं जर संयुक्त अक्षर असेल, तर त्या शब्दाचें उपान्त्य अक्षर ह्रस्वच असतें. जसें चिंच (उच्चार चिन्च), खुंट (उच्चार खुण्ट), इ०

३. अकारांत शब्दाचें उपांत्य अक्षर जर ईकारयुक्त किंवा ऊकारयुक्त असलें, तर अंत्य अकाराला कोणत्याही कारणानें दीर्घत्व येतांच, उपान्त्य ई ऊ ऱ्हस्व होतो, किंवा त्याच्या स्थानीं अ होतो; असा सामान्य नियम आहे. परंतु त्यांत—

—विषेश नियम—

१. तो शब्द द्व्यक्षरी असेल, तर ई ऊ यांच्या स्थानीं उक्त प्रसंगीं ह्रस्वच होतो, अकार होत नाहीं.—उदा०—

पीठ	पिठें	चूल	चुली
मीठ	मिठें	धूर	धुराला इ०

२. शब्द त्र्यक्षरी असून ई ऊ यांच्या पूर्वीं संयुक्त वर्ण किंवा हकार असेल, तर तेथेंही ऱ्हस्वच होतो. उदा०–

भक्तीण	भक्तिणी	विहीण	विहिणी
विहीर	विहिरी	माहूत	माहुताला इ०

पापीण हाही शब्द याच प्रकारें चालतो.

३. परंतु त्या त्र्यक्षरी शब्दांतील ई ऊच्या पूर्वीं हकारावांचून दुसरें कोणतेंही असंयुक्त व्यंजन असेल, तर अ होतो. उदा०–

परीट	परटाला	लाकूड	लाकडें
कणीक	कणकेचा	चिबूड	चिबडें
वाघीण	वाघणी	चाबूक	चाबकानें इ०

अपवाद–चाळीस, चाळिसांना पण चाळीस, चाळशी—चाळिशी.

४. असा शब्द चार किंवा अधिक अक्षरांचा असतां,—उपान्त्य अक्षराच्या पूर्वींचें (म्हणजे शेवटाकडून तिसरें) अक्षर जर ऱ्हस्व असलें, तर ई, ऊ यांच्या स्थानीं ऱ्हस्व होतो. उदा०–

* परटीण	परटिणी	वतर्णूक	वर्तणुका
परभीण	परभिणी	समजूत	समजुती
कुळंबीण	कुळंबिणी	मुरकूट	मुरकुटें
सोयरिक	सोयरिका	जाचणूक	जाचणुका इ०

५. चार किंवा अधिक अक्षरांच्या इतर शब्दांमध्यें अ होतो. उ०—

मराठीण	मराठणी	सुतारीण	सुतारणी इ०.

* दादोबांनीं अशा शब्दांना ‘ पापिणीचा वर्ग ’ असें कठोर नांव दिलें होतें; परंतु तसा वर्ग करण्याचें, किंवा निदान तसें कठोर नांव देण्याचें तरी कांहीं कारण नव्हतें.

६. तीन किंवा अधिक अक्षरांच्या शब्दांमध्यें जेथें अ होतो असें म्हटलें आहे, तेथें केवळ ऱ्हस्वाचीही क्वचित् प्रवृत्ति आढळते. परंतु तशीं रूपें प्रायः जुन्या ग्रंथांत आणि काव्यांत येतात.

७. तीन किंवा अधिक अक्षरांच्या अशा शब्दांमध्यें उपांत्य अक्षर केवळ (म्हणजे व्यंजनावांचून) ई किंवा ऊ असेल, तर ईच्या स्थानीं इ किंवा य, आणि ऊच्या स्थानीं उ किंवा व असे विकार होतात. उदा०–

सुईण	सुइणी,	सुयणी	देऊळ	देउळें,	देवळें
कुईट	कुइटें,	कुयटें	पाऊल	पाउलें,	पावलें
काईल	काइली,	कायली	राऊळ	राउळें,	रावळें इ.

८. संस्कृत शब्दांमध्यें आणि फारसी इत्यादि परभाषांतून आलेल्या शब्दांमध्यें हे उपांत्यसंबंधी नियम चालत नाहींत.

संस्कृत शब्द

गीत	गीतें	शरीर	शरीरें
सूत्र	सूत्रें	जीव	जीवाचा
मयूर	मयूरानें	कूट	कूटें इ०

परभाषीय शब्द

अमीर	अमीराचा	मुनीम	मुनीमानें इ०

याप्रमाणेंच वकील, जामीन, चिटणीस, डबीर, हकीम मुनीम इ०

परंतु या परभाषीय शब्दांच्या उपांत्याला ऱ्हस्व करून अमिराचा, मुनिमानें, वकिलास, इत्यदि प्रकारें लिहिण्याकडे कित्येकांचा कल होत चालला आहे.

जमीन, संदूक, बंदूक, तक्षीम, अफीण, खंजीर, अंजीर, जंजीर इत्यादि कांहीं शब्द फारच प्रचारांत आले असल्यामुळें त्यांचा उपान्त्य ऱ्हस्व होतो.

या प्रकरणाच्या ओघानें शब्दाच्या अन्त्य अकाराच्या संबंधानें कांहीं विचार करणें अवश्य दिसतें.

शुद्ध मराठी शब्द आणि परभाषांतून आलेले मराठी शब्द, यांच्या अंतीं ' अ ' हा स्वर असला, तर त्याचा पुरा उच्चार प्रायः होत नाहीं. कितेकांचें तर म्हणणें आहे कीं त्याचा मुळींच उच्चार होत नाहीं. आमच्या मतें यामध्यें दोन्ही प्रकार आहेत. मराठींत आलेले संस्कृत शब्द जर घेतले, तर त्यांतील अंत्य अकाराचा प्रायः पूर्ण उच्चार होतो. जसें गृह, बुध, रात्र, इ०. परंतु मराठी शब्दांमध्यें आणि फार फार वहिवाटींतल्या संस्कृत शब्दांमध्यें अंत्य अकाराचा प्रायः पूर्ण उच्चार होत नाहीं. जसें, काम, घर, चाल, नगर, इ०. परभाषांतून आलेल्या शब्दांमध्यें तर त्याचा मुळींच उच्चार होत नाहीं असें कदाचित् म्हणतां येईल. जसें दरबार, जमीन, वस्ताद. इ०. परभाषांतून घेतलेले हे अकारांत शब्द मुळीं त्या त्या भाषांत हलंतच होते. परंतु मराठींत हलंत शब्द लिहिण्याला फार त्रास पडतो, यामुळें ते अजंतच मानून त्याप्रमाणें लिहिण्याचा प्रघात पडला आहे. अशा प्रकारचे संस्कृतादि शब्द मात्र मूळचेच अकारांत. ते जरी क्वचित् उच्चारण्यांत हलंत आले, तरी त्यांचें मूळ रूप सुटूं नये, आणि हलंत शब्द लिहिण्याची कटकटही नाहींशी व्हावी, या दोन्ही हेतूंनीं हे अजंतच लिहिले जातात; तथापि विद्वान्, भगवान्, इत्यादि मराठींत आलेले कित्येक संस्कृत शब्द मूळचेंच हलंत आहेत, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

'अ' हा स्वर ऱ्हस्व आहे अशी साधारण समजूत आहे, आणि त्या समजुतीप्रमाणें प्रायः सर्वत्र तो ऱ्हस्वच आढळतो. संस्कृतामध्यें ही तो ऱ्हस्व आहे; परंतु वर सांगितल्या प्रकारच्या आकारांत मराठी शब्दांच्या उपांत्य स्थानीं जेव्हां ' अ ' असतो, तेव्हां त्याचा उच्चार चालू मराठी व्याकरणांत जरी ऱ्हस्व मानिला असला, तरी खरोखरी पाहतां तो

दीर्घच होय. आ म्हणजे मात्र दीर्घ अ, अशी बळकट समजूत असल्यामुळें, या 'अ' ला कोणी दीर्घ म्हणत नाहींत; परंतु दीर्घ म्हणजे लांब हा जर अर्थ खरा आहे, तर 'कागद,' 'गवत,' 'जवळ', 'परत', इत्यादि शब्दांतील उपान्त्य अकार दीर्घ आहे, असें ग्राह्य करणें प्राप्त आहे. 'आ' या सर्वमान्य दीर्घ स्वराच्या उच्चारामध्यें जसें तोंड पसरावें लागतें, तसें या 'अ'च्या दीर्घ उच्चारामध्यें पसरावें लागत नाहीं, इतकाच काय तो भेद. संस्कृत व्याकरणामध्यें पाहिलें तरी, ' आ ' हा जो तोंड पसरून उच्चारायाचा दीर्घ स्वर, त्याच्या जोडीचा ऱ्हस्व म्हटला म्हणजे, तोंड न पसरतां उच्चारायाचा जो ' अ ' तो धरलेला नाहीं; तर ' आ ' याचा जो ऱ्हस्व उच्चार, तोंड पसरून करावयाचा, तो धरलेला आहे. त्याचें प्रदर्शक चिन्ह 'आ' हेंच आहे, तथापि व्याकरणामध्यें ऱ्हस्व दीर्घाच्या सिद्धयर्थ हा सूक्ष्म भेद लक्षांत आणावा लागतो. त्याप्रमाणेंच हे, मराठींतले, तोंड न पसरतां उच्चारावयाचे जे ऱ्हस्व दीर्घ 'अ', त्यांतील भेदही लक्षांत घेतला पाहिजे.

मराठी अकाराचे हे दोन उच्चार दाखविण्याला वेगवेगळीं चिन्हें नाहींत; म्हणून त्याला सर्वदा आम्ही ऱ्हस्वच मानितों, ही केवळ स्थूल दृष्टीची आणि सोयीची गोष्ट आहे.

तथापि यावरून असें लक्षांत येईल कीं, इ उ हे उपांत्यस्वर असतां, त्यांच्या ठायीं जसें दीर्घाचें प्रावण्य आहे, तसेंच या उपान्त्य अ स्वराचेंही आहे. आणि ते ई ऊ दीर्घ स्वर ज्या कारणानें ऱ्हस्व होतात, त्याच-कारणानें हा अ पुनः ऱ्हस्व होतो. असेंही पुढील उदाहरणांवरून ध्यानांत येईल. पहा–'घर' यांतील ' घ् ' पुढील ' अ ' दीर्घ आहे, पण ' घरें ' यांत तो ऱ्हस्व होतो. याप्रमाणेंच फळ, फळें; कागद, कागदास; इ०

अंत्य ' अ ' चा लोप किंवा अत्यल्प उच्चार, आणि उपान्त्य ' अ ' चा दीर्घ उच्चार, या सूक्ष्म गोष्टी परकी लोकांना, आणि त्यांत विशेषतः द्रविडादि भाषा बोलणारांना ठाऊक नसतात; म्हणून ते मराठी

बोलत असतां त्यांचे उच्चार अशा स्थळीं हास्यास्पद होतात, ही सर्वांच्या अनुभवाची गोष्ट आहे.

श आणि च ज झ यांविषयीं

मराठी भाषेमध्यें 'स्' या व्यंजना पुढें इ ई हे स्वर आले, तर तेथें स् च्या स्थानीं 'श्' हें व्यंजन येतें. त्याप्रमाणेंच 'स्या' याच्या स्थानीं 'शा' हें अक्षर येतें. उदाहरण–असा अशी, असें; कसा, कशी, कशाला इ०

'से' याच्या स्थानीं 'शे' योजण्याकडे कित्येकांचा क्वचित् कल आढळतो. उदा०–ससा सशे; मासा, माशे; इ. परंतु हा एकदेशीय प्रकार आहे, सर्वमान्य नाहीं, आणि आलिकडे लेखामध्यें तर हा मुळींच येत नाहीं.

संस्कृत भाषेमध्यें च् ज् झ् या व्यंजनांचे उच्चार सर्वदा तालव्यच आहेत. पण मराठी मध्यें द्रविडादि भाषांच्या सांनिध्यानें त्यांच्या ठायीं दंततालव्यही उच्चार आलेले आहेत. मराठी शब्दांत च् ज् झ् यांपुढें इ ई हे स्वर किंवा यकार असतां, त्यांचा उच्चार संस्कृतांतल्याप्रमाणेंच तालव्य होतो. उ०—चिखल, चीन, जिवाणू, जीन, झिरपणें, झीट, त्याच्या, माझ्या, इ०.

'ए' हा स्वर पुढें असतां दोन्ही प्रकार आहेत. म्हणजे शब्दाच्या आरंभीं तालव्य आणि मध्यें किवा अंतीं प्रायः दंततालव्य उ०–चेकाळणें, जेवण, झेलणें, यांत तालव्य; आणि आमचें घर, माझें काम इ०, यांत दंततालव्य.

शब्दाच्यामध्यें आणि अंतींही 'चे' याचा उच्चार क्वचित् केवळ तालव्य आढळतो, पण तोही सर्वमान्य नव्हे.

च् ज् झ् यांपुढें इतर स्वर असतां त्यांचा उच्चार दंततालव्य होतो. उदा०–चढाव, चाल, चूक, चोर, चौरंग इ०

संख्यावाचक 'चार' (४), या शब्दांत 'च्' याचा उच्चार केवळ तालव्य आहे. पण 'चार' (ओलें गवत) यांत दंततालव्य, 'चैन' यामध्यें प्रायः दन्ततालव्य, अर्थात् येथें तालव्य उच्चारही आढळतो.

च् ज् झ् यांचा दंततालव्य उच्चार असतां, त्यांच्या मागें एक बिंदु देऊन '·चाकर' '·चाल' इत्यादि प्रकारें लिहावें, अशी कांहीं दिवसांमागें एक पद्धति निघाली होती. परंतु ती फार त्रासदायक असल्यामुळें आणि तिचें फारसें कारणही नसल्यामुळें, ती नष्ट झाल्यासारखीच आहे. त्याप्रमाणें 'च्' आणि 'या' यांचा संयोग झाला असतां, तेथें नुसता 'चा' लिहावा, मागें बिंदु देऊं नये म्हणजे झालें, असा त्याच पद्धतीचा एक नियम होता; परंतु तोही आतां निरुपयोगी झाला आहे; स्पष्ट 'च्या' असेंच सर्वत्र लिहिण्यांत येतें; हें कांहीं अयोग्य नव्हे.

या वचनप्रकरणावरून पाहतां सहज लक्षांत येईल कीं, पुल्लिंग संस्कृत सर्वनामामध्यें प्रथमेच्या एकवचनीं 'सर्व' आणि बहुवचनीं 'सर्वे' अशीं जीं रूपें होतात, त्यांच्याच धोरणानें मराठींतील 'घोडा आणि घोडे' हीं रूपें साधलीं आहेत. स्त्रीलिंगी 'नदी,' 'नद्यः' यांच्या धोरणानें 'नदी,' 'नद्या;' 'श्वश्रू, 'श्वश्वः' यांच्या धोरणानें 'सासू,' 'सासवा;' आणि 'भांडम्' 'भांडानि' (प्रा. भांडाइँ), यांच्या धोरणानें 'भांडें,' 'भांडीं' हीं रूपें झालीं आहेत.

'घर' हा शब्द 'गृह' याचा अपभ्रंश, हें तर स्पष्ट दिसतच आहे, तथापि 'घरें' असें जें त्याचें बहुवचन, त्याची उत्पत्ति अंमळ संदिग्ध आहे. 'गृहे' असें जें संस्कृत द्विवचनरूप त्याचा हा अपभ्रंश असावा, असें कित्येकांनीं मत प्रदर्शित केलें आहे खरें; पण अशीं द्विवचनावरून बहुवचनरूपें साधल्याचीं दुसरीं उदाहरणें प्रायः दिसत नाहींत. आणि संस्कृतादि भाषांतील द्विवचनव्यवस्थेची कल्पना नष्ट होऊन, प्राकृत भाषेमध्यें तिचा मागमोसही राहिला नव्हता; तेव्हां आलिकडे मराठींत त्या

कल्पनेचें पुनरुज्जीवन होणें किंवा तिजमधून कांहीं घेण्यासारखें आहे असें मराठी भाषेला वाटणें, हेंच असंभाव्य होय. तशांत शब्दांचा जो प्रकार असतो, तो प्रत्ययांना सर्वथा लागू पडतो असें नाही. विद्वान लोक भाषेमध्यें नवे नवे शब्द योजूं शकतात, आणि कालेंकरून त्यांचें सामान्यजनही ग्रहण करितात. परंतु प्रत्ययांची गोष्ट तशी नाहीं. प्रत्यय बहुशः सामान्य जनांच्याच भाषेंतून विद्वानांलाही घ्यावे लागतात. आजपर्यंत अनेक स्थळीं अनेक प्रसंगीं विद्वानांनीं संस्कृत भाषा पुनः पूर्ववत् प्रचारांत आणण्याचा यत्न केला. पण पुष्कळ संस्कृत शब्द जरी प्रचारांत आले, तरी भाषेचें खरें स्वरूप दाखविणारी जी प्रत्ययरचना ती कांहीं संस्कृत झाली नाहीं. यावरून पाहतां द्विवचन प्रत्ययावरून हा ‘ ए ’ प्रत्यय आला असावा हा तर्क काहीं बळकट दिसत नाहीं.

‘ घरें ’ याच्या स्थानीं कोंकणी भाषेंत ‘ घराँ ’ असें जवळचें रूप आहे; आणि हें रूप प्राकृत ‘ घराइँ ’, आणि तद्द्वारा ‘ गृहाणि ’ यांशीं संबद्ध असावें असें मानण्यास शब्दसादृश्यावरून पुष्कळ आधार दिसतो. सारांश, ‘ भांडीं ’ हा शब्द ‘ भांडानि ’ याचा जसा अपभ्रंश, तसाच घरें हा ‘ गृहाणि ’ याचा अपभ्रंश होय, असें मानणें विशेष साधार दिसतें. आतां, एकाच बहुवचन रूपावरून हे असे दोन प्रकारचे अपभ्रंश, (म्हणजे ‘ भांडीं ’ यामध्यें ईकारान्त आणि ‘ घरें ’ यामध्यें एँकारान्त, असे) कसे झाले, हा एक प्रश्न उपस्थित होतो खरा; परंतु असे एकच शब्दाचे दोन दोन प्रकारचे अपभ्रंश झाल्याचीं उदाहरणें अनेक आहेत. अकारांत शब्दांचींच उदाहरणें मागें लिंगविचारामध्यें दिलीं आहेत. ‘ दलन ’ यापासून ‘ दळण ’ आणि ‘ दळणें ’ हे दोन शब्द होतात. आतां त्यांत पहिला केवळ प्रातिपदिकावरून, आणि दुसरा ‘ दलनम् ’ या विभक्तिरूपावरून झाला आहे, ही गोष्ट खरी; तरी ते दोन्ही अपभ्रंश एकाच शब्दाचे होत यांत कांहीं संशय नाहीं. जेव्हां शब्द दोन झाले, तेव्हां त्यांची

बहुवचनरूपेंही तदनुसार वेगवेगळीं व्हावीं हें साहजिक आहे. पुनः प्राकृतांतील जो 'आइँ' प्रत्यय, त्याचा एक अपभ्रंश 'आँ' अथवा 'एँ' असा होणें, आणि दुसरा केवळ अंत्य अक्षरावरून 'ईं' असा होणें, यांत कांहीं असंभाव्य दिसत नाहीं.

या अपभ्रंशाच्या संबंधानें दुसरा एक प्रश्न पुढें येतो. मराठीमध्यें आकारांत पुल्लिंग जे शब्द आहेत, त्यांतील 'आ' या अंत्य अक्षराची व्युत्पत्ति कशी? साधारणतः अशी समजूत आहे कीं, संस्कृतांतील 'अः' याच्या स्थानीं प्राकृतांत 'ओ' होऊन त्यापासून मग हा 'आ' झाला. कित्येक उदाहरणामध्यें तर प्राकृत 'ओ'च्या स्थानीं मराठींत 'आ' स्पष्ट दिसतो. पहा—

संस्कृत	प्राकृत	मराठी
अंगुष्ठः	अंगुट्ठो	आंगठा
स्कंधः	खंधो	खांदा
गवयः	गवओ	गवा
गर्भः	गब्भो	गाभा
बहिरः	बहिरो	बहिरा
काणः	काणो	काणा
मूकः	मूको	मुका इ०

तथापि येथें असा प्रश्न आहे कीं मराठी 'आंगठा' हा शब्द प्राकृत 'अंगुट्ठो' यापासून निघाला, किंवा प्रत्यक्ष 'अंगुष्ठः' या संस्कृत शब्दापासूनच निघाला? शब्दसादृश्यावरून जर पाहिलें, तर 'अंगठा' याचें 'अंगुष्ठः' याशीं जितकें साम्य दिसतें, तितकें 'अंगुट्ठो' याशीं दिसत नाहीं, हें उघड आहे. संस्कृत 'अः' यावरून 'ओ' झाल्याचीं संस्कृतामध्यें आणि प्राकृतामध्यें पदोपदीं उदाहरणें आहेत खरीं; पण त्या 'ओ' वरून मराठींत 'आ' आला असें मानण्याला सबळ प्रमाण दिसत

नाहीं. जुन्या मराठी ग्रंथांतील ओकारांत शब्द घेऊन जर पाहिलें, तर असें स्पष्ट दिसतें कीं जरी त्यांतील ओकार हा संस्कृत ' अः ' याच्या स्थानीं आलेला प्राकृत ओकारच होय, तरी त्यापासून पुढें 'आ' झाल्याचें उदाहरण प्रायः दिसत नाहीं. त्या ' ओ ' च्या स्थानीं फार तर, 'ऊ' झाला आहे. पण प्रायः असें आढळेल कीं, जसजसें त्या जुन्या भाषेला सांप्रतचें रूप येत चाललें, तसतसा तो ओकार मुळींच गळून जाऊन पुनः त्याला पूर्ववत् अकारांतत्व येत चाललें; त्यांना आकारांतत्व आलेलें नाहीं. उदाहरणार्थ—

जुने शब्द	मराठी शब्द	जुने शब्द	मराठी शब्द
डोहो	डोह	तनयो	तनय
रावो	राव	समयो	समय
देवो	देव	गणेशू	गणेश
भावो	भाव	विनयू	विनय

यांत ओकाराच्या आणि ऊकाराच्या स्थानीं पुनः ' अ ' आला, पण ' आ ' आला नाहीं. याप्रमाणेंच जरी लाभ, नाथ, इत्यादिकांच्या स्थानीं लाहो, नाहो, इत्यादि ओकारांत झालेले शब्द जुन्या ग्रंथांत आहेत, तरी आलिकडच्या भाषेंतून त्या ओकारांताचा प्रयोग नाहींसा होतांच, ते शब्द भाषेंतून अगदीं गेल्यासारखेच झाले. पण त्यांना आकारांतत्व आलें नाहीं. तसेंच, गुजराथी, कोंकणी, इत्यादि भाषांत ' अः ' याच्या स्थानीं झालेला जो ' ओ ' आहे, त्याचें ' आ ' होण्याकडे प्रावण्य मुळींच दिसत नाहीं. या सर्व गोष्टींवरून पाहतां पुल्लिंग शब्दांच्या अंतींचा ' आ ' हा ओकारापासून आला आहे, असें मानण्यापेक्षां, 'अः' यापासूनच तो एकदम आला आहे असें मानणें विशेष साधारण दिसतें. आंगठा, खांदा, इत्यादि जे शब्द वर दिले आहेत, त्यांचीं ओकारान्त रूपें जरी बालभाषेंत असलीं, तरी यांचा त्यांचा जन्यजनक संबंध आहे असें म्हणण्याला प्रमाण नाहीं.

'ओ' हा जसा 'अः' पासून झाला आहे, तसाच 'आ' सुद्धां 'अः' पासूनच झाला आहे. त्यांत कदाचित् इतकेंच म्हणतां येईल कीं 'ओ' हा फार जुना अपभ्रंश आणि 'आ' हा अमळ आलिकडचा.

असें दिसतें कीं, प्राकृत भाषेकडून निर्वाह होईनासा झाला, आणि तिजमध्यें दिवसेंदिवस संदिग्धता वाढत चालली, तेव्हां विद्वान् लोकांनीं तिजमध्यें संस्कृत शब्दांचा भरणा करण्याची युक्ति काढली. प्रातिपदिकरूप देव, धर्म, कोश, इत्यादि जे शब्द घेतले, ते तसेच चालले; परंतु जे रामः, कृष्णः, इत्यादि विभक्त्यंत शब्द घेतले, त्यांचीं रूपें कालांतरानें रामा, कृष्णा, कान्हा, इत्यादि प्रकारें आकारांत झालीं. कदाचित् असाही प्रकार झाला असावा कीं, संस्कृत भाषा थोडी बहुत तरी जीवमान असे तों पर्यंत जे अपभ्रंश झाले, त्यांमध्यें 'अः'च्या स्थानीं 'ओ' चें प्राबल्य बरेंच होतें; परंतु पुढें संस्कृत भाषा वाग्व्यवहारांतून गेल्यानंतर जे अपभ्रंश झाले, त्यांमध्यें 'आ' चें प्राबल्य चाललें. सारांश 'आ' हा अपभ्रंश 'ओ' पासून आलेला नव्हे, प्रत्यक्ष 'अः' पासूनच आला आहे, असें आमचें मत आहे.

पुस्तक २२, अंक ३, मार्च १८९०.

मराठी व्याकरणावर विचार

निबंध ८ वा

विभक्तिविचार

दादोबा म्हणतात,—" या भाषेंत विभक्तींविषयीं फार गोंधळ आहे." पण आमची समजूत अशी आहे कीं, हा गोंधळ या भाषेंत आहे असें नाहीं; तर या भाषेचे जे सध्यांचे व्याकरणग्रंथ आहेत, त्यांत आहे. मराठी विभक्तींचा पाया बालव्याकरणामध्यें संस्कृत विभक्तींवर रचिला होता, तो योग्य होता; कारण कीं संस्कृत व्याकरणामध्यें जशी

विभक्तिसंबंधीं व्यवस्था आहे, तशी उत्तम व्यवस्था दुसऱ्या कोणत्याही भाषेच्या व्याकरणांत नाहीं, ही गोष्ट सर्व विद्वान् लोकांना मान्य आहे. पाश्चात्य लोकांच्या ग्रीक, लाटिन, इत्यादि प्राक्कालीन भाषा, आणि इंग्लिश्, जर्मन्, फ्रेंच्, इत्यादि आधुनिक भाषा, यांच्या व्याकरणामध्यें, किंबहुना सध्यांच्या मराठी व्याकरणामध्यें देखील, " वर्तमान काळाचें रूप केव्हां केव्हां भूतार्थीं योजिलें जातें, " " भविष्यदर्थी वर्तमान-काळही केव्हां केव्हां येतो, " अशा प्रकारचे अनेक नियम वारंवार आढळतात, आणि त्यांत कांहीं अयोग्य आहे, असें कोणाच्या लक्षांतही येत नाहीं. परंतु संस्कृत वैयाकरण अशा लेखांना 'सर्वथा अशास्त्र लेख' म्हटल्यावांचून कधींही राहणार नाहींत. ते म्हणतात कीं अमुक रूप वर्तमानकाळाचें आणि अमुक रूप भूतकाळाचें असें एकदां स्पष्ट ठरल्या-नंतर मग पुनः 'वर्तमानकाळाचें रूप भूतकाळीं येतें,' असें म्हटल्यानें त्याच्या वर्तमानवाचकत्वाला बाध आलाच. 'गच्छति' हें जर वर्तमान रूप आहे, तर त्याचा प्रयोग भूतार्थी करणें हें अशास्त्र नव्हे काय? 'रामेण' याला एकदां जर कर्तृविभक्ति ही संज्ञा केली, तर पुनः त्याच रूपाला 'करणविभक्ति' मानणें ही मोठी चूक आहे. वास्तव एका रूपाचे जर दोन किंवा अधिक अर्थ होत असतील, तर त्या रूपाला संज्ञा म्हणजे नांव देतेवेळीं फार सावधपणा ठेविला पाहिजे. कारण कीं, त्याला जर कांहीं अन्वर्थक संज्ञा करावयाची, तर त्या संज्ञेमध्यें त्याच्या निरनिराळ्या सर्व अर्थांचा समावेश झाला पाहिजे. आणि असें जर न होईल तर ती संज्ञा तितकी कोती पडलीच. परंतु अशी पूर्ण अर्थाची संज्ञा मिळणें ही अशक्य गोष्ट होय. बरें, त्या अनेक अर्थांतून एकादा ठळक अर्थ घेऊन त्याच्या धोरणानेंच जर संज्ञा करावी, तर बोलून चालून ती संज्ञा अर्धकच्ची. सारांश, विभक्त्यादिकांना अन्वर्थक संज्ञा करण्याचा यत्न करणें हेंच मुळीं अप्रशस्त. ही गोष्ट पूर्णपणें

लक्षांत आणून संस्कृत वैयाकरणांनीं या संज्ञांच्या कामीं कांहीं वेगळ्याच रीतीचें अवलंबन केलें आहे. पाश्चात्य भाषांच्या व्याकरणामध्यें विभक्तींना कर्तृविभक्ति, कर्मविभक्ति, करणविभक्ति, संप्रदानविभक्ति, अपादानविभक्ति, जनकविभक्ति, स्थानविभक्ति, संबोधनविभक्ति हीं जशीं अन्वर्थक दिसणारीं, पण सर्वांशीं अन्वर्थक नव्हेत अशीं नांवें दिलीं आहेत, तशीं संस्कृत व्याकरणांत दिलेलीं नाहींत. तर त्यांना पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पांचवी, साहवी, सातवी, या अर्थांच्या **प्रथमा, द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी,** अशा केवळ क्रमसूचक नुस्त्या सांकेतिक संज्ञा केल्या आहेत. हाच प्रकार क्रियापदांमध्येंही आहे. अशी व्यवस्था असल्यामुळें 'रामेण' ही तृतीया विभक्ति एके प्रसंगीं निर्बाधपणें कर्त्रर्थी असण्याला कांहीं अडचण नाहीं, आणि तीच अन्य प्रसंगीं करणार्थी असण्यालाही कांहीं अडचण नाहीं. याप्रमाणेंच 'भवति' ही लट्–संज्ञक धातुविभक्ति एके प्रसंगीं वर्तमानार्थी असूं शकेल, अणि अन्य प्रसंगीं भविष्यदर्थी असूं शकेल. अमुक अमुक विभक्ति अमुक अमुक प्रसंगीं अमुक अमुक अर्थानें योजिल्या जातात, यांचें उत्तम स्पष्टीकरण त्या त्या प्रकरणाच्या संबंधानें केलें असल्यामुळें, या व्यवस्थेला कोणत्याही प्रकारें अडचण न येतां सर्व प्रकारें तिला सशास्त्रताही येते.

संस्कृत भाषेचें उदाहरण घेऊन मराठी व्याकरणांतही विभक्तींना प्रथमा, द्वितीया, इत्यादि सांकेतिकच संज्ञा केल्या आहेत, ही व्यवस्था फार उत्तम होय. इजमध्यें कोणत्याही प्रकारचा गोंधळ नाहीं. हें तर काय? पण असेंही म्हणतां येईल कीं संस्कृत विभक्तिव्यवस्थेपेक्षांही मराठी विभक्तिव्यवस्था एका अर्थी प्रशस्ततर आहे. ही आमची उक्ति अंमळ धाडसाची वाटेल खरी; तथापि खरोखरीं अशीच स्थिति आहे, यांत कांहीं संदेह नाहीं. कशावरून, तर पहावें.–प्रत्येक विभक्तीचे प्रत्यय अगदीं वेगवेगळे ठेवण्याविषयीं संस्कृत वैयाकरणांनीं आपणांकडून होईल तितका प्रयत्न

केला आहे, ही गोष्ट जरी खरी, तरी केवळ अकारांत पुल्लिंग शब्दांच्या विभक्तीमध्यें, आणि त्यांत पुनः एकवचनीं मात्र, त्यांचा प्रयत्न पूर्णपणें सिद्धीस गेला आहे. त्यांच्याच द्विवचनीं आणि बहुवचनीं त्याप्रमाणेंच इतर शब्दांच्या तिन्ही वचनीं,–कित्येक स्थळीं या प्रयत्नांमध्यें अनिवार अडचणी आल्यामुळें, दोन किंवा क्वचित् तीन विभक्तींना समान प्रत्ययांची योजना करणें त्यांना प्राप्त झालें आहे. परंतु मराठीमध्यें ही अडचण मुळींच येत नाहीं. पहा—

मराठी विभक्तींचे प्रत्यय.

विभक्ति	एकवचन	बहुवचन
प्रथमा	(प्रथमा विभक्तीला प्रत्यय नाहीं.)	
द्वितीया	ला (स)	ना (ला, स)
तृतीया	नें	नीं (हीं)
चतुर्थी	साठीं	साठीं
पंचमी	हून (ँतून)	हून (ँतून)
षष्ठी	चा (ची चें चे च्या चीं)	चा (ची चें चे च्या चीं)
सप्तमी	ँत	ँत
संबोधन*	(प्रत्यय नाहीं)	नो

अशी उघड स्थिति असतां, दादोबांनीं आणि इतरांनींहीं जरी आग्रहानें म्हटले, कीं, 'या भाषेंत विभक्तींविषयीं फार गोंधळ आहे,' तरी तें म्हणणें प्रशस्त नव्हे, असेंच म्हणावें लागतें. दादोबा, चिपळूणकर, गोडबोले, जोशी यांच्या व्याकरणामध्यें यासंबंधानें गोंधळ आहे, इतकेंच फार तर म्हणतां येईल. गंगाधरशास्त्री फडके, आणि बाळशास्त्री जांभेकर यांणीं प्रत्येक विभक्तीचे प्रत्यय वेगवेगळे ठेविले होते. असें असतां विभक्ति

* संस्कृत व्याकरणामध्यें संबोधन विभक्ति प्रथमेच्या पोटींच धरिली आहे; पण मराठी संप्रदायानुसारें एथें ती वेगळी मांडली आहे.

प्रत्ययांच्या व्यवस्थेचें खरें तत्त्व सोडून देऊन, दादोबांनीं आणि त्यांच्या-नंतर झालेल्या इतर वैयाकरणांनीं विभक्तिप्रकरणामध्यें नसता गोंधळ उपस्थित केला आहे, असें म्हणणें प्राप्त होतें.

विभक्तीचें लक्षण करितांना—

दादोबा म्हणतात—“ नामाशीं आणि क्रियेशीं जो संबंध त्यास कारक अशी संज्ञा आहे, आणि हा संबंध सुचविणारे जे प्रत्यय, तदन्त जे शब्द त्यांस विभक्ति म्हणतात.”

गोडबोले त्यांतच थोडासा फेर करून म्हणतात,—“ क्रियेशीं किंवा क्रियावाचक शब्दांशीं नामाचा जो संबंध त्यास कारक म्हणतात; आणि तो संबंध दाखविणाऱ्या प्रत्ययांस विभक्तिप्रत्यय म्हणतात. नामांस विभक्तिप्रत्यय जोडून जीं रूपें होतात, त्यांस विभक्ति किंवा विभक्त्यंत म्हणतात.”

जोशीही म्हणतात,—“ प्रातिपदिकाचा क्रियापदाशीं जो संबंध असतो, त्यास कारक असें म्हणतात; आणि तो संबंध दाखविण्यासाठीं नामाचें जें रूप करितात त्यास विभक्ति असें म्हणतात. ”

परंतु विभक्तीचें हें असलें लक्षण मुळीं आणिलें कोणीकडून, हें कांहीं कळत नाहीं, इंग्रजींतून घेतलें असें म्हणावें, तर इंग्रजींतही असें लक्षण नाहीं. संस्कृतांतून घेतलें म्हणावें, तर तेथेंही असें नाहीं. क्रियेशीं नामाचा असणारा जो संबंध, तो दाखविणाऱ्या प्रत्ययांनाच विभक्तिप्रत्यय ही संज्ञा करावी, आणि कोणत्याही इतर प्रत्ययांना ती करूं नये, या विलक्षण शास्त्राला आधार काय ? कांहीं नाहीं. तर मग विभक्ति म्हणजे काय, याचा आधीं स्पष्ट निश्चय झाला पाहिजे. मागें शब्दविभागप्रकरणीं सांगितलेंच आहे कीं प्रत्यय दोन प्रकारचे आहेत. त्यांतील एका प्रकारचे प्रत्यय शब्दाला लागले म्हणजे शब्दाची वाढ खुंटते. दुसऱ्या प्रकारच्या प्रत्ययांपासून वाढ खुंटत नाहीं; पुनः त्यांवर नवीन प्रत्यय लागूं शकतात.

उदाहरणार्थ—' शास्त्र ' या शब्दापुढें ' नें ' हा प्रत्यय लागून शास्त्रानें, असें रूप झालें आहे. या रूपाला पुनः नवे प्रत्यय लागूं शकत नाहींत. हा पहिला प्रकार झाला. परंतु ' शास्त्र ' या पुढें ' ई ' प्रत्यय लागून ' शास्त्री ' असा जो शब्द सिद्ध होतो, त्यापुढें पुनः ' नें ' हा प्रत्यय लागून ' शास्त्र्यानें ' असा नवा शब्द होऊं शकतो. यापुढें मात्र त्याची वाढ खुंटली. ज्या प्रत्ययाच्या योगानें या प्रकारें शब्दांची वाढ खुंटते, त्याला ' विभक्तिप्रत्यय ' अशी संज्ञा आहे; आणि अशा रीतीनें वाढ खुंटलेला जो शब्द, म्हणजे विभक्तिप्रत्ययांत शब्द, त्याला ' पद ' अशी संज्ञा आहे. सारांश, ज्या प्रत्ययाच्या योगानें प्रातिपदिकाला पदत्त्व प्राप्त होतें, त्याचें नाव **' विभक्तिप्रत्यय. '** संस्कृत भाषेमध्यें हे जे विभक्तिप्रत्यय आहेत, त्यांचे अर्थभेदावरून सात वर्ग केले आहेत. प्रत्येक वर्गामध्यें एकवचनप्रत्यय, द्विवचनप्रत्यय, आणि बहुवचनप्रत्यय असे तीन तीन प्रत्यय येतात. प्रत्येक वर्ग विभक्त म्हणजे वेगवेगळा दाखविण्यास्तव त्याला ' विभक्ति ' ही संज्ञा केली आहे. आणि त्या निरनिराळ्या विभक्तींना पुनः प्रथमा, द्वितीया इत्यादि सांकेतिक संज्ञा केवळ अनुक्रमाच्या धोरणानें केल्या आहेत. या सर्व गोष्टींकडे नीट लक्ष दिलें असतां पूर्णपणें ध्यानांत येईल कीं, प्रत्येक विभक्ति अन्यविभक्तीपासून रूपदृष्ट्या भिन्न असणें ही गोष्ट जितकी साधेल, तितकी साधण्याकडे वैयाकरणांचें लक्ष असलें पाहिजे. जर ' विभक्ति ' म्हटलेलें कोणेक रूप सर्वदा, म्हणजे प्रत्येक शब्दाच्या प्रसंगीं, दुसऱ्या एकाद्या विभक्तीशीं रूपदृष्ट्या समान असेल, तर त्याला ' विभक्ति' ही संज्ञाच अयुक्त होय. त्या निरनिराळ्या दोन विभक्ति न म्हणतां, दोन्ही मिळून एकच विभक्ति मानिली पाहिजे. असें असतां, दादोबांनीं चतुर्थी विभक्ति वेगळी धरून तिला द्वितीयेचेच प्रत्यय नेमिले आहेत, आणि कर्मार्थ असतां ती द्वितीया आणि कर्मार्थ नसतां चतुर्थी मानावी, असें ठरवून टाकिलें आहे. हें केवळ अप्रशस्त होय. त्यांनींच पुढें

म्हटलें आहे कीं, जर "संस्कृत आणि प्राकृत (मराठी) व्याकरणांचा मूलशाखासंबंध नसता आणि तो संबंध ठेवणें इष्ट नसतें, तर चतुर्थीस केव्हांच काढून टाकून संबोधनासुद्धां सातच विभक्ति मानिल्या असत्या; परंतु तसें करणें प्रशस्त दिसत नाहीं. कारण, तसें केल्यानें लाभापेक्षां हानि फार आहे." याप्रमाणें मूलशाखासंबंधाविषयीं स्वतः म्हणत असून, पुनः त्यांनींच संस्कृत व्याकरणाच्या शैलीविरुद्ध दोन निरनिराळ्या विभक्तींना सर्वथा समान प्रत्यय ठेविले आहेत, हें आश्चर्य होय. विभक्तींच्या संख्येमध्यें त्यांनीं न्यूनाधिक्य केलें नाहीं, ही गोष्ट चांगली केली खरी; परंतु चतुर्थीला स्वतंत्र प्रत्यय उपलब्ध असतां त्यांनीं ते टाकून दिले, आणि केवळ नांवाला ती विभक्ति ठेवून द्वितीयेचा आणि तिचा व्यर्थ गोंधळ केला, हें कांहीं चांगलें झालें नाहीं. 'साठीं' हा विभक्ति प्रत्यय नव्हे, अव्यय आहे, असें त्यांचें म्हणणें दिसतें. परंतु त्या शब्दाला अव्यय म्हणविण्याचा जितका अधिकार आहे, तितकाच, किंबहुना त्याहून अधिक अधिकार प्रत्यय म्हणविण्याचा आहे. 'साठीं' हा उच्चार 'स्यार्थे' यांचा अपभ्रंश स्पष्ट आहे. 'स्य' हा संस्कृतांतील षष्ठीप्रत्यय, आणि 'अर्थे' अर्थ शब्दाची सप्तमी, हीं दोन्ही मिळून 'स्यार्थे' असा उच्चार होतो. याच्या अंगीं स्वतंत्रपणें प्रातिपदिकत्व नाहीं. तेव्हां 'साठीं' असा जो याचा अपभ्रंश, त्याला तरी स्वातंत्र्य आणि अव्ययत्व कोठचें? त्याचें प्रथमाक्षर 'सा' यामध्यें मूळच्या 'स्य' प्रत्ययाची स्पष्ट ओळख पटते. तेव्हां एवढ्यावरून 'साठीं' या सगळ्या उच्चाराला प्रत्यय म्हटल्यानें बिघडतें काय? कांहीं नाहीं. एक प्रत्यय आणि एक विभक्त्यंतरूप यांचा संयोग होऊन, त्या संयुक्तरूपाचा पुनः अपभ्रंश होऊन जो लहानसा द्व्यक्षरी शब्द झाला, त्याला अन्य प्रत्ययाच्या अभावीं सोईस्तव प्रत्ययसंज्ञा करणें हें कांहीं वाईट नव्हे. यापासून विभक्तींमध्यें खूट न राहतां सर्व व्यवस्था पुनः सुरळीत लागते. दादोबांनीं पुनः म्हटलें आहे कीं, कारणें, करितां, अर्थीं,

स्तव, साठीं यांतून एकाद्यालाच जर प्रत्यय मानावें, तर सर्वांना कां मानूं नये, अशी आशंका येईल. परंतु या आशंकेचें समाधान सोपें आहे असें आम्हांस वाटतें. ' कारणें ' हें अव्यय मुळीं ' कारण ' शब्दाची तृतीया आहे. ' करितां ' हें अव्यय ' कृते ' या संस्कृत अव्ययाचा अपभ्रंश आहे. ' स्तव ' या अव्ययाची उत्पत्ति संदिग्ध असून, त्याचा अर्थ संप्रदानापेक्षां अपादानाकडे,—म्हणजे चतुर्थीच्या मुख्य अर्थापेक्षां पंचमीच्या मुख्य अर्थाकडे—अधिक ओढतो. 'अर्थी' ही तर ' अर्थ ' शब्दाची सप्तमी उघड आहे. परंतु ' साठीं ' यामध्यें, अन्य कांहीं अर्थ अधिक असला तरी, ' स्य ' या प्रत्ययाचाही अंश त्यांत असल्यामुळें, इतर जे पूर्वोक्त शब्द, त्या सर्वांपेक्षां त्यामध्यें प्रत्ययत्व अधिक आहे, यांत कांहीं संशय नाहीं. यास्तव ' साठीं ' यालाच चतुर्थीचा प्रत्यय मानून इतरांना केवळ अव्ययांत गणणें ही गोष्ट सोईची, आणि पुनः सयुक्तिकही आहे.

विभक्तिसंज्ञेचें लक्षण करण्यामध्यें मुळीं चुकी झाल्यामुळें, त्या चुकीचा परिणाम पुढें चमत्कारिकच झाला, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. मुळीं पायाच डळमळीत असला, तर त्यावर उभारलेली रचना भलतीकडे-सच झुकायाची, हें साहजिक आहे. काळा घोडा असेल तो मात्र घोडा, असा जर प्रथमतः सिद्धांत केला, तर पांढरा घोडा हा कांहीं घोडा नव्हे, असें दुसऱ्या कोणी म्हटलें तर नवल नाहीं. " नामाशीं आणि क्रियेशीं जो संबंध त्यास कारक अशी संज्ञा आहे, आणि हा संबंध सुचविणारे जे प्रत्यय तदंत जे शब्द त्यास विभक्ति म्हणतात, " हें दादोबांनीं दिलेलें विभक्तींचें लक्षण सदोष आहे किंवा निर्दोष आहे, हें पाहण्याची आज पन्नास-पंचावन्न वर्षांत कोणालाही इच्छा होऊं नये, हें केवढें आश्चर्य ! दादोबांनीं दिलेलें हें विभक्तींचें अशुद्ध लक्षण जर कृष्णशास्त्री चिपळूणकर आणि कृष्णशास्त्री गोडबोले, या शास्त्रिद्वयानें निःशंकपणें गृहीत केलें, तर जोशीबुवांनींही तीच अंधपरंपरा डोळे झांकून स्वीकारिली असतां नवल

तें कशाचें ? दादोबांनीं दिलेल्या लक्षणानें, कारकार्थसूचक प्रत्ययांना मात्र विभक्तित्व येतें. ' षष्ठी ' म्हटलेली जी विभक्ति, तिचा संबंध क्रियेशीं नसल्यामुळें ती कारकांत येत नाहीं, अर्थात् तिला विभक्तित्व नाहीं, असा परिणाम झालाच ! तथापि आपणच दिलेल्या लक्षणाकडे आपणच दुर्लक्ष करून, पुरातन पद्धतीचा थोडासा मान राखून, दादोबांनीं षष्ठीची ही गणना विभक्तीमध्यें कशी तरी केलीच. परंतु पुढें चिपळूणकर शास्त्रिबुवा यांणीं त्यांचा स्वमतविरोधरूप दोष काढिला. तरी दादोबांनीं दिलेलें जें विभक्तीचें अशुद्ध लक्षण, तें त्यांणीं शुद्ध केलें असें नाहीं; तर तेंच अशुद्ध लक्षण शुद्ध मानून त्यावरूनच असा सिद्धांत केला कीं, षष्ठी ही कांहीं विभक्ति नव्हे. अनुमानाला आधारभूत जी व्याप्ति, तीच मुळीं चुकीची असल्यामुळें, अर्थात् अनुमान चुकलें. ' कारकसूचक जे प्रत्यय तेच विभक्तिप्रत्यय, ' या अशुद्ध लक्षणावरून, ' जे प्रत्यय कारकसूचक नव्हेत, ते विभक्तिप्रत्यय नव्हेत, ' अशी व्यतिरेकव्याप्ति आली, तीही अशुद्धच; आणि षष्ठीचे प्रत्यय हे कांहीं कारकसूचक नव्हेत; तस्मात् षष्ठीचे प्रत्यय हे विभक्तिप्रत्यय नव्हेत, असा या सदोषव्याप्तीच्या अनुरोधानें स्वाभाविकपणें तर्काभास उत्पन्न झाला. परंतु कोणत्याही भाषेंत पाहिलें तरी षष्ठीचा जो अर्थ त्याचा संबंध क्रियेशीं क्वचितच आढळेल. षष्ठीचा संबंध मुख्यत्वें नामाशीं असतो. पण असें जरी आहे, तरी षष्ठीची गणना प्रसिद्ध प्रसिद्ध सर्व भाषांच्या व्याकरणांमध्यें निर्बाधपणें विभक्तींमध्यें केलेली असते. संस्कृत व्याकरणांत तर ' षष्ठी ' ही एक विभक्ति आहेच. पण ज्या भाषेमध्यें विभक्ति केवळ दोन, किंवा फारच म्हटल्या तर तीन आहेत, अशा इंग्लिश भाषेमध्यें देखील आमच्या षष्ठीच्या अर्थाची Genitive (जेनिटिव्ह) अथवा Possessive (पझेसिव्ह) या नामें विभक्ति आहेच. क्रियेशीं असणारा संबंध दाखविणाऱ्या प्रत्ययाला मात्र विभक्तिसंज्ञा करावी, ही गोष्ट कोणत्याही व्याकरणाला संमत असेल असें वाटत

नाहीं. पुनः क्रियेशीं संबंध असणें ही जर विभक्तिसंज्ञेची खरी अट असेल. तर संबोधनालाही विभक्तींतून गाळून टाकणें प्राप्त आलेंच. षष्ठीला लोटण्याला विशेषण हें एक वेगळें स्थळ तरी आहे; पण या संबोधनाची वाट काय ? याशिवाय, ' मनानें मोकळा,' ' पायानें लंगडा, ' इत्यादि प्रयोगामध्यें ' मनानें, ' ' पायानें ' इत्यादिकांचा संबंध क्रियेशीं नाहीं; तेव्हां दादोक्त लक्षणाला अनुसरल्यास यांना विभक्ति मानितां येणार नाहीं. ' रात्रीचा फिरतो, ' ' दिवसाचा निजतो, ' इत्यादि प्रयोगांमध्यें ' रात्रीचा, ' ' दिवसाचा ' इत्यादिकांचा संबंध क्रियेशीं आहे, तेव्हां त्यांना या प्रसंगीं विभक्तित्व द्यायाचें किंवा नाहीं ? अशा अनेक अडचणी उत्पन्न होण्याला मूळ कारण विभक्तिसंज्ञेचें अशुद्ध लक्षण हेंच होय. दुसरें कांहीं नाहीं.

ज्या रूपाला षष्ठी म्हणतात, तें रूप विशेषणाच्या लक्षणांनीं युक्त असतें, म्हणजे त्याला विशेष्य असतें, आणि विशेष्याच्या अनुरोधानें त्याचें रूपांतर होतें, म्हणून त्याला विभक्तींत गणणें योग्य नव्हे, अशी एक कोटी चिपळूणकर, गोडबोले, आणि जोशी यांनीं पुढें आणिली आहे. परंतु त्या रूपामध्यें जर विभक्तीचे वास्तविक धर्म आहेत, तर विशेषणाचे धर्मही त्यामध्यें आणखी असले म्हणून काय झालें ? षष्ठीच्या रूपाचा सर्व भाषांमध्यें विशेषणासारखा प्रयोग आहेच; तरी त्या रूपाला विभक्तित्व नाहीं, असें कोणत्याही व्याकरणांत म्हटलेलें नाहीं. तृतीयादि विभक्ति अर्थतः क्रियापदाचीं विशेषणेंच आहेत, तरी त्यांचें विभक्तित्व काढून टाकावें असें कोणी म्हणत नाहीं, आणि तसें म्हणण्याला योग्य कारणही नाहीं. असें असतां, षष्ठीविभक्ति हें अर्थतः नामपदाचें विशेषण आहे, हें कारण दाखवून त्याचें मात्र विभक्तित्व काढून घेण्याचा यत्न करणें हें कांहीं प्रशस्त नव्हे. षष्ठीच्या अंगीं विशेषणत्व असणें ही गोष्ट जर तिच्या विभक्तित्वाच्या आड येऊं शकत नाहीं, तर तिच्या अंगीं विशेष्यनिघ्नता

असणें, म्हणजे विशेष्याच्या लिंगवचनाच्या अनुरोधानें विकार पावण्याचा विशेषणाचा धर्म असणें, यांतच अयोग्य तें काय आहे ? कांहीं नाहीं.

या विभक्तिप्रकरणाच्या संबंधानें दादोबापासून आलीकडच्या प्रत्येक वैयाकरणानें एकाहून एक अधिक चमत्कार केले आहेत. दादोबांनीं चतुर्थीला द्वितीयेचेच प्रत्यय ठेविले. चिपळूणकर यांनीं षष्ठी विभक्ति काढून टाकिली. गोडबोले यांनीं द्वितीया आणि षष्ठी या दोन्ही विभक्ति काढून टाकिल्या. जोशीबुवांनीं द्वितीया परत आणिली; इतकेंच नव्हे, तर तिचे सप्रत्यय द्वितीया आणि अप्रत्यय द्वितीया असे दोन प्रकार केले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें वागूं गेल्यास काय काय चमत्कारिक परिणाम होतात, ते पाहूं—

'राम रावण मारितो,' यांत **राम** ही प्रथमा; **रावण** ही अप्रत्यय द्वितीया; 'राम रावणास मारितो,' यांत रावणास ही सप्रत्यय द्वितीया ! त्यांनीं आणखी म्हटलें आहे,—

"सकर्मक क्रियापद असतां वाक्यांत जो शब्द त्या क्रियापदाचें कर्म असतो, तो द्वितीयांत असतो; उदा० 'रामा **काम** करितो,' 'बाप **मुलास** पोशितो,'" (नि० ५९६)

यावरून पाहिलें असतां सहज असें वाटेल कीं, जो शब्द कर्मार्थी योजिला असेल, तो सप्रत्यय असो किंवा अप्रत्यय असो, त्याला द्वितीया हीच संज्ञा द्यावी, असा जोशीबुवांचा सिद्धांत असेल. पण तसेंही नाहीं. 'मी गाई बांधिल्या,' 'त्यानें पुस्तक रचिलें,' 'हरीनें पत्रें लिहिलीं,' (नि०५९३) यांत **गाई**, **पुस्तक**, **पत्रें**, हे शब्द प्रथमान्त समजावे असें ते म्हणतात ! याच्या स्पष्टीकरणार्थ म्हणून जो लेख त्यांणीं लिहिला आहे, तोच उतरून घेऊं—

"५९३. कर्मणि प्रयोग असतां कर्मपद प्रथमांत असतें व त्याच्याप्रमाणें क्रियापदाचें रूप फिरतें, म्हणून त्यास त्या क्रियापदाचा **कर्ता** असें म्हण-

तात. [प्रश्न–कोण म्हणतात ?] परंतु त्यापासून क्रियाकर्तृत्वाचा बोध होत नाहीं." (! ! !) या वाक्याचा अर्थ पुनः स्पष्ट करण्याकरितां याच्या खालीं जोशीबुवांनीं टीका लिहिली नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट समजायाची; कारण कीं हें टीकेचें काम इतरांच्या हातून साध्य होण्याची कोणत्याही प्रकारें अगदीं आशा नाहीं.

तथापि यांतील सारांश असा दिसतो, कीं अप्रत्ययशब्द कर्तृस्थानीं असतां त्याला 'प्रथमा' हें नांव द्यावें, आणि कर्मस्थानीं असतां 'द्वितीया' हें नांव द्यावें. पण कर्मणि प्रयोग असेल तर, तो अप्रत्ययशब्द प्रत्यक्ष कर्मस्थानीं असला तरी त्याला 'प्रथमा' हेंच नांव द्यावें इतकेंच नव्हे, तर तेथें त्या कर्माला 'कर्ता' हें नांव द्यावें !

एकाच शब्दाला कर्तृ–कर्म–संप्रदानादि अर्थभेदाप्रमाणें प्रथमा अथवा द्वितीया, आणि द्वितीया अथवा चतुर्थी, मानण्याची कल्पना म्हटली म्हणजे इंग्रजी व्याकरणांतील पद्धतीचें खरें स्वरूप न जाणतां, तिचा अनुकार करण्याची जी यांना इच्छा झाली, तिचा परिणाम होय. इंग्रजी भाषेमध्यें नामाचें जें मूळरूप तेंच विकार न पावतां, वाक्याच्या ओघाप्रमाणें कर्त्रर्थींही येतें, आणि कर्मार्थींही येतें, हें यांणीं पाहिलें. परंतु तेथें केवळ विभक्तिक्रमसूचक प्रथमा, द्वितीया, इत्यादि प्रकारचीं वेगळीं सांकेतिक नांवें नाहींत, हें कांहीं त्यांच्या ध्यानांत आलें नाहीं; आणि प्रथमा, द्वितीया, इत्यादि सांकेतिक संज्ञा या, केवळ कर्ता, कर्म, करण, संप्रदान, इत्यादिकांशीं समानार्थक आहेत, असें गृहीत करून, त्यांमध्येंही वाक्याच्या ओघाप्रमाणें एकाच रूपाला प्रथमा अथवा द्वितीया, आणि द्वितीया अथवा चतुर्थी, इत्यादि संज्ञा कराव्या, असें अशास्त्र लेख त्यांनीं लिहिले !

सप्रत्यय द्वितीया आणि अप्रत्यय द्वितीया हे जसे द्वितीयेचे दोन भेद जोशीबुवांनीं केले आहेत, तसे सप्रत्यय प्रथमा आणि अप्रत्यय प्रथमा

असे प्रथमेचेही दोन भेद त्यांनीं कां केले नाहींत हें समजत नाहीं. कर्मस्थानीं असणारा जो शब्द तो सप्रत्यय असो, किंवा अप्रत्यय असो, त्याला जर ' द्वितीया ' ही संज्ञा लागते, तर कर्तृस्थानीं असणारा जो शब्द तो सप्रत्यय असो किंवा अप्रत्यय असो, त्याला ' प्रथमा ' ही संज्ञा देण्यास जोशीबुवांच्या म्हणण्याप्रमाणें कांहीं बाध नव्हता. " राम रावणास मारितो, ' ' रामानें रावण मारिला ' आणि ' रामाला चालवतें, ' या वाक्यांमध्यें राम, रामानें, आणि रामाला हीं तीन्ही कर्तृपदें आहेत. तेव्हां या तिहींना त्यांच्या मताप्रमाणें ' प्रथमा ' संज्ञा करणें अवश्य होतें ! परंतु त्यांच्या व्याकरणांतील ' कर्ता ' या नांवाचें पद आणि ' कर्तृपद ' यांतील सूक्ष्म भेद आमच्या स्थूल बुद्धीला अगोचर असल्यामुळें, " सर्व भिन्न मतें व वादस्थळें, यांची एकवाक्यता " करणारी, " पूर्ण भरवशानें " सांगितलेली, जी त्यांची व्यवस्था, ती आमच्या ध्यानांत भरत नसेल, या गोष्टीला उपाय नाहीं.

सप्रत्ययद्वितीयेला अर्थभेदास्तव म्हणजे संप्रदानार्थ असतां जशी ' चतुर्थी ' ही संज्ञा होते, तशी सप्रत्ययप्रथमेला करणार्थ असतां ' तृतीया ' ही संज्ञा होणें हें ठीकच आहे. परंतु प्रत्येक विभक्तिरूपाचे जे निरनिराळे अनेक अर्थ होतात, त्या त्या अर्थाप्रमाणें त्याला निरनिराळी संज्ञा करणें हें काम जोशीबुवांनीं तसेंच पुढें चालविलें नाहीं हे तरी उपकारच समजायाचे; कारण कीं, जर त्यांणीं तें चालविलें असतें, तर तें सिद्धीस तर गेलें नसतेंच; पण शिकणारांना मात्र विनाकारण त्यापासून मोठाच त्रास उत्पन्न झाला असता.

बरें, या सर्व गोष्टी एकीकडे राहिल्या; पण जेव्हां विभक्तिगणनेंतून कोणी द्वितीया काढून टाकिली, कोणी षष्ठी काढून टाकिली, तेव्हां अवशिष्ट राहिलेल्या विभक्तींच्या नांवांमध्यें जी अव्यवस्था उत्पन्न झाली, तिची वाट काय ? जर प्रथमा म्हणजे पहिली विभक्ति ही स्थिर आहे, आणि पुढें

जी द्वितीया म्हणजे दुसरी विभक्ति मानिली होती ती नाहींशी झाली, तर तिच्यापुढें मानिलेल्या ज्या तृतीया, चतुर्थी, पंचमी, त्यांचीं नांवें फिरवून त्यांना अनुक्रमें द्वितीया, तृतीया, आणि चतुर्थी हीं नांवें नकोत का द्यावयाला ? याप्रमाणेंच पुढें षष्ठी नाहींशी झाल्यामुळें सप्तमीला पंचमी, आणि संबोधनाला षष्ठी हीं नांवें देणें अवश्य आहे. त्यांत पुनः कोणी चतुर्थी काढून टाकतो; तेव्हां त्याच्या मताप्रमाणें पुनः संज्ञामध्यें आणखी गोंधळ व्हायाचाच. जी जी विभक्ति काढून टाकिली, तिचें नांव तेवढेंच गाळन इतर विभक्ति तशाच ठेवण्याचा प्रयत्न करून प्रथमा, तृतीया, चतुर्थी, पंचमी, सप्तमी, असा विचित्र क्रम गोडबोलेशास्त्री यांणीं ठेविला आहे. चिपळूणकर आणि जोशी यांणींही असेंच कांहींसें केलें आहे. परंतु यामध्यें कांहींच अर्थ नाहीं. आमचें म्हणणें स्पष्ट करण्याकरितां एक उदाहरण घेऊं आणि तें पुनः आमच्या या सर्व वैयाकरणांच्या नित्य परिचयांतलें, म्हणजे विद्याशालेच्या संबंधाचेंच घेऊं. असें समजूं कीं यांच्या शाळेंतील एका वर्गामध्यें आठ विद्यार्थी आहेत. तेव्हां त्यांना अनुक्रमानें पहिला, दुसरा, तिसरा, इत्यादि आठ संज्ञा होणें योग्यच आहे. पण जर अशी गोष्ट झाली, कीं त्यांतील दुसरा आणि सहावा हे विद्यार्थी शाळा सोडून निघून गेले अथवा दुर्वर्तनास्तव यांस शाळेंतून काढून टाकिलें तर अवशिष्ट राहिलेल्या विद्यार्थ्यांना निरंतर मूळच्याच संज्ञा चालवायच्या, किंवा नव्या महिन्याच्या अथवा वर्षाच्या आरंभीं नवा क्रम धरून शेवटचा विद्यार्थी सहावा होईल, अशा रीतीनें नव्या संज्ञा करायाच्या ? हीच गोष्ट विभक्तिरूपांच्या संज्ञाला लाविली पाहिजे. पण विभक्तिसंख्येमध्यें आमच्या प्रत्येक वैयाकरणानें आपापल्या समजुतीला अनुसरून न्यूनाधिक्य केलें आहे. तेव्हां जुन्या संज्ञा, आणि प्रत्येकानें दिलेल्या वेगवेगळ्या क्रमाला अनुसरून असणाऱ्या नवनव्या संज्ञा, यांमध्यें सर्वच गोंधळ होऊन जाणार. एकाची तृतीया, ती दुसऱ्याची द्वितीया; आणि एकाची सप्तमी ती दुसऱ्याची पंचमी,

किंवा चतुर्थी ! जर अशा नव्या संज्ञा न कराव्या, तर प्रथमा, तृतीया, पंचमी, सप्तमी, इ० प्रकारचा उडता क्रम केवळ अर्थशून्य आणि वेडगळ व्हायाचाच. हेंही मोठेंच संकट. तेव्हां या सर्व अडचणी दूर करण्याचा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे—आम्हीं वर दाखविल्याप्रमाणें प्रत्येक विभक्तीचे प्रत्यय सर्वथा भिन्नभिन्न ठेऊन आठही विभक्ति पूर्ववत् सुस्थिर ठेवाव्या, हाच होय. याला कोणतीही अडचण येत नाहीं, आणि यापासून पुढेंही कांहीं गोंधळ उत्पन्न होत नाहीं.

शास्त्रामध्यें कोणतीही संज्ञा करायाची तर ती कोणत्या कार्यासाठीं करायाची, हें स्पष्ट असलें पाहिजे. कार्य जर आधींच सिद्ध आहे, तर संज्ञेचें कांहीं प्रयोजनच नाहीं. म्हणजे संज्ञेला पुढें जर कांहीं कार्य नसेल, तर ती संज्ञा व्यर्थ होय. शास्त्रसंज्ञा वादासाठीं करावयाच्या असें नाहीं. त्यांचें स्वतंत्रत्वेंकरून कांहीं प्रयोजन नसतें; कांहींतरी कार्याच्या अपेक्षेनें त्यांचा उपयोग व्हायाचा. वाक्यामध्यें द्वितीया विभक्तीचा काय अर्थ होतो आणि तिचा कसा प्रयोग करायाचा, हें आपणांस पुढें समजून घ्यायाचें आहे, म्हणून द्वितीया कोणती, आणि चतुर्थी कोणती, हें आधीं समजण्याची आवश्यकता. परंतु कर्मार्थ असतां ‘ रामास ’ या रूपाला द्वितीया संज्ञा करावी, आणि संप्रदानाद्यर्थ असतां **चतुर्थी** संज्ञा करावी, या वादोक्त नियमाचा कांहीं एक उपयोग नाहीं. कर्मार्थ आणि संप्रदानाद्यर्थ हे आधीं स्पष्ट समजल्यानंतर मग संज्ञा पाहिजे कशाला ? आणि उलट घेऊन तिच्याविषयीं इतकी भवति न भवति करीत बसण्याचें तरी प्रयोजन काय ?

त्याप्रमाणें ‘ राम ’ हा शब्द कर्ता असतां त्याला **प्रथमा**, आणि कर्म असतां **द्वितीया** या संज्ञा कराव्या, म्हणून जोशीबुवांनीं केलेल्या नियमाचा तरी काय उपयोग ? कर्ता आणि कर्म समजण्याकरितां या विभक्तींचा उपयोग व्हायाचा. पण कर्ता आणि कर्म हीं जर आधींच समजलीं तर

प्रथमा आणि द्वितीया या संज्ञा निरर्थक होत. 'घरांत बसून जर धान्य मिळत आहे, तर रानांत जाऊन शेत पिकविण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं.'

सारांश, प्रस्तुत प्रसंगीं विभक्तिसंज्ञा ज्या करावयाच्या, त्यांचा उपयोग पुढें कारकाद्यर्थ प्रकरणीं व्हायाचा आहे. अमुक विभक्तीचा म्हणजे शब्दस्वरूपाचा, अर्थ अमुक होतो, किंवा प्रयोग अमुक प्रकारें होतो, हें पुढें सांगायाचें आहे. म्हणून शब्दस्वरूपें आधीं निश्चित झालीं पाहिजेत. परंतु हीं शब्दस्वरूपें एकवचन, द्विवचन, बहुवचन, या भेदांही करून, आणि आदेश, आगम, इत्यादि कारणांवरून अनेक होतात. म्हणून थोडक्या शब्दांनीं त्यांचें ग्रहण व्हावें या हेतूनें, संस्कृत वैयाकरणांनीं नियत प्रत्यय आणि त्यांचे आदेश यांच्या योगानें झालेल्या पदांना नियत संज्ञा केल्या आहेत. त्या संज्ञा पुनः अर्थाच्या धोरणानें न करितां, केवळ ओळख रहाण्यास्तव संख्येच्या क्रमानें केल्या आहेत. ही गोष्ट किती चातुर्याची आहे, हें विचारी जनांच्या सहज लक्षांत येईल.

याप्रमाणें विभक्तींची संख्या, त्यांच्या संज्ञा, आणि त्यांचे प्रत्यय हे स्थिर झाल्यानंतर आतां त्या विषयीं विशेष विचार करण्याला मार्ग मोकळा झाला.

पुस्तक २२, अंक ४, एप्रिल १८९०,

मराठी व्याकरणावर विचार.

निबंध ६ वा.

विभक्तिप्रत्ययांची उत्पत्ति.

संस्कृत भाषेमध्यें प्रथमा विभक्तीलाही प्रत्यय आहेत. उदाहरणार्थ, 'राम' शब्दाची प्रथमा संस्कृतामध्यें **रामः, रामौ, रामाः**, अशी होते हें सर्वांना ठाऊक आहेच. वास्तविकपणें पाहिलें असतां प्रत्येक विभक्तीचें

रूप वेगवेगळें असावें, आणि प्रातिपदिकाहूनही तें भिन्न असावें, यांतच विभक्तीच्या लक्षणाची खरी पूर्तता होते. परंतु सर्वत्र तसें घडून येत नाहीं. संस्कृतामध्यें देखील कित्येक प्रातिपदिकांपुढें प्रथमैकवचन प्रत्ययाचा लोप होतो; जसें **रमा, नदी, सरित्** , यांच्या प्रथमेचीं एकवचनें **रमा, नदी, सरित्** , हींच आहेत. वर्तमान मराठी भाषेमध्यें प्रथमेच्या एकवचनीं प्रातिपदिक तीच प्रथमा; तिला वेगळे प्रत्यय नाहींत. वचनप्रकरणीं दाखविलें आहे त्याप्रमाणें, प्रथमा बहुवचनीं कित्येक प्रातिपदिकांना जो विकार होतो, त्यालाच 'प्रथमा बहुवचन प्रत्यय' हें नांव देण्याला कांहीं अडचण दिसत नाहीं. त्यांच्या उत्पत्तीविषयीं त्या प्रकरणीं विचार केलाच आहे.

जुन्या ग्रंथांमध्यें विशेषतः अकारांत पुल्लिंग शब्दांना प्रथमैकवचनीं 'ओ' अथवा 'ऊ' प्रत्यय लागलेला दृष्टीस पडतो. जसें, देवो, रावो, नाहो, गणेशु, नाथु इत्यादि. हा प्रत्यय प्राकृताच्या द्वारें आलेला संस्कृत अः प्रत्ययाचा अपभ्रंश स्पष्ट आहे.

द्वितीया.

द्वितीयेचे प्रत्यय, ला, स, ना, हे संस्कृतामधील षष्ठी प्रत्ययांचे अपभ्रंश आहेत. संस्कृत भाषेच्या उत्तर स्थितीमध्यें षष्ठीच्या रूपांचा प्रयोग संप्रदानार्थी आणि कर्मार्थीही पुष्कळ होऊं लागला; आणि त्यामुळें त्या त्या अर्थी असणारे मूळचे प्रत्यय प्रचारांतून जातां जातां शेवटीं मराठीमध्यें षष्ठीच्या प्रत्ययांचीच योजना त्यांच्या स्थानीं स्थिर होऊन गेली. पांसष्ट वर्षांमागें प्रथमतःच जेव्हां मराठी व्याकरणाची रचना झाली, तेव्हां विभक्ति प्रत्यय ठरविते वेळेस त्या प्रत्ययांच्या उत्पत्तीकडे वैयाकरणांनीं लक्ष दिलें नाहीं. पण कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, नामसंबंध, अधिकरण, या मुख्य मुख्य अर्थांच्या धोरणानें सध्यांच्या मराठी भाषेमध्यें मिळालेल्या प्रत्ययांची वांटणी करून त्यांना क्रमशः प्रथमादि संज्ञा देऊन टाकिल्या. यामुळें जरी मूळचे संस्कृत प्रत्यय आणि त्यांचे अपभ्रंशरूप जे सध्यांचे

मराठी प्रत्यय, यांमध्यें स्थानदृष्ट्या, म्हणजे संज्ञासंबंधानें, सर्व प्रकारें ऐक्य आढळत नाहीं, तरी मराठी वैय्याकरणांनीं जो मार्ग स्वीकारिला, तोच सयुक्तिक होता यांत कांहीं संदेह नाहीं. कारण कीं, सर्व जुने प्रत्यय, किंवा त्यांचे अपभ्रंश तरी, सर्वदा मराठींत आढळतात असें नाहीं. आणि तशांत जे निरनिराळे अपभ्रंश आढळतात, त्यांचे सध्यांचे अर्थ सर्वदा त्यांच्या त्यांच्या मूळ अर्थांशीं अचूक जुळतात असेंही नाहीं. यामुळें मूळचा अर्थ आणि मूळची संज्ञा या दोन्ही गोष्टींकडे लक्ष ठेवून प्रत्ययांची वांटणी करूं पाहणें सर्वथा असाध्यच झालें असतें. असो.

बहुतेक संस्कृत शब्दांपुढें लागणारा षष्ठी बहुवचनप्रत्यय **नाम्** हा, **ना** या रूपानें मराठींतील द्वितीया बहुवचनाचा प्रत्यय झाला आहे. नाचेंच रूपांतर '**ला**' हें होय. **न** आणि **ल** यांचा परस्परांच्या स्थळीं विनिमय झाल्याचीं उदाहरणें:—

संस्कृत	प्राकृत	मराठी
नवनीत	नोनीअ	लोणी
लांगल		नांगर
लगुड		लाकूड, नाकूड (कुळंबी भा०)
कुणबी		कुळंभी

ला हा मूळचा बहुवचनप्रत्यय खरा, तथापि एकवचनींही बहुवचनप्रत्ययाचा प्रयोग करण्याकडे जो आपल्या लोकांचा कल आहे, त्यामुळें हा एकवचनींही आला.

संस्कृत अकारांत शब्दांपुढें लागणारा षष्ठीचा एकवचन प्रत्यय '**स्य**' याचें प्राकृत भाषेंत **स्स** असें रूप झालें आहे. या '**स्स**' प्रत्ययाचा अपभ्रंश पुनः नुसता **स** असा झाला. पंधरासत्राशें वर्षांमागच्या प्राकृत शिलालेखामध्यें **स** हा षष्ठीचा प्रत्यय आढळतो—पण आलिकडे हा **स** मराठी द्वितीयेच्या वांट्यास आला, आणि त्या स्सचेंच "चा" असें दुसरें

एक रूप होऊन तें षष्ठीलाच राहिलें. सर्व जुन्या मराठी ग्रंथांमध्यें द्वितीयेच्या स्थानीं **स** हाच प्रत्यय प्रायः आढळतो. इतर प्रत्ययांनाही लागणारा जो ईकार तो त्याला लागून **सी** असेंही रूप झालेलें पुष्कळ स्थळीं आढळतें. किंबहुना **स** पेक्षां **सी**ची प्रवृत्ति जुन्या ग्रंथांत अधिक आहे असें म्हणण्याला अडचण नाहीं. **स** हा प्रत्यय आतां दोन्ही वचनीं लागतो, तरी हा मूळचा एकवचनप्रत्यय यावरून पाहतां **स** पेक्षां **ला**मध्यें उत्पत्ति दृष्ट्या आदरार्थ अधिक आहे. **स**ची प्रवृत्ति कोंकणांत अधिक, आणि **ला**ची प्रवृत्ति देशावर अधिक आहे. याचें कारण—देशावर आदरार्थी शब्दांकडे आणि प्रौढ भाषणाकडे लोकांचा कल विशेष, हेंच प्रायः असावें असें वाटतें.

जुन्या ग्रंथांमध्यें **तें** हा एक प्रत्यय द्वितीयेला आहे. हा मूळचा **अन्ते** म्हणजे समीप या अव्ययाचा अपभ्रंश होय.

तृतीया

तृतीया विभक्तीचा एकवचन प्रत्यय ' नें ', हा राम, देव, इत्यादि संस्कृत शब्दांच्या तृतीयैकवचनीं ' रामेण ' ' देवेन ' इत्यादिकांत दिसणारा जो ' एन ' हा अंश, त्याचा अपभ्रंश असें कित्येकांना वाटतें. परंतु ' एन ' याचा अपभ्रंश एँ असा आहे, आणि तो रामें, देवें इत्यादि जुन्या मराठी रूपांमध्यें आढळतो. आणि नें हा प्रत्यय पाहिला असतां इकारान्तादि शब्दांपुढें लागणारा ' विधिना, ' ' भानुना ' इत्यादिकांत दिसणारा, जो ना प्रत्यय, त्याचा हा अपभ्रंश होय, असें मानणें विशेष सोपपत्तिक दिसतें. जेव्हां कांहीं विशेष कारणानिमित्तें एकादें नवीन अक्षर लागून शब्द किंवा प्रत्यय मूळच्यापेक्षां लांबट झाला असेल, तेथची गोष्ट वर्ज्य करून इतरत्र पाहिलें असतां, असें लक्षांत येईल कीं, अपभ्रष्ट शब्दांचा कल मूळच्या शब्दांमध्यें कांहीं तरी लाघव उत्पन्न करण्याकडे प्रायः असतो. यास्तव एन पासून एँ प्रत्यय झाला

हें ठीकच. परंतु त्यांतीलच 'न' हें अक्षर, कांहीं विशेष कारणांवाचून केवळ कालांतराच्या निमित्तानें लांबट होऊन **ने**चें रूप पावलें असें म्हणणें अंमळ अडचणीचें दिसतें. **ना**च्या स्थानीं **नें** होणें यांत कांहीं ओढाताण नाहीं. कोंकणांतील कित्येक प्रदेशीं आणि विशेषतः मालवणापासून राजापूरच्या आसपासपर्यंत ज्या कित्येक शब्दांच्या अंतीं 'ऑं' आढळतो, त्यांच्याच अंतीं इतर स्थळीं 'एँ' आढळतो. जसें असाँ, तसाँ, बराँ, यांच्या स्थानीं असें, तसें, बरें इत्यादि. यावरूनही कदाचित् उक्तमतास बळकटी येईल असें आम्हांला वाटतें.

हीं हा प्रत्यय 'भिः' या संस्कृत प्रत्ययाचा अपभ्रंश स्पष्ट आहे. **भिः** याच्या स्थानीं जुन्या प्राकृतांमध्यें '**हिं**' होऊन तोच मराठीमध्यें **हीं** झाला आहे. हीं चा अपभ्रंश 'ईं' असा जुन्या ग्रंथांत आढळतो. उदा०—

'व्यासोक्तें अवगाहिला **बुधजनीं** नाना **गुणीं** गाइला.'

या ईला बहुवचनसूचक अनुनासिकत्व अथवा नकार लागून **नी** झाली आहे, असें दिसतें.

गोडबोले म्हणतात—'**बोलणें** याचें बहुवचन **बोलणीं** आहे, तसें **नें** याचें बहुवचन **नीं** आहे.' परंतु आम्हांला वाटतें कीं **नीं** आणि **नें** यांचा परस्परांशीं कांहीं संबंध नाहीं. कोल्हापूरप्रांतीं **त्यास, यास** यांचीं बहुवचनें **त्यास्नी** आणि **यास्नी**, अशीं करीत असतात. यांकडे पाहिलें तर असें लक्षांत येईल कीं यांतील जो नकार तो बहुवचनसूचक जें अनुनासिकत्व त्याचेंच रूपांतर असून, तो पुढील ईकाराला जाऊन मिळालेला आहे; तोच प्रकार एथें दिसतो. **हीं**च्या स्थानीं जो ई राहिला त्यालाच बहुत्वसूचक जें अनुनासिकत्व, तें नकाररूपानें येऊन मिळालें आहे, दुसरें कांहीं नाहीं.

आजपर्यंत सर्व मराठी वैयाकरणांनीं तृतीयेचा आणखी एक प्रत्यय **शीं** हा घेतला आहे. परंतु तो **सह** या संस्कृत प्रत्ययाचा अपभ्रंश स्पष्ट

आहे. इंग्रजी With (उईद्) या अव्ययाचा अर्थ मराठीमध्यें **नें** आणि **शीं** या दोहों शब्दांनीं प्रकट होतो, म्हणून कदाचित् या दोहोंनाही तृतीयाप्रत्ययांत धरिलें असावें, असें दिसतें. परंतु हे समानार्थी नसल्यामुळें या दोहोंला एकच विभक्तिसंज्ञा प्रशस्तपणें कशी देतां येईल हें आम्हांला समजत नाहीं. आमच्या मतें **शीं** हा शब्द स्पष्ट अव्ययांत गणावा हें योग्य आहे.

चतुर्थीचा प्रत्यय **साठीं** हा, **स्य** आणि **अर्थे** यांचा संयोग जो **स्यार्थे,** त्याचा अपभ्रंश होय हें मागें सांगितलेंच आहे.

पंचमीचा प्रत्यय **हून** हा प्राकृतांतील पंचमी बहुवचन प्रत्यय **हिंतो** याचा अपभ्रंश होय. **हिंतो** याच्या जोडीला दुसरा एक सुंतो असा प्राकृतांत प्रत्यय आहे. **हिंतो** हा, प्राकृत तृतीया बहुवचनाचा हिं आणि पंचम्यार्थक संस्कृत प्रत्यय ‘ तस् ’ यांच्या संयोगानें झाला असावा. **सुंतो** हा, प्राकृत सप्तमी बहुवचनाचा सुं आणि तस् यांच्या संयोगानें झाला असावा. सुंतो याचा अपभ्रंश सून हा मालवणी इत्यादि कोंकणी भाषांमध्यें आढळतो. जसें–थैंसून, हैंसून, मुंबईसून; घरसून, इ०

हून यांतील हकार जाऊन **ऊन** असा एक प्रत्यय झाला आहे. हा सर्व शब्दांना लागत नाहीं. कित्येक अकारांतांपुढें मात्र लागतो. जसें—हातून, तोंडून, घरून, दारून, इ०. वरून, खालून, आंतून, बाहेरून, पासून, इत्यादि अव्ययें हीं अशाच प्रकारें **ऊन** प्रत्यय लागून झालेलीं आहेत.

तूँन हा ‘ आंतून ’ याचा अपभ्रंश स्पष्ट आहे. तथापि याला प्रत्यय मानण्याला कांहीं अडचण दिसत नाहीं. **षष्ठीचे** प्रत्यय चा, **ची, चें, चे, च्या, चीं,** हे आहेत. हीं सर्व एकाच मूळ प्रत्ययाचीं रूपांतरें होत. संस्कृत **स्य**चा अपभ्रंश स्स; आणि पुनः त्या स्सचा एक अपभ्रंश **स,** आणि दुसरा **चा. स** हा तर द्वितीयेचा प्रत्यय झाला, हें मागें सांगितलेंच आहे. चाच्या पोटीं (ची, चें, इ०) सहा भेद झाले.

चिपळूणकरशास्त्रीबोवा म्हणतात, "ऐतिहासिक रीतीनें पाहतांही संस्कृतांतील, षष्ठीच्या प्रत्ययांतून मराठींतील षष्ठीचा प्रत्यय उत्पन्न होत नाहीं. तो उत्पन्न होण्याचा संभव षष्ठीच्या अर्थाचा जो संस्कृत प्रत्यय **ईय** त्यापासून फार आहे. **रामीय** याचें बालभाषेंत **रामिज्ज** असें रूप होऊन त्यापुढें जचा च होऊन **रामाचा** असें मराठी रूप होण्याचा चांगला संभव दिसतो." (कृ० शा० चि० निबंध ६ वा) परंतु आमच्या मतें **ईय** यापासूनच **चा** निघाला आहे असें नाहीं; तर **स्स** पासूनच **चा** निघाला आहे.

संस्कृतामध्यें '**च्**' या वर्णाला दंततालव्य उच्चार नाहीं. तेथें दंततालव्य उच्चार म्हणजे '**स्**'. परंतु दक्षिणदेशीय द्रविडादि भाषांमध्यें च् या वर्णाचा दंततालव्य उच्चार फार आढळतो. मराठी भाषा संस्कृतापासून जरी निघाली आहे, तरी तिला द्रविड भाषांचें सान्निध्य फार असल्यामुळें तिजमध्यें चकाराला दंत्य, आणि दंततालव्य असे दोन्ही उच्चार प्रसंगोपात्त येतात. गुजराथीमध्यें ग्राम्य जनांच्या भाषेंत क्वचित् च याचा दंततालव्य उच्चार आढळतो; तरी तो सर्वमान्य नाहीं. तथापि सांगायचें तात्पर्य इतकेंच कीं उत्तरदेशीय आणि दक्षिणदेशीय भाषांच्यापरत्वें स आणि च यांची उलटापालट फार दृष्टोत्पत्तीस येते. मारवाडी, व्यापारी लोक हे उत्तरदेशीय; हे मराठी भाषा बोलूं लागले असतां, त्यांना मराठींतील चकाराचा दंततालव्य उच्चार साधत नाहीं; यामुळें त्याच्या स्थानीं ते सर्वदा सकाराचा उच्चार करितात. हें आपण नित्यशः पाहतों. त्याचा, चाकर, घरचा, चांगला हे शब्द त्यांच्या तोंडी **त्यासा**, **साकर**, **घरसा**, **सांगला** अशा प्रकारें सकारयुक्त निघतात. आतां उलटपक्षीं उदाहरण घेऊं. गुजराथी भाषेमध्यें **खिस** म्हणजे सरक असें क्रियापद आहे; मुंबई आणि आसपासचीं गांवें, येथील कित्येक लोकांच्या भाषेंत हा शब्द गुजराथी भाषेच्या संसर्गानें आलेला आहे. तथापि यामध्यें सकाराच्या स्थानीं दंततालव्य च येऊन या शब्दाचा उच्चार खिच असा झाला

आहे. याच प्रदेशीं खिसा शब्द **खिचा** हा असा झाला आहे. मराठी शब्द **निसण** हा कानडी भाषेंतही आहे, पण तेथें त्याचें स्वरूप **निचणकि** असें आहे. कोंकणी शब्द **सोडण** (म्हणजे नारळावरचें काथ्याचें वेष्टन) हा शब्द **चोडण, चोड,** असाही आढळतो. नारळाचा किसलेला गर अथवा चोहो, चहू, याला कोंकणामध्यें कित्येक स्थळीं चोय आणि सोय हे शब्द आहेत. यांतून मूळचा कोणता असेल तो असो. संस्कृत शब्द **चमस,** आणि मराठी शब्द **चमचा** यांमध्ये फारसी भाषेच्या द्वारें कांहीं संबंध असावा असा तर्क होतो; आणि तसा जर कांहीं खरोखरी संबंध असेल, तर स आणि च यांच्या परस्पर उलटापालटीचें हें एक आणखी उदाहरण म्हणतां येईल. संस्कृत चूर्ण, मराठी **चुना,** आणि कानडी **सुण्ण,** यांमध्यें हाच प्रकार उलट रीतीनें दृष्टीस पडतो. हें कसें झालें असेल तें असो. पण या सर्व उदाहरणांवरून, आणि विषयैक्यावरून पाहतां, **चा** हा प्रत्यय **स्स** याचा अपभ्रंश असण्याचा जितका संभव दिसतो, तितका तो **ईय** याचा अपभ्रंश असण्याचा संभव दिसत नाहीं.

स्स हा प्रत्यय अकारांत असतां त्याचा अपभ्रंश **चा** हा आकारांत, म्हणजे दीर्घ झाला आहे, याचें कारण पाहतां असें दिसतें कीं मूळ प्रत्ययामध्यें जें द्वित्व होतें, तें अपभ्रंशांतून नाहींसें होतांच, त्यांतील द्वित्वाचा नेट पुढें दीर्घत्वाच्या स्वरूपानें आविर्भूत झाला आहे.

याप्रमाणें त्यांत दीर्घत्व येतांच, इतर आकारांत विशेषणांप्रमाणें त्यामध्येंही लिंगभेदानुसारें रूपांतर पावण्याचें सामर्थ्य आलें, आणि चा, ची, चें, चे, च्या, चीं, असे त्याचे पोटभेद झाले. हिंदी, गुजराथी, इत्यादि भाषांमध्यें देखील याप्रमाणेंच षष्ठी प्रत्ययाला लिंगभेदानुसारें रूपांतर होत असतें. उदाहरणें–राजा**का** घोडा, राजा**की** दौलत, इ०. गुजराथींत **राजानो** घोडो, **राजानी** दौलत, **राजानुं** कारखानुं, इ०

सप्तमीचा प्रत्यय ँ **त** हा, **आंत** या अव्ययाचा अंश आहे. सप्तमीचा दुसरा एक प्रत्यय ई हा बहुतेक अकारांत पुंनपुंसक शब्दांना लागतो. हा

संस्कृत सप्तम्येकवचन 'इ' प्रत्यय लागून झालेलीं रामे, गृहे, इत्यादि जीं एकारांत पदें, त्यांतील एचें रूपांतर आहे.

गोडबोलेशास्त्री म्हणतात कीं, संस्कृत सर्वनामांचा सप्तम्येकवचन प्रत्यय जो **स्मिन्**, त्याचा प्राकृत अपभ्रंश जो **स्मि**, त्याचा हा अपभ्रंश होय. परंतु तें म्हणणें सयुक्तिक दिसत नाहीं. हिंदी **में** आणि गुजराथी **मां** हे त्या स्मिन् प्रत्ययाचे अपभ्रंश म्हणतां येतील; पण मराठींतला ईं प्रत्यय हा संस्कृत एचा अंश स्पष्ट दिसतो.

यांशिवाय कांहीं थोड्या शब्दांना **आँ** हा प्रत्यय सप्तम्येकवचनीं लागतो याची उत्पत्ति स्पष्टपणें ध्यानांत येत नाहीं; तथापि हा कदाचित् आंत याचा अपभ्रंश असेल असें वाटतें.

संबोधन बहुवचनीं येणारा **नो** प्रत्यय हें करिणः, हस्तिनः इत्यादि रूपांतील अंत्य अक्षराचें रूपांतर असावें, असें वाटतें.

या प्रत्ययांमध्यें **नें, नीं, हीं, ईं, साठीं,** यांच्या अंतीं जें आनुनासिक्य आढळतें, त्याच्या संबंधानें थोडासा विचार करणें अवश्य दिसतें. यांतील कोणतेंही आनुनासिक्य देशी लोकांच्या उच्चारण्यांत येत नाहीं. तथापि सर्वत्र छापी लेखांमध्यें हें स्पष्ट दाखविण्यांत येतें; परीक्षेच्या प्रसंगीं या स्थळीं बिंदु न लिहिले, तर चूक धरण्यांत येते. परंतु या बिंदूंची वास्तविक आवश्यकता आहे किंवा नाहीं, हें पाहणें योग्य आहे.

नें—संस्कृत **ना** (अथवा **इन**)
ईं—सं० **ए** (सप्तमी)
साठीं—सं० **स्यार्थे.**

यांमध्यें तर मूळचें आनुनासिक्य नाहीं हें उघड आहे. आतां **हीं** यांत संस्कृत **भिः**, प्रा० **हिं** असें असल्यामुळें आनुनासिक्य प्राकृतांतून आलें आहे असें म्हणतां येईल. **हीं** यापासूनच तृतीया बहुवचनाचे ईं आणि **नीं** हे प्रत्यय आहेत, म्हणून यांमध्येंही आनुनासिक्य प्राकृतांतून आलें आहे असें म्हणण्याला बाध नाहीं.

एँ हा जो तृतीयैकवचन प्रत्यय, तो **इन** यापासून झाला आहे, म्हणून एथें मूळचें आनुनासिक्य आहे.

मोडी कागदपत्रांमध्यें तर हे बिंदु लिहिण्याचा संप्रदाय पूर्वींपासून मुळींच नाहीं. **नें** या तृतीयाप्रत्ययावर प्राचीन काव्यग्रंथांच्या शुद्ध मानलेल्याही हस्तलिखित पोथ्यांमध्यें बिंदु लिहिलेला प्रायः आढळत नाहीं. **नीं** याविषयींही तोच प्रकार. इतर प्रत्यय एँ, ईं, हीं, **साठीं** यांवर सर्वदा जरी नाहीं, तरी बहुतेक स्थळीं बिंदु आढळतो. देशी लोकांच्या बोलण्यांत तर यांतील कोणत्याही स्थळीं आनुनासिक्य येत नाहीं, हें वर सांगितलेंच आहे. तेव्हां हें आनुनासिक्य चालू ठेवावें किंवा नाहीं, हा मोठाच वादग्रस्त विषय होणार. म्हणून सध्यां यांविषयीं आम्ही कांहींच निश्चय करूं इच्छित नाहीं. चालू वहिवाटीस धरूनच चालतों. तथापि जसजसा पुढें प्रसंग येईल, तसतसा निरनिराळ्या शब्दांमध्यें आणि प्रत्ययांमध्यें दिसणारें आनुनासिक्य उत्पत्तिदृष्ट्या साधार किंवा निराधार आहे याचा जेथच्या तेथें विचार करीत जाऊं; म्हणजे तेणें करून पुढें याविषयीं निर्णय करण्यास बरें पडेल.

ना हा प्रत्यय **नां** असा सानुनासिक दादोबा लिहितात; आणि त्याची उत्पत्तिही **नाम्** यापासून आहे. तथापि सार्वत्रिक प्रचाराला अनुसरून आम्ही त्यावरील बिंदु सोडून दिला आहे.

टीपः—कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधांची प्रत दुर्मिळ असल्यामुळें आमच्या लेखांमध्यें तत्संबंधानें निश्चयें करून लिहिण्यास आजपर्यंत अंमळ अडचण होती. परंतु सांप्रत त्यांतील बहुतेक निबंध आम्हांस मिळाले असल्यामुळें ती अडचण बरीच दूर झाली आहे. त्या निबंधांमध्यें अशीं कित्येक स्थळें आम्हांला सांपडलीं आहेत, कीं तेथें त्यांचें आणि आमचें मत फारच जमतें; परंतु त्यांचे अनुयायी म्हणविणारे जे **जोशीबुवा**, यांच्या मनांत ते विषय नीट रीतीनें न भरल्यामुळें, त्या गोष्टींचा अव्हेर करून त्यांनीं पुढें भलत्याच चुका केल्या आहेत. उदाहरणार्थ—

१. प्रत्ययांच्या दोन जाति आम्हीं दाखविल्या आहेत–एक **विभक्तिप्रत्यय**, आणि एक **इतर प्रत्यय.** चिपळूणकर शास्त्रीबोवांनींही असेंच केलें आहे; आणि विभक्तिप्रत्ययांना **चरमप्रत्यय** ही संज्ञा करून तिजविषयीं आपल्या सातव्या निबंधामध्यें त्यांनीं त्यांचें चांगलें स्पष्टीकरण केलें आहे. परंतु जोशीबोवाचें लक्ष तिकडे पोंचलेलें नाहीं.

२. दादोबांनीं प्रथमावृत्तीमध्यें " प्रत्ययाभाव द्वितीया " म्हणून एक प्रकार केला होता; त्याप्रमाणेंच त्यांनीं पुढील आवृत्तींमध्यें द्वितीया आणि चतुर्थी यांचे प्रत्यय समान ठेवून त्या कृत्याला संस्कृत व्याकरणाची सड दाखविली आहे; या दोन्ही गोष्टी आपणांस सर्वथा असंमत असल्याचें चिपळूणकरशास्त्रीबोवांनीं बरेंच लांब व्याख्यान करून स्पष्ट केलें आहे. असें असतां जोशीबुवांनीं पुनः **सप्रत्ययद्वितीया, अप्रत्ययद्वितीया** असे अप्रशस्त भेद आपल्या नवीन व्याकरणांत आणिले आहेत. तसेंच द्वितीयेचे आणि चतुर्थीचे प्रत्यय पुनः समसमान ठेविले आहेत, ही मोठी आश्चर्याची गोष्ट होय.

याप्रमाणेंच आणखी कांहीं विषय चिपळूणकरशास्त्रीबोवांनीं चांगलें स्पष्ट केलेले असतां, त्यामध्यें पुनः जोशीबुवांनीं गोंधळ उत्पन्न केला आहे! पण तो पुढें जेथच्या तेथें दाखविणें बरें पडेल, म्हणून तूर्त त्यांकडे लक्ष देत नाहीं.

पुस्तक २२, अंक ६; जून १८९०.

मराठी व्याकरणावर विचार.

निबंध ७ वा.

विभक्तिप्रत्ययांच्या निमित्तानें शब्दाला होणारे विकार.

मागील निबंधामध्यें विभक्तींचे प्रत्यय आणि त्यांची उत्पत्ति यांचा विचार झाला. आतां त्या प्रत्ययांच्या निमित्तानें शब्दाला जे कांहीं विकार होतात, त्यांकडे लक्ष देऊं.

पुढें विभक्तिप्रत्यय आले असतां कित्येक शब्दांच्या स्वरूपामध्यें कांहीं विकार होतो, कित्येकांच्या स्वरूपामध्यें कांहींच होत नाहीं, यास्तव ते विकार समजून घेणें ही गोष्ट फार अवश्य आहे.

ज्या शब्दाला प्रत्ययादि कांहीं कार्य व्हावयाचें, त्याला त्या प्रत्ययादिकांच्या संबंधानें **अंग** ही संज्ञा वैयाकरणांनीं केली आहे.

मराठी विभक्तिप्रकरणामध्यें प्रत्ययाच्या निमित्तानें अंगाला जो कांहीं विकार व्हावयाचा, त्याच्या संबंधानें मोठी सोईची गोष्ट अशी आहे कीं, जरी एथें आठ विभक्ति असल्यामुळें त्यांची संख्या मोठीं वाटते, आणि जरी इतकीं निरनिराळीं रूपें ध्यानांत धरण्याला मोठी अडचण पडत असेल असें एखाद्या परकी मनुष्याला वाटण्याचा फार संभव दिसतो, तरी, त्यांपासून खरोखरीं तशी अडचण पडत नाहीं. द्वितीयेच्या प्रत्ययापूर्वी अंगाला जो काहीं विकार होईल, तोच विकार बिनचुकपणें इतर सर्व विभक्तिप्रत्ययांपूर्वींही होतो. द्वितीयेच्या प्रत्ययांपूर्वी जर कांही विकार होत नसला, तर इतर विभक्तिप्रत्ययापूर्वी देखील कांहीं विकार होत नाहीं. केव्हां केव्हां स्त्रीलिंग शब्दामध्यें, एकवचनीं सर्व विभक्तींना एक विकार आणि बहुवचनीं सर्व विभक्तींना दुसरा कांहीं विकार, अशी गोष्ट घडते खरी; तथापि तेथें सुद्धां वर सांगितलेला जो नियम, त्याला कांहीं व्यत्यय येत नाहीं. म्हणजे, प्रत्येक वचनीं द्वितीयेपासून संबोधनापर्यंत प्रत्येक विभक्तिकालीं त्या नामाला होणारा जो विकार, तो सर्वदा समानच असतो. अर्थात् त्यामध्यें सामान्य म्हणजे समानता हा धर्म आढळतो. यावरून द्वितीयादि सर्व विभक्तिरूपांमध्यें नामाचें जें समानरूप आढळतें त्याला **सामान्यरूप** ही संज्ञा केलेली आहे.

यावरून पाहतां असें लक्षांत येईल कीं, नामाच्या सर्व विभक्ति समजण्याला, प्रथमा बहुवचन आणि दोन सामान्यरूपें समजलीं म्हणजे काम झालें. प्रातिपदिक हें तर मूळचें आयतें आहेच. प्रथमा बहुवचनही

वचनप्रकरणावरून सर्वथा स्पष्ट झालेंच आहे. आतां काय तो एथें दोन सामान्यरूपांपुरताच विचार करावयाचा.

दादोबांनीं या सामान्यरूपाच्या संबंधानें विभक्तींचे सात विभाग अथवा प्रकार केले आहेत. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांणीं बारा प्रकार केले आहेत. गोडबोलेशास्त्री यांणीं वेगवेगळे वर्ग केले नाहींत, पण निरनिराळ्या विकारांची बरीच लांब पंक्ति दिली आहे. जोशीबोवांनींही सात वर्ग केले आहेत; पण त्यांचे वर्ग दादोबांच्या वर्गांशीं जुळत नाहींत. आणि त्यामध्यें सर्व विकारांचा समावेशही व्हावा तसा होत नाहीं. आमच्या मतें मराठी विभक्तींचें ज्ञान होण्याला इतक्या भेदांचें कारणच नाहीं. आणि इतके भेद करून देखील विभक्तींचें यथापद्धति निरूपण होत नाहीं. आम्हांला वाटतें कीं, त्यांचे सर्व मिळून तीन वर्ग करणें योग्य, आणि तितकेच पुरे आहेत. त्या तीन वर्गांचीं लक्षणें अशीं—

१. पहिल्या वर्गाचें लक्षण आ.
२. दुसऱ्या वर्गाचें लक्षण ई.
३. तिसऱ्या वर्गाचें लक्षण अविकार.

स्पष्टीकरण

पहिल्या वर्गाचें लक्षण आ, म्हणजे काय? तर या वर्गांत जे जे शब्द येतात म्हणून पुढें सांगण्यांत येईल, ते पुल्लिंग अथवा **नपुंसकलिंग** असल्यास, त्यांच्या **दोन्ही सामान्यरूपांच्या अंतीं आ** हा स्वर लागलेला दृष्टीस पडेल. शब्द **स्त्रीलिंग** असल्यास, तो **आ** त्यांच्या **प्रथमाबहुवचनीं** आणि **बहुवचनसामान्यरूपीं** लागलेला दिसेल. सारांश या वर्गांतील कोणत्याही शब्दाचें **बहुवचनसामान्यरूप** घ्याना, तें **आकारांतच** आढळेल. म्हणून या वर्गाचें लक्षण, **अंगाला** बहुवचनसामान्यरूपीं आ लागणें हें होय, असें म्हणतां येईल.

या एकाच वर्गांत नव्हे, पण सामान्यतः * असें लक्षांत येईल कीं पुल्लिंग आणि नपुंसकलिंग शब्दांचीं दोन्ही सामान्यरूपें समान; आणि स्त्रीलिंग शब्दाचें प्रथमाबहुवचन आणि बहुवचनसामान्यरूप हीं दोन्ही समान.

हा नियम फार उपयोगी आहे. याच्या योगानें दादोबांच्या तिसऱ्या, चौथ्या, साहव्या, सातव्या, अशा चारही प्रकारांचा समावेश या एका प्रथमवर्गांत करितां येतो.

हा पहिला वर्ग सर्व वर्गांत मोठा आहे. यांत सामान्यतः **कोणत्याही** लिंगाचे आणि कोणत्याही अंत्यवर्णाचे शब्द येतात. दुसरा आणि तिसरा हे वर्ग यालाच अपवादरूप आहेत, असें म्हणण्याला बाध नाहीं.

दुसऱ्या वर्गाचें लक्षण **ई**; म्हणजे दुसऱ्या वर्गांत येणारे जे शब्द, त्यांना **प्रथमाबहुवचन, एकवचनसामान्यरूप** आणि **बहुवचनसामान्यरूप**, या तीन्ही स्थळीं ई हा अंत्यादेश होतो.

ज्या अकारांत स्त्रीलिंग शब्दांचें बहुवचन ईकारांत होतें, असें मागें वचनप्रकरणीं दाखविलें आहे, ते सर्व शब्द या दुसऱ्या वर्गांत येतात.

तिसऱ्या वर्गाचें लक्षण **अविकार**; म्हणजे या वर्गांत जे शब्द येतात, त्यांपुढें विभक्तिप्रत्यय आले तरी, तन्निमित्तानें अंगाला कांहीं विकार होत नाहीं. प्रत्यय जशाचे तसे पुढें लावून दिले म्हणजे झालें.

जे शब्द पहिल्या आणि दुसऱ्या वर्गांत येत नाहींत, ते तिसऱ्या वर्गांत येतात, हें उघड आहे. तथापि बहुतेक दीर्घ ऊकारान्त पुल्लिंग आणि स्त्रीलिंग शब्द असे आहेत कीं, ते पहिल्या आणि तिसऱ्या या दोन्ही वर्गांत येतात. ते उदाहरणांवरून पुढें समजतील.

सर्व ऱ्हस्व इ–उ-कारांत शब्द याच म्हणजे तिसऱ्या वर्गांत येतात. हे सर्व शब्द संस्कृत आहेत. या शब्दांच्या लेखनाविषयीं थोडासा वाद उत्पन्न

* या नियमाला ऱ्हस्व इ-उ-कारांत स्त्रीलिंग शब्द मात्र अपवादरूप आहेत. याविषयीं विशेष विचार पुढें होईल.

झाला आहे. आपल्या सर्व मराठी कवींमध्यें शब्दांच्या शुद्ध प्रयोगांकडे विशेष लक्ष देणारा कवि म्हटला म्हणजे मोरोपंत. याच्या काव्यामध्यें छंदाच्या सोयीसाठीं हे शब्द क्वचित् दीर्घ केलेले असले तरी, प्राय: विभक्तिप्रत्ययांपूर्वीं सुद्धां ऱ्हस्वच लिहिण्याचा त्या कवीचा कल दिसतो. प्रथमाबहुवचनीं मात्र असले शब्द त्यानें कित्येक स्थळीं बुद्ध्या दीर्घ केलेले आढळतात. बाळशास्त्री-दादोबाप्रभृतीनीं जी पद्धति ठेविली आहे, ती अमळ वेगळी आहे. त्यांणीं सामान्यरूपीं आणि संबोधनीं अशा शब्दांना दीर्घत्व दिलें आहे. अन्यत्र म्हणजे जेथें कांहीं विभक्तिप्रत्यय नाहीं तेथें, अर्थात् प्रथमा बहुवचनीं, ते शब्द अविकृत म्हणजे ऱ्हस्वांतच ठेविले आहेत. कृष्णशास्त्री चिपळूणकर आणि त्यांचे अनुयायी यांचें म्हणणें असें आहे कीं, हे शब्द जरी मुळीं म्हणजे संस्कृतांत ऱ्हस्वांत खरे तरी मराठी भाषेच्या सामान्य ओघाला अनुसरून यांचा उच्चार दीर्घ होतो, यास्तव हे सर्वदा दीर्घांतच लिहावे हें सयुक्तिक. परंतु या मताशीं आमचें मत मिळत नाहीं. जर हे शब्द सर्वदा दीर्घांतच लिहिले तर, त्या कृत्यापासून दुसरी एक अडचण उत्पन्न होते ती अशी—विभक्तिप्रत्ययापूर्वीं हे शब्द सर्वदा अविकृत राहत असतात आणि मूळचेच जे दीर्घ ई-ऊ-कारान्त अन्य शब्द, ते तर सर्वदा अविकृत राहतात असें नाहीं; विकार पावण्याकडे त्यांचें प्रावण्य विशेष असतें. अर्थात् विभक्तिकार्याच्या दृष्टीनें या दोहों प्रकारच्या शब्दांचा एक वर्ग होऊं शकत नाहीं. म्हणून मूळचे ऱ्हस्वांत असून मराठीमध्यें दीर्घांत केलेले शब्द कोणकोणते, आणि मूळचेच दीर्घांत कोणते, ही निवड या विभक्तिकार्यासाठीं प्रयत्नेंकरून करावी लागणार. समासादि प्रसंगींही पूर्वपदस्थानीं असल्यास हे पुनः पूर्ववत् ऱ्हस्व होणार; म्हणून त्या निमित्तानेंहि त्यांचें मूलस्वरूप जाणणें अत्यंत अवश्य आहे. यांचें मूळचें ऱ्हस्वत्व जाणिल्यावांचून व्याकरणांत निर्वाहच नाहीं. अशी स्थिति ज्या पक्षीं आहे, त्या पक्षीं हे शब्द विभक्तिप्रत्ययाभावीं मूळच्या शुद्ध म्हणजे ऱ्हस्व स्वरूपानें योजण्याला अधिक

श्रम पडतात असें कांहीं म्हणतां येत नाहीं. जर अधिक श्रमावांचून त्यांचें मूळचें शुद्ध स्वरूप आपणांस साध्य आहे, आणि त्यांचें रूपांतर केल्यास पुनः मूळचें रूप शोधून काढण्याची खटपट अवश्य करावी लागणार आहे, तर त्यांमध्यें रूपांतर उत्पन्न करून बुद्ध्या अडचणींत पडणें हें कृत्य सर्वथा अयोग्य आणि अप्रयोजक असेंच म्हणणें आम्हांला प्राप्त होतें. तशांत सर्व मराठी शब्दांमध्यें, आणि विशेषतः अशा प्रकारच्या संस्कृत शब्दांमध्यें, अंत्याक्षर दीर्घ उच्चारण्याकडे सर्वांचा स्वाभाविक कल असतोच असेंही निश्चयानें म्हणतां येत नाहीं, असें आम्हांला वाटतें. म्हणून चालू पद्धतीला अनुसरून हे शब्द सामान्यरूपीं दीर्घ, आणि प्रथमेच्या दोन्ही वचनीं ऱ्हस्वच लिहिण्याचा संप्रदाय आम्ही योग्य मानितों.

दादोबांनीं अशा शब्दांचा एक वेगळाच विभक्तिप्रकार मानिला आहे. परंतु हे शब्द सर्वदा ऱ्हस्व किंवा सर्वदा दीर्घ, कसेही मानिले, तरी त्यांचा समावेश तिसऱ्या वर्गांतच करण्याला ज्या पक्षीं कांहीं प्रत्यवाय नाहीं, त्या पक्षीं प्रातिपदिक आणि प्रथमा बहुवचन मूलवत् ऱ्हस्व असून, सामान्यरूपीं मात्र त्यांना दीर्घत्व येतें असें म्हटलें तरी, त्याच वर्गांत त्यांचा समावेश करण्याला कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. कारण कीं केवळ दीर्घत्व येणें यांत कांहीं वर्णांतर घडत नसल्यामुळें, या अल्पविकाराला अविकारामध्येंच धरण्याला कांहीं अडचण दिसत नाहीं. तथापि, पूर्वीं दाखविल्याप्रमाणें ज्या पक्षीं या शब्दांची बुद्ध्या निवड करावी लागणारच आहे, त्या पक्षीं या शब्दांचा वर्ग वेगळाच मानून त्याला **चौथा वर्ग** हें नांव द्यावें असेंच जर कोणाचें म्हणणें असेल, तर त्या मतांशीं कोणत्याही प्रकारें आमचा विरोध नाहीं.

आतां या तीन्ही वर्गांतील शब्दांचीं उदाहरणें क्रमानें देत जाऊं :–

पहिल्या वर्गाच्या लक्षणांच्या संबंधानें विशेषकार्य

उदाहरणें देण्याला आरंभ करण्यापूर्वीं, पहिल्या वर्गाच्या लक्षणाच्या संबंधानें कांहीं विशेष कार्य घडत असतें, तें सांगणें अवश्य आहे.

पहिल्या वर्गाचें लक्षण असा जो **आ**, तो लागला असतां सामान्यतः अंगाच्या अंत्य स्वराचा लोप होतो; परंतु **आकारांत पुल्लिंग, ईकारांत पुल्लिंग, स्त्रीलिंग** किंवा **नपुंसकलिंग**, आणि **एकारांत नपुंसकलिंग**, अशा प्रकारच्या अंगापुढें हा **आ** आल्यास, अंगाच्या अंत्य स्वराला यकारादेश होतो; म्हणजे अंत्यस्वर जाऊन त्याच्या स्थानीं य् हा वर्ण येतो. अंग एकाक्षरीं ईकारांत असल्यास मात्र **आ** आगमापूर्वीं ईच्या स्थानीं **इय्** होतो.

ऊकारांत शब्दांमध्यें हे दोन्ही प्रकार आहेत; म्हणजे **आ** आगमापूर्वीं क्वचित् अंत्यस्वराचा लोप होतो; क्वचित् ऊच्या स्थानीं अवादेश (म्हणजे **अव्** हा आदेश) होतो. शब्द एकाक्षरी असतां त्याला **उव्** आदेश होतो. **गहूं** शब्दाच्या अंत्याला केवळ वकारादेश (**ह्म. व्** हा आदेश) होतो.

अवश्य ध्यानांत ठेवायाचा नियम—बहुवचनप्रत्ययांपूर्वीं * सामान्यरूपाचा अंत्यस्वर अनुनासिक होतो.

अकारांत पुल्लिंग

रथ शब्द. (केवळ आ)

	एकवचन	बहुवचन
प्रथमा	रथ	रथ
द्वितीया	रथाला, रथास	रथांना, रथांला, रथांस
तृतीया	रथानें	रथांनीं, रथांहीं

* या अनुनासिकत्वाचा उद्देश बहुत्व दाखविण्यावांचून दुसरा कांहीं नाहीं. म्हणून ना, नीं, हीं, नों हे जे निर्विवाद बहुवचन प्रत्यय, त्यांचा पूर्ववर्ती जो अंगाचा अंत्यस्वर त्याच्या आनुनासिक्याचें उच्चारण किंवा श्रवण होत नसतें, आणि त्यांचें प्रयोजनही नाहीं, तथापि चालू वहिवाटीवरून उक्त प्रसंगीं आह्मी आनुनासिक्य ठेविलें आहे. पुढें याचा विशेष विचार होईल.

चतुर्थी	रथासाठीं	रथांसाठीं
पंचमी	रथाहून–रथांतून	रथांहून-रथांतून,
षष्ठी	रथाचा	रथांचा
सप्तमी	रथांत	रथांत
संबोधन	रथा	रथांनो

शब्दांच्या प्रथमाबहुवचनाची सिद्धता तत्प्रकरणीं झालीच आहे. इतर विभक्तींचीं रूपें पूर्वोक्तलक्षणानें (म्हणजे आ लागून) सिद्ध झालेल्या सामान्यरूपापुढें विभक्तिप्रत्यय आल्यानें प्राप्त होतात, हें वरील उदाहरणांवरून स्पष्ट आहे.

याप्रमाणें सर्व अकारांत पुल्लिंग शब्दांचीं रूपें जाणावीं.

अपवाद—१ मुळाक्षरांचीं नांवें इत्यादि प्रकारचे जे एकाक्षरी शब्द, ते तिसऱ्या वर्गांत येतात, अर्थात् विभक्तिकालीं त्यांना कांहीं विकार होत नाहीं. उदा०–'या कला काना दे.'

२. परभाषेंतील, आणि क्वचित् स्वभाषेंतीलही विशेषनामांचें सामान्यरूप तिसऱ्या वर्गाप्रमाणें करण्याकडे कित्येकांचा कल होत चालला आहे. उ. इंग्लंडचा इतिहास; गव्हर्नरचा अधिकार; बाळाजी विश्वनाथची कारकीर्द. इ०

३. संबोधन हा प्रथमेचाच प्रकार आहे, यामुळें संबोधनाच्या स्थळीं केवळ प्रथमा योजलेली वारंवार आढळते. सन्मानार्थी बहुवचन असतां तर प्रथमाच दृष्टीस पडते. उदा०–' अरे नारायण ', ' अरे ए तेली ', ' अहो गोविंदराव ' इत्यादि.

२. अकारांत नपुसकलिंग

घर शब्द (केवळ आ).

	एकवचन	बहुवचन
प्रथमा	घर	घरें
द्वितीया	घराला इ०	घरांना इ०

याप्रमाणें झाड, मन, राज्य इत्यादि अकारांत नपुंसक शब्दांचीं रूपें जाणावीं.

३ आकारांत पुल्लिंग

घोडा शब्द (यकारादेश)

	एकवचन	बहुवचन
प्रथमा	घोडा	घोडे
द्वितीया	घोडयाला इ०	घोडयांना इ०

याप्रमाणें वाडा, धक्का, कुत्रा, इत्यादि आकारांत पुल्लिंग शब्दांचीं रूपें जाणावीं.

अपवाद—१. **राजा** या शब्दाला याप्रमाणेंच यकारादेश प्राप्त आहे खरा; पण जर तो यकारादेश केला, तर **राजा** आणि **राज्य** या दोन्ही शब्दांचीं रूपें **राज्याला, राज्यानें** अशी होऊन भ्रांतीला कारण होईल; म्हणून **राजा** शब्दाचीं रूपें **राजाला, राजानें** अशींच करीत असतात. यांत राजा, राजाला, इत्यादि रूपांमध्यें जकाराचा उच्चार तालव्य आणि दंततालव्य असा विकल्पें दोहों प्रकारचा होतो. त्यांत पहिला उच्चार संस्कृत आणि दुसरा मराठी, असें म्हणण्याला बाध नाहीं.

अपवाद—२. दादा, काका, मामा, नाना आजोबा, दाजीबा, गोविंदा, सोमपा, शंखध्मा, इत्यादि ज्या आकारांत शब्दांचीं बहुवचनें आकारांतच राहतात असं मागें वचनप्रकरणीं दाखविलें आहे, त्यांच्या अंगाला कांहीं विकार होत नाहीं. उदा०—दादाला, काकानें, मामाहून, हरावाला, इ० हे शब्द तिसऱ्या वर्गांत धरण्यालाही कांहीं अडचण नाहीं.

अपवाद ३. पणा-प्रत्ययांत शब्दांना विभक्ति लागत नाहींत. अथवा, पण-प्रत्ययांत शब्दाप्रमाणेंच त्यांच्या विभक्ति होतात, असें, हवेंतर म्हणतां येईल-उदा०-देवपण, देवपणा, या दोहोंचींही रूपें देवपणाला, देवपणानें, इत्यादि प्रकारें होतात असें म्हणतां येईल.

अपवाद ४. देशपांड्या, मानमोड्या, इत्यादि शब्दांमध्यें अंतीं एक यकार असल्यामुळें पुन्हां विभक्तीच्या निमित्तानें दुसरा यकार येत नाहीं. उ० देशपांड्याला, मानमोड्याचा इ०

टीप—कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं अशी एक कोटी केली आहे कीं घोडा, धोंडा इत्यादि, शब्दांमध्यें मूळ शब्द घोड, धोंड इत्यादि प्रकारें अकारांतच मानावे, आणि आ हा प्रथमेचां प्रत्यय मानावा; कारण कीं तो आ संस्कृतांतील स् अथवा विसर्ग याचें रूपांतर आहे दुसरें कांहीं नाहीं. शास्त्रीबोवांनीं दिलेली ही व्युत्पत्ति खरी आहे. तथापि तिजपासून मराठी विभक्तिप्रकरणांमध्यें तादृश कांहीं लाभ न होतां शिकणारांचा गोंधळ मात्र होणार आहे. यास्तव ही व्युत्पत्ति पुढें तद्धितप्रकरणीं दाखवावी, आणि व्यवहारांत जसे शब्द आहेत, तशींच त्यांचीं आकारांत प्रातिपदिकें मानून, किंवा आवंत संस्कृतवत् नवे शब्द मानून, विभक्ति सिद्ध कराव्या; आणि मराठींत प्रथमैकवचनीं विभक्तिप्रत्यय नाहीं; मुळीं संस्कृतांत तो होता, पण मराठी शब्द सिद्ध करण्याला त्याचा व्यय झाला आहे असें समजावें, ही गोष्ट फार सोईची आणि सयुक्तिक दिसते.

४ ईकारांत पुल्लिंग

तेली शब्द (यकारादेश)

	एकव.	बहुव.
प्र.	तेली	तेली
द्वि.	तेल्याला इ०	तेल्यांना इ०

याप्रमाणें शास्त्री, संन्यासी, गोसावी, पुजारी, शेतकरी, वारकरी, वाणी, तांबोळी, धोबी, शिंपी, न्हावी, गोंधळी, पापी, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

अपवाद- हत्ती, जती, हे शब्द; त्याप्रमाणेंच हस्ती, करी, दंडी, नंदी, बंदी, केसरी, आततायी, इत्यादि फार प्रचारांत नसलेले शब्द; तसेंच वादी, प्रतिवादी, काजी, मौलवी, फिर्यादी इत्यादि व्यवहारशास्त्रसंबंधीं संस्कृत अथवा परभाषीय शब्द; आणि ज्यांच्या अंतीं जी अथवा ची अक्षर आहे असे पंतोजी, बाबाजी, रावजी, दादाजी, मशालजी, मशालची, काची, इत्यादि पुल्लिंग शब्द; हे सर्व तिसऱ्या वर्गांत येतात; अर्थात् विभक्तिनिमित्तानें यांना कांहीं विकार होत नाहीं.

हस्ती आणि **यति** हे दोन्ही शब्द तिसऱ्या वर्गांतील असल्यामुळें, त्यांचे अपभ्रंश जे **हत्ती** आणि **जती** शब्द, हे फार प्रचारांतले असतां यांनाही कांहीं विकार होत नाहीं; हेही तिसऱ्या वर्गांतच येतात.

दर्जी हा शब्द जीशब्दांत आहे तरी, हा प्रथम वर्गांतच येतो. उदा०–‘ अरे, त्या दर्ज्याला बोलाव ’ ‘ दर्ज्याचें काम धोब्याच्या हातून कसें होईल ? ’ इ०

५. ईकारान्त नपुंसकलिंग

पाणी शब्द (यकारादेश)

	एकव.	बहुव.
प्र.	पाणी	पाण्यें
द्वि.	पाण्याला इ०	पाण्यांना इ०

याप्रमाणेंच लोणी, दहीं, चिंचवणीं, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं. यांच्या प्रथमाबहुवचनरूपांचा प्रयोग व्यवहारांत क्वचितच येतो; तथापि तो अगदींच येत नाहीं असें नाहीं.

मोतीं हा शब्द याप्रमाणेंच चालतो. याचें प्रथमा बहुवचन मोतीं असेंही क्वचित् आढळतें. जसें–‘ काल आम्ही बाजारांत फार सुंदर **मोतीं** पाहिलीं ’ इ०- तथापि हा प्रयोग एकदेशीय होय. एथें **मोत्यें** हेंच रूप सर्वमान्य अतएव विशेष ग्राह्य होय.

मोत्यें हा शब्द कोणी मोतें असा यकाररहित लिहितात; पण उच्चाराकडे सूक्ष्म दृष्टि न दिल्यामुळें ही चूक घडते, हें उघड आहे.

६ एकारांत नपुंसकलिंग

तळें शब्द (यकारादेश)

	एकव.	बहुव.
प्र.	तळें	तळीं
द्वि.	तळयाला इ०	तळयांना इ०

याप्रमाणेंच कुत्रें, घोडें, भांडें, लोणचें, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

७ ईकारांत नपुंसकलिंग

(एकाक्षरी) बीं शब्द (इयादेश)

	एकव.	बहुव.
प्र.	बीं	बियें
द्वि.	बियाला इ०	बियांना इ०

८ ऊकारांत पुल्लिंग

तट्टू शब्द (केवळ आ)

	एकव.	बहुव.
प्र.	तट्टू	तट्टू
द्वि.	तट्टाला इ०	तट्टांना, इ०

या शब्दाच्या विभक्ति तट्टूला, तट्टूंना इत्यादि प्रकारें तिसऱ्या वर्गांतही येतात. याप्रमाणेंच चालणारे शब्द, परभू, वाटसरू, यात्रेकरू, हे होत. यांचीं हीं रूपें परभाला, परभूला; वाटसराला, वाटसरूला; यात्रेकराला, यात्रेकरूला; अशीं दोन दोन होतात.

९ उकारांत पुल्लिंग

गहूं शब्द (वकारादेश)

प्र.	गहूं	गहूं
द्वि.	गव्हाला इ०	गव्हांना इ०

या शब्दाला विकल्प नाहीं. याप्रमाणें चालणारा शब्द म्हटला म्हणजे **भाऊ** हा होय. हा भ्रातृवाचक असेल तेव्हां मात्र पहिल्या वर्गांत येतो.

१० ऊकारांत पुल्लिंग

भाऊ शब्द

	एकव.	बहुव.
प्र.	भाऊ	भाऊ
द्वि.	भावाला इ०	भावांना इ०

परंतु **भाऊ** शब्द जेव्हां विशेषनाम किंवा प्रतिष्ठासूचक नाम असतो, तेव्हां तो तिसऱ्या वर्गांत येतो. जसें-' **भाऊंनें** आपल्या भावाला शाळेंत पोंचविलें, ' ' **भाऊंना** बोलावून आण, ' इ०

११ ऊकारांत पुल्लिंग

लाडू शब्द (अवादेश)

	एकव.	बहुव.
प्र.	लाडू	लाडू
द्वि.	लाडवाला इ०	लाडवांना इ०

याचीं रूपें विकल्पें तिसऱ्या वर्गाप्रमाणेंही होतात. जसें–लाडूला, लाडूनें इ०

याप्रमाणेंच नारू, साडू, काडू, विंचू, चाटू इ०

यांशिवाय मेरू, पेरू, चाकू, गडू, काऊ, खाऊ, काजू, खडू, वसू, दांडू, बरू, बोरू, कोद्रू, सांकू, इत्यादि शब्द; तसेच संस्कृत प्रतिभू, वभ्रू इत्यादि शब्द; हे तिसऱ्या वर्गांतच येतात; ते त्या स्थळीं पहावे.

१२ ऊकारांत पुल्लिंग

(एकाक्षरी) पू शब्द (उवादेश)

प्र.	पू	पू
द्वि.	पुवाला इ०	पुवांना इ०

याप्रमाणेंच गू, रू, हे शब्द.

१३ ऊकारांत नपुंसकलिंग

वासरूं शब्द (आ)

	एकव.	बहुव.
प्र.	वासरूं	वासरें
द्वि.	वासराला इ०	वासरांना इ०

याप्रमाणेंच कुसूं, मेंढरूं, रेडकूं, शिंगरूं, गुरूं, टिपरूं, शेरडूं, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

१४ ऊकारांत नपुंसकलिंग

तारूं शब्द. (अवादेश)

	एकव.	बहुव.
प्र.	तारूं	तारवें
द्वि.	तारवाला	तारवांना इ०

याप्रमाणेंच कुं कूं, अ ळूं, गळूं, असूं, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं

जिवाणूं, सुकाणूं, हे शब्द वचनप्रकरणीं दाखविल्याप्रमाणें दोहों प्रकारें चालतात. जसें—जिवाणाला, जिवाणवाला, सुकाणाला, सुकाणवाला, इ०

पहिल्या वर्गांतील स्त्रीलिंग शब्द

स्त्रीलिंगशब्दांत **प्रथमाबहुवचन** आणि **बहुवचनसामान्यरूप** हीं दोन्ही **समान** असतात, हें मागें सांगितलेंच आहे. तसेंच, ईकारांत

शब्दांमध्यें विभक्तिलक्षणरूप जो आ, तो लागतांना ईला यकारादेश होतो; तोच शब्द एकाक्षरी असल्यास इयादेश होतो, असेंही सांगितलें आहे. ऊकारांतांमध्यें कोठें नुसता आ, कोठें अवादेश, आणि एकाक्षरी शब्द असल्यास उवादेश, होतो हेंही सांगितलें आहे.

आतां स्त्रीलिंगशब्दांच्या एकवचन सामान्यरूपाविषयीं मात्र एक नियम एथें सांगायचा आहे. तो हाः— ईकारांत आणि ओकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं एकवचनसामान्यरूपें प्रातिपदिकाप्रमाणेंच असतात; पण पहिल्या वर्गांतील इतर सर्व स्त्रीलिंग शब्दांचीं एकवचनसामान्यरूपें एकारांत होतात.

१५ अकारांत स्त्रीलिंग

वाट शब्द (केवळ आ)

	एकव.	बहुव.
प्र.	वाट	वाटा
द्वि.	वाटेला इ०	वाटांना इ०

याप्रमाणेंच जीभ, काख, भीक, वीज, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

टीप—अकारांत स्त्रीलिंगांमध्यें ज्या शब्दांचें प्रथमाबहुवचन ईकारांत होतें, ते सर्व शब्द दुसऱ्या वर्गांत येतात.

१६ आकारांत स्त्रीलिंग

विद्या शब्द (केवळ आ)

	एकव.	बहुव.
प्र.	विद्या	विद्या
द्वि.	विद्येला	विद्यांना

याप्रमाणेंच आज्ञा, गंगा, अपेक्षा, हवा, मजा, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

अपवाद–अमळ प्रतिष्ठार्थी बोलायाचें असतां आकारान्त स्त्रीलिंग विशेषनामें रमा, गंगा, इत्यादि तिसऱ्या वर्गांत येतात; अर्थात् ते शब्द अविकृत राहतात. जसें–रमाला, गंगानें इ.

१७ ओकारांत स्त्रीलिंग

बायको शब्द (केवळ आ)

	एकव.	बहुव.
प्र.	बायको	बायका
द्वि.	बायकोला इ०	बायकांना इ०

याप्रमाणेंच ढंबो, ताटको, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

१८ ईकारांत स्त्रीलिंग

नदी शब्द (यकारादेश)

	एकव.	बहुव.
प्र.	नदी	नद्या
द्वि.	नदीला	नद्यांना इ०

याप्रमणेंच काठी, गाडी, दोरी, साडी, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

अपवाद–नारी, देवी, कुमारी, साध्वी, इत्यादि प्रौढ संस्कृत शब्द तिसऱ्या वर्गांत येतात.

१९ ईकारांत स्त्रीलिंग

(एकाक्षरी) स्त्री शब्द (वैकल्पिक)

	एकव.	बहुव.
प्र.	स्त्री	स्त्रिया
द्वि.	स्त्रीला, स्त्रियेला इ०	स्त्रियांना इ०

याप्रमाणेंच बी शब्दाचीं रूपें होतात.

२० उकारांत स्त्रीलिंग

सासू शब्द (वकारादेश)

	एकव.	बहुव.
प्र.	सासू	सासवा
द्वि.	सासूला, सासवेला इ०	सासूंना, सासवांना

याप्रमाणेंच जळू, पेळू, टाळू, वाळू, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

सर्व ऊकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं सामान्यरूपें विकल्पें तिसऱ्या वर्गाप्रमाणेंहि होतात. धू शब्द मात्र अपवादक. याला विकल्प नाहीं.

२१ ऊकारांत स्त्रीलिंग

पिसू शब्द (फार वैकल्पिक)

	एकव.	बहुव.
प्र.	पिसू	पिसा, पिसवा
द्वि.	पिसूला, पिसेला, पिसवेला इ०	पिसूंला, पिसांना पिसवांना इ०

२२ ऊकारांत स्त्रीलिंग

धू शब्द (उवादेश)

	एकव.	बहुव.
प्र.	धू	धुवा
द्वि.	धुवेला इ०	धुवांना इ०

या धू शब्दाला मात्र विकल्प नाहीं असें नुकतें सांगितलेंच आहे. इतर एकाक्षरी ऊकारांत स्त्रीलिंग शब्द सू, ऊ, इ० यांचीं रुपें अशींच होऊन पुनः एकवचनी सूला, ऊला अशींही वैकल्पिक रूपें होतात. ऊ शब्दांचीं रूपें वा, वेला, वाना, अशीं देशावर क्वचित् आढळतात. पण तीं सर्वमान्य नव्हेत.

याशिवाय वधू गेरू चमू भ्रू सुभ्रू श्वश्रू इत्यादि संस्कृत; खडू आऊ माऊ काकू तंबाखू अफू बाजू गुडाखू हे मराठी; आणि आबरू अबरू हे शब्द तिसऱ्या वर्गांत येतात. म्हणून यांचीं सामान्यरूपें अविकृत होतात.

आते शब्द **आत** शब्दाप्रमाणें आणि **तिवै सवै** इत्यादि शब्द **तिवई, सवई,** इत्यादि शब्दांप्रमाणें चालतात.

याप्रमाणें पहिल्या वर्गांतील शब्दांचें विभक्तिविवेचन झालें. पुढें दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्गांतील विभक्तीचा समावेश दोनचार उदाहरणां-तच होणार आहे. परंतु तूर्त येथें सांगायाचें इतकेंच कीं, मराठी विभक्ति प्रकरण वस्तुतः इतकें सरळ आणि सोपें असतां, आजपर्यंत त्याजविषयीं विनाकारण किती गोंधळ चालत आलेला आहे, ही गोष्ट वाचकांनीं ध्यानांत घेण्यासारखी आहे. आणि याकरितांच इतकीं अधिक उदाहरणें लागलीं. या विषयाच्या संबंधानें विशेष विवेचन पुढील निबंधांत होईल.

पुस्तक २२, अंक ८, आगष्ट १८९०.

मराठी व्याकरणावर विचार.

निबंध ८ वा.

मागील निबंधामध्यें विभक्तींच्या संबंधानें पहिल्या वर्गांतील शब्दांचें विवेचन झालें.

वर्ग दुसरा

या वर्गांत येणारे शब्द वचनविचारप्रकरणीं निर्णीत झालेच आहेत. ज्या अकारांत स्त्रीलिंग शब्दांचें बहुवचन ईकारांत होतें, ते सर्व शब्द या वर्गांत येतात.

या वर्गांतील शब्दांना प्रथमाबहुवचन, एकवचनसामान्यरूप आणि बहुवचनसामान्यरूप, या तीन्ही स्थळीं ई हा अंत्यादेश होतो. उदाहरण—

२३ अकारांत स्त्रीलिंग

भिंत शब्द

	एकव.	बहुव.
प्र.	भिंत	भिंती
द्वि.	भिंतीला	भिंतींना इ०

याप्रमाणेंच सुंठ, रात्र, चाल इत्यादि शब्दांचीं विभक्तिरूपें जाणावीं.

ज्या अकारांत स्त्रीलिंग शब्दांचें प्रथमा बहुवचन विकल्पेंकरून आकारांत अथवा ईकारांत होतें, त्यांचीं सामान्यरूपेंही तदनुसार दोनदोन प्रकारचीं होतात. उदाहरण—

२४ अकारांत स्त्रीलिंग

तरवार शब्द

	एकव.	बहुव.
प्र.	तरवार	तरवारा, तरवारी
द्वि.	तरवारेस, तरवारीस	तरवारांस, तरवारींस इ०

याप्रमाणेंच परात, वरात, कटार, इजार, कर्मणूक, इत्यादि शब्दांचीं वैकल्पिक रूपें जाणावीं.

वर्ग तिसरा.

या वर्गांतील शब्दांना विभक्ति-प्रत्ययांच्या निमित्तानें कांहीं विकार होत नाहीं. उदाहरण—

२५ ईकारांत स्त्रीलिंग
नारी शब्द.

	एकव.	बहुव.
प्र.	नारी	नारी
द्वि.	नारीला	नारींना इ०

या वर्गांत येणाऱ्या शब्दांची परिगणना वेगळी करण्याचें कारण नाहीं. यांचा उल्लेख प्रथम वर्गांत झालेलाच आहे. तथापि सोईसाठीं थोडक्यांत त्यांचा संग्रह एथें करूं.

१. क, ढ, इत्यादि मूळाक्षरांचीं नांवें इ०

२. राजा, दादा, काका, मामा, नाना, आजोबा, दाजीबा, शंखध्मा, इत्यादि आकारांत पुल्लिंग शब्द.

३. देवपणा, मनुष्यपणा, इत्यादि **पणा**प्रत्ययांत शब्द.

४. हत्ती, जती, करी, दंडी, मशालजी, इत्यादि कित्येक ईकारांत पुल्लिंग शब्द.

५. देवी, कुमारी, साध्वी, इत्यादि ईकारांत स्त्रीलिंग प्रौढ शब्द.

६. मेरू, पेरू, चाकू, गड्डू, काऊ, खाऊ, इत्यादि पूर्वोक्त ऊकारांत शब्द.

यांशिवाय कित्येक शब्द विकल्पेंकरून प्रथम वर्गामध्यें आणि या वर्गामध्यें येतात ते—

७. तट्टू, परभू, वाटसरू, यात्रेकरू हे ऊकारांत पुल्लिंगशब्द विकल्पेंकरून आकारांत अथवा अविकृत असतात. उदा०—तट्टाला, तट्टूला इ०

८. लाडू, नारू, साडू, विंचू इत्यादि ऊकारांत पुल्लिंग, आणि सासू, पेळू, जळू, टाळू, वाळू, इत्यादि ऊकारांत स्त्रीलिंगशब्द यांना विकल्पें करून अवादेश होतो, किंवा ते अविकृत राहतात. उदा०—लाडवाला, लाडूला; सासवेला, सासूला; इ०

९. पिसू शब्दाचीं रूपें तीन प्रकारचीं होतात, हें मागें दाखविलेंच आहे.

टीप—सामान्यतः ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, ऊकारांत शब्दांचीं जीं दोन दोन किंवा क्वचित् तीन तीन रूपें होतात, त्यांत देशांतील लोकांचा कल अविकृत रूपांकडे, आणि कोंकणांतील लोकांचा कल वकारयुक्त रूपांकडे, विशेष असतो.

याशिवाय आणखी क्वचित् कित्येक शब्दांचीं रूपें विकल्पेंकरून अविकृत राहतात. ते शब्दही मागें सांगितलेच आहेत.

ऱ्हस्व इकारांत आणि ऱ्हस्व उकारांत शब्द देखील याच वर्गांत धरण्याला अडचण नाहीं, असें मागें निरूपण केलेंच आहे. ते शब्द सामान्यरूपीं दीर्घ होतात. इतकाच त्यांमध्यें विशेष आहे. उदाहरण—

२६ इकारांत पुल्लिंग

कवि शब्द

	एकव.	बहुव.
प्र.	कवि	कवि
द्वि.	कवीला	कवींला इ०

याप्रमाणें यति, गुरु, मति, धेनु, वारि, मधु, इत्यादि शब्दांचीं रूपें जाणावीं.

उपांत्य ई ऊ अक्षरांच्या संबंधानें, आणि स–अक्षरांत शब्दांच्या संबंधानें जे विचार मागें वचनप्रकरणीं सांगितले आहेत तेच विभक्तिप्रकरणींही अवश्य ग्राह्य होत. जसें पीठ, पिठाला; विहीर, विहिरीला; मराठीण, मराठणीला; देऊळ, देवळाला–देउळाला; गीत, गीताला; अमीर, अमीराला; वांसा, वांशाला; मासा, माशाला; इत्यादि.

च ज झ आणि स यांच्यासंबंधानें दादोबांनीं बरेंच लांब विवेचन केलें आहे; परंतु सध्यांच्या काळीं तरी त्याचें कांहीं फारसें प्रयोजन दिसत नाहीं. रीतीप्रमाणें विभक्तिकार्याच्या निमित्तानें जेथें यकार जोडावा लागेल, तेथें तो जोडावा. जसें—चमचा, चमच्याला; ओझें, ओझ्यानें; इ० जेथें संदेह उत्पन्न होईल तेथें मात्र (म्हणजे राजा शब्दामध्यें) यकार जोडूं नये, म्हणजे झालें. सच्या स्थानीं श होणें या विषयींचाही नियम स्पष्ट आहे. श्याच्या स्थळीं नुसता शा लिहिण्याकडे बहुतेकांचा कल आहे; जसें—मिशी, मिशा; माशी, माशा; इ० यांत श् आणि य् हे दोन्ही वर्ण तालव्य असल्यामुळें, एका तालव्य उच्चारानें दुसऱ्या तालव्य उच्चाराचें काम सहज निभावून जातें, म्हणून ही यकार न जोडण्याची प्रवृत्ति पडली आहे. जेथें संदेह उत्पन्न होण्यासारखा नसेल, तेथें यकार न जोडला तरी कांहीं दोष मानूं नये असें आम्हांस वाटतें.

दादोबांनीं म्हटलें आहे—" लाडू आदिकरून शब्द, ज्यांचीं सामान्य-रूपें सातव्या प्रकाराप्रमाणें होतात, त्यांचीं रूपें लिहिण्याचे दोन प्रकार आढळतात—**लाड्वानें**, आणि **लाडवानें**; परंतु यांत व्याकरणशुद्ध म्हटलें म्हणजे पहिलें रूप."

पुनः " बहुधा **सासू** आदिकरून शब्दांचीं **सासवेला, सासवेनें, वाळवेचें, पिसवांनीं**, अशीं रूपें लिहिण्याचा प्रघात पडला आहे. परंतु व्याकरणदृष्टीनें पाहिलें असतां हा प्रघात शुद्ध नव्हे; **सास्वेला, सास्वेचें, वाळ्वेचें, पिस्वांनीं** इ० हीं रूपें शुद्ध होत. "

तसेंच " वरील नियमाप्रमाणें ऊकारांत नपुंसक नामांचीं रूपें अशींच लिहावीं. **तारवें, अळवें, असवें**, याप्रमाणें लिहिण्याचा परिपाठ फार आहे; परंतु तो शुद्ध नव्हे. "

दादोबांनीं हीं जीं मतें दिलीं आहेत, यांचा विचार अलीकडच्या व्याकरणाकारांनीं फारसा केला नाहीं. तथापि तो विचार करणें अत्यंत

अवश्य होय. प्रत्यक्ष भाषेमध्यें जीं रूपें सर्वमान्य आहेत, आणि लिहिण्यांतही ज्यांचा प्रचार अतिशयच आहे, तीं व्याकरणशुद्ध नव्हेत असें म्हणणें, हें मोठेंच धाष्टर्य होय असें आम्हांला वाटतें. भाषेला सोडून जर व्याकरण आहे, तर तेथें भाषाव्यवहार अशुद्ध न म्हणतां व्याकरणच चुकलें असें म्हटलें पाहिजे, आणि भाषेला जुळेल अशीच व्याकरणाची शुद्धता केली पाहिजे. **माळी, काठी, पाणी**, यांच्या सामान्यरूपीं **ई**च्या स्थानीं या येतो; या सादृश्यावरून **लाडू, सासू** आणि **गळू** यांच्या सामान्यरूपीं प्रत्यक्ष व्यवहाराला अनुसरून अवादेश न होतां केवळ **वा** हाच आदेश झाला पाहिजे, असें भाषेला सांगण्याचा अधिकार व्याकरणकाराला नाहीं, असें आम्ही समजतों. कित्येक स्थळीं **सास्वेला** असेंही रूप होत असतें ही गोष्ट खरी आहे; तथापि सर्वत्र तसाच प्रकार झाला पाहिजे, असें नाहीं. फार तर इतकेंच म्हणतां येईल कीं, ‘सास्वेला’ हें एक वैकल्पिक रूप आहे. याच्या पलीकडे वैयाकरणाला जातां येत नाहीं. असो.

नामांच्या विभक्तिप्रकरणामध्यें आजपर्यंत जो घोटाळा होता आणि त्यांचे निरनिराळे सात किंवा त्यांहूनही अधिक वर्ग केल्यामुळें त्यामध्यें जी अव्यवस्था उत्पन्न झाली होती, ती आमच्या या तीन वर्गांच्या व्यवस्थेनें सर्वथा दूर होऊन मराठी विभक्तिप्रकरण फार सरळ आणि सोपें झालें आहे, असें सुज्ञ वाचकांच्या सहज लक्षांत येईल. गोडबोले आणि जोशीबोवा यांच्या व्याकरणांमध्यें दिलेलीं, सामान्यरूपीं होणाऱ्या आदेशांचीं, लांबलचक पत्रकें पाठ करण्याचें कारण राहिलें नाहीं, तसेंच जोशीबोवांनीं आपल्या निरनिराळ्या सात वर्गांखालीं दिलेल्या अनेक संदिग्ध परिगणना आणि त्यांचे अपवाद, आणि पुनः प्रत्यपवाद, यांचा गोंधळही एणेंकरून दूर झाला आहे, असेंही ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.

विभक्तिसंबंधी विकारांची उत्पत्ति

जेव्हां शब्दांचे अपभ्रंश होतात, तेव्हां प्रायः कठीण उच्चार जाऊन त्यांच्या स्थानीं सोपे उच्चार येण्याचा कल फार असतो; तसाच निर-निराळ्या अनेक रूपांचा सूक्ष्म प्रकार जाऊन त्यांतीलच एकाद्या ठळक रूपाचा सार्वत्रिक प्रचार होऊन जातो.

संस्कृत भाषेमध्यें अकारांत शब्दांच्या विभक्तीमध्यें, रामस्य, देवस्य, रामाणाम्, देवानाम्, रमाणाम् इत्यादिकांमध्यें आढळणारे प्रत्ययांच्या पूर्वींचे जे अकार आकार, तेच मराठींत आ या विकाराच्या रूपानें आले आहेत. त्याप्रमाणेंच ईकारांत स्त्रीलिंग शब्दांचा जो अंत्यवर्ण तोच मराठी-मध्यें ई या विकाराच्या रूपानें राहिला आहे. कितेक जे अकारांत स्त्रीलिंग शब्द सामान्यरूपीं एकारांत होतात, त्यांचें मूळ पाहिलें असतां प्रायः ते आधीं आकारांत होते; आणि संस्कृतांत आकारांत स्त्रीलिंग शब्द संबोधनादि स्थळीं एकारांत होत असतात; याप्रमाणेंच मराठीमध्यें सामान्यरूप आणि संबोधन हीं दोन्ही समान असतात; म्हणून त्या धोरणावरून त्यांचें सामान्यरूप एकारांत होत असतें.

दादोबांचें म्हणणें असें दिसतें कीं, ह्या या सर्वनामाचें जें सामान्यरूप ह्या किंवा या असें आहे, तें शब्दाच्या पुढें लागून, रामयाचा, घोडयाचा, इत्यादि रूपें झालीं, आणि त्यांचा संक्षेप होऊन मग रामाचा, घोडयाचा इत्यादि रूपें झालीं. परंतु एथें अशी शंका येते कीं ह्या याचें सामान्यरूप ह्या किंवा या हेंच आधीं कसें उत्पन्न झालें ? तेथें ज्या कारणानें यकाराचा उदय झाला, तेंच कारण स्वतंत्रतेनें इतर शब्दांमध्येंही होण्याला कांहीं अडचण नाहीं. तेथें ह्या शब्दाचेंच सामान्यरूप कल्पिण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं. पुनः दुसरी शंका अशी आहे कीं, राम याचा मिळून रामाचा, असें जर झालें म्हणावें, तर त्यांतील यकार गेला कसा ? पुनः लाडू याचा मिळून लाडवाचा, झालें आहे असें जर म्हणावें, तर यका-

राच्या स्थानीं वकार झाला असें म्हणावें लागेल. मराठीमध्यें यकाराच्या स्थानीं कित्येक प्रसंगीं वकार होत असतो, ही गोष्ट खरी; तरी एथें तसेंच झालें आहे असें निश्चयपूर्वक म्हणतां येत नाहीं. आमचें मत तर असें आहे कीं, हीं सर्व केवळ संधिकार्यें होत, दुसरें कांहीं नाहीं. तथापि एथें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं सामान्यत: निरनिराळ्या शब्दांच्या संयोगीं होणारीं जीं ठळक संधिकार्यें तींच हीं आहेत असें नव्हे. त्यांहून यांमध्यें बरेच भिन्न प्रकार आहेत–

म्हणजे बहुतेक स्थळीं शब्दांचा अंत्य स्वर जाऊन पुढील स्वराप्रमाणें त्याचें रूप होतें. जसें– राम, आ, ला, मिळून **रामाला**; वासरूं, आ, ला, मिळून **वासराला**; वाट, ए, ला, मिळून **वाटेला**; इ० याला **पररूपसंधि** हें नांव आहे.

कित्येक शब्दांमध्यें कांहीं वेगळा प्रकार होतो.–पुढें आ आला असतां, शब्दाच्या अंतीं असणारा आ, ई, आणि ए यांच्या स्थानीं य् आदेश होतो. उदा.–घोडा, आ, नें मिळून **घोड्यानें**; शास्त्री, आ, चा, मिळून शास्त्र्याचा; नदी, आं, चा, मिळून नद्यांचा; तळें, आ, नें मिळून तळ्यानें; इ. यांत संस्कृत संधिकार्याला अनुसरून ईच्या स्थानीं यकारादेश होतो असें म्हणतां येईल. पण आ आणि ए यांच्याही स्थानीं यकारादेश होतो, हा कांहीं संस्कृत संधीचा सामान्य प्रकार नव्हे; तर मग हे संधि कसे उत्पन्न झाले असावेत ? संस्कृतांत राम, रमा, इत्यादि शब्दांपुढें 'ओ:' हा षष्ठी-सप्तमीचा द्विवचन प्रत्यय आला असतां तेथें रामयो:, रमयो: अशीं रूपें होत असतात. तसाच कांहींसा प्रकार एथें झालेला आहे. म्हणजे एथें दोन **आ** आल्यामुळें उच्चाराला अडचण उत्पन्न होऊन सोप्या उच्चारासाठींच मध्यें स्वाभाविक रीतीनें यकार गृहीत झालेला आहे. संस्कृत शब्द **गत:, कृत:,** इत्यादिकांचे **गओ, किओ,** इत्यादि बालभाषेंत अपभ्रंश झाले; परंतु दोन स्वर एकत्र आल्यानें

उच्चाराला अडचण येऊं लागल्यामुळें मध्यें यकार शिरून त्यापासूनच पुढें **गयो, गया, कियो, किया,** इत्यादि रूपें बृज, हिंदी, गुजराथी, इत्यादि भाषांत उत्पन्न झालीं. सारांश, केवळ संधीमुळें हा मराठी विभक्तीं-तलाहि यकार आलेला आहे, यांत संशय दिसत नाहीं.

ऊकारांत शब्दांमध्यें अवादेश होणें ही गोष्ट तर संस्कृत व्याकरणांत अतिशयित सामान्य आहे. तेथें ऊच्या स्थानीं गुणसंज्ञक **ओ** हा वर्ण होऊन, त्याला मग अवादेश झाला असें म्हणतात. परंतु मराठींत सध्यां तितकें लांब जाण्याचें कारण नाहीं. केवळ अवादेश झाला म्हटलें म्हणजे झालें.

एकाक्षरीं ईकारांत आणि ऊकारांत शब्दांना जे इय् आणि उव् आदेश होतात, ते तर सर्वथा संस्कृत आदेशच होत, असें म्हणण्याला कांहींच बाध दिसत नाहीं. संस्कृतामध्यें श्री, भू इत्यादि शब्दांपासून श्रियम् भुवम् इत्यादि प्रकारचीं जीं रूपें होतात, त्यांमध्यें आणि मराठींत स्त्री, धू इत्यादि शब्दांपासून स्त्रिया, धुवा, इत्यादि जीं रूपें होतात त्यांमध्यें संधिकार्याच्या दृष्टीनें कोणत्याही प्रकारें कांहीं भेद नाहीं, असें सहज लक्षांत येईल.

पुस्तक २२, अंक ९; सप्टेंबर, १८९०.

महाराष्ट्र भाषेची वर्णयोजना

भाषेच्या सुधारणेचीं आणि अभिवृद्धीचीं साधनें अनेक आहेत; पण त्यांत भाषेमध्यें सर्वत्र एकरूपता असावी, आणि लिहिण्यामध्यें देखील तिच्या प्रत्येक शब्दाची वर्णयोजना नेमकी ठरीव असावी, हीं दोन मोठींच आणि आवश्यक साधनें होत. आमची महाराष्ट्र भाषा, महाराष्ट्र देशाच्या बाहेर देखील बऱ्याच पुष्कळ प्रदेशीं व्यवहारांत आहे. तेथें

आणि प्रत्यक्ष महाराष्ट्र देशाच्या निरनिराळ्या प्रांतीं देखील, मराठी भाषेला बऱ्याच अंशीं निरनिराळीं स्वरूपें आलीं आहेत. या निरनिराळ्या स्वरूपांच्या उत्पत्तीला कारणें काय काय झालीं, आणि त्यांचें एकीकरण होण्याचा मार्ग कोणता, या गोष्टीचा स्वतंत्रपणें अवश्य विचार करण्यासारखा आहे. तथापि प्रस्तुत प्रसंगीं इतकेंच म्हणणें पुरे आहे कीं, निरनिराळ्या प्रांतीं वाग्व्यवहारांत असणाऱ्या मराठी भाषेच्या स्वरूपाचें परस्परांशीं कितीही भिन्नत्व असलें, तरी लिहिण्याची भाषा म्हणून जी सांप्रत वहिवाटींत येत चालली आहे, किंबहुना पुष्कळ दिवसांपासून चांगल्या रीतीनें स्थिर होऊन राहिली आहे असें म्हणण्यालाही बाध नाहीं, त्या भाषेचें स्वरूप पाहतां, महाराष्ट्र देशाच्या निरनिराळ्या प्रत्येक प्रांतीं, आणि महाराष्ट्राच्या बाहेर देखील मराठी प्रदेशांत तें एकसारखें एकच आहे, ही मोठी आनंदाची गोष्ट होय. सूक्ष्मदृष्टीनें पाहणारांना क्वचित् कांहीं भेद आढळण्यासारखा असला, तरी सार्वत्रिक स्थूळ दृष्टीनें पाहतां तिजमध्यें म्हणण्यासारखा मोठासा भेद नाहीं. आजकालच्या प्रसिद्ध मराठी पुस्तकांमध्यें आणि प्रसिद्ध वर्तमानपत्रांमध्यें मराठी भाषेचें जें स्वरूप दृष्टीस पडतें, तें सामान्यत: सर्वमान्य होऊन गेलें आहे. आणि त्यामध्यें कोणी फारशी उलटापालट करूं इच्छितही नाहीं. हिमालयापासून रामेश्वरापर्यंत जेथें जेथें म्हणून शुद्ध मराठी भाषा बोलण्याची आणि लिहिण्याची कोणी इच्छा धरितो, तेथें तेथें आजकालच्या प्रसिद्ध मराठी पुस्तकांतील आणि वर्तमानपत्रांतील भाषेचें अनुकरण करण्याचा तो यत्न करितो, यांत कांहीं संशय नाहीं. याप्रमाणें मराठी भाषेच्या थोरवीला आणि अभिवृद्धीला हें एक खरोखरी मोठें साधन झालें आहे. तथापि याच्याच जोडीचें जें दुसरें मोठें आवश्यक साधन,--म्हणजे लिहिण्यामध्यें भाषेंतील प्रत्येक शब्दाची वर्णयोजना नेमकी ठरींव असावी,- त्याकडे अद्यापि आमचें लागावें तितकें लक्ष लागलेलें नाहीं, ही गोष्ट

निर्विवाद होय. यामुळें लेखांमध्यें वर्णयोजनेच्या संबंधानें पुष्कळच मत-भेद उत्पन्न होतात. परीक्षेच्या समयीं परीक्षापात्र मुलांना आणि इतर विद्यार्थ्यांना शुद्धलेखनाच्या संबंधानें फार त्रास पडतो. परीक्षक लोक आपापल्या तात्कालिक स्फूर्तीप्रमाणें लेख शुद्धाशुद्ध मानून वेळ मारून नेतात. मराठी भाषा शिकणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांना तर यापासून जो त्रास होतो, तो सांगतां पुरवत नाहीं. या विविधज्ञानविस्तार मासिक पुस्तकामध्यें पंचवीस सत्तावीस वर्षांपासून या विषयाची अनेक वेळां चर्चा करून, ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, अनुनासिक, वर्णव्यत्यास, वर्णलोप, संक्षेप, इत्यादि गोष्टींच्या संबंधानें कांहीं तरी समंजस निर्णय होणें अवश्य आहे, अशाविषयीं आम्ही अनेक सूचना करीत आलों आहों. तथापि विद्याशालाधिकाऱ्यांना या गोष्टीकडे लक्ष देण्याला मुळींच बनलें नाहीं, आणि जें कांहीं चालू आहे, त्यामध्यें उलटापालट करणेंही त्यांना आवडलें नाहीं. यामुळें—चाळीस पन्नास वर्षां-मागें जे कांहीं बरेवाईट कसे तरी नियम ठरले होते, तेच पुढें चालत आले. परंतु अलीकडे, थोडया दिवसांमागें, मराठीविषयीं अनभ्यस्त अशा एका नवीन विद्वान् गृहस्थाच्या हातीं, सरकारी मराठी पुस्तकांच्या नवीन आवृत्ति छापविण्याचें काम आलें. त्यांमध्यें त्यांनीं इतर पुष्कळ फिरवा-फिरवींच्या संगतीं ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, अनुनासिक, इत्यादिकांच्या संबंधानें स्वतःच्या समजुतीप्रमाणें पुष्कळच उलटापालटी केल्या आहेत. पण त्या कांहीं पायाशुद्ध नियमानें केलेल्या नाहींत, आणि सर्वत्र सारख्याही नाहींत. कोठें नवी रीत, कोठें जुनी रीत, कोठें कांहीं तृतीय पंथच. यामुळें सर्व महाराष्ट्र देशांतील हजारो शाळांचे पंतोजी, विद्यार्थी, आणि परीक्षक, हे सर्वच गोंधळांत पडल्यासारखे झाले आहेत. पूर्वीं मुख्यत्वेंकरून अनु-नासिकांच्या संबंधाची फार अव्यवस्था होती; पण आतां तिजमध्यें अनेक प्रकार आले आहेत. या गोष्टीपासून जरी मोठाच गोंधळ उत्पन्न झाला,

तरी एकपक्षीं पाहतां महाराष्ट्रभाषेच्या वर्णयोजनाविचाराला उचल देण्याला ही गोष्ट चांगली साधनीभूत झाली यांत कांहीं संशय नाहीं. या गोष्टीच्या संबंधानें पंतोजीवर्गाकडून तक्रारी सुरू झाल्या, मराठी शाळापत्रकांतून चर्चा चालू झाली, वर्तमानपत्रांमध्येंही कित्येकांनीं आपापले विचार प्रदर्शित केले. आणि अलीकडे–‘ पुणें ट्रेनिङ् कॉलेज् ’ या विद्यालयाचे मुख्य अधिकारी रा. सा. काशिनाथ नारायण साने, आणि दुय्यम अधिकारी रा. रा. रामचंद्र परशुराम गोडबोले, आणि तिसरे एक विद्वान् गृहस्थ रा. रा. शंकर रामचंद्र हातवळणे या पंडितत्रयानें या विषयाच्या संबंधानें एक सूचनापत्रक छापवून निरनिराळ्या विद्वान् लोकांच्या अभिप्रायासाठीं चोहोंकडे पाठविलें आहे. हा झालेला प्रकार फार चांगला झाला. महाराष्ट्र देशामध्यें मराठी शिक्षक उत्पन्न करण्याचें पुणें येथें जें प्रसिद्ध विद्यालय आहे, त्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं ही गोष्ट मनावर घेतली, यांत त्यांनीं आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजाविलें, यास्तव ते स्तुतीस पात्र आहेत. रा. हातवळणे यांनींही त्यांत मन घातल्यामुळें तेही स्तुतीला योग्य आहेत. “ वादे वादे जायते तत्त्वबोधः ” या न्यायानें या गोष्टीचा परिणाम चांगलाच होईल याविषयीं कांहीं शंका वाटत नाहीं. आमची सूचना इतकीच आहे कीं प्रत्येक महाराष्ट्रभाषाभिज्ञ विद्वानानें यासंबंधानें आपले विचार कसकसे आहेत, ते स्पष्ट लिहून वेळेवर या पंडितत्रयापाशीं पाठवावे, किंवा अन्य रीतीनें म्हणजे वर्तमानपत्रादिकांच्या द्वारें प्रसिद्ध करावे; म्हणजे हातीं धरलेलें काम चांगल्या रीतीनें तडीस नेण्यास त्या विद्वान गृहस्थांस मोठें सहाय्य होईल.

असो. या विचारामध्यें जे अनेक विषय येतात, ते घेऊन क्रमानें त्यांतील एकेका विषयावर आमचा अभिप्राय देण्याचा यत्न करूं.

प्रथमतः अनुस्वार आणि अनुनासिक यांच्या कारणानें मराठी अक्षरांवर जो बिंदु येतो, त्याकडे लक्ष देऊं.

अनुस्वार.

१ य र ल व हे अंतस्थ वर्ण, आणि श ष स ह हे उष्म वर्ण, यांच्यापूर्वी-**संयोग, संरक्षण, संवाद, अंश, संसार,** सिंह, इत्यादि शब्दांमध्यें-जो नाकांतून उच्चार होतो, त्याला अनुस्वार ही संज्ञा आहे. इतर वर्णांप्रमाणें अनुस्वार हा एक वेगळा वर्ण मानिलेला आहे. हा प्रायः संस्कृत शब्दांत आढळतो. देशी आणि कोंकणी सर्व लोकांच्या मुखांमध्यें हा येतो, आणि सर्वांच्या लेखांमध्यें बिंदुरूपानें दृश्य असतो. याविषयीं कोठेंही मतभेद नाहीं. अथात् हा अनुस्वारजन्य बिंदु सर्वदा लिहिणें अवश्य आहे.

२ अंक, अंग, सुंठ, पंडित, अंत, पंथ, पंचा, चंदन, गंध, अंजन, कंप, कुंद, बिंदु, संप, दंभ; इत्यादि शब्दांमध्यें बिंदूचा उच्चार क्रमशः ङ ण न म यांसारखा होतो. हा जरी खरा अनुस्वार नव्हे, तरी अन्य वर्णांचा हा प्रतिनिधि असल्यामुळें अनुस्वाराप्रमाणेंच हा ही वेगळा वर्ण मानण्यांत येतो. या बिंदूच्या आवश्यकतेविषयीं देखील कोणाचाही मतभेद नाहीं. तस्मात् हाही सर्वत्र लिहिला पाहिजे.

३ सांग, सोंग, आंग, रांग, शेंग; कोंडा, सोंड, पेंढा, पांढरा; कांदा, धांदल, सांज, वांझ, सांधा, आंबा इत्यादि मराठी शब्दांतील बिंदु हा देखील ङ ण न म यांच्या स्थानीं असून स्पष्ट वेगळा वर्ण आहे. याचा उच्चार जरी फ़ारसा खणखणीत होत नाहीं, तरी याच्या आवश्यकतेविषयीं देखील मतभेद नाहीं. हाही सर्वत्र लिहिला पाहिजे.

सूचना—हे शब्द बहुशा मराठी असतात. यांतील बिंदुयुक्त अक्षर दीर्घ असतें, आणि त्यापुढील अक्षर हें वर्गातील तिसरें किंवा चवथें —म्हणजे ग घ, ज झ, ड ढ, द ध, ब भ, यांतून एकादें—असतें.

या तीन लेखांमध्यें वर्णिलेले सर्व बिंदु अथवा अनुस्वार हे योग्य स्थळीं जर न उच्चारिले किंवा न लिहिले तर अर्थबोध होत नाहीं; किंवा अर्थाचा अनर्थ होतो. यास्तव या बिंदूचा त्याग करितां येत नाहीं.

अपवाद 'रत्नागिरी' हा शब्द कोंकणी लोकांच्या बोलण्यांत 'रत्नांगिरी' असा येतो. पण वस्तुतः तेथें बिंदूला कांहीं आधार नाहीं, म्हणून तो प्रशस्त नव्हे.

त्याप्रमाणेंच झुजणें, झुंजणें; भाजणी, भांजणी; मोगल, मोंगल; असे कांहीं थोडथा शब्दांचे दोन दोन उच्चार आढळतात. पण यांत देश कोंकण याचा कांहीं संबंध दिसत नाहीं. कोणी बिंदु देतात, कोणी देत नाहींत. 'मोगल' हा शब्द मराठींत येण्याच्या पूर्वींच त्याचे दोन उच्चार होते असें दिसतें. या तीन्ही शब्दांत बिंदु देणें न देणें ही गोष्ट अंमळ अनिश्चित आहे. तथापि वरील तिसऱ्या नियमाप्रमाणें पाहतां बिंदु येतो. 'रत्नागिरी' यांत मात्र बिंदु नसणें उत्तम.

आनुनासिक्य.

कोणत्याही स्वराचा उच्चार नाकाच्या साहाय्यानें केला असतां, त्याला आनुनासिक्य येतें. जसा अनुस्वार हा एक वेगळा वर्ण मानितां येतो, तसा आनुनासिक्य हा कांहीं वेगळा वर्ण मानितां येत नाहीं.

१ मराठी शब्दाच्या अंतर्भागीं दीर्घ अक्षरावर बिंदु असून त्यापुढें जर क ख, च छ, ट ठ, त थ, प फ, र व, स ह, यांतून एकादें अक्षर आलें, तर त्या बिंदूचा उच्चार अनुनासिक होतो. त्या बिंदूविषयीं देश-कोंकणपरत्वें सर्वदा भतभेद असतो. कोंकणी लोकांच्या लेखामध्यें आणि भाषणामध्यें तें आनुनासिक्य सर्वदा असतें. पण देशी लोक तें लिहीत नाहींत, आणि उच्चारीतही नाहींत. असे शब्द–लेंक, रोंख, पेंच, सांचा, खेंटर, ओंठ, सभोंता, चोंथा, टांपू, स्वांर, पेंव, ठरींव, घोंटींव, वळींव, कोंस, कोंहळा, शेंकडा, कोंकण, इ.

२ भरंवसा, जंव, तंव, संवई, हंस, पिंवळा, हिंवाळा, इत्यादि कित्येक शब्दांत बिंदूच्या पूर्वीं दीर्घ अक्षर नाहीं; तथापि यांतील आनुनासिक्या-विषयीं देखील देशकोंकणपरत्वें मतभेद आहेच.

यांतील कित्येक शब्दांचें आनुनासिक्य पाहतां तें मूळच्या 'म' कार 'न' कारापासून किंवा संयुक्ताक्षराच्या लोपापासून आलेलें आहे. जसें ग्राम-गांव; नाम-नांव, हिम—हींव, कोमल-कोंवळा, ओष्ठ-ओंठ; इ.

३ पण दुसरे शेकडो शब्द असे आहेत कीं त्यांतील आनुनासिक्याला उत्पत्तिदृष्ट्या कांहीं आधार नाहीं. उच्चाराचें आनुनासिक्य हें कोंकणी लोकांच्या वळणीं पडल्यासारखें असल्यामुळें मात्र अशा शब्दांमध्यें तें आढळण्यांत येतें, असें स्पष्ट दिसतें. उदा.—सोंटा, खोंच, खोंट, पेंठ, जांच, कांच, रोंख, धोंपट, कोंच (इंग्लिश शब्द) इ.

वरील तीन्ही लेखांमध्यें वर्णिलेल्या सर्व शब्दांतील आनुनासिक्य जरी सोडून दिलें, तरी अर्थबोधाला कांहीं अडचण येत नाहीं किंवा अर्थाचा अनर्थही होत नाहीं. यास्तव तें मुळींच सोडून देणें बरें असें आमचे मत आहे.

कित्येकांच्या मतें—पाच (रत्नविशेष); पांच (संख्या); नाव (नौका), नांव (संज्ञा); काप (छेद), कांप (थरथर); वाच (पढ), वांच (जिवंत रहा); घाट (मार्ग), घांट (घंटा); असा भेद ठेवावा हें बरें. याप्रमाणें भेद ठेवूं नयेच असा आमचा आग्रह नाहीं. तरी यांत एक प्रकारचें काठिन्य आहे, आणि यावांचून कांहीं अडलें आहे, असें आम्हाला वाटत नाहीं.

आतां शब्दांच्या अंतीं येणाऱ्या बिंदूविषयीं:—मराठी शब्दाच्या अंतीं असणाऱ्या बिंदूचा उच्चार अनुस्वारासारखा खणखणीत कधींही होत नाहीं; सर्वदा तो अनुनासिकच असतो.

१. मराठीमध्यें कोणत्याही अकारांत शब्दाच्या अंतीं बिंदु नसतो, अर्थात् आनुनासिक्यही नसतें. पण ईकारांत, ऊकारांत, एकारांत, नपुंसक नाम-सर्वनाम-शब्द एकवचनीं असोत वा बहुवचनीं असोत, त्यांच्या अंतीं सर्वदा आनुनासिक्य असतें. या आनुनासिक्याला संस्कृतांतील मकार-नकार यांचा आधार आहे. असे शब्द-मोतीं-मोत्यें, वासरूं-वासरें; झाड-झाडें, तळें-तळीं, इ०

अपवाद—पाणी, लोणी, चिंचवणी, इत्यादि कित्येक नपुंसक शब्दांच्या अंतीं नकारास्तव अंगचेंच आनुनासिक्य आहे, म्हणून त्यावर वेगळा बिंदु देण्याचें कारण नाहीं, असें बहुशः सर्वत्र ठरल्यासारखेंच आहे.

टीप—यावरून पाहतां असें लक्षांत येईल कीं, पुष्कळ दिवसांपासून सामान्यत: आनुनासिक्य लिहिण्याचा सर्वांना मोठा त्रास वाटत आहे, आणि तो टाळण्याविषयीं सर्वांना उत्पन्न झालेली उत्सुकताही स्पष्ट होत आहे.

ऊकारांत पुल्लिंग शब्द गहूं (सं. गोधूम, प्रा. गहूअ) याच्या अंतीं दादोबांनीं बिंदु दिला आहे. उत्पत्तिदृष्ट्या त्याला म्हणण्यासारखा आधार नाहीं. देशी उच्चारामध्यें तर तो आढळत नाहींच; आणि एवढ्या एकाच पुल्लिंगी शब्दावर बिंदु ठेवण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं, आणि त्यावांचून कांहीं अडतही नाहीं, तर सोडून देण्यास काय अडचण ?

विभक्तिप्रत्ययांचें आनुनासिक्य

ना, ने, नी, शी, ही, प्रत्यय यांवर दादोबांनीं आणि इतरांनींही बिंदु दिले आहेत. पण प्राचीन हस्तलिखित पोथ्यांमध्यें पाहतां हे बिंदु प्रायः आढळत नाहींत. यांत ना (सं० नाम्); ने, नी (सं० इना); शी (सं० सह), ही (सं० भिः, प्रा० हि) अशी उत्पत्ति आहे. देशी लोकांच्या भाषेंत हें आनुनासिक्य नाहीं. पाणी, लोणी, इत्यादिकाप्रमाणें

ना, ने, नी, यांमध्यें तें आंगचेंच आहे; म्हणून तें पुनः लिहिण्याची आवश्यकता नाहीं असेंही म्हणतां येईल. कित्येक छापी लेखांमध्येंही या प्रत्ययांवर बिंदु न देण्याचा संप्रदाय पुष्कळांनीं ठेवलेला बहुतेकांच्या पाहण्यांत आहे.

द्वितीयेचा प्रत्यय तें (सं० अंते) यामध्ये मूळचा अं जाऊन ते राहिला. यावर बिंदु कसा आला कळत नाहीं. तो काढून टाकण्यास कांहीं अडचण दिसत नाहीं.

सप्तमीच्या 'त' प्रत्ययापूर्वी दोन्हीवचनीं बिंदु देण्याचा सध्यां संप्रदाय आहे. उत्पत्ति पाहतां अंतर् (आंत) अशी आहे. पण मूळ शब्दांतील तकाराच्या मागचा 'अ' गेला आहे आणि पुढचा रेंफही गेला आहे. तेव्हां राहिलेल्यां 'त' च्या मागें एका त्रासदायक अनुनासिक बिंदूलाच पकडून टेवण्यापासून काय अर्थ? 'अंते' यांतील अवरील बिंदूप्रमाणें हा देखील कां काढून टाकूं नये? देशी लोकांच्या भाषणांत तर तो येत नाहीं. म्हणून तो प्रत्यय नुसता 'त' मानिला तर बरा. 'तून' प्रत्ययाविषयींही हाच विचार. बहुवचन सामान्यरूपावर सामान्य नियमानुसारें बिंदु येणारच आहे. आणि अशानें दोहों वचनांचा भेदही स्पष्ट होईल, असें आम्हांस वाटतें.

सप्तमीचा ई (सं० इ किंवा ए) प्रत्यय यावर उत्पत्तिदृष्ट्या बिंदु नाहीं. देशी लोकांकडून तर आनुनासिक्याला विरोध आहेच. तेव्हां येथेंही बिंदूचें कारण दिसत नाहीं.

तृतीयेचें एं ईं (सं० इन किं एन) प्रत्यय यांवर उत्पत्तिदृष्ट्या बिंदूला आधार आहे. तथापि हीं रूपें प्रचारांत फारशीं येत नसल्यामुळें बिंदूवांचून यांचें फारसें अडेल असें दिसत नाहीं; अर्थभेदास्तव हवा तर बिंदु ठेवावा.

माथां, पायां, गळां, या दोनचार सप्तम्यंत रूपांतील आं प्रत्ययाची उत्पत्ति गुजराथी मा प्रत्ययापासून असण्याचा कदाचित् संभव आहे. हीं रूपें फार नाहींत आणि अंमळ विलक्षण आहेत. एवढ्याच कारणानें यांवरील बिंदु हवे तर राखून ठेवावे.

द्वितीयेचा **ला** प्रत्यय हा **ना** प्रत्ययाचा अपभ्रंश आहे. तरी हा अनुनासिक बिंदूच्या तडाक्यांतून कसा सुटला हें कळत नाहीं.

नामाच्या विभक्तिसामान्यरूपाच्या बहुवचनीं अंत्य स्वरावर चालू संप्रदायाप्रमाणें बिंदु देणें अवश्य आहे. त्यापासून अर्थभेद स्पष्ट होतो. आणि हा नियम व्यापक असून सर्वमान्यही आहे.

सर्वनामांचें आनुनासिक्य.

मी, तू, आम्ही, तुम्ही, म्या, त्वा, यांच्या अंतीं दादोबांनीं नित्य बिंदु चिकटून दिला आहे. परंतु सांप्रत **मी**, आम्ही, तुम्ही, यांवर प्रथमा विभक्तिकालीं बिंदु देत नाहींत; तृतीयाकालीं कोणी देतात. तूं, म्यां, त्वां, यांवर मात्र नित्य बिंदु देतात. उत्पत्तिदृष्ट्या **मी** (मया, मिया); म्या (मया), त्वा, (त्वया- तुवा), यांवर बिंदु देण्याला आधार नाहीं. तूं (त्वम्-तुम) यांत उत्पत्तिदृष्ट्या बिंदु येतो. पण देशी लोकांच्या बोलण्यांत या बिंदूला थारा नाहीं. **आम्ही** (अम्हेहि-हिं), तुम्ही (तुम्हेहि-हिं) यांत संदिग्ध आधार आहे. तथापि **मी, आम्ही, तुम्ही** यांवर प्रथमा कालीं बिंदु द्यायाचा नाहीं, आणि तृतीयाकालीं तो द्यावयाचा, अशा प्रकारच्या गोंधळाचें कांहीं कारण दिसत नाहीं. मी, तू, आम्ही तुम्ही, म्या, त्वा यांवर केव्हांही बिंदु न दिला तर काय अडणार आहे ?

नपुंसक सर्वनामें—तें, हें, जें, असें, तसें, इत्यादिकांवर दोन्ही वचनीं बिंदु येतो, तो ठीकच आहे.

आम्हांस, तुम्हांस, इत्यादिकांतील **आम्हा तुम्हा** हीं जीं विभक्ति सामान्यरूपें तीं एकवचन सामान्यरूपांहून सर्वथा भिन्न असल्यामुळें,

त्यांवर बहुवचनसूचक बिंदु न दिला तर काय अडचण येणार ? आमचा तुमचा यांतील 'आम' तुम' या भागांवर बिंदु नसतो, हा एक याला मोठा आधार आहे.

कांहीं (कायही) याच्या उच्चारामध्यें देशी लोकांच्या भाषेंत आनुनासिक्य नसतें, केवळ कोंकणी लोकांतच हें आढळतें. तें काढून टाकिल्यानें अर्थभेद होणार नाहीं. मग तें कां ठेवावें ?

कोणी (कोणही) आणि कोणीं (कोण तृ.) असा लिहिण्यामध्यें आनुनासिक्य भेद कोणी कोणी ठेवतात.

परंतु मी-मीं, आम्ही-आम्हीं, तुम्ही-तुम्हीं कोणी-कोणीं यांचे अर्थभेद ध्यानांत आणून त्याप्रमाणें वेगवेगळे उच्चार करण्याकडे एक हजार मराठी लोकांतून दहा जणांचें तरी लक्ष लागत असेल, आणि त्या भेदांची त्यांना खरोखर आवश्यकता दिसत असेल, असें आम्हांला तर वाटत नाहीं.

कोण या शब्दाची तृतीया सामान्यनियमानुसारें 'नें' लागून तर होत नाहीं. **कोणें** असें रूप जुन्या ग्रंथांत क्वचित् आढळतें. आणि तृतीया बहुवचनासारखें दिसणारें, पण वस्तुतः दोन्ही वचनीं चालणारें 'कोणीं' हें त्याचें अनर्गळ रूप अगत्यानें वेगळेंच ध्यानांत ठेवावें लागतें. त्यापेक्षां प्रथमेसारखेंच तें आहे, किंवा फार तर, त्यांतील आनुनासिक्य मूळच्या नकारास्तव वेगळें दाखवायाला नको आहे, म्हटलें म्हणजे सर्व अडचण दूर होईल. सारांश 'कोणी' याच्या तृतीयेवर बिंदु देण्याचें कारण नाहीं, असें आम्हांस वाटतें.

एकाच उच्चारापासून निरनिराळे अर्थ होत असले, तर लेखामध्यें निरनिराळ्या रीतीनें ते दाखविण्याची नवी पद्धत पाडणें ही कल्पना पाश्चात्यांची आहे, आमच्या देशची नव्हे. पाश्चात्य भाषांमध्यें 'अर्थाग्रफी' (वर्णोच्चार ज्ञान) आणि स्पेलिंग (वर्णयोजना) या नांवाचीं

मोठीं शास्त्रेंच झालीं आहेत. तो प्रकार आमच्या भाषेंत होऊं देणें अनावश्यक होय. समान शब्दांमध्यें अर्थभेदास्तव बुद्धया सूक्ष्म उच्चार भेद कल्पून तो ध्यानांत ठेवून उच्चारणें, आणि लिहिण्यामध्यें तो मोठया प्रयत्नानें दाखविणें, ही गोष्ट आमच्या सुलभ लेखनकलेला विनाकारण काठिन्य आणणारी आहे. यास्तव तसेंच कांहीं महत्त्वाचें कारण असल्यावांचून असले सूक्ष्म भेद उत्पन्न करणें बरें नव्हे, असें आम्हांस वाटतें.

विशेषणांतील आनुनासिक्य

ईकारांत, एकारांत, नपुंसकलिंगी विशेषणावर शेवटीं बिंदु असतो उदा. चांगलीं मुलें, मोठें घर, इत्यादि.

अपवाद—जीं विशेषणें तीन्ही लिंगीं समान असतात, त्यांवर बिंदु नसतो. उदा०—लहान घर, लहान घरें; गुणी माणूस, गुणी माणसें; कडू फळ, कडू फळें, इ.

शे, दोनशे, चारशे, इत्यादिकांत शे (शत) यावर मूळचा बिंदु नाहीं, आणि देशी लोकांच्या व्यवहारांतही तो येत नाहीं. पण कोंकणी लोक सर्वदा तो बिंदु देतात. हा सोडून देण्यास काय अडचण आहे ?

विशेषणसामान्यरूपावर बहुवचनीं देखील बिंदु नसतो, ही व्यवस्था चांगली आहे. उदा. **मोठ्या** मनुष्यांना, **धाकट्या** मुलांनीं इ.

क्रियापदांतील आनुनासिक्य

इतर अकारांत शब्दांप्रमाणें अकारांत क्रियापदांवर देखील बिंदु नसतो. पण याला एक अपवाद आहे. 'तूं येतेंस', 'तूं आलेंस' इत्यादि जीं द्वितीय पुरुषवाचक नपुंसक क्रियापदें आहेत, त्यांत 'स' च्या पूर्वी बिंदु येतो.

अकारांतांशिवाय जीं क्रियापदें राहिलीं त्यांविषयीं असे नियम सध्यां चालू आहेत.–

१ प्रथमपुरुषीं त्यांच्या अंतीं नित्य बिंदु असतो. उदा. मी येतों, मी येल्यें[1], मी येतें, आम्ही येतों, मी आलों,-ल्यें,-लें, आम्हीं आलों, मी येऊं, आम्हीं येऊं, मी आहें, मी असें इ.

अपवाद—पाहिजे, नको, नलगे, यांच्या शेवटीं प्रथम पुरुषीं देखील बिंदु देण्याचा संप्रदाय नाहीं.

२. द्वितीय पुरुषीं बहुवचनीं क्रियापदांच्या शेवटीं बिंदु असतो. उदा० तुम्ही **येतां**, तुम्ही **आलां**, तुम्ही आहां, तुम्ही होतां, इ०

अपवाद्—आज्ञार्थी द्वितीय पुरुषीं बिंदु नसतो. उदा०—तुम्ही **या**, तुम्ही **बसा**, इ०

३. द्वितीय पुरुषीं एकवचनीं, आणि तृतीय पुरुषीं दोन्ही वचनीं पुल्लिंग स्त्रीलिंग क्रियापदांवर बिंदु नसतो. पण नपुंसकीं मात्र या तीन्ही स्थळीं बिंदु येतो. उ०—तूं येतोस, तूं येत्येस, तो येतो, ती येत्ये, ती होती, ते होते, त्या होत्या, इ०, यांवर बिंदु नाहीं; पण—

नपुंसकीं—तूं **येतेंस**, तूं **आलेंस**, तें **येतें**, तें **आलें**, तीं **आलीं**, इ. यांवर बिंदु आहे.

अपवाद्—यांत जीं नपुंसक क्रियापदें अन्यथा पुल्लिंग रूपांसारखींच असतात, त्यांवर नपुंसकीं देखील बिंदु नसतो. उदा०—तो **आहे**, तें **आहे**; तो **असे**, तें **असे**; तो **पाहिजे**, तें **पाहिजे**; तो **नको**, तें **नको**; तो **नव्हे**, तें **नव्हे**; इ०

टीप—क्रियापदावरील बिंदूच्या संबंधानें विचार करितां ही एक गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे कीं, संस्कृत आणि प्राचीन प्राकृत

१ बहुतेक स्थळीं व्यवहारांत असणारीं मी येत्यें, मी आल्यें इत्यादि रूपें मी येतें, मी आलें, या नपुंसक रूपांपासून भिन्न दाखविण्यास्तव बुद्ध्या यकारयुक्त एथें दाखविलीं आहेत. त्याविषयीं कोणत्याहि प्रकारें आमचा आग्रह नाहीं. तरी तीं प्रचारांत येतील तर बरीं, असें आम्हांस वाटतें.

यांमध्यें क्रियापदांना लिंगभेद अगदीं नव्हता. मराठीमध्यें केवळ अपभ्रंशानें जीं क्रियापदें आलीं आहेत, त्यांत देखील लिंगभेद नाहीं. उदा० **आहे, असे, असेल, असणार, ऐस,** इत्यादि क्रियापदें तीन्ही लिंगीं समान आहेत. पण शेवटीं **तो, ला, ला, वा,** हीं अक्षरें लागून जीं मराठीं क्रियापदें सिद्ध झालीं आहेत, तीं अंशतः विशेषणरूप असल्यामुळें, त्यांमध्यें लिंगभेद नवीन उत्पन्न झाला आहे. उ० तो येतो, ती येते, तें येतें, ती आली, तें यावें, इत्यादि. या लिंगभेदामुळें नपुंसकीं जो बिंदु येतो तो सर्वथा अपरिहार्य होय.

पण प्रथमपुरुष क्रियापदांवर जो बिंदु येतो त्याला संस्कृतांतील, 'मि' 'म्' 'म,' किंवा 'मः' यांचा आधार आहे यांत संशय नाहीं. तथापि हे प्रथमपुरुषमूलक अनेक बिंदु आणि वर सांगितलेले नपुंसकलिंगसंबंधाचे अनेक बिंदु यांपासून मराठी क्रियापदांना दुष्पट काठिन्य आलें आहे. या बिंदूच्या संबंधानें वारंवार चुका होतात. देशी लोकांच्या भाषणामध्यें तर हे बिंदु येत नाहींतच. इत्यादि सर्व कारणें ध्यानांत घेऊन प्रथम पुरुषसंबंधाच्या सर्व बिंदूंना जर निरोप दिला, तर ती गोष्ट वावगी होईल असें आम्हांस वाटत नाहीं. कित्येकांना सकृद्दृष्ट्या ही सूचना कदाचित् अयोग्य वाटेल; तथापि या सूचनेप्रमाणें व्यवस्था केल्यानें मोठी सोई उत्पन्न होईल. अर्थज्ञानाला देखील इजपासून कांहीं अडचण येईल असें नाहीं. म्हणून या गोष्टीचा विचार सर्व विद्वज्जनांनीं अवश्य करावा.

यांतील नपुंसकसंबंधाच्या बिंदूंना देखील याप्रमाणेंच काढून टाकण्याला काय अडचणी आहेत याचा विचार पुढें येणार आहे.

'तुम्ही **येतां**' 'तुम्ही आलां' इत्यादि द्वितीयपुरुष बहुवचन क्रियापदांवर जो बिंदु येतो, त्यापासूनही कांहीं काठिन्य उत्पन्न होतें खरें, तरी अवश्य भेद दाखविण्याच्या कामीं त्याचा उपयोगही बराच दिसतो. म्हणून त्याच्या निराकरणाविषयीं आमचा तितका आग्रह नाहीं.

नाहीं (सं० नहि किंवा नास्ति, प्रा. णत्थि) यांत मूळचा बिंदु नाहीं, सध्यां छापी पुस्तकांत तो सर्वत्र लिहिण्यांत येतो; पण देशी भाषेंत तो नाहीं. या बिंदूचें कारण किंवा प्रयोजन कांहीं दिसत नाहीं.

क्रियाविशेषणें आणि इतर अव्ययें यांचें आनुनासिक्य.

संस्कृतामध्यें कांहीं थोडया अव्ययांच्या अंतीं मकार आहे. पण दुसरीं शेकडो अव्ययें अशीं आहेत कीं, त्यांच्या अंतीं मकार किंवा बिंदु मुळींच नाहीं. परंतु मराठी अव्ययें पहातां त्यांच्या अंतीं अनुनासिक बिंदूचा केवळ भडिमार आहे.

अथवा, किंवा, जात्या, सहजगत्या, बुद्धया, हळू, कडे, यद्यपि, तथापि, अहाहा, अरेरे, अरे, अहो, अबाबा, इत्यादि पांच दहा शब्द वर्ज्य करून राहिलेल्या झाडून सर्व अकारांतभिन्न अव्ययांवर धडकून बिंदु देण्याचा संप्रदाय चालू आहे. पहा– करूं, करितां, करितांना, करितांनां, करूनियां, एथें, इथें, जेथें, जिथें, कोठें, कुठें, तेथें, तिथें, केव्हां, कधीं, जेव्हां, तेव्हां, एव्हां, आतां, कां, साठीं, पेक्षां, मुळें, कारणें, करितां, संबंधीं, ठायीं, विषयीं, पुढें, मागें, हल्लीं, पूर्वीं, पाशीं, मधां, मधांशीं, यंदां, गुदस्तां, उद्यां, परवां, एरवां, पुन्हां, सध्यां, मध्यें, स्वतां, स्वथां, आधीं, लागीं, लागोनियां, नेहमीं, शेवटीं, एकदां, दोनदां, सदां, कीं, सुद्धां, जों, तों, पावेतों, मागुतीं, पुढतीं, जरीं, तरीं, लवलाहीं, माघारां, पुढारां, शेंकडों, हजारों, लाखों, पहिल्यानें, दुसऱ्यानें, पहिल्यानदां दिवसाउजेडीं, सकाळीं, दुपारीं, अगदीं, इ० इ०

बुद्धयां, जात्यां, बहुशां–अशा प्रकारें बिंदु, दिलेलेही क्वचित् पाहण्यांत येतात ! इतके हे बिंदु आले तरी कोठून ! कोणत्या पायावर हे बसविले आहेत ? यांमध्यें ओढाताणीनें कसा तरी कांहीं थोड्या बिंदूंना आधार

दाखवितां येईल. पण सामान्येंकरून पाहतां असें स्पष्ट दिसतें कीं, जसा अकारांतभिन्न सर्व नपुंसक नामावर बिंदु असतोच, तद्वत् अकारांतभिन्न सर्व अव्ययांवर बिंदु असलाच पाहिजे, अशी कांहीं चमत्कारिक दृढ समजूत कित्येक पुढारी विद्वानांची झालेली आहे; आणि त्या समजुती-मुळेंच अनुनासिकजालाचा मराठी भाषेवर हा सर्वत्र पसारा झाला आहे. याच्या घोटाळ्यांतून कसें सुटावें हें स्पष्टपणें ध्यानांत येत नाहीं. तरी भीत भीत आम्ही असें विचारितों कीं, हे सर्व बिंदु साफ सोडून द्यावे असें जर कोणी म्हटलें, तर कांहीं दोष घडेल का ? देशी वाग्व्यवहारांत तर हे बिंदु मुळींच नाहींत.

मराठी भाषेंतील सर्व अनुनासिक बिंदूंना सरसकट फांटा द्यावा, अशी वर्तमानपत्रातून कोणी सूचना केलीं आहे; पण ती सूचना सर्वथा त्याज्य होय; कारण कीं अनुनासिक बिंदूंना जर सर्वथैव फांटा दिला तर--'ते कुत्रे आले', 'तें कुत्रें आलें'; 'ती कुत्री गेली', 'तीं कुत्रीं गेलीं;' 'ही घोडी बांधिली,' 'हीं घोडीं बांधिलीं,' यांतील भेद कसा समजावा ? आणि 'तें कुत्रें आलें' याच्या स्थानीं 'ते कुत्रँ आलँ' असें लिहिलें तरी लाभ तो काय ? लिहिण्याचे श्रम तर वांचत नाहीत, संदिग्धता मात्र अधिक आली. 'कुत्र आल' असें लिहावें, तर त्र आणि ल यांत उच्चा-राचें दीर्घत्व आहे, तें लिहिण्यामध्ये आलें नाहीं. तें स्पष्टपणें दाखविण्याला कांहीं सर्वमान्य युक्ति मिळेतोंपर्यंत 'तें कुत्रें आलें' असेंच स्पष्ट बिंदुयुक्त लिहावें हें चांगलें. 'ती कुत्री गेली', आणि 'तीं कुत्रीं गेलीं' यांतील भेद तर बिंदूवांचून दुसऱ्या कोणत्याही रीतीनें दाखवितां येतच नाहीं. तेव्हां, सर्वथा अनुनासिक बिंदूचा त्याग ही कांहीं चांगलीं सूचना नव्हे.

ऱ्हस्वदीर्घांविषयीं

शुद्ध मराठी शब्दांमध्यें 'आणि' हा एकच शब्द ऱ्हस्वान्त लिहिण्याचा संप्रदाय आहे. याविषयीं आमचा मतभेद नाहीं. कां कीं ऱ्हस्वाकडे याचा

कल असल्यामुळें, याचे संक्षेप 'नि' आणि 'णि' हेही ऱ्हस्वच आहेत. उदा. 'तो नि मी', 'चार नि पांच नऊ', 'तो णि हा', 'दहा णि पांच पंधरा, इत्यादि.

केव्हां केव्हां त्याचें दीर्घ णीयुक्त रूप 'अणीक' हेंही आढळतें. उ. 'त्यानें पंधरा रुपये दिले. अणीक ?' इत्यादि.

इतर कोणत्याही मराठी शब्दांच्या अंतीं इ उ असल्यास ते दीर्घ असतात. जसें, काठी, पोथी, लाडू, तंबाखू, इत्यादि.

जे कित्येक ऱ्हस्व इ–उ–कारांत संस्कृत शब्द मराठींत आले आहेत, ते सर्व दीर्घान्त लिहावे अशी या पत्रिकेच्या उत्पादकांची आणि दुसऱ्या कितेकांची सूचना आहे. आणि तिजप्रमाणें ते–परंतु, यद्यपि, तथापि, रुचि, कृति, भीति, साधु, विधु, इत्यादि शब्द दीर्घान्त लिहितात. पण ही सूचना आम्हाला मान्य नाहीं. कारण या सूचनेप्रमाणें वागूं लागल्यास घोटाळा उत्पन्न होणार. उदाहरणार्थ—कृति, रुचि हे दोनच शब्द घेऊन पाहूं: सूचनेप्रमाणें यांचीं कृती, रुची, अशीं नवीं रूपें सिद्ध झालीं; 'ईकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं प्रथमाबहुवचनें आणि बहुवचन सामान्यरूपें या लागून होतात,' या व्याकरणनियमाप्रमाणें या शब्दांचीं—

	एकवचन.	बहुवचन.
प्रथमा	कृती	? कृत्या
द्वितीया	कृतीस	? कृत्यांस; इ०
प्रथमा	रुची	? रुच्या
द्वितीया	रुचीस	? रुच्यांस इ०;

अशीं वेडगळ रूपें होऊं लागतील, आणि भाषेमध्यें सर्वच गोंधळ होऊन जाईल. बरें, हे शब्द दीर्घ तर करावे, पण सामान्य नियमाला अपवादक मानून, 'यांच्या विभक्तिसामान्यरूपीं कांहीं विकार होत नाहीं,'

असें लिहून ठेवावें म्हणजे झालें' असें जर म्हटलें, तर हे शब्द कोणते? यांचें परिगणनच करावें लागणार. आणि जे शब्द मुळीं संस्कृत असून ऱ्हस्वान्त होते, पण सांप्रत मराठींत दीर्घान्त झाले आहेत, ते या वर्गांत येतात, असें लिहून ठेवावें लागणार. पण इतका खटाटोप करण्यापेक्षां हे शब्द जशांचे तसे ऱ्हस्वान्त ठेवून सामान्यरूपीं मात्र दीर्घान्त होतात, हा नियम स्थिर ठेविला, तर यांत वाईट तें काय? संस्कृत शिकणारांना आयतें या शब्दांचें ज्ञान झालें असें होतें. याप्रमाणेंच **परंतु**, इत्यादि, हे शब्द दीर्घ करण्याचें देखील कांहीं कारण नाहीं. ऱ्हस्व ठेवणें हेंच बरें.

अनुनासिक, सामासिक, आधुनिक, मानसिक, इत्यादि संस्कृत शब्दांमध्यें उपान्त्य अक्षरें ऱ्हस्व आहेत, तीं दीर्घ करावीं अशी सूचना आहे. पण तीही आम्हांला संमत नाहीं. कारण कीं, अशा प्रकारें संस्कृत शब्दांचीं शुद्ध रूपें बिघडण्याचा कोणालाही अधिकार नाहीं.

सरकारी शाळापुस्तकांमध्यें नवीन आवृत्तिकारांनीं वर्तमान कृदंतें (धातुसाधित अव्ययें) **करित, मारित, लिहित,** इत्यादि प्रकारें उपांत्य ऱ्हस्वयुक्त केलीं आहेत. दादोबांनीं आपल्या व्याकरणामध्यें तीं अशींच दिलीं आहेत खरीं, पण व्यवहारामध्यें सांप्रत तीं अशीं नसतात. बसत, उठत, हसत, इत्यादिकांच्या उपांत्य स्थळीं असणारा अ स्वर जरी ऱ्हस्व म्हणतात, तरी त्याचा देखील उच्चार दीर्घ म्हणजे लांबटच होत असतो. मराठीमध्यें असा हा संवृत दीर्घ अ दाखविण्याला वेगळी खूण नाहीं. म्हणून तो लिहिण्यांत निरुपायामुळें ऱ्हस्वच येतो. तरी उच्चारामध्यें तो दीर्घच आहे. असें असतां, ज्याचीं ऱ्हस्व दीर्घ चिन्हें स्पष्ट वेगवेगळीं आहेत, त्या इ, उ स्वरांविषयीं देखील असा गोंधळ होणें बरें नाहीं. करीत, मारीत, लिहीत, इत्यादि प्रकारें उपांत्यदीर्घयुक्तच हे शब्द लिहावे हें योग्य.

अकारांत शब्दांच्या अंत्य अक्षराला कांहीं विकार झाल्यास उपांत्य ई ऊ ऱ्हस्व होतात, हा मराठींत सामान्य नियम आहे. जसें पीठ, पिठास; चूक, चुका, इत्यादि. पण प्रवीण, उदासीन, इत्यादि संस्कृत शब्दांना या प्रत्यय आणि वृद्धि होऊन जे **प्रावीण्य, औदासीन्य,** इत्यादि भाववाचक शब्द होतात त्यांना देखील मराठीचा नियम लावून त्यांतील उपान्त्य स्थानचा ई वर्ण ऱ्हस्व करून प्राविण्य, औदासिन्य, इत्यादि प्रकारचीं त्यांना रूपें देण्याचा संप्रदाय घालावा, अशी प्रस्तुत पत्रिकाकार पंडित-त्रयाची सूचना आहे. पण तीही अयोग्य, म्हणून आम्हांला मान्य नाहीं.

सहस्रावधि संस्कृत शब्दांशिवाय आणखी त्यांचे सहस्रावधि अपभ्रंश हे मराठी भाषेला उगमरूप किंबहुना केवळ जीवरूप होत. उ०—कर्ण–कान, पर्ण–पान, पानीय–पाणी, सर्प–साप, विद्युत्–वीज, गृह–घर, शाला–साळ, माला–माळ, इत्यादि. हे अपभ्रंश सोडून देऊन मराठींत मूळचीं संस्कृत रूपें मात्र योजावीं, असें कोणीही म्हणणार नाहीं, आणि म्हणतही नाहीं. हाच नियम आरबी, फारसी, इत्यादि परभाषांतून आलेल्या शब्दांच्या अपभ्रंशांच्या संबंधानेंही मानिला पाहिजे. मराठीमध्यें जीं त्यांचीं रूपें वहिवाटींत येऊन पक्कीं झालीं आहेत, तींच शुद्ध रूपें म्हटलीं पाहिजेत. तीं अशुद्ध म्हणून सोडून देतां येत नाहींत.

समजूतदार, जाहगीरदार, हकीकत, इत्यादि शब्दांतील शेवटच्या दोन अक्षरांपूर्वींचे ई ऊ ऱ्हस्व करण्याची सूचना पत्रिकाकर्त्यांनीं केली आहे. पण ही सूचना आग्रहाची दिसते. जर विकल्प ठेवायाचा नसेलच, तर आहेत तसे ते दीर्घयुक्तच ठेवावे. पण ऱ्हस्वयुक्त कोणी लिहितात म्हणून हवीं तर ऱ्हस्वयुक्त वैकल्पिक रूपेंही ठेवावीं, असें आम्हास वाटतें.

न ण–ल ळ.

या अक्षरांच्या संबंधानें मराठींत मोठीशी भानगड राहिली आहे असें दिसत नाहीं. अद्यापि **म्हनूण, मानसें, कारन, रावन, गोली, पली,**

पातेळें, इत्यादि प्रकारें विलक्षण उच्चार करणारे लोक बरेच आढळतात ही गोष्ट खरी आहे; तथापि शुद्ध मानिलेल्या लेखांमध्यें असलीं रूपें कोठें आढळल्याचें आम्हांला आठवत नाहीं. न, ण, ल, ळ, यांचीं नेमकीं स्थळें ठरलेलीं आहेत. संस्कृतप्रचुर प्रौढ भाषेमध्यें स्थल, मूल, कुल, बाल, इत्यादि लकारयुक्त शब्द येतात, पण त्यांपासून कांहीं गोंधळ दिसत नाहीं.

न ण यांचा विचार करितां त्यानें, त्याणें, त्यांनीं, त्यांणीं, यांचाही विचार येतो. तृतीयेचे प्रत्यय नें, नीं, हे सर्वत्र असतां, सर्वनामांमध्येंच णें, णीं हे कशाला? यास्तव ते काढून टाकावे, असा एक नियम सरकारी शालापुस्तकमालेमध्यें चालू आहे. त्याप्रमाणेंच हा, ही, हें, या सर्वनामांच्या ह्याला, हिला, ह्यांना, इत्यादि हकारयुक्त विभक्ति मात्र खऱ्या मानाव्या, हकार जाऊन राहिलेलीं याला, इला, यांना इत्यादि रूपें अशुद्ध मानावीं, असाही एक नियम चालू आहे. इतर पुस्तककार या दोन्ही नियमांची तितकी थोरवी मानीत नाहींत, आणि आतांच्या नव्या आवृत्तींमध्यें हे नियम मोडल्याचेंही आढळतें. या आणि दुसऱ्या कित्येक भाषापद्धतींच्या संबंधानें मागें पुष्कळ भवतिनभवति होऊन मोठे दोन पक्ष झाले होते. त्या वेळची भाषेची स्थिति वेगळी होती आणि वादाची पद्धतही अमळ विलक्षण होती; आणि दोहोंकडे आग्रही प्रकारही बराच होता. पण तो वाद आतां मागें पडून गेला, ही गोष्ट एका अर्थी बरीच झाली आहे. म्हणून मागील वाद पुनः उकरून न काढितां, सध्यां भाषेची स्थिति आहे तिजविषयींच विचार व्हावा हें चांगलें. अमुकानें चाळीस पंचेचाळीस वर्षांमागें अमुक ठरविलें होतें म्हणून अमुक चांगलें, आणि अमुक वाईट म्हणावें, असेंही कोणी सुचविलें आहे. पण हें म्हणणें “बाबावाक्यं प्रमाणं” म्हणण्यासारखें

होय. यास्तव सध्यां जी भाषेची स्थिति आहे तींच लक्षांत घेऊन या गोष्टीचा विचार करणें हेंच योग्य असें आम्हांस वाटतें. नें, णें, नीं, णीं, यास, ह्यास, इत्यादिकांतून एकेकच रूप ठेविल्यानें परभाषीयांना तितकी अधिक सोई होते, ही गोष्ट खरी आहे. पण भाषेचें अंगचें वळण, ज्यांची ती भाषा त्यांच्या बोलण्याची वहिवाट, इत्यादि गोष्टीही पाहणें अवश्य आहे. यासंबंधानें अशी एक शंका निघाली आहे कीं, अशानें देशी, कोंकणी, खानदेशी, मालवणी, इत्यादि जे अनेक प्रकार, त्या सर्वांचा समावेश करावा लागेल! आम्हांस वाटतें कीं, अशी भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. खानदेशी बायका ' कुकु ' म्हणतात; आणि मालवणी लोक ' भीत ' म्हणतात; तरी ' कुकु ' आणि ' भीत ' हे एकदेशीय शब्द आहेत, ' कुंकू ' आणि ' भिंत ' हेच सर्वमान्य शब्द होत; आणि आपला लेख सर्वमान्य व्हावा अशी इच्छा असल्यास तेथें सर्वमान्य भाषेचीच योजना केली पाहिजे, इतकें जर सर्वांना समजलें तर पुरे आहे. आतां सर्वमान्य किंवा निदानपक्षीं बहुमान्य तरी प्रकार कोणचा, हें पाहणें कठीण नाहीं. आमच्या मतें, ' अनेन ,' ' अस्य ,' इत्यादि संस्कृत शब्दांकडे लक्ष दिल्यास ' ह्याला ' पेक्षां 'याला' ची योग्यता उणी नाहीं. ' त्याणें, ' ' याणें, ' यांमध्यें देखील बालभाषेच्या संबंधानें पाहतां णकाराला टाकून देणें अमळ कठीण आहे. म्हणून अशा कित्येक स्थळीं वैकल्पिक रूपांना देखील थारा देणें अवश्य आहे असें आम्हांस वाटतें.

खुद्द पुण्यामध्यें 'कसें झालें' याच्या स्थानीं 'कसँ झालँ' किंवा नुसतें 'कस झाल' असे देखील म्हणतात. पण हाही एकदेशीय प्रकार होय. यापासून काय काय अडचणी येतात, हें मागें अनुनासिक प्रकरणाच्या अंतीं स्पष्ट केलेंच आहे. यास्तव सर्वांनीं 'कसें झालें' असेंच लिहावें, म्हणजे लेखामध्यें तरी सर्वत्र एकरूपता राहील. देशी लोकांमध्यें याचा

उच्चार 'कसे झाले' असा बहुतेक करितात, तोच उच्चार चालू ठेवण्याला देखील कांहीं अडचण नाहीं.

भपका, भबका इत्यादिकांमध्यें कोणता प्रकार चालू ठेवावा, असा एक प्रश्न आहे. याविषयीं आम्हांला वाटतें तें असें–यांतील प ब हीं अक्षरें लिहिण्यांत जरी प्‌अ ब्‌अ अशीं अकारयुक्त आहेत, तरी त्यांचा उच्चार एथें प् ब् असा केवळ व्यजंनवत् असतो. म्हणून पुढील अक्षर जर क ख, प फ या श्वास म्हणजे कठोर वर्णांपैकीं असलें, तर मधील अक्षराचा उच्चार स्वभावतः प सारखा होऊं पाहतो, आणि ही स्थिति नसेल तेथें ब सारखा होऊं पाहतो, हें सरळ दिसतें. तेथें कोणताही आग्रह धरण्याचें कारण नाहीं. संस्कृत संधि जाणणारांना तर ही गोष्ट सांगायला नकोच. अर्थात्--भपका, धपका, झुपका, ठिपका; आणि अजब, चोबदार, ताबडतोब, संजाब, पंजाब, इत्यादि प्रकारें लिहावें हें योग्य.

ताम्र, आम्र, इत्यादिकांमध्यें मूळचें ब अक्षर नसून अपभ्रंशांत ब् येऊन तांबें (ताम्बें), आंबा (आम्बा), ताम्रक–तांबडा, अम्लिका –अंबील, चर्मकार--चांभार, इत्यादि प्रकारें मराठी शब्द होतात. यावरून मराठीचा कल म् संगतीं ब् आणण्याचा दिसतो. म्हणून उंबरठा, ओंबण, कोंबट, चांबडें, चोंबडा, कोंबडा, ठुंबरी, डांबर, तंबाखू, तुडुंब, वांबळ, इत्यादि शब्दामध्यें ब् हा वर्ण येणें ही गोष्ट मराठीच्या स्वभावाला अनुकूळ दिसते. पोचट किंवा ठसठशीत उच्चाराकडे पाहण्याचें कारण नाहीं असें वाटतें.

तथापि इंबला, आणि लांबणदिवा यांपेक्षां इमला आणि लामणदिवा हे शब्द अधिक प्रचारांत आहेत असें आम्हांस वाटतें. पण याचें कारण मात्र स्पष्टपणें लक्षांत येत नाहीं.

'अव' या उपसर्गाचा संस्कृतामध्यें देखील संक्षेप होतो. प्राकृतामध्यें त्याच्या स्थळीं 'ओ' होतो. यावरून पाहतां, टवकारणें, दऊड, दऊत,

लवकर, यांपेक्षां **टौकारणें, दौड, दौत, लौकर,** यांकडे मराठीचा स्वाभाविक कल अधिक आहे असें दिसतें. सुगरण, सुग्रण; ज्वान, जवान; तकरार, तक्रार; यांतून अमकेच ग्राह्य म्हणणें अमळ कठीण आहे. 'दिढोतरा' यापेक्षां 'दिढोत्रा' अधिक लोकमान्य दिसतो. 'धोतर' या सर्वमान्य शब्दाच्या स्थळीं क्वचित् 'धोत्र' शब्द ऐकूं येतो; पण तो सर्वमान्य नाहीं.

यांत देखील मार्दव किंवा कार्कश्य यांचा कांहीं विशेष संबंध दिसत नाहीं. तसेंच लक्ष (चित्त किंवा ध्यान) हा शब्द नवा आहे, यास्तव 'लक्ष्य' असाच तो लिहावा, असें कित्येकांचें म्हणणें आहे; परंतु 'लक्ष्य' याचा अर्थ तरी उदाहरण, किंवा बाण मारण्याचें निशाण असा आहे. तेव्हां हा शब्द कदाचित् नवा असला तरी त्याज्य नव्हे असें आम्हांस वाटतें. तो शब्द संस्कृत नसेलच तर नसेना कां? मराठी मानण्याला तर कांहीं अडचण नाहींना?

याप्रमाणें तूर्त आम्हांस जे विचार सुचले, ते येथें प्रदर्शित केले आहेत. पत्रिकाकर्त्यांनी म्हटल्याप्रमाणेंच आम्हीही म्हणतो कीं, कोणत्याही प्रकारें अमुकच असलें पाहिजे आणि अमुकच खरें, असा आमचा आग्रह म्हणून नाहीं. सर्वांच्या विचारें जें योग्य ठरेल, त्याचा स्वीकार व्हावा हें योग्य आहे.

या सर्व गोष्टींचा विचार करितांना दोन अडीच हजार वर्षांच्यापूर्वी एका सर्वमान्य वैयाकरणानें एक गोष्ट लिहून ठेविली आहे, ती ध्यानांत घेणें अवश्य आहे. तो म्हणतो—एकाद्या मनुष्याला जर मडक्यांची गरज लागली तर तो कुंभाराकडे जाऊन म्हणतो, "कुंभारदादा, मडक्या-वांचून माझा स्वैपाक अडला आहे, यासाठीं मला मडकीं करून दे." आणि तीं मडकीं मिळत तोंपर्यंत त्याचें काम खरोखरी अडून राहतें.

पण कोणी मनुष्य एकाद्या वैयाकरणाकडे जाऊन, "पंडितदादा, भाषेवांचून माझें बोलणें अडलें आहे, मला भाषा बनवून द्या" असें त्यानें म्हटलें, किंवा पंडितदादावांचून त्याचें बोलण्याचें काम अडलें, असें होत नाहीं. त्याची भाषा कशी काय आहे हेंच पंडितदादांना शिकावें लागतें. **सारांश**, लोकांच्या व्यवहारांत जी भाषा आहे, तिला कांहीं मान म्हणून आहे. सर्वजनमान्य प्रकार कोणता, निदान बहुजनमान्य प्रकार तरी कोणता, हें वैयाकरणांनीं आणि ग्रंथकारांनीं लक्षांत घेणें अवश्य आहे.

पुस्तक २९, अंक ९, सप्टेंबर १८९८

'मराठी भाषेची लेखन पद्धति'

या विषयावर पुण्यांतील प्रसिद्ध पंडितत्रयानें आजपर्यंत बरेच लेख प्रसिद्ध केले आहेत. यासंबंधानें आमचे विचार आम्हीं यापूर्वीच स्पष्ट केले आहेत, त्यामध्यें अधिक उणें करण्याचें आम्हांला कांहीं विशेष कारण दिसत नाहीं. या विषयाची चर्चा होतां होतां शेवटीं उक्त पंडितत्रयाचीं मतें बरींच स्थिर झाल्यासारखीं दिसत आहेत. यांत विशेषतः ही गोष्ट लक्षांत धरण्यासारखी आहे कीं, 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' ही म्हण ध्यानांत घेऊन हें पंडितत्रय आपलाच हेका न धरितां इतरांच्या मतांचाही विचार करीत आहे. आणि एकंदरीनें पाहतां, मराठी लेखन पद्धतीचीं जी सद्यस्कस्थिति, तिजकडेसच त्यांचें पुनः मत वळत चाललें आहे, हें पाहून तितकें समाधान वाटतें. कांहीं थोड्या गोष्टींविषयीं अद्यापि त्यांचें मत अनिश्चित दिसतें; तथापि थोड्याच दिवसांत तेथेंही वाद नाहींसा होईल अशी आशा धरण्यास अवकाश आहे. ऱ्हस्व इ-उ-कारांत संस्कृत शब्दांचें स्वरूप दीर्घान्त करण्याविषयीं त्यांची बरीच

प्रवृत्ति दिसते, व तें तसें न करण्याला आम्हीं जीं कारणें दाखविलीं आहेत, तीं त्यांना कबूल नाहींतसें वाटतें. तसेंच कित्येक अकारांत शब्दांचे अपभ्रंश विसर्गहीन, आणि कित्येकांचे आकारान्त कां व्हावेत याविषयीं त्यांची समजूत होत नाहीं, असेंही भासतें.

यासंबंधानें आम्ही कित्येक वेळां लिहिलें आहे, म्हणून तूर्त अधिक लिहीत नाहीं; तरी कारण पडल्यास त्याकडे पुनः लक्ष देऊं. तथापि त्यांच्या मताचा स्वीकार केल्यास देखील, संस्कृत शब्द कोणते व निवळ मराठी कोणते हें जाणण्याची आवश्यकता मुळींच चुकत नाहीं, असें आम्हांस वाटतें. अनुस्वाराच्या संबंधानें याचा विचार अद्यापि अपुर्ता आहे असेंही म्हणणें प्राप्त आहे. असो. तूर्त इतकेंच पुरे.

पुस्तक ३०, अंक ३, मार्च १८९१

लहान मुलांकरितां

सुबोध व्याकरण

(स्वतंत्र पुस्तक)

शके १८०८; इसवीसन १८८६.

प्रस्तावना

या पुस्तकांत लहान मुलांना आवश्यक तितके सर्व विषय आणिले आहेत. तरी निरुपयोगी संज्ञा आणि अप्रयोजक नियम मुळींच दिले नाहींत. शब्दांचे भेद आणि उपभेद हे कारणापुरतेंच सांगितले आहेत. आवश्यक संज्ञा आणि त्यांचीं लक्षणें लहान मुलांना समजतील अशीं सरळ आणि थोडक्यांत दिलीं आहेत. पुस्तकाची भाषा अत्यंत सुगम योजिली आहे. विभक्तींचे आणि क्रियापदांचें जाल उकलून त्यांतील गुंतागुंत समूळ काढून टाकली आहे. वाक्ययोजनेचे नियम स्पष्ट केले आहेत; आणि मराठीभाषेंत येणाऱ्या कित्येक प्रयोगांची नीट व्यवस्था लावतां येत नाहीं अशी जी हाकाटी होती, ती दूर करण्याचा होईल तितका प्रयत्न केला आहे. आणि पुस्तकाचें अक्षर ठळक योजलें आहे.

लहान मुलांना, विनाकारण त्रास न व्हावा म्हणून, संधिप्रकरण हें अगदीं शेवटीं समासप्रकरणाच्या जवळ दिलें आहे. द्वितीया आणि चतुर्थी यांतील काल्पनिक भेद सोडून देऊन त्यांचे वेगवेगळे प्रत्यय दिले आहेत. तसेंच **कर्तरि, कर्मणि, भावी** किंवा **भावे**, आणि प्रयोग या विलक्षण संज्ञा न योजतां, त्यांच्या स्थळीं **कर्त्याचें, कर्माचें,** आणि **क्रियेचें प्राधान्य**, इत्यादि संज्ञा दिल्या आहेत. '**आख्यात**' हा एक एक फार उपयोगी शब्द प्रचारांत आणला आहे. तसेंच **उत्तम, मध्यम, अन्य, पुरुष**, या प्राचीन रीतीला मिळत्या संज्ञा यांत योजिल्या आहेत. याविषयीं कोणीही विचारी जन मला दूषण देणार नाहींत, अशी आशा धरितों.

हें पुस्तक जितकें व्हावें, तितकें चांगलें झालें नसेल हें उघड आहे. तथापि लहान मुलांना व्याकरणाचा अभ्यास करतांना, जर यापासून पूर्वीच्या पुस्तकांपेक्षां कांहीं तरी अधिक उपयोग झाला, तर माझे श्रम व्यर्थ गेले नाहींत, असें मी समजेन.

—सुबोध व्याकरण—

अ	इ	उ	ऋ	ऌ
आ	ई	ऊ	ॠ	ॡ
ए	ऐ	ओ	औ	
क्	ख्	ग्	घ्	ङ्
च्	छ्	ज्	झ्	ञ्
ट्	ठ्	ड्	ढ्	ण्
त्	थ्	द्	ध्	न्
प्	फ्	ब्	भ्	म्
य्	र्	ल्	व्	
श्	ष्	स्	ह्	ळ्

ं (अनुस्वार) : (विसर्ग)

यांना **वर्ण** म्हणतात. वर्ण म्हणजे भाषेंतील अगदी साधे ध्वनि. वर्णांचे भेद चार,—**स्वर, व्यंजनें, अनुस्वार, विसर्ग.**

स्वर.

स्वर म्हणजे नुसते सूर. अ पासून औ पर्यंत स्वर. ते चौदा आहेत. स्वरांचे भेद दोन, **ह्रस्व** आणि दीर्घ.

ऱ्हस्व म्हणजे तोकडा. दीर्घ म्हणजे लांब.

अ	इ	उ	ऋ	ऌ – हे ह्रस्व स्वर
आ	ई	ऊ	ॠ	ॡ – हे दीर्घ स्वर
ए	ऐ	ओ	औ –	हे ही दीर्घ स्वर. यांनाच संधिस्वर म्हणतात.

व्यंजनें.

व्यंजनें म्हणजे स्वरांच्या आश्रयानें राहणारे भरतीचे वर्ण. क् पासून ळ् पर्यंत व्यंजनें. तीं चौतीस आहेत.

नुसता स्वर, अथवा व्यंजनाशीं युक्त स्वर, याला अक्षर म्हणतात.

क् या व्यंजनाला अ जोडला असतां क असें अक्षर होतें. व्यंजनाखालचा फांटा काढून टाकला म्हणजे, याला 'अ' जोडला आहे, असें समजावें.

क् याला

आ	जोडला असतां	का
इ	...	कि
ई	...	की
उ	...	कु
ऊ	...	कू
ऋ	...	कृ
ॠ	...	कॄ
ऌ	...	क्ऌ
ॡ	...	क्ॡ
ए	...	के
ऐ	...	कै
ओ	...	को
औ	...	कौ

कोणत्याही अक्षराला अनुस्वार विसर्ग जोडतां येतात. जसें,— अं, किं, अः, छिः.

जो वर्ण उच्चारण्याला नाकाचें साहाय्य लागतें, तो अनुनासिक. जसें—आँ, ऊँ, एँ, काँ, इत्यादि. लिहितांना बहुशः अनुनासिक दाखविण्याला ं अनुस्वारच लिहितात. पण त्यांतील भेद नीट ध्यानांत ठेवावा. ङ् ञ् ण् न् म् हीं व्यंजनेंही अनुनासिक आहेत.

जोडाक्षरें.

दोन किंवा अधिक व्यंजनें एकत्र आलीं, तर त्यांना **संयोग** म्हणतात. जसें क् ट् मिळून क्ट् इत्यादि. संयोगापुढें स्वर आला, तर त्या सर्वांला मिळून **संयुक्ताक्षर** अथवा जोडाक्षर म्हणतात. जसें—

क्	ट्		अ	मिळून	क्ट
श्	र्		ई	...	श्री
क्	ष्		अ	...	क्ष
ज्	ञ्		अ	...	ज्ञ
स्	त्	र्	ई	...	स्त्री

लिहितां लिहितां पुष्कळ जोडाक्षरांची आकृति अगदीं वेगळ्या प्रकारची झाली आहे. ती नीट ध्यानांत ठेवावी.

शब्द.

ज्या ध्वनीपासून म्हणजे आवाजापासून कांहीं अर्थ समजतो, तो **शब्द**. जसें घर, राजा, पृथ्वी इत्यादि. एक अथवा अनेक वर्णांचा शब्द होतो. भाषा म्हणजे बोलणें.

भाषेमध्यें येणारा शब्द तें पद. ‘ तो मुलगा पुस्तक वाचतो. ’ हीं चार पदें आहेत.

ज्या एका शब्दापासून निरनिराळीं अनेक पदें होतात, तो मूळ शब्द. जसें—पुस्तकाला, पुस्तकानें, पुस्तकांत, यांचा मूळ शब्द ‘पुस्तक’.

मूळ शब्द चार प्रकारचे आहेत,—नाम, विशेषण, अव्यय आणि धातुशब्द.

नाम म्हणजे कशाचेंही नांव. जसें--मुलगा, पुस्तक, मन, इत्यादि.

नामाचा अर्थ वाढविणारा जो शब्द तें **विशेषण**. जसें—चांगला मुलगा, दोन पुस्तकें, इत्यादि.

ज्या शब्दापासून निरनिराळीं पदें होत नाहींत, तें अव्यय. जसें— लौकर, कोठें, आणि, इत्यादि.

स्थिति किंवा व्यापार दाखविणाऱ्या पदाचें जें मूळ, तो **धातुशब्द**; जसें—अस, जा, ये, इत्यादि. हे असतो, जातो, येतो, इत्यादिकांचे धातुशब्द आहेत.

नाम.

नामाच्या जाती पांच आहेत. **सामान्य, विशेष, भाववाचक, क्रियावाचक,** आणि **सर्वनाम.**

सामान्यनाम म्हणजे कोणेका जातीच्या कोणत्याही वस्तूला लागणारें नांव. जसें,—घोडा, मनुष्य, इ०.

विशेषनाम म्हणजे नेमक्या एकाच वस्तूचें नांव. जसें—विष्णु, गंगा, मुंबई, इ०.

भाववाचकनाम म्हणजे पदार्थाच्या गुणाचें अथवा धर्माचें नांव. जसें,—मनुष्यपणा, सौंदर्य, इ०.

क्रियावाचकनाम म्हणजे कांहीं व्यापाराचें नांव. जसें,—जाणें, बसणें, येणें, इ०.

सर्वनाम म्हणजे कोणत्याही नामाच्या स्थळीं योजतां येणारें नांव. जसें,—मी, तूं, तो, इ०.

लिंगविचार.

हें नांव पुरुषाचें, आणि हें नांव स्त्रीचें, असा जो भेद तें लिंग.

लिंगें तीन आहेत,—**पुल्लिंग, स्त्रीलिंग,** आणि **नपुंसकलिंग.**

पुरुषाचें, अथवा पुरुषाप्रमाणें मानलेल्या वस्तूचें नांव तें **पुल्लिंग** जसें,—राजा, मुलगा, समुद्र, पर्वत, इ०.

स्त्रीचें, अथवा स्त्रीप्रमाणें मानलेल्या वस्तूचें नांव तें **स्त्रीलिंग.** जसें, —राणी, मुलगी, नदी, टेकडी, इ०.

जें नांव पुल्लिंगही नव्हे, आणि स्त्रीलिंगही नव्हे, तें **नपुंसकलिंग.** जसें,—झाड, पाणी, तळें, इत्यादि.

स्त्री किंवा पुरुष हा भेद ध्यानांत न आणतां योजलेलें जें नांव, तेंही नपुंसकलिंग. जसें,—मूल, कुत्रें, घोडें, इ०.

लिंगभेद स्पष्ट करण्याकरितां, पुल्लिंग नामाच्या पूर्वी 'तो,' स्त्रीलिंग नामाच्यापूर्वी 'ती,' आणि नपुंसक नामाच्या पूर्वी 'तें,' हे शब्द लावितात. जसें—**तो समुद्र, ती नदी,** तें पाणी, इ०.

निर्जीव पदार्थांच्या नांवांचा लिंगभेद.

१ अंगरखा, सोटा, वाडा, इत्यादि आकारांत शब्द पुल्लिंग.
२ पागा, हवा, मजा, रजा, सजा, हे शब्द स्त्रीलिंग.
३ आज्ञा, विद्या, प्रभा, ममता, इत्यादि संस्कृतशब्द स्त्रीलिंग.
४ आत्मा, प्रेमा, महिमा, गरिमा, हे पुल्लिंग.
५ नदी, वेणी, काठी, छत्री, बढाई, मर्जी, इत्यादि ईकारांत शब्द स्त्रीलिंग.
६ गति, मति, स्तुति, रीति, भीति, बुद्धि, वृद्धि, इत्यादि स्त्रीलिंग.
७ कर्मणूक, वागणूक, जेवणावळ, पत्रावळ, इत्यादि स्त्रीलिंग.
८ तळमळ, कळमळ, कटकट, पळापळ, आरडाओरड, इत्यादि स्त्रीलिंग.
९ चकचकाट, खणखणाट, सणसणाट, इत्यादि पुल्लिंग.
१० गुरुत्व, महत्त्व, देवपण, लाघव, गौरव, इत्यादि नपुंसकलिंग.
११ दहीं, दूध, पाणी, लोणी, तेल, तूप, हे नपुंसकलिंग.

क्षुद्र जंतूंच्या नांवांचा लिंगभेद.

१२ मासा, नाकतोडा, विंचू, काडू, तारू, साप, मगर, इत्यादि पुल्लिंग.
१३ माशी, मुंगी, पाल, घोरपड, सुसर, घोण, ऊ, पिसू, जळु, इत्यादि स्त्रीलिंग.
१४ चिलट, मुरकट, पिंगाणें, घुंगुरटें, इत्यादि नपुंसकलिंग.

कित्येक शब्दांचें लिंग केवळ प्रचारावरून जाणावें. जसें,—तो पाऊस, ती वीट, तें घर, इत्यादि.

कित्येक पुल्लिंग नामांवरून अन्यलिंगीं नामें जाणतां येतात. जसें,—

पुल्लिंग	स्त्रीलिंग	नपुंसकलिंग
घोडा	घोडी	घोडें
कुत्रा	कुत्री	कुत्रें

पु॰.	स्त्री॰.	पु॰.	स्त्री॰.
काका	काकी	सिंह	सिंहीण, सिंही
मामा	मामी	धोबी	धोबीण
वाघ	वाघीण	भाट्या	भाटीण इ॰.

कित्येक पुल्लिंग नामांच्या जोडीचीं स्त्रीलिंग नामें वेगळींच असतात. जसें,—

राजा	राणी	सासरा	सासू
नवरा	बायको, नवरी	बाप	आई
दीर	जाऊ	मोर	लांडोर इ॰.

विभक्ति.

एका मूळशब्दापासून जीं अनेक पदें होतात त्या **विभक्ति.** विभक्ति आठ आहेत. **प्रथमा** म्हणजे पहिली, **द्वितीया** म्हणजे दुसरी, **तृतीया,** म्हणजे तिसरी, **चतुर्थी** म्हणजे चौथी, **पंचमी** म्हणजे पांचवी, **षष्ठी** म्हणजे सहावी, **सप्तमी** म्हणजे सातवी, आणि **संबोधन** म्हणजे हाक मारण्याची.

एकवचन आणि **अनेकवचन** असे एकेका विभक्तीचे दोन दोन भेद आहेत.

एकवचन म्हणजे एक वस्तु दाखविणारा शब्द, आणि **अनेकवचन** म्हणजे दोन किंवा अधिक वस्तु दाखविणारा शब्द. जसें,—**काठी** हें एकवचन, आणि **काठया** हें अनेकवचन.

शब्दाला कांहीं निमित्तानें अधिक अक्षर किंवा वर्ण लागतो, तो प्रत्यय.

विभक्तींचे प्रत्यय.

विभक्ति	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	—	—
द्वितीया	ला (स)	ना (ला, स)
तृतीया	नें	नीं (हीं)
चतुर्थी	साठीं	साठीं
पंचमी	हून (ँतून)	हून (ँतून)
षष्ठी	चा	चा
सप्तमी	ँत	ँत
संबोधन	—	नो

अनेकवचन प्रत्ययांपूर्वी शब्दाचा अंत्य स्वर अनुनासिक होतो.

विभक्तींचे वर्ग पांच आहेत.

वर्ग पहिला.

—हत्ती शब्द—

विभक्ति	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	हत्ती	हत्ती
द्वितीया	हत्तीला	हत्तींना
तृतीया	हत्तीनें	हत्तींनीं
चतुर्थी	हत्तीसाठीं	हत्तींसाठीं
पंचमी	हत्तीहून	हत्तींहून
षष्ठी	हत्तीचा	हत्तींचा
सप्तमी	हत्तींत	हत्तींत
संबोधन	हत्ती	हत्तींनो

याप्रमाणें काका, दादा, रावोबा, रावजी, दंडी, पांडू, काजू, पेरू, देवी, आबरू, टाहो, लाहो, खो, ढ, इत्यादिकांचीं रूपें जाणावीं. यांत प्रत्ययांच्या निमित्तानें शब्दाला कांहीं विकार होत नाहीं.

वर्ग दुसरा.

भिंत शब्द

(यांत विभक्तिकार्य ई.)

प्र.	भिंत	भिंती
द्वि.	भिंतीला	भिंतींना
तृ.	भिंतीनें	भिंतींनीं
च.	भिंतीसाठीं	भिंतींसाठीं
पं.	भिंतीहून	भिंतींहून
ष.	भिंतीचा	भिंतींचा
स.	भिंतींत	भिंतींत
सं.	भिंती	भिंतींनो

याप्रमाणेंच रीत, गत, चाल, साल, इत्यादि बहुतेक अकारांत स्त्रीलिंगी शब्दांचीं रूपें जाणावीं.

विभक्तिप्रत्ययांपूर्वी शब्दांचें जें नेमकें रूप होतें, त्याला **सामान्यरूप** म्हणतात. ‘ भिंत ’ याचें सामान्यरूप ‘ भिंती ’. ‘ हत्ती ’ याचें सामान्यरूप ‘ हत्ती ’ हेंच. अनेकवचनीं सामान्यरूपाचा अंत्य स्वर अनुनासिक असतो. जसें—भिंतीं, हत्तीं, इ.

वर्ग तिसरा.

साधु शब्द

(यांत प्रत्ययांपूर्वी दीर्घ)

प्र.	साधु	साधु
द्वि.	साधूला	साधूंना इ०

याप्रमाणें गिरि, रुचि, दधि, गुरु, धेनु, मधु, इत्यादि ऱ्हस्व इकारांत उकारांत संस्कृत शब्दांचीं रूपें जाणावीं.

वर्ग चौथा.

(यांत मुख्य कार्य आ.)

१. रथ शब्द (पुल्लिंग)

प्र.	रथ	रथ
द्वि.	रथाला	रथांना इ०.

याप्रमाणें वृक्ष, सूर्य, पर्वत, वाघ, इत्यादि पुल्लिंग शब्दांचीं रूपें जाणावीं.

परभू, वाटसरू, तट्टू, यात्रेकरू, इत्यादि कांहीं शब्दांचीं रूपें परभाला, परभूला; वाटसराला, वाटसरूला; इत्यादि दोन दोन प्रकारचीं होतात.

२ घर शब्द (नपुंसक)

प्र.	घर	घरें
द्वि.	घराला	घरांना इ०.

याप्रमाणें झाड, पान, लिंबू, कुसूं, पांखरूं, तट्टूं, इत्यादि नपुंसक शब्दांचीं रूपें जाणावीं.

३ धार शब्द (स्त्रीलिंग)

धार	धारा
धारेला	धारांना इ०.

याप्रमाणें अटक, अडक, इत्यादि कित्येक अकारांत स्त्रीलिंग; आणि विद्या, गंगा, हवा, इत्यादि आकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं रूपें जाणावीं.

वर्ग पांचवा.

(मुख्य कार्य या किंवा वा)

या.

१ कोल्हा शब्द (पुल्लिंग.)

प्र.	कोल्हा	कोल्हे
द्वि.	कोल्ह्याला	कोल्ह्यांना इ०.

याप्रमाणें आंबा, वाडा, घोडा, इत्यादि आकारांत पुल्लिंग शब्दांचीं रूपें जाणावीं.

२ धनी शब्द (पुल्लिंग.)

प्र.	धनी	धनी
द्वि.	धन्याला	धन्यांना इ.

याप्रमाणें शास्त्री, वाणी, तेली, इ.

३ मोतीं शब्द (नपुंसक.)

प्र.	मोतीं	मोत्यें, मोतीं
द्वि.	मोत्याला	मोत्यांना इ.

याप्रमाणें पाणी, लोणी, दहीं, इत्यादि; पण यांचीं अनेकवचनें व्यवहारांत येत नाहींत.

४ तळें शब्द (नपुंसक.)

प्र.	तळें	तळीं
द्वि.	तळ्याला	तळ्यांना इ०.

याप्रमाणें कडें, पागोटें, घोडें, कुत्रें, इ०.

५ काठी शब्द (स्त्रीलिंग.)

प्र.	काठी	काठ्या
द्वि.	काठीला	काठ्यांना इ०.

याप्रमाणें नदी, सुपारी, वाटी, इ०.

वा.

१ गहूं शब्द (पुल्लिंग.)

प्र.	गहूं	गहूं
द्वि.	गव्हाला	गव्हांना इ०.

याप्रमाणें भाऊ (म्हणजे बंधु या अर्थाचा) शब्द.

२ नातू शब्द (पुल्लिंग.)

प्र.	नातू	नातू
द्वि.	नातवाला	नातवांना इ०.

लाडू, नारू, पणतू, विस्तू, साडू, विंचू, काडू, इत्यादिकांचीं रूपें लाडवाला, लाडूला; नारवाला, नारूला; अशीं दोन दोन प्रकारचीं होतात.

३ तारूं शब्द (नपुंसक.)

प्र.	तारूं	तारवें
द्वि.	तारवाला	तारवांना इ०.

याप्रमाणें गळूं, आसूं, कुंकूं, इत्यादि. ' कुंकूं ' शब्दाला अनेकवचन नाहीं.

४ सासू शब्द (स्त्रीलिंग.)

प्र.	सासू	सासू, सासवा
द्वि.	सासूला, सासवेला	सासूंना, सासवांना इ०.

याप्रमाणेंच वाळू, दारू, टाळू, जाऊ, पाऊ यांचीं रूपें जाणावीं. पिसू याचीं रूपें—पिसू, पिसा, पिसवा; पिसूला, पिसेला, पिसवेला; पिसांना, पिसवांना इ.

(एकाक्षरी)

१ बी शब्द (स्त्रीलिंग.)

प्र.	बी	बिया
द्वि.	बीला, बियेला	बियांना इ०.

याप्रमाणेंच स्त्री शब्द.

२ बीं शब्द (नपुंसक.)

प्र.	बीं	बियें
द्वि.	बियाला	बियांना इ०.

३ पू शब्द (पुल्लिंग.)

प्र.	पू	पू
द्वि.	पुवाला	पुवांना इ०.

याप्रमाणेंच रू शब्द.

४ जूं शब्द (नपुंसक.)

प्र.	जूं	जुवें
द्वि.	जुवाला	जुवांना इ०.

५ ऊ शब्द (स्त्रीलिंग.)

प्र.	ऊ	उवा
द्वि.	ऊला, उवेला	उवांना इ०.

बायको शब्द.

प्र.	बायको	बायका
द्वि.	बायकोला	बायकांना इ०.

आते शब्द.

प्र.	आते	आता
द्वि.	आतेला	आतांना इ०.

वन्सें शब्द.

प्र.	वन्सें	वन्सें, वन्सा
द्वि.	वन्सेला	वन्सेंना, वन्सांना इ०.

'वन्सें' हा शब्द प्रायः अनेकवचनींच येतो; एकवचनीं क्वचित्.

सर्वनाम.

मी, तूं, तो, हा, जो, कोण, काय, आपण, हीं सर्वनामें होत.

'मी' याला **उत्तमपुरुष,** 'तूं' याला **मध्यमपुरुष,** आणि इतर नामसर्वनामांला **अन्यपुरुष,** हीं नांवें आहेत. यांनाच प्रथमपुरुष, द्वितीयपुरुष, तृतीयपुरुष, असें म्हणतात.

मी, तूं, कोण, काय, आपण,–हे शब्द तीन्ही लिंगीं समान आहेत. तो, हा, जो, पुल्लिंग; यांच्या जोडीचे ती, ही, जी, स्त्रीलिंग; आणि तें, हें, जें, नपुंसक शब्द होतात.

सर्वनामांच्या विभक्ति.

'मी'

विभक्ति	एकवचन	अनेकवचन
प्र.	मी	आम्ही
द्वि.	मला	आम्हांला
तृ.	मी, म्या	आम्ही
च.	मजसाठीं	आम्हांसाठीं
पं.	मजहून	आम्हांहून
ष.	माझा	आमचा
स.	माझ्यांत, मजमध्यें	आमच्यांत

सर्वनामास संबोधन नसतें.

'तूं'

विभ.	एकव.	अनेकव.
प्र.	तूं	तुम्ही
द्वि.	तुला	तुम्हांला
तृ.	तूं, त्वां	तुम्ही
च.	तुजसाठीं	तुम्हांसाठीं
पं.	तुजहून	तुम्हांहून
ष.	तुझा	तुमचा
स.	तुझ्यांत, तुजमध्यें	तुम्हांत

'तो'

विभ.	एकव.	अनेकव.
प्र.	तो	ते

द्वि.	त्याला	त्यांना
तृ.	त्यानें–णें	त्यांनीं–णीं
च.	त्यासाठीं	त्यांसाठीं
पं.	त्याहून	त्यांहून
ष.	त्याचा	त्यांचा
स.	त्यांत	त्यांत

याप्रमाणेंच ' जो ' शब्दाचीं रूपें जाणावीं.

' ती '

प्र.	ती	त्या
द्वि.	तिला	त्यांना
तृ.	तिनें–णें	त्यांनीं–णीं
च.	तिजसाठीं	त्यांसाठीं
पं.	तिजहून	त्यांहून
ष.	तिचा	त्यांचा
स.	तींत	त्यांत

(पुल्लिंगाप्रमाणें)

याप्रमाणेंच ' जी ' शब्दाचीं रूपें जाणावीं.

' तें '

प्र.	तें	तीं
द्वि.	त्याला	त्यांना

पुढील रूपें पुल्लिंगाप्रमाणें.

याप्रमाणेंच ' जें ' शब्दाचीं रूपें जाणावीं.

' हा '

प्र.	हा	हे
द्वि.	याला, ह्याला	यांना, ह्यांना

तृ.	यानें--णें, ह्यानें--णें	यांनीं--णीं, ह्यांनीं--णीं
च.	यासाठीं, ह्यासाठीं	यांसाठीं, ह्यांसाठीं
पं.	याहून, ह्याहून	यांहून, ह्यांहून
ष.	याचा, ह्याचा	यांचा, ह्यांचा
स.	यांत, ह्यांत	यांत, ह्यांत

'ही'

प्र.	ही	या, ह्या
द्वि.	इला, हिला	अनेकवचनी द्वितीयेपासून पुढील रूपें पुल्लिंगाप्रमाणें.
तृ.	इनें--णें, हिनें--णें	
च.	इजसाठीं, हिजसाठीं	
पं.	इजहून, हिजहून	
ष.	इचा, हिचा	
स.	ईंत, हींत	

'हें'

प्र.	हें	हीं
द्वि.	याला, ह्याला	यांना, ह्यांना

पुढील रूपें पुल्लिंगाप्रमाणें जाणावीं.

'कोण'

प्र.	कोण	कोण
द्वि.	कोणाला	कोणाला
तृ.	कोणीं	कोणीं
च.	कोणासाठीं	कोणांसाठीं
पं.	कोणाहून	कोणांहून
ष.	कोणाचा	कोणांचा
स.	कोणांत	कोणांत

'काय'

प्र.	काय	काय
द्वि.	कशाला	कशांना
तृ.	कशानें	कशांनीं
च.	कशासाठीं	कशांसाठीं
पं.	कशाहून	कशांहून
ष.	कशाचा	कशांचा
स.	कशांत	कशांत

'आपण'

प्र.	आपण	आपण
द्वि.	आपणाला	आपणांला
तृ.	आपण	आपण
च.	आपणासाठीं	आपणांसाठीं
पं.	आपणाहून	आपणांहून
ष.	आपला	आपला
स.	आपणांत	आपणांत

यात **'आपणा'** याच्या स्थानीं 'आपल्या' असेंही क्वचित् सामान्यरूप होतें. 'आपला' या शब्दाचेंही सामान्यरूप असेंच.

विशेषणें.

विशेषणाचे भेद दोन, **संख्यावाचक** आणि **गुणवाचक**.

एक, दोन, तीन इत्यादि **संख्यावाचक** विशेषणें.

चांगला, बरा, लहान, मोठा, काळा, तांबडा, इत्यादि **गुणवाचक** विशेषणें.

विशेषणांच्या विभक्ति.

'एक'

(याला एकवचन मात्र आहे.)

पु. न. लिं. एक, एकाला, एकानें, इ.

स्त्रीलिंग. एक, एकीला, एकीनें, इ.

पुढील शब्द तीन्ही लिंगीं समान. ह्यांना एकवचन नाहीं.

दोन, दोहोंला, दोहोंनीं इ.

तीन, तिहींला, तिहींनीं इ.

चार, चोहोंला, चोहोंनीं इ.

पांच, पांचांना, पांचांनीं इ.

गुणविशेषणाला विभक्ति प्रायः नामाप्रमाणेंच लागतात. जसें—

चांगला, चांगले, चांगल्याला, चांगल्यांना, इ.

चांगली, चांगल्या, चांगलीला, चांगल्यांना, इ.

चांगलें, चांगलीं, चांगल्याला, चांगल्यांना, इ.

अकारांत, ईकारांत ऊकारांत, विशेषणें तीन्ही लिंगीं समान असतात. त्यांना प्राय: विभक्ति लागत नाहींत. क्वचित् लागल्याच, तर नामाप्रमाणें लागतात. जसें—

पु. न. मूर्ख, मूर्ख, मूर्खाला, मूर्खानें, मूर्खांनीं, इ.

स्त्री. मूर्ख, मूर्खेला, मूर्खेनें, मूर्खांनीं, इ.

तीन्ही लिं. कडू, कडू, कडूला, कडूनें, कडूंनीं, इ.

ध्यानांत ठेवण्याचे नियम.

(संस्कृत किंवा परभाषांतील शब्दांना हे लागत नाहींत.)

१ सध्यांच्या निवळ मराठी शब्दांमध्यें 'सी' आणि 'स्या' हीं अक्षरें नाहींत. त्यांच्या स्थानीं 'शी' आणि 'शा' हीं अक्षरें येतात. जसें—असा, असें, अशी, अशानें, इ.

परंतु संस्कृत शब्द **सीता, सीमा, शील, काशी,** इत्यादिकांत **स, श,** असतील तसेच ठेवावे.

२ अंत्य अक्षर ऱ्हस्वाचें दीर्घ झालें, तर त्याच्या मागचे दीर्घ ई, ऊ, ऱ्हस्व होतात. जसें--पीठ, पिठाला; चूल, चुली; समजूत, समजुती; इ.

तीन अक्षरी--वटीक, **वटकी**; परीट, **परटीण**.

पण विहीण, **विहिणी**; माहूत, **माहुतीण**, सुईण, **सुइणी, सुयणी**; देऊळ, देउळें, देवळें, इ.

अव्यय.

ज्या शब्दापासून निरनिराळीं पदें होत नाहींत, म्हणजे लिंग, वचन, विभक्ति, यांमुळें ज्याला विकार होत नाहीं, तें अव्यय.

अव्ययांचे भेद चार,-- १ पदार्थक, २ प्रत्ययार्थक, ३ वाक्यार्थक, आणि ४ संयोजक. यांनाच १ क्रियाविशेषण, २ शब्दयोगि, ३ उद्गारवाचि आणि ४ उभयान्वयि, असें म्हणतात.

१ पदार्थक अव्ययांचे पोटभेद चार. एथें, तेथें, कोठें, जवळ, वर, इत्यादि स्थलबोधक. आतां, उद्यां, केव्हां, एव्हां, इत्यादि कालबोधक. कां, कारणबोधक. फटकन्, झटदिशीं, इत्यादि रीतिबोधक.

२ प्रत्ययार्थक अव्ययें,—पाशीं, कडून, शीं, करितां, मुळें, पेक्षां, विषयीं, वर, खालीं, इत्यादि.

३ वाक्यार्थक अव्ययें,—अरेरे, वाहवा, धन्य, छीः, इत्यादि.

४ संयोजक अव्ययें,—आणि, अथवा, किंवा, म्हणून, कीं, कांकीं कारण, कारणकीं, इत्यादि.

धातुशब्द

धातुशब्दाच्या विभक्तीला **आख्यात** अथवा **क्रियापद** म्हणतात.

धातुशब्द दोन प्रकारचे--**सकर्मक** आणि **अकर्मक.**

जो कोणी कांहीं करितो, तो त्या क्रियेचा **कर्ता**. जसें–'मुलगा खेळतो.' यांत खेळतो कोण? तर मुलगा. म्हणून **मुलगा** हा कर्ता.

कर्त्याची क्रिया ज्याला घडते, तें **कर्म**. जसें–'नारायण पोथी वाचतो.' यांत नारायण वाचतो काय? तर पोथी. म्हणून **पोथी** हें कर्म.

ज्या धातुशब्दानें दाखविलेल्या क्रियेला कर्म असतें, तो **सकर्मक**. जसें–खा, सांग, दे, इत्यादि.

ज्या धातुशब्दानें दाखविलेल्या क्रियेला कर्म लागत नाहीं, तो **अकर्मक** जसें–ये, बस, चाल, इत्यादि.

आख्यातें आठ. प्रत्येक आख्याताचीं, प्राधान्य, पुरुष, लिंग, वचन, यांवरून रूपांतरें होतात.

प्राधान्य तीन प्रकारचें असतें. कर्त्याचें, कर्माचें आणि क्रियेचें.

ज्या क्रियापदामध्यें कांहीं **करणें** हा अर्थ प्रबळ असतो, त्यांत **कर्त्याचें** प्राधान्य. जसें,—हरि धांवतो; तो पोथी लिहितो; इ०. यालाच **कर्तृप्रधान** क्रियापद म्हणावें.

ज्या क्रियापदामध्यें कोणी दुसऱ्यानें केलेली क्रिया **भोगणें** हा अर्थ प्रबळ असतो, त्यांत **कर्माचें** प्राधान्य. जसें,–काम करावें; घोडा आणिला; इ० यालाच **कर्मप्रधान** क्रियापद म्हणावें.

ज्या क्रियापदामध्यें केवळ क्रियेचाच अर्थ प्रबळ असतो, त्यांत **क्रियेचें** प्राधान्य. जसें,–बसावें, जावें, इत्यादि. यालाच **भावप्रधान** क्रियापद म्हणावें.

सकर्मक धातूंचीं **व**–प्रत्ययांत आणि **ल**–प्रत्ययांत रूपें मात्र **कर्मप्रधान**. त्यांचीं इतर रूपें; आणि अकर्मक धातूंचीं सर्व रूपें **कर्तृप्रधान**.

भावप्रधान रूपें वेगळीं शिकायाला नकोत. तीं यांतच येतात. सकर्मकांचीं **व–ल**–प्रत्ययांत आणि अकर्मकांचीं **व**–प्रत्ययांत, तृतीयपुरुषीं नपुंसकलिंगीं एकवचनीं जीं रूपें, तींच प्रसंगीं **भावप्रधान** होतात. वाक्य-योजनेवरून त्यांचा भेद समजतो.

सामान्य नियम.

१. लिही, पी, धू, भी, इत्यादि धातूंपुढें दीर्घाक्षरी प्रत्यय आला, तर त्यांचे अंत्य ई ऊ ऱ्हस्व होतात. जसें,–लिहिलें, पितो, धुणार, भितो, इ०.

२. दीस, शीक, चूक, इत्यादि धातूंपुढें कोणताही प्रत्यय आला, तर त्यांतील ई ऊ ऱ्हस्व होतात. जसें,—दिसतो, शिकत, चुकला, लुटलें, इ०.

क्रियापदाची रूपावली.

प्रथम आख्यात.

(याचा अर्थ वर्तमान अथवा रीतिवर्तमान काळ.)

हस धातु, अकर्मक.

	एकवचन	अनेकवचन
उत्तम पुरुष	मी हसतों, पु० मी हसतें, स्त्री० मी हसतें, न०	आम्ही हसतों
मध्यम पुरुष	तूं हसतोस तूं हसतेस तूं हसतेंस	तुम्ही हसतां
अन्यपुरुष	तो हसतो ती हसते तें हसतें	ते त्या हसतात तीं

याप्रमाणें धाव, नाच, ये, जा, दे, घे, इत्यादिकांचीं रूपें जाणावीं.

अकारांत सकर्मक धातूंचीं रूपें सोडतों, सोडितों; करतों, करितों; अशीं दोन दोन होतात. परंतु पाह, साह, वाह, चाह, माग, सांग, बघ, म्हण, बोल, शीक, पढ, चाव, समज, जाण, यांचीं रूपें पाहतों, साहतों, अशीं एकेकच. इच्छ, प्रार्थ, अर्प यांचीं इच्छितों, प्रार्थितों, अर्पितों, अशीं एकेकच.

दुसरें आख्यात.

(याचा अर्थ भूतकाळ अथवा संकेत.)

उ० पु०	मी हसलों मी हसलें मी हसलें	आम्ही हसलों
म० पु०	तूं हसलास तूं हसलीस तूं हसलेंस	तुम्ही हसलां
अ० पु०	तो हसला ती हसली तें हसलें	ते हसले त्या हसल्या तीं हसलीं

याप्रमाणें पड, झड, चाल, इत्यादि अकारांत अकर्मक धातूंचीं, आणि न्हा, नें, लिही, यांचीं रूपें जाणावीं.

अकारांत सकर्मक धातूंचीं रूपें सोडला, सोडिला; आणला, आणिला; अशीं दोनदोन होतात. परंतु पाह, साह, राह, वाह, चाह, इच्छ, प्रार्थ, अर्प, यांचीं पाहिला, साहिला, राहिला, वाहिला, चाहिला, इच्छिला, प्रार्थिला, अर्पिला, अशीं एकेकच. वाह याचें अकर्मकीं क्वचित् 'वाहला' असेंही रूप आढळतें. जाण याचें प्रायः ' जाणलें ' असें रूप.

विलक्षण धातुशब्द आणि त्यांचीं रूपें.

सांग	सांगितला	दे	दिला
माग	मागितला	गा	गाइला
बघ	बघितला	मा	माइला
घाल	घातला	म्हण	म्हणाला (कर्तृप्र.) म्हटला (कर्मप्र.)
धू	धुतला		
घे	घेतला	खण	खटला, खणला
ये	आला	पळ	पळाला

जा	गेला	ऊड	उडाला
हो	झाला, जाह्ला	बुड	बुडाला
खा	खाल्ला, खाला	नीघ	निघाला
पी	प्याला	वीझ	विझाला, विझला
वी	व्याला	बूज	बुजाला, बुजला
भी	भ्याला	वीर	विरला, विराला
ले	ल्याला	जीर	जिरला, जिराला
कर	केला	लप	लपला, लपाला
मर	मेला	आहे	होता

या आख्यातीं सकर्मक धातूंचीं रूपें **कर्मप्रधान** असतात. परंतु जे धातु मुळीं अकर्मक असून सकर्मकाप्रमाणें ही योजले जातात, अशा कांहीं धातूंचीं रूपें **कर्तृप्रधान** होतात. जसें,–तो बारा वर्षें **पढतो**. तो व्याकरण **पढला**. तो चांगला **शिकतो**, तो गणित **शिकला**. मुका मनुष्य **बोलतो** काय ? तो चार शब्द **बोलला**. तो **खेळतो**, तो सोंकट्या **खेळला**. वेणू जेवते, ती दूधभात **जेवली**. गाय व्याली, ती गाय पाडा **व्याली**. तो कुत्रा चावतो, तो कोणाला **चावला** ? तो मुलगा झोंपेमध्यें भ्याला, हरी सापाला **भ्याला**. गंगेस घोडे न्हाले, ते गंगा न्हाले. याप्रमाणेंच मी पाणी **प्यालों**, विठू तुमचें म्हणणें **समजला**, ती त्याला शिवली, तो काय म्हणाला ? इत्यादि. परंतु ' त्यानें काय म्हटलें ? ' हें वाक्य कर्मप्रधान.

उत्तम आणि मध्यम पुरुषीं कर्मप्रधान क्रियापद येत नाहीं. क्वचित् कवितेंत मात्र आढळतें. जसें,–श्रीकृष्णें मी तारिलों. मोहापासाव सोडविलों. दुष्टांनीं तूं छळिलास. इत्यादि.

तिसरें आख्यात.

(याचा अर्थ **रीतिभूतकाळ**. जुन्या भाषेमध्यें ऐतिहासिक **वर्तमान** अथवा **भूतकाळ**.)

	एकव.	अनेकव.
उ०	मी हसें	आम्ही हसूं
म०	तूं हसेस	तुम्ही हसां
अ०	तो, ती, तें, हसे	ते, त्या, तीं, हसत

याप्रमाणें चाल, नीघ, नाच, इत्यादि अकारांत अकर्मक धातु; पढ, शीक, बोल, खेळ, चाव, म्हण, समज, इत्यादि कित्येक अनेकाक्षरी धातु; आणि सांग, माग, बघ, हे धातु; यांचीं रूपें जाणावीं.

इतर अकारांत सकर्मक धातूंचीं, आणि राह, वाह, या अकर्मक धातूंचीं रूपें,–मी **सोडीं**, तूं **सोडीस**, तो **सोडी**, आम्ही **सोडूं**, तुम्ही **सोडां**, ते **सोडीत**, अशा प्रकारें होतात.

ये (एकाक्षरी) धातूचीं रूपें.

उ०	मी येईं	आम्ही येऊं
म०	तूं येईस	तुम्ही यां
अ०	तो येई	ते येत

याप्रमाणें जा, दे, घे, भी, पी, वी, ने, खा, हो, धू यांचीं रूपें होतात. भी, पी, वी, हे पुढें दीर्घ अक्षर असतां, नियमाप्रमाणें आधीं ऱ्हस्व होतात, हें ध्यानांत ठेवावें. मध्यमपुरुष अनेकवचनीं जां, द्यां, खां, घ्यां, प्यां, व्यां, भ्यां, न्यां, व्हां, धुवां.

चवथें आख्यात.

(याचा अर्थ भविष्यत्काळ अथवा संशय.)

	एकव.	अनेकव.
उ०	मी हसेन	आम्ही हसूं
म०	तूं हसशील	तुम्ही हसाल
अ०	तो, ती, तें, हसेल	ते, त्या, तीं, हसतील

याप्रमाणें चाल, नीघ, नाच, इत्यादि अकारांत अकर्मक, आणि पढादिकांतील अनेकाक्षरी, आणि सांग, माग, बघ, या सकर्मक धातूंचीं रूपें जाणावीं.

इतर सकर्मक धातूंच्या रूपांमध्यें मी **सोडीन**, तो **सोडील**, इतकाच भेद. इतर रूपें पूर्ववत्. जेव, वाह, राह, या धातूंचीं रूपें अशींच, जेवीन, इ०.

ये (एकाक्षरी) धातूचीं रूपें.

उ०	मी येईन	आम्ही येऊं
म०	तूं येशील	तुम्ही याल
अ०	तो, ती, तें, येईल	ते, त्या, तीं, येतील

याप्रमाणेंच जा, दे, घे, भी, पी, वी, ने, खा, न्हा, धू, इत्यादिकांचीं रूपें जाणावीं.

मध्यम अनेकवचनीं जाल, द्याल, घ्याल, भ्याल, प्याल, व्याल, न्याल, खाल, न्हाल, धुवाल, इ०.

पांचवें आख्यात.

(याचा अर्थ भविष्यत्काळ आणि निश्चय.)

	एकव.		अनेकव.	
उ०	मी	हसणार	आम्ही	हसणार
म०	तूं		तुम्ही	
अ०	तो, ती, तें		ते, त्या, तीं	

याप्रमाणेंच इतर धातूंचीं रूपें जाणावीं. पुढें ' णार ' लावला म्हणजे झालें. इच्छ याचें मात्र ' इच्छिणार '

साहवें आख्यात.

(याचा अर्थ उत्तमपुरुषीं प्रश्न, मध्यम पुरुषीं आज्ञा किंवा प्रार्थना, आणि अन्यपुरुषीं इच्छा.)

	एकव.	अनेकव.
उ०	मी हसूं ?	आम्ही हसूं ?
म०	तूं हस	तुम्ही हसा
अ०	तो, ती, तें, हसो	तो, त्या, तीं, हसोत

याप्रमाणेंच इतर धातूंचीं रूपें जाणावीं. अस आणि बस यांचीं मध्यमपुरुषीं अस, ऐस; बस बैस; अशीं दोनदोन रूपें होतात. पाह, वाह, राह, साह, यांचीं दोन्ही वचनीं पहा, वहा, रहा, सहा, अथवा पाहा, राहा, वाहा, साहा, अशीं होतात.

सातवें आख्यात.

(याचा अर्थ **धर्म, संभव, योग्यता** आणि क्वचित् **रीतिभूतकाळ.**)

हस धातूंचीं हीं रूपें तादृश प्रचारांत नसल्यामुळें **अस धातु** घेतों.

	एकव.	अनेकव.
उ०	मी असावा मी असावी मी असावें	आम्ही असावे आम्ही असाव्या आम्ही असावीं
म०	तूं असावास तूं असावीस तूं असावेंस	तुम्ही असावेत तुम्ही असाव्यात तुम्ही असावींत
अ०	तो असावा ती असावी तें असावें	ते असावे त्या असाव्या तीं असावीं

याप्रमाणेंच इतर धातूंचीं रूपें जाणावीं. लिही याचें रूप लिहावा. पाह, वाह, राह, साह, यांचीं रूपें पहावा–पाहावा; रहावा–राहावा; वहावा–वाहावा; सहावा–साहावा; अशीं होतात. **ये**, जा, इत्यादि एकाक्षरी धातूंचीं रूपें–यावा, जावा, द्यावा, घ्यावा, भ्यावा, प्यावा, व्यावी, न्यावा, खावा, व्हावा, धुवावा, इ०.

या आख्यातीं सकर्मक धातूंचीं **रूपें कर्मप्रधान**; त्यांतील उत्तम मध्यम रूपें प्रचारांत येत नाहींत. अन्यपुरुष रूपें मात्र येतात. जसें,—वाईट मार्ग सोडावा, विद्या शिकावी, इत्यादि.

आठवें आख्यात.

(याचा अर्थ असिद्धसंकेत.)

	एकव.	अनेकव.
उ०	मी हसतों मी हसतें मी हसतें	आम्ही हसतों
म०	तूं हसतास तूं हसतीस तूं हसतेंस	तुम्ही हसतां
अ०	तो हसता ती हसती तें हसतें	ते हसते त्या हसत्या तीं हसतीं

याप्रमाणेंच इतर धातूंचीं रूपें जाणावीं. अर्थात् धातूंला सरळ प्रत्यय लागतात. इच्छ, प्रार्थ, अर्प, या धातूंपासून मात्र इकार लागून 'इच्छितों' इत्यादि रूपें होतात.

धातूंपासून जीं नामें, विशेषणें, आणि अव्ययें होतात तीं **कृदंतें.** त्यांतील फार उपयोगी मात्र एथें देतों.

	अकर्मक धातु	सकर्मक धातु
	हस	सोड
कर्तृवाचक नामें किंवा विशेषणें	हसता हसणारा हसणार हसत	सोडता सोडणारा सोडणार सोडीत
भूतार्थक विशेषण	हसला, हसलेला (कर्तृप्र.) सोडिला,	सोडला, सोडलेला सोडिलेला (कर्मप्र.)

क्रियावाचक नामें.	हसणें हसावें हसूं	सोडणें सोडावें सोडूं
वर्तमानक्रिया-बोधक अव्ययें.	हसतां हसतांना	सोडतां, सोडितां सोडतांना, सोडितांना
पूर्वक्रियाबोधक अव्यय.	चालून	सोडून
संकेतार्थक अव्यय.	चालल्यास	सोडल्यास

यांतील बहुतेकांची सिद्धि मागें गेलेल्या अशाच रूपांच्या क्रियापदांवरून जाणावी. इतरांची सरळच आहे.

अस धातु फार उपयोगी, त्याचीं मुख्य रूपें.

आ०	रूपें	अर्थ.
१	मी असतों, इ.	वर्तमान अथवा रीतिवर्तमान.
२	मी असलों, इ.	संकेत. (असधातूच्या या आख्याताचा हा एकच अर्थ. इतर धातूंप्रमाणें भूतकाळ हा अर्थ एथें नसतो.)
३	मी असें, इ.	रीतिभूतकाळ इ.
४	मी असेन, इ.	भविष्यकाळ अथवा संशय.
५	मी असणार, इ.	भविष्यकाळ आणि निश्चय.
६	मी असूं इ.	प्रश्न, आज्ञा, इच्छा.
७	मी असावा, इ.	धर्म, योग्यता, इ.
८	मी असतों, इ.	असिद्धसंकेत.

अस धातूचीं केवळ सत्तार्थक रूपें.—

भेद दाखविण्यास्तव याला 'आहे' धातु हे नांव दिलें आहे.

प्रथम आख्यात. (वर्तमानकाळ.)

	एकव.	अनेकव.
उ.	मी आहें	आम्ही आहों
म.	तूं आहेस	तुम्ही आहां
अ.	तो, ती, तें, आहे	ते, त्या, तीं, आहेत

दुसरें आख्यात. (भूतकाळ.)

	एकव.	अनेव.
उ.	मी होतों मी होतें मी होतें	आम्ही होतों
म.	तूं होतास तूं होतीस तूं होतेंस	तुम्ही होतां
अ.	तो होता ती होती तें होतें	ते होते त्या होत्या तीं होतीं

इतर आख्यातीं असें, असेन, असणार, असूं, असावा, असतों, इत्यादि पूर्ववत्.

पाहिजे धातु.

प्रथम आख्यात (वर्तमानकाळ.)

उ.	मी पाहिजे	आम्ही पाहिजे
म.	तूं पाहिजेस	तुम्ही पाहिजेत
अ.	तो, ती, तें पाहिजे	ते, त्या, तीं पाहिजेत, पाहिजत

चवथें आख्यात (भविष्यत्काळ, संशय.)

अ. पाहिजेल

'पाहिजे' याचीं इतर रूपें होत नाहींत.

हवा धातु.

प्रथम आख्यात.

	एकव.	अनेकव.
उ.	मी हवा	आम्ही हवे
	मी हवी	आम्ही हव्या
	मी हवें	आम्ही हवीं
म.	तूं हवास	तुम्ही हवेत
	तूं हवीस	तुम्ही हव्यात
	तूं हवेंस	तुम्ही हवींत
अ.	तो हवा	ते हवे, हवेत
	ती हवी	त्या हव्या, हव्यात
	तें हवें	तीं हवीं, हवींत

इतर रूपें नाहींत. याप्रमाणेंच 'व्हावा' धातु.

होय धातु.

प्रथम आख्यात.

	एकव.	अनेकव.
उ.	मी होय	आम्ही हों
म.	तूं होस	तुम्ही व्हां
अ.	तो, ती, तें होय	ते, त्या, तीं होत

इतर रूपें नाहींत.

नस धातु (अस याच्या उलट.)

मी नसतों, नसलों, नसें, नसेन, नसणार, नसूं, नसावा, नसतों इत्यादि.

नाहीं धातु (आहे याच्या उलट.)

प्रथम आख्यात.

मी नाहीं, तूं नाहींस, तो नाहीं, आम्ही नाहीं, तुम्ही नाहीं, ते नाहींत. इ.

दुसरें आख्यात (भूतकाळ.)

मी नव्हतों, तूं नव्हतास, तो नव्हता, आम्ही नव्हतों, तुम्ही नव्हतां, ते नव्हते. इ.

नव्हे धातु (होय याच्या उलट.)

मी नव्हें, तूं नव्हेस, तो नव्हे, आम्ही नव्हों, तुम्ही नव्हां, ते नव्हेत, नव्हत.

नको धातु (पाहिजे याच्या उलट.)

मी नको, तूं नकोस, तो नको, आम्ही नको, तुम्ही नका, ते नकोत.

नलगे धातु (पाहिजे याच्या उलट,)

मी नलगें, तूं नलगेस, तो नलगे, आम्ही नलगे, तुम्ही नलगेत, ते.नलगेत.

नये धातु. (याचीं केवळ अन्यपुरुषीं रूपें.)

अ. पु.	नये	नयेत

इतर रूपें नाहींत.

हो धातु (प्रथम आख्यात.)

	एकव.	अनेकव.
उ.	मी होतों-तें-तें	आम्ही होतों
म.	तूं होतोस-तेस-तेंस	तुम्ही होतां
अ.	तो होतो ती होते तें होतें	ते त्या } होतात तीं

हीं रूपें सरळ आहेत. तरी 'आहे' धातूचीं दुसऱ्या आख्याताचीं रूपें आणि 'हो' धातूचींही प्रथमाख्याताचीं रूपें कांहीं कांहीं समान आहेत. त्यांचा गोंधळ होऊं नये, म्हणून यांतील भेद नीट ध्यानांत ठेवावा. याचीं इतर रूपें—झालों, होई, होईन, होणार, होऊं, व्हावा, होतों, इ.

व-प्रत्ययांतधातु.

मूळ धातूला 'व' प्रत्यय लागल्यानें **शक्त्यर्थक** धातु होतात. जसें—बसव, चालव, आणव, इत्यादि. धातु एकाक्षरी असल्यास त्याला 'वव' हा प्रत्यय लागतो. जसें, येवव, देवव, घेवव, इत्यादि.

शक्त्यर्थक धातूपासून अन्यपुरुषीं मात्र रूपें होतात. त्यांत पुनः मूळधातु अकर्मक असल्यास तीं नपुंसकलिंगीं एकवचनीं मात्र होतात. जसें—

सकर्मक धातु सोड.

	एकव.	अनेकव.
अ. पु.	सोडवतो–ते–तें	सोडवतात.

पुढील रूपें अकर्मकाप्रमाणें,—सोडवला, सोडवे, सोडवेल, सोडवणार, सोडवो, सोडवावा, सोडवता, इ. हीं रूपें **कर्मप्रधान** असतात.

मूळ अकर्मकधातूपासून बसवतें, बसवलें, बसवे, बसवेल, बसवणार बसवो, बसवावें, बसवतें, इतकींच रूपें. हीं **भावप्रधान** असतात.

ईव-प्रत्ययांत धातु.

मूळ धातूला 'ईव' प्रत्यय लागल्यानें **प्रयोजक** धातु होतात. जसें—करीव, देवीव, इत्यादि. हे सर्व सकर्मक. यांचीं रूपें इतर सकर्मक धातूंच्या रूपांप्रमाणें. उदाहरणार्थ **करीव** धातु—

	एकव.	अनेकव.
उ.	मी करिवतों करवितों. मी करिवतें, करवितें मी करिवतें, करवितें	आम्ही करिवतों, करवितों

याप्रमाणेंच इतर रूपें जाणावीं.

'करीव' यापासून पुनः 'करवीव' असा दुसरा प्रयोजक धातु होतो. याचीं रूपें सरळ, करविवतों, करविवला, इत्यादि एकेकच.

कित्येक अकर्मक धातूंपासून प्रयोजक धातु होत नाहींत; तथापि त्यांमध्येंच कांहीं रूपांतर होऊन सकर्मक होतात. ते असे—

अकर्मक	सकर्मक	अकर्मक	सकर्मक
पड	पाड	ये	आण
झड	झाड	दीस	दाखीव
सूट	सोड	दब	दाब
फूट	फोड	गळ	गाळ
तूट	तोड	सर	सार
मर	मार	टळ	टाळ
फाट	फाड	चर	चार
लाग	लाव	तर	तार
फीट	फेड	इ०.	इ०.

कित्येक धातु रूपांतर न पावतां प्रसंगाप्रमाणें अकर्मक किंवा सकर्मक होतात. जसें,––दार उघडतें (अक०); तो दार उघडतो, त्यानें दार उघडलें (सक०). यांना **उभयविध** धातु म्हणतात.

कांहीं धातु मुळीं सकर्मक असून प्रसंगीं अकर्मक होतात. जसें—या खलामध्यें हें औषध चांगलें घोटतें (म्हणजे घोटलें जातें,) इ०.

वाक्ययोजना.

मनांतील कांहीं कल्पना उघड करणारी जी पदांची योजना तें वाक्य. जसें, हरी पुस्तक वाचतो.

वाक्यांतील पदांचा एकमेकांशीं कांहींनाकांहीं योग्य संबंध असला पाहिजे. तो नसेल तर असंबद्ध प्रलाप होईल.

वाक्यामध्यें कर्ता आणि क्रियापद अशीं दोन तरी पदें असलीं पाहिजेत. क्रियापद सकर्मक असेल, तर त्याला कर्महि असलें पाहिजे.

प्राधान्य

प्राधान्य म्हणजे क्रियापदावर अधिकार. प्राधान्य तीन प्रकारचें— कर्त्याचें, कर्माचें आणि क्रियेचें (पृष्ठ ३८७ वें पहा.)

क्रियापद अकर्मक असल्यास, त्यामध्यें कर्त्याचें किंवा क्रियेचें प्राधान्य असतें. क्रियापद सकर्मक असल्यास त्यामध्यें कर्त्याचें, किंवा कर्माचें, किंवा क्रियेचें, प्राधान्य असतें. (पृष्ठ ३८७ वें पहा.)

वाक्यांतील क्रियापद जर **कर्तृप्रधान** असलें, तर कर्त्याची विभक्ति प्रथमा असते, आणि कर्त्याचें जें लिंग, जें वचन, आणि जो पुरुष असेल, तेंच लिंग, तेंच वचन, आणि तोच पुरुष क्रियापदाचा असतो. जसें— हरि चालतो, मनी बोलते, पाखरें उडालीं, इ०.

कर्तृप्रधान क्रियापदाला जर कर्म असलें, तर त्या कर्माची विभक्ति प्रथमा किंवा द्वितीया असते. जसें सदू पुस्तक वाचतो. नारायण शास्त्र पढला. (पृष्ठ ३९० वें पहा.) मांजर उंदराला धरतें, किंवा उंदीर धरतें, इ०.

यांत कर्मपद जर विशेषनाम अथवा प्राण्याच्या स्थानीं योजलेलें सर्वनाम असलें, तर बहुशः त्याची विभक्ति द्वितीया असते. जसें, तो हरीला धरतो; तूं मला पाठीव, इ०.

जर क्रियापद **कर्मप्रधान** असलें, तर कर्त्याची विभक्ति तृतीया, कर्माची प्रथमा, आणि कर्माचें जें लिंग, जें वचन, आणि जो पुरुष असेल, तेंच लिंग, तेंच वचन, आणि तोच पुरुष, क्रियापदाचा असतो. जसें रामानें रावण मारिला; कृष्णानें मुरली वाजविली; इ०.

कर, ठरीव, नेम, अशा कांहीं धातूंना केव्हां केव्हां दोनदोन कर्में असतात. त्यांतून दुसरें कर्म तर सर्वदा प्रथमांतच असतें. पण पहिलेंही कर्म जर प्रथमांत असलें, तर त्यालाच अनुसरून कर्मप्रधान क्रियापदाचे

लिंग–वचन–पुरुष असतात. जसें,–राजानें ती स्त्री आपली राणी केली; त्या लोकांनीं ती वेषधारी कन्या मोठा चतुर पुरुष मानिली; इत्यादि.

परंतु पहिलें कर्म जर द्वितीयांत असलें, तर दुसऱ्या कर्मालाच अनुसरून त्या क्रियापदाचे लिंग–वचन–पुरुष असतात. जसें,–प्रधानानें आपल्या सात मुलींना सात राजांच्या राण्या केल्या; विष्णुपंतांनीं नारायणरावाला आपला जांवई केला; राजानें त्या वेषधारी स्त्रीला आपला प्रधान केला; इ०. दुसऱ्या कर्माच्या स्थानीं केवळ विशेषण असलें, तरी असा प्रयोग होतो. जसें,–गोविंदरावांनीं आपला पुत्र (किंवा, आपल्या पुत्राला) विद्वान् केला; मनीनें आपली बाहुली (किंवा, आपल्या बाहुलीला) पाटावर उभी केली; इ० यांत ' विद्वान्,' ' उभी ' हीं विशेषणें नामवत् मानावीं, किंवा त्यांपुढें ' पुरुष, ' ' बाहुली, ' असे शब्द अध्याहृत म्हणजे गुप्त मानावे. एथें कर्म द्वितीयांत असतां क्रियापद भावप्रधानही होतें. जसें, वैद्यानें तिला बरें केलें, इ०.

क्रियापद शक्त्यर्थक असतां त्याच्या कर्त्याची विभक्ति द्वितीया किंवा सविकरण तृतीया असते. जसें,–मला अथवा माझ्यानें काम करवतें; त्याच्यानें पत्र लिहवतें; इ०.

षष्ठीचा प्रत्यय लागून त्यापुढें तृतीयेचा प्रत्यय लागतो, त्या विभक्तीला सविकरण तृतीया म्हणतात.

क्रियापद भावप्रधान असतां, कर्ता तृतीयांत, आणि त्याला कर्म असल्यास तें द्वितीयांत असतें. क्रियापद तृतीयपुरुषीं, नपुंसकलिंगीं, एकवचनीं, असतें. जसें,–त्यानें जावें; रामानें रावणास मारिलें; तुम्ही चोरास धरावें, इ०.

शक्त्यर्थाचीं उदाहरणें,–माझ्यानें अथवा मला चालवतें, त्याच्यानें चोरास धरवलें, इ०.

' प्रधानानें सात मुलींना सात राजांच्या राण्या केलें, ' असाच जखडलेला प्रयोग करण्याविषयीं कित्येकांचा आग्रह आहे; परंतु भाषेमध्यें असा प्रयोग नाहीं. **म्हणून** हा अशुद्ध. याप्रमाणेंच ' त्यानें तिला **मारिली** ' ' तिनें त्याला

धरिला.' इत्यादि प्रयोग क्वचित् बोलण्यांत येतात, परंतु हे सर्वसंमत नव्हेत. म्हणून हेही त्याज्य. परंतु 'म्हण' धातूच्या संबंधानें, "त्या प्रवाहास 'नदी' म्हणावें, अथवा 'नदी' असें म्हणावें." असे भावप्रधान प्रयोग येतात, ते शुद्ध मानणें प्राप्त आहे.

उजेड, सांजाव, कळमळ, मळमळ, बन, फाव, असे पांच सात अकर्मक धातु मोठे चमत्कारिक आहेत. यांच्या क्रियापदांना वेगळा कर्ता नसतो. पण, उजेड होतो–उजेडतें; सांज होते–सांजावतें; कळमळ होते–कळमळतें; मळमळ होते–मळमळतें; कांहीं कृत्य बनविण्याला वेळ मिळते–बनतें. कांहीं वस्तु 'भावयितुं' म्हणजे घडविण्याला वेळ मिळते–फावतें; याप्रमाणें क्रियापदामध्येंच कर्त्याचा अर्थ मिसळलेला असतो. दिसण्यामध्यें वेगळा कर्ता नसतो. म्हणून यांना **अकर्तृक** किंवा **भावकर्तृप्रधान** क्रियापदें म्हणतात.

ल–प्रत्ययांत कृदंतापुढें **जा** धातु लागून सर्व आख्यातीं कर्मप्रधान संयुक्त क्रियापद होतें; याच्या कर्त्याला 'कडून' हा प्रत्यय लागतो. जसें,– मामलतदाराकडून हुकूम **फर्माविला गेला**, सरकाराकडून अपराध्याला शिक्षा **केली जाईल**, इ०.

तां–प्रत्ययांत कृदंतापुढें **ये** धातु लागून शक्यर्थक क्रियापदें होतात. जसें, मुलाला **चालतां येतें** (भावप्रधान). त्याला पुस्तकें **वाचतां येतात.** (कर्मप्रधान.)

क्रियापद कर्मप्रधान असून जेव्हां वाक्यामध्यें त्याच्या कर्त्याची अपेक्षा नसते, तेव्हां त्याला कर्मकर्तृप्रधान म्हणतात. जसें,—सदाशिवराव भाऊ लढाईंत **मारले गेले**; श्रम **केला**, तर विद्या साध्य होईल, इ०.

विशेषण आणि विशेष्य.

संस्कृतांत आणि जुन्या मराठींत नामाची जी लिंग–वचन–विभक्ति तीच विशेषणाची असे. परंतु चालू मराठींत विशेषणाच्या विभक्तींचा लोप होतो. जसें,—सुंदर कन्येनें, कडू फळांचा, इ०.

लिंगभेदाप्रमाणें आ-ई-एँकारांत होणारीं जीं विशेषणें, त्यांच्या विभक्तीचा जरी लोप झाला, तरी सामान्यरूप राहतें. जसें,— चांगल्या मुलाला, मोठ्या घरीं, इ०.

स्त्रीलिंग विशेषणाचेंही सामान्यरूप पुल्लिंगाप्रमाणेंच होतें. जसें,- **पिवळ्या** काठीचा, **शहाण्या** मुलीनें, इ०

क्वचित् **मोठे** मुलानें, **पिवळे** काठीला, **तांबडे** रंगाचा, इत्यादि प्रकारेंही विशेषणाचीं रूपें होतात.

ज्या नामाचें जें विशेषण, तें त्या विशेषणाचें विशेष्य. जसें,—' चांगला मुलगा, ' यांत **चांगला** हें विशेषण, आणि **मुलगा** हें विशेष्य.

षष्ठी विभक्ति हेंही विशेषणच आहे. म्हणून संबद्ध शब्दाच्या रूपाप्रमाणें तिचीं रूपें वेगवेगळीं होतात. जसें,–माझा, माझी, माझें, माझे, माझ्या, माझीं, इ०. इतर विशेषणाप्रमाणेंच याच्या पुढील विभक्तीचा लोप होऊन सामान्य रूप होतें. जसें,-**त्याच्या** घरांत, **याच्या** विद्येचें फळ, इ०.

सर्वनामेंही विशेषणाप्रमाणें योजतां येतात. जसें;-**तो** मुलगा, **त्या** मुलानें, **मला** नारायणाला, तूं हरीनें, इ०.

अस, ठर, हो, बन, निपज, केला जा, इत्यादि क्रियापदांच्या संगतीं अर्थपूरणासाठीं केव्हां केव्हां प्रथमांत नाम, अथवा विशेषण, यांची योजना होते. जसें,—नारायण विद्यार्थी आहे, गोविंद उत्तम ठरला, विनायक शिपाई झाला, इ०. यांतील विशेषणाचें लिंग-वचन विशेष्याप्रमाणें असतें; परंतु नामाविषयीं तो नेम चालत नाहीं. जसें,—नाटकामध्यें सदू **द्रौपदी** झाला; यमुना **अभिमन्यु** झाली, इ०. अशा नामाला **विधिनाम**, आणि विशेषणाला **विधिविशेषण** म्हणतात.

ज्याविषयीं पुढें कांहीं सांगायाचें असेल, त्याच्या नांवापुढें लिंगभेदाप्रमाणें हा हें सर्वनाम, वाक्य गोड करण्यासाठीं, लावतात. जसें,—हरी हा शहाणा आहे, यमुना आणि कृष्णी ह्या ठेंगण्या आहेत, शाहुराजानें

बाजीराव याला पेशवाई दिली. इ०. परंतु त्या सर्वनामानें दर्शविलेलें पुनः दुसरें नाम पुढें असेल तर, त्याच्या लिंगवचनाप्रमाणें हा याचें लिंगवचन होतें. जसें,--पुणें ही पेशव्यांची **राजधानी** होती; मुंबई हें **मोठें** शहर आहे; ती वेषधारी कन्या हा राजानें आपला **प्रधान** केला; इ०.

विभक्तींचे अर्थ.

प्रथमेचे अर्थ कर्ता, कर्म, उद्दिष्ट, विधान, विशेषण, आणि परिमाण.

हरी पोथी वाचतो; यांत **हरी** ही कर्त्रर्थी प्रथमा, **पोथी** ही कर्मार्थी प्रथमा.

शिवाजी हा राजा होता; यांत **शिवाजी** ही उद्दिष्टार्थी प्रथमा; **राजा** ही विधानार्थी प्रथमा.

अयोध्याधीश रामचंद्र फार सात्विक होता; यांत **अयोध्याधीश** ही विशेषणार्थी प्रथमा.

एक शेर तांदूळ; यांत **शेर** ही परिमाणार्थी प्रथमा.

द्वितीयेचा अर्थ कर्म, कर्ता, आणि संप्रदान.

कर्म--शिपाई **चोराला** धरतो.
कर्ता--**त्याला** उद्योग करवतो.
संप्रदान--**भिकाऱ्याला** अन्न देतो; **त्याला** खेळणें आवडतें, इ०.

तृतीयेचे अर्थ कर्ता, करण, हेतु, अंगविकार आणि साहित्य.

कर्ता—**रामानें** यावें, **गोपाळानें** पत्र वाचलें.

अंगविकार—**पायानें** लंगडा.

करण—**काठीनें** मारतो. (हेतु—**वयानें** वडील.)

साहित्य—मळक्या **पोषाखानें** फिरतो.

चतुर्थीचा अर्थ **तादर्थ्य**. **पैशासाठीं** श्रम करितो.

पंचमीचा अर्थ अपादान म्हणजे **वियोग** अथवा तारतम्य.

वियोग—पुण्याहून आला.

तारतम्य—हरीहून लहान.

घर, हात, इत्यादि कांहीं शब्दांची पंचमी घरुन, हातून, अशी होते, हें ध्यानांत ठेवावें.

षष्ठीचा अर्थ अनेक प्रकारचा संबंध—

गोविंदाचें अक्षर, द्रव्याचें रक्षण, मजूरीचें काम, गव्हांचें पीठ, पिठाचे गहूं, राजाचा वाडा, इ०. **रात्रीचा** फिरतो, ही अधिकरणीं षष्ठी.

सप्तमीचा अर्थ अधिकरण म्हणजे स्थान अथवा काल.

स्थान—घरांत बसतो.

काल—सोमवारीं आला.

घर, हात, पाय इत्यादि अकारांतांची सप्तमी घरीं, हातीं, पायीं, अशीही होते; पायां, माथां, हेही शब्द ‘पायां पडणें,’ ‘माथां शेंदूर पाझरे,’ यांत येतात, हें ध्यानांत ठेवावें.

संबोधन म्हणजे हाक मारणें.–हे **राजा**, अरे **मुला** इ०.

वरील अर्थांतील कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान; आणि अधिकरण, यांचा संबंध क्रियेशीं असतो, म्हणून **यांना कारकें** म्हणतात.

आख्यातांचे अर्थ.—वर्तमान काळ म्हणजे चालती वेळ, भूतकाळ म्हणजे गेली ती वेळ, भविष्यकाळ, म्हणजे पुढें येणार ती वेळ.

संयुक्त क्रियापदें.—बहुतेक आख्यात रूपांपुढें असधातूचीं रूपें लागून संयुक्त क्रियापदें होतात. जसें,—

मी करीत आहें–अपूर्ण वर्तमान.

मी करीत असतों–रीति-वर्तमान.

मी करीत होतों–अपूर्ण भूत.

मी करीत असें–रीतिभूत.

मीं केलें असेल–भूत भविष्य अथवा संशयार्थ भूत

मीं केलें असावें–संशयार्थ भूतवर्तमान.

मीं केलें असलें–संकेतार्थ भूतवर्तमान.

मी करीत असेन–अपूर्ण भविष्य,
अथवा संशयार्थ वर्तमान.
मी करीत असणार–अपूर्ण भविष्य.
मी करीत असूं ?–प्रश्न इ०.
मी करीत असावें–रीतिभूत,
अथवा विध्यर्थ.
मी करीत असलों–संकेत.
मी करीत असतों–असिद्ध संकेत.
मीं केलें आहे–भूतवर्तमान
मी केलें होतें–भूत भूत.
मीं केलें असतें–असिद्धसंकेत.
मी करणार आहें–भविष्य
वर्तमान.
मी करणार होतों–भविष्यभूत.
मी करणार असेन–भविष्य भविष्य
अ० संशय भविष्य.
मी करणार असावा–संशय भविष्य.
मी करणार असलों–संकेत भविष्य इ०

क्रियेचा गुण दाखविण्याकरितां कारकांचा उपयोग करितात; त्याप्रमाणेंच पदार्थक (म्हणजे क्रियाविशेषण) अव्ययांचा आणि विशेषणांचाही करितात. जसें,–तो **लौकर** आला; ती **चांगली नाचते**; तो **हसत बोलतो**; इ०.

क्रियापद सकर्मक असतां, क्रियाविशेषण कर्माच्या अनुरोधानें वागतें. जसें,–तो मुलगा श्लोक **चांगले** गातो; ती बाई चोळी **वांकडी** शिवते; इ०.

क्रियापद अकर्मक असतां, क्रियाविशेषण नपुंसकींही आढळतें. जसें,–तो मुलगा **चांगला** बोलतो, किंवा **चांगलें** बोलतो. परंतु या दुसऱ्या वाक्यामध्यें ' बोलणें ' हें कर्म गुप्त असून क्रियापद सकर्मक आहे असा भास होतो.

जो यापुढें **तो** हा शब्द आला पाहिजे. जसें,–**जो** श्रम करील **तो** फळ मिळवील. इ०. यांच्यामध्यें लिंगभेद आणि विभक्तिभेदही असूं शकतो. जसें,–**जें** कांहीं ऐकूं येतें, **तो** शब्द; **जो** गांव राजाच्या राहण्याचा, **ती** राजधानी; ज्याचें नांव विष्णु त्याला बोलाव; इ०.

याप्रमाणें जर यापुढें तर, आणि जरी यापुढें तरी, असे शब्द आले पाहिजेत. 'जर तो आला, तर मी येईन;' 'जरी त्याला पुष्कळ सांगितलें, तरी तो ऐकेना;' इ०. जो, जर, जरी, हे शब्द गुप्तही असतात. 'करील तो भरील,' इ०.

वाक्यामध्यें आधीं कर्ता, मग कर्म आणि शेवटीं क्रियापद यावें, आणि ज्या पदाचें विशेषण त्या पदापूर्वी यावें, हा सामान्य नियम आहे. परंतु बोलणाराच्या मनामध्यें ज्या पदावर विशेष नेट द्यावयाचा असेल, तें पद वाक्याच्या आरंभीं येतें. जसें;—'चांगला आहे तो मुलगा;' 'नको ही मला कटकट;' 'आधीं या तुम्ही इकडे;' इ०

प्राधान्यभेद—

{ कर्तृप्रधान —तो काम करितो.
  कर्मप्रधान—त्याकडून काम केलें जातें.

{ कर्तृप्रधान—ती असावी.
  भावप्रधान—तिनें असावें

{ कर्मप्रधान—रामानें रावण मारिला.
  कर्तृप्रधान—राम रावणास मारता झाला.
  भावप्रधान—रामानें रावणास मारिलें. इ०.

नकार जोडण्याची रीति.

करितों, करीत आहें–करीत नाहीं.

केलें, केलें आहे–केलें नाहीं.

करीन, करणार–करणार नाहीं.

करीं, करीत असें–करीत नसें.

कर, करूं–करूं नको

करो–न करो.

करावें–करूं नये

करितों (असिद्धसंकेत)– न करितों.

केलें असलें–केलें नसलें.

केलें असेल–केलें नसेल.

केलें असतें–केलें नसतें.

करवतें–करवत नाहीं.

यांवेगळीं, आणि विशेषेंकरून संकेतार्थ असतां, न केलें, न करील, न करीं, न करावें, न करवतें, अशीं ही रूपें होतात.

ध्यानांत ठेवण्याजोगे अनेक प्रकारचे प्रयोग.

१ ' रामा आणि गोविंदा घरीं गेले. '

२ ' त्याचा घोडा, गाडी, आणि **पागोटें** काय **झालें** ?

(म्हणजे घोडा काय झाला, गाडी काय झाली, आणि पागोटें काय झालें ?) अथवा ' हीं काय झालीं ? '

३ ' आम्ही राजा आणि राणी पाहिली. अथवा राजा आणि राणी हीं पाहिलीं. '

४ ' मी, तूं आणि तो गेलों; ' ' तो आणि तूं गेलास अथवा गेलां.'

५ ' त्यानें घर **बांधायाचें** होतें. ' (कर्मप्रधान, विध्यर्थ भूतकाळ.)– अर्थ, बांधणें हें योग्य होतें.

६ ' त्यानें जायाचें होतें. ' (भावप्रधान, विध्यर्थ, भूतकाळ.)—वरच्या-प्रमाणेंच अर्थ. (एथें ' बांधावें होतें, ' ' जावें होतें, ' असे प्रयोग कोणी करितात, पण ते सर्वमान्य नव्हेत.)

७ ' त्याला (कर्ता) घर (कर्म) बांधायाचें आहे, कामें (कर्म) करायाचीं आहेत. ' (कर्मप्र०, विध्यर्थ भविष्यत्काळ.)—अर्थ, आवश्यकता.

८ ' त्याला (कर्ता) जायाचें आहे. ' (भावप्र.)—अर्थ, आवश्यकता.

९ ' त्याला (कर्ता) गोविंदाला (संप्र.) पैसे (कर्म) पाठवायाचे आहेत ' (कर्मप्र.) ; ' हरीला (कर्ता) वाघाला (कर्म) मारायाचें आहे ' (भावप्र.) –अर्थ, आवश्यकता.

१० ' तो घरीं जायाचा (विशेषण) आहे. '—अर्थ, नेमणूक. (अशा प्रकारचा सकर्मकाचा प्रयोग होत नाहीं. पण याच अर्थाचे अकर्मकीं ' तो जाणार आहे, ' सकर्मकीं ' तो काम करणार आहे, ' असे प्रयोग होतात.)

११ तो या वेळेस घरीं जायाचा नाहीं (जाणार नाहीं.) अर्थ, निश्चित गोष्ट. यांत ' जायाचा हें विशेषण मानावें, किंवा ' जायाचा नाहीं ' हें सगळें

क्रियापद मानावें, हें अधिक चांगलें. याप्रमाणेंच ‘ तो काम करायाचा नाहीं, ’ यांत ‘ करायाचा नाहीं ’ हें सगळें क्रियापद मानावें.

१२ ‘ तो न सांगतां निघून जायाचा, ’ ‘ पाहतां पाहतां तो लोकांचे खिसे कापायाचा.’ अर्थ, संभव. यांत ‘ जायाचा, ’ ‘ कापायाचा ’ हीं विशेषणें असून क्रियापदांप्रमाणें योजलीं आहेत. वस्तुतः मराठींतील बहुतेक क्रियापदें मुळचीं विशेषणेंच आहेत.

१३ ‘ सगळें काम झालें, आतां घरीं जायाचें. ’—अर्थ प्रसक्ति, म्हणजे क्रमानुसारें प्राप्ति. यांत ‘ जायाचें ’ हा कर्ता आणि ‘ आहे ’ हें गुप्त क्रियापद (कर्तृप्र०), अथवा ‘ आपण जायाचें ’ असा (भावप्र.) प्रयोग मानावा. ‘ आतां पोथी वाचायाची. ’ यांत ‘ वाचायाची ’ हें विशेषण, अथवा ‘ वाचायाची आहे ’ हें (कर्मकर्तृप्र०) क्रियापद मानावें.

१४ ‘ जो पैसा या कामाला लागायचा ’ (लागण्याला शक्य आहे) यांत ‘ लागायाचा ’ हें विशेषण, पूर्ववत् (उदा० १२ पहा.) क्रियापदाप्रमाणें मानतां येईल.

१५ ‘आम्हीं काम केलें पाहिजे,’ ‘आम्हाला काम केलें पाहिजे,’ यांत क्रियापदें कर्मप्रधान. याप्रमाणेंच ‘ गेलें पाहिजे ’ (भाव प्र०)—अर्थ, आवश्यकता. या स्थळीं ‘ करायाला पाहिजे,’ ‘जायाला पाहिजे,’ असेंही प्रयोग आढळतात: परंतु ते तितके प्रशस्त मानले जात नाहींत. ‘ करायास पाहिजे, ’ ‘ जायास पाहिजे, ’ हे प्रयोग तर अगदीं एकदेशीय मानले जातात. अर्थात् सर्वमान्य नव्हेत.

१६ तथापि इच्छा हा अर्थ असतां, ‘ त्याला खायाला पाहिजे, ’ ‘ शिकायाला नको, ’ हे प्रयोग प्रशस्त आहेत. यांत ‘ खायाला, ’ ‘ शिकायाला ’ हे वाक्यांतील कर्ते आहेत.

१७ ‘ त्याला लाडू खायाला पाहिजेत, ’ (इच्छा) ; ‘ ही गोष्ट मला तुम्ही सांगायाला नको, ’ (अनावश्यकता). यांतही सूक्ष्मपणें पाहतां कर्माचें प्राधान्य आहेच. तथापि एथें लाडू आणि गोष्ट हे कर्ते, आणि पाहिजेत आणि नको हीं क्रियापदें मानण्यास अडचण दिसत नाहीं.

१८ आपण एवढें काम केलें पाहिजे.—अर्थ, आग्रहाची आणि नम्रतेची विनंती.

१९ त्याला घरीं बसायाला (कर्ता) मिळतें, खेळायाला (कर्ता) सापडतें.

२० तो चालूं लागला, काम करूं लागला. यांत चालूं, करूं, हीं कृदंतनामें, प्रथमांत, आणि 'लागला' या सकर्मक क्रियापदाचीं कर्में. अथवा 'चालूं लागला,' 'करूं लागला,' अशीं दोन्हीं पदें मिळून संयुक्त क्रियापद (कर्तृप्रधान). यांच्या स्थळीं 'करायास लागला,' 'जायास लागला,' हे क्वचित् आढळणारे प्रयोग प्रायः एकदेशीय मानिले जातात. यापेक्षां 'करायाला लागला,' 'जायाला लागला,' हे कांहीं बरे.

२१ याप्रमाणेंच 'तो म्हणाला' याच्या स्थानीं 'म्हणायास लागला,' 'म्हणायाला लागला,' 'म्हणूं लागला' हे लांबट प्रयोग वाईट दिसतात. तथापि, 'तो श्लोक म्हणूं लागला,' (म्ह० त्यानें श्लोक म्हणायाला आरंभ केला,) इत्यादि प्रयोग प्रशस्त आहेत.

२२ '(तूं) त्याला काम करूं दे;' '(तुम्ही) त्याला काम करूं द्या.' यांत 'काम' हें 'करूं दे' आणि 'करूं द्या' यांचें कर्म. कोल्हापूर प्रांतीं 'तो काम करूं दे' (म्ह० करो), 'ते काम करूं देत (म्ह० करोत,) असे प्रयोग आढळतात; परंतु हे सर्वमान्य नव्हेत, आणि केव्हां केव्हां तर हे फार उद्धट दिसतात.

याप्रमाणेंच 'त्यानें पोथी लिहूं दिली,' 'मुलानें अंगरखा फाटूं दिला,' यांमध्यें ही संयुक्त क्रियापदें मानावीं.

२३ 'त्याला (कर्ता) काम (कर्म) करावें लागतें, अथवा करायाचें पडतें.' (कर्मप्र.) 'त्याला जावें लागतें' (भावप्र.)–अर्थ, आवश्यकता.

२४ 'तो काम करीना;' म्ह० त्याला काम करण्याची इच्छा झाली नाहीं. (भूतकाळ.) 'तो धोंडा हलेना;' म्ह० त्याच्या अगीं हलण्याचें सामर्थ्य आलें नाहीं. (भूतकाळ.) 'तो तें काम खुशाल करीना;' म्ह० कां करीत नाहीं? खुशाल करो, त्याला प्रतिबंध नाहीं. (वर्तमान.)

२५ वाक्यांत कर्माचें किंवा क्रियेचें प्राधान्य असतांही, कर्ता जर मध्यम पुरुषीं एकवचनीं असेल, तर क्रियापदापुढें 'स' हें अक्षर प्रशस्तपणें लागतें.

जसें—तूं काम केलेंस, तूं घरीं जावेंस, इ०. अनेकवचनीं कर्ता असल्यास 'त' हें अक्षर क्वचित् लागतें. जसें, तुम्ही त्याला धरिलेंत, इ०.

२६ 'पुरे' म्हणजे जितकें अवश्य पाहिजे तितकें आहे. अनेकवचन 'पुरेत.' यांवेगळीं पुरतें, पुरतात, इत्यादि इतर अकर्मक धातूंच्या रूपांप्रमाणें रूपें होतातच.

२७ 'कोण जाणे ?' म्हणजे कोणी जाणत नाहीं. मला ठाऊक नाहीं. 'न जाणों' म्हणजे आम्ही जाणत नाहीं; कदाचित्. याप्रमाणेंच 'नकळे' म्ह० कळत नाहीं, ठाऊक नाहीं. 'कोण जाणे' यामध्यें थोडासा उद्धटपणा दिसतो.

२८ सर्व धातुशब्दांवरून झालेलीं जीं भूतार्थक क्रियापदें, त्यांनाही नामांप्रमाणें विभक्ति लागतात. अर्थात् त्या वेळेस तीं नामेंच आहेत. जसें, केल्याला, केल्यास, केल्यानें, केल्यापासून, केल्याचा, केल्यांत, केल्यामुळें, केल्यावरून, इ०. यांना प्रथमा नाहीं, आणि यांचा मूळशब्द काय, हें ही स्पष्ट सांगतां येत नाहीं. 'केल्या' हें सामान्यरूप आहे, इतकें मात्र समजतें. याला 'कर' याचें क्रियावाचक भूत कृदंत नाम म्हणावें, आणि विभक्ति असेल ती सांगावी, म्हणजे झालें. हें नपुंसकलिंगी आहे. उदा० 'दुकाळ पडल्याला (म्ह० दुकाळ पडला होता, या गोष्टीला) आठ वर्षें झालीं;' 'चिंतूला (अथवा चिंतू) इकडे आल्याला दोन महिने झाले,' इ० यांच्या स्थानीं 'चिंतूला इकडे येऊन दोन महिने झाले,' असाही प्रयोग, आढळतो. 'उद्योग केल्यास (उद्योग केला, या गोष्टीला, अथवा जर उद्योग केला तर) फळ मिळेल.' या वाक्यांत भूतार्थ नाहीं, केवळ संकेत आहे. एथें 'केल्यास' या शब्दाला नुसतें संकेतार्थक कृदंत अव्यय मानण्यासही बाध नाहीं. तात्पर्य एकच.

२९ याप्रमाणें करायाला, करावयाला, इत्यादिकांचाही मूळ शब्द अमुक असें स्पष्ट सांगतां येत नाहीं. जसें, तो विद्या शिकायाला अ० शिकायास मुंबईस आला आहे, 'चणे खायाला त्याला दांत नाहींत,' इ०. हीं पूर्ववत् क्रियावाचक नामें खरीं, पण यांत भूतार्थ नाहीं. करायाला, खायाला

यांच्या स्थानीं करायला, खायला, अशीं संक्षिप्त रूपेंही बोलण्यांत येतात. तथापि यांच्याच जोडीचीं स-प्रत्ययांत, रूपें-करायस् बसायस्, इत्यादि जरी क्वचित् कोठें ऐकण्यांत आलीं, तरी तीं प्रशस्त मानलीं जात नाहींत.

३० ' पत्र पोंचतांच वर्तमान समजलें, ' चोरानें गाठोडें उचलतांच गवगवा झाला.' यांत ' पोचतां,' ' उचलतां ' हीं भूतार्थक अव्ययें आहेत. आणि ' उचल ' धातु सकर्मक असल्यामुळें, त्या कारणास्तव ' उचलतांच ' यामध्यें कर्माचें प्राधान्य ध्वनित होतें, आणि त्यामुळें कर्ता तृतीयांत होतो. पोंचतांच (पोचे तआच) ह्मणजे पोचतें किंवा पोचलें तेव्हांच, उचलतांच (उचली तआच) म्हणजे उचलतो किंवा उचललें तेव्हांच. (संस्कृत ' तदा एव'.) भविष्यत्काळींही या प्रकारचें वाक्य येतें. जसें,-सोळावें वर्ष संपतांच तो देश पहायाला निघणार आहे.

३१ ' च ' या अव्ययाचा अर्थ ' निश्चयें करून'. अर्थात् हें क्रियाविशेषण आहे. च, ही (समुच्चयार्थक अव्यय), हे शब्द पूर्वशब्दांला चिकटून लिहिण्याचा संप्रदाय पडला आहे.

३२ सूर्य उगवतांक्षणींच (उगवे तदा क्षणामध्येंच, अथवा उगवे तत्क्षणींच) यांत ' उगवतां ' आणि ' क्षणीं ' हे शब्द वेगवेगळे मानावे; अथवा ' उगवतांक्षणीं ' हें सर्व संयुक्त अव्यय मानावें; अथवा ज्या क्षणीं सूर्य उगवतो, तो सूर्य उगवताक्षण आणि त्याक्षणीं म्ह० सूर्य उगवता (अथवा उगवते) क्षणीं; अशा प्रकारें ' उगवता ' हें ' क्षण ' याचें विशेषण मानावें.

३३ जातां जातां, लिहितां लिहितां, इत्यादि द्विरुक्त अव्ययें वर्तमानकालबोधक आहेत. जसें,-तो मुलगा पुस्तक वाचतां वाचतां झोपीं गेला; चालतां चालतां तो उड्या मारूं लागला, इ०.

३४ ' सूर्य उगवे पर्यंत ' यांत सूर्य उगवे (म्ह० उगवतो, उगवला, उगवेल,) तोंपर्यंत असा स्पष्ट अर्थ घ्यावा. अथवा ' सूर्य उगवे' हें सर्व वाक्य नामाप्रमाणें मानून त्यापुढें ' पर्यंत ' हें अव्यय मानणें कित्येकांस बरें दिसतें.

३५ अव्ययांचा उपयोग केव्हां केव्हां नामाप्रमाणें होतो. जसें,-केव्हांपासून म्हणजे कोणत्या वेळेपासून; उद्यांसाठीं म्हणजे येत्या दिवसासाठीं. इ०.

३६ ल-प्रत्ययांत कृदंताचे अर्थ.-निजलेलें (जें निजलें आहे तें) मूल. केलेलें (कोणीतरी केलें आहे तें) काम. राहिलेलें (ज्या घरीं आपण राहत असूं तें) घर. चाललेली (ज्या वाटेनें आपण कधीं तरी चाललों होतों ती) वाट. गाणें ऐकलेला (ज्यानें गाणें ऐकलें आहे असा) मनुष्य. पैसा पाठविलेला (ज्याला किंवा ज्यानें पैसा पाठविला होता तो) मनुष्य. इ०. वाक्याच्या ओघावरून हे अर्थ लक्षांत घ्यावे.

३७ डोक्यांत पागोटें घालणें, पायांत जोडा घालणें, अंगांत अंगरखा घालणें, इत्यादि प्रयोगांचा अर्थ-डोक्याच्या आश्रयानें पागोटयाची योग्य योजना करणें, इत्यादि प्रकारें होतो.

३८ ' अश्व म्हणजे घोडा.' याचा सूक्ष्म शब्दार्थ पाहिला तर ' घोडा अश्व म्हटला जातो,' असा आहे. परंतु असें उलट वाक्य न घेतां, ' अश्व (सुगमशब्दानें अथवा अर्थानें) घोडा आहे,' असा भावार्थ घेण्यास बाध दिसत नाहीं. म्हणून ' अश्व ' हा कर्ता, ' घोडा ' हें विधिनाम, ' आहे' हें अध्याहृत क्रियापद, आणि ' म्हणजे ' हें क्रियाविशेषण.

३९ ' त्याला कोणी अपशब्द बोलतां नये.' (कर्मप्रधान) अर्थ,-अपशब्द बोलणें योग्य नव्हे.

४० ' त्यानें कथा निवेदन केली.' अशा प्रकारचे शिथिल प्रयोग न करितां, 'त्यानें कथा निवेदित केली,' किंवा 'कथेचें निवेदन केलें,' किंवा दोहोंचा मिळून एक शब्द करून, ' कथानिवेदन केलें ' असा प्रयोग करावा, हें योग्य दिसतें. तथापि जेथें शिथिल प्रयोग आढळेल, तेथें ' निवेदन ' हें नाम ' निवेदित ' या विशेषणाच्या अर्थीं योजलें आहे ' असें मानून निर्वाह करून घ्यावा.

४१ ' पैसा असला म्हणजे सर्व मिजाशी आठवतात.' यांत 'म्हणजे' याचा अर्थ ' तर ' किंवा ' तर मग ' (संकेतार्थक अव्यय.) ' दुपार झाली म्हणजे सूर्य पश्चिमेस वळतो ' यांत ' म्हणजे ' याचा अर्थ ' नंतर ' ' म्हटलें म्हणजे अशी गोष्ट होऊं नये.' यांत ' म्हटलें म्हणजे ' इतकें सर्व क्रियाविशेषण. अर्थ,-प्रशस्त गोष्ट कोणती असें म्हटलें तर.'

४२ प्रश्नवाक्यांमध्यें कोण, काय, कोठें, अशा प्रकारचा कांहीं खरोखरी प्रश्नार्थक शब्द नसला, तर प्रायः 'काय?' हें अव्यय योजतात. जसें,–'पुस्तक मिळालें काय?' केव्हां केव्हां बोलण्याच्या सुरावरूनच प्रश्न समजतो. जसें,–नाना आला? इ०. केव्हां केव्हां कीं, किंवा, यांचाही प्रयोग होतो. जसें,–तूं येणार कीं नाहीं? तो आला किंवा नाहीं? इ०.

४३ कोणत्याही भाषणावर नेट द्यायाचा असला, तर 'नव्हे काय?' किंवा 'कां नाहीं?' या अर्थाचें 'ना' असें अव्यय शेवटीं योजतात. जसें. अरे मुला, इकडे ये–आलों ना?' 'अहो जातां कां? घटकाभर बसाना?' इ० प्रश्नांतील अर्थ आपणाला इष्ट किंवा विदित आहे, असेंही यापासून ध्वनित होतें. जसें,–'तो गृहस्थ संभावित आहे ना?' 'तो लबाड तर नाहींना?' 'गोविंदराव आले आहेत ना, त्यांना भेटायाला गेलें पाहिजे.'

४४ 'रामा म्हणून एक मुलगा होता.' यांत 'रामा म्हणून' (म्ह० रामा म्हटलेला) हें 'मुलगा' याचें विशेषण.

४५ 'तुम्ही पत्र पोचतांच निघून येणें.' यांत 'येणें' हें नाम 'यावें' या अर्थीं क्रियापदाप्रमाणें योजलें आहे. (भावप्र०).

४६ 'तो मुलगा भला आहे' म्हणून (किंवा 'यामुळें' किंवा 'आणि त्यामुळें') सर्वांस आवडतो. यांत 'म्हणून' याच्या स्थळीं 'आणि म्हणून' असें म्हणूं नये.

४७ 'वाघ मारिला गेला,' इत्यादि स्थळीं 'वाघ मेला गेला' इत्यादि प्रकारें अकर्मक क्रियापदाचा प्रयोग करूं नये. तो अशुद्ध आहे.

४८ बोल, म्हण, आणि सांग, यांच्या प्रयोगामध्यें कित्येक लोक फार गोंधळ करितात. तो न व्हावा म्हणून हीं शुद्ध उदाहरणें दिलीं आहेत.

बोल.—हा मुलगा फार बोलतो. बोलूं नको, चूप राहा. तो माझ्याशीं बोलत नाहीं. मला जें कांहीं बोलायाचें आहे, तें मी थोडक्यांत बोलतों. तो कधींही खोटें बोलत नसतो.

म्हण.—सदू नित्य रामरक्षा म्हणतो. क म्हण, ट म्हणूं नको. जेवणाला अजून अवकाश आहे; तुम्हांला स्तोत्रबित्र म्हणावयाचें असेल तर स्वस्थपणें म्हणा.

सांग.—हें वर्तमान तुम्हांला कोणी सांगितलें? मी तुमचा निरोप त्याला काल्च सांगितला (किंवा कळविला). मी तुला सांगतों कीं तूं असला वेडे-पणा करूं नकोस. मला जें कांहीं सांगायाचें असेल तें मी उद्यां सांगेन.

तुमचें बोलणें मला समजलें नाहीं; तुम्ही म्हणतां काय, हें मला नीट सांगा. मी म्हणतों कीं तुम्ही त्या मूर्खाचें बोलणें ऐकून फसूं नका. तो कोणालाही भलतेंच कांहीं तरी सांगत असतो.

मराठी भाषेची उत्पत्ति.

' संस्कृत ' म्हणून जी प्राचीन भाषा सुप्रसिद्ध आहे, तिजमध्यें अंतर पडतांपडतां कांहीं काळानें ' माहाराष्ट्री ' म्हणून (२००० वर्षांमागें) भाषा झाली, आणि माहाराष्ट्रीमध्यें अंतर पडतां पडतां सांप्रतची ' मराठी ' भाषा झाली आहे. मराठीमध्यें पुनः शुद्ध संस्कृत शब्द मिसळले आहेत. यांशिवाय मुसलमान राजांच्या सहवासानें आरबी, फारसी, हिंदुस्थानी शब्द पुष्कळ मिसळले आहेत. आणि अलीकडे इंग्रजी शब्दही मिसळत चालले आहेत. यांवेगळे कितेक निवळ ' देशी ' म्हणून शब्द आहेत, त्यांच्या उगमाचा अद्यापि चांगलासा पत्ता लागलेला नाहीं.

संस्कृत शब्द.—नदी, राजा, मार्ग, गमन, पर्वत, पात्र इत्यादि सहस्रावधि शब्दांचा मराठींत भरणा आहे-

माहाराष्ट्रींतून आलेले शब्द.—सं० हस्त; माहा० हत्थ; म० हात.—सं० पर्ण; मा० पण्ण; म० पान.–सं० स्तंभ; मा० खंभो; म० खांब.–सं० विद्युत्; मा० विज्जुअ; म० वीज. इ०.

देशी शब्द.—डोळा, बोट, धोंडा, रेडा, डोंगर, इ०.

आरबी शब्द.—अक्कल, इलाज, जाहीर इ०.

फारशी शब्द.—उमेद, दरबार, दर्या, इ०.

हिंदुस्थानी शब्द.–कामगार, असवार, मतवाला, इ०

इंग्रजी शब्द.–बुक, टेबल, कंपनी, स्टेशन, पेनसिल, स्लेट, इत्यादि.

या सर्व शब्दांचे तीन भेद. सिद्ध, साधित, आणि सामासिक.

जे अगदीं साधे शब्द ते सिद्ध. जसें—घर, पैसा, भाजी, कृपा इ०.

जे शब्द दुसऱ्या शब्दापासून उत्पन्न होतात, ते **साधित**. साधित शब्दांचे भेद दोन, **कृदंत** आणि **तद्धित**. जे शब्द धातुशब्दापासून उत्पन्न होतात, ते **कृदंत**; आणि जे शब्द नामें, विशेषणें किंवा अव्ययें यांपासून उत्पन्न होतात ते **तद्धित**.

धातु	प्रत्यय	कृदंतें	शब्द	प्रत्यय	तद्धितें
दळ	ण	दळण	राग	ईट	रागीट
लिही	णावळ	लिहिणावळ	असा	ला	असला
खेळ	कर	खेळकर	पांच	वा	पांचवा
नेम	णूक	नेमणूक	तेथें	चा	तेथचा
कर	णी	करणी इ०	पाटील	की	पाटिलकी इ०

दोन किंवा अधिक शब्द एकत्र मिळून जो एक शब्द होतो, तो **सामासिक**. जसें राजवाडा, हरिदास, इ०.

अशा रीतीनें शब्द उत्पन्न होणें याला समास म्हणतात.

समासाचे प्रकार सात.—अव्ययीभाव, तत्पुरुष, कर्मधारय, बहुव्रीहि, द्वंद्व, मध्यमपदलोपी, आणि द्विगु.

ज्या समासानें जोडलेले शब्द अव्ययाप्रमाणें योजले जातात, तो **अव्ययीभाव**. जसें—घरोघर, हरघडी, दररोज, इ०.

ज्या समासामध्यें पूर्वशब्दाची विभक्ति जाते, आणि उत्तरशब्द प्रमुख होतो, तो **तत्पुरुष**. जसें, द्वितीयातत्पुरुष—**परपीडा**; तृतीयातत्पुरुष—**द्रव्य-साध्य**; चतुर्थीतत्पुरुष—**पोळपाट**; पंचमीतत्पुरुष—चोरभय; षष्ठीतत्पुरुष—राजवाडा; सप्तमीतत्पुरुष—गृहप्रवेश; इ०. नव्हे जो ब्राह्मण तो 'अब्राह्मण' याला नञतत्पुरुष म्हणतात.

विशेषण आणि विशेष्य यांचा जो समास तो **कर्मधारय.** जसें-नील-कमल, शुक्लपक्ष, इ० (वस्तुतः हा प्रथमातत्पुरुषच आहे.)

योजलेल्या शब्दांहून भिन्न अर्थाकडे ज्या समासाचें लक्ष्य असतें, तो **बहुव्रीही.** जसें–चतुर्भुज (म्ह. विष्णु), मृगनयना (म्ह. सुंदर स्त्री) इ०.

अनेक शब्दांचा समुच्चय दाखविणारा जो समास, तो द्वंद्व. जसें–रामलक्ष्मण, कुणबीमाळी, इ०.

दोन शब्दांचा समास होऊन त्यामध्यें पुष्कळ लांबट अर्थाचा संग्रह होतो, तेव्हां तो **मध्यमपदलोपी.** जसें-साखर, केशर इत्यादि कित्येक पदार्थ घालून कांहीं विशेष रीतीनें केलेला जो भात तो साखरभात; दहिंवडी, इ०.

ज्यामध्यें पूर्वशब्द संख्यावाचक असून, सर्व शब्द एकवचनीं असतो, तो द्विगु. जसें–पंचपाळें, तिधारें, इ०.

संधिविचार

निरनिराळे वर्ण एकत्र उच्चारतांना जीभ अडखळूं नये म्हणून, त्यांच्या स्थानीं जो सोपा उच्चार येतो, त्याचें नांव **संधि**, अर्थात् सांधा.

संस्कृत शब्दांमध्यें संधि पुष्कळ येतात; पण त्यांतून कामापुर्ते एथें सांगतों.

१. अ, इ, उ, ऋ, यांतून कोणताही स्वर ऱ्हस्व किंवा दीर्घ कसाही असून, त्यापुढें तोच स्वर, ऱ्हस्व दीर्घ कसाही आला, तर ते दोन्ही स्वर जातात, आणि दोहोंच्या स्थानीं मिळून त्यांचा दीर्घ स्वर येतो. उदा०

दैव — अधीन — दैवाधीन	गिरि — ईश — गिरीश
फल — आशा — फलाशा	साधु — उक्ति — साधूक्ति
गंगा — अर्पण — गंगार्पण	चमू — उत्साह — चमूत्साह
कृपा — आरंभ — कृपारंभ	पितृ — ऋण — पितॄण

२. अ अथवा आ आधीं असला, आणि त्यापुढें कोणताही भिन्न स्वर आला, तर ते दोन्ही जातात. आणि दोहोंच्या स्थानीं मिळून एक वेगळाच संधि येतो; पण तो सर्वदा पुढील स्वराच्याच धोरणानें येतो. तो असा,--पुढील वर्ण इ किंवा ई असल्यास ए; उ-ऊ असल्यास ओ; ऋ-ॠ असल्यास अर्; ऌ असल्यास अल्; ए-ऐ असल्यास ऐ; ओ-औ असल्यास औ. उदा०—

देव – इच्छा – देवेच्छा	गुण – एकत्व – गुणैकत्व
रमा – ईश – रमेश	सुख – ऐश्वर्य – सुखैश्वर्य
सूर्य – उदय – सूर्योदय	इच्छा – ऐक्य – इच्छैक्य
विद्या – उद्देश – विद्योद्देश	वन – ओषधि – वनौषधि
देव – ऋषि – देवर्षि	देव – औदार्य – देवौदार्य
तव – ऌकार – तवल्कार	कृपा – औदार्य – कृपौदार्य
याला 'गुणादेश' म्हणतात	याला 'वृद्ध्यादेश' म्हणतात

३. या येत्या प्रकारामध्यें प्रथमचा स्वर मात्र जातो, आणि त्याच्या स्थानीं वेगळाच वर्ण येतो; पुढील स्वरामध्यें कांहींच भेद पडत नाहीं, हें नीट ध्यानांत ठेवावें. अ—आ सोडून दुसरा कोणताही स्वर आधीं असला, आणि पुढें कोणताही भिन्न स्वर आला, तर प्रथमस्वराच्या स्थानीं वेगळाच वर्ण येतो. तो असा–इ ई यांच्या स्थानीं य्; उ ऊ यांच्या स्थानीं व्; ऋ ॠ यांच्या स्थानीं र्; ऌ यांच्या स्थानीं ल्; ओ यांच्या स्थानीं अव्. उदा०—

रवि — उदय — रव्य् — उदय — रव्युदय
नदी — ओघ — नद्य् — ओघ — नद्योघ
गुरु — आज्ञा — गुर्व् — आज्ञा — गुर्वाज्ञा
चमू — ईश — चम्व् — ईश — चम्वीश
पितृ — आज्ञा — पित्र् — आज्ञा — पित्राज्ञा
ऌ — अनुबंध — ल् — अनुबंध — लनुबंध
गो — ईश — गव् — ईश — गवीश इत्यादि

याला 'यणादेश' म्हणतात.

४. त् यापुढें चवर्ग, टवर्ग, किंवा ल् आला, तर त् जाऊन त्याच्या स्थानीं पुढील वर्णासारखाच, पण अल्पप्राण वर्ण येतो.

क् हा अल्पप्राण, ख् हा महाप्राण; ग् ङ् हे अल्पप्राण, घ् हा महाप्राण; असें प्रत्येक वर्गांत जाणावें. श् ष् स् हे महाप्राण. य् र् ल् व् हे अल्पप्राण.

सत् — चरित्र — सच्चरित्र
तत् — छाया — तच्छाया
तत् — जाया — तज्जाया
बृहत्— झंकार — बृहज्झंकार
तत् — टीका — तट्टीका
तत् — डमरु — तड्डमरु
तत् — ढक्का — तड्ढक्का
सत् — लीला — सल्लीला इ०

५. त् यापुढें श आला, तर दोन्ही व्यंजनें जातात, आणि दोहोंच्या स्थानीं मिळून च्छ् हें संयुक्त व्यंजन येतें. जसें, सत्–शास्त्र–सच्छास्त्र; तत्–शब्द–तच्छब्द; इ०.

६. क् ट् त् प् यांतून कोणत्याही व्यंजनापुढें कोणत्याही वर्गांतील पांचवें म्हणजे अनुनासिक व्यंजन आलें, तर क् ट् त् प् यांच्याही स्थानीं त्या त्या वर्गांतील पांचवें व्यंजन येतें. जसें—

पृथक् — नाम — पृथङ्नाम
वाक् — मन — वाङ्मन
षट् — मुख — षण्मुख
प्रावृट् — नदी — प्रावृण्नदी
तत् — नयन — तन्नयन
सत् — मान — सन्मान
अप् — मय — अम्मय
ककुप् — नाग — ककुम्नाग इ.

७. क् ट् त् प् यांपुढें कोणत्याही वर्गांतील तिसरें किंवा चौथें व्यंजन, किंवा य् र् ल् व् ह्, किंवा कोणताही स्वर आला, तर प्रथम वर्णाच्या स्थानीं त्याचा तिसरा वर्ण येतो. म्हणजे क्च्या स्थानीं ग्; ट्च्या स्थानीं ड्; त्च्या स्थानीं द्; आणि प्च्या स्थानीं ब्; हीं व्यंजनें येतात. उदा०—

वाक् — ईश — वागीश
वाक् — दान — वाग्दान
तत् — आशा — तदाशा
चित् — गुण — चिद्गुण

प्रावृट् — जल — प्रावृड्जल   अप् — द — अब्द
षट् — गुण — षड्गुण   सुप् — अंत — सुबंत इ०

८. वर्गांतील पहिल्या चार व्यंजनांतून कोणत्याही व्यंजनापुढें ह् आला, तर तीं दोन्ही व्यंजनें जाऊन, त्यांच्या स्थानीं त्याच वर्गांतील तिसरें आणि चौथें हीं व्यंजनें येतात.; अथवा मागील नियमाप्रमाणें कार्य होतें. जसें—

वाक् — हसित — वाग्घसित — किंवा वाग्हसित
षट् — होतृ — षड्ढोतृ — किंवा षड्होतृ
सत् — हरि — सद्धरि — किंवा सद्हरि
अप् — ह्रास — अब्भ्रास — किंवा अब्ह्रास इ०.

प्रायः ' वाग्घसित ' इत्यादि प्रकारचींच रूपें येतात. ' वाग्हसित ' इत्यादि क्वचित्.

व्याकरण करण्याची रीति.

मुलांनीं विद्याभ्यासाकडे चित्त ठेवावें.

मुलांनीं—हें ' मूल ' या अकारांत नपुंसकलिंगी सामान्यनामाच्या तृतीयेचें अनेकवचन. हा 'ठेवावें' या क्रियापदाचा कर्ता.

विद्याभ्यासा—हें ' विद्याभ्यास ' या अकारांत पुल्लिंगी सामान्यनामाचें एकवचनीं सामान्यरूप, ' कडे ' या अव्ययाच्या योगानें. ' विद्याभ्यास ' हा षष्ठीतत्पुरुष समास.

कडे—हें प्रत्ययार्थक अव्यय. ' विद्याभ्यासाकडे ' या सर्व पदाचा अर्थ, ' ठेवावें ' याचें अधिकरण.

चित्त—हें ' चित्त ' या अकारांत नपुंसकलिंगी सामान्यनामाच्या प्रथमेचें एकवचन. हें ' ठेवावें ' या क्रियापदाचें कर्म.

ठेवावें—हें ' ठेव ' या सकर्मक धातूचें सातव्या आख्यातीं अन्यपुरुषीं नपुंसकलिंगी एकवचन. याचा अर्थ धर्म, आणि यांत प्राधान्य ' चित्त ' या कर्माचें.

परमेश्वर सर्वांचा त्राता आहे.

परमेश्वर—हें 'परमेश्वर' या अकारांत पुल्लिंगी विशेषनामाच्या प्रथमेचें एकवचन. हा 'आहे' या क्रियापदाचा कर्ता.

सर्वांचा—हें 'सर्व' या नामार्थक (म्हणजे नामाप्रमाणें योजलेल्या) पुल्लिंगी संख्याविशेषणाच्या षष्ठीचें अनेकवचन. याचा संबंध 'त्राता' याकडे.

त्राता—हें 'त्राता' या आकारांत पुल्लिंगी सामान्यनामाच्या प्रथमेचें एकवचन. याचा अर्थ विधान.

आहे—हें 'आहे' किंवा 'अस' या अकर्मकधातूचें प्रथम आख्यातीं अन्यपुरुषीं पुल्लिंगी एकवचन. याचा अर्थ वर्तमानकाळ, आणि यांत प्राधान्य 'परमेश्वर' या कर्त्याचें.

त्या मुलाला बोलाव.

त्या—हें 'तो' या पुल्लिंगी सर्वनामाचें लुप्तद्वितीयेचें एकवचनीं सामान्यरूप. याचें विशेष्य 'मुलाला.'

मुलाला—हें 'मूल' या अकारांत पुल्लिंगी सामान्यनामाच्या द्वितीयेचें एकवचन. हें 'बोलाव' या क्रियापदाचें कर्म.

बोलाव—हें 'बोलाव' या सकर्मक धातूचें साहाव्या आख्यातीं मध्यमपुरुषीं सामान्यलिंगीं एकवचन. याचा अर्थ आज्ञा; आणि यांत प्राधान्य 'तूं' या अध्याहृत कर्त्याचें.

शुद्धिपत्र

पृष्ठ ३९०-१-२, एथें 'चाव' धातूच्या संबंधानें अधिक सांगायाचें—

'चाव' धातूपासून, 'त्यानें आपली जीभ चावली' (कर्मप्र.); 'तो कुत्रा हाडकें चावीत असतो;' 'ती मुलगी तुझें बोट चावील, संभाळ;' इत्यादि प्रकारें इतर सकर्मक धातूंप्रमाणेंही रूपें होतात. थोडासा अर्थभेद आहे, हें सहज लक्षांत येईल.

NOTES ON MARATHI ORTHOGRAPHY

लेखनशुद्धि

(स्वतंत्र पुस्तक)

सुधारलेली तिसरी* आवृत्ति

इ० सन १८९२

[* महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धि.
पहिली आवृत्ति, इ० स० १८६९, दुसरी आवृत्ति १८७८.]

लेखनशुद्धि.

भाषा शुद्ध रीतीनें लिहितां बोलतां येणें हें, वहिवाटीनें आणि व्याकरणाच्या अभ्यासानें होतें खरें; तथापि लिहिण्याच्याच संबंधाचे त्यांतले नियम थोडक्यांत वेगळे दिलेले मिळावे, आणि जे कित्येक नियम व्याकरणामध्येंही आले नाहींत, त्यांचाही संग्रह व्हावा, म्हणून हें लहानसें पुस्तक केलें आहे.

मराठी भाषा शुद्ध लिहिण्याला मुख्यत्वें दोन प्रकारच्या अडचणी उत्पन्न होतात. पहिली अडचण, इ उ या वर्णांच्या ऱ्हस्वदीर्घांचें अज्ञान; आणि दुसरी अडचण, सानुनासिक अक्षरांचें अज्ञान.

पुढील पत्रांमध्यें प्रस्तुत विषयाचे चार भाग केले आहेत. पहिल्या भागांत, शुद्ध मराठी शब्दांतील इ उ वर्णांविषयीं नियम; दुसऱ्यामध्यें, मराठींत येणाऱ्या संस्कृत शब्दांतील इ उ वर्णांविषयीं नियम; तिसऱ्यामध्यें, सानुनासिक वर्णांविषयीं नियम; आणि चवथ्यामध्यें, या विषयाच्या संबंधानें दुसऱ्या कित्येक किरकोळ गोष्टींचा विचार; अशी योजना केली आहे.

भाग पहिला.

शुद्ध मराठी शब्दांतील इ उ या स्वरांविषयीं.

जे शब्द संस्कृत भाषेपासून अपभ्रंश पावून मराठी झालेले, आणि जे मूळचेच मराठी ते **शुद्ध मराठी.**

अंत्य अक्षर म्हणजे शेवटचें अक्षर; आणि अंत्य अक्षराच्या पूर्वीचें अक्षर तें उपांत्य अक्षर.

१. **अंत्य अक्षरांतील इ उ या स्वरांविषयीं नियम.**—शुद्ध मराठी शब्दाच्या अंतीं जर इ किंवा उ हा स्वर असेल, तर तो दीर्घ असतो. उदाहरणें—

नामें—हत्ती, पाणी, लोणी, काठी, वाटी, सासू, विठू, लाडू, इत्यादि.

सर्वनामें—मी, तूं, ती, कोणी, इ०.

विशेषणें—आर्जवी, खेळाडू, कडू, चांगली, शाहणी, इ०,

क्रियापदें—आली, गेली, येऊं, जाऊं, इ०

अव्ययें—आधीं, कधीं, हळू, इ०.

अपवाद—वरील नियमाला एकच अपवाद आहे तो हा—

आणि या शब्दाच्या शेवटचा इ हा स्वर ऱ्हस्व आहे.

२. **उपांत्य अक्षरांतील इ उ या स्वरांविषयीं नियम**—शब्दाच्या अंतीं जर साधें* ऱ्हस्व अक्षर असेल, तर उपांत्य अक्षरांतील इ उ हे स्वर दीर्घ असतात. उदाहरणें—मीठ, पीठ, तीळ, दूध, तूप, सूप, इ०.

प्रत्युदाहरणें—(म्हणजे नियम मोडल्यामुळें उलट प्रकारें होणारीं उदाहरणें).

(क) विडा, दिवा, हिरा, शिसें, पुरी, सुई, गुरें, इत्यादि शब्दांत अंत्य अक्षरें ऱ्हस्व नाहींत; म्हणून उपांत्य अक्षरांतील इकार उकार दीर्घ नाहींत.

(ख) भिल्ल, शिस्त, भिस्त, पुस्त, सुस्त, इत्यादि शब्दांत अंत्य अक्षरें साधीं नाहींत, संयुक्त म्हणजे जोडाक्षरें आहेत. म्हणून उपांत्य अक्षरांतील इकार उकार दीर्घ नाहींत.

(ग) पुस्ती, कुस्ती, किल्ली, चिठ्ठी, बुट्टी, पुड्ठा, इत्यादि शब्दांत अंत्य अक्षरें संयुक्त असून दीर्घही आहेत; म्हणून उपांत्य अक्षरांतील इकार उकार दीर्घ नाहींत.

स्पष्ट अनुस्वार हा व्यंजनासारखाच आहे. जसें—हिंग, शिंप, सुंठ, बुंद, यांचा उच्चार हिङ्ग, शिम्प, सुण्ठ, बुन्द, असा होतो. म्हणून

* जोडाक्षर नव्हे तें साधें.

कोणत्याही अक्षरावरील स्पष्ट अनुस्वार आणि पुढील अक्षर मिळून जोडाक्षरासारखेंच होतें. यामुळें पुढील नियम—

३. उपांत्य अक्षरांत इ किंवा उ हा स्वर असून जर त्यावर स्पष्ट अनुस्वार असेल, तर तो स्वर ऱ्हस्व असतो. उदाहरणें—भिंत, चिंच, सुंठ, रुंद, उंट, सुंब, इ०

प्रत्युदाहरणें—हींव, शींव, इत्यादिकांत स्पष्ट अनुस्वार नाहीं; केवळ अनुनासिक बिंदु आहे; म्हणून उपांत्य अक्षर ऱ्हस्व नाहीं.

४. दोहोंपेक्षां अधिक अक्षरांच्या शब्दांतील इ उ स्वरांविषयीं नियम—ज्या शब्दांत दोहोंपेक्षां अधिक अक्षरें आहेत, त्यांत शेवटच्या दोन अक्षरांपूर्वी जर इ किंवा उ हा स्वर असेल, तर तो ऱ्हस्व असतो. उदाहरणें–सांगितलें, किरकोळ, भिजला, कुळकर्णी, सुतार, मुलगा, उनाड, इ०.

५. विशेष नियम—

(क) कांहीं–सा, थोडी–शी, भाजी–वाला, लाडू–खाऊ, इत्यादि शब्दांची उत्पत्ति लक्षांत आणून तिच्या अनुरोधें त्यांचे दोन दोन भाग करून मग वरील नियम लावावे. अर्थात् जरी ते दोन दोन वेगळे शब्द नाहींत, तरी वेगळे आहेत असें कल्पून मग नियम लावावे. नाहीं तर पहिल्या भागाच्या शेवटचीं अक्षरें (३ ऱ्या आणि ४ थ्या नियमांवरून) ऱ्हस्व होऊं लागतील.

(ख) शब्दापुढें विभक्तिप्रत्यय अथवा शब्दयोगी अव्यय आल्यामुळें जें सामान्यरूप होतें, तेंही वेगळ्या शब्दाप्रमाणें मानावें. अर्थात् त्याच्या अंतीं ई किंवा ऊ हा स्वर असल्यास तो (१ ल्या नियमाप्रमाणें) दीर्घच राहतो; पुढील अक्षराच्या निमित्तानें त्यामध्यें ऱ्हस्वत्व येत नाहीं. उदाहरणें—काठी–ला, नदी–चा, सासू–नें, विठू–ला, नदी–वर, पाठी–मागें, इ०.

अपवाद— ती, जी, ही, तूं, या एकाक्षरी सर्वनामांतील जे ईकार, ऊकार, ते प्रत्ययामुळें ऱ्हस्व होतात, जसें–तिला, जिला, हिला, तुला, इ०.

सूचना— बहीण, विहीण, तूप, सूत, इत्यादि शब्दांत उपांत्य स्वर दीर्घ कां; आणि बहिणीस, विहिणीस, तुपाचा, सुतानें, इत्यादि शब्दांत तेच स्वर ऱ्हस्व कां झाले; याचें उत्तर नियम १ आणि २ यांवरून सहज लक्षांत येईल.

६. परभाषांतील शब्द मसूदा, नमूना, वकीलात, जाहीरात, इत्यादि. यांतील इकार, उकार कोणी असेच दीर्घ लिहितात. परंतु अलीकडे मराठीच्या रीतीला अनुसरून नमुना, मसुदा, वकिलात, जाहिरात, असे ऱ्हस्व लिहिण्याकडे पुष्कळांचा कल होत चालला आहे. वास्तव ते ऱ्हस्व-युक्त लिहावे हें बरें.

भाग दुसरा.

मराठींत येणाऱ्या संस्कृत शब्दांतील इ उ स्वरांविषयीं.

७. श्री, धी, गी, स्त्री, ह्री, भू, भ्रू, सुधी, सुभ्रू, श्वश्रू, यांतील अंत्य स्वर दीर्घ आहे. (यांत श्री, स्त्री, यांच्या विभक्तींचीं रूपें श्रीला, श्रियेला; स्त्रीला, स्त्रियेला, अशीं होतात. पण इतर शब्दांमध्यें ई ऊ स्वर दीर्घ राहून श्रीला, धीला, असें एकेकच रूप होतें.)

८. हस्त आहे ज्याला तो हस्ती; गुण आहे ज्याला तो गुणी; ऋण आहे ज्याला तो ऋणी; इत्यादि स्वामित्वसूचक जे संस्कृत पुल्लिंग शब्द, त्यांचा इ हा अंत्यस्वर दीर्घ असतो. उदाहरणें—हस्ती, करी, गुणी, ऋणी, संन्यासी, मंत्री, वादी, प्रतिवादी, चक्री, वनमाली, इ० (संस्कृतांत यांना इन्नंत शब्द म्हणतात)

९. तथापि या शब्दांपुढें अन्य शब्द येऊन समास झाला, किंवा साधित प्रत्यय (तद्धित) आला, तर तेथें हे शब्द ऱ्हस्व असतात. उदाहरणें—हस्ति–दंत, गुणि–जन, फणि–वर, हस्तिनी, करिणी, मालिनी, इ०.

१०. शब्दामध्यें रेफयुक्त जोडाक्षरापूर्वी जर इ किंवा उ हा स्वर असेल, तर तो दीर्घ असतो. उदा० --

दीर्घ, कीर्ण, जीर्ण, उत्तीर्ण, विस्तीर्ण, विदीर्ण, शीर्ण, तीर्थ, गांभीर्य, वीर्य, ईर्ष्या, मार्गशीर्ष, शीर्ष, मूर्ख, कूर्च, मूर्छा, ऊर्जा, ऊर्णा, घूर्ण, चूर्ण, तूर्ण, पूर्ण, धूर्त, मूर्त, मूर्धा, मुहूर्त, शूर्प, ऊर्मि, कूर्म, सूर्य, दूर्वा, पूर्व, ऊर्ध्व इ०. *

परंतु या नियमाला दोन अपवाद आहेत; ते हे—

(क) मधुर, चतुर, गुरु, उरु, इत्यादि कित्येक शब्दांमध्यें र च्या पूर्वी ऱ्हस्व उकार आहे; आणि अशा शब्दांपासून माधुर्य, चातुर्य, गुर्वी, उर्वी, इत्यादि शब्द होतात; म्हणून, यांमध्यें देखील रेफापूर्वीचा उकार ऱ्हस्वच राहतो, दीर्घ होत नाहीं.

(ख) 'निर्' आणि 'दुर्' हे उपसर्ग लागून झालेल्या निर्गम, निर्णय, निर्दय, दुर्गम, दुर्ग, दुर्गा, दुर्मार्ग, इत्यादि शब्दांमध्यें रेफापूर्वील इकार उकार ऱ्हस्वच राहतात, दीर्घ होत नाहींत.

११. स्त्री, नदी, नगरी, वृक्षवल्ली, स्त्रीजाति, यांचीं नांवें, आणि अकारांत शब्दावरून झालेलीं स्त्रीलिंग विशेषणें, यांच्या अंतीं जर ई हें अक्षर असेल, तर तें दीर्घ असतें. उदाहरणें—

स्त्रियांचीं (विशेष) नांवें–गौरी, पार्वती, सरस्वती, भवानी, लक्ष्मी, इ०.

नद्यांचीं नांवें.—नदी, भागीरथी, कावेरी, गोदावरी, इ०.

नगरींचीं नांवें.—नगरी, पुरी, अमरावती, वाराणसी, इ०.

वृक्षवल्लींचीं नांवें—वल्ली, धात्री, आमलकी, गुडूची, इ०.

स्त्रीजातीचीं नावें—ब्राह्मणी, व्याघ्री, कुमारी, देवी, राक्षसी, इ०.

स्त्रीलिंग विशेषणें — सुंदरी, चंद्रमुखी, गुणग्राहिणी, पंचमी, सप्तमी, इ०.

* कीर्द (फारसी), तूर्त (मराठी), हे शब्द जरी संस्कृत नव्हेत, तरी यांतही हाच नियम आहे.

१२. शब्दाच्या अंतीं इकार येऊन त्यापुढें भवन, भाव, भूत, करण, कार, कृत यांतील एकादा शब्द येऊन, सर्व मिळून एक शब्द होतो, तेव्हां तो इकार दीर्घ असतो. उदाहरणें–वक्रीभवन, वक्रीभाव, शुद्धीभूत, दीर्घीकरण, स्वीकार, अंगीकृत, इ०.

१३. शब्दाला ईय, नीय, ईन, हे जे प्रत्यय लागतात, त्यांतील इकार दीर्घ असतो. उदाहरणें—

ईय–स्वीय, स्वकीय, परकीय, सजातीय, विजातीय, इ०.

नीय––वंदनीय, रमणीय, करणीय, विश्वसनीय, इ०.

ईन—कुलीन, जनीन, प्राचीन, नवीन, अर्वाचीन, इ०.

१४. पुढील शब्दांत उपांत्य इ उ स्वर दीर्घ आहेत. हे शब्द पाठ करावे.

अनीक यूका वीज पूजा कीट कूट कालकूट पीठ क्रीडा गूढ मूढ रूढ आरूढ प्रवीण प्रावीण्य वीणा क्षीण भ्रूण तीक्ष्ण गीत गीता परिणीत प्रणीत दीप्त दूत अवधूत नीत नवनीत पीत पूत भीत भूत विपरीत क्रीत विक्रीत उपवीत सीता सीत प्रसूत सूत गृहीत प्रदीप्त यूथ सूद ऊन दीन पीन कौपीन मीन न्यून दीन उदासीन हीन विहीन दीप समीप कूप धूप अपूप भूप रूप सूप क्लीब भीम धूम गोधूम भीष्म ग्रीष्म सूक्ष्म द्वितीय तृतीय पूज्य शून्य असूया राजसूय मूल्य अमूल्य चीर धीर तीर नीर पूर गंभीर गभीर मयूर शरीर शारीर वीर दूर शूर क्रूर क्षीर मूत्र सूत्र शूद्र धूम्र कील नील लीला शील अनुकूल लांगूल गोलांगूल तांबूल मूल स्थूल शूल जीव ग्रीवा ईश अनीश मनीषा शिरीष ईषा ईक्षा प्रतीक्षा दीक्षा परीक्षा ईप्सा ईहा ऊह दुरूह व्यूह इ०

१५. पुढील शब्दांतील इकार उकार सर्वदा दीर्घ असतात.

ईषत्, टीका, सटीक, सूतक, पूरक, कीलक, पूर्वक, मूषक, वीतराग, ग्रामणी, गीर्वाणी, पूरण, सूरण, ईक्षण, दूषण, भूषण, भगीरथ, सूचना, समीचीन, मूर्छना, पूजन, नूतन, सेनानी, जीवन, ईशान, मद्यपी, सीकर, सीत्कार, तूणीर, सूत्रधार, पीवर, नीवार, ईश्वर, धूसर, हृषीकेश, नीरस, नीरोग, भूगोल इ०.

१६. पुढील शब्दांतील ऱ्हस्वदीर्घत्व नीट लक्षांत ठेवावें.

पुंडलीक, उलूक, विदूषक, चित्रकूट, बिभीषण, मधुसूदन, भूमि, ऊरु, उलूखल, कुतूहल, धूलि, उर्वी, गुर्वी, जिगीषा, व्रीहि, गीति, नीति, भीति, विभूति, रीति, दीप्ति, प्रीति, मूर्ति, प्रसूति, रूढि, स्फूर्ति, इत्यादि शब्दांतील इ उ स्वर नीट लक्षांत ठेवावे.

१७. यांशिवाय राहिलेले मराठींत येणारे जे संस्कृत शब्द, त्या सर्वांतील इकार उकार प्रायः ऱ्हस्व जाणावे. उदाहरणें—

अतिशय, प्रतिपदा, अधिकार, निबंध, अभिमान, परिणाम, विशेषण, अनुक्रम, कुमार्ग, सुज्ञ, उपदेश, उत्कर्ष, निर्णय, निर्दय, दुर्गम, दुर्घट, दुर्ग, कृति, कांति, मुक्ति, गति, युक्ति, स्तुति, स्थिति, धृति, नति, संपत्ति, विपत्ति, उत्पत्ति, उपपत्ति, भक्ति, विभक्ति, जाति, आसक्ति, मति, मिति, मुक्ति, शक्ति, स्मृति, युति, रति, भ्रांति, क्रांति, विश्रांति, श्रुति, शांति, क्षांति, बुद्धि, समृद्धि, शुद्धि, वृद्धि, सिद्धि, तृप्ति, क्लृप्ति, व्याप्ति, ज्ञप्ति, विज्ञप्ति,* इति, आदि, इत्यादि, अपि, कदापि, यद्यपि, तथापि, परंतु, कार्तिक, कौतुक, रुचि, हितेच्छु, गुण, निपुण, हरिण, करुणा, वरुण, विष्णु, चरित, सुत, सरिता, पति, यति, दधि, निधि, बंधु, मधु, साधु, व्याधि, संधि, ध्वनि, अग्नि, तनु, धेनु, भानु, मनु, हनु, मिथुन,

* तिप्रत्ययान्त क्रियावाचक शब्द सर्व ऱ्हस्वान्त असतात.

आश्विन, फाल्गुन, रिपु, शत्रु, चित्र, पवित्र, मित्र, शिर, सुर, असुर, हरि, गुरु, विष, अद्रि, कुल, कवि, पवि, रवि, शिव, हवि, ऋषि, धनिक, कारिका, मायिक, सांवत्सरिक, इ०.

१८. कर्तरि, कर्मणि, हे शब्द कर्तृ, कर्मन्, यांचीं सप्तमीचीं रूपें असल्यामुळें ऱ्हस्वांत आहेत. परंतु **भावी** हा शब्द भाव या शब्दावरून झालेलें केवळ विशेषण आहे, म्हणून तो दीर्घान्त आहे.

१९. दयालु, कृपाळु, इत्यादि शब्द ऱ्हस्वान्त आहेत; परंतु शुद्ध मराठी शब्दास ळू प्रत्यय लागला असतां तो दीर्घ होतो. उ० झोंपाळू.

२०. पुढें विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय असतां ऱ्हस्वान्त संस्कृत शब्द मराठीप्रमाणेंच दीर्घान्त होतात, एवढाच काय तो विशेष. पण याशिवाय संस्कृत शब्दांमध्यें आणखी कोणत्याही प्रकारें मराठी व्याकरणाच्या निमित्तानें रूपान्तर होत नाहीं. रुचि, रुची-स, रुची-मध्यें, इ०

भाग तिसरा.

सानुनासिक वर्णांविषयीं नियम.

संस्कृत शब्दांतील अनुस्वारांचा उच्चार स्पष्ट होतो, म्हणून तेथें अनुस्वारांविषयीं भ्रांति पडत नाहीं. मराठीमध्येंही जेथें त्यांचा स्पष्ट उच्चार होतो तेथें भ्रांति पडत नाहीं. म्हणून फक्त अनुनासिक उच्चारामुळें मात्र कोणकोणत्या अक्षरांवर बिंदु दिला पाहिजे, याविषयीं नियम लिहूं.

२१. कोणत्याही अकारांत शब्दाचा अंत्यस्वर अनुनासिक नसतो.

२२. अकारांताशिवाय इतर जीं नपुंसकलिंगीं नामें, त्यांच्या अंत्य अक्षरावर बिंदु द्यावा. उदाहरणें— मोतीं, वासरूं, मोत्यें, घरें, वासरें, जाणें, येणें, इ०

अपवाद—पाणी, लोणी, यांतील णकारामुळें अंत्य अक्षरें सानुनासिक आहेत, म्हणून त्यांवर वेगळा बिंदु देत नाहींत.

२३. ' गहूं ' हा शब्द नपुंसकलिंग नसतांही याच्या अंत्याक्षरावर बिंदु आहे.

२४. मी, आम्ही, तुम्ही, कोणी, या सर्वनामांवर नपुंसकलिंगीं देखील बिंदु नाहीं, तथापि हे शब्द जर तृतीयाविभक्त्यंत असतील तर यांवर बिंदु द्यावा, असा कित्येकांनीं काल्पनिक नेम केला आहे. उदाहरणें—

मी येईन; मीं काम केलें. आम्ही लिहितों; आम्हीं लिहिलें.
तुम्ही गेलां; तुम्हीं पैसे दिले.
कोणी एक मुलगा; तुला कोणीं मारलें ?

हा नियम त्रासदायक आहे, आणि फारसा उपयोगी नाहीं. यामुळें याकडे कोणी तादृश लक्ष देत नाहींत. तथापि परीक्षेस जाणारांनीं हा ध्यानांत ठेवावा ही हिताची गोष्ट आहे.

२५. तूं या सर्व नामावर सर्वदा बिंदु असतो.

२६. एकारांत आणि ईकारांत नपुंसक सर्वनामांचा अंत्यस्वर अनुनासिक असतो. उदाहरणें—तें घर, तीं घरें; हें मूल, हीं मुलें; जें कृत्य, जीं कृत्यें; इ०.

२७. एकारांत, ईकारांत, नपुंसक विशेषणाच्या अंत्यस्वरावर बिंदु असतो. उदा० मोठें घर, मोठीं घरें, इ०.

अपवाद—जीं विशेषणें तीन्ही लिंगीं सारखीं असतात, त्यांवर नपुंसक लिंगीं देखील बिंदु येत नाहीं. उदाहरणें—गुणी मुलें; कडू कारलें; इ०.

२८. अकारांताशिवाय इतर जें प्रथमपुरुषवाचक क्रियापद, त्यावर बिंदु असतो. उदाहरणें—मी आहें; आम्ही आहों; मी घेतों, मी आलें; आम्ही आलों; मी येऊं ? मी येईं; मी करीं; आम्ही जाऊं; इ०.

२९. स्वार्थी द्वितीय पुरुषीं आकारांत क्रियापदांवर बिंदु असतो. उदाहरणें—तुम्ही येतां, तुम्ही आलां, इ०.

२०. एकारांत, ईकारांत, नपुंसक क्रियापदांवर बिंदु द्यावा. उदाहरणें–पाखरूं उडतें; गवत वाढलें; फुलें मिळालीं; झाडें वाढलीं असतीं इ०.

अपवाद—अकारांतावांचून जीं क्रियापदें तीन्ही लिंगीं समान असतात, तीं प्रथमपुरुषीं असलीं तर मात्र त्यांवर बिंदु असतो; इतर पुरुषीं नपुंसकलिंगीं देखील नसतो; उदाहरणें—असें नव्हे; घर आहे; तें येई; हें असो; इ०.

२१. पाहिजे, नको, यांवर कधींही बिंदु येत नाहीं.

२२. अकारांतांवाचून इतर अव्ययांवर प्रायः बिंदु असतो. उदाहरणें खालीं, मागें, पुढें, येथें, जेथें, कधीं, आतां, उद्यां, झटदिशीं, जेव्हां, केव्हां, कां, कीं, जों, तों, इ०.

अपवाद—

(क) जरा, हळू, कडे यांवर बिंदु नसतो.

(ख) वाहवा, भले, अरेरे, इत्यादि उद्गारवाची अव्ययांवर बिंदु नसतो.

२३. करितां, बसतां, लिहितां, करूं, बसूं, लिहूं, इ० धातुसाधित अव्ययांच्या अंतीं बिंदु असतो.

२४. लिहितांना, बसतांना, करितांना, इत्यादि धातुसाधित अव्ययांच्या अंतीं बहुशः बिंदु देत नाहींत. तथापि त्यांतील ता या अक्षरावर प्रायः बिंदु देतात.

याप्रमाणेंच जंव, तंव, यांतील उपांत्य अक्षरावर बिंदु देतात.

२५. विभक्तिप्रत्यय—तें, नें, एँ, नीं, हीं, ईं, शीं, आं यांच्या अंतीं बिंदु असतो. उदाहरणें—त्यातें, रामानें, पाठीशीं, घरीं, माथां, इ०.

तँ, तूँन, या प्रत्ययांपूर्वील अक्षरांवर बिंदु असतो. उदाहरणें— घरांत, मनांतून, इ०.

३६. विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय पुढें आलें असतां, बहुवचनीं, शब्दाच्या सामान्यरूपावर बिंदु असतो. उदाहरणें—**घरांचा, लोकांमध्यें, तुम्हांपेक्षां**, इ०.

३७. परंतु विशेषणसामान्यरूपावर कधींही बिंदु येत नाहीं. उदाहरणें- **तेथल्या** लोकांनीं; **शाहण्या** मुलांच्या इ०.

३८. षष्ठी विभक्ति विशेषणासारखी आहे. म्हणून पुढील शब्द नपुंसक असेल, तर षष्ठीच्या प्रत्ययावर बिंदु असतो. उदाहरणें—**राजाचें** वैभव; **रामाचीं** पुस्तकें; इ०.

३९. **नाहीं**, याच्या अंत्य अक्षरांवर, आणि **कांहीं** याच्या दोन्ही अक्षरांवर बिंदु असतो.

४०. ऊस, ओठ, काच, कीव, केस, खेकडा, पिवळें, पोवळें, पै, म्या, त्वा, सोवळें, ओवळें, आवळा, सावळा, कोवळा, हीव, भोवरा, जावई, यांतील प्रथमाक्षरावर कोंकणचे लोक बिंदु देतात. देशी लोक देत नाहींत. याप्रमाणेंच नांव, गांव, हे शब्द होत. तथापि या दोन्ही शब्दांवर लिहिण्यामध्यें तरी सर्वदा बिंदु असतो. पुन्हां, शेंकडों, लाखों, हजारों; घरोंघर, दारोंदार; कोरींव, घोंटींव, घडींव, ठरींव, एकदां, दोनदां, सर्वदां, सदां, शें, दोनशें, दोनशेंहें, चारशें; इत्यादि शब्दांतील अनुनासिकत्व देशी लोकांच्या बोलण्यांत अथवा लिहिण्यांत येत नाहीं.

४१. यांशिवाय खालीं लिहिलेल्या शब्दांमध्यें आनुनासिक्याच्या संबंधानें देशकोंकणपरत्वें भेद पडतो. देशांतील लोकांच्या उच्चारांत आणि लेखांत यांचें अनुनासिकत्व येत नाहीं.

कोंपर
ढोंपर
मोंगल
रोंवणें
पोंच
खोंच
घोंस
ओंठ
झोंप
भोंपळा
भोंक
भोंकर
भोंसकणें
चोंथा
झोंक
रोंख
ठेंचणें
रेंच
पेंच
फेंस
जांतें
अगदीं

रेंस
रेंव
लेंक
झांप
कोंकण
वांटणें
कदांचित्
भरंवसा
स्वांरी
संवयी
शेंवयी
शिंवणें
सभोंवतीं
भोंव
वांकडा
रांवा
सोंटा
देंठ
जिंकीर
घोंट
कोंता
सध्यां

चिंवट
पेंव
सांठा
वांसरूं
सोंपणें
रत्नांगिरी
हांव
फेंकणें
टांकळा
आंचका
झोंपडी
टोंक
चेंचणें
टेंकणें
टेंकाड
टांकण
टांक
जुंवळा
घांसणें
गोंवरी
जरीं
उद्यां

टांच
खोंट
टांप
टांपू
टांकी
कांकडी
कांख
कांतणें
कांसोटा
कोंकी
कोंतवाल
कौंटाळ
खांच
खुरंट
खेंटर
गंवसणी
चंवळी
घोंटाळा
गोंवारी
चांचपणें
तरीं
परवां इ०.

भाग चवथा.

किरकोळ विषय.

४२. कित्येक शब्द लिहितांना कोणी चुका करितात. यास्तव हे पुढील लेख लिहिले आहेत.

अशुद्ध	शुद्ध	अशुद्ध	शुद्ध
व्याकर्ण	व्याकरण	श्राप	शाप
प्रकर्ण	प्रकरण	मच्छ	मत्स्य
सिंव्ह	सिंह	प्रजन्य	पर्जन्य
अरंण्य	अरण्य	च्यार (४)	चार
अद्रुष्ट	अदृष्ट	विच्यार	विचार
माहदेव	महादेव	धृव	ध्रुव
माहराज	महाराज	द्रुष्ट	दृष्ट
येक	एक	विषई, विषयी	विषयीं

४३. किंचित् रूपांतरामुळें अर्थभेद पावणारे शब्द.

शब्द.	अर्थ.	शब्द.	अर्थ.
सुत	पुत्र	सूत	सारथि
द्विप	हत्ती	द्वीप	बेट
वर्ण	रंग, जाति, मूळाक्षर	वरण	(जेवणांतील)
दिन	दिवस	दीन	निराश्रित
नाव	नौका	नांव	नाम
समयीं	वेळेस	समई	दिव्याचें पात्र
विषयी	विषयासक्त	विषयीं	संबंधानें

४४. दहा, सहा, चहा, यांतील प्रथमाक्षर ऱ्हस्व असतें. पाह, राह,

इत्यादि हकारांत धातूंचीं तीन रूपें (पहा, पहायाला, पहाव–याला, इ०.) यांत प्रथमाक्षर ऱ्हस्व, आणि द्वितीयाक्षर दीर्घ होतें.

४५. 'राजा' शब्दाच्या सामान्यरूपामध्यें **या** जोडूं नये. **या** जोडल्यानें 'राज्य' शब्दाचा आणि याचा गोंधळ होईल. राजा, राजास, राजाला, इ० आणि राज्य, राज्यास, राज्याला, इ० असें लिहावें.

४६. संस्कृत भाषेंत ' ळ ' हें अक्षर येत नाहीं. म्हणून जरी अतिपरिचयांतल्या संस्कृत शब्दांतील लच्या स्थळीं ळ घातलेला बहुधा आढळतो, तरी स्वल्प परिचयांतील संस्कृत शब्दांमध्यें तसें करूं नये. उ० हिमाचल, ललाम, मलयपर्वत, इ०

४७. संस्कृत शब्दांत म्, य्, र्, ल्, व्, न्, यांतील एकाद्या व्यंजनाशीं हकाराचा **संयोग** होतो, तेव्हां हकार आधीं लिहून म य र ल व न हीं व्यंजनें खालीं किंवा पुढें जोडावीं. उ० ब्राह्मण, बाह्य, ह्रस्व, आह्लाद, विह्वल, चिह्न, इ०. ह्यांतील हकारयुक्त अक्षरें वर लिहिल्या-प्रमाणें लिहावीं; म्ह, ऱ्ह, ल्ह, व्ह, न्ह, अशीं लिहूं नयेत.

४८. सिद्धि, वृद्धि इत्यादि शब्दांमध्यें, शेवटचीं अक्षरें त् आणि ध् मिळवून ' त्ध ', किंवा धला द्वित्व करून ' ध्ध ' अशीं लिहूं नयेत. द्ला ध् जोडून ' द्ध ' अशीं लिहावीं.

४९. जा, ये, दे, घे, इत्यादि एकाक्षरी धातूंपुढें ऊन प्रत्यय लागला असतां जाऊन, येऊन, इ० रूपें लिहावीं. परंतु पाठीव, शीव इ० वान्त धातूंपुढें हा प्रत्यय लागला असतां मूळचा वकार जाऊं देऊं नये. उ० पाठवून, शिवून इ० .

५०. पी, वी, ले इत्यादिकांचीं भूतकाळचीं रूपें मी प्यालों, ती व्याली, ल्याली अशीं होतात.

५१. अस धातूचा भूतकाळ आणि हो धातूचा वर्तमानकाळ यांतील रूपाचा भेद.

' अस ' धातु भूतकाळ.

१	मी होतों—तें—तें	आम्ही होतों
२	तूं होतास—तीस, तेंस	तुम्ही होतां
३	तो होता ती होती तें होतें	ते होते त्या होत्या तीं होतीं

' हो ' धातु वर्तमानकाळ.

१	मी होतों—तें—तें	आम्ही होतों
२	तूं होतोस–तेस–तेंस	तुम्ही होतां
३	तो होतो ती होते तें होतें	ते, त्या, तीं } होतात.

याचा भूतकाळ मी झालों, तूं झालास, इ० जाणावा.

समाप्त.

लाघवी लिपि

किंवा

अतित्वरेनें लिहिण्याची युक्ति

(स्वतंत्र पुस्तक)

रामचंद्र भिकाजी गुंजीकर,

एल्फिन्स्टन् विद्यालयांतील शिक्षक, याणें रचिली.

मुंबई.

एशियाटिक व ज्ञानदर्पण छापखान्यांत छापिली.

शालिवाहन शके १७९५.

इसवी सन १८७४.

सूचना.

पुस्तकावरूनच शिकणारांनीं प्रथमतः, ४५१, ४५२ या पृष्ठांवरील मुळाक्षरें शिकावीं, आणि मग पहिल्यापासून सर्व पुस्तक वाचावें, म्हणजे समजण्यास बरें पडेल.

प्रस्तावना.

आपली देवनागरी किंवा बालबोध हीच एक सर्व पृथ्वीवर उत्कृष्ट लिपि असल्यामुळें ही "आमची लिपि," असें म्हणण्यास आपणांस मोठा अभिमान वाटतो, हें योग्यच आहे. संस्कृत भाषेंतील प्रत्येक ध्वनीला निर-निराळें चिन्ह, याप्रमाणें जितके ध्वनी तितकींच चिन्हें या लिपीमध्यें असल्यामुळें, ही शिकण्याला सुलभ असून हिच्या अंगीं संशयास्पदपणा अगदीं नाहीं. स्पष्ट आणि दिसण्यामध्येंही सुरेख. आपली सर्व संस्कृत, महाराष्ट्र पुस्तकें याच लिपीनें लिहिलेलीं असतात. अशी या लिपीची खरोखर योग्यता आहे. तरी हिच्या नियमाप्रमाणें प्रत्येक अक्षर लिहिण्याला, आणि काना, मात्रा, वेलांटी, उकार, इत्यादि चिन्हें लिहिण्याला प्रतिक्षणीं हात वर उचलावा लागतो. यामुळें त्वरेच्या कामीं हिची योजना यावी तशी करितां येत नाहीं म्हणून ही अडचण दूर करण्याकरितां हीच बालबोध लिपि कोनकोपरे मोडून धावत्या हातानें लिहिण्याची आपल्या पूर्वजांनीं चाल घातली. हीं अक्षरेंही चांगलीं वळणदार, सुंदर व स्पष्ट असून यांमध्यें जलदीही खूपच साधतां येते. या लिपीची मोड किंवा वळण यावरून हिला "मोडी लिपि" म्हणतात. आपल्या देशीं कारकुनी व दरबारी लेखांमध्यें सर्वत्र या मोडी लिपीचीच योजना होत असते. तथापि इजपेक्षां-ही जलदीनें लिहितां येण्याजोग्या एकाद्या नवीन लिपीची आपल्या देशीं सांप्रत फारच आवश्यकता उत्पन्न झाली आहे. छापखाने व वृत्तपत्रें यांचा दिवसेंदिवस प्रसार होत चालल्यामुळें स्वपरदेशसंबंधीं हरएक लहान मोठी वार्ता ऐकण्याची इच्छा आमच्या देशीं वाढत चालली आहे. कोणी प्रख्यात मनुष्यानें एकादें व्याख्यान किंवा कांहीं संभाषण केलें असतां तें ऐकण्याची सर्वांस इच्छा उत्पन्न होते, व तें लिहिलेलें मिळाल्यास पत्रकर्ते-ही छापून प्रसिद्ध करण्यास सिद्ध असतात. परंतु त्या वक्त्याचें पांडित्य जेव्हांचे तेव्हां शब्दशः उतरून घेण्यास तितक्या वेगानें लिहितां येण्याजोगी

लिपि उपलब्ध नसल्यामुळें तो हेतु सिद्धीस जात नाहीं. ही गोष्ट लक्षांत आणून ही नवीन "लाघवी" किंवा "चिटणिशी" नांवाची लिपि तयार केली आहे.

ही सुसाध्य असून फारच वेगानें लिहितां येण्याजोगी आहे. हिजमध्यें नव्या शिकणारालाही फक्त एका फाट्यानें एका वर्णाचें काम साधतां येतें. आणि बरीच गति झाल्यावर एका फाट्यानें केव्हां केव्हां चार चार अक्षरांपर्यंतही भ्रांतीवांचून काम अटोपतां येतें व जसजसा हात बसत जाईल, तसतशी तर फारच मजल झेपतां येते. सारांश त्वरा हा या लिपीचा मुख्य उद्देश असल्यामुळें तो साधण्याचा होईल तितका एथें प्रयत्न केला आहे.

या लिपीमुळें सांप्रतच्या ज्या आपल्या बाळबोध आणि मोडी लिपि, यांस कांहीं धोका येईल, अशी कोणी व्यर्थ भीति बाळगण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं; कारण मोडी लिपि उत्पन्न झाल्यामुळें बाळबोध लिपि नष्ट झाली असें नाहीं, त्याप्रमाणेंच ही चिटणीशी प्रचारांत आली असतां बाळबोध किंवा मोडी यांना धोका येईल असेंही नाहीं. तशांत असें न होण्याला दुसरें एक कारण आहे. आतां, हें कारण असणें बरें किंवा वाईट हें एकाएकीं सांगतां येत नाहीं; तरी अशी गोष्ट आहे खरी कीं, चिटणिशी लिपीचा मुख्य हेतु जी त्वरा, ती साधण्याकरितां लिपि तयार करिते वेळीं,—बाळबोध किंवा मोडी लिपीमध्यें ज्या कित्येक दुसऱ्या सोई आहेत, त्यांपैकीं कित्येक सोईंकडे दुर्लक्ष करणें अगदीं दुर्निवार होऊन जातें; म्हणजे, या लिपीमध्यें देवनागरीची उत्कृष्ट शोभा, डौलदारी व ठळकपणा मिळणार नाहीं. ठसेछापानें छापण्याला बरीच मेहनत पडते. अशा व दुसऱ्या कांहीं कारणामुळें पुस्तकादिकांमध्यें या चिटणिशीची योजना होण्याचा फारसा संभव व तादृश आवश्यकताही दिसत नाहीं. इंग्रजी वगैरे भाषांमध्यें उच्चाराप्रमाणेंच नियमित वर्ण लिहिण्याची नीट व्यवस्था नसल्यामुळें, तेथें सर्वत्र अशा चिटणिशीची योजना करण्यापासून

कदाचित् फायदा होईल. तरी तसें करण्यास ठसे छापाची वगैरे बरीच अडचण, म्हणून त्यांहीं आपल्या नेहमींच्या लिपीमध्येंच, आमच्या बाळबोध लिपीप्रमाणें प्रत्येक उच्चाराला एकेकच चिन्ह, व प्रत्येक चिन्हाला एकेकच उच्चार ठरवून कित्येक मुळीं कमी होतीं तीं नवी चिन्हें केलीं, आणि कित्येक अधिक असलेलीं गाळलीं, आणि त्या लिपीला "फोनॉटिपि" म्हणजे उच्चारानुसारें लिहिण्याची लिपि असें नांव देऊन हळू हळू प्रचारामध्येंही ती आणण्याचा त्यांचा हेतु व प्रयत्न चालला आहे. परंतु आमची देवनागरी बाळबोध लिपि मूळचीच उच्चारानुरोधी असल्यामुळें तसा प्रकार करण्याची आम्हांस अगदींच गरज नाहीं. फक्त जरूरीच्या कारकुनी कामामध्यें मात्र योजण्याला लिपि पाहिजे आहे. ती ही **'लाघवी'** किंवा **'चिटणिशी.'**

ही लिपि शिकण्यास कांहीं फार वेळ लागणार नाहीं; तथापि इजमध्यें चांगल्या रीतीनें हात घटण्याला, उत्साह आणि निश्चय या दोन गोष्टींची फारच आवश्यकता आहे. प्रथमतः बराच हात बसेतोंपर्यंत उतावीळ अगदीं करतां येणार नाहीं, व हाताला श्रम दिल्यावांचून केवळ मानसिक तरंगांचा इजमध्यें कांहीं उपयोग होणार नाहीं. यामुळें कित्येक अस्थिर मनाच्या लोकांना या लिपीचा त्रास होईल. परंतु जे अगत्यपूर्वक श्रम घेऊन नेमानें ही लिपि लिहिण्याचा व वाचण्याचा अभ्यास करतील, त्यांना कोणीही वक्ता, कितीही जलदीनें बोलत असो, जवपर्यंत त्याचा उच्चार स्पष्ट आहे, व त्याच्या उच्चारामध्यें कांहीं घोटाळा नाहीं, तवपर्यंत त्याचें भाषण अगदीं शब्दशः उतरून घेण्याचें निभ्रांत सामर्थ्य येईल. म्हणून ज्यांना मन लावून या लिपीचा अभ्यास करण्याची इच्छा नसेल, ते या लिपीची योग्यता समजणार नाहींत. या लिपीमध्यें बरेच दोष असतील; तथापि त्यांचें उन्मूलन करून टाकण्यास निरनिराळ्या बुद्धिमान् लोकांनीं ही लिपि प्रचारांत आणून, हिजमध्यें जे वास्तविक दोष सांपडतील ते व त्यांचें निवारण करण्यास ज्या कांहीं युक्ति सुचतील त्या अनुभवानुसार

प्रकट केल्या पाहिजेत. इंग्रज लोकांची जी " फोनॉग्रफि " नामक अशा प्रकारची लिपि आहे, ती तीस चाळीस वर्षांपासून सुधरत सुधरत येऊन नुकतीच स्थिर झाल्यासारखी झाली आहे. तथापि अझून तिजमध्यें कोणी कल्पक पुरुष सुधारणा करण्याला स्थळ दाखवितात. सारांश, या कामाला अनेक बुद्धिवान् व उद्योगी लोकांनीं साह्य केलें पाहिजे.

युरोपामध्यें सांप्रत सर्व लोकांनीं या प्रकारच्या लिपींची आपापल्या भाषांमध्यें योजना केली आहे, व 'तिचा उपयोग काय ?' असा सांप्रत त्यांमध्यें बहुधा कोणी प्रश्न करीत नाहीं. निरनिराळ्या लोकांनीं आपापल्या मतांप्रमाणें या लिपीचीं निरनिराळीं चिन्हें ठरविलीं आहेत; परंतु त्यांमध्यें इंग्लंडांतील पिट्मन् आणि त्याच्या लिपीचीच विशेष सुधारणा करणारा अमेरिकेंतील मन्सन् यांच्या पद्धति सर्वमान्य आहेत. आमच्या मराठी चिटणिशीचीं चिन्हेंही त्यांच्या इंग्रजी लिपीला अनुसरूनच असतीं तर एकपक्षीं सोई होती. तथापि ती गोष्ट सर्वथा बरी झाली असती, किंवा वाईट, याचा निर्णय करणें कठीण आहे. हें कसेंही असो, तरी त्या भाषेंत वारंवार येणारे सकारयुक्त व इतर बोबडे उच्चार यांना जमण्याकरितां, व त्यांच्या वर्णांचें जें कांहीं अंशीं सदोष वर्गीकरण, त्याला अनुसरून रचलेलीं चिन्हें, आपल्या भाषेंतील स्पष्ट उच्चाराला व वर्णांच्या निर्दोष वर्गीकरणाला जमणार नाहींत, हें उघड आहे. तशांत त्यांच्या भाषेंतील आणि आमच्या भाषेंतील वर्णांची संख्या समसमान नसल्यामुळें पुनः दुसरी अडचण आहे. म्हणून आमचीं चिन्हें आमच्या भाषेच्या सोईला जमण्याजोगीं अशीं जीं पुष्कळ विचारांतीं वाटलीं, तींच ठरविलीं आहेत. चिन्हें म्हटलीं म्हणजे फांटा, कोर, गांठ, फांसा, कडी, बिंदु, हींच यावयाचीं; म्हणून आमच्या लिपीनें लिहिलेल्या वाक्यांचें स्वरूप, इंग्रजी 'फोनॉग्रफी'-सारखेंच बहुधा दिसेल; तथापि या चिन्हांवर त्यांची जितकी सत्ता तितकीच आमचीही. तरी, आमचें पुस्तक उत्पन्न होण्याला, व त्यांतील

पद्धतीची रचना वगैरे ठरविण्याला पिट्मन् आणि मन्सन् यांच्या पुस्तकांपासून मला पुष्कळ साह्य झालें; व तीं पुस्तकें माझ्या दृष्टीस न पडतीं, तर अशा प्रकारची कांहीं रचना आमच्या भाषेमध्यें असावी, अशी जरी माझी इच्छा साहजिक होतीच, तरी ती इतक्यांत पूर्ण झाली नसती, व कदाचित् मनच्या मनींच राहूनही गेली असती; म्हणून वर सांगितलेल्या इंग्लिश व अमेरिकी विद्वानांचा मजवर मोठा आभार आहे, ही गोष्ट एथें मोठ्या आनंदानें कबूल करितों.

आमचीं चिन्हें इंग्लिश चिन्हांशीं जमलीं नाहींत* म्हणून त्यांच्या लिपीशीं आमच्या लिपीचें समत्व झालें नाहीं, (हा कदाचित् तोटा मानल्यास) याशिवाय दुसरा आणखी कांहीं तोटा झाला नाहीं. आमचीं चिन्हें त्यांच्या चिन्हांपेक्षां होतील तितकीं विशेष साधारण नियमानें बसविलीं आहेत, व शिकण्याच्या दृष्टीनेंही पाहतां ही लिपि आमच्या लोकांस तिजपेक्षां सरळ वाटण्याजोगी असून बऱ्याच कमीं वेळांत सहज शिकतां येण्याजोगी आहे.

एकादी नवीन लिपि उत्पन्न करण्यामध्यें कित्येकांचा असा विलक्षण हेतु असतो कीं गुप्त लेख चालविण्याच्या कामीं तिचा उपयोग व्हावा. परंतु या लिपीकाराचा हेतु बिलकूल तशा प्रकारचा नाहीं, हें उघड आहे. ही लिपि सर्वांनींही शिकावी, विद्यालयामध्यें हिचा अभ्यास चालावा, आणि कारकुनांनीं, वृत्तकारांनीं, मुशाफरांनीं, किंबहुना हरएक मनुष्यानें हरएक घाईच्या प्रसंगीं हिची योजना करावी, आणि सध्यां जी अशा प्रसंगीं मोठी अडचण पडते, तिचें निवारण व्हावें, अशी माझी इच्छा आहे. ती सिद्धीस गेली असतां आपल्या श्रमाचें सार्थक्य झालें असें मी समजेन.

---

* तथापि त्यांचे आमचे कित्येक वर्ण अगदीं बरोबर जमले आहेत असें दोन्ही लिपि तपासून पाहणाऱ्याच्या लक्षांत येईल.

लाघवी लिपि,
किंवा चिटणिशी,
अर्थात् अतित्वरेनें लिहिण्याची युक्ति.

उपोद्घात

१. बोलणारा बोलत असतां, त्याचें भाषण उतरून घेण्याला, जितकी त्वरा साधेल, तितकी थोडीच; म्हणून कोणताही शब्द लिहावयाचा असतां, पहिल्यानें त्यांतील व्यंजनें मात्र लिहिण्याची सवई ठेवावी. प्रत्येक शब्द निरनिराळा लिहावा; परंतु शब्द संपल्यावांचून मध्येंच हात तोडूं नये. पहिलें व्यंजन संपतांच तेथूनच पुढील व्यंजनांस आरंभ करावा. स्वर आणि अनुस्वार अवकाशानुसार हवे तसे मागाहून मांडतां येतात. तथापि त्यांमध्येंही शब्दांतील प्रथम व्यंजनानंतर येणाऱ्या तरी स्वराचें कांहीं अंशीं आपोआप ज्ञान व्हावें म्हणून पुढें लिहिल्याप्रमाणें तजवीज केली आहे, तिजकडे चांगलें लक्ष द्यावें.

शब्द लिहिण्याचीं स्थानें.

२. चिटणिशी लिपि लिहिण्याला नेहमीं आंखलेला कागद किंवा आंखलेली चोपडी घ्यावी. आणि ओळीच्या वरची जी जागा तिचें नांव **प्रथमस्थान**, ओळीचें मध्य हें **द्वितीयस्थान**, आणि ओळीच्या खालची जागा हें **तृतीयस्थान** याप्रमाणें नावें द्यावीं. आणि शब्दाच्या **प्रथम व्यंजनानंतर**,

अ	आ	किंवा	ऋ	ॠ	ऌ	असल्यास	तें व्यंजन	**प्रथमस्थानीं**,
इ	ई	,,	ए		ऐ	,,	,,	**द्वितीयस्थानीं**,
उ	ऊ	,,	ओ		औ	,,	,,	**तृतीयस्थानीं**,

लिहावें. अशा रीतीनें शब्द लिहिण्याची वहिवाट आरंभापासूनच ठेवावी.

व्यंजनांची संख्या.

३. मराठीमध्यें ङ आणि ञ यांची मुळींच गरज नाहीं. तसेंच जरूरीच्या कामीं न ण यांमध्यें भेद न राहिला तरी चिंता नाहीं. म्हणून ङ च्या पोटीं ञ ण न यांचा समावेश केला. त्याप्रमाणेंच ल च्या पोटीं **ळ** घेतला. **क्ष ज्ञ** हीं तर संयुक्ताक्षरेंच आहेत. तेव्हां छत्तीसांतून **ञ ण न ळ क्ष ज्ञ**× हीं सहा व्यंजनें वजा जातां बाकी व्यंजनें तीस राहिलीं.

× हीं सहा व्यंजनें गाळण्याचें मुख्य कारण चिन्हांची कमताई हेंच.

व्यंजनांचीं चिन्हें.

४. व्यंजनांचीं मुख्य चिन्हें दोन आहेत. एक सरळरेघ — आणि दुसरी चंद्रकोर ◡ . चंद्रकोर चार प्रकारची आहे. १ वरच्या तोंडाची ◡ , दुसरी उजव्या तोंडाची (, तिसरी खालच्या तोंडाची ⌒ , आणि चवथी डाव्या तोंडाची) यांना संक्षेपाकरितां अनुक्रमें वरचीकोर ◡ , उजवीकोर (, पालथीकोर ⌒, आणि डावीकोर), अशीं नावें दिलीं आहेत. सदरहू चार कोरा आणि एक रेघ मिळून एकंदर पांच चिन्हें झालीं. यांचे पोटभेद पुढें समजतील.

५. यांत सरळरेघेपासून वर्गांतील पहिल्या दोन अक्षरांचा बोध होतो; वरची ◡ व उजवी (कोर यांपासून वर्गांतील तिसऱ्या किंवा चवथ्या अक्षराचा बोध होतो; आणि पालथ्या ⌒ व डाव्या) कोरेपासून इतर अक्षरांचा बोध होतो, असें समजावें.

६. हीं चिन्हें सरळ आडवीं — असलीं तर तीं कंठ्य जाणावीं.

सरळ उभीं । असलीं तर तालव्य जाणावीं.

डाव्या झोंकाचीं उतरतीं / असलीं तर दंत्य जाणावीं.

उजव्या झोंकाचीं उतरतीं \ असलीं तर तीं ओष्ठ्य जाणावीं.


जीं दंत्य वर्गाचींच चिन्हें पण खालून वर लिहिलेलीं व किंचित् उजवीकडे जास्त दबलेलीं असतील तीं मूर्धन्य जाणावीं. /

७. या रीतीनें एकंदर पंधरा चिन्हें होतात. तींच बारीक व जाड या भेदानें दुप्पट म्हणजे तीस झालीं, व प्रत्येक व्यंजनास एकेक चिन्ह बरोबर जमलें. तें येणें प्रमाणें –


कंठ्य	— क	— ख	◡ ग	◡ घ	⌒ ङ*	⌒ ह
तालव्य	। च	। छ	(ज	(झ	) य	) श
मूर्धन्य (झोंक पर)	/ ट	/ ठ	/ ड	/ ढ	/ र	/ ष
दंत्य (झोंक खालीं)	/ त	/ थ	(द	(ध	) ळ*	) स
ओष्ठ्य	\ प	\ फ	(ब	(भ	) म	) व

८. हे व्यंजनाचे झोंक नीट लक्षांत भरण्याकरितां पुढील कोष्टकाकडे नीट लक्ष द्यावें.

* ङ च्या पोटीं ञ ण न आणि ळ च्या पोटीं ळ घेतल्याचें कारण देणारें.




९. व्यंजनें मनामध्यें पक्कीं ठसण्याकरितां आपल्या नेहमीच्या क्रमानें लिहूं.




* या चिन्हानें दाखविलेल्या सर्व अक्षरांचा झोंक खालून वर आहे, व इतरांचा खालीं किंवा उजवीकडेस आहे हें लक्षांत ठेवावें.

१०. हे वर्ण अगदीं सोपे आहेत; तथापि नुसते पाहून कधींही चांगले लक्षांत राहणार नाहींत. म्हणून यांवर पक्का हात बसे तों पर्यंत पुनःपुनः लिहावे. यांवर चांगला हात बसल्यावांचून, व हे मनांत पक्के ठसल्यावांचून पुढील पत्रें वाचूं नयेत. अक्षरें एथें दिलीं आहेत तेवढींच काढावी, लहान मोठीं काढूं नयेत. लिहितांना व्यर्थ घाई करूं नये. हात बसल्यावर त्वरा सहज साधेल. बारीक जाड अक्षरें हीं सवईनेंच साधतील. पहिल्यानेंच घाई करण्यामध्यें तोटा फार आहे.

शब्द आणि वाक्यें.*



* यांतील स्वर, अनुस्वार, आणि विसर्ग सोडले आहेत, तथापि २ या कलमांत सांगितल्या प्रमाणें शब्दाच्या स्थानाकडे लक्ष दिलें आहे स्वर वगैरे जोडण्याची रीत पुढें समजेल.



वर्णमालेची रचना करण्यामध्यें, त्वरेपासून उत्पन्न होणारी अडचण दूर करण्याकडे लक्ष.

११. मागें दिलेलीं व्यंजन चिन्हें नीट पाहिलीं असतां असें लक्षांत येईल कीं, तीं फार बारीक विचारानेंच ठरविलीं आहेत; कारण; कोणतींही सारखीं दिसणारीं दोन चिन्हें गडबडीमुळें एकमेकांच्या जागीं जरी पडलीं, तरी उच्चारावरून झटकन् खरा शब्द ध्यानांत यावा, अशीच, साधेल तेथवर, त्यांची रचना केली आहे. पहा ट ठ ड ढ र, आणि त थ द ध ल, यांचा परस्पर संकर होण्याचा फारसा संभव नाहीं, तरी कदाचित् तसें झाल्यास उच्चारावरून झटकन् खरा शब्द ओळखतां येतो. तसेंच, क च ट त प ग ज ड द ब यांचा, आणि ख छ ठ थ फ घ झ ढ ध भ यांचाच कायतो परस्परांच्या जागीं संकर होण्याचा संभव. तथापि एथेंही उच्चारावरूनच खरा शब्द सहज लक्षांत येईल.

१२. न य र ल म, आणि ह श ष स व, यांचा परस्पर संकर होण्याची मात्र कांहीं भ्रांति खरी. ह्मणून यांतील बारीक जाडपणाचा भेद फार जपून राखावा.

१३. तथापि घाईच्या वेळीं श ष स या तिहींच्याही स्थानीं ष चीच योजना करावी; ह्मणजे य ल, आणि श स यांच्या जागीं मुळींच भ्रांति राहणार नाहीं.

१४. म आणि व या एका फाट्यांतील भेद मात्र नित्य स्पष्ट दाखविलाच पाहिजे.

१५. न र, आणि ह ष [शषस], यांतील भ्रांति नाहींशी होण्याकरितां पुढें संक्षेपप्रकरणीं युक्ति केली आहे, ती त्या प्रकरणीं समजेल.

स्वर.

१६. मुख्य स्वरचिन्हें दोन आहेत, बिंदु [·] आणि लहान फांटा [-] ; बारीक व जाड यारूपांनीं हीं चिन्हें चार होतात, तथापि स्थानभेदानें यांपासून बारा स्वरांचें काम होतें, असें पुढें लक्षांत येईल.

टीप- यामध्यें, **विसर्ग** मुळींच सोडून दिला आहे; कारण. मराठीमध्यें बहुशः त्याची गरज नाहीं. **अनुस्वार** लिहिण्याची रीति पुढें समजेल. ऋ ॠ, ऌ ॡ यांच्या जागीं अनुक्रमें **र ल** यांची सोईसाठीं योजना केली आहे. पण **य** आणि **या** हीं दोन अक्षरें स्वर नसतांही सोईसाठींच स्वरांत गणलीं आहेत. अर्थात् अ.आ; इ.ई; उ.ऊ; य,या; ए.ऐ; ओ.औ; या बारा अक्षरांची बाराखडीमध्यें योजना केली आहे. त्यांत पहिल्या तीन जोड्या किंवा सहा अक्षरें यांच्या जागीं बिंदु [·] आणि दुसऱ्या तीन जोड्या किंवा सहा अक्षरें यांच्या जागीं लहान फांटा [-] योजला आहे; व प्रत्येक जोडींतील **पहिल्या** अक्षराला **बारीक** व **दुसऱ्या** अक्षराला **जाडें** चिन्ह अशी तजवीज केलेली आहे. उदाहरणार्थ;

बाराखड्या.

— ·— -— ·— — —· ·— ·— ·— ·— —· —·
क का कि की कु कू क्य क्या के कै को कौ

। ।˙ ⊢ ⊢˙ |. |. |‾ |‾ |- |- |. |.
च चा चि ची चु चू च्य च्या चे चै चो चौ.
इत्यादि.

परंतु यांचीं स्थळें व दिशा मनांत नीट भरण्याकरितां पुढील लेखांकडे नीट लक्ष द्यावें.

१७ व्यंजनाचे तीन अवयव किंवा भाग.

थेट उभीं किंवा निर्कस व्यंजनें असतां त्यांचें

शिखर	।	हा	प्रथमभाग
मध्य	⫶	हा	द्वितीयभाग
तळ	⫶	हा	तृतीयभाग.

अर्थात् अक्षरें खालून वर, किंवा वरून खालीं, लिहिण्याचीं असोत, त्यांच्या अवयवांमध्यें फेर पडत नाहीं.

आडवीं व्यंजनें असतां त्यांचा

आरंभ	·—	हा	प्रथमभाग
मध्य	-·-	हा	द्वितीयभाग
शेवट	—·	हा	तृतीयभाग.

व्यंजनाच्या दिशा.

थेट उभीं किंवा निर्कस व्यंजनें असतां त्यांची

पुढची बाजू	⁞	ती सरळ	दिशा
मागची बाजू	⁞	ती उलट	दिशा.

आडवीं व्यंजनें असतां त्यांची

वरची बाजू — ती सरळ दिशा,
खालची बाजू — ती उलट दिशा.

स्वरचिन्हांचीं स्थळें.

१९. कोणत्याही व्यंजनानंतर, त्याशीं मिळून येणारा जो स्वर असेल, तो चिन्हरूपानें त्या व्यंजनाच्या सरळ दिशेसच लिहावा. पण तो

अ आ किंवा य या असल्यास प्रथम भागीं,
इ ई " ए ऐ " द्वितीय भागीं,
उ ऊ " ओ औ " तृतीय भागीं,

याप्रमाणें लिहिला पाहिजे.

२०. परंतु व्यंजनापूर्वी नुसता स्वर असल्यास तो त्या व्यंजनाच्या उलट दिशेस यथास्थळी लिहिला पाहिजे. जसें, ईश्वर आदे, इत्यादि

अनुस्वार.

२१. ज्या स्वरानंतर अनुस्वार असेल, त्याचे चिन्ह न लिहितां त्याच्या स्थळीं वरील चिन्ह करावें. यांत ऱ्हस्वरूप स्वराच्या स्थळीं [◦] हें चिन्ह, आणि दीर्घरूप स्वराच्या स्थळीं [•] हें चिन्ह करावें, व हीं चिन्हें पूर्वीच्या स्वरानुसारें बारीक किंवा जाड असावीं. जसें, चंद्र साग. तसें, सौंदर्य, इत्यादि.

हकार [◡ ⌒].

२२. जोडाक्षरामध्यें ज्या व्यंजनाशीं हकार मिळाला असेल, त्याच्या सरळ दिशेला, स्वराच्या स्थळांप्रमाणें वरील चिन्हें करावीं; यांत प्रथम सहा स्वरांच्या स्थळीं [◡] हें, व पुढील सहांच्या स्थळीं [⌒] हें चिन्ह करावें. बारीक किंवा जाड लिहिणें तेंही स्वराप्रमाणेंच. जसें,
म्हणून, गुन्हेगार, इत्यादि.

सांध्यावरील चिन्हें.

२३. दोन व्यंजनांच्या सांध्यावर, पूर्व व्यंजनाचें एक व उत्तर व्यंजनाचें एक अशीं दोन चिन्हें आलीं, तर तीं क्रमानेंच जवळ जवळ लिहावीं. जागेची अडचण असल्यास क्रमानेंच एकावर एक लिहावें. जसें
चूक, तुलना, इत्यादि.

शब्द.

चंद्र, सुखरूप, वस्तु,
उपदेश, पुरुष. लक्ष्मी.
गुंजारव, ऐश्वर्य, चैतन्य.
व्याकरण. साधन, चंद्रिका.
औषध, वैशाख, सह्याद्रि.

संक्षेप.

२४. मागील लेखांत सांगितल्याप्रमाणें लिहूं लागल्यास पुष्कळ त्वरित व शुद्ध लिहितां यईल. तथापि याहूनही विशेष त्वरा साधणें अवश्य आहे. म्हणून पुढील लेखांकडे लक्ष द्यावें.

२५. जरूरीनें लिहित असतां सर्व स्वरचिन्हें, अनुस्वार, जोडाक्षरांतील हकार, यकार, हे सोडून दिल्यावांचून निर्वाह नाहीं. हीं चिन्हें मागें सांगितलीं आहेत, तरी साधेल तरच तीं लिहावयाचीं. ज्ञपाल्यामध्यें तीं साधतच नाहींत; याकरितां बेलाशक सोडून द्यावीं. तथापि दुसऱ्या लेखांमध्यें सांगितल्याप्रमाणेंच शब्दस्थान बरोबर योजण्याची मात्र खबरदारी ठेविली पाहिजे.

क [०].

२६. क या व्यंजनाच्या जागीं कचें पूर्ण चिन्ह न लिहितां फक्त एक लहान वर्तुळ [०] करावें; व तें कोणत्याही दुसऱ्या फाट्याच्या आरंभीं किंवा शेवटीं आल्यास त्या त्या स्थळीं त्या फाट्यास जोडूनच लिहावें. जसें, ... काप, ... कापड, ... कर्शीदा, ... डाक, ... चाक, इत्यादि.

क्ष, क्र, कर, कार [०].

२७. यांच्या जागीं फक्त एक मोठें वर्तुळ करावें. याचा आकार सुमारे वरील क वर्तुळाच्या दुप्पट असावा. य कोणत्याही दुसऱ्या फाट्याच्या आरंभीं किंवा शेवटीं हीं अक्षरें आल्यास त्या त्या जागीं त्या फाट्यास जोडून तें वर्तुळ करावें. जसें .... चक्र, ... गावकर, ... कारण, ... माकर, इत्यादि.

र [‿].

२८. र या व्यंजनाच्या जागीं फक्त एक लांबोडा बारीक फांसा [‿] करावा, व कारण पडल्यास वरील चिन्हाप्रमाणेंच दुसऱ्या फाट्यास जोडून लिहावा. जसे .... दर, दार, ... धर, ... राग, ... गार, ... रकम, इत्यादि.

प्र पृ पर परा परि [‿]

२९. कोणत्याही दुसऱ्या फाट्याच्या आरंभीं किंवा शेवटीं यांतून एकादें अक्षर आल्यास त्याच्या जागीं फक्त एक मोठा फांसा करावा. जसें, ... प्रकाश, ... पृथ्वी, ... परकीय, ... परामर्श, ... परपरा, ... परिधि, इत्यादि.

न.

३०. ज्या फाट्याच्या शेवटीं न, ण, नें, णें, नीं, णीं, यानें, याणें, याणीं, ईन, ऊन, एन, हून, तून, यांतून कोणतही अक्षर किंवा प्रत्यय येईल, त्याच्या शेवटीं उलटी एक लहान कडी क-

रावीं. जसें, दान, मण, गोणी, पान, पाहून, म्हणून, बसेन, घेऊन, इत्यादि.

सूचना– **पान** आणि **पाहून** हे दोन्ही शब्द सारखेच लिहितां येतील; परंतु संशय न पडावा म्हणून पाहू शब्द आधीं लिहून, पुढें प्रत्यय लावावा हें बरें

त.

३१. ज्या फाट्याच्या **शेवटीं**, त, आंत, न्त तां. ईत, इतां, इतानां, यांतून कोणतेंहीं अक्षर किंवा प्रत्यय येईल, त्याच्या **शेवटीं** फक्त एक **मोठी कडी** करावी. जसें, भिंत, मदन, जातां, इत्यादि.

संक्षिप्त चिन्हांचें कोष्टक.

वर्तुळ.		फांसा.		कडी.	
लहान.	मोठें.	लहान.	मोठा.	लहान.	मोठी
क	कर	र	पर	न	त
∘	○	‿	◡	⌣	⌣

उलटीं संक्षिप्त चिन्हें.

३२. मागें सांगितलेलीं सर्व संक्षिप्त चिन्हें ज्या क्रमानें लिहावयाचीं, त्याच क्रमानें, वाचावयाचीं. परंतु पुढें येणारीं, **स** आणि **ल** यांबद्दलचीं जीं संक्षिप्त चिन्हें आंचा क्रम उलट आहे; म्हणजे ज्या फाट्यापूर्वीं तीं चिन्हें येतील, **त्यांच्या नंतर** त्यांचा उच्चार करावा लागतो.

स.

३३. ज्या फाट्याच्या **शेवटीं स, श, ष, यास, यावयास, ण्यास, ल्यास, शीं**, यांतून कोणत्याही अक्षराचा किंवा प्रत्ययाचा उच्चार होईल, त्याच्या **आरंभीं** फक्त एक लहान कडी करावी; व ती वरील नियमानुसार त्या फाट्या **नंतर वाचावी**. जसें, त्यास, बेस, ससा, वासरू, लिहिण्यास, मशीं, इत्यादि.

ल.

३४. ज्या फाट्याच्या **शेवटीं ल, ला, ली, लें, ले, ल्या, लीं, याला, आवयाला, ण्याला, इला, ईल, एल**, यांतून कोणत्याही अक्षराचा किंवा प्रत्ययाचा उच्चार होईल, त्याच्या **आरंभीं** फक्त एक मोठी कडी करावी, व ती त्या **नंतर वाचावी**. जसें, कमल, काल, गेला, बसला, ण्याला, देईल, इत्यादि.

सूचना– जशीं वर्तुळें व फांसे पाहिजेल तर स्वतंत्र लिहितां येतात, तसा प्रकार कड्यांचा नाहीं. कड्या दुसऱ्या फाट्याला जोडूनच लिहिल्या पाहिजेत. तसेंच कोणत्याही फाट्याच्या आधीं

ही जी कडी असते, तिचाही उच्चार त्या फाट्याच्या पाठीमागूनच झाला पाहिजे, ह्मणून विशेषें करून **स, ल,** यांबद्दलच्या कड्या करितांना फार सावधगिरी ठेविली पाहिजे. शब्दाच्या आरंभींच जर स ल न किंवा त अक्षराचा उच्चार असला, तर तेथें त्यांबद्दल कड्या न करितां पूर्ण फांटेच केले पाहिजेत.

संक्षिप्त चिन्हांचा झोंक

३५. वर सांगितलेलीं **वर्तुळें, फांसे, व कड्या,** हीं चिन्हें कोररूप फाट्याला जोडावयाचीं असल्यास, त्या कोरेचा झोंक ज्या दिशेस असेल, ती दिशा न बदलतां, कोरेच्या झोकालाच जमतील अशा रीतीनेंच तीं चिन्हें जोडावीं. सरळरेषारूप फाटा असल्यास वरील चिन्हे, सोई प्रमाणें सरळ किंवा उलटें यांतून कोणत्याही दिशेस जोडल्यास चिंता नाहीं. पण सरळ दिशाच साधणें हें चांगलें.

द्वित्वाक्षर.

३६. ज्या फाट्यामध्यें द्वित्व दाखवावयाचें असेल, त्याच्या मध्यभागीं विभाग करावा. ह्मणजे झालें, पण अशा स्थळीं संक्षिप्तचिन्ह न लिहितां पूर्ण फाटाच करावा. जसें लुच्चा, पक्का, वट्टा, इ०.

सावधगिरी.

३७. वर संक्षिप्त चिन्हें दिलीं आहेत खरीं; पण जेथें संशयस्थान असेल, तेथें पूर्ण फांटेच करावे. तसेंच कोठेही घाईमुळें संक्षेपाच्या स्थळीं पूर्ण चिन्ह पडल्यास चिंता नाहीं. वर्तुळें व फांसे यांशिवाय इतर कोणतेंही संक्षिप्त चिन्ह आलें असतां, शब्दामध्यें एक तरी पूर्ण फाटा असू द्यावा. संशय नसेल, अशा स्थळीं दोन तीन संक्षेप एकत्र करण्यास हरकत नाहीं. या सर्व गोष्टींवरून पाहतां, एकच शब्द दोन तीन तऱ्हांनींही लिहितां येईल हें उघड आहे.

संक्षेपामध्यें स्वरचिन्हें.

३८. घाईच्या वेळीं स्वरचिन्हें सोडून द्यावीं लागतात, असें मागें सांगितलेंच आहे. तथापि स्पष्टपणाकरितां हवीतर मागाहून कांहीं जोडतां येतात तरी तेथेंही धोरणानेंच काम पुष्कळ. असो. एक साधारण नियम एथें देऊन ठेवितों. त्याचा होईल तितका उपयोग करावा.

संक्षिप्त चिन्हाची वरची किंवा उजवी बाजू हा प्रथमभाग, मध्य हा द्वितीयभाग. आणि खालची

किंवा डावी बाजू हा तृतीयभाग, मानून स्वरचिन्हें जो डावीं; किंवा पुढें एखादा फाटा असल्यास त्याच्या उलट दिशेस यथास्थानीं तीं चिन्हें जोडावीं. जसें काय, श्री, कारण, इ०.

शब्दाच्या आरंभीं येणारा अ.


३९. अ हें अक्षर निषेधार्थक आहे; ह्मणून शब्दांतील स्वरचिन्हें सोडून देण्याच्या नियमापासून कित्येक स्थळीं अर्थविपर्यास होण्याचा फार संभव. याकरितां पुढील नियम केला आहे.

४०. शब्दाच्या आरंभींच अ असल्यास फाट्याला आरंभ करतानांच उलट झोक घेऊन आरंभ करावा. जसें अज्ञान, अशक्य, अपूर्ण, इ०.

वारंवार येणारे शब्द.

अथवा	असो
असा	आणि
असेल	आनां

आंत	कांहीं
आधीं.	किनेक
आपण	केवढा
आपला	केव्हां
आहे	कोण
आम्ही	कोणीएक
इकडे	कोठें
ईश्वर	खाली
एक	जर
एथें	जसा
एथून	जा
कधीं	जेथें
कडे	जो
कडून	जेवढा
कर	झटकन्
करितां	ठायीं
कसा	तथापि
करून	तर
कां	तसा
काय	तस्मात्
करणें, कारणें	तिकडे
काल	तुह्मी



परिशिष्ट.

बाळबोध लिपि सर्वोत्कृष्ट. व मोडी लिपिही कारकुनी कामास फार चांगली असें मागें म्हटलें आहे; तथापि त्यांविषयीं कांहीं जास्त लिहिलें पाहिजे.

आपल्या देशीं ज्से छाप सुरू झाल्यापासून, इंग्रजांची छापी (रोमन) लिपि व आपली बाळबोध लिपि यांमध्यें तारतम्य दिसत चालतें. ज्से छापखान्यामध्यें बाळबोध लिपीची एक ओळ तयार करण्यास, अक्षराच्या अंगाबद्दल एक, मात्रा वेलांटी वगैरे बद्दल एक आणि उकार ऋकार यांबद्दल एक अशा तीन ओळी तयार कराव्या लागून मागें पुढें त्या न सराव्या म्हणून आणखी फार हुशारी ठेवावी लागते. इंग्रजी लिपीमध्यें फक्त एकाच ओळीनें काम होतें: चिन्हें वगैरे समोरच जोडतात, या मुळें शब्द लांबट झाले तरी छापणें सुलभ व त्वरित होतें. पण मराठीमध्यें मोठमोठीं पुस्तकें व वर्तमानपत्रें वगैरे छापण्याचे श्रम फार पडून कामही लौकर निघत नाहीं.

दुसरें, – कित्येक मोठमोठे संस्कृतादि भाषांचे ग्रंथ इंग्लंड, फ्रान्स, जर्मनि, अमेरिका, वगैरे देशीं तद्देशीय लोक पूर्वोक्त अडचणीमुळें आपल्या इंग्रजी लिपीनेंच छापून आमच्या देशींही पाठवितात. व आमच्या देशींही साधेल तेथें ते लोक तीच लिपि योजतात. सांप्रत तर संस्कृतादि ग्रंथाला आमच्या देशीं उत्तेजन नाहीं; परदेशी

लोकांनीं आमचे ग्रंथ सहज शिकावे, व त्यांची लिपि शिकल्यावाचून, आम्हाला आमचे ग्रंथ वाचतां सुद्धां येऊ नयेत, ही मोठी दुःखाची गोष्ट होय.

या दुःखकारक गोष्टींचा परिहार कसा व्हावा ? याकडे कित्येक विद्वानांचें लक्ष लागलें आहे; व कोणी योग्य उपाय सुचविल्यास, तो ग्राह्य करण्यास आमचे छापखानेवालेही आळस करणार नाहींत. ह्मणून पुढील युक्ति केली आहे.

१. मूळाक्षरें जोडाक्षरें काने व विसर्ग पूर्वी प्रमाणेंच लिहावे, त्यांमध्यें कांहीं फेर नाहीं.

२. अक्षरावरील रेफ, आणि ऱ्हस्व वेलांटी वर न लिहितां डाव्या बाजूसच लिहावीं.

३. मात्रा, अनुस्वार, दीर्घ वेलांटी, उकारचिन्हें, ऋकारचिन्हें, व व्यंजनत्व सूचक (्) हें चिन्ह हीं सर्व उजव्या बाजूस लिहावीं. उदाहरणार्थ बाराखडी.

क का कि की कु कू कृ के कै को कौ कं कः

स्वर.

अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ

ऌ ॡ ए ऐ ओ औ अं अः

इतर अक्षरें.

क्र (क्र), कृ (कृ), क्लृ (क्लृ), क्लॄ (क्लॄ)

क्* (क्), र्क (र्क), इत्यादि.

*्‌ मात्रा आणि ् यांमध्यें भेद दाखवण्याकरितां हें ् व्यंजन चिन्ह अक्षराच्या अगदीं पायाजवळ लिहावें.

२. मोडी लिपीमध्यें इ उ यां स्वरांचे ऱ्हस्व दीर्घत्व दाखविण्याची वस्तुतः गरज नाहींच. तथापि वर्तमान पत्रादिकांत छापण्याचा मजकूर लिहून पाठविण्याचा, या ऱ्हस्व दीर्घत्वाच्या अभावामुळें, आपली सर्वसाध्य व सुंदर मोडी लिपि योजतां येत नाहीं. ही अडचण दूर करण्याकरितां पुढील भेद लक्षांत ठेवल्यास चांगलें होईल.

स्वर.


	इ.		उ.	
ऱ्हस्व	ि	ि	ु,	ु
दीर्घ	ी	ी,	ू,	ू

अक्षरें


ऱ्हस्व	श्री	श्रीं;	खी	खीं;	पु;
दीर्घ	श्री	श्रीं;	खी	खीं;	पू; इत्यादि.

तात्पर्य, सध्यां जी इ उकारयुक्त अक्षरें आहेत, तीं सर्व ऱ्हस्व समजावीं. व दीर्घत्व दाखविण्याकरितां, बारीक गांठ किंवा उलट निग, याची योजना करावी. त्यांत अक्षराचा फांटा परत उजव्या बाजूस वर चढून ओळीला मिळत नसेल, तेथें बारीक गांठ; आणि फांटा फिरून वर चढत असेल तेथें उलट निग (बंगाली निग) करावा.


ड (ड) आणि द (द) यांतील भेद स्पष्ट दाखवावा. संशयाच्या स्थळीं ला ळा हीं अक्षरें ल (ळ) सारखीं न लिहितां बाळबोधी सारखींच लिहावीं; व सर्व अक्षरें स्पष्ट लिहिण्याची जी शिकस्त करणें, ती सर्वांचा सर्व दाखवावें.




कोल्हा आणि कावळा.




कोल्हा आणि द्राक्षें.





कुत्रा आणि त्याचें प्रतिबिंब.






कोल्हा आणि बकरा.







THE ORIGIN OF THE SANSKRIT ALPHABET

One evening, just a few days ago, as I was intently looking over the several forms of letters in a plate of Ancient Indian Alphabets, suddenly an idea struck me, and following its train I attempted to see how far it agreed with facts. The result of my enquiry was as follows: In the oldest Indian Alphabet—

𑀅	अ is shaped like an			अंकुश or goad.
𑀇	इ ,,	,,	,,	इल्वला or stars in the head of Orion.
𑀉	उ ,,	,,	,,	the उत्संग or lap.
𑀏	ए ,,	,,	,,	the एषणी or scale of a balance.
𑀓	क ,,	,,	,,	a कबंध or headless trunk.
𑀔, 𑀔	ख,,	,,	,,	a खग or bird.
𑀕	ग ,,	,,	,,	a गव्हर or cave.
𑀖	घ ,,	,,	,,	a घटी or water-clock.
𑀘	च ,,	,,	,,	a चमस or spoon.
𑀙	छ ,,	,,	,,	a छत्र or parasol.
𑀚	ज ,,	,,	,,	the जघन or posteriors.
𑀛	झ ,,	,,	,,	a झर* or waterfall.

* उत्सान्निर्गतो जलप्रवाह:।

	ट ,,	,,	,,	the टंकार or twang of a bow-string.
	ड ,,	,,	,,	a डमरु or hourglass-shaped drum.
	त ,,	,,	,,	a तर्कु or spindle.
	द ,,	,,	,,	the दंष्ट्रा † or lock-joint.
	ध ,,	,,	,,	a धनुः or bow.
	न ,,	,,	,,	the नर ‡ or pin of a sun-dial.
	प ,,	,,	,,	a पर्वन् or joint.
	फ ,,	,,	,,	a फणा or hood of a cobra.
	ब ,,	,,	,,	a बंधनागार or prison.
	भ ,,	,,	,,	a भद्रपीठ or royal seat.
	म ,,	,,	,,	the मद्यसंधान or distiller's pot
	य ,,	,,	,,	a यंत्र or drag-hook.
	र ,,	,,	,,	a रथ्या or street.
	ल ,,	,,	,,	a लता or creeper.
	व ,,	,,	,,	a वदर or berry.

† दंतपंक्तिद्वयप्रांतस्था द्विगुणाकृता दंतावालः।
‡ छायाप्रमाणज्ञानोपयोगी शंकुः।



श ,, ,, ,, a शंकुला or nut-cracker.

स ,, ,, ,, a सर्प or serpent.

ह ,, ,, ,, a हस्तिशुंडा or an elephant's trunk.

ठ is the doubling of ट, and looks like the सूर्य § or the sun.

ढ is the doubling of ड, and looks like a शुनोलांगूल or dog's tail.

ण is the doubling of न, and looks like a भूषण or jewel.

थ is the ठ with a dot in the centre, and looks like a दुर्ग or fort.

ञ looks like a biforked root.

ष shows प्राणिगर्भविमोचन *or delivery of a child.

ङ shows the mutual attraction between a sense and it object.

To my mind this seems to be something more than a mere accident. I believe all persons judging impartially from the above list will be convinced that the agreement between the shapes of letters therein and their sounds is intentional. In fact the oldest Indian alphabet, of which all

§ ठकारः सूर्यमंडले ।

* षूङ् प्राणिगर्भ विमोचने :।

other Indian alphabets, ancient and modern, are mere developments, is what is called a hieroglyphic or picture-shaped alphabet. The plan of this alphabet seems to be this. The inventor, whoever that blessed person might be, at first clearly arranged in his mind all the simple vowel and consouant sounds. He then proceeded to see and collect separately all Sanskrit words beginning with each of these simple sounds. He selected from each of the separate groups thus formed a single word that suited his purpose best, the chief condition of suitableness being, that the word selected should, without the least confusion, express the idea of a plain and well defined article in common life. An orderly collection of the outline pictures of the articles represented by these single words formed the first Indian Alphabet.

It is obvious from the table given above that the inventor took special care, perhaps for the sake of clearness of pronunciation, to see that in the case of consonantal letters the opening sound in each of the words thus selected was followed by the short vowel अ; and hence it is perhaps that the consonantal letters in the Sanskrit alphabet always have on inherent short अ after them.

As there are in Sankrit no words beginning with ङ,ञ, or ण, and no suitable words beginning with ठ, ढ, थ, or ष, the inventor was compelled to have recourse to some other plan in order to have pictures or signs to express these sounds. He doubled the signs for ट, ड, and न in order to get those for ठ, ढ, and ण respectively; and he put a dot in the centre of ठ to make it थ.

For ष he took to his assistance Sanskrit Grammar, which gives षूङ् as a conventional form of the verbal root सू signifying the delivery of a child, and thus gave a symbolical picture of that process to denote the sound of ष.

The letters ङ and ञ are the most difficult to deal with. Let us see however what the inventor has done with respect to them. It seems to me that while thinking of ङ, he had the word अङ्ग also brought before his mind by the close similarity of the two sounds; and as a last resource he found it convenient to express the sound of ङ by asymbolical picture of the attraction that subsists between अङ्ग or इंद्रिय and its विषय i. e. between a sense and its object. The crooked line in the figure I take for the upper part of the human body, composed of the head and one of the shoulders, and the horizontal one directed towards it for an object influencing one of the organs of sense such as the eye or the ear.

Now the letter ञ is the last one that requires an explanation. It is not quite clear to my mind what that sign or symbol really refers to. It may not however be unlikely that in this case also the inventor had to call his grammar to his assistance. There the letter ञ is used as an इत् or conventional temporary augment attached to several verbal roots to signify that each verbal root that has the letter ञ् affixed to it, is उभयपदी i. e. conjugated in two different ways, but literally meaning that it has two feet. It is not quite unlikely therefore that the form of the letter ञ, as it is found in the oldest Sanskrit alphabet, was originally intended to show a root of a tree forked into two.

If the above results of my enquiry are correct, I may draw some conclusions therefrom; and,

The first of them will be, that the inventor of this alphabet spoke Sanskrit, and was a man of Indian origin. and most probably a Brahman.

2nd.—This alphabet is not such as is borrowed from, or based upon, any other alphabet, Indian or foreign; but it had a decidedly independent origin.

3rd.—Though it is almost impossible at this stage of the enquiry to assert anything as to

the exact date of the origin of this alphabet, it is quite clear from the total absence of information on the point, that it must be at a considerably early time in the history of the Indian civilization that the nation invented the art of writing.

Another circumstance going to prove the great antiquity of the invention of the art of writing in India, seems to me to be this, that though the alphabet is clearly hieroglyphic or picture-shaped in its origin, yet there is not a single proof (at least to my knowledge) to show that during the last two thousand years or more, anybody ever suspected of its being a hieroglyphic alphabet.

It is quite possible that in a few cases I may have not hit upon the very words originally intended by the inventor of the alphabet to express the ideas represented by the picture letters, and also that a few letters such as ष, ञ, ङ, may have been added to the alphabet at a comparatively recent date by the exigencies of grammar. I am sure, however, that any person looking at this alphabet minutely, will admit that this possibility cannot be considered as a drawback to the main theory that the oldest Sanskrit alphabet was decidedly hieroglyphic and of clearly Indian origin.

I must now wait before I say anything further on this point, and see how my humble enquiry is appreciated by the impartial and liberal-minded gentlemen, who have devoted their lives to the researches of Indian antiquities.

Belgaum,
31st October 1892 — RAMCHANDRA BHIKAJI GUNJIKAR.

प्रथम भाग
समाप्त

स्फुट विषय.

दामोदर.

मोल्स्वर्थकृत मराठी–इंग्लिश कोशामध्यें ‘दामोदर’ या शब्दाचा अर्थ विलक्षण प्रकारचा दिला आहे. याचा खरा अर्थ म्हटला म्हणजे– ‘ज्याच्या उदराभोंवतीं दावें बांधलें आहे तो’ म्हणजे ‘दाव्यानें बांधून ठेविलेला.’ दामोदर हा शब्द कृष्णाला लागतो. बाळपणीं कृष्ण गोकुळांत असतां दांडगाई करूं लागला म्हणून यशोदेनें त्याला लडिवाळपणानें वासराच्या दाव्यानें बांधून ठेविलें होतें, अशी कथा आहे. त्या कथेशीं या शब्दाचा संबंध आहे. दुसरा विशेष सयुक्तिक अर्थ–‘दाम म्हणजे जग, लोक. यावरून अनंत लोक अथवा ब्रह्मांडें ज्याच्या उदरांत राहिलीं आहेत तो अर्थात् विष्णु’ दोहोंतून कोणताही अर्थ घेतला तरी तो विष्णु किंवा त्याचा अवतार कृष्ण याला लागतो. परंतु मोल्स्वर्थ यांनीं ‘दाम’ म्हणजे पैसा, द्रव्य, असा अर्थ घेऊन, ज्याच्या पोटीं अर्थात् ज्यापाशीं द्रव्य पुष्कळ आहे तो, म्हणजे श्रीमान् मनुष्य असा ‘दामोदर’ शब्दाचा अर्थ दिला आहे. तो **भ्रममूलक** आहे.

पोहरा.

पोहरा म्हणजे विहिरींतून पाणी काढण्याचें भांडें. या शब्दाची उत्पत्ति ‘अपोहर’ शब्दापासून झाली आहे, असें कित्येकांनीं लिहिलें आहे. परंतु तें शुद्ध नव्हे. ‘अपोहर हा शब्दच आधीं काल्पनिक आणि अशुद्ध आहे. ‘पोहणें’ यापासून ‘पोहरा’ शब्द झाला आहे, अशी एक नवी कल्पना हल्लीं निघाली आहे. परंतु या कल्पनेलाही कांहीं आधार नाहीं. वास्तविकपणें पाहिलें असतां, ‘पयोधरः’ शब्दाचा ‘पओहरो’ असा बाल भाषेंत अपभ्रंश होऊन, त्यापासून ‘पोहरा’ असा मराठी शब्द झाला आहे. ‘पयस्’ या शब्दाचे दोन अर्थ आहेत, एक उदक

आणि दुसरा दुग्ध. यावरून 'पयोधर' याचा एक अर्थ 'उदकाचें धारण करणारा,' असा आहे. म्हणून हा शब्द संस्कृतामध्यें मेघाला लागतो. आणि त्यावरूनच त्याचा मराठी अपभ्रंश असा जो 'पोहरा' शब्द तो 'उदकाचें धारण करणारा' पात्रविशेष याला लागतो. 'पयोधर' आणि 'पओहरो' याचा दुसरा अर्थ, 'दुग्ध धारण करणारा' अर्थात् स्त्रीस्तन असा आहे, पण प्रकृत विषयाशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं.

(पु० २१ वें, अंक ७-८ जुलई-ऑगस्ट १८८९).

'ला' किंवा 'लाहा.'

जेव्हां एकादा मनुष्य कांहीं अदृष्ट कारणामुळें कर्जाच्या अचाट पेचांत येतो, आणि त्याला त्या कर्जांतून मुक्त होण्याची कांहींच आशा नसते, तेव्हां आपणाला त्या संकटांतून सोडविण्याकरितां जर त्याणें सरकारांत अर्ज दिला, तर त्याच्या स्थितीची चौकशी करून योग्य कारण दिसल्यास त्याला त्या कर्जाची माफी द्यावी, असा सरकारानें कायदा केला आहे. तो कायदा आपणाला लागू करावा म्हणून जर कोणी अर्ज केला, आणि त्याप्रमाणें—त्याणें माफी मिळविली, तर त्याणें 'ला' घेतला, किंवा 'लाहा' घेतली असें म्हणतात. परंतु हा शब्द प्रचारांत कसा आला, हें थोड्याच लोकांनां ठाऊक असेल. कित्येक लोक तर हा शब्द मराठीच असेल असें मानतात. परंतु हा इंग्रजी शब्द "LAW लॉ" असा आहे. याचा अर्थ कायदा. यावरून नादार कर्जदाराची सुटका करणाऱ्या कायद्याचा आश्रय करणें, म्हणजे 'ला' घेणें असें म्हणणें प्रचारांत आलें आहे. अर्थात् 'ला' घेणें म्हणजे सरकारदरबारांतून नादार ठरणें होय.

(पुस्तक २२ वें, अंक ७ वा; जुलै १८९०).
